# नानासाहेब पेशवे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.
REFBK-0003048

[illegible]

गंद ३९८

भारत-गौरव-ग्रंथमाला, पुष्प ६८ वें.

# नानासाहेब पेशवे

( हकीकत दाखविणाऱ्या मूळ पत्रांसह ).



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 3084

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

—भगवान् श्रीकृष्ण.

REFBK-0003048

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

---

प्रस्तावक

त्र्यंबक शंकर शेजवलकर, बी. ए.

---

साधी प्रत दीड रुपया.] किंमत [ कापडी प्रत दोन रुपये.

प्रकाशक
एम्. एन्. कुळकर्णी,
मालक,
भारत-गौरव-ग्रंथमाला,
२१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे वगैरे सर्व
प्रकारचे हक्क लेखकानें आपणाकडे
राखून ठेवले आहेत.

मुद्रक
एम्. एन्. कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
२१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.



छत्रपति शाहू महाराज

Lakshmi Art, Bombay 8.

राघोबा दादा

Lakshmi Art, Bombay 8.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भारत-गौरव-ग्रंथमालेचें हें ६८ वें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस आनंद होत आहे. रा. रा. सरदेसाई यांजसारखे अधिकारी इतिहासलेखक मालेस लाभले हें तिचें मोठें भाग्य होय. ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचीं चरित्रें हें वाङ्मयाचें महत्त्वाचें अंग आहे. कादंबऱ्यांसारख्या सुलभग्राही वाङ्मयाच्या वाचनानें घटकाभर मनाची करमणूक होईल, पण त्यापासून बुद्धीला जागृति आणण्याचें कार्य फारसें होणार नाहीं. आपण वाचीत आहों ती कथा कल्पित आहे असा ग्रह बुद्धीवर आधींच आरूढ झाल्यामुळें, त्या कथेंतील साऱ्याच भल्याबुऱ्या गोष्टी आपण कल्पनेच्या सदरांत ढकलतों. यामुळें त्यांतून घेण्यासारख्या अथवा टाकण्यासारख्या गोष्टी कोणत्या याचा विचार करण्याकडे आपली बुद्धि सहसा वळत नाहीं. पण चरित्रांची—विशेषतः ऐतिहासिक चरित्रांची—गोष्ट तशी नाहीं. चरित्रांतील सारीं पात्रें प्रत्यक्ष सृष्टींत वावरणारीं होतीं अशी आपल्या मनाची खात्री असते. ऐतिहासिक स्त्रीपुरुषांच्या कृत्यांचे परिणाम अल्पजीवी अथवा त्या त्या व्यक्तीपुरते नसून, सबंध राष्ट्रावर घडत असतात, आणि कित्येक वेळां त्यांच्या कृती राष्ट्राचा सारा जीवनौघ बदलण्यासही कारणीभूत होत असतात. याकरितांच ऐतिहासिक चरित्रें ही वाङ्मयांतील कायमची संपत्ति होय. या संपत्तींत जितकी अधिक भर पडेल तितकी ती अधिक उपकारक होईल.

रा. रा. सरदेसाई यांचे इतिहासग्रंथ कोणाच्या अवलोकनांत नसतील असें नाहीं. त्यांचा इतिहासाचा व्यासंग दीर्घकालाचा असून तो लक्षपूर्वक झाला आहे. यामुळें ऐतिहासिक चरित्रें लिहिण्याचा अधिकार त्यांस सहजगत्याच प्राप्त झाला आहे असें म्हणणें खास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. प्रस्तुत चरित्रग्रंथ जो कोणी वाचून पाहील त्याची खात्री आपोआपच पटण्यासारखी असल्यामुळें, आमच्यासारख्यांनीं अलाहिदा खातरजमा करण्याचें कारणच नाहीं.

चरित्रग्रंथांच्या वाचनाची हौस पुष्कळांस नसते असें आमच्या कानीं आलें आहे. ही गोष्ट परदेशीय व्यक्तींच्या चरित्रांपुरती कदाचित् खरी असेल. ज्यांना आपण कल्पनेनेंही पुरतेंसें जाणूं शकत नाहीं, त्यांच्या चरित्रांच्या वाचनाकडे आपलें चित्त न वेधलें तर त्यांत नवल नाहीं. पण मराठ्यांच्या इतिहासांतील

प्रसिद्ध व्यक्तींच्या चरित्रवाचनांत खुद्द मराठ्यांचेंच मन रमत नाहीं. असें कोणी म्हटलें तर तें आम्हांस कालत्रयींही खरें वाटणार नाहीं. सारा देश मुसलमानांच्या घाण्यांत रगडला जात असतां, ज्यांनीं त्यापासून त्याला मुक्त केला अशा पुरुषांचीं चरित्रें ज्याला रुचत नाहींत इतका अभागी मराठा कोणी असेल असें आम्हांस तरी वाटत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासांतील जितकीं चरित्रें मिळतील तितकीं आज थोडींच. प्रस्तुत चरित्रासारखीं अनेक चरित्रें रा. रा. सरदेसाई यांनीं लिहावीं अशी विनंति त्यांना आम्हीं केली तर आमचा सारा वाचकवर्ग तिला एकमुखानें दुजोरा देईल अशी आमची खात्री आहे.

रा. रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनीं प्रस्तुत चरित्राला प्रस्तावना लिहिली आहे, तिच्यासंबंधीं सूचनेचे दोन शब्द आमच्या वाचकांच्या कानावर घालणें अनाठायीं होणार नाहीं.

जगांतील मुत्सद्दीमंडळांत प्रस्तुत चरित्रनायकास कोणत्या दर्जावर बसवितां येईल याचाच विचार प्रामुख्यानें प्रस्तावनालेखकांनीं केला आहे. नानासाहेब पेशव्यांच्या कुळांत जन्मास आला, आणि मराठशाहीचीं सूत्रें दैवानें त्याच्या हातीं दिलीं, म्हणूनच त्याचें चरित्र लिहिण्याचा दुर्धर प्रसंग रा. रा. सरदेसायांवर आला असा शेजवलकरांच्या मताचा थोडक्यांत निष्कर्ष आहे. उलट पक्षीं चरित्रकार त्याला बरेंच वरचें स्थान देत आहेत. चरित्रकार आणि प्रस्तावनाकार यांच्या मतांतील हा भयंकर विरोध पाहून आमच्यासारखा सामान्य वाचक गांगरून गेल्यास नवल नाहीं. तेव्हां या विरोधाचें मूळ कोठें आहे याचें अल्पसें दिग्दर्शन आमच्या वाचकांसाठीं करणें अवश्य आहे.

प्रस्तावनाकारांची वृत्ति न्यायाधीशासारखी निष्ठुर आहे. आपणासमोर आलेल्या प्रत्यक्ष पुराव्यापलीकडे न्यायाधिशाची नजर जात नाहीं, त्याचप्रमाणें प्रस्तुत चरित्रनायकाची प्रत्येक कृति प्रस्तावनाकारांनीं धारवाडी कांट्यानें तोलली आहे. मनुष्याचे सारेच बेत आणि साऱ्याच भावना आपणास ठाऊक नसतात, त्याच्या योजना पार पडणें ही गोष्ट पुष्कळ अंशीं परिस्थितीवर अवलंबून असते. म्हणून ‘ ज्याच्या हातीं ससा तो पारधी ’ या सूत्रानेंच त्याच्या कृतीचें परीक्षण करणें योग्य नाहीं. आपली परिस्थिति सर्वथा उल्लंघून कोणीही मनुष्य पलीकडे जाऊं शकत नाहीं. त्याची राजकारणविषयक अथवा नीतिविषयक विचारसरणी त्या विशिष्ट काळापलीकडे फारशी गेलेली नसते. पेशवाई परत देण्यासाठीं प्रत्यक्ष

शाहूमहाराज सुद्धां जेथें नजराणा मागतात, तेथें नानासाहेबाचे स्वराज्यविषयक विचार सर्वव्यापी नसले तर त्यांत नवल नाहीं. त्याकाळीं आधीं स्वार्थाच्या विचारानें लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्याच हृदयांत ठाणें दिलें होतें. नानासाहेबाचा बहुतेक काळ या अंतस्थ झगड्यांत गेला असें आपणास दिसून येतें. हिंदुपदपातशाहीच्या त्याच्या साऱ्या कल्पनांवर ही कृष्ण छाया पसरली होती. यामुळें त्याच्या राजकारणी बुद्धीचा योग्य परिपोषच झाला नसण्याचाही संभव आहे. या छायेमुळेंच त्याची कृति विकृत झाली असेल. पण प्रस्तावनाकारांच्या मनांत हा विचारच आला नाहीं. शुद्ध परोक्ष तत्त्वांच्या कसोटीवर नानासाहेबास घांसून त्याला त्यांनीं हिणकस ठरविलें आहे. या दृष्टीनें त्यांनीं केलेलें नानासाहेबाचें परीक्षण योग्य आहे असें म्हणणें भाग आहे. इतिहासापासून आपणास कांहीं तरी शिकावयाचें असतें, याकरितां त्यांतील व्यक्तींच्या साऱ्या कृती सूक्ष्मदर्शकाखालीं घालून तपासल्या पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. इतिहास हा नुसता करमणुकीचा विषय नव्हे. प्रस्तावनाकारांचा हा मुद्दा लक्षांत ठेवून त्यांचा लेख आपण वाचला पाहिजे. गतकालीं आपल्या हातून घडलेल्या चुका त्यांनीं स्पष्टपणें आपणासमोर मांडल्या, याबद्दल त्यांजवर न रागावतां त्यापासून योग्य तो बोध आपण घेतला पाहिजे.

उलट पक्षीं, ग्रंथकार आपल्या चरित्रनायकाकडे अधिक सहानुभूतीनें पाहत आहेत. एका काळीं आमच्या भीमथडी तट्टांनीं साऱ्या देशभर संचार केला, आणि या घोडदौडीची पराकाष्ठा ज्याच्या राजवटींत झाली त्या पुरुषाबद्दल ग्रंथकारांना अभिमान वाटत आहे, आणि त्यांचा हा अभिमान अनाठायीं आहे असें कोणता मराठा म्हणेल ? टीकाकारांचें परीक्षण कठोर आणि हृदयविदारक असलें, तरी तें नितान्त बोधप्रद असल्यामुळें उपकारक आहे, त्याचप्रमाणें आपल्या राष्ट्राच्या अंगीं कांहीं कर्तबगारी खचित होती हें निदर्शनास आणून पुढील कार्यासाठीं ग्रंथकारांनीं आपणास उत्तेजित केलें आहे. आपणां मराठी वाचकवर्गावर दोघांचेही सारखेच उपकार आहेत. गतकालाचें मनोहर स्मरण भविष्याची आशा उत्पन्न करतें, आणि गतकालाच्या चुका पुढील मार्ग निष्कंटक करण्यास उपयोगीं पडतात. ग्रंथकार आणि प्रस्तावनाकार हे दोघेही अधिकारी लेखक आहेत. आपल्या ज्ञानाच्या ठेव्यांत सर्व महाराष्ट्रास त्यांनीं वांटेकरी करावें अशी त्या दोघांसही आमची विनंति आहे. विशेषतः अशी विनंति प्रस्तावनाकारांस करणें अधिक आवश्यक

आहे. त्यांच्या ज्ञानाचा परिचय महाराष्ट्रास अद्यापि झालेला नाहीं. तो त्यांनीं मुक्तहस्तानें आतां करून दिला पाहिजे. नाहीं तर, कृपणाच्या ठेव्याप्रमाणें त्यांचें ज्ञानधन जागच्या जागीं राहण्यांत कोणतें हित साधणार ?

प्रस्तुतची कृति वाचकांस पसंत पडल्यास, मराठ्यांच्या इतिहासांतील अशाच अनेक व्यक्तींचीं बोधप्रद चरित्रें मालेच्या द्वारें प्रसिद्ध करण्यास आम्हांस उमेद येईल हें सांगणें नकोच. मालेनें अनेक प्रकारच्या कामगिऱ्या हातीं घेण्याचा संकल्प केला आहे. पण हा संकल्प आकारास येण्यास वाचकांचें साहाय्य तिला पाहिजे. आमच्या वर्गणीदारांनीं मनांत आणलें तर प्रत्येकीं एक दोन नवे वर्गणीदार मिळवून देणें त्यांना जड आहे असें नाहीं. मालेकडे आपलेपणाच्या दृष्टीनें पाहून तिची जोपासना यांनीं करावी अशी त्यांस विनंति आहे.

# निवेदन.

भारत-गौरव-ग्रंथमालेचे माजी चालक कै. असे यांनी मला आपल्या मालेंत नानासाहेब पेशव्याचें चरित्र लिहिण्याची विनंति केली, ती मीं आनंदानें स्वीकारिली. परंतु दोन वर्षें होऊन गेलीं तरी इतर व्यवसायांत हें काम स्वतंत्रतेनें करण्यास मला बिलकूल सवड होईना; आणि पुनः जेव्हां कर्नाटक प्रेसकडून मला त्याबद्दल स्मरण देण्यांत आलें, तेव्हां माझे मित्र रा. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांस 'या कामीं मला मदत कराल काय,' म्हणून विचारिलें. त्यांनीं तें कबूल केल्यावर उभयतांनीं काय व कसें काम करावयाचें तें ठरविलें. नाना साहेब पेशव्याच्या कारभाराचे माझ्या रियासतींत दोन भाग झाले असून, त्यास सुमारें आठशें पानें गुंतलीं आहेत. बहुधा त्याच मजकुराचा संक्षेप करून चरित्राच्या धाटणीस साजेल अशी योजना आम्हीं ठरविली, आणि तें काम रा. शेजवलकरांनीं मोठ्या काळजीपूर्वक करून दिलें. नंतर तें मीं सर्व वाचून तपासलें आणि उभयतांच्या विचारानें जरूर ते कमीजास्त फेरफार केले. ती ही उभयतांच्या श्रमांची कृति आतां वाचकांसमोर येत आहे.

रा. शेजवलकरांचा व माझा आज दोन तीन वर्षें निकट परिचय असून, त्यांच्या इतके व्यासंगी, बुद्धिमान् व विद्वान् गृहस्थ माझ्या पाहण्यांत फारच थोडे आहेत. माझ्या इतिहासाच्या कामांत अनेक शंकांचें निरसन करण्यास त्यांची मला अतिशय मदत होते. यास्तव नानासाहेबाच्या या चरित्रास त्यांनींच आपली प्रस्तावना लिहावी आणि त्यांत त्यांनीं आपल्या दृष्टीनें एकंदर मराठशाहीच्या कारभाराचें सिंहावलोकन करावें असें आम्हीं ठरविलें. कित्येक महत्त्वाच्या बाबतींत त्यांचा माझा मतभेद असून, तो जाहीर रीतीनें वाचकांसमोर मांडल्यास त्यापासून इतिहासाचा फायदाच होईल, अशा बुद्धीनें मुद्दाम रा. शेजवलकर यांची प्रस्तावना या पुस्तकांत स्वतंत्र छापण्यांत आली आहे. हीप्रस्तावना लिहिण्याचें कबूल करून त्यांनीं माझा मोठा गौरव केला असें मी समजतों. या प्रस्तावनेवरूनच त्यांची लायकी केवढी मोठी आहे याची खात्री वाचकांस होईल.

मराठ्यांचा इतिहास हल्लीं बनत आहे. पृथ्वीवरील थोर राजकर्त्यांच्या पंक्तीस बसण्याजोगे अनेक राज्यकर्ते मराठशाहींत झाले; त्यांचीं साधार चरित्रें लोकांसमोर अवश्य आलीं पाहिजेत. शिवछत्रपति, शाहूमहाराज, कान्होजी आंगरे,

बाजीराव, नानासाहेब व माधवराव पेशवे, अहल्याबाई, नाना फडणीस, महादजी सिंदे, रघूजी भोसले वगैरे किती तरी पराक्रमी व्यक्ती मराठशाहींत नामांकित झाल्या. परंतु ब्रिटिश सरकारामार्फत प्रसिद्ध झालेल्या ' रूलर्स ऑफ इंडिया ' नामक हिंदी राज्यकर्त्यांच्या मालेंत वरच्यांपैकीं फक्त एकाच व्यक्तीचा म्हणजे महादजी सिंद्यांचा तेवढा समावेश आहे. याचा अर्थ महादजीशिवाय दुसरे कोणी त्याच्या तोडीचे झाले नाहींत असा समजतां नये. बहुधा इतरांची असावी तितकी भरपूर माहिती इंग्रजींत उपलब्ध नसल्यामुळें, त्यांचीं चरित्रें त्या मालेंत किंवा इतरत्र बाहेर येऊं शकलीं नाहींत. याचा अर्थच असा, कीं आमचा राष्ट्रीय इतिहास आपला आपणच बनविला पाहिजे. प्रस्तुतची ही कृति वाचकांस पसंत पडल्यास, अशाच धर्तीचीं आणखी अनेक चरित्रें बाहेर आणण्यास लेखकांस व प्रकाशकांस उमेद येईल हें सांगणें नकोच. तसेंच हीं चरित्रें अखिल हिंदी वाचकांसाठीं इंग्रजींत लिहून प्रसिद्ध झालीं पाहिजेत, तोही योग उत्तरोत्तर आणावा अशी इच्छा आहे.

सर्व पेशव्यांत नानासाहेव पेशव्या एवढा विस्तृत व खोंचदार लेखक दुसरा कोणी झाला नाहीं. वास्तविक त्याचें चरित्र स्वतंत्र देण्यापेक्षां, ज्यांत त्याचें अंतरंग भरपूर उतरलें आहे अशीं त्याचीं पत्रेंच एकत्र दिल्यानें मोठें काम होईल; ही गोष्ट लक्षांत घेऊन या पेशव्याचीं प्रसिद्ध असलेलीं बहुतेक महत्त्वाचीं पत्रें किंवा त्यांतील जरुरी पुरते उतारे त्या त्या प्रकरणीं ठिकठिकाणीं दिले आहेत, त्यांवरून या पेशव्याची योग्यता वाचकांस आपापल्या अंदाजाप्रमाणें ठरवितां येईल. मागाहून आढळलेलीं कांहीं पत्रें परिशिष्टांत दिलीं आहेत. इतर अंगांतही पुस्तक शक्य तितकें उपयोगी करण्यांत लेखकांनीं व प्रकाशकांनीं कसूर केलेली नाहीं, हेंही चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येईलच.

रा. भसे यांचे पश्चात् त्यांचें अंगीकृत कार्य कर्नाटक छापखान्याचे मालक रा. कुळकर्णी यांनीं अंगावर घेऊन पुढें चालविलें आहे, याबद्दल महाराष्ट्रानें त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. लेखक व प्रकाशक यांच्या सहकारितेनेंच अशीं कामें सिद्धीस जातात. सबब या मालेचें अभीष्ट चिंतून मी वाचकांची रजा घेतों.

मुंबई, ता. १ आगस्ट स. १९२६. }

**गोविंद सखाराम सरदेसाई.**

---

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रस्तावना | | १–३६ |
| १ लें. | —पूर्व वृत्तान्त | १ |
| २ रें. | —पेशवेपदप्राप्ति व पुढील उपक्रम | ७ |
| ३ रें. | —कारभाराचें सामान्य स्वरूप | १३ |
| ४ थें. | —रघूजी भोसल्याशीं समेट | १७ |
| ५ वें. | —दक्षिणोत्तर भानगडी | २९ |
| ६ वें. | —पेशवाईवरून अल्पकाल दूर | ४० |
| ७ वें. | —शिंदेहोळकरांचा बेबनाव | ५२ |
| ८ वें. | —शाहूची अखेर | ६२ |
| ९ वें. | —मराठेशाहींतील परिवर्तन | ७६ |
| १० वें. | —सांगोल्याची व्यवस्था | ८६ |
| ११ वें. | —ताराबाईशीं घासाघीस | ९७ |
| १२ वें. | —निजामशाहीचे लचके | ११३ |
| १३ वें. | —उत्तरेंतील बिघाडाची सुरवात | १३० |
| १४ वें. | —स्वकीयांचे विरुद्ध परकीयांची मदत | १४८ |
| १५ वें. | —हिंदुपदपातशाहीची सिद्धता | १५६ |
| १६ वें. | —अटकेवरील झेंडे | १७२ |
| १७ वें. | —पानिपतचें प्रचंड युद्ध | १८७ |
| १८ वें. | —नानासाहेबाचा मृत्यु व कर्तबगारी | २०५ |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
| --- | --- | --- | --- |
| ८ | १५ | शहूच्या | शाहूच्या |
| २१ | १९ | सहाशिवराव | सदाशिवराव |
| २५ | २८ | ज्योत्याजी | जोत्याजी |
| ३० | ९ | असल्यानें | नसल्यानें |
| ,, | १७ | प्रभती | प्रभृति |
| ४१ | ३ | गण | पण |
| ७३ | २ | राज्यहितषी | राज्यहितैषी |
| ७६ | २४ | टीकाकर | टीकाकार |
| ७७ | ६ व ८ | ग्रँड्र डफ | ग्रँट डफ |
| ९८ | २२ | निजाम, | निजाम |
| १९२ | २४ | सहाशिवरावानें | सदाशिवरावानें |
| १९७ | टीप ५ | श्रीमंतीस | श्रीमंतांस |

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 327...
3088

# प्रस्तावना

ती. रा. गोविंदरावनाना सरदेसाई यांच्या सारख्या विख्यात इतिहासकाराच्या ग्रंथास वास्तवीक दुसऱ्या कोणा माणसाची प्रस्तावना जोडण्याचें कारण नाहीं. त्यांतहि ग्रंथकाराहून त्या त्या विषयांत जास्त अधिकारी व सुप्रसिद्ध माणसानें ती लिहिली तर असो, पण हे गुण नसणाऱ्यानें तर ती लिहूंच नये. परंतु या माझ्या मताला विरोध एकाच गोष्टीचा व ती गोष्ट ग्रंथकारांची इच्छा. आणि या इच्छेचें कारण ग्रंथकारांचा व माझा मराठ्यांच्या इतिहासांतील बऱ्याच मुद्द्यांवर होणारा मतभेद. ग्रंथकारांच्या मतें हा मतभेद मी आपल्याजवळच राखून न ठेवतां जगांतहि त्याचा प्रसार करावा! त्यांच्या इच्छेस मान देणें हें माझें कर्तव्य असल्यानेंच मी लेखणी हातीं धरीत आहें.

ग्रंथांतील गोष्टी व घडामोडी कालस्थलादि दृष्टया तपासणें हा या ठिकाणीं माझा हेतु नाहीं. असलें काम संशोधकांच्या बैठकींत यथावकाश करतां येईल. मराठ्यांच्या इतिहासांतील अनेक घडामोडींची रूपरेषा ग्रंथकारांना प्रथमच एकट्यानें ठरवावी लागल्यामुळें, त्यांत तपासणी करण्यास बरीच जागा राहिली असणें हें अगदीं साहजीक आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें कार्य अजून अपूर्ण स्थितींत आहे व त्यांत बरेच फेरबदल करावे लागतील. माझा हेतु ग्रंथकारांपेक्षां जरा जास्त उंचीवर चढून व जरा खोल बुडी मारून मराठ्यांच्या इतिहासाचा पट डोळ्यांसमोर आणणें व त्याचा ठाव घेणें हा आहे.

'ज्या राष्ट्रांस भूतकाळ नाहीं त्यांस भविष्यकाळहि नाहीं,' अशी बहुतेक इतिहासकारांची समजूत आहे. त्यांच्या मतानें मराठे, शीख, रजपूत वगैरे ज्या लोकांनीं पूर्वीं इतिहासांत नांव गाजवलें त्यांचाच भविष्यकाल उज्ज्वल होणें शक्य आहे. हिंदुस्थानाबाहेर जाऊन यूरोपाकडे पाहावयाचें तर रोमन, ग्रीक, फ्रेंच वगैरे लोकांच्या वंशजांचाच भावी इतिहास बनणार आहे! ही समजूत इतकी दृढ आहे कीं, जगाच्या इतिहासकारांपैकीं बहुतेक हें सूत्र पुढें ठेवूनच आपला इतिहास लिहीत असतात. इतिहासाची सरणी याच सूत्रान्वयें लावण्याची त्यांची रीत असते. फार काय, या सूत्राशीं न जुळणाऱ्या बऱ्याच गोष्टी दडविण्याची व त्यास पोषक अशा गोष्टी निर्माण करण्याचीहि त्यांची तयारी असते. गेल्या महा-

युद्धापूर्वीच्या काळांत जर्मनींत या प्रवृत्तीचा अतिरेक झालेला पहावयास सांपडतो. भूतकाळांत केलें काय तें आमच्या पूर्वजांनीं व अर्थात्, पुढेंहि करणार काय ते आम्हीच, अशी जर्मन लेखकांची गर्जना होती. याच कल्पनेनें लिहिलेल्या इतिहासांचें प्राथमिक शाळांपासून अध्ययन जर्मन मुलें करीत असत. व सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे, या सत्यापलापाचें समर्थन करण्यांत जर्मनींतील अनेक विद्वान् भूषण मानीत व समाजांतून ते उजळ माथ्यानें फिरत. त्यांच्या सिद्धांतास धक्का दिला काय तो महायुद्धाच्या निकालानें ! आमच्या इकडेहि असे इतिहासकार अविश्रुत नाहींत. पण राष्ट्राच्या सध्यांच्या विप्लवांत आपल्या सिद्धांतांचें समर्थन करणें त्यांस जड जातें एवढेंच. एक संशोधक माझ्याशीं बोलतांना म्हणाले, 'अहो, पेशव्यांबद्दल लिहितांना आपणांस जरा जपूनच लिहिलें पाहिजे, नाहींतर हे ब्राह्मणेतर आपल्याच वाक्यांचा अहेर आपणांस करावयाचे व त्यांचा ब्राह्मणांविरुद्ध उपयोग करून घ्यावयाचे.' या गृहस्थांची इतिहासाबद्दलची कल्पना काय असावी याचें अनुमान करणें कठीण नाहीं. यांच्या मतानें इतिहासाचा उपयोग शहाणपणा शिकण्याकडे करावयाचा नसून, वर्तमानपत्रांच्या एखाद्या चळवळींतील लेखांप्रमाणें लोकांस, दोषांबद्दल अंधकारांत ठेवून एखाद्या मार्गास प्रवृत्त करण्याकडे करावयाचा असतो. शास्त्रीय वर्गीकरणाच्या परिभाषेंत बोलावयाचें तर त्यांच्या मतानें इतिहास हें शास्त्र नसून ती एक उपयुक्त कला आहे.

ज्यांस भूतकाळ नाहीं त्यांस भविष्यकाळ नाहीं, या सिद्धांताचा अर्थ जर, ज्यांच्या जवळ भूतकालीं संपादन केलेल्या कांहीं गोष्टी संग्रहीं आहेत त्यांस भविष्यकाळ उज्ज्वल करण्यास सोपें जाणार आहे, एवढाच असला तर तो खराच आहे. जसें व्यक्तीच्या उदयाचा विचार कर्तव्य असतां त्याचा आनुवंशिक पिंड आपण पाहतों तसें राष्ट्राचा पिंडहि पाहणें गैर नव्हे. पितरांपासून उतरलेला पिंडच जर रोगग्रस्त असेल तर त्या व्यक्तीस पुरुषार्थ साधण्यास मुळांतच अडचण येणार हें उघड आहे. परंतु हा सिद्धांत प्रतिपादणाऱ्यांचा उद्देश वेगळ्याच आशयाचा असतो. उदाहरणार्थ, आज आमचे प्रभु जेव्हां आम्हांस सांगतात कीं, हिंदुस्थान स्वराज्यास अपात्र आहे, कारण पूर्वीं कधीं या देशानें स्वराज्य वहिवाटलेलें नाहीं, तेव्हां त्यांची या सिद्धांताचा अर्थ लावण्याची रीत काय हें कोणास सांगावयास पाहिजे ? ते इतिहासांतील कांहीं गोष्टींचा उपयोग जित राष्ट्रास कायमचेंच खच्ची करण्याकडे करीत आहेत व ते इतिहासाकडे कला या दृष्टीनें पाहतात हें उघड होतें. इतिहासाचा तसाच उपयोग आज गोरीं राष्ट्रें तदितरांविरुद्ध करीत

आहेत. •आम्हांस मात्र हा सिद्धांत अशुद्ध वाटतो. आमच्या दृष्टीनें ऐतिहासिक भूतकाल नसणाऱ्या नीग्रोसारख्या लोकांसहि भविष्यकाल आहे. तसें नसेल तर, जगांतील कांहीं धर्मपंथ ज्याप्रमाणें त्यांच्या बाहेर असलेले लोक कायमचेच मोक्षास आंचवलेले समजतात, त्यांचाच सिद्धांत खरा म्हणण्याची आपत्ति ओढवेल ! म्हणजे शंकराचार्यांच्या भाषेंत ईश्वरावर " वैषम्यनैर्घृण्यप्रसंग " आला ! पण ज्या अर्थी ईश्वर हा आपण, कांहीं लोकांबद्दल मत्सरग्रस्त व क्रौर्यप्रेरित समजत नाहीं; ज्या व्यक्ति इतिहासप्रसिद्ध सरदार घराण्यांत न जन्मलेल्या, त्या पुढें सरदार होणारच नाहींत असें म्हणत नाहीं; किंवा गुजराथी वाणियांत गांधी, अमेरिकेंतील नीग्रोंत ड्युबॉय अथवा मूठभर उंचीच्या जपान्यांत टोगो निपजत नाहींत असा आपला अनुभव नाहीं; त्या अर्थी हा सिद्धांतच अबाधित म्हणणारांचें म्हणणें अर्थातच फोल ठरतें.

इतिहासाचा वास्तवीक उपयोग शहाणपण शिकणें हा आहे. मागील चुका व दोष नेहमीं डोळ्यांसमोर वागवून, ते दोष आपल्यांतून जावे, तशा चुका पुनः घडूं नयेत, असा जर आपला प्रयत्न नसला, तर इतिहाससंशोधकांची खटपट व्यर्थ मानावी लागेल. हे दोष नाहींसे करीत असतां आपल्या 'भूतकाळाची काळजी करण्याचें आपणांस कारण नाहीं. तो चांगला असला तर उत्तमच, नसला तरी, त्याचा भविष्यावर मोठासा परिणाम घडणार आहे असें नाहीं. व्यायामशाळेंत प्रवेश करणाऱ्यानें, आपले पूर्वज भीमसेन होते किंवा काय याचें संशोधन करावयास नको. मात्र जे आनुवंशिक दोष आपल्यांत आले असतील, तेवढे नाहींसे करण्याची खटपट करावी म्हणजे झालें. पण त्याच्या ऐवजीं जर तो, आपल्यांत दोष आलेलेच नाहींत, आपले पूर्वजच भीमसेन होते, असा अभिमान धरून बसेल, तर तो स्वतः कधींच तालिमबाज होण्याचा संभव नाहीं हें उघड आहे.

प्रस्तुत ग्रंथकारांच्या ठिकाणीं असला दुरभिमान नसल्यामुळें तत्संभव दोषहि या ग्रंथांत नाहींत. पूर्वजांबद्दल योग्य अभिमान व त्याबरोबर प्रगतिप्रियता, यांचें माफक मिश्रण त्यांच्यांत झालें असल्यानें, इतिहासलेखकास आवश्यक अशीच त्यांची मनोरचना आहे. अर्थातच आपला चरित्रनायक हा सर्व सद्गुणांचा पुतळा, अशा भावनेनें हें चरित्र लिहिलें गेलेलें नाहीं. त्यच्यानंतर दुसरी एक गोष्ट चरित्रलेखकांस सांभाळावी लागते. ती म्हणजे तरतम भावाची तीव्र जाणीव. नाहीं तर ज्याप्रमाणें कांहीं वर्षांमागें एका नटचरित्रलेखकानें आपल्या नायकास

शिवाजीमहाराज व नेपोलियन यांच्या मालिकेंत गुंफलें व 'श्वानं युवानं मघवानमाह' या सुभाषिताची सार्थता पटवून दिली, तसें व्हावयाचें. सरदेसायांच्या हातून अर्थातच असलें हास्यास्पद कृत्य घडणार नाहीं हें कांहीं सांगावयास नको. परंतु ज्या इतिहासकारांना लेखनासाठीं संशोधनहि करावें लागतें, त्यांचें कार्यक्षेत्र आकुंचित राहतें व त्यामुळें दृष्टिहि कांहींशी संकुचित होते. ज्याप्रमाणें एखाद्या खेड्यांतच जन्म जाणाऱ्याला त्या गांवांतील खडानखडा ज्ञात होतो, परंतु तुलनात्मक दृष्ट्या पाहतांना त्याकडून ग्रामकुठाराला नाना फडणीस नांव देण्याची चूक सहजगत्या होते, तसेंच कांहींसें संशोधकांचें होतें. ज्या व्यक्तींचे इतिहास जुळविण्याची खटपट करण्यांत त्यांचे दिवसांचे दिवस मोडतात त्यांच्याबद्दल साहजिकच त्यांस आदर उत्पन्न होतो. एखाद्या व्यक्तीचे विशिष्ट प्रकरणीं वर्तनोद्देश समजण्यास अर्थातच त्यांची सूक्ष्म तपासणी फार उपयुक्त असते. पण नुसतें मराठी वाङ्मय वाचून ज्याप्रमाणें हरीभाऊ आपट्यांस कांहींजण पहिल्या नंबरचे कादंबरीकार समजतात, परंतु त्यांसच टॉलस्टाय, टर्युगेंनेव, डोस्टोवस्की, न्यूट हॅमसन, वाल्झॅक, ड्यूमा, झोला, डिकन्स प्रभृति प्रख्यात पाश्चात्य कादंबरीकारांच्या कृति वाचण्यास मिळाल्या कीं, हरीभाऊंस पहिल्या वर्गांत तरी घालावें कीं नाहीं याची शंका पडते, तीच गत आपला इतिहास सोडून जगाचा इतिहास पाहूं जातां होते. वरवर पहाणाराला नानासाहेब पेशव्याची कर्तबगारी पाहून साहजिकच विल्यम पिटशीं त्याची तुलना करण्याची कल्पना सुचते, पण जगाच्या इतिहासाचें विहंगमावलोकन करीत जाऊं लागलें तर पिट व पेशवा हे एकाच तोलाचे कीं काय याची शंका वाटेल. जी गोष्ट नानासाहेब पेशव्याची तीच नाना फडणिसाची. आपण या सर्वांस मुत्सद्दी समजतों. परंतु खरोखरी ते मुत्सद्दी होते किंवा काय याचा कयास कोणी काढीत नाहीं. 'नाना जिवंत असेपर्यंत पुण्याच्या कारभारांत आपला हात शिरकणार नाहीं;' असें एखाद्या इंग्रजाचें शिफारसपत्र वाचून आपण नाना फडणीस म्हणजे मोठा मुत्सद्दी असें मानतों, परंतु खरा मुत्सद्दी कोणास म्हणावयाचें याचा विचार आपण करीत नाहीं.

मराठींतील मुत्सद्दी या फारशी शब्दाचा अर्थ केवळ दरबारी कारकून एवढाच मूळ आहे. पण सध्यां आपण हा शब्द स्टेट्स्मन् या इंग्रजी शब्दाशीं समानार्थानें योजतों. या इंग्रजी शब्दाचाहि मूळ अर्थ केवळ दरबारी एवढाच. राज्याशीं ज्यांचा लहान मोठ्या कामानिमित्त रोज संबंध ते सर्वच स्टेट्स्मेन्. राज्याचीं कामें अनेक प्रकारचीं असतात. तीं करण्यासाठीं अनेकांचा संबंध दरबाराशीं येतो.

पण या सर्वांसच जर मुत्सद्दी ही संज्ञा लावावयाची, तर आम्ही म्हणतों तशा पुरुषांस वेगळीच संज्ञा निर्माण करावी लागेल. आमच्या मतें मराठशाहींत शिवाजी खेरीज अन्य मुत्सद्दीच झाला नाहीं व शिवाजीच्या मुत्सद्दीपणाबद्दल सुद्धां अस्सल पुरावा थोडकाच आहे, बऱ्याचशा गोष्टी अभिप्रेत घ्याव्या लागतात. ज्या पुरुषांचें लक्ष राज्यापुढें येणारे रोजचे प्रश्न सोडविणें एवढ्यांतच गुरफटून गेलेलें दिसतें त्यांस आमच्या मतें मुत्सद्दी हा शब्द लावणें योग्य नाहीं. आजच्या राज्यपद्धतींत अशीं कामें अधिकारीवर्ग करीत असतो व त्यांच्या कृत्यांचे प्रेरक किंवा टीकाकार दुसरे लोकप्रतिनिधि, वर्तमानपत्रकार, वगैरे लोक असतात. या सर्वांस मुत्सद्दी म्हणावयाचें काय ? पूर्वीच्या राज्यपद्धतींत राज्यांचीं सूत्रें ज्यांच्या हातांत असत त्यांस तत्संबंधीं उत्पन्न होणाऱ्या अनेक भानगडींचें परिमार्जन करणें भाग होतें. पण त्यांच्या पलीकडे जाऊन, आपल्या देशाच्या किंवा राज्याच्या हितावर चिरंतन परिणाम होणारी अशी कोणती कामगिरी ते करीत होते ? मराठ्यांचें राज्य वाढत जात होतें व त्या वाढीच्या कार्यांत त्यांचा हात होता, एवढ्यावरच त्यांस मुत्सद्दी म्हणावयाचें काय ? आमच्या मतें नाहीं. कारण मराठ्यांच्या राज्याची वर्धिष्णुता ही कांहीं त्यांनीं निर्माण केलेली चीज नव्हती. तिचा उगम व त्याबरोबरच श्रेय शिवाजीकडे जाईल. शिवाजीनें निर्माण केलेल्या आयुधांचा उपयोग करण्यांत ते तरबेज होते एवढेंच त्यांच्याबद्दल म्हणतां येईल. जर नाना फडणिसास मराठ्यांचें राज्य होतें तेवढें तरी कायम राहील अशी व्यवस्था करितां आली असती, तरच त्यास मुत्सद्दी म्हणणें योग्य झालें असतें. जर नानासाहेब पेशव्यास इंग्रजांसारख्या नूतन राष्ट्राचा ठाव लागूं शकला नाहीं, तर त्याचें मुत्सद्दीपण तें कशांत राहिलें ? आपल्या सभोंवारच्या स्थळांच्या व काळाच्या पार ज्यांची दृष्टि पोहोंचते, व त्या दूर दृष्टीनें जे राज्यकारभार करितात, त्यांसच मुत्सद्दी ही संज्ञा लावणें योग्य आहे. मराठशाहींत असा पुरुष झालेला दिसत नाहीं. कित्येक पुरुषांत शहाणपण होतें असा भास कोठें कोठें होतो, पण त्यांच्यांत कर्तबगारी नव्हती. कर्तबगार माणसांपैकीं मात्र कोणांत ही दूरदृष्टि दिसत नाहीं. जर ती होती असें मानलें, तर त्यांच्यांत कर्तबगारी नव्हती असें म्हणणें भाग पडेल.

आपणांस मराठशाहींतील इतर पुरुषांशीं सध्यां कांहीं कर्तव्य नसून फक्त नानासाहेब पेशवाच प्रस्तुत आहे. सरदेसाई त्यास शिवाजीच्या खालोखाल पुरुष समजतात. त्याच्या अमदानींत मराठ्यांच्या राज्योत्कर्षाच्या भरतीची सीमा झाली हें उघडच आहे. तो शिवाजीप्रमाणें तलवारबहाद्दर नव्हता किंवा अन्नैणहि

नव्हता. म्हणजे राज्याच्या वाढीचें बहुतेक श्रेय त्याच्या सरदारांस द्यावें लागेल व समाजास आदर्शभूत होण्याजोगा तो नव्हता असेंहि ठरतें. मराठशाहींतील दुसऱ्या अनेक पुरुषांप्रमाणें तो राज्यकारभारांत निपुण होता, पण हें नैपुण्य म्हणजे मुत्सद्दीपणा मात्र नव्हे. मराठशाहींतील ज्या पुरुषांस मुत्सद्दी म्हणतात ते वास्तवीक हुषार राज्यकर्ते होत. त्याच्या मुत्सद्दीपणाची मीमांसा आतां आपण करूं.

जर एखाद्या पुरुषास मुत्सद्देगिरी दाखवण्यास योग्य समय पाहिजे होता असेल, तर तो नानासाहेबाच्या काळीं होता. जगाच्या इतिहासांत जे क्रांतीचे काळ कांहीं शतकांनीं एकदां येतात, अशा एका काळाच्या दरवाजावर तो उभा होता. अशी मुत्सद्देगिरी दाखविण्यास स्थळ पाहिजे होतें असेल, तर अठराव्या शतकाच्या मध्यांतील हिंदुस्थानाखेरीज तसें अन्यत्र क्वचितच आढळतें. साधनें पाहिजे होतीं असतील, तर तीं तशीं नानासाहेबाजवळ नव्हतीं असें कोण म्हणेल? पण जेथें कर्त्यांचाच अभाव तेथें अधिष्ठान व करणें काय करणार? बाकी ‘दैवं चैवात्र पंचमम्’ असें म्हणण्यास सर्वांसच मोकळीक आहे.

नानासाहेबाची कारकीर्द सन १७४० पासून १७६१ पर्यंतची. इंग्लंडांत ज्यास औद्योगिक क्रांतीचा काळ म्हणतात, त्याची सुरवात स्थूलमानानें १७६० पासून झाली. यानंतर अनेक शोध लागून जगास आधुनिक स्वरूप येण्यास सुरवात झाली. या पूर्वीच्या म्हणजे जुन्या काळांत नानासाहेबाची अमदानी झाली. ज्या त्रिखंडांत चाललेल्या युद्धांतील जयानें इंग्लंड, फ्रान्सचा पराभव करून जगांत पहिलें राष्ट्र बनलें, तें विख्यात ‘सप्तवार्षिक युद्ध’ सन १७५६ पासून १७६३ पर्यंत चालू होतें. हिंदुस्थानांत कर्तबगारी दाखवतां दाखवतां जगाच्या इतिहासास निराळें वळण देणें ही गोष्ट नानासाहेबास त्या वेळीं शक्य होती. अशा तऱ्हेचें वळण, आंधळेपणानें नव्हे जाणून बुजून, चॅथॅम् सारखे मुत्सद्दी त्या वेळीं इंग्लंडांत बसून देत होते. जगाचा नकाशा पुढें घेऊन, या मार्गानें गेलें कीं आपण जगज्जेते होऊंच होऊं, या आत्मविश्वासानें ते बुद्धिबळाचा डाव खेळत होते. त्यांचा तो डाव पूर्णपणें सिद्धीस गेला, हें आज आपण अनुभवीत आहों. नानासाहेबाची हिंदुपदपातशाही मात्र मध्येंच कोठें जिरली व त्याच्या वंशजांचें स्वातंत्र्यसुद्धां राखलें गेलें नाहीं. असें कां झालें याचें उत्तर नाहीं काय?

एखाद्या राष्ट्राचें भवितव्य एकाच माणसावर अवलंबून असतें, ही विचारसरणी आम्हांस मान्य नाहीं. मुख्य पुरुष हा केवळ समाजस्थितिदर्शक असतो असें आमचें मत आहे. या दृष्टीनें पाहतां व्यक्तींचीं चरित्रें हीं आमच्या दृष्टीनें कांहींशीं

आभासात्मक असतात, त्यांत पूर्ण सत्य दिसूं शकत नाहीं. पण ज्यांना सरदेसायांप्रमाणें कार्लाइलची वीर पुरुषांची कल्पना मान्य आहे, ते जर राष्ट्रीय भरभराटीचें श्रेय एका पुरुषास देणार, तर त्या पुरुषानें राष्ट्रीय अधःपाताबद्दलहि जबाबदार झालें पाहिजे हें ओघानेंच आलें. विचारसरणींतील हा भेद केवळ तात्विक नसून मूलभूत आहे. याच भेदावर राजकीय प्रगति आधीं कीं सामाजिक प्रगति आधीं हा प्रचलित वाद उभारलेला आहे. नानासाहेबाच्या जागीं आमच्यांत त्या काळीं चॅथॅम् कां निर्माण झाला नाहीं, याचें उत्तर आमच्या मतें हिंदी समाज हा इंग्रजी समाजाप्रमाणें नव्हता असें आहे. नानासाहेबाची बुद्धि चॅथॅम् इतकीच तीव्र होती असें धरलें तरी, चॅथॅमच्या आज्ञा अंमलांत आणण्याची जर हिंदी समाजाची पात्रता नव्हती, तर नानासाहेब काय करणार? पण तशी ती तीव्र असणें शक्य नाहीं, कारण आडांतच नाहीं तें पोहोऱ्यांत कोठून येणार? समाजांतच जे गुण नाहींत ते उत्कर्षानें व्यक्तींत कसे दिसतील? जर ते दिसतील तर मात्र ती व्यक्ति लोकोत्तर दूरदृष्टीची, म्हणजेच मुत्सद्दी, असें आम्हीं म्हणूं. अशी व्यक्ति शिवाजीनंतर मराठशाहींत निपजली नाहीं हेंच आमचें म्हणणें आहे.

मराठशाहीच्या इतिहासाचे एक मार्मिक अभ्यासू कै. खरेशास्त्री यांनीं एके ठिकाणीं असे उद्गार काढले आहेत कीं, 'पेशवाईच्या कृत्यांसंबंधीं हल्लींच्या काळांत चर्चा होते तेव्हां, अमक्यानें अमूक केलें असतें तर अमुक झालें असतें, असें पुष्कळ टीकाकार लिहीत व बोलत असतात. परंतु पेशवाईची घटना कशी होती, तिचे अधिकारी कोणत्या बंधनांनीं बांधले गेले होते, हें माहीत नसल्यामुळें ही टीका बहुधा अप्रयोजकपणाची असते.' शास्त्रीबोवांच्या मताप्रमाणें पेशव्यांच्या प्रत्येक सदिच्छेस व कृत्यास अनिराकरणीय अशी अडचण होती असें मानलें, तर इतिहासाचें अध्ययनच करावयास नको. ऐतिहासिक टीका नेहमींच अमक्या वेळीं अमक्यानें असें असें करणें योग्य होतें, तें त्यानें केलें किंवा नाहीं, या मुद्द्यावरच उभारलेली असणार. व आमच्या मतें अशी इतिहासरचना असेल तरच त्याच्या अध्ययनानें फायदा होण्याचा संभव आहे. नुसतें घडलेल्या हकीकतींचें समर्थनच ज्यांत असेल तो खरा इतिहास नव्हे, ती 'कथा' होईल. म्हणून आम्हीं त्या काळीं पेशव्यानें काय केलें पाहिजे होतें, काय करणें त्यास शक्य होतें, तें त्यानें कां केलें नाहीं व त्याचे काय परिणाम झाले ह्याचाच ऊहापोह करणार आहों.

इतिहासविदांचा असा एक वर्ग आहे कीं, त्यास इतिहासांतील साऱ्या गोष्टी ईश्वराच्या प्रेरणेनें व जगाच्या हितासाठींच घडतात असें वाटतें. रानडेप्रभृति

माणसांची मनोवृत्ति अशाच ठेवणीची होती व त्या समजुतीवरच त्यांचा आयुष्यक्रम उभारलेला असे. इंग्रजांचें हिंदुस्थानांत येणें हें हिंदी लोकांच्या हितासाठीं ईश्वरी घटनेनें झालें अशी त्यांची समजूत. अर्थात् इंग्रजांवर त्यांचा बिलकुल राग असणें शक्य नव्हतें. हा सिद्धांत खरा मानला तर मुसलमानांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून जो अनर्थ केला, तोहि ईश्वरी प्रेरणेनें व हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं असेंच ठरलें. मग त्याचाच उपसिद्धांत असा कीं, या परकीयांस जोरानें तोंड देण्याची बुद्धि आमच्या पूर्वजांस व सत्ताधिशांस झाली नाहीं, तीहि ईश्वरी सूत्र घडून येण्यासाठीं; तो कांहीं त्यांचा दुर्गुण किंवा कमकुवतपणा नव्हे! अर्थात् नानासाहेब पेशव्यानें बंगाल व मद्रास वेळींच ताब्यांत आणून इंग्रजांचा पाय रुतूं नये अशी व्यवस्था केली नाहीं ती, केवळ इंग्रजांचें आगमन सुकर होऊन हिंदुस्थानचें कल्याण त्यांकडून व्हावयाचें ही जी विधिघटना, ती मोडली जाऊं नये म्हणून. ही विचारसरणी इतकी प्रबळ आहे कीं, आजचे इतिहासांतील अग्रगण्य प्रो. यदुनाथ सरकार हेहि तिचाच पुरस्कार करतांना आढळतात. "History when rightly read is a justification of Providence, a revelation of a great purpose fulfilled in time." असा गंभीर उपसंहार ते आपल्या औरंगजेबाच्या इतिहासाच्या शेवटीं करतात. आपल्या पुराणांतून जेव्हां ऐतिहासिक राजांच्या हकीकती देतात, त्यांचाहि उद्देश इतिहासकथनाचा नसून ईश्वरी लीला कशी पुरी झाली हेंच दाखवावयाचा असतो. आम्हीं एवढेंच सांगतों कीं ही विचारसरणी आम्हांस खोटी वाटते. ही विचारसरणी आमची असेल तर आम्ही इतिहासवाचनाच्या भानगडींत कधींच पडणार नाहीं. ईश्वरी लीला वर्णावयास संशोधनाचा खटाटोप नको, काल्पनिक गोष्टीनेंहि तें कार्य होईल. आम्हीं मनुष्यांच्याच प्रेरणेनें कार्यें घडतात असें धरून इतिहास पाहतों. आमच्या दोषांचें खापर ईश्वरावर लादण्याची आमची तयारी नाहीं.

या मंडळीचें मत, आज श्वेतेतर जग जें श्वेतवर्णीयांच्या ताब्यांत गेलेलें दिसतें तें 'A great purpose fulfilled in time,' एक मोठें विधिघटित योग्य समयीं पुरें झालें, असें समजावयाचें. त्यांनीं खुशाल तसें समजून आपल्या मनाचें समाधान करावें! आम्हीं, आमच्या नामर्दपणाच्या अभावीं तसें घडण्यास कांहीं कारण होतें, असें समजत नाहीं. नानासाहेब पेशव्यालाहि, या

विधिघटनेस न जुमानतां, हिंदुस्थानांत इंग्रजांचा पाय न ठरेल अशी व्यवस्था करणें शक्य होतें असें समजतों. तर त्यानें काय करावयास पाहिजे होतें तें पाहूं.

जर नानासाहेबांत खरें मुत्सद्दीपण, म्हणजे भोंवतालच्या लोकांपेक्षां जास्त ज्ञान व दूरदृष्टि, असतीं तर, हिंदुस्थानचें समुचित राजकारण त्यांच्या डोळ्यां-समोर आलें पाहिजे होतें. तसें तें होतें किंवा नाहीं याची आमच्या मतें एकच कसोटी. ती म्हणजे त्याच्या अनुरोधानें त्याचें वर्तन घडलें किंवा नाहीं हें पाहणें. हिंदुस्थानचें राजकारण या संज्ञेंत हिंदुस्थानाशीं संबंध आलेल्या लोकांचेंहि राज-कारण अंतर्भूत धरलें पाहिजे. कारण तसें धरलें नाहीं तर, इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज प्रभृति परक्या राष्ट्रांचा प्रतिकार करणें त्यास कसें शक्य होणार होतें? नानासा-हेबाच्या काळीं या लोकांचा संबंध हिंदुस्थानाशीं येऊन दोन शतकें लोटलीं होतीं. त्यांचे गुणावगुण समजण्यास एवढा काल पुरेसा होता. त्यांचें बल कशांत आहे हेंहि हिंदी राजकर्त्यांच्या मनांत ठसण्यास हा काल भरपूर होता. हे पाश्चात्य लोक आपल्या पेक्षां अनेक बाबतींत श्रेष्ठ आहेत, ही साधी गोष्टहि ज्यांच्या लक्षांत आली नसेल, ते एकतर अहंमन्य किंवा मूर्ख म्हटले पाहिजेत. पण तसेच आमचे पूर्वज होते असें म्हणणें भाग आहे. तत्कालीन यूरोपीय ज्या अनेक उपयुक्त कलांत निपुण होते त्यांतील पहिली छापण्याची कला. वास्को द गामा इकडे येण्यापूर्वींच या कलेचा शोध लागलेला असून हिंदुस्थानांतसुद्धां पोर्तुगिजांनीं ती कला चालू केली होती. गोवें, कॅंगानूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं बायबलें छापण्याचे कारखाने काढले होते. एका जेझुइट पाद्रीबोवानें अकबर बादशहास स्पेनच्या दुसऱ्या फिलिप बादशहासाठीं मुद्दाम छापलेली बायबलची एक बहुमूल्य सुंदर प्रत नज-रहि केली होती. त्यानें त्या प्रतींतील येशू व मेरीचीं चित्रें पाहून त्यांच्या प्रती आपल्या चित्रकारांकडून करून घेतल्या. पण एवढया शहाण्या अकबरासहि इकडे छापखाना काढणें फायदेशीर आहे हें सुचलें नाहीं! जी गोष्ट अकबरासारख्या जगद्विख्यात शहाण्याची तीच नानासाहेबाची. चौकसपणानें दुसऱ्याचा ठाव घेऊन त्याच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करावें हें आम्हांस ठाऊकच नाहीं. त्याचा परिणाम काय झाला पाहा. त्या काळीं यूरोपांत वर्तुळाकार जगाचे नकाशे सर्वत्र फैलावले होते. तिकडील लोकांस आपले देशबांधव साहा साहा महिन्यांच्या सफरी समुद्रांतून कोठें जाऊन करतात, याची स्पष्ट कल्पना येत होती. आम्हांस मात्र हे येतात कोठून, जातात कोठें, करतात काय, याची कल्पना तिलमात्र नव्हती. म्हणूनच नानासाहेब पेशवा कुकडी नदीवर मोगलांशीं युद्ध चालू असतां

ग्रहण पडलें तेव्हां, गोमुखींत हात घालून पाण्यांत उभें राहून जप करीत राहिला, व मागें शत्रूनें गिन्यास न भितां पेशव्याच्या देवांची उचलबांगडी केली. जर यूरोपीय कलाज्ञानाचा इकडे प्रसार झाला असता, तर आम्हांस पाश्चात्यांपेक्षां मागें पडण्याचें कारणच उरलें नसतें. मग नानासाहेबास पाश्चात्य युद्धज्ञानपटु बुसीस आपल्याकडे ओढण्याचा हव्यास नको होता. पण—

नानासाहेबाच्या काळच्या मराठ्यांच्या सत्तेचा विचार करतां शिवाजीचें राज्य तें किती ? टीचभर. परंतु राज्यरक्षणाच्या बाबतींत त्याची दृष्टि इतकी तीक्ष्ण कीं, त्यास, तो देशावर रहाणारा होता तरी, आरमाराची आवश्यकता पटली. त्याच्या आरमारांत कांहीं पोर्तुगीज किंवा त्यांनीं शिकवलेले बाक्ये गोलंदाजीच्या वगैरे कामावर होते. त्यानें पोर्तुगिजांच्या अनुकरणानें दारूखाना म्हणून एक वेगळाच कारखाना रायगडास उघडला. सारांश, त्यास पाश्चात्यांच्या नौकानयनज्ञानाची पूर्ण जाणीव होती व म्हणून त्यानें शक्य ती खटपट या प्रकरणीं करून, शत्रूंस दहशत वाटण्यासारखें आरमार उभारून ठेविलें. आरमाराचें महत्त्व व पाश्चात्यांची या कलेंतील पारंगतता याची केवढी छाप शिवकालीन प्रधानांवर होती हें पाहणें असेल त्यानें, अमात्यांच्या राजनीतींतील या विषयावरील स्वतंत्र प्रकरण वाचावें. ही शिवकालीन नाविकपरंपरा आंग्र्यांच्या घरांत उतरली. तुळाजी आंग्र्याची मदत पाश्चात्यांसहि हवीशी वाटे. दुप्लेचा दुभाषी आनंदरंग पिले यानें, तुळाजीचें आरमार इंग्रज फ्रेंचांच्या युद्धांत तेलिचेरीस सात हजार सैन्यासह आलें होतें असें लिहिलें आहे. अशा आरमारास पैशाचा भरपूर पुरवठा होता, तर शिद्दी, फिरंगी, इंग्रज, फ्रेंच, यांची डाळ पश्चिम किनाऱ्यावर शिजली असती असें मुळींच वाटत नाहीं. पेशव्यांस असें आरमार स्वतः उभारतां येणें, ते म्हणते तरी शक्य नव्हतें. कारण ते किंवा त्यांचे विश्वासू सरदार दर्यावर्दी बनण्यासारखे नव्हते. व दुसरें, दर्यावर्दी नाविक लोकांची संख्या घोडदळाप्रमाणें वाटेल तितकी वाढवितां येण्यासारखी नव्हती. समुद्र किनाऱ्यावरील गांवांतच असले लोक निपजावयाचे व तेहि हिंदुधर्माच्या जातिभेदामुळें विशिष्ट जातींतून. आजहि असे लोक पाहिजे असल्यास थोडेच मिळूं शकतील. अशा परिस्थितींत ज्याच्या जागीं आपणांस दुसरा लायक इसम निर्माण करणें शक्य नाहीं, अशा आंग्र्यास आणि तें इंग्रजांची मदत घेऊन बुडविणें, या इतकी मुत्सद्देगिरीची वाण दाखविणारी दुसरी गोष्ट पेशव्यास करणें शक्य नव्हतें. या घोडचुकीचा सरदेसाई प्रभृति सर्वांनींच जोरानें निषेध केला आहे. पण त्याचे अपरिमार्जनीय दुष्परि-

णाम मात्र त्यांच्या मनावर ठसलेले दिसत नाहींत. राजवाडे या प्रकरणावर लिहितांना म्हणतात, 'एवढा चाणाक्ष नानासाहेब पेशवा, पण तो असा चकला.' आम्हीं अशी अक्षम्य चूक करणारास चाणाक्ष म्हणावयासच तयार नाहीं. अशी चूक पेशव्याच्या हातून घडण्याचें कारण एकच, गाढ अज्ञान.

ज्या पाश्चात्य राष्ट्रांशीं आपला संबंध येतो त्यांच्या आपआपसांतील राजकारणाची पुरी,–उडती उडती नव्हे,–बित्तंबातमी नानासाहेबानें ठेविली असती, तर त्यानें इंग्रजांऐवजीं फ्रेंचांसच जवळ केलें असतें. दुर्बलांसच मित्रांची जास्त आवश्यकता भासते व असे मित्र आपले शत्रु होण्याचा संभव नसतो. या काळीं यूरोपांत फ्रेंचांची स्थिति खालावलेली होती. त्यांच्यांत पुष्कळ हुषार व्यक्ति पैशासाठीं नोकरीस राहण्यासारख्या होत्या. अशा लोकांस इकडे आणवून त्यांच्याकडून यूरोपीयांचें शास्त्रीय ज्ञान पेशव्यांस इकडे फैलावणें शक्य होतें. पण ही कल्पनाच सुचेल तेव्हां ना ! मागसलेल्यांना पुढारलेल्यांशीं संबंध आला असतां आपलें रक्षण करण्याच्या दोनच युक्त्या आहेत. एक तर त्यांस आपल्या घरांत उतरावयासहि न देणें, किंवा दुसरें त्यांच्यासारखें पुढारणें. पहिल्या पद्धतीनें कांहीं काल आपलें स्वातंत्र्य राहूं शकेल, पण आपण कायमचेच मागसलेले राहण्याचा संभव फार, व त्यामुळें परिणामीं आपलें स्वातंत्र्यहि टिकवणें महादुष्कर जातें. दुसरी पद्धत स्वीकारतांना अडचण अशी कीं, परकीय लोक आपली विद्या दुसऱ्यास शिकवीत नाहींत व दुसरा शिकून आपल्या तोडीचा होण्यापूर्वींच त्याची मान मुरगळतात. या सर्व संकटांतून आपल्या राष्ट्रांस सुरक्षित पलिकडे नेऊन त्यांस कायम निर्भय करणें हें खऱ्या मुत्सद्यांचें कार्य. असे मुत्सद्दी प्रथमच असे डोळ्यांत तेल घालून असतील कीं, ते आपलें राष्ट्र मागें पडूंच देणार नाहींत. यदाकदाचित् पूर्वजांच्या चुकीनें मागें राहिलें, तरी स्वतः त्याची प्रगति ते करवितील. पिटर दी ग्रेटच्या वेळीं रशिया अगदीं मागसलेला होता. पण त्या राजश्रींनीं स्वतः सुतार बनून हॉलंडांत प्रवेश केला व प्रजेस उदाहरण घालून दिलें. त्यामुळें रशिया हें एक प्रबल राष्ट्र झालें. दुसरें मुत्सद्देगिरीचें बिनतोड उदाहरण जपानचें. हें एवढेंच श्वेतेतर राष्ट्र पाश्चात्य गिधाडांच्या तडाख्यांतून सुटून पुनः त्यांच्या जोडीस कसें येऊन बसलें बरें ? त्यानें वर सांगितलेल्या दोनहि युक्त्यांचा यथाकाल अवलंब केला. ज्या काळीं पाश्चात्यांनीं आमच्या किनाऱ्यावर प्रवेश केला त्याच सुमारास जपानच्या किनाऱ्यावरहि केला. पण या लोकांची परस्वहरणाची अजब चलाखी ओळखून, वेळींच त्यांस आपल्या देशांत पाऊल ठेवण्यासहि बंदी

जपानी लोकांनीं केली. त्यामुळें धर्म, स्वातंत्र्य व पैसा हीं तीनहि त्यांनीं रक्षिलीं. पण हें करण्यास त्यांच्यांत अभेद्य एकी होती. या प्रकारानें जपान जगांतील इतर देशांच्या सुधारणेस पारखें होऊन, होतें त्याच स्थितींत राहिलें. अशा स्थितींत दोन शतकें गेल्यावर सन १८६७ सालीं एका अमेरिकन कमँडरनें जपानच्या किनाऱ्यावर येऊन लगट केली. यापूर्वींच चीनच्या किनाऱ्यावर इंग्रजांनीं जबरीनें प्रवेश केला होता. तेव्हां आपल्या जुन्या आयुधांनीं स्वातंत्र्य रक्षण होणें नाहीं हें अगदीं ऐनवेळीं ओळखून, जपाननें आधुनिक जगांत प्रवेश केला. तावडतोब राक्षसी जोरानें कामास लागून यूरोपीयांची चारशें वर्षांची सुधारणा त्यांनीं अवघ्या पंचवीस वर्षांत आत्मसात् केली. या क्रांतीच्या काळांत जर त्यांनीं मूर्खपणानें कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्राशीं कुरापत काढली असती, तर त्यांच्या स्वातंत्र्याचा चुटकीसरशीं होम झाला असता. पण या काळांत त्यांनीं इतक्या शिताफीनें राजकारण चालविलें कीं, कोणाशीं तोंड लागूं नये. दुर्बलाचा बलवानानें अपमान केला तरी, त्यानें स्वतः बलवान् होईपर्यंत त्यास गम खावा लागतो. पण जर कां मूर्खपणानें नुसता तालिमखान्यांत प्रवेश करून हा दंड पिटूं लागेल, तर त्याचा त्वरित नाश होईल, हें जपानी मुत्सद्यांनीं इतकें पुरेपुर ओळखलें होतें कीं, त्यांनीं सर्वांशीं ' सुसरीबाई, तुझी पाठ मऊ ' या तत्वावर घेतलें होतें. जपानी लोकांच्या या क्रांतिकालीन मुत्सद्देगिरीला जगाच्या इतिहासांत तोंड नाहीं. कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्रानेंहि इतक्या अल्प कालांत एवढी कर्तबगारी दाखविलेली नाहीं. या जपानी मुत्सद्यांच्या पासंगालाहि पुरणारी हुषारी दाखविणारा पेशवाईंत कोणी निघाला नाहीं ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे ?

नानासाहेबाच्या कालीं हिंदुस्थानांत परक्यांस दूर ठेवण्याचा मार्गच मोकळा नव्हता. असें करण्यास सर्व देशावर एकच अकुंठित सत्ता गाजविणारा प्रभु लागतो. खेरीज लोकांतहि इतकी एकी व इतकें देशप्रेम लागतें कीं कोणीहि घरभेद्या न निघावा. हिंदुस्थान हा देश एवढा अफाट, इतक्या वेगवेगळ्या सत्ताधिशांनीं व्यापलेला, व इतक्या भिन्न भिन्न जातींनीं भरलेला कीं, या सर्वच गोष्टी अशक्य होत्या. दुसरा मार्ग, म्हणजे परक्यांस मोकळीक ठेवून आपली सुधारणा करीत रहाणें व योग्य वेळीं एकएकाचा कांटा काढणें; हेंच नानासाहेबास करणीय होतें. तें त्यानें केलें, किंवा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, कीं नाहीं, यावरच त्याची कसोटी लागणार आहे. त्यास यश आलें किंवा नाहीं हा प्रश्न गौण आहे. मुत्सद्देगिरीचें पहिलें लक्षण म्हणजे कालज्ञान. आपण कोणत्या कालांत आहों व

त्या कालांचा विशेष काय हें ओळखून ज्याचा कार्यक्रम ठरतो त्यासच मुत्सद्दी होणें शक्य आहे. कार्लाइल हा आपल्या वीरपुरुषविवेचनांत नेहमीं Zeitgeist किंवा Time-spirit ऊर्फ कालात्मा असा एक शब्द नेहमीं योजतो. हा आत्मा ज्यास ओळखतां येतो त्यासच यशप्राप्ति होणें शक्य असतें. नानासाहेबास किंवा पेशवाईतील कोणासहि या आत्म्याची ओळख पटली नाहीं. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत अराजक इतकें बोकाळलें होतें कीं, नानासाहेबासच काय पण शिवाजीसारख्या पुरुषांसहि त्यास आटोक्यांत आणणें दुरापास्त झालें असतें. समाजांत सर्वत्र एकमुखी सत्तेविरुद्ध एक प्रचंड लाटच जणूं निर्माण झाली होती. छत्रपतींचें पेशव्यानें ऐकूं नये, पेशव्यांचें सरदारांनीं ऐकू नये, त्यांस क्षुद्र पथक्यांनींहि जुमानूं नये, अशी कांहीं जनमनोरचना त्या काळीं बनली होती. प्रत्येकासच राजा होण्याची हांव सुटली तर राज्याची काय स्थिति होणार ? व्यक्तिस्वार्थ जर इतका बळावला तर कर्तव्यनिष्ठा कोठें राहणार ? आपण सर्व एक, आपलें सर्वांचें हित एकच, ही भावनाच जर समाजांतून नष्ट झाली, तर चार लोकांनीं एकमार्गानें कसें जावें ? पण अशीच कांहीं स्थिति त्या काळीं होती—दुर्दैवानें आमच्यांत ती तशीच आजहि कायम आहे—अशी कल्पना त्या काळचे अस्सल लेख वाचणारांची होते हें खास. हें कालमाहात्म्य त्या काळीं ओळखून नानासाहेबानें शिवशाहीचा कार्यक्रम आंखला पाहिजे होता.

शिवाजीनें स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविल्यापासून, हिंदुस्थानांत त्याचेंच अनुकरण करून स्वतंत्र सत्ताधीश होण्याचा पायंडा पडत गेला. शिवाजीच्या समकालींच छत्रसाल व राजसिंह यांनीं औरंगजेबास न जुमानतां जवळ जवळ स्वतंत्र होण्याचा पंथ काढला. त्यानंतर औरंगजेबानें विजापूर, गोवळकोंडें, महाराष्ट्र, येथील राज्यें जिंकिलीं त्यामुळें, मध्यवर्ती सत्तेचा दरारा हिंदुस्थानच्या जास्तच भागांतून नष्ट झाला. कारण दक्षिणेंत जुन्या सत्तांची वेसण मात्र नष्ट होऊन नव्या सत्तेची वेसण अडकण्यास कालावधीच मिळाला नाहीं. या अराजकी काळांत अनेक महत्वाकांक्षी व स्वाभिमानी मराठ्यांनीं जोर मारून बराच मुलूख हाताखालीं घातला.. पण या नव्यां मराठ्यांच्या राज्याचा विशेष हा होता कीं, तें मध्यवर्ती सत्तेच्या पगारी नोकरांनीं कमावलेलें शिवकालीन राज्य नसून, स्वतःच्या पराक्रमानें व हुषारीनें अनेक व्यक्तींनी जिंकलेलें राज्य होतें. या अनेक व्यक्ति एकएकट्या स्वतःच्या पायावर उभें राहाण्यास दुर्बल होत्या. त्यामुळें त्यांस शिवछत्रपतीच्या नांवाखालीं एकत्र जमणें अवश्यच होतें. या एकांड्या शिलेदारांस

एकत्र राखण्याचा प्रयत्न रामचंद्रपंत अमात्यांसारख्या स्वाभिमानी लोकांनीं केला. तरीहि ते इतके दोन दगडींवर पाय ठेऊन असत कीं, प्रत्येकाचें मोगली अंमलदारांशीं सूत असे. रामचंद्रपंतानें शिवकालीन शिस्त गाजवण्याचा विचार केला असता तर हे सर्व मोगली जहागिरदार बनले असते. शिस्त सुटल्यामुळें नवीन धारे पडत चालले. प्रत्येक सरदार मुलुखगिरीवर निघण्याच्या आधींच जिंकावयाच्या मुलखाची सनद छत्रपतींकडून करून घेई. छत्रपतीच्या दरबारचे प्रधान, हे निदान इतका तरी मान ठेवतात एवढेंच समजत. शाहूच्या आगमनानें या प्रकारांत वाढच झाली. पेशव्यांनीं जुन्या शिरजोर सरदारांस मोडण्याचा प्रयत्न केला, पण असें करण्यासाठीं त्यांस नवीन स्वतःचे सरदार निर्माण करावे लागले. तात्पर्य काय ? एकसूत्रीपणास बाध यावयाचा तो आलाच. नानासाहेबास जयाप्पा शिंद्यासारख्या सरदारांस जें चुचकारावें लागे व मल्हाररावाच्या मनस्वीपणापुढें मान वांकविण्याची पाळी येई, ती यामुळेंच. मात्र असें पेशवे न करते तर मराठ्यांचें जें नांव गाजलें तेंहि गाजलें नसतें. कारण मराठ्यांत एकांडेपणाचा दोष हा मूलभूतच आहे. आम्हीं अजूनहि पारशांसारख्या संहतीनें जाणाऱ्या लोकांस कावळ्यांची उपमा देत असतों. पण अशा कावळ्यांसारख्या जुटीनें वागणाऱ्या लोकांचीच कायमची भरभराट शक्य असते हें मात्र विसरतों. मराठ्यांच्या एकांडेपणास शौर्याची जोड असल्यामुळेंच त्यांचें नांव कांहीं काळ गाजलें. मराठ्यांचा इतिहास शिवाजीपासून आरंभ करून बहुतेक या एकांड्यांनींच बनविलेला आहे. नानासाहेबाच्या अमदानींत सुद्धां जयाप्पा, दत्ताजी, मल्हारराव, दमाजी, रघूजी, जानोजी प्रभृति मनस्वी एकांड्यांच्या एकक्ली पराक्रमानेंच राज्याची थोडीफार भरभराट झाली.

अठराव्या शतकांत पराक्रमी एकांड्यांची व्याप्ति मराठ्यांपुरतीच नसून हिंदुस्थानांतील इतर जातींतहि त्यांची उपज होत होती. पडत्या बादशाहीचे सफदरजंग, अलिवर्दीखान, निजामुल्मुक प्रभृति सुभेदार; रोहिले, शीख, जाट, बुंदेले प्रभृति जातींतील असंख्य सरदार; दक्षिणेंतील सावनूर, कडपें, कर्नूळ, अर्काट प्रभृति ठिकाणचे नबाब; व म्हैसूर, सोंधें, बिदनूर, त्रिचनापल्ली, चित्रदुर्ग प्रभृति असंख्य लहान मोठ्या संस्थानांचे स्थानिक राजे; हे सर्वच आपापल्या ठायीं स्वतंत्र होण्याच्या विचारानें वागत असून, ज्या आपल्याहून प्रबळ सत्ताधिशाचें सैन्य प्रत्यक्ष आपल्या दारांतच येऊन ठेपेल, त्यापुढें अगदीं तात्पुरतीच मान वांकविण्याचा त्यांचा प्रघात असे. सैन्य माघारें फिरलें कीं हे पूर्ण स्वतंत्र. पेश-

त्यांच्या फौजा सालोसाल गेल्या तरच खंडणी जमा व्हावयाची. मराठ्यांस उत्तरेंत काम पडलें तर दक्षिणेंतील खंडणी बंद, दक्षिणेंत स्वारी गेली तर उत्तरेस मराठ्यांचा अंमल उठण्याची भीति. अशी सर्व देशाची स्थिति असतांना ज्यांस हिंदुपदपातशाही स्थापण्याची महत्वाकांक्षा, त्यांनीं कोणत्या मार्गास लागावयाचें ? पण मार्ग ठरण्यापूर्वी महत्वाकांक्षा पुरी करण्यास मराठ्यांजवळ पुरेशी साधनसामग्री होती किंवा काय हें पाहिलें पाहिजे.

हिंदुपदपातशाही म्हणजे हिंदूंच्या प्रदेशांत हिंदूंचें वर्चस्व असणें. अठराव्या शतकांत हा हिंदुस्थान प्रदेश केवढा होता ? दहाव्या शतकापर्यंत काबूल कंदहारपर्यंत तो पसरलेला होता, परंतु मुसलमानांच्या लाटेनें त्यास सिंधूच्या पलीकडे हांकून दिलें होतें. काबूल कंदहार हा प्रदेश वास्तविक लष्करीदृष्टया हिंदुस्थानावर स्वामित्व गाजविणाऱ्या सत्तेच्या ताब्यांत असावयास पाहिजे, तरच हिंदुस्थानचें रक्षण शक्य होतें. औरंगजेबापर्यंतच्या मोगल बादशहांचा अंमल या प्रदेशावर होता. तदनंतरसुद्धां राघोबादादाच्या सन १७५८ च्या अटकेपर्यंतच्या भरारीतागाईत हा प्रदेश दिल्लीपतीच्या कक्षेंतील अशी प्रचलित समजूत होती. इराणची व हिंदुस्थानची सरहद्द एकमेकांस भिडलेली असावी अशी पूर्वपरंपरा. त्यामुळेंच राघोबाच्या पत्रांत अब्दाली हा या पातशाहींतील बंडखोर उपटसुंभ अशीच भावना आढळते. पण नानासाहेबाच्या काळीं या सिंधुपार प्रदेशांत हिंदूंची वसती अत्यल्प असून हिंदुपदपातशाहीच्या कक्षेंतून हा प्रदेश कायमचा सुटला होता. हा प्रदेश, आजच्या काश्मीरच्या राज्यापैकीं खुद्द काश्मीर खोरें सोडून इतर प्रदेश, बलुचिस्थान, वगैरे हिंदूबाह्य प्रदेश वगळून; पण नेपाळ, सिंहलद्वीप वगैरे हिंदूवसती असलेले प्रदेश जमेस धरतां, हिंदुपदपातशाहीचें कार्यक्षेत्र उणें पुरें पंधरा लक्ष चौरस मैलांचें ठरतें. बृहन्महाराष्ट्राचें क्षेत्रफळ एक लाख चौरस मैल. मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थानावर अधिराज्य गाजवावयाचें म्हणजे आपल्या पंधरापट मुलखावर सत्ता चालवावयाची. आधुनिक शोधांनीं अंतर तोडण्यांत शिकस्त केल्यामुळें ही गोष्ट सोपी झाली आहे. आज पुण्याहून पेशावर म्हणजे दोन दिवसांची वाट, त्या काळीं ही वाट चालण्यास निदान महिना लागला असता. पुलांच्या अभावीं अब्दाली व सदाशिवराव यमुनेच्या दोन तीरांवर महिनेच्या महिने अडकून राहिले. त्या काळीं तारायंत्र असतें तर पानिपताहून पुण्यास तार जाऊन नानासाहेब केव्हांच साहाय्यास आला असता ! क्षेत्रफळाची बाब सोडली तर जेत्यांजवळ निदान जास्त मारक शस्त्रास्त्रें तरी पाहिजेत.

मराठ्यांजवळ तींहि नव्हतीं. राहतां राहिलें शौर्य व युद्धकौशल्य. यांवरच मराठ्यांचा जोर, पण याहि बाबतींत त्यांस अब्दाली, पोर्तुगीज, हैदर, इंग्रज असे प्रसंगोपात वस्ताद भेटतच.

आतां संख्याबलाकडे वळूं. त्या काळीं हिंदुस्थानची लोकसंख्या अजमासें बारा कोटींहून जास्त नसावी. महाराष्ट्राची आमच्या मतें पन्नास साठ लाखांहून जास्त नव्हती. हे आंकडे तर्कावर रचलेले असले तरी त्यांस मुळींच आधार नाहीं असें नव्हे. पण हे आधार व त्यांची गोळाबेरीज करण्याचें हें स्थळ नव्हे. हिंदुस्थानच्या बारा कोटींत मुसलमानांची संख्या सुमारें दोन कोटी असावी. जर्मन लष्करी रीतीच्या मापानें पहातां लोकसंख्येचा दहावा हिस्सा लढाऊ लोकांची संख्या असते. म्हणजे त्याकाळीं साहा लाख मराठे लढाईस योग्य ठरले असते असें होतें. परंतु जर्मन गणतींत जातीची अडचण धरलेली नाहीं. हिंदुस्थानांतील बऱ्याच जातींतून लष्करी शिपाई मिळणें कठीण होतें. उदाहरणार्थ ब्राह्मण जात घेऊं. मराठ्यांत पुष्कळ ब्राह्मण सरदार होते तरी मराठ्यांच्या लष्करांत ब्राह्मण शिपायांचा फारसा भरणा होता असें दिसत नाहीं. लष्कराबरोबर असलेले हत्यारबंद कारकून वगळले तर केवळ शिपाईपेशा ब्राह्मण थोडेच आढळले असते. उलटपक्षीं अलाहाबाद अयोध्येकडील अनेक ब्राह्मण जाती शिपाई पेशाच्या आहेत. आपण इकडे तत्प्रांतीय जे परदेशी भय्ये अशाच कामावर ठेवतों त्यांतील बरेच ब्राह्मण असतात. सत्तावन सालच्या बंडांत बंगाल्यांत पहिलें बंड या परदेशी ब्राह्मण पलटणींतच झालें. आजहि त्यांचा शिपाईपेशा सुटलेला नाहीं. गेल्या महायुद्धांत या ब्राह्मणांनीं ४६ हजार लोक पुरवले असें युद्धानंतर त्यांची एक परिषद झाली तिच्या अध्यक्षांनीं अभिमानानें सांगितलें. त्या काळीं सुजाउद्दौल्याच्या सैन्यांत या लोकांचा मोठा भरणा होता. असे लोक वगळले तर बंगाल, मद्रास, गुजराथ वगैरे प्रांतांतील ब्राह्मणांत मात्र लढवय्ये मुळींच कोणी नव्हते. क्षत्रिय व शेतकरी वर्गांत शिपायांचा भरणा जसा होत असे तसा वैश्य व शिल्पी लोकांत होत नसे. अस्पृश्य जातींसहि लष्करी पेशांत मज्जाव नसला तरी त्यांच्याशीं बरोबरीनें काम करण्यास इतर उच्चवर्णीय तयार नसल्यामुळें त्यांची भरती होत नसावी. त्यांचा उपयोग मजूर, भारवाहक, असा करीत असत. या सर्व अडचणींचा विचार करतां त्या काळीं मराठ्यांस तीन लाखांपेक्षां जास्त सैन्य महाराष्ट्रियांचें असें उभारणें कठीण होतें असें म्हणतां येईल. लोकसंख्येच्या वाढीनें सैन्यांतील कामास आलेल्या लोकांच्या जागीं

नवीन भरती वेळोवेळीं होण्यासारखी होती. या तीन लाख सैन्याचें आधिपत्य एकाच एकसूत्री सत्तेकडे असतें तरीसुद्धां त्याच्या बळावर सर्व हिंदुस्थान जिंकणें व त्यावर अव्याहत सत्ता चालविणें त्या काळीं मराठ्यांस शक्य होतें असें वाटत नाहीं. पण तेंहि कधीं घडलें नाहीं. मराठ्यांचें बरेंच सैन्य निजामापाशीं होतें. पेशव्याशीं जुटीनें न वागणाऱ्या लहान सत्ताधिशांजवळहि बरेच मराठे शिपाई नोकरीस असत. म्हणजे पेशव्याजवळ दोन लाखांपेक्षां जास्त मराठे जमणें शक्य नव्हतें व त्यांच्या बळावर हिंदुपदपातशाही स्थापण्याचा त्याचा विचार होता.

वरील विवेचनावरून केवळ मराठ्यांस सर्व हिंदुस्थानची रखवाली करणें शक्य नव्हतें हें उघड झालें. म्हणूनच मराठ्यांस कानडी व मुसलमान शिपायांचें गाडदी सैन्य इब्राहिमखानाबरोबर ठेवणें भाग झालें. उत्तरेस शिंद्यांच्या फौजेंत हिंदुस्थानी शिपाई ठेवण्याचा प्रघात पडला. नारो शंकराजवळ आरब शिबंदी असे व पानिपतच्या वेळीं तर गिलच्यांची एक रुसून आलेली तुकडी मराठ्यांनीं नोकरीस ठेवली होती. अर्थात् त्यापासून होणारे तोटेहि मराठ्यांच्या वांटणीस आले. आतां मराठ्यांच्या सैन्यास कितीपट सैन्याशीं झगडावें लागलें असतें याचा विचार करूं.

सर्व हिंदुस्थान मराठ्यांविरुद्ध एकदम उठलें असें धरलें तर एक कोटीवर शिपायांशीं त्यांस झगडणें भाग आलें असतें. पण हें जास्तींत जास्त गणिती प्रमाण झालें. प्रत्यक्ष एवढ्या मोठ्या सैन्यास नोकरीस ठेवून त्यांकडून काम घेणारे सत्ताधीश हिंदुस्थानांत नव्हते हीच त्या वेळीं मराठ्यांच्या फायद्याची गोष्ट होती. मात्र अनेक वेळीं, विशेषतः स्वभूमीसाठीं लढण्याचा प्रसंग येई तेव्हां, हें अमूर्त सैन्य मराठ्यांस जाचक होत असे हें, त्यांच्या बुंदेले, रजपूत वगैरेंशीं झालेल्या झगड्यांत दिसून येत असे. अशी परिस्थिति सोडून इतर सत्ताधिशांकडे पाहतां त्यांच्या फौजेची बेरीज दाहा लाखांपेक्षां जास्त नव्हती. हें सैन्य अटकेपासून रामेश्वरापर्यंत पसरलेलें असून तें एकत्र होण्याचा कधींच संभव नव्हता. पेशवा प्रसंगोपात एक लाखापर्यंत फौज एका वेळीं समरांगणांत आणूं शके. तितकीहि त्यास तोंड देण्यास कोणी आणूं शकत नसे. पानपतच्या वेळीं अब्दाली, रोहिले, सुजाउद्दौला असे एकत्र झाले, तेव्हांच मराठ्यांशीं सामन्यास आले. पण या काळीं मराठ्यांच्या तोट्याची अशी गोष्ट, हें सैन्य अनेक सत्ताधिशांच्या हातीं होतें हीच होती. एकाच्या हातीं मोठें सैन्य नसणें ही जशी मराठ्यांस स्वारी करण्यास उत्तेजक गोष्ट, तशीच एकाच सत्ताधिशाचा एका दिशेस

पराभव करून दुसरे संस्थानिक दबूं शकत नसत ही गैरसोईची गोष्ट होती. वर ज्या कालात्म्याचें वर्णन केलें त्याचा जोर अठराव्या शतकांत एवढा मोठा होता कीं, पेशव्यानें मोठ्या निजामाचा पराभव केला तरी कर्नाटकांतील एखादा क्षुद्र देसाईसुद्धां त्यामुळें दहशत खात नसे. त्याच्यावर स्वतंत्र सैन्यासह वेगळी स्वारी करावी तेव्हांच त्याच्याकडून खंडणी वसूल व्हावयाचा संभव. कर्नाटकांत स्वारी येऊन पुनः जर पेशवा एकाच जागीं राहील, तरीहि हे क्षुद्र सत्ताधीश भरणा करावयाचे नव्हत, प्रत्येकाच्या गांवास वेढा बसेल तेव्हांच त्यांकडून कांहीं मिळण्याची आशा पेशव्यानें धरावी ! आणि पेशव्याचें उत्पन्न तर असल्या खंडण्यांवर अवलंबून. तें न आलें तर फौजेचें धरणें बसण्याची धास्ती. या सर्व परिस्थितीचा परिणाम असा होत असे कीं, पेशव्याची स्वारी बुंदेलखंडांत गेली तर दक्षिणेंत निजामानें पुनः जमवाजमव करून सामन्यास तयार व्हावें, पेशवा निजामावर आला तर रजपुतांनीं उचल करावी. एवंच जेथें मराठ्यांचें सैन्य तेथें तेवढें त्यांचें राज्य, बाकीचा प्रदेश बहुतेक स्वतंत्र अशी स्थिति होती.

वरील विवेचनावरून अशी शंका निघणें शक्य आहे कीं, जिंकलेल्या प्रदेशांत मराठ्यांनीं कायम शिबंदी ठेवून व्यवस्थित अंमल कां चालू केला नाहीं ? या प्रश्नास अनेक उत्तरें आहेत. एक तर मराठ्यांनीं एखादें राज्य जिंकिलें याचा अर्थ तें संपूर्ण त्यांच्या ताब्यांत आलें असा कधींच नव्हता, त्याचा अर्थ त्या संस्थानिकाचा मराठ्यांनीं युद्धांत पराभव केला एवढाच असे. पण अशीही गोष्ट नेहमीं घडत नसे. धूर्त संस्थानिक मराठ्यांची परिस्थिति पुरी ओळखीत असत. युद्ध करून आपलें सैन्य जायां होण्यापूर्वींच ते शरण येऊन खंडणी ठरवीत व कांहीं रकम रोख देत. त्यांस माहित असे कीं, एकदां हें सैन्य माघारें फिरलें कीं पुनः तीन वर्षें धास्ती नाहीं, तें दुसऱ्या दिशांस गुंतलें जाणार, पुनः येईल तेव्हां पाहतां येईल. या वागणुकीचा परिणाम, मराठ्यांवर प्रसंगोपात उलटूं शकणारें सैन्य शाबूत अस्तित्वांत राही, कायमचें नष्ट होत नसे. याच गोष्टींत पेशव्यांच्या राजनीतीचा लंगडेपणा निदर्शनास येतो. एकच दिशा रोखून तिकडील प्रदेश निःशेष-शत्रु करण्याचें टाकून त्यांनीं अनेक बाजूचीं राजकारणें एकदम हातांत घेतलीं. हरिवंशांतील,

**शत्रुशेषमृणशेषं शेषमग्नेश्च भूनृप ॥**
**पुनर्वर्धेत संभूय तस्माच्छेषं न शेषयेत् ॥**

ही शिवाजीनें ओळखलेली राजनीति पेशव्यांनीं अवलंबिली नाहीं. अशी नीति आचारावयास एक प्रकारचा करडेपणा लागतो तो शिवकालीन मराठ्यांत होता, पेशवाईत उरलेला दिसत नाहीं. जेतृपणा हा एक प्रकारें क्रूरपणाच आहे, त्या क्रूरपणाची भरपाई पुढें सम्यक् प्रजापालनानें करावयाची असते. जेतृपणाचा राजधर्म आचरतांना ज्याचें मन व्यक्तिधर्मास विसरत नाहीं तो जेता होण्यासच अयोग्य होय. या दृष्टीनें पहातां नानासाहेब पेशव्याची मोठी चूक, एक एक कांटा पुरा काढून न टाकणें ही होय. त्यानें कसें वागावयास पाहिजे होतें याचा विचार आतां करूं.

बाजिरावाच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांचा अंमल अर्धेउणें महाराष्ट्र, गुजराथचा दक्षिणभाग, माळवा, बुंदेलखंड, मध्यप्रांतांतील बराच भाग, इतक्या प्रदेशावर साधारणपणें बसला होता. साधारणपणें म्हणण्याचें कारण माळवा, बुंदेलखंड वगैरे ठिकाणीं सुरक्षित अंमल चालू झाला नसून केवळ जुजबी खंडणी वसूल होत असे. सरदारांत तंटे होऊं नयेत म्हणून शाहूनें वेगवेगळ्या सरदारांस अनेक दिशांस पाठविण्याचा प्रघात सुरू केला. त्याचा परिणाम असा झाला कीं बाजिराव फक्त उत्तरेस जाऊं लागला. दक्षिण बाजू ही फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधि, बाबूजी नाईक, यांचें कार्यक्षेत्र म्हणून राखण्यांत आली. या गोष्टीचा परिणाम मराठ्यांच्या राज्यास अत्यंत विघातक झाला. ज्या बाजूस अपराक्रमी सरदार जावे अशी योजना होती ती बाजू लंगडी राहिली. वास्तवीक सर्व मराठ्यांच्या हितावर लक्ष ठेवणें व परराष्ट्रांपुरती तरी एकमुखी सत्ता राखणें या दृष्टीनें काम चालण्यास सर्वांवर एका हुषार माणसाची योजना झाली पाहिजे होती. स्वतः शाहू असें काम करण्याचा प्रयत्न करी, पण असल्या कामास तो जात्याच नालायक होता. बाजिरावाची मुख्य प्रधान या नात्याची हुकमत पाळण्यास कोणीच तयार नव्हता. बाजिरावाच्या वेळीं दिल्लीची बादशाही बरीच जोर धरून होती. वजीर कमरुद्दीनखान, निजामउल्मुल्क, सफदरजंग वगैरे हुषार गृहस्थ तिला टेकू देऊन होते. अशा वेळीं बाजिरावाच्या स्वाऱ्या तिकडच्या प्रदेशांत होण्यांत कांहींच फायदा नव्हता, व तसा झालाहि नाहीं. या वेळीं हिंदुस्थानांतील राजनीतीचें धोरण जुन्या वृक्षाच्या वळकट खोडावर घाव घालण्याचें नसून तिच्या फांद्यांवर हत्यार चालविण्याचें होतें. बादशाही कमजोर झाली असली तरी तिचीं पाळेंमुळें इतकीं खोलवर गेलेलीं होतीं कीं, तिच्यावर प्रत्यक्ष उठणें म्हणजे गांधिल माशीच्या पेकडीस हात लावण्यासारखें होतें. सारी दक्षिण मोकळी पडलेली असतांना नर्मदा

ओलांडण्याचें मराठ्यांस कांहीच प्रयोजन नव्हतें. बाजिरावाची झडप कर्नाटकावर पडती तर अर्काट, सावनूर, कडपें, म्हैसूर वगैरे लहान संस्थानें जागच्या जागीं विराम पावून, महंमदअली, चंदासाहेब, हैदर, व त्यांच्याच बरोबर इंग्रज, फ्रेंच वगैरेंचीं नांवें पुढें येणेंच अशक्य झालें असतें. हा सर्व प्रदेश अनेक, आपआपसांत भांडणाऱ्या, क्षुद्र संस्थानिकांच्या ताब्यांत राहूं दिला, ही मराठ्यांच्या दक्षिणेंतील राजकारणांतील मोठी चूक. यामुळेंच धूर्त व युद्धशास्त्रांत जास्त निष्णात अशा परकीय व्यापाऱ्यांस बोट शिरकावण्यास अवकाश मिळाला. बरें बाजिरावाच्या वेळीं बाजू चुकली तर निदान नानासाहेबानें तरी ती सुधारावी कीं नाहीं? सन १७४०–४१ सालांत शाहूनें तंजावरच्या आपल्या भाईबंदाच्या मदतीस म्हणून कां होईना, तिकडे रघूजी भोसले प्रभृतींस पाठवून मराठ्यांचा दरारा पुनश्च बसविला. हा सर्व प्रदेश शहाजी, शिवाजी, राजाराम यांच्या काळीं मराठ्यांच्या परिचयाचा झालेला असून तिकडील कांहीं प्रदेशावर त्यांचें राज्यहि होतें. असा प्रदेश हातीं आलेला असतांना तेथील राज्य पक्कें करण्याचें सोडून मराठ्यांस परत येण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण आपसांतील चुरशीमुळें रघूजीस वाटलें कीं, नानासाहेब उत्तरेंत गेला आहे तेव्हां आपला तिकडील मुलूख सुरक्षित नाहीं, त्यामुळें तो परत आला. यापुढें तरी नानासाहेबानें उत्तरेंतून परत आल्यावर कर्नाटकाकडे लक्ष पुरवावें कीं नाहीं? पण नाहीं, तो रघूजीच्या पाठीवर बंगाल्यांत गेला व तेथें एकाच छत्रपतीचे दोन सरदार आपसांत लढतात असें दृश्य उत्तरेंतील मुसलमानांस दिसलें! या कृत्याचा लष्करी दृष्ट्या झालेला तोटा बाजूस ठेवला तरी राजनीतींतील ही केवढी घोडचूक समजावयाची बरें! अतःपर उत्तरेंतील राजेरजवाडे मनांत पुरे समजले कीं, एका मराठा सरदाराविरुद्ध आपणांस दुसऱ्याची मदत घेतली कीं झालें काम! रजपूत, जाट, वजीर, रोहिले यांनीं या कानमंत्राचा पुढें कसा उपयोग करून घेतला हें इतिहासविदांस माहीत आहेच. अशा तऱ्हेची चूक नानासाहेबाच्या हातून घडते तेव्हां त्याच्या मुत्सद्देगिरीची काय तारीफ करावी! मराठ्यांच्या राजकीय नीतिमत्तेचें यापरतें प्रदर्शन तें काय राहिलें!

हे दोन प्रबल मराठे सरदार दूरच्या बंगाल प्रांतांत गुंतले आहेत ही संधि धूर्त निजामानें मात्र व्यर्थ दवडिली नाहीं. त्यानें याच वेळीं (सन १७४३) कर्नाटकांत उतरून मराठ्यांचें दोन वर्षांचें कार्य चुटकीसरशीं कोसळून टाकलें. यावेळी त्यास शह देणें हें मराठ्यांच्या साम्राज्याच्या मुख्य प्रधानाचें कर्तव्य

नव्हतें काय ? पण त्याच्या मनांत कर्नाटक गेलें तर भोसल्याचें व बाबूजीचें. दुर्बळांचा कनवाळू शाहू तें त्यांकडून काढून आपणास थोडेंच देणार आहे? त्यापेक्षां निजामाशीं गोडी ठेवून आपण ( बाजिरावानें आधींच जिंकलेल्या ) माळव्याच्या कोरड्या बादशाही सनदा आपल्या नांवें मिळवणें हेंच बरें. एवंच हा प्रदेश कायमचा मराठ्यांच्या कक्षेंतून सुटला व याच प्रदेशांत इंग्रज, फ्रेंच, हैदर वगैरे यथावकाश वाढीस लागले. मराठ्यांच्या हाताखालचा मुलूख गमावून हिंदुपदपातशाहीचें पाऊल पुढेंच पडणार होतें नव्हे!

मराठ्यांच्या राज्याचा कायमचा दुष्मन् म्हणजे निजाम. एवढी पेशव्यांची अमदानी होऊन त्यांचें नांवहि राहिलें नाहीं, पण निजाम आजसुद्धां कायमच आहे. पेशव्यांनीं निजामाचा दाहावीस वेळ पराभव केला असेल, पण सर्व मराठी बोलणारे लोकहि कधीं त्याच्या ताब्यांतून सुटले नाहींत, अजूनहि ते त्याच्या राज्यांत आहेत. असें कां वरें? 'मराठा तितुका मेळवावा' हा शिवाजीस दिलेला गुरुमंत्र "शिवाजी महाराजांच्या शिष्यांस" आठवला नाहीं काय? हिंदुधर्माभिमानी रजपूत राजांवर आपले पराक्रमी सरदार वर्षानुवर्षे गुंतवून ठेवणाऱ्या पेशव्यास तितक्याच श्रमांत निजामाचें समूळ उच्चाटण करतां आलें नसतें काय? पण दुष्टांचें शेषहि शिल्लक ठेवूं नये ही साधी पुराणांत सांगितलेली नीति पेशव्यास समजलेली दिसत नाहीं. हिंदुपदपातशाही करूं इच्छिणाऱ्या पेशव्यास रजपूत, जाट, बुंदेले, हे स्वधर्मीय परके वाटले. त्यांच्यावर ज्या चिडीनें व आवेशानें मोहिमा झाल्या तशा निजामावर होत्या, तर कपाळास लावावयास त्याची रक्षासुद्धां उरली नसती! त्यास शिल्लक ठेवून दिल्लीच्या राजकारणांत हात घालण्याची पेशव्यास काय आवश्यकता होती? निजामाच्या मदतीस कोणीहि मुसलमान उत्तरेंतून येत नव्हता. त्याचें राज्य बुडतें तर दिल्लीच्या बादशाहीप्रमाणें लोकांस त्याचें प्रेम थोडेंच होतें? त्या काळीं या सर्व स्वतंत्र झालेल्या व दिल्लीपतीस न पुसणाऱ्या सुभेदारांस मोडणें हें एका दृष्टीनें बंडखोरांचें पारिपत्यच भासण्यासारखें होतें. निदान तसा राजकारणी पुकारा करण्यास पेशव्यास सवड होती. दक्षिणेंत मुसलमानांची संख्या इतकी थोडी होती कीं, त्या सर्वांस हद्दपार करणेंहि त्या काळीं शक्य झालें असतें. पण हें सर्व करण्यास जो कडवा धर्माभिमान, जी करडी राजनीति, जो करारीपणा, चिकाटी व निश्चय, हीं लागतात, तीं कोठून आणावयाचीं?

प्रत्येक युगाचा कालात्मा जसा वेगळा, तसेंच त्या कालात्म्यास प्रसन्न करून घेण्याची रीति वेगळी. ज्या आरोळीनें सोळाव्या शतकांत कार्य होतें, त्याच

आरोळीनें अठराव्या शतकांत होण्यासारखें नाहीं; किंवा सत्राव्या शतकांत ज्या गर्जनेस जनतेनें हांक दिली, तिचा टाहो विसाव्यांत उपयोगी पडण्यासारखा नाहीं. कालात्म्यास वश करूं इच्छिणाऱ्या भक्तास विशिष्ट वेष परिधान करावा लागतो, नवा मंत्र जपावा लागतो, नवा शंखनाद करावा लागतो. सत्राव्या शतकांत शिवाजीनें धर्माची आरोळी ठोकून कार्यसाधना केली, त्या आरोळीच्या समर्थनार्थ प्रतापगडची भवानीहि त्याच्या मुखें बोलूं लागली, व त्या भवानीचे भक्तहि शिवाजीच्या कार्यांत सामील झाले. शिवाजीला यशोलाभ होण्यास एकनाथ, तुकाराम, रामदास, अशा ' टाळकुट्या ' भक्तांनीं जें वातावरण निर्माण केलें होतें तेंच उपयोगी पडलें. तसें तें वातावरण नसतें तर शिवाजीच्या आंगांतील भवानीस पळून जाण्याची पाळी आली असती. अठराव्या शतकांत अशा धर्मश्रद्धेचा पूर बराच ओसरला होता, तरी प्रवाह चालू होता. कुशल कर्णधारास नाव हांकण्या इतकें पाणी नदींत शिल्लक होतें; नाव केवळच रुतली नसती. पण या कालाला अशा नव्या मंत्राची मात्र जोड पाहिजे होती कीं, ज्याच्या जपानें जें पिशाच कालदेवतेच्या मानगुटीस बसलें होतें तें अंतर्धान पावावें. शिवाजीच्या कार्यक्षेत्रास व काळास पुरण्यासारखा मंत्र 'मराठा तितुका मेळवावा' हा रामदासांनीं सांगितला, पण या नव्या काळास लागू पडणारा मंत्र नानासाहेबास सांपडला नाहीं. तो मंत्र विसाव्या शतकाप्रमाणें ' हिंदी तितुका मेळवावा ' इतका विस्तृत नसता तरी ' हिंदू तितुका मेळवावा ' एवढा विस्तृत पाहिजे होता खास. अशा मंत्राचा जप नानासाहेब करता तर कालदेवता त्यास निश्चित अनुकूल झाली असती. पंजाबांत पिछाडी संभाळण्यास शीख; मध्यें हिंदुस्थान संभाळण्यास रजपूत, जाट, बुंदेले; व दक्षिणेस मराठे; असे ठांसून उभे राहते तर हिंदुपदपातशाहीहि झाली असती आणि मानगुटीस बसण्यासाठीं आकाशांत घिरट्या घालणारीं परकी पाश्चात्य पिशाचेंहि अंतर्धान पावलीं असतीं. सत्राव्या शतकांत शिवाजीला उत्तराभिमुख सैन्यरचना संग्रामासाठीं करणें भाग होतें, अठराव्यांत ती दक्षिणाभिमुख करणें जरूर होतें. पण हें सर्व कालात्मा जाणणाऱ्या कुशल सेनापतीसच कळण्यासारखें होतें; पेशवा तें समजण्या इतका धूर्त नव्हता, म्हणूनच तो पिछाडीचें महत्व न ओळखतां उत्तराभिमुख मुमूर्षु बादशाहीकडे तोंड करून उभा राहिला होता व त्याहि स्थितींत योग्य मंत्राचा जप न केल्यामुळें पराभूत झाला.

बीजगणितांतील उदाहरण सोडविणाऱ्या विद्यार्थ्यास एका गोष्टीचें विशेष अवधान ठेवावें लागतें. ती गोष्ट म्हणजे एक अज्ञात वस्तू ज्ञात होण्याचा प्रयत्न

# मुख्य आधारभूत ग्रंथांची यादी.


१ **राजवाडे**—खंड १–४,६.

२ **खरे**—ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १; इचलकरंजीचा इतिहास.

३ **काव्येतिहाससंग्रह**—(साने) पत्रें, यादी वगैरे; शाहूमहाराजांचें चरित्र; रामराजाचें चरित्र; पेशव्यांची बखर; रघुनाथ यादवाची पानिपतची बखर; भाऊसाहेबांची बखर; व कैफियत.

४ **पारसनीस**—इतिहाससंग्रहांतील प्रकरणें; भारतवर्ष, वर्ष १,२; बुंदेलखंडाची त्रुटित बखर; बुंदेल्यांची बखर; रामचंद्रबावाचीं अप्रकाशित पत्रें; तह व करारमदार.

५ **रा. ब. वाड**—नानासाहेबाच्या रोजनिशा-कैफियती व यादी (भाग १–३).

६ **भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल व इतिवृत्तें.**

७ **श्रीकृष्ण वि. आठल्ये**—रिंगणगांवकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपतची बखर व पत्रें—सर्व अप्रकाशित.

८ Elliot & Dowson—History of India–Vol. 8.

९ Asiatic Researches–Vol. 3. काशीरायाची बखर.

१० Grant Duff—History of the Marathas.

११ Tate's Kingdom of Afghanistan.

१२ **वाकसकर**—कोटेकर पंडितांचीं पत्रें (अप्रकाशित.)

करीत असतांना दुसऱ्या अज्ञात वस्तूचा समीकरणांत प्रवेश न होऊं देणें. नाहीं-तर एक अज्ञात वस्तूचें दुसऱ्या अज्ञात वस्तूच्या रूपांत उत्तर मिळून, दोनहि वस्तु पुनः अज्ञात राहतात त्या राहातातच. हिंदुस्थानच्या राजकारणाचें समीकरण सोडवितांना नानासाहेबाची तीच गत झाली. हुषार गणिती इष्ट उत्तर काढण्यासाठीं नव्या अज्ञातांचा समावेश समीकरणांत करतो, नाहीं असें नाहीं, पण सर्वच अज्ञातें परस्परांस खोडून टाकतील अशी त्याची योजना असते. आपला कारभार एकसूत्री करण्यासाठीं नानासाहेबास तुळाजी आंग्र्याचा बींमोड करणें इष्ट होतें असें गृहीत धरलें, तरी त्यासाठीं इंग्रजांचा प्रवेश हिंदी राजकारणाच्या समीकरणांत करून देण्याची त्यास गरज नव्हती; तीहि होती असें धरलें, तर निदान या नव्या पाहुण्यास खोडून टाकण्याची व्यवस्था त्यास करणें जरूर होतें. तशी व्यवस्था त्यानें काय केली ? कर्नाटकच्या रंगभूमीवर इंग्रज फ्रेंचांचें झुंज लागलें असतां दोघेहि नष्ट होतील अशी योजना करणें पेशव्यास शक्य होतें; पण या वेळीं त्यानें तिकडे अगदीं दुर्लक्ष्य केलें. उत्तरेंतील बादशाही हें हिंदी राजकारणांतील कायमचें मोहरें होतें. त्याचा समाचार पुढेंमागें घेतां येण्यासारखा होता. पण इंग्रज व फ्रेंच या नव्या मोहऱ्यांची तशी स्थिति नव्हती. त्यांच्या गतीचेंहि आपणांस चांगलेंसें ज्ञान झालें नव्हतें. अशा या अज्ञातकुलशील नव्या पाहुण्यांना येथें वसती करूं न देणें हेंच मुत्सद्दीपणाचें होतें. तें न करतां, जिच्याबद्दल जुनाटपणामुळें सर्वांस आदर, त्या बादशाहींत नानासाहेबानें अगदीं अयोग्य वेळीं हात घातला. वृद्ध बादशाहीला आपोआप मरूं देऊन नंतर तेथें आपलें बस्तान बसवणें, हा डाव त्या काळीं खेळण्याचा होता. त्या ऐवजीं दिल्लीकडे अजाण रघुनाथरावाची रवानगी करून पेशव्यानें केवढी चूक केली पहा. या वेळीं अब्दाली हा नवा मोहरा हिंदुस्थानच्या राजकारणांत प्रवेश करीत होता. मराठे दिल्लीस न येतां पूर्वेस वजिराच्या मुलखांत काशी प्रयाग सोडविण्यास जाते, तर इकडे हिंदी मुसलमान व पठाण आपसांत लढून मेले असते किंवा निदान दुर्बळ होते. काशी प्रयाग सोडविण्याच्या धर्मयुद्धांत रजपूत, जाट, बुंदेले वगैरेंची थोडीबहुत मदत व सहानुभूति मिळण्यासारखी होती. निदान त्यांचा उपसर्ग खास झाला नसता असें म्हणतां येतें. त्या ऐवजीं दिल्लींत मराठ्यांचा तळ पडल्याबरोबर हिंदी मुसलमानांस अब्दालीसारख्या शत्रूच्या गळ्यांत पडणें भाग झालें व दोघांच्या एकत्र शक्तीशीं झगडण्याची पाळी मराठ्यांस आली. या कामांत जाट, रजपूत वगैरे बादशाहीबद्दल आदर असणाऱ्या हिंदूंचीहि मदत त्यांस मिळणें अर्थातच शक्य नव्हतें.

जी चूक दिल्लीच्या राजकारणांत झाली तशाच स्वरूपाची चूक म्हैसूर प्रकरणीं पेशव्याच्या हातून घडली. एकतर आधीं शेजारचें निजामाचें मुसलमानी राज्य कायम ठेवून पूर्ण हिंदू म्हैसुरावर जाण्याचें पेशव्यास कारण नव्हतें. जावयाचें तर तें पूर्ण ताब्यांत घेण्याची तयारी पाहिजे होती. जिंकलेला मुलूख तावडतोब ताब्यांत घेऊन तेथें आपलें राज्ययंत्र व्यवस्थित सुरू करणें हें मराठ्यांस ठाऊकच नव्हतें. किंबहुना तशी त्यांची तयारीच नव्हती. सर्व हिंदुस्थानचा कारभार चालवण्यास भरपूर मराठी सैन्य जसें पुरण्यासारखें नव्हतें, तसेंच शांततेच्या काळांत काम चालवण्याइतके कारकून, कमाविसदार, सुभेदार वगैरे माणसेंहि महाराष्ट्रांतून पुरलीं असतीं असें वाटत नाहीं. मराठ्यांचें मनुष्यबळच इतकें नव्हतें; त्यामुळें चौथाईच्या नुसत्या कबुलीवर मराठे माघारे जात. म्हैसूरच्या नंदिराजाचा पराभव करून पुनः मराठ्यांनीं त्यास कायम ठेवल्याचा परिणाम असा झाला कीं, त्यास हैदराची मदत घ्यावी लागली; व अशा रीतीनें अप्रत्यक्षपणें हैदराच्या उदयास पेशवा कारणीभूत झाला. अशाच मराठ्यांच्या अमुत्सद्देगिरीच्या वागणुकीनें, निजामास फ्रेंचांची, महंमदअल्लीस इंग्रजांची, जंजिरेकरास मुंबईकरांची, अशी मदत घ्यावी लागून मराठ्यांच्या शत्रूंची संख्या वाढली व त्यांचा जोरहि वाढला. शत्रूंचें एकतर समूळ उच्चाटण करणें किंवा निदान इतरांची मदत त्यास घेतां येऊं नये अशी योजना करणें, हीं नानासाहेबास करतां आलीं नाहींत.

वर सांगितलेल्या सर्व चुकांपेक्षां मोठी चूक पेशव्याकडून बंगालप्रकरणीं घडली व तीमुळें त्याच्या शहाणपणाचें योग्य माप घेतां येतें. या चुकीचें कडू फळ केवळ मराठ्यांच्याच वांट्यास न येतां, सर्व हिंदुस्थानास तें चाखावें लागत आहे. सन १७४३ च्या भांडणानंतर रघूजीनें दक्षिण सोडून बंगाल हें आपलें कार्यक्षेत्र केलें व सालोसाल स्वाऱ्या करून त्या सुभ्याची चौथाई त्यानें मिळविली व खेरीज ओढया प्रांतहि आपल्या राज्यास जोडला. चौथाईचा करार पाळावयाचा म्हणजे त्याप्रमाणें, बंगालवर कोणी स्वारी केल्यास त्या प्रांताचें रक्षण करणें हें भोसल्याचें कर्तव्य होतें. करार बाजूस ठेवला तरी आपली चौथाई आपणांस पुढेंहि अव्याहत मिळण्यासाठीं तरी तसें करणें मराठ्यांस इष्ट होतें हें उघड आहे. सर्व हिंदुस्थानांत त्या काळीं बंगालसारखा अव्याहत उत्पन्न देणारा प्रांत नव्हता. कारण या प्रदेशास दुष्काळाची बाधा क्वचित् होते. गंगेच्या पुरांमुळें हा प्रदेश फार सुपीक झालेला होता खेरीज हा प्रदेश हिंदुस्थानच्या एका टोकास असल्यामुळें बाहेरच्या स्वाऱ्यांचें त्यास फारसें भय नसे व लोकहि गरीब असल्यामुळें अंतस्थ

बंडेंहि फारशीं होत नसत. जर हा सुभा पेशव्यानें पुरा जिंकला असता, तर त्यास त्याच्या बाकीच्या सर्व राज्याइतकें उत्पन्न झालें असतें. अलिवर्दीखानानें जो चौथाईचा करार केला त्यांत दुसरा कोणी मराठा सरदारहि बंगालवर आल्यास रघूजीनें रक्षणास आलें पाहिजे अशी अट होती. शाहूनंतर मराठ्यांच्या राज्याचा सर्वाधिकार नानासाहेबाकडे आला तेव्हां राज्याचे सर्व करार पाळले जातील हें पाहणें व तशी व्यवस्था करणें हें त्याचें कर्तव्य झालें. पण हें कर्तव्य पाळण्या ऐवजीं बंगाल स्वतःच हाताखालीं घालण्याचा त्याचा विचार होता असें त्याच्या जयापा शिंद्यास गेलेल्या आज्ञेवरून दिसतें. सन १७५५ च्या आरंभीं रघूजी भोसले वारला. त्याचे दोन मुलगे जानोजी व मुधोजी यांचें भांडण सुरू झालें. रघूजी जिवंत असेपर्यंत नागपुरच्या कारभारांत पेशव्यास हात घालतां येत नव्हता तशी संधि या वेळीं आली. पेशव्याच्या आंगांत मुत्सद्दीपण व राज्यहितैषा असतीं तर त्यानें हें भांडण आपल्या जोरावर मोडून दोघांसहि मराठशाहीच्या उद्योगांत सामील करून घेतलें असतें. पण तसें कांहींच न करितां नानासाहेबानें दोघांसहि आपणाजवळ माशा मारीत ठेवलें. हिंदुस्थानची पूर्व बाजू संभाळण्याचें काम भोसल्यांचें होतें. त्यांनीं नागपुरास राहून बंगाल्यावर पाहारा ठेवणें हेंच त्यांचें मराठशाहींतील कार्य होतें. सन १७५६–५७ हीं वर्षें हिंदुस्थानच्या इतिहासांत क्रांतीचीं होतीं. पेशव्यानें इंग्रजांच्या मदतीनें १७५६ च्या फेब्रुआरींत तुळाजीचा उच्छेद केला, व इंग्रजांस आरबी समुद्र मोकळा करून दिला. स्वतः पेशवा या वेळीं सावनूरच्या मोहिमेवर गेला होता. बरोबर भांडण तोडण्याच्या निमित्तानें भोसले बंधु त्यानें दिवसगत लावून मुद्दाम घेतले होते. याच वेळीं बंगाल्यांत अलिवर्दीखान मरून त्याचा उनाड नातू सिराजउद्दौला सुभेदार झाला. मराठ्यांचें पाऊल त्या बाजूस पुढें सरकवण्यास ही अमूल्य संधि होती. मृत नवाबाच्या दुसऱ्या मुलींचे नवरे हेहि वारस होते. दिल्लीचा बादशाहा मराठे सांगतील त्यास सुभेदारीचीं वस्त्रें देता. अशा वेळीं भोसल्यांच्या संगनमतानें पेशव्यानें बंगालच्या राजकारणांत स्वतः लक्ष घातलें पाहिजे होतें. विजयदुर्ग पडल्याबरोबर इंग्रज किती शेर झाले होते हें, किल्ला पेशव्याच्या स्वाधीन करण्यांत त्यांनीं जी टाळाटाळी चालविली होती त्यावरून उघड करून चुकलें होतें. या वेळीं इंग्रजफ्रेंचांत सप्तवार्षिक युद्ध सुरू होऊन कलकत्तेकर इंग्रजांची सिराजनें तळी उठवून दिली म्हणूनच इंग्रज जरा नरम येऊन त्यांनीं विजयदुर्ग सोडलें इतकेंच. नाहींतर नानासाहेबास इंग्रजांचा कावा याच

वेळीं समजावयाचा. पेशव्यास मात्र या संधीचा मराठ्यांस फायदेशीर उपयोग करून घेणें सुचलें नाहीं. किंबहुना कलकत्त्याच्या भांडणाची हकीकत तरी त्यास कळली होती किंवा कसें याचीहि शंका वाटते. सर्व दिशांची ज्यास बातमीहि राखतां येत नाहीं त्यानें हिंदुपदपातशाहीची महत्वाकांक्षा बाळगावी याचें मात्र आश्चर्य वाटतें. परदेशांत वकिलाती ठेवणें दूरच पण बंगालच्या नवाबाजवळसुद्धां पेशव्याचा वकील नव्हता. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. रघुनाथरावाची स्वारी कंगाल बनलेल्या दिल्लीवर गेली व नानासाहेब स्वतः श्रीरंगपट्टणावर गेला. मध्यंतरीं इंग्रजांस मोकळें रान सांपडून क्लाइवनें भली मोठी शिकार केली. विजयदुर्गाहून तो मद्रासेस गेला व मद्रासेसहि इंग्रजांवर कोणी नसल्यानें त्यास, कलकत्तेकर इंग्रज हुगळीच्या तोंडावर हिंवतापानें उपाशीं मरत होते त्यांच्या मदतीस जातां आलें. नबाबाच्या दरबारीं या वेळीं मराठ्यांचा मुळींच शह नसल्यानें क्लाइवनें सावकाश कारस्थानें रचून युद्धावांचून बंगाल घशांत टाकला. याच तीन कोटीच्या सुभ्याची बारा लाख चौथाई मिळण्यासाठीं, भोसल्यास दहा वर्षें सालोसाल स्वाऱ्या कराव्या लागल्या होत्या. एवंच, ज्यांत स्वारीचा खर्चहि उभा होत नाहीं अशा अब्दालीवरील स्वाऱ्या कराव्या मराठ्यांनीं, व केवळ बुद्धिबळावर व हिंमतीवर राज्य संपादावें इंग्रजांनीं, असा प्रकार झाला. आणि हा प्रकार होतो केव्हां ? काय रावबाजीच्या अंमलांत ? नव्हे; पेशव्यांतील दिग्विजयी नानासाहेब, भाऊसाहेब, राघो भरारी यांच्या हयातींत व ते ज्या हिंदुस्थानांत हिंदुपदपातशाही ( कीं भटकुलबादशाही ? ) स्थापण्याच्या महत्वाकांक्षेनें कमर बांधून तयार होते तेव्हां. बरें हा प्रकार होतो कोठें ? काय कानडांत व मॉरिशस बेटांत ? नव्हे, नव्हे, या भरतभूमींतच गंगासागरसंगमीं !!

या प्रकरणाबद्दल नानासाहेबास वेळींच बातमी मिळाली नाहीं, किंवा मिळूनहि त्याचें महत्व त्या वेळीं लक्षांत येण्यासारखें नव्हतें असें मानलें, तरी प्लासीनंतर सुद्धां चार वर्षें नानासाहेब जिवंत होता. इंग्रज फ्रेंचांचें युद्ध रंगास चढलें होतें. नानासाहेब यावेळीं मोठी फौज घेऊन कर्नाटकांत उतरता तर फ्रेंचांच्या साहाय्यानें मद्रासचें उच्चाटण करतां आलें असतें. मद्रास व मुंबई येथें दबाव पडता तर कलकत्तेकर इंग्रजांस काबूंत आणणें जानोजी भोसल्यास अगदीं सोपें होतें. कारण मीरजाफरासहि इंग्रज नको असून त्यानें डच लोकांच्या मदतीनें त्यांच्या ताब्यांतून सुटण्याचा यत्न चालविला होता जानोजीस त्यानें चौथाईच्या कराराची पुनः कबुली दिली होती व त्याची मदतहि मागितली होती. या प्रकरणीं निजामा-

चीहि मदत मिळण्यासारखी होती. कारण त्याचा उत्तर सरकार प्रांत कर्नल फोर्डनें कलकत्त्याहून भोसल्याच्या ओढया प्रांतांतून येऊन जिंकून घेतला होता. पेशव्याच्या शहामुळें बुसीला सलाबतजंगाच्या रक्षणास राहावें लागल्यामुळें त्यास फोर्डच्या विरुद्ध जातां आलें नाहीं. जानोजी भोसल्यास, फोर्ड आपला मुलुख तुडवीत जात असतां त्यास अडवितां आलें असतें पण त्यानेंहि नानासाहेबाच्या चुरशीमुळें यावेळीं इंग्रजांशीं गोडीनें घेतलेलें दिसतें. एरवीं आपल्या चौथाईच्या क्षेत्रांत दुसरे शिरले असतां तो स्वस्थ कां बसला होता याचा उलगडा होत नाहीं. बाकी त्याचें वर्तन कसेंहि असलें, तरी या प्रकरणाकडे नानासाहेबाचें जें सर्वस्वी दुर्लक्ष झालें त्याचें समर्थन करतां येत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत आपल्या संमतीशिवाय पानहि हालूं नसे अशी व्यवस्था राखणें हें त्याचें काम होतें. हिंदुपदपातशाही करणें हें त्याचें ध्येय होतें, तर त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ तरी त्यानें इकडे लक्ष पुरवावयाचें होतें. मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनेंहि हिंदी रंगभूमीवर नवीं पात्रें तरी न येतील अशी काळजी त्यास घेतली पाहिजे होती. यांपैकीं एकहि बाब ज्यास सांभाळितां आली नाहीं त्यास मुत्सद्दी म्हणणें धाष्ट्यांचें आहे.

ज्याच्या हातीं लोकांचें कल्याण करण्याची सत्ता असते, त्याच्याकडूनच त्यांचें अकल्याण होण्याचीहि धास्ती राहाते. एकसूत्री राजसत्तेचा लंगडेपणा याच गोष्टींत आहे. ज्या जर्मन कैसरनें तो देश वैभवास चढविला, त्याच्याच हातून त्यास अधोगति प्राप्त झाली. ज्यांच्या वर्तनानें जगाच्या इतिहासाचा ओघ बदलूं शकतो, अशा पुरुषांत नानासाहेबाची गणना करावी लागेल. कारण तशीच महत्वाची जागा त्याच्या वांट्यास आली होती. तो काळही ओघ वळण्याचा होता. मात्र या गोष्टीची जाणीव नानासाहेबास होती असें दिसत नाहीं. मराठ्यांना हिंदुस्थानभर धिंगाणा घालण्याचा अधिकार जेणेंकरून प्राप्त झाला होता, त्याच कारणानें त्या देशाचें रक्षण करण्याची जबाबदारीहि त्यांवर आली होती. हिंदुस्थानांतील सर्व जातींत हुषार असे जे ब्राह्मण, त्यांपैकींच कांहींच्या वांट्यास ही जबाबदारी पार पाडून दाखविणें आलें होतें. अशी जबाबदारी ज्यांस तोलली नाहीं त्यांनीं अर्थात् दोषास पात्र व्हावें हें योग्यच आहे. हिंदुस्थानांतील तत्कालीन कोणाहि सत्ताधिशांपेक्षां पेशव्यास हें महत्त्वाचें काम बजावण्यास जास्त संधि व शक्ति होती. पेशव्याकडून हें काम तर झालें नाहींच, पण उलट त्याच्या वर्तनाचा असा चमत्कारिक परिणाम झाला कीं, परक्यांस हात घालण्यास संधि प्राप्त झाली. आपल्या वर्तनाचा असा परिणाम होईल हें न

लक्षांत येणें, हेंच त्याच्या शहाणपणास कमीपणा आणतें. ल्युसिटानिया सारख्या बोटी बुडवण्याच्या आपल्या कार्यक्रमानें अमेरिका युद्धांत पडेल हें लक्षांत न आल्यामुळेंच कैसरसारख्यांचा पराभव होतो व म्हणूनच त्यांचें वर्तन गैरमुत्सद्देगिरीचें ठरतें. नानासाहेबास पाश्चात्यांचें स्तोम हिंदुस्थानांत न माजेल अशी काळजी निश्चित घेतां आली असती. त्या काळीं पाश्चात्यांचें वळ, हिंमत व धूर्तता यांचा अंत कोणास लागण्यासारखा नव्हता हें म्हणणें पोकळ आहे. अमात्याच्या राजनीतींत त्यांच्या गुणांची पुरी पारख केलेली दिसते. 'हातीं आलेलें स्थळ हे सोडावयाचे नव्हत,' 'हे हट्टी जात,' 'आरमाराच्या जोरावर नूतन दुर्गच निर्माण करणार' अशीं त्यांतील वाक्यें वाचून शिवकालीन मुत्सद्यांस तरी पाश्चात्यांची पूर्ण ओळख पटली होती असें दिसतें. इतकें असूनहि जर ती पेशव्यांस नसली तर मग काय म्हणावें ? नानासाहेबाच्या दुर्लक्षामुळें बंगालप्रांत इंग्रजांच्या ताब्यांत जाऊन इंग्रजांचें राज्यस्थापना कार्य सुकर झालें. त्या व्यापारी लोकांस बंगालच्या भांडवलावर बाकी हिंदुस्थानचें व्याज पाडण्याची कला पूर्ण अवगत होती. हिंदुस्थानच्या भांडवलावर इंग्रजांचे धंदे उभारले जाणें शक्य झालें. ईस्ट इंडिया कंपनीच्या 'नवाब' नोकरांनीं बऱ्या वाईट मार्गानें हिंदुस्थानांतून नेलेला पैसा भांडवल म्हणून मिळाला नसता, तर अठराव्या शतकांतील नवे शोध शोधकांच्या घरीं पडून राहून इंग्लंडांत 'औद्योगिक क्रांति' झाली नसती. नवीन धंद्यांच्या पैशावर जगांतील फ्रान्स सारख्या इतर प्रतिस्पर्ध्यांस त्यांनीं नेपोलिऑनिक युद्धांत चीत केलें व पुढें अर्धें जग ताब्यांत आणलें. बाकीच्या अर्धांसहि त्यांचें ग्रहण आहेच. तात्पर्य, परंपरेनें पाहूं जातां नानासाहेबाच्या चुकीचे एवढे घोर परिणाम झाले.

आमच्या या विवेचनाचा तात्विक उपयोग आतां कांहींच नाहीं हें उघड आहे, पण त्यामुळें वर दिलेली कार्यकारणपरंपरा मात्र खोटी पडत नाहीं. जर कोणा एका माणसाच्या हातांत ही अनर्थपरंपरा मुळांतच थांबविण्याचें होतें असें मानलें, तर ती व्यक्ति निश्चयानें नानासाहेब पेशवा होय असें इतिहास वाचणारांस म्हणणें भाग आहे. न्यायाच्या कोर्टांत हुषार वकील कदाचित् पेशव्यास या आरोपांतून मुक्त करूं शकतील, पण तें व्यक्तीवर किती जबाबदारी ठेवावयाची याच मुद्यावर. आम्हीं वरील सर्व विवेचनांत नीतिमत्तेचा मुळींच संबंध आणलेला नाहीं हें लक्षपूर्वक वाचणारांच्या ध्यानांत असेलच. कृत्यांची नीतिमत्ता शोधीत बसण्याच्या भानगडींत न पडतां, त्यांमुळें इष्ट हेतु सिद्धीस गेला कीं नाहीं एवढेंच आम्हीं

पाहतों. नीतीच्या सूक्ष्म विचारांत शिरल्यास महाभारत रचावें लागेल. सर्व हिंदुस्थानांत हिंदुपदपातशाही स्थापन करणें व त्याचें परकीयांपासून रक्षण करणें हीं दोन कर्तव्यें मराठ्यांनीं आपल्या शिरावर घेतलीं होतीं. अशी पातशाही स्थापन करणें न्याय्य होतें किंवा नाहीं हा प्रश्न वेगळा. ती स्थापन करण्याची खटपट करीत असतांना जीं बरीं वाईट कृत्यें करावयास पाहिजे होतीं तीं पेशव्यानें खुशाल करावयाचीं होतीं, त्यांची नीतिमत्ता ठरवावयास आम्हीं आलों नसतों. त्यानें रामराजास राहूं दिलें अशा स्थितींत राहूं देणें न्याय्य होतें कीं काय? दाभाड्याची गुजराथ घेणें न्याय्य होतें किंवा कसें? रजपुतांशीं सरदारांनीं आधीं केलेला करार पाळणें योग्य होतें किंवा नाहीं, असल्या प्रश्नांची चौकशी आम्हीं करूं इच्छित नाहीं. पण ही सर्व मुभा इष्ट हेतु साध्य होईल तर; जर तो होत नसेल तर त्याच्या सर्व कुळकथेची तपासणी करणें भाग येईल. कारण अपयशाचें कारण शोधतांना तें कृत्याच्या अनीतिमत्तेमुळेंच बुडालेलें आढळणें शक्य आहे. एरवीं क्लाइवनें एक खोटा कागद करून बंगाल घेतला असला तर, नानासाहेबानें दोन खोटे कागद करून तो घ्यावयाचा होता असें आम्हीं म्हणूं. असा प्रयत्न करीत असतांना सुद्धां, अकल्पनीय सृष्टीच्या आपातांनीं किंवा एकटा नानासाहेब तेवढा प्रयत्न करीत असतां, त्याच्या सांगण्यास न ऐकतां बाकीचें सारें हिंदुस्थान इंग्रजांस जाऊन मिळालें म्हणून जर कार्य विफल होतें तर वेगळी गोष्ट होईल. पण तसा पुरावा नाहीं तोंपर्यंत, त्या मार्गानें जाणें हेंच त्यास कळलें नाहीं किंवा कळूनहि त्यानें प्रयत्न केला नाहीं असें समजून त्यावर दोष ठेवणें भाग आहे.

नीति-अनीतींचा विचार करावयाचा तर, आजच्या राष्ट्रीय हक्कांच्या मनूंत, मराठ्यांस हिंदुस्थानांतील इतर प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास योग्य कारण होतें असें म्हणतां येणार नाहीं. रजपूत, जाट, बुंदेले; फार काय, मुसलमान नबाबाच्या अमलाखालीं राहणारे गरीब बंगाली; या परप्रांतीय हिंदूंचें मत मराठ्यांविषयीं अनुकूल नव्हतें हें स्पष्ट आहे. 'महाराष्ट्रपुराण' या बंगाली काव्यमय इतिहासाचा कर्ता गंगाराम यानें, भास्कर रामाच्या स्वाऱ्यांचें जें वर्णन दिलें आहे तें, मराठ्यांच्या लौकिकास भूषणास्पद नाहीं खास. टॉडनें दिलेली रजपुतांवरील स्वाऱ्यांची हकीकतहि त्याच मासल्याची आहे. आमच्या मतें मराठ्यांस हिंदुस्थान काबीज करण्याचा नैतिक हक्क एकाच गोष्टीनें मिळण्यासारखा होता. ती गोष्ट म्हणजे हिंदूंचें हिंदुस्थान यवनाक्रांत झालें होतें तें मोकळें करण्याची धार्मिक इच्छा. शिवाजीनें अशीच गोब्राह्मण-

प्रतिपालकाची भूमिका स्वीकारून कार्यास हात घातला. औरंगजेबाच्या कडव्या धर्माभिमानामुळें शिवाजीच्या कार्यास जोरच आला. तशीच परंपरा शिस्तीनें व नीतीनें चालती तर प्रांतोप्रांतीं मराठ्यांच्या स्वाऱ्यांस स्थानिक हिंदूंची मदत मिळणें शक्य झालें असतें. पण त्याच्या जागीं, ' पुण्याची रुक्षता ' दूर करण्यासाठीं दक्षिण व उत्तर या दिशांचे ' सुवर्णनदीप्रवाह ' आणण्याची कल्पना आल्याबरोबर मराठ्यांचा नैतिक अध:पात झाला व परप्रांतीय स्वधर्मीयसुद्धां त्यांचे शत्रु बनले. हिंदुस्थान मोकळें करीत असतां मराठे नीतीनें वागते तर त्यांस मिळाला त्याहूनहि जास्त पैका मिळाला असता, असें तत्कालीन कागदपत्र वाचून आमचें मत झालें आहे. मराठ्यांच्या स्वाऱ्यांनीं, ते जिकडे जिकडे गेले त्या ठिकाणच्या समाजाची, आर्थिक घडी विसकटून जात असे. जर मुसलमानांचें राज्य जुलमी होतें असें समजावयाचें तर, मराठ्यांचें राज्य त्यांच्या जागीं झाल्यावर त्या प्रांताची जास्त भरभराट दिसली पाहिजे होती. तशी ती प्रत्ययास आलेली दिसत नाहीं. कोणत्याहि ठिकाणीं परकियांचें राज्य यशस्वी होण्यास त्या परकियांबद्दल प्रथम अनुकूल वातावरण निर्माण करावें लागतें. इंग्रजांनीं गेल्या शतकाच्या आरंभीं असेंच अनुकूल वातावरण हिंदुस्थानांत निर्माण केलें होतें. त्यामुळें त्यांच्या राज्याची घडी चांगली बसून त्यांस भरपूर पीक काढतां आलें. अनुकूल मत निर्माण होण्यास तसेंच शिस्तवार चोख वर्तन डोळ्यांत तेल घालून राखावें लागतें. तशीच त्याबद्दल चळवळसुद्धां करावी लागते. शिवाजीच्या कालीं असें चळवळीचें काम रामदासासारख्यांनीं केलें. त्यामुळें शिवछत्रपतीच्या विभूतिमत्त्वाचा डांगोरा दिगंतीं ऐकूं गेला व त्यास साहाय्यक मिळूं शकले. राज्यहिताची व संवर्धनाची ही बाजू पेशव्यांच्या डोक्यांत शिरली नाहीं. रामदासासारखे चळवळ्ये प्रेरक प्रांतोप्रांतीं पुढें जाते व त्याबरोबरच पेशवे शिवाजीची करडी शिस्त ठेवून वागते, तर यवनाक्रांत हिंदुस्थान सहजच मोकळें होतें. मराठे पंजाबांत गेले तेव्हां तेथील शीखांची मदत त्यांस अनुकूल करून घेतां आली असती. पण हे त्याऐवजीं तेथील मुसलमानांचीच मदत घेतांना आढळतात. तीच हकीकत रजपूत, जाट, बुंदेले यांशीं वागतांना घडली. विजेसिंग, सुरजमल, सभासिंग वगैरे पराक्रमी हिंदुधर्माभिमानी वीरांचें शौर्य मराठ्यांशीं लढून विफल झालें. त्याचा कोणासच उपयोग झाला नाहीं. जयापा, मल्हारराव, प्रभृति आपल्या सरदारांस कोणावर नेऊन सोडावयाचें याची योजना नानासाहेबाच्या मनांत आली पाहिजे होती. ती येती तर हिंदूंचीं तीर्थें व यज्ञभूमि बळकावून बसलेला वजीर सलामत राहून,

रजपूत कटून लढून मेले नसते. सारांश, हिंदुपदपातशाहीस पोषक अशी नीति मराठ्यांस सातत्यानें राखतां आली नाहीं, तशा कार्यास प्रेरक अशा चळवळीचा मार्ग त्यांनीं अवलंबिला नाहीं व अठराव्या शतकांतील अराजकी कालास योग्य असें संयुक्त-सत्तेचें धोरण त्यांनीं स्वीकारिलें नाहीं, म्हणून त्यांस अपयश आलें.

या संयुक्तसत्तेच्या शेवटच्या मुद्द्याचा जास्त खुलासा केला पाहिजे. आमच्या मतें मोठ्या पुरुषांसहि काळाच्या पुढें जाणें बहुतेक अशक्य असतें. अठराव्या शतकांतील वातावरणांत एकछत्री राज्य स्थापणें शिवाजी सारख्यांनाहि शक्य झालें नसतें. ज्या युगांत एकच अद्वितीय लोकोत्तर विभूति यशस्वी होतांना दिसते त्या काळांत बहुधा दुय्यम प्रतीचे अनेक स्वतंत्र वृत्तीचे पुरुष नसतात. तशी स्थिति असते तेव्हां सर्वांच्या हिताची गोष्ट एकच, ती म्हणजे आपसांत एकोप्यानें, दुसऱ्यांवर सत्ता गाजवण्याचा विचार न धरतां राहून सर्वांनीं कांहीं बाबींपुरतें एक होणें. उदाहरणार्थ राज्यरक्षण, व्यापार, उद्योगधंदे, धर्म इत्यादि गोष्टी. मध्ययुगीन यूरोपांत हंससंघ, 'पवित्र रोमन साम्राज्य' वगैरेसारखीं संयुक्त सत्तात्मक राज्यें होतीं. अशी एकी हिंदुस्थानांत असती तर इंग्रजांना कलकत्त्याहून मद्रासेस किंवा मुंबईस जातांना वाटेंतील प्रत्येक संस्थानिकानें प्रतिबंध केला असता; किंवा मराठ्यांनीं साष्टीवर हल्ला चढविला असतां मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं सुद्धां इंग्रजांवर तिकडील सत्ताधिशांच्या स्वाऱ्या झाल्या असत्या. बिस्मार्कनें अशाच अनेक संस्थानांचें एक जर्मन साम्राज्य बनविलें. नानासाहेबास तसें कांहीं करतां आलें नसतें असें नाहीं, पण तितकी कल्पकता असेल तेव्हां!

नानासाहेबाच्या स्वतःच्या अनेक कृत्यांच्या नीतीचा विचार करतांना सुद्धां, त्याचें वर्तन बऱ्याच प्रसंगीं योग्य म्हणतां येणार नाहीं. रामराजाला ताराबाईच्या सासुरवासांत कुजत ठेवणें याखेरीज त्यास त्या प्रकरणीं दुसरा मार्ग नव्हता असें कोण म्हणेल? दमाजीला तहाची बोलाचाली चालू असतां पकडणें हें चांगलें कसें ठरेल? जास्त पैशाच्या लोभानें ईश्वरसिंगाची एकदां पत्करलेली बाजू सोडणें व त्याच्या प्रतिस्पर्ध्याचा पुरस्कार करणें कसें शोभेल? राजघातकी गाजिउद्दिनाचा पक्ष मराठ्यांनीं धरणें कसें नीतीचें ठरेल? दादोबा प्रतिनिधीस सावनूरकरावर पाठवून तोंडघशीं पाडणें हें सभ्यपणाचें काम काय? बाबूजी नाईक व तुळाजी आंग्रे यांशीं झालेलें त्याचें वर्तन खुनशीपणाचें नाहीं काय? व्यक्तिविषयक दृष्ट्याहि, परप्रांतांतून ' खुबसुरत पोरी ' ' श्रीमंत स्वामीची फर्मास ' म्हणून पाठविण्यास सांगणें हें राज्यपदावरील सुखासीन व अपराक्रमी

पुरुषास शोभलें असतें, पेशव्यास तें खास शोभत नाहीं. ब्राह्मणांनीं मुदलीं राज्यपदारूढ व्हावें किंवा नाहीं हा धार्मिक मुद्दा बाजूस ठेवला तरी, शिवशाहीच्या वहिवाटदार ब्राह्मण पुरुषानें याहून वेगळा नीतिमत्तेचा कित्ता घालून द्यावयास पाहिजे होता.

व्यक्तीची योग्यता ठरवितांना अनेक गोष्टींचा विचार अनेक बाजूंनीं करणें योग्य आहे. सबंध पेशव्यांच्या अमदानींत पहिल्या प्रतीची अशी एकहि इमारत उठलेली दिसत नाहीं. मराठ्यांस स्वास्थ्य असें कधींच नव्हतें हें खरें, तरीहि त्यांस कायम भूषण देणाऱ्या अशा चार दोन इमारतीहि बांधतां आल्या नसत्या असें वाटत नाहीं. अहमदाबाद, विजापूर, आग्रा, लखनौ वगैरे कोणत्याहि मुसलमानी राजधानींत गेलें तर काळाशीं टक्कर देऊन राहिलेल्या अनेक इमारती दृष्टीस पडतात, पुण्यास मात्र तसें कांहींच कां असूं नये ? शनवारवाडा जळून गेला यावरूनच त्याचें काम कोणत्या स्वरूपाचें होतें याची कल्पना करतां येते ! त्याप्रमाणेंच जुन्या बहुतेक शहरांतून एखाद्या कलेची तरी वाढ झालेली दृष्टीस पडते व त्यासाठीं तें शहर प्रसिद्ध राहातें. पुण्यास असा एकहि धंदा नाहीं. एवढ्या गाजलेल्या मराठशाहीच्या राजधानींत परप्रांतियांस पाहाण्यासारखें किंवा घेण्यासारखें अनन्यसदृश कांहीं नाहीं. स्वारीवर जाण्याशिवाय ' सुवर्णनदीप्रवाह ' आणण्याचे व्यापार, उद्योगधंदे, कलाकौशल्य वगैरे कायम फलदायक व जास्त नीतिमत्तेचे मार्ग आपल्या लोकांस शिकविणें हें पेशव्याचें कर्तव्य नव्हतें काय ?

पेशवाई हें ब्राह्मणप्रधान राज्य असल्यामुळें विद्येचा उत्कर्ष या कालांत व्हावा असें कोणी म्हणेल, तर तोहि झालेला दिसत नाहीं. त्या काळीं विद्या ही आधीं ब्राह्मणजातीपुरती आकुंचित. ब्राह्मणांनीं नवें कांहीं संपादन करण्यासारखें आहे ही भावनाच अस्तित्वांत नाहीं अशी स्थिति. बरें जुन्या संस्कृत विद्येचें तरी पुनरुज्जीवन व प्रसार व्हावा, पण तसेंहि फारसें झालेलें दिसत नाहीं. एकही पहिल्या दर्जाचा विद्वान् या काळांत झालेला दिसत नाहीं. खुद्द पेशव्याकडून मराठी भाषेच्या वाढीस पोषक असेंसुद्धां कांहीं घडलेलें दिसत नाहीं. मोरोपंतादि कवी पुण्याबाहेरच्या वातारणांत राहूनच मराठीची सेवा करीत होते. त्यांची विचारपूससुद्धां पेशव्यांनीं केलेली दिसत नाहीं. उलटपक्षीं पेशवाईमुळें निरर्थक कर्मकांडाचें निरर्गल स्तोम मांजलें, ज्यांच्या गायत्रीजपाचा राष्ट्राच्या संवर्धनास तिलमात्र उपयोग नाहीं अशा भट्टमजकुरांचीं तट्टें फुगलीं, अर्थात् हिंदुस्थानची नव्या काळाकडे प्रगति होण्याऐवजीं अंधश्रद्धा व पुराणाभिमान

बोकाळून राष्ट्राची थोडीफार सामाजिक पिछेहाटच झाली असें म्हणण्यास जागा आहे. पेशव्यांच्या दक्षिणेचा व अहिल्याबाईच्या दानधर्मांचा मराठशाहीच्या संवर्धनास कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं; हा सर्व पैसा, तळीं, घाट, वगैरे उपयोगी कार्यास लागला तो वजा करून, व्यर्थ गेला. राष्ट्रांतील जुने दोष नाहींसे करणें व नवीन गुण आणणें, या सामाजिक प्रगतीच्या दोन आंगांकडे पाहतां, नानासाहेबास एकाहि बाबतींत कांहीं करतां आलेलें दिसत नाहीं. मराठशाहींत शिक्षण कायतें लष्करी व दरबारी कामापुरतें वाढलें असेल तेवढेंच. या गोष्टींत सुद्धां तत्कालीन यूरोपाशीं तुलना करतां ज्ञान व शास्त्र या दोन मुख्य बाबींत आम्हीं मुळींच प्रगति केली नाहीं. मूठभर पोर्तुगीज लोकांनीं मराठशाहीच्या अर्ध्या सैन्याला दोन वर्षे तोंड दिलें, यांतील अर्थ समजून नानासाहेब सुधारणा करता तर, तीनशें लोकांनिशीं क्लाइवनें अर्कांटचा वेढा उठविला किंवा पांच हजार फौजेनिशीं वेलेस्लीनें शिंद्याच्या पन्नास हजार लोकांस पळवून लावलें अशा हकीकती हिंदुस्थानच्या इतिहासांत लिहिल्या जात्या ना. राष्ट्राचा उदय व अस्त नुसत्या तोंडपाटिलकीच्या मुत्सद्देगिरीवर किंवा कागदी घोडे नाचविण्याच्या कुटिल नानाफडणिशी राजनीतिवर अवलंबून नसतात, हें त्या काळीं एकाहि शहाण्यास उमजलें नाहीं.

आमचें हें प्रवचन ऐकून कोणी श्रोते असें विचारतील कीं, काय हो, मग जर आमचे पूर्वज इतके नादान होते तर त्यांनीं साम्राज्याचा जो एवढा डोलारा उभारिला तो काय नुसत्या जादूनें ? त्याचें उत्तर असें कीं, आमच्यांत कांहीं गुण निश्चित होते. ते म्हणजे शौर्य, हिंमत, डोक्याची तरतरी व उद्योग. पण केवळ याच गुणांवर राज्य कायम टिकूं शकत नाहीं. शास्त्रज्ञानाशिवाय कोरडी डोक्याची तरतरी कितीशी पुरी पडेल. जर एखाद्या उद्योगी व शूर माणसानें आपणास दुसऱ्या गांवास जावयास कोणत्या रस्त्यानें गेलें पाहिजे याचें ज्ञान करून घेतलें नाहीं, तर नुसत्या चालण्याच्या उद्योगानें व हिंमतीनें तो त्या गांवास पोहोंचेल काय ? कीं गांव दूर राहून तो एखाद्या रानांत शिरेल ? आमचें म्हणणें इतकेंच कीं, पेशव्यांस नवीन कांहीं कल्पना काढण्याचें श्रेय नाहीं. सर्व डोक्याचें काम शिवाजीनें आंखून ठेवलें होतें त्याच्या जोरावर पेशव्यांनीं कांहीं दिवस चालविलें एवढीच त्यांची बहादुरी. भालाईत शिलेदार गोळा करून राज्य संपादितां येतें हा मार्ग दाखविण्याचें श्रेय शिवाजीस. पेशव्यांनीं शिवाजीच्या चौपट असे शिलेदार जमविले असले तरी त्यांत नवीन कल्पना किंवा हिंमत नाहीं. जें एक अजस्र

यंत्र शिवाजीनें चालू करून दिलें त्याचा अंतस्थ जोरच एवढा कीं, तें कांहीं काळ मूळच्या वेगावरच चालावें. त्यांत नवीन वेग उत्पन्न होण्यास जो कोळसा वेळोवेळीं पुरविला पाहिजे होता, तोहि पुरविणें पुढें कोणास झालें नाहीं. शिवाजीच्या राज्यापेक्षां पेशवाईवर जास्त संकटें होतीं असें नाहीं. पण अशाहि काळांत अनेक नवीन गोष्टींचा उपक्रम करण्यास शिवाजीस फुरसत झाली. नाहीं तर राजव्यवहार कोश करून व भूषण कवीस आश्रय देऊन शिवाजीचें राज्य वाढत होतें अशांतला भाग नाहीं, पण आपल्या इष्ट हेतूस पोषक अशा सद्यःफलदायी नसणाऱ्या गोष्टी करण्यांतहि त्याचा हातखंडा होता. भूषण कवीच्या काव्यानें कदाचित् एखादा छत्रसाल आपल्यासारख्या कामांत पडतो व भाषा हेंहि राष्ट्रसंवर्धनाचें एक अंग आहे हें शिवाजी समजत होता; पेशव्यास तें उमजलें नाहीं. तें उमजतें तर पेशवाईतील ब्राह्मणभोजनांच्या खर्चांत एखादा तरी ताजमहाल उठविण्याची वासना त्यांस होती. अजूनहि आमच्यांत तिळातांदुळांचा संहार करणारीं मीमांसामहाविद्यालयेंच स्थापन होत आहेत, टांचण्या व सुया यांसारखे नित्योपयोगी पदार्थ करणारे कारखाने निघूं शकत नाहींत, त्या अर्थी देशाचें नष्टचर्य संपलें नाहीं हेंच खरें. अशा लोकांचा उदय होणें कठीण आहे!

मराठ्यांच्या भराऱ्यांमुळें राष्ट्रावर झालेल्या एका नैतिक दुष्परिणामाचा विचार करून आतां हें विवेचन संपवूं. जॉन मोर्लेचें असें मत होतें कीं, एकोणिसाव्या शतकांत ‘ दुष्ट संदेशांचा ’ ( evil epistles ) प्रसार डार्विन व बिस्मार्क या दोन 'प्रेषित' पुरुषांनीं केला. डार्विनच्या उत्क्रांतिवादानें असें ठरविलें कीं, प्राण्याची उत्क्रांति ही केवळ आकस्मिक अज्ञात कारणांवर ( accident, chance or luck ) अवलंबून असते, त्याचा व्यक्तीच्या प्रयत्नाशीं किंवा नैतिक गुणांशीं संबंध नाहीं. उदाहरणार्थ, आपली मनुष्यजात ही वानरजातीपासून उत्क्रांति कां पावली व सध्यां अस्तित्वांत असलेल्या वानर जातींची तशी उत्क्रांति न होतां त्या त्याच स्थितींत कां कायम राहिल्या, या गोष्टीस कारण नाहीं. या मोठ्या सिद्धांताचा उपयोग सर्वसाधारण गोष्टींत करूं लागलें म्हणजे अर्थातच नीतिमत्तेचा पायाच ढांसळून पडतो. व्यक्तींच्या किंवा राष्ट्रांच्या प्रयत्नांवर व सद्गुणांवर जर त्यांची उन्नति अवलंबून नसेल, तर कोणासच उद्योग करण्याची व इंद्रियदमनाची जरूर राहाणार नाहीं, कारण उद्योग करूनहि उन्नति होते असें थोडेंच आहे! बिस्मार्कनें राजकीय क्षेत्रांत असें ठरविलें कीं, कुटिल नीति, खोटे कागद करणें व पाशवी सामर्थ्य यांवरच राष्ट्राचा उदय होऊं शकतो; अर्थात् नीतिमान्,

उद्योगी, चिमुकल्या व ( युद्धदृष्ट्या ) दुर्बल राष्ट्रांची धडगत नाहीं. याप्रमाणें जर्मनीचा उदय झाला हें स्पष्टच होतें. हिंदुस्थानच्या निराशाप्रधान व दैववादी लोकांवर मराठ्यांच्या अप्रतिहत स्वाऱ्यांनीं असाच परिणाम झाला. आपण काय अपराध केला किंवा अमार्गानें गेलों म्हणून ही मराठ्यांची टोळधाड आपल्यावर आली असें त्यांनीं समजावयाचें ? एखाद्या कारागिरानें किंवा शेतकऱ्यानें आपल्या उद्योगाचें फल क्षणार्धांत नष्ट होतांना पाहून काय मानावयाचें ? आपल्या उद्योगाचें फल आपल्यासच उपभोगावयास सांपडेल असा विश्वास नाहीं तर उद्योग कोण करणार ? पाशवी शक्तीशिवाय असा कोणता गुण त्यांस मराठ्यांच्या आंगीं दिसत होता ? अर्थात् सगळीकडे निराशा, दैववाद, मायावाद, अंधश्रद्धा यांचेंच साम्राज्य पसरलें व या स्थितींत आपलें सुव्यवस्थित राज्य स्थापणें इंग्रजांस सोपें झालें. अशा वातावरणाचा राष्ट्रावर असा परिणाम होतो कीं, ' तुरूत दान, महापुण्य ' ही दृष्टि बोकाळते. दीर्घकाळ सतत उद्योग, राष्ट्राचा भावी उदयकाल होण्यासाठीं, आज दृश्य फायदा नसतांना करणें, हें कोणासच सुचत नाहीं. आज खिशांत पैसा आहे. खुशाल खावेंप्यावें, सिनेमाला जावें, कोणाला ठाऊक आपला जीव मारून पैसा देशकार्याकडे लावून तरी स्वराज्य मिळतें आहेसें ! सर्व दैवाधीन ! कांहीं उद्योग करणें तोहि सद्यःफलदायी करावा. परसांत मेथीची भाजी पेरावी, पंधरा दिवसांत होते. अक्रोडाचें झाड लावून चाळीस वर्षें वाट कोणी पहावी ? आणि मध्येंच झाड कीड लागून मेलें तर, वाऱ्यानें मोडलें तर, कोणी लाकूड तोडून नेलें तर, वांझच निपजलें तर, कडू निघालें तर, आपण जगलों तर, जमीन आपल्या ताब्यांत राहिली तर, अशा किती तरी 'तरी' मध्यें राहातात. शंभर वर्षें वांचूं या विचारानें वागावें कोणी ? त्यापेक्षां दहाव्या वर्षीं लग्न, सत्राव्या वर्षीं मूल, तिसाव्या वर्षीं नातवंड, चाळिसाव्या वर्षीं अक्रोडाला फळें येण्यापूर्वीच पूर्वजांच्या मागें जावें. अशा विचारसरणीनें कोणत्याहि राष्ट्राचा उदय होत नसतो एवढें मात्र खरें. अशा राष्ट्रानें नेहमीं मेथीची भाजीच खात रहावें, त्याच्या वांट्यास अक्रोड कधीं येणें नाहीं.

नानासाहेबाच्या चरित्रांतील बहुतेक बाबींचें विवेचन येथवर केलें. त्यावरून असें दिसून आलें कीं, त्या पुरुषाच्या आंगीं पहिल्या प्रतीचा असा गुण नव्हता. मराठशाहींत शिवाजीच्या खालोखाल त्याचा अनुक्रम लागतो किंवा न लागतो हा प्रश्न गौण आहे. ज्या वर्गांत भास्कराचार्यासारखा एखादा बृहस्पति असतो, त्या वर्गांत दुसऱ्या कोणा तरी मुलाचा दुसरा नंबर लागतच असतो. पण त्याव-

रून त्यांस पहिल्या व दुसऱ्या नंबरचे विद्यार्थी ठरविणें योग्य नाहीं. हजारों शाळांतून एखादा भास्कराचार्य असतो, बाकी पहिले व दुसरे नंबर कोणाचे तरी लावतातच. वास्तविक शिवाजी व नानासाहेब हे वेगळ्या जातींचेच पुरुष समजावयाचे. हजारों तारकांची बेरीज करून एक तमोनाशक चंद्र तयार होत नाहीं किंवा हजारों परप्रकाशित चंद्रांचा गोळा करून एक सूर्य होत नाहीं. नानासाहेब हा असा एक चंद्र होता. पण त्याचे सर्व गुण त्यास मिळालेल्या पदावर अवलंबून होते. तसें पद न मिळतें तर हैदर, रणजीतसिंग किंवा क्लाइव यांप्रमाणें शिपाईगिरीची नोकरी पत्करून उदय करून घेण्यासारखा तो पुरुष नव्हता. त्याचा–' सरदारीनें काम करावें, जातिनिशीं वायां जाऊं नये ' हा युद्धशास्त्रदृष्ट्या फार उपयुक्त नियम होता. पण जातीनिशीं काम न करणारा कोणीहि माणूस काळोखांतून उजेडांत येत नाहीं हें तेवढेंच खरें आहे. आपल्या कार्यास अनुकूल वातावरण नसूनहि तें निर्माण करणें, समाजाच्या पुढें दृष्टि पोहोंचणें, जगाचें विस्तृत ज्ञान असणें, त्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्याची तयारी ठेवणें, वगैरे महापुरुषास आवश्यक गुणांपैकीं एकहि त्याजवळ नव्हता. हिंदुस्थानच्या राजकीय पटाचेंहि त्यास आकलन झालें नाहीं. आधीं कोठलें काम हातीं घ्यावें, मग कोठलें घ्यावें, हेंहि त्यास कळलें नाहीं. इंग्रज प्रभृतींची पारख त्यास होऊं शकली नाहीं. हिंदुपदपातशाहीस पोषक काय याचा विचार त्यास शिवला नाहीं. राष्ट्राच्या उन्नतीस आवश्यक काय हें त्यानें पाहिलें नाहीं. अशा सर्व गोष्टींचा विचार करतां त्याच्याबद्दल वर प्रदर्शित केलेलें मत फारसें चुकलें नसावें असें वाटतें.

आमचें पुराण संपलें. यांतील सर्वच मतें कोणास पसंत पडावीं अशी आमची अपेक्षा नाहीं. आपण जर भरमसाट आपल्या पूर्वजांस मूख ठरवीत गेलों तर त्यांचा इतिहास वाचील कोण अशी सकारण शंका पुष्कळांस येते. आमचें त्यावर म्हणणें असें कीं, दोष झांकून लिहिलेल्या इतिहासाच्या वाचनाचा उपयोग नाहीं. आम्हीं इतिहास ही करमणूक समजत नसून उपयुक्त व आवश्यक असें एक शास्त्र समजतों. नाटकें, कादंबऱ्या, काव्यें वगैरे करमणूकीचे दुसरे मार्ग मोकळे आहेत. तेव्हां केवळ करमणुकीसाठीं व वडिलांच्या कीर्तीवर मिशांस पीळ देणाऱ्यांकरतां इतिहास नाहीं. असे वाचक गळले तरी त्यापासून राष्ट्राचें कोणतें अहित होणार आहे? आमच्या या लेखनानें वाचकांच्या विचारांना चलन देण्याचें कार्य घडलें तरी पुष्कळ असें आम्हीं समजूं व तसें झाल्यास त्याबद्दल त्यांनीं ग्रंथकार सरदेसाई यांचे आभार मानावे; कारण त्यांच्या इच्छेखेरीज आमच्या हातून कांहीं लिहिलें जाण्याचा मुळींच संभव नव्हता.

**त्र्यंबक शंकर शेजवलकर.**



श्रीमंत नानासाहेब पेशवे

Lakshmi Art, Bombay 8.



मल्हारराव होळकर

Lakshmi Art, Bombay 8.

स्थळप्रत
ग्र. सं. धो. टाणे.
श्री

# नानासाहेब पेशवे

यांचें

# चरित्र.

६ ३१८
२२२८
१४-११

## प्रकरण पहिलें.

## पूर्ववृत्तान्त.

मराठशाहीचा सूर्य ज्याच्या अमदानींत डोक्यावर आला, मराठ्यांच्या सेनासागराच्या लाटा ज्याच्या कारकीर्दींत भरतखंडाच्या सीमेवर जाऊन आदळल्या, भीमथडीच्या घोड्यांनीं ज्या काळांत गंगा-सिंधु-कावेरींच्या जलांनीं आपली तृषा शांत केली, त्या भाग्यशाली काळाचा सूत्रधार बाळाजी बाजीराव भट ऊर्फ नानासाहेब पेशवा होय. मराठ्यांच्या कर्तबगारीची पराकाष्ठा याच्याच सूत्रचालनेनें प्रगट झाली. अशा या स्फूर्तिदायक पुरुषाचें चरित्र हाच प्रस्तुत ग्रंथाचा वर्ण्य विषय होय.

सध्यांच्या रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांच्या मध्यें समुद्रकांठीं जंजिऱ्याचें लहान संस्थान आहे. येथील संस्थानिक जातीनें शीदी ऊर्फ हबशी मुसलमान आहे. त्यांचा पूर्वज विजापुरच्या आदिलशाहीचा आरमारी सुभेदार होता. औरंगजेबानें महाराष्ट्र जिंकल्यानंतर त्यानें या शीदीसच पश्चिम किनाऱ्यावरील मोंगल आरमाराचें आधिपत्य दिलें. सुरतेपासून सारी कोंकणपट्टी व प्रत्यक्ष मराठ्यांची राजधानी रायगड हीं शीदीच्या अंमलाखालीं होतीं, व मराठ्यांस शेवटपर्यंत पुरून मोगल बादशाहीचा हा अवशेष अजूनहि शिल्लक आहे. या संस्थानांत समुद्रतीरीं श्रीवर्धन म्हणून मोठा गांव आहे. समुद्रांतून पाहिला असतां हा गांव नारळ व पोफळ यांच्या बागांनीं नुसता भरगच दिसतो. श्रीवर्धनी रोटी सुपारी

तर प्रख्यात आहे. हेंच सुपीक व सुंदर गांव भट घराण्याचें मूलस्थान होय. या प्रांताला पूर्वी दंडाराजपुरी हें नांव चालत असे, व भटांचें घराणें मुसलमानी अंमलाच्या प्रारंभापासून या प्रांतींचे देशमुख म्हणून अधिकारावर होतें. त्या काळचे देशमुख म्हणजे लष्करी, फौजदारी व मुलकी या सर्व अधिकारांनीं युक्त असत. बाळाजी विश्वनाथाचा पणजा महादाजी हा इ. स. १५७५ च्या सुमारास देशमुख असल्याचा उल्लेख सांपडतो. पुढें औरंगजेबानें संभाजीस मारून महाराष्ट्र पादाक्रांत करण्याच्या सुमारास, कोणत्याहि कारणानें असो,–कदाचित् मराठ्यांच्या पक्षपातित्वाबद्दल असेल,–भट घराण्याचें व शीदी सुभेदाराचें इतकें वांकडें आलें कीं, बाळाजी विश्वनाथास श्रीवर्धन सोडून मराठी राज्यांत जावें लागलें. ही गोष्ट इ. स. १६९७ च्या सुमारास घडली असावी. कारण १६९६ त तो दंडाराजपुरीचा देशमुख, श्रीवर्धनचा अधिकारी व दाभोळचा सभासद म्हणजे सुभेदारास सल्ला देणारा होता, अशा उल्लेखाचीं पत्रें सांपडलीं आहेत. देशावर आल्यावर तो पुणें व दौलताबाद या दोन प्रांतांचा सरसुभेदार असल्याचीं पत्रेंहि छापलीं आहेत. या वेळीं शाहू व त्याची आई येसूबाई हीं अहंमदनगरास बादशाही कैदेंत होतीं. त्यांची योग्य व्यवस्था रहावी म्हणून बाळाजीपंत नानानें खटपट केली असाहि एक उल्लेख सांपडतो. म्हणजे बाळाजी विश्वनाथ हा कोंकणांतून पोट भरण्यास आलेला एक यःकश्चित् कारकून होता, ही आजपर्यंत ग्रांट डफवरून प्रचलित झालेली कहाणी साफ खोटी ठरते. तसें कांहीं नसून शाहूनें पेशवाईपदास लायक ठरविलेला बाळाजी विश्वनाथ हा कुलीन, घरंदाज, अनुभवी व पराक्रमी असा तत्कालीन शाहूच्या सहायकांत श्रेष्ठ पुरुष होता. त्याच्या कारस्थानांशिवाय शाहूचें पाऊल टिकणें शक्य नव्हतें. म्हणूनच आपला पाय पूर्ण रुतल्यावर व बाळाजीची कसोटी लागल्यानंतर शाहूनें, एका घराण्यांतून दुसऱ्या घराण्याकडे प्रधानपदें बदलणें त्यास आवडत नव्हतें तरी, बाळाजीस स० १७१३ त प्रधानपद दिलें. यानंतर सात वर्षें त्यानें शाहूची सेवा अत्यंत दक्षतेनें बजाविली. दिल्लीस जाऊन शाहूची मातुश्री वगैरे माणसें सोडवून आणिलीं, आणि चौथाई सरदेशमुखीच्या पातशाही सनदाही आणिल्या. अशीं कामें करून १७२० सालीं शाहूचा हा पहिला पेशवा दिवंगत झाला. ह्याच चरित्रनायकाचा आजा असून त्याचेंच बाळाजी हें नांव नातवास ठेवण्यांत आलें.

बाळाजी विश्वनाथास दोन मुलगे होते. वडील बाजीराव व धाकटा चिमाजी-आप्पा. बाळाजी नंतर बाजीरावासच शाहूनें पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. बाजीरावाची

आई राधाबाई ही मोठी शहाणी व पराक्रमी बायको होती. घरचा सगळा कारभार तिच्या सल्ल्यानें होत असे. बाजीराव हा शुद्ध शिपाई बाण्याचा लढवय्या पुरुष होता. त्याचें संसाराकडे फारसें लक्ष नसे. त्यामुळें राधाबाई व चिमाजीआपा यांजवर कुटुंबाचें ओझें होतें. बाजीरावाचें लग्न बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळण्यापूर्वींच महादाजी कृष्ण जोशी चासकर, छत्रपतींचे पोतदार व सावकार, यांची कन्या काशीबाई इच्याशीं झालें होतें. काशीबाई स्वभावानें गरीब असून नवऱ्यावर तिचें वजन बेताचेंच असे. इच्या पोटीं चरित्रनायक बाळाजी ऊर्फ नानासाहेब याचा जन्म ता. १२ दिसेंबर १७२१ रोजीं पुणें जिल्ह्यांतील नाणे मावळांत सातें मुक्कामीं झाला. बाळाजीचें बालपण बहुतेक सातारा व पुणें या ठिकाणीं गेलें. बाप बाजीराव बहुतेक बाहेर स्वारीवर असे. त्यामुळें मुलास बापाचा सहवास फारसा घडला नाहीं. चुलता चिमाजीआपा हाच घरच्या कारभारावर लक्ष ठेवीत असे. बाळाजीचें शिक्षण आजी राधाबाई, चुलता चिमाजी व कारभारी अंबाजीपंत पुरंदरे यांच्या सहवासांत झालें. गृहशिक्षण व बाहेरचा अनुभव यासंबंधानें पेशव्यांच्या घराण्यांतील दक्षता त्या काळच्या इतर प्रमुख घराण्यांतहि क्वचितच आढळली असती. बुद्धिमत्ता, उद्योग व शिस्त हे चित्पावन ब्राह्मणांचे मुख्य गुण पेशव्यांच्या घराण्यांत प्रथमपासून दिसतात; व याच गुणांच्या बळावर कोंकणांतील ब्राह्मणांनीं देशावरच्या वतनदार घराण्यांवर आपली छाप बसविली. पेशव्यांच्या घराण्यांत वैभवामुळें मुलांच्या शिक्षणाची हयगय कधींहि झाली नाहीं.

त्या काळचें कर्तबगार घराण्यांचें शिक्षण म्हणजे मोडी बालबोध लेखन वाचन, हिशेबाची पूर्ण माहिती, संस्कृत वाचतां येणें, घोड्यावर बसणें व शस्त्रास्त्रांत प्रावीण्य संपादिणें, या विषयांचें असे. दहाबारा वर्षांच्या वयांतच मुलांस बाहेरील व्यवहारांचा प्रत्यक्ष अनुभव मिळूं लागे. पुस्तकी शिक्षणापेक्षां त्या वेळीं व्यावहारिक बाबींवर विशेष भिस्त असे. रामायण व महाभारत हे ग्रंथ म्हणजे सर्व हिंदूंच्या शिक्षणाचा, स्फूर्तीचा व पराक्रमाचा आधार होत. नानासाहेबास संस्कृत चांगलें येत असून महाभारतांतील निवडक भाग, पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनीति आदि नीतिग्रंथ, यांचा त्यास व्यासंग होता. अंबाजीपंत पुरंदरे, गोविंदराव चिटणीस, व रामचंद्रबाबा शेणवी यांच्या सहवासांत त्यानें पत्रव्यवहार व हिशेबी काम उचललें. या कामांत पेशव्यांच्या घराण्याचा शेवटपर्यंत हातखंडा होता. घोड्यावर बसणें वगैरे लष्करी शिक्षण त्या-

वेळच्या दरबारांत वागणाऱ्या सर्व मराठ्यांस उपजतच मिळत असे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्धाचें प्रत्यक्ष ज्ञान मात्र बाळाजीस लहानपणीं मिळालें नाहीं. त्यास एक कौटुंबिक गोष्ट आडवी आली. बाळाजी स्वतःचे जबाबदारीवर स्वारींत जाण्याइतका मोठा होण्यापूर्वीच बाजीरावाची मस्तानीशीं गांठ पडली, त्यामुळें बाजीरावाचें घरांतल्या मंडळीशीं रहस्य नाहींसे झालें. विशेषतः या बाबतींत *बाळाजीचें मन बापाविषयीं बरेंच कलुषित झालें असावें. या कारणामुळें बाळाजी कधीं बापाबरोबर स्वारीस गेल्याचें नमूद नाहीं.* चुलता चिमाजी याजबरोबर जावयाची त्यास संधि होती, पण छत्रपतीच्या दरबारीं घरचा असा एक तरी माणूस तेथील नानाविध व्यवहारांवर व निरनिराळ्या व्यक्तींच्या खटपटींवर देखरेख ठेवण्यासाठीं साताऱ्यास रहाणें इष्ट असे. अर्थातच तें काम बाळाजीवर येऊन पडे. साताऱ्याला राहून छत्रपतीच्या दरबारांतील मराठशाहीचीं सर्व कारस्थानें व घडामोडी कैक वर्षे सतत डोळ्यांपुढें असल्यामुळें, बाळाजीस मराठशाहीच्या घटनेचें मात्र उत्तम ज्ञान झालें. शाहूचा सर्व मराठे सरदारांशीं व राजेरजवाड्यांशीं जो पत्रव्यवहार चाले तो गोविंदराव चिटणीसाच्या सहवासांत बाळाजीस सहजच वाचावयास मिळे; तसेंच अनेक कारस्थानें व गुप्त खलबतें हींहि त्याच्या कानावरून जात. यामुळें मराठशाहींतील वेगवेगळ्या माणसांच्या स्वभावाची व कर्तबगारीची त्यास प्रत्यक्ष माहिती झाली. शाहूच्या मरणानंतर मराठशाहीची व्यवस्था लावतांना या सर्व अनुभवाचा बाळाजीस चांगला उपयोग झाला. पण त्याबरोबरच, स्वारींत फिरण्यानें जो हालचालींचा उत्साह, काटकपणा व युद्धाची आवड उत्पन्न होते, ती त्यास न झाल्यामुळें पुढेंहि पेशवा झाल्यावर बहुतेक स्वाऱ्या त्यास सरदारांमार्फत चालवाव्या लागत. स्वतः त्याच्या आंगीं कारस्थानांचे व व्यवहाराचे डावपेंच चांगल्या प्रकारचे असल्यामुळें, बापाच्या शिपाईगिरीची जोड त्यास असती तर मराठशाहीचें पुढील स्वरूप कदाचित् वेगळें झालें असतें, व सरदारांच्या एककली स्वैर वर्तनास आळा पडून मराठशाही विस्कळीत न राहतां सुदृढ बनली असती.

आजोबाचें नांव नातवास ठेवण्याचा प्रघात महाराष्ट्रांत बराच आहे. पण प्रत्यक्ष बापाच्या नांवानें आपल्या मुलास हांक मारणें गैर वाटत असल्यानें सहाजिकच नातवास टोपणनांव प्राप्त होतें. त्याप्रमाणें बाळाजीस घरांत नाना म्हणत व बाहेर नानासाहेब हें त्याचें नांव रूढ झालें. आजोबासही बाळाजीपंतनाना असें म्हणत. नानासाहेबास रामचंद्र, रघुनाथ व जनार्दन असे तीन धाकटे भाऊ

झाले. पैकीं पहिला लहानपणींच वारला. दुसरा प्रख्यात राघोबादादा हा नानासाहेबापेक्षां तेरा वर्षांनीं लहान होता व त्याहूनहि लहान जनार्दनबावा. हाही पुढें लग्न होऊन नंतर अल्पवयांतच वारला. चिमाजीस पहिल्या बायकोचा सदाशिवरावभाऊ हा एक मुलगा व दुसऱ्या बायकोची एक मुलगी वयावाई झाली. सदाशिवराव राघोबापेक्षां चार वर्षांनीं वडील होता.

नानासाहेबानें पेशवा झाल्यावर आपल्या एकविसाव्या वर्षीं आठ वर्षांच्या रघुनाथास स्वारींतून एक पत्र लिहिलेलें उपलब्ध आहे. तें वाचल्यानें तत्कालीन शिक्षणासंबंधीं नानासाहेबाचा अभिप्राय कळून येतो. तें पत्र असें:—

" येथून जाते समयीं जें सुचलें तें तुम्हांस सांगितलें आहे, त्याचें निरंतर स्मरण मनांत असूं देणें. रघुवंश, विदुरनीति, चाणक्य व जें तुम्हांस येत असेल, त्याची नेमपूर्वक चिंतनिका करून थोडेंबहुत शास्त्री यांजवळ नित्य म्हणत जाणें. विराटपर्वापासून पुढें भारत रिकामपणीं वाचीत जाणें. केवळ घोडीं फेरावयाचे छंदास न लागणें. वजनी, कैली, बेरीज करावयाचा सराव बहुत करणें. चिरंजीव भाऊची मर्जी बहुत प्रकारें रक्षण करीत जाणें. घोडीं वेगळीं बांधीत न जाणें. क्षुद्र मनुष्याशीं सहवास कोणी प्रकारेंहि न करणें. मातुश्रीबाई ( आजी ), ताई ( काशीताई ), अनुबाई ( आते ), यांशीं एक दों दिवशीं अर्धघटकाभर जाऊन बसत जाणें. शरीरप्रकृत नीट नाहीं यास्तव औषध कांहीं नेमेंकरून घेत जाणें. भाऊसमागमें घोडीं फेरावयास जात जाणें. सातारियास जर जावयाची आज्ञा केली, तर चिमणगिरी गंगाधरभटास, भाऊजवळ विनंति करून, बरोबर दिल्हें तर घेऊन जाणें. सातारियास गेल्यावर दोनहि बाईंकडे ( शाहूच्या राण्या ) विना बोलाविल्यावांचून, अथवा गोविंदराव यांनीं आपण सांगितल्यावांचून, न जाणें. कालानुरूप, वयास उचित, योग्य वेष करीत असावें. देवपूजा थोडी परंतु एकांतीं, न बोलतां करीत जाणें. इतकेंही नेमेंकरून करावें आणि गर्व न करावा. निरंतर साधनवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी. सावध वर्तावें. सर्व जें मनेंकरून समजेल तें समजावें. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावें. शिष्यधर्में असलिया उपयोग आहे.* चिरंजीव जनार्दन ( कनिष्ठभाऊ ) बहुत कामही करून पढतात. ते हरएक गोष्टींत अधिक झाल्यास तुम्हीं त्यांस मान्य पुरुष कसे व्हाल ? "

---

* Always desirous to learn.

या पत्रावरून नानासाहेबाचे तत्कालीन शिक्षणाचे विचार कळतात. आठ वर्षांच्या मुलास हें पत्र समजत होतें असें मानलें तर आजहि इतका समज असलेले मुलगे क्वचितच आढळतील! नानासाहेबाचा ओढा शिपाईपेशाकडे नव्हता हेंही यावरून दिसतें. देवपूजा, वेष वगैरे संबंधींचीं त्याचीं मतें यांत दिग्दर्शित झालीं आहेत.

नानासाहेबाचें लग्न दहाव्या वर्षी गोपिकाबाईशीं बाईस झालें. गोपिकाबाई ही भिकाजी नाईक रास्ते सावकार यांची कन्या. लग्नांत इचें वय पांच वर्षांचें असावें. या संबंधामुळें रास्ते घराण्याचा उदय झाला. या वयांतच नानासाहेब स्वतःच्या अकलेनें पत्रलेखन करीत असे. साताऱ्यास राहून छत्रपतीच्या दरबारची माहिती तो बाप व चुलता यांस कळवी. त्यानें आपल्या वर्तनानें व शहाणपणानें शाहूची मर्जी फार चांगली संपादन केली. सन १७३७ पासून दोनतीन वर्षें तो शाहूबरोबर मिरजेच्या स्वारींत होता. हाच त्याचा युद्धाचा पहिला अनुभव असावा. स० १७३९ मध्यें चिमाजीआपानें वसई घेतली, तेव्हां इंग्रजांस दहशत वाटून त्यांनीं आपला वकील गॉर्डन यास मुंबईहून शाहूकडे पाठविलें. त्या वेळीं बाजीराव व आपा दोघेहि बाहेर स्वारींत होते, म्हणून गॉर्डननें नानासाहेबाची भेट घेतली. त्या वेळीं नानासाहेबाच्या धूर्ततेबद्दल व सलगी न दाखवतां बेतशीर वागण्याबद्दल गॉर्डनची चांगलीच खात्री पटली. त्यानें आपल्या रोजनिशींत या गोष्टीची मुद्दाम नोंद केली आहे. नानासाहेबानें साहेब मजकुरांच्या आगमनाबद्दल नापसंति दर्शविली. आपास वसईस न भेटतां खुद्द शाहूकडे येण्याचें कारण काय असें नानासाहेबानें त्यास विचारलें, त्याचें समाधानकारक कारण गॉर्डनला सांगतां आलें नाहीं. पेशव्यांस दूर ठेवून परभारें छत्रपतीशीं तह करण्याचा इंग्रजांचा विचार होता, तो नानासाहेबास कळल्याशिवाय कसा राहणार? अर्थात् त्यानें वकिलाशीं वागतांना साशंक वृत्तीनें रहावें हें योग्यच होतें.

स. १७४० च्या फेब्रुवारींत सदाशिवरावाचें लग्न व रघुनाथरावाची मुंज हीं दोन कार्यें पुण्यास झालीं. बाजीराव या वेळीं स्वारींत होता. तरीही नानासाहेबाच्या आग्रहावरून खुद्द शाहू छत्रपति या प्रसंगासाठीं मुद्दाम एकवार पुण्यास आले होते. नानासाहेबानें साताऱ्यास राहून शाहूची मर्जी कशी संभाळली होती याचें हें एक उदाहरण आहे. या प्रसंगाखेरीज शाहू महाराज पुण्यास कधीं आल्याचें दिसत नाहीं. हीं कार्यें आटोपून नानासाहेब चिमाजीआपाबरोबर कोंकणांत मानाजी आंग्र्याच्या साह्यास गेला. कान्होजी आंग्र्याच्या वेळेपासून कोंकणपट्टींत

आंग्रेच सत्ताधीश होते. बाळाजी विश्वनाथासही कान्होजीशीं गोडीच करावी लागली होती. तेव्हांपासून आंग्र्यांचें पारडें हलकें करून कोंकणस्थांची मायभूमि आपल्या स्वतःच्या अंमलाखालीं आणावी असा पेशव्यांचा विचार दिसतो. शिवाय आंग्रे पेशव्यांची हुकमत मानीत नसत. सबब त्यांना संभाजी व मानाजी या बंधूंच्या भांडणांत लक्ष घालावें लागलें. संभाजी आंग्र्यानें आपलें आरमार पाठवून मानाजीस वेढलें होतें, सबब मानाजीस उचलून धरण्यासाठीं नानासाहेब कोंकणांत उतरला व त्यानें मानाजीस सोडविलें. हें काम आटोपतें आहे तोंच बाजीराव नर्मदातीरीं वारल्याचें वर्तमान त्यास कुलाब्यास कळलें. तेव्हां तेथेंच उत्तरक्रिया आटोपून नानासाहेब लगेच पुण्यास आला. नंतर आठ दिवसांनीं आई काशीताई बाजीरावाच्या स्वारींतून परत येऊन पोहोंचली. अशा रीतीनें वयाच्या एकोणिसाव्या वर्षी स्वतःच्या पायांवर उभें रहाण्याची जबाबदारी तरुण नानासाहेबावर येऊन पडली. ती त्यानें कशा युक्तीनें पार पाडली हें पुढील प्रकरणांत पाहूं.

---

## प्रकरण २ रें.

# पेशवेपदप्राप्ति व पुढील उपक्रम.

नानासाहेबाच्या टीकाकारांनीं या पेशव्यावर टीका करतांना त्यानें प्रथमच कपटकारस्थानानें पेशवाई संपादिली असा त्यावर आरोप ठेवलेला आढळतो. या मुद्द्याचें निराकरण करण्याकरितां हा प्रकार कसा घडला तें प्रथम सांगितलें पाहिजे.

बाजीराव वैशाख शु० १३ रविवार ता. २८ एप्रिल १७४० रोजीं मरण पावला, व ता. २५ जून रोजीं नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. म्हणजे या दोन महिन्यांतच काय तीं टीकाकार म्हणतात तीं कारस्थानें घडलीं असलीं पाहिजेत. त्यांतील आरंभींचा महिना तर बापाच्या मृत्यूची बातमी नानासाहेबास कळून तो पुण्यास येऊन पोचण्यापर्यंत संपला. याच सुमारास शाहूकडून नारो राम मंत्री व जिवाजी खंडो चिटणीस हे इसम नानासाहेबास साताऱ्यास नेण्यासाठीं पुण्यास आले. या एकाच गोष्टीवरून शाहू महाराजांचा कल स्पष्ट दिसतो. १३ जून रोजीं साताऱ्यास पोहोंचल्यावर बारा दिवसांतच नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें समारंभानें देण्यांत आलीं. या वस्त्रांची किंमत २३० रुपये होती. खेरीज मोत्यांचा तुरा,

निमचा व कट्यार हे जिन्नसही त्यास देण्यांत आले. याच वेळीं पेशव्यांच्या गैरहजिरींत साताऱ्यास त्याच्यातर्फे काम पहाण्यासाठीं माहादाजीपंत पुरंदरे यास शाहूनें पेशव्याचा मुतालिक म्हणून नेमिलें.

भट घराण्यांतच पेशवाई कायम होऊं नये अशाबद्दल खटपट करणारांत रघूजी भोसले हा प्रमुख होता. तो आपणांस छत्रपतींचा आप्त समजे. बाजीरावाच्या मृत्यूची बातमी त्यास कर्नाटकच्या स्वारींत समजली, तेव्हां तो तसाच सैन्य मागें ठेवून सड्या स्वारीनिशीं पेशवाईच्या खटपटीसाठीं लगोलग साताऱ्यास आला. सावकार बाबूजी नाईक पेशव्यांचा आप्त, त्याचे भावास बाळाजी विश्वनाथाची मुलगी भिऊबाई दिलेली होती, व तो रघूजीचा मित्र होता, तेव्हां बाबूजीस पेशवाईचें पद द्यावें असें रघूजीनें सुचविलें. आपल्या स्नेह्यास हें पद मिळवून देण्याची खटपट करून प्रतिपक्षाचें पारडें हलकें करण्यांत रघूजीचे दोन हेतू दिसतात. एक तर त्यामुळें पेशव्यांशीं फारसे स्नेहभावांत नसलेले प्रतिनिधि, सचिव प्रभृति कित्येक पुरातन अधिकारी आपोआप आपल्या पक्षास मिळून मराठशाहींत आपणास प्रमुखपणा मिळेल, आणि त्यामुळें स्वतःचा पक्ष मजबूद होऊन पुढेंमागें शहूच्या पश्चात् छत्रपतीची गादी आपल्या घरांत येण्यास मदत होईल. परंतु हा त्याचा प्रयत्न अनेक कारणांमुळें सिद्धीस गेला नाहीं. प्रधानाचीं किंवा इतर पदें विशेष कारण असल्याशिवाय एका घराण्यांतून काढून दुसऱ्यास देऊं नयेत, अशी शाहूची स्वतःची मनोभावना त्या कालच्या वहिवाटीस अनुसरून होती. नानासाहेब लहानपणापासून शाहूच्या नजरेंत वाढलेला असल्यामुळें, त्याचे गुणदोषांची पूर्ण पारख इतरांच्या मानानें शाहूसारख्या गुणपरीक्षकास अरपूर झालेली होती. आपल्या गोड व विचारी स्वभावानें आणि कर्तबगारीनें नानासाहेबानें शाहूचेंचसें काय, पण प्रतिनिधिप्रभृति प्रतिपक्षीयांचेंहि प्रेम लहान वयांतच संपादिलें होतें. दरबारांतील बहुतेक लोकांस बाळाजी विश्वनाथाचा नातू व बाजीरावाचा पुत्र नाना हाच छत्रपतींच्या उतार वयांत राज्याचा भार वाहूं शकेल असें साहजिकच वाटत होतें. दुसरी गोष्ट, नानासाहेबास प्रतिस्पर्धी म्हणून उभा केलेला बाबूजी नाईक याची कांहींच मोठी म्हणण्यासारखी कर्तबगारी शाहूपुढें झळकली नव्हती. तो सावकार व पैसेवाला असल्यानें त्याची गरज सर्वांस लागे; पण पैशाचा पाठिंबा एवढीच कांहीं प्रधानपदास पुरेशी लायकी नव्हती. तत्कालीन इतर सरदार रघूजीप्रमाणेंच व्यक्तिशः पराक्रमी होते, परंतु पेशवाईचें महत्पद चालवून राज्याचें ओझें झेंपण्यासारखा अष्टपैलू धुरंधर त्या मंडळींत नव्हता. बहुतेक

मराठे सरदार केवळ रणपटु व ब्राह्मण लेखणीबहाद्दर होते. पेशव्यांच्या घराण्यांत मात्र या दोनही गुणांचा मिलाफ बराच दृग्गोचर झाला होता. या सर्व गोष्टींचा विचार करतां एखाद्या वृद्ध सावकाराकडे हें पद न सोंपवितां नानासाहेबासारख्या तरुण, तरतरीत व होतकरू माणसास कर्तबगारी संपादण्यास क्षेत्र देऊन अनुभव पहाणेंच शाहूस बरें वाटलें, यांत नवल तें काय? बाकीच्या माणसांची पुढील आयुष्यांतील कामगिरी नानासाहेबाशीं ताडून पाहिल्यास छत्रपतींची निवड बरोबर होती असेंच म्हणावें लागेल.

नानासाहेबास पेशवाई मिळूं नये अशी खटपट करणारांचा विरोध राज्यास अपायकारक न व्हावा, याविषयीं काळजी घेण्यासही शाहू विसरला नाहीं, हें गोविंदराव चिटणिसानें लिहिलेली शाहूची बखर वाचल्यास कळून येतें. पेशवाईचीं वस्त्रें देण्याच्या दरबारांतच शाहूनें सर्व लोकांजवळ शपथपूर्वक असें मागणें मागितलें कीं, "बाळाजीपंत लहान आहे, मसलत उभी करील, जाईल, हूडपणा करील, तर पत घेतली असें होऊं न देतां, याजला संभाळून, मसलतीस एकदील होऊन याचा लौकिक होईल, असें तुम्ही करून दाखवा." शाहूचें हें मागणें दरबाऱ्यांनीं मनःपूर्वक कबूल केलें. पेशवा कितीहि हुशार असला तरी हा वीस वर्षांचा पोर आम्हांस कोण शिकवणार, असें सर्व वयोवृद्ध व अनुभवी माणसांस वाटणें साहजिक होतें. हा मनुष्यस्वभाव शाहू ओळखून होता, म्हणूनच त्यानें स्वतःची भीड खर्च करून या प्रवृत्तीचें शक्य तें निराकरण करण्याचा प्रयत्न केला. तरीही या मंडळीस कह्यांत वागविणें बराच काळ नानासाहेबास जड गेलें. पण शेवटीं त्यानें आपली प्रधानकी चिरस्मरणीय केलेली पाहून इंग्लंडच्या इतिहासांतील धाकट्या पिट्टचें उदाहरण मनांत येतें. शाहूनें नवीन पेशव्यास एकंदर तीस गांव मुकासे नेमून दिले; व आज्ञा केली कीं, "बाजीरावानें थोरले बाळाजीपंत यांचे मागें बहुत सेवा निष्ठेनें करून मोठमोठीं कार्यें करून दाखविलीं. शेवटीं इराणीचें पारिपत्य करून बादशाही स्थापावी म्हणून रवाना केले. तेथें आयुष्य थोडें झालें. त्यास त्यांचे पुत्र तुम्हीं, पातशाही रक्षून सर्व हिंदुस्थान आपलें करावें ऐसा बेत त्यांहीं केला, तो तुम्हीं सिद्धीस न्यावा. अटकेपार घोडे चालवावे." पातशाही रक्षून हिंदुस्थान आपलें करावें, या शाहूच्या अशक्य आज्ञेंत शाहूची भावना व राजकारणाची ओळख किती होती तें स्पष्ट दिसून येतें. शाहूच्या या मनोवृत्ती संभाळाव्या लागल्यामुळें नानासाहेबाचा हात नेहमीं आंखडलेला राहिला, आणि मराठेशाहीच्या घटनेस एक विचित्र स्वरूप प्राप्त झालें.

पेशवाईची प्राप्ति नानासाहेबास बाजीरावाच्या आकस्मिक मरणामुळें अनपेक्षित लौकर झाली, तरी ही जबाबदारी आपणांवर पुढेंमागें येणार ह्या विचारानें एकंदर परिस्थितीचा नकाशा त्यानें आपल्या डोळ्यांसमोर अगोदरपासूनच ठेविला होता. राज्यांतील सर्व प्रमुख व्यक्ति व त्यांच्या हालचाली याची त्यास चांगली माहिती झालेली होती. त्यामुळें वडिलांच्या वेळच्या चुक्या टाळून पुढील कारभार कसा हांकावा हें त्याच्या पूर्ण लक्षांत होतें. ही गोष्ट पदप्राप्तीनंतरच्या त्याच्या पहिल्याच उपक्रमांत दृष्टोत्पत्तीस येते. शिवशाहीचीं वारणेच्या तहानें झालेलीं दोन छकलें मराठ्यांच्या उत्कर्षास फार जाचक होतात, हें ओळखून व पुढें प्राप्त होणाऱ्या प्रसंगाचा होरा वर्तवून, हीं छकलें एकत्र सांधण्याचा दूर दृष्टीचा विचार त्यानें योजिला. नानासाहेबास पेशवाई मिळाल्यावर दोन महिन्यांनीं कोल्हापुरकर संभाजी शाहूच्या भेटीस साताऱ्यास आला, तेव्हां एक प्रकारें मोठें धाडस करून शाहूच्या पश्चात् राज्यव्यवस्था काय करावी याबद्दल एक गुप्त करार त्यानें संभाजीशीं केला. धाडस म्हणण्याचें कारण, असले नसते कारभार केवळ स्वतःच्या मुखत्यारीवर हा एकोणीस वर्षांचा पोर करतो हें जर शाहूस समजतें, तर त्याची इतराजी होऊन नानासाहेबावर कठीण प्रसंग ओढवला असता. पण असें धाडस केल्याशिवाय राजकारणांत पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. तसेंच हा गुप्त करार शाहूच्या हयातींत बाहेर फुटला नाहीं, यावरून नानासाहेबानें घेतलेली खबरदारी चांगलीच असावी हें उघड आहे. या गोष्टींत चुलता चिमाजी आप्पा याचेंही अंग होतें, किंबहुना आपली पुढील कामगिरी मजबूद पायावर उभी करण्याची त्याचीच ही कल्पना असेल. करार नानासाहेब व चिमाजी आप्पा या उभयतांनीं संभाजीस लिहून दिला. त्यांतील मतलब असा होता, कीं 'सातारचें राज्य स्वामीचें, आणि एकछत्री शिक्का महाराजांचा' म्ह० संभाजीचा चालावा. शाहूमहाराजांचा जीवात्मा आहे तों वाह्यात्कारी आम्ही त्यांचे सेवक, परंतु अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज यांनीं कैलासवास केल्यावर दोन्ही राज्यें स्वामींचीं व आम्ही सेवक स्वामींचे, स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं, अशी शपथ दिली होती. त्याप्रमाणें दोन्ही राज्यें एक करून स्वामींचा शिक्का चालावा, आणि आम्ही शाहू महाराज यांचे कारकिर्दीप्रमाणें सेवा करून असावें हें प्रमाण, यासीं अंतर करणार नाहीं, अशी विनंति सेवकांनीं किल्ले सातारचे मुकामीं केली होती.' शाहूच्या मृत्यूपूर्वी नऊ वर्षें पेशव्यांनीं हा ठराव संभाजीशीं केला, आणि शाहूच्या मृत्यूनंतर तो पेश-

ऱ्यानें पुनः ताजा करून दिला. पुढें नवीन परिस्थिति निर्माण होऊन या कराराची अंमलबजावणी कधींच झाली नाहीं. परंतु असा उपक्रम प्रथमारंभींच नानासाहेबानें केला होता, यावरून राज्याच्या हितासाठीं जरूर वाटणारी गोष्ट आपणावर संकट झुलत ठेवून व शाहूच्या मर्जीची केवळ पर्वा न धरितां, नानासाहेब कशी करीत असावा तें दिसून येतें.

"बाह्यात्कारीं त्यांचे सेवक" हें कपटवाक्य लिहून देण्यांत पेशव्यानें राजद्रोह केला असा वाद कित्येकांनीं माजविला आहे त्यांत अर्थ नाहीं. या करारानें शाहू हयात असेपर्यंत त्याचा कोणताही हक्क जात नव्हता, इतकेंच नव्हे तर मृत्यूनंतरही हा करार बाजूस ठेवून नानासाहेबानें शाहूच्या इच्छेस मान देऊन रामराजासच गादीवर आणिलें, यावरून शाहूच्या इच्छेसही या करारानें बाध आणण्याचा पेशव्याचा हेतु करार करतांना नव्हता हें उघड होतें. या कराराचा हेतु फक्त राज्याच्या हितासाठीं संभाजीशीं गोडी करून शाहूच्या इच्छेस बाध न येईल तर दोनही गाद्या एक करण्याचा होता; आणि वास्तविक मरणसमयीं शाहूनें रामराजाऐवजीं संभाजीसच साताऱ्यास आणण्याची व्यवस्था केली असती, तर तीच गोष्ट राज्याच्या दृष्टीनें फायदेशीर झाली असती. या गोष्टीचा विचार पुढें यथास्थळीं येणारच आहे. येथें फक्त पेशवाई प्राप्त होतांच नानासाहेबानें केवढें कारस्थान अंगावर घेतलें, हें दाखविण्यासाठीं मुद्दाम त्याचा उल्लेख केला आहे.

चिमाजीआप्पा, महादोबा पुरंदरे वगैरेंच्या खटपटीनें नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं, पण हीं वस्त्रें सुखदायक नसून त्रासदायक होतीं. पहिली अडचण म्हणजे पेशवाईस कर्ज होतें. बाजीराव जन्मभर कर्जानें गांजून त्यांतच मरण पावला. त्याचें देणें सुमारें १४ लाख असून देणेदार सावकारांची संख्या तीस होती. रघुनाथभट पटवर्धन, ब्रम्हेंद्रस्वामी, बाबूजी नाईक बारामतीकर प्रभृति नांवें या देणेदारांत आढळतात. व्याजाचा दर १२ टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत होता. बाबूजी नायकास पेशवाई न मिळाल्यामुळें त्यानें आपल्या कर्जाबद्दल निकडीचा तगादा लावला, त्याचें ३६ हजार रुपये कर्ज देऊन महादाजी पुरंदऱ्यानें पेशव्याची या संकटांतून सुटका केली. या एका सावकाराच्या तगाद्यानें सावध होऊन व बापाची तारांबळ लक्षांत वागवून नानासाहेबानें प्रथमपासून राज्याच्या हिशेबी व्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरविलें, आणि कोणतीही उलाढाल झाली तरी तीपासून सरकारांत कांहीं तरी रोख पैसा यावा, अशी योजना केली. बाजीरावाच्या हलगर्जीपणाचा फायदा घेऊन सरदारांनीं खजिने

भरावे, मुलूख हाताखालीं घालावा व इकडे पेशव्यानें मात्र कर्जांत बुडावें, असा प्रकार पूर्वी झाला होता, तो नानासाहेबानें थांबविण्याचा क्रम आरंभिला. पोर्तुगीजांकडून मिळालेला साष्टी, वसई वगैरे मुलूख, गुजराथ खेरीज करून नर्मदेच्या उत्तरेकडील मुलखाची खंडणी, वगैरे पेशव्यानें छत्रपतींकडून आरंभींच आपल्या नांवें करून घेतली. हिंदुस्थानांतील द्रव्यनद्यांचे प्रवाहाचा ओघ सदैव महाराष्ट्राकडे वळावा असें त्याचें धोरण होतें.

नानासाहेबांच्या रोजनिशींतील स्वारीचे मुक्काम पाहिले म्हणजे त्याच्या राज्यकारभाराचें रहस्य समजतें. बापानें केलेल्या व्यवहारांची तड पोचविणें, आणि मुलखाची व वसुलाची व्यवस्था बांधून देणें हे दोन उद्देश आरंभीं नानासाहेबापुढें होते. त्यांतूनच पुढें हिंदुपद-पातशाहीचा शिवाजीचा हेतु पार पाडावयाचा, हें ध्येय नानासाहेबापुढें आलें. बाजीराव व त्याचे सरदार यांनीं महाराष्ट्राभोंवतीच्या प्रदेशांत आपला संचार यापूर्वीच केला होता. परंतु त्यांच्या उद्योगांत व्यवस्था मुळींच नव्हती. घेतलेल्या मुलखांत नवीन राज्यकारभार सुरू करून त्यांस मराठशाहीचे घटक बनविणें व पुढें त्याच प्रदेशास पाया करून तेथून पुढें पाऊल टाकीत रहाणें, हीं कामें केवळ भालाईत शिलेदारांकडून वठण्यासारखीं नव्हतीं. नानासाहेबानें पुण्याचें फडणिशी खातें मराठी राज्याचें केंद्र करून फडाच्या यःकश्चित् कारकुनासही कोट्यधीश जहागीरदार सरदारांवर दहशत राखतां येईल, अशी व्यवस्था सुरू केली. या फडाच्या शाळेंतच रामचंद्रबाबासारख्यांच्या हाताखालीं सदाशिवराव, माधवराव, सखाराम बापू, नाना फडणीस, वगैरे कारभारी व माणसें भराभर तयार होऊं लागलीं. हें कारकुनी शिक्षण पांढरपेशा वर्गाच्या इतकें गळीं उतरलें कीं, मराठे कारकून काशीपासून रामेश्वरापर्यंत महशूर झाले. पुढील रावबाजीसारखे पराक्रमहीन पुरुषसुद्धां पेशवाईत कारकुनी कामांत बांके असत, ते या फडांतील शिक्षणामुळें होत.

रोजनिशीवरून उघड दिसतें कीं, नानासाहेब आरंभीं सारखा हिंडत होता. चार दोन दिवसांपेक्षां त्याचा जास्त मुक्काम सहसा एक एके जागीं नसे. लग्न, कार्य, जन्म, मृत्यु इत्यादि प्रसंगांची आडकाठी मनांत न आणतां तो सारखा अहोरात्र राज्याच्या कामांत निमग्न असे. हल्लींच्या शांततेच्या काळांत त्या वेळच्या उद्योगाची कल्पना यथायोग्य होऊं शकणार नाहीं. रोज नवीन काम, नवीन स्वारी, नवीन उपक्रम व नवीन अडचणी आणि त्यांचें निरसन, अशा कष्टमय राष्ट्रीय दंगलींत लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकाचें आयुष्य त्या वेळीं झिजत असे. उदयो-

न्मुख राष्ट्राची भावना अशाच प्रकारची असून ती नानासाहेबाच्या रोजनिशी-वरून व्यक्त होते.

नानासाहेबाचें राज्यकौशल्य खुद्द पेशव्याच्या अमलांतील प्रदेशांत दिसून येतें. वेळच्या वेळीं वसूल करणें, तंटे तोडणें, फौजेंत चांगल्या लोकांची भरती करणें, देवस्थानें वगैरे धार्मिक बाबींकडे लक्ष पुरविणें व अनेक आश्रितांचा यथा-योग्य परामर्ष घेणें, हीं कामें तो महाराष्ट्रांत फिरत राहून करीत असे. या फिर-तीवर असतांनाच सबंध मराठशाहीचे कारभार तो उलगडी.

बाजीरावाच्या मृत्यूनें हिंदुस्थानभर लोकांचीं मनें साशंक होऊन मराठ्यांचे उद्योग पुढें कसे चालणार या विषयींचे तर्कवितर्क चालले होते, तोंच सर्व सरदारांस आपल्या कारभाराची चुणूक दाखवून बाजीरावाहूनही वस्ताद पेशवा कारभारावर आला आहे, अशी लोकांची त्यानें अविलंबेंच खात्री पटविली. बाजीरावानें आरं-भिलेले उद्योग तडीस पोहोंचविण्यासाठीं प्रथम उत्तरेकडे स्वाऱ्या करण्याची तयारी त्यानें केली. रघूजी भोसले, दमाजी गायकवाड, प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी शिवदेव, वगैरे आपल्याशीं कांहींना कांहीं कारणानें वितुष्ट ठेवून राज्यहितास बाध आणणाऱ्या इसमांचा त्यानें जरबेनें आटोप केला. राजकारणांत साधनचतुष्टय असतें त्यांपैकीं सामाचा मात्र उपयोग नानासाहेब बहुधा करीत असे. दंडापर्यंत पाळी न यावी अशी त्याची इच्छा असे; परंतु पाळीच आल्यास त्या अस्त्राचाही जरूर तेवढा उपयोग करण्यास तो मागेंपुढें पहाणारा नव्हता. छत्रपतीच्या दरबाराचें नाजूक तंत्रही त्यास संभाळावें लागे. हीं कामें त्यानें कशीं विल्हेस लाविलीं तें आतां पुढील प्रकरणांत पाहूं.

---

## प्रकरण ३ रें.

# कारभाराचें सामान्य स्वरूप.

इ० स० १७४० च्या जून पासून १७६१ च्या जूनपर्यंत एकंदर एकवीस वर्षें नानासाहेबानें पेशवाईचा कारभार केला. या काळाचे मुख्यतः दोन भाग पडतात. पहिल्या ९ वर्षांचा काळ म्हणजे डिसेंबर १७४९ त शाहूच्या निधना-पर्यंतचा. या पूर्वार्धांत नानासाहेबाचें आचारस्वातंत्र्य अर्थातच फार संकुचित होतें. किंबहुना कांहीं वेळीं तो केवळ शाहूचा हस्तक या नात्यानें वागे. या दृष्टीनें पहातां या काळांतील कारभाराच्या यशापयशाची जबाबदारी बरीचशी शाहूवर

टाकावी लागेल. नानासाहेबास केवळ स्वतःचें पद राखणें हा प्रधान हेतु मनांत ठेवून या काळांत वागावें लागे. कारण त्या एकाच गोष्टीच्या बळावर त्यास मराठमंडळांत कांहीं कार्य करून दाखविण्यास अधिकार येत होता. शाहूच्या मृत्यूनंतरचीं नानासाहेबाचीं तीन वर्षें रामराजाची परीक्षा करण्यांत गेलीं. त्याच्या अंगीं कांहीं कर्तृत्व नाहीं अशी खात्री झाल्यावर नानासाहेबानें त्यानंतर स्वतःच्या अकलेनेंच मराठशाहीचा कारभार हांकण्याचा प्रयत्न केला. १७५२ नंतरच्या या उत्तरार्धांतील कारभाराची जोखीम सर्वथा त्याजवरच येते. शाहू जिवंत असेपर्यंत सालोसाल साताऱ्यास जाऊन केल्या कामाचा झाडा त्यास देऊन त्याची मर्जी राखणें, व आपणांविरुद्ध चाललेल्या इतर पक्षांच्या खटाटोपांस तोंड देणें, हीं कामें त्यास करावीं लागत. या गोष्टींची राज्यहितास कांहींही जरूर नव्हती. त्यांत केवळ काळाचा अपव्यय झाला. पण मराठशाहीच्या विशिष्ट घटनेमुळें या गोष्टी न करूनही चालण्यासारखें नव्हतें. इतर सरदारांप्रमाणें आपलें पद हें एक स्वतः-साठीं जहागीर कमावण्याचें साधन एवढाच पेशव्याचा हेतु असता, तर त्यास भोसलेगायकवाडांप्रमाणें बाहेरचें क्षेत्र संपादून सहज तसें करतां आलें असतें. पण त्यापेक्षां उच्च दृष्टि ठेवून, पेशव्याचें पद म्हणजे सर्व सरदार व अष्टप्रधान या आंवळ्यांची मोट बांधून एकरूपतेनें शिवशाही हांकण्याची जवाबदारी असा अर्थ मनांत वागवून, तदनुरूप इष्टकार्यसिध्यर्थ अविश्रांत उद्योग करणें, हें नाना-साहेबाचें ध्येय होतें. शाहूच्या हयातींत त्यास ह्या ध्येयाप्रमाणें वागण्यास मोक-ळीक नव्हती व उत्तरार्धांत ती अंशतः तरी त्यास मिळाली, हा या दोन भागांतील फरक ध्यानांत ठेवणें जरूर आहे. पूर्वार्धांत सातारा हें मराठशाहीच्या म्हणजे दिवसेंदिवस वृद्धि पावणाऱ्या पेशव्याच्या कारभाराचें केंद्र होतें, तर उत्तरार्धांत तें स्थान पुण्यास प्राप्त झालें, ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे.

नानासाहेबाच्या कारभाराचें रहस्य समजण्यास हिंदुस्थानची तत्कालीन परि-स्थिति डोळ्यांसमोर आणली पाहिजे. मुलुखगिरी हा मराठ्यांच्या साम्राज्याचा एक कायमचा विशिष्ट उद्योग होता, आणि असें असणें हें, त्या साम्राज्याच्या अस्तित्वाचा जो प्रधान हेतु म्हणजे यवनाक्रांत हिंदुस्थान सोडवणें, त्यास पोषकच होतें. अर्थात् हिंदुस्थानांतील सर्व सत्ताधीशांशीं मराठ्यांचा सहाजिकच संबंध येत असे. हे संबंध समजण्यासाठीं अठराव्या शतकाच्या मध्यांतील राजकीय पट कसा होता तें पाहिलें पाहिजे.

नानासाहेबास पेशवाई मिळण्याच्या जरा आधीं मोगलांच्या मोडत्या साम्राज्यास नादिरशहानें शेवटचा धक्का देऊन पुरें खिळखिळें केलें. तो स्वतःच त्या साम्राज्याचा अधिपति होता तर हिंदुस्थानांत एका नव्या बादशाही वंशाची स्थापना होऊन राज्यकारभारांत कांहीं जोम शिरला असता. परंतु नादिरशहानें येथील बादशाहीचा लोभ सोडून परत इराणास प्रयाण केलें. त्याच्या खुनानंतर त्याचाच शिष्य अहंमदशहा अबदाली यानें त्याचेंच अनुकरण केलें. म्हणजे हिंदुस्थानांत राज्य न स्थापतां वारंवार स्वाऱ्या करून केवळ द्रव्यहरणाचें काम त्यानें पुढें चालविलें. त्यामुळें मोगलांच्या राज्यांत नवीन पक्षभेद उत्पन्न झाले. कोणतेंही राज्य दुसऱ्यास सालोसाल डोईजड खंडणी देऊन टिकूं शकणार नाहीं. मग आधींच सुभेदारांनीं विभागलेलें मोगली साम्राज्य कितीसा टिकाव धरणार! बादशहास न जुमानणारे सुभेदार साहजिकच एक तर पूर्ण स्वतंत्र झाले किंवा या नव्या जेत्यास मिळाले; आणि अशा या मोगल बादशाहीपासून हिंदुस्थान सोडवणें हा मराठ्यांचा हेतु होता. अर्थात् या उद्योगानें पुढें मराठ्यांची अहंमदशहा अबदालीशीं गांठ पडली.

मोगलांपासून हिंदुस्थान सोडवणें हें या बाहेरच्या कारणामुळें दुष्कर झालें, पण घरच्या एका कारणामुळेंही तें कठीण झालें होतें. तें कारण म्हणजे शाहूकालीन मराठशाहीची घटना होय. "पातशाही रक्षून हिंदुस्थान आपलें करावें," अशी शाहूची अशक्य इच्छा. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं हिंदुस्थानांत केलेले करार शाहूच्या या इच्छेनें निगडित झाले होते. एका म्यानांत दोन तरवारी राहूं शकत नाहींत, त्याचप्रमाणें एका प्रदेशांत दोन सत्ताधीश नांदूं शकणार नाहींत. नांदावयाचे तर त्यांतला एक केवळ नामधारी असला पाहिजे. मराठ्यांनीं यवनाक्रांत हिंदुस्थान सोडवावयाचें तर बादशहा नामधारी झाला पाहिजे होता. पण तो नामधारी म्हणून तरी राखावयाचा म्हणजे त्यामुळें होणारा निष्कारण खर्च व त्रास सोसणें भाग होतें; असा पेंच मराठशाहीचा कारभार वहिवाटणारांवर येऊन पडे. हिंदुस्थानांतील मोगल बादशाहीचा अभिमान धरणाऱ्या मुसलमानांशीं जरा नरमाईनें घेऊन राजकारण सुलभ करणें हा या दंडकाचा व्यावहारिक उपयोग असला, तरी त्यामुळें मराठ्यांच्या साम्राज्यास कमीपणा येत असे, व कित्येक वेळां तर या दांभिकतेमुळें राजकारण साफ बुडे. तें कसेंहि असलें तरी नानासाहेबास हा जुना दंडक सोडणें शक्य नव्हतें. महाराष्ट्राची मनोरचना त्या काळीं एकदम जुनें मोडून नवें करण्यासारखी नव्हती. खरे शास्त्री म्हणत त्याप्रमाणें

पेशव्याच्या अधिकारासारखा अधिकार दुनियेंत कधीं कोणी चालविला नसेल. दिल्लीपति बादशाहा आपणांस अखिल भरतखंडाचे सार्वभौम समजत व लोकमतहि तसेंच होतें. छत्रपतींची गादी या सार्वभौमास चीत करून उभारलेली होती. अर्थात् ती स्वतंत्र म्हणजेच सार्वभौम ठरली. पेशवे हे या छत्रपतींचे प्रधान. मोगल हे मराठ्यांचे शत्रु म्हणजे पेशव्यासही तसेच. परंतु छत्रपतीची इच्छा दिल्लीपति राखण्याची व हे दिल्लीपति तर राजा शाहू हा आपला अंकित समजत. इकडे पेशवा छत्रपतींचा प्रधान म्हणून मोगलांच्या सुभ्यांवर स्वारी करी, तर लगेच तो दिल्लीपतीकडून सुभेदारीचीं वस्त्रें मिळविण्यांत भूषण मानी. दिल्लीपतीचा सुभेदार या नात्यानें इतर सुभेदार त्यास आपल्याशीं समान दर्जाचा मानीत, व छत्रपतींनीं निर्मिलेले सरदारही त्यास बरोबरीचाच समजत. अशा विलक्षण घोटाळ्याचा अधिकार संभाळून पेशव्यास कारभार हांकावा लागे.

आपणच अधिकार दिलेले सुभेदार आपल्या ठायीं स्वतंत्र होऊं लागले, तेव्हां कमकुवत बादशहास त्यांची खोड मोडण्याकरतां मराठ्यांची मदत घेणें जरूर वाटूं लागलें. उलट मराठ्यांची स्वारी आली हें निमित्त सांगून त्यामुळें आपणांस दिल्लीस कांहीं पाठवितां येत नाहीं असा बहाणा हे सुभेदार करीत. बादशहास तरी मनांतून हे मराठे कोठें हवे होते ? त्यामुळें पुष्कळ वेळां संधि पाहून बादशहा सुभेदारांस मराठ्यांविरुद्ध उत्तेजन देत असे. मराठे विजयी होऊन दिल्लीस आले तर 'बरी शिरजोर सुभेदाराची खोड मोडलीत,' म्हणून बादशहा त्यांस शाबासकी देई; सुभेदारांनीं त्यांचा पराभव केला, तर 'बरा गनिमांचा सूड घेतलात' म्हणून बादशहा सुभेदारांस खिलाती पाठवी. छत्रपतीच्या सनदांच्या बळावर नागपुरकर भोसले बंगालवर स्वारी करीत, तर त्याच छत्रपतीचे मुख्य प्रधान दिल्लीपतीच्या सुभेदाराची कुमक करण्याच्या मिषानें त्याच भोसल्यावर हल्ला करीत, पण स्वतः मात्र ते माळव्याच्या सुभ्यावर स्वारी करण्यांत मागें नसत. सारांश, अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत एका दृष्टीनें केवळ अराजक स्थिति माजली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. ज्यास, ज्या रीतीनें, जेव्हां, जेथें, जितकें, साधेल, तितकें त्यानें चापावें, हा एकच प्रयोग सर्वांनीं उचलिला होता. अशा या धामधुमीच्या काळांत " आम्हीं शिवाजी महाराजांचे शिष्य आहों " ही आठवण जागृत ठेवून नानासाहेबानें शक्य त्या रीतीनें कारभार हांकला, ह्यांतच त्याच्या कामगिरीचें रहस्य आहे.

हिंदुस्थानांत या वेळीं कोण कोण सत्ताधीश होते तें पाहूं. पहिला दिल्लीचा बादशहा त्याचा अधिकार जवळजवळ संपुष्टांत आलेला असून वजीर सफदरजंग, रोहिले, बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान, दक्षिणेंत निजामुल्मुल्क वगैरे बलिष्ठ सरदार आपापल्या जागीं स्वतंत्र होऊं पहात होते. यांपैकीं निजाम हा तर मराठ्यांचा धूमकेतुच होता. दक्षिणेंत मराठ्यांच्या सत्तेस तोंड देऊन आळा घालणारा हा पुरुष या वेळीं झाला नसता तर या देशाचा इतिहास कदाचित् बदलला असता इतकें या पुरुषाचें महत्त्व हिंदुस्थानच्या इतिहासांत त्या वेळीं होतें. हा घराजवळचा शत्रु कायम असल्याकारणानें मराठ्यांचा बाहेरील उद्योग लंगडा पडे. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव या दोहोंच्या अमदान्या पाहून पुढें नानासाहेबासही तो पुरला. त्याच्याच सारखा हुशार बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान हा नुकताच स्वतंत्र होऊं पहात होता. त्याच्या हुशारीमुळें मराठ्यांचें पाऊल बंगाल्यांत पुरें न रुतून इंग्रजांस अवकाश राहिला. वजीर सफदरजंगानें मराठ्यांस गंगेपार ठेविलें व हिंदूंचीं पुण्यक्षेत्रें आपल्या ताब्यांत राखून त्यांचें नाक सदैव आपल्या हातांत राखिलें. रोहिल्यांनीं अफगाणिस्तानांतून अहंमदशहास आणून मराठ्यांस वस्ताद भेटविला. स्वतः दुर्बल रजपूत राजांनीं मराठ्यांत वितुष्ट पाडून त्यांस आपसांतील भांडणांनीं कमकुवत केलें. मराठ्यांची पडती घडी साधून परकी इंग्रज किनाऱ्यावर दबा धरून होते, त्यांनीं आपला पसारा वाढविला. इतक्या सर्व परकीयांशीं नानासाहेबास तोंड द्यावयाचें होतें. पण घरांतही ताराबाई, रघूजी भोसले, प्रतिनिधि, बाबूजी नाईक, दमाजी गायकवाड यांस दावांत ठेवून व शिंदे होळकरांकडून कामें घेऊन नानासाहेबास पेशवाई हांकावयाची होती. ती त्यानें कशी हांकली हेंच आतां सांगावयाचें आहे.

---

## प्रकरण चवथें.

# रघूजी भोसल्याशीं समेट.

शाहू छत्रपति गादीवर आल्यापासून मराठशाहींत पक्षभेद निर्माण झाला. प्रतिनिधि, सेनापति, भोसले, आंग्रे वगैरे सरदार आपणांस पुरातन समजत, आणि नवीन पेशव्यांस बाहेरचे मानून त्यांजशीं विरोध ठेवीत. विरुद्ध पक्षास तोंड देऊन आपला पक्ष बळकट करण्यासाठीं शिंदे, होळकर, बुंदेले प्रभृति आपल्या भरंवशाचे नवे सरदार पेशव्यांस निर्माण करावे लागले. जुन्यांपैकीं

ज्यांस सामर्थ्य होतें, त्यांस शाहूनें स्वतंत्र उद्योगाचें क्षेत्र नेमून दिलें; यामुळें जुने सरदार व पूर्वींचे अष्टप्रधान बहुतेक पेशव्यांचे विरोधी बनले. नानासाहेब पेशवाईवर आला त्या सुमारास सेनापति दाभाडे व प्रतिनिधि यांचें महत्त्व नष्ट झालें होतें. या दुहीचा एक परिणाम असा झाला होता कीं, बाजीरावानें दक्षिणेंतील कारभारांतून आपला हात काढून उत्तरेकडे दृष्टि ठेविली. प्रतिनिधि, फत्तेसिंग भोसले वगैरे सरदारांनीं कर्नाटकांत दोन तीन वेळ स्वाऱ्या केल्या तरी सावनूर, कडपें, शिरें, कर्नूळ, अर्काट, म्हैसूर, बिदनूर, सोंधे व इतर अनेक लहानमोठीं जीं संस्थानें त्या प्रदेशांत बळावलीं होतीं, त्यांचें शासन होण्याइतकें मोठें सैन्य किंवा तितके पराक्रमी सरदार त्या बाजूस कधींच गेले नव्हते. या प्रदेशाच्या अगदीं दक्षिणेस मराठ्यांच्या स्वराज्याचा एक अंश म्हणून तंजावरचें संस्थान व्यंकोजीच्या वंशाकडे चालत होतें. तेथें १७४० सालीं राजा प्रतापसिंह गादीवर होता. याच वेळीं अर्काटच्या नबाबाचा जांवई चंदासाहेब हा त्रिचनापल्लीचा विख्यात किल्ला जिंकून फार प्रबळ झाला, व त्यानें तंजावरचें सुपीक राज्य हस्तगत करण्याचा उद्योग आरंभिला. या प्रबल शत्रूशीं तोंड देण्याचें आपलें सामर्थ्य नाहीं हें जाणून प्रतापसिंहानें साताऱ्यास शाहू छत्रपतीची मदत मागितली. शाहूला आपल्या या आप्त घराण्याबद्दल फार कळकळ वाटत असे; त्यामुळें त्यानें प्रतापसिंहास मदत पाठविण्याचा निश्चय केला. या उपक्रमानें दक्षिणच्या सहा सुभ्यांत चौथाईचा अंमल बसविणें हा जो बाळाजी विश्वनाथानें आणलेल्या सनदांचा उद्देश त्याचीहि पूर्तता सहजच होणार होती. कारण कर्नाटक वगैरे मुलूख विजापुर व गोवळकोंडें या दोन सुभ्यांच्या पोटांतील होता. या कर्नाटकाच्या स्वारीवर शाहूनें फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर याची योजना केली आणि रघूजीस त्याचा मदतनीस नेमिलें. यावेळीं बाजीराव उत्तरेस नादिरशहाविरुद्ध बादशहास कुमक करण्यास गेला होता. उभयतां भोसल्यांची फौज सन १७४० च्या एप्रिल महिन्यांत कर्नाटकांत उतरली. कडप्पा व अर्काट या जिल्ह्यांच्या दरम्यान दमलचेरीचा घांट आहे. तेथें मराठ्यांस अडविण्यासाठीं नबाब दोस्तअली फौज घेऊन सज्ज राहिला. प्रथम मराठ्यांनीं त्याच्याशीं सामोपचाराचीं बोलणीं केलीं; पण नबाबाकडून त्यांचीं उडवाउडवीचीं उत्तरें आलेलीं पाहून मराठ्यांच्या निवडक दहा हजार स्वारांनीं दुसऱ्या मार्गानें जाऊन दोस्तअलीस वळसा देऊन वेढिलें. तेव्हां मोठें घनघोर युद्ध होऊन नबाब दोस्तअली, त्याचा धाकटा मुलगा हसनअली व दुसरे कित्येक नामांकित सरदार पतन पावले. त्याचा दिवाण मीर आसद

कैद झाला, आणि मराठ्यांस मोठा जय मिळाला. ही लढाई ता. २० मे १७४० रोजीं झाली.

कर्नाटकांतील या मुख्य संस्थानिकाच्या पराभवानें मराठ्यांचा दरारा त्या बाजूस महशूर होऊन अनेक संस्थानिक गलितधैर्य झाले. नवाबाचा मुलगा सफदरअली बापाच्या मदतीस येत होता तो वेल्लूरच्या किल्ल्याच्या आश्रयास गेला. मयत नवाबाचा जांवई चंदासाहेब यास स्वतः नवाब होण्याची महत्त्वाकांक्षा असल्यानें तोही त्रिचनापल्ली सोडून नवाबाच्या मदतीस आला नाहीं. मात्र त्यानें व सफदर अलीनें मयत नवाबाचें कुटुंब, उभयतांचीं बायकामुलें व एकंदर जडजवाहीर हीं मराठ्यांच्या हातीं लागूं नयेत, म्हणून पांदिचरीस फ्रेंचांच्या ताब्यांत पाठवून दिलीं. याच सुमारास बाजीरावाच्या मृत्यूची खबर ऐकून पेशवेपदाबद्दल खटपट करण्यासाठीं रघूजी स्वारींतून तसाच सातार्‍यास अल्प काळ परत आला, पण बाबूजी नायकास पेशवाई न मिळाल्यामुळें तो तसाच कर्नाटकांत परत गेला. तेथें एक कोट रुपये घेऊन मराठ्यांनीं सफदरअलीस अर्काटचा नबाब केलें; आणि त्याचा प्रतिस्पर्धी फ्रेंचांच्या मदतीमुळें बळावलेला चंदासाहेब यास त्रिचनापल्लीच्या किल्ल्यांत वेढिलें. या वेढयांत मुरारराव घोरपडे गुत्तीकर यानें मर्दुमकी दाखवून चंदासाहेबास मुलासुद्धां कैद केलें. नंतर रघूजी स. १७४१च्या जूनांत चंदासाहेब वगैरे कैद्यांस बरोबर घेऊन सातार्‍यास परत आला. या यशस्वी स्वारीमुळें रघूजीचा पराक्रम व शहाणपण कसोटीस लागून त्याजवर शाहूची मर्जी प्रसन्न झाली, तेणेंकरून रघूजीचें वजन वाढलें. शाहूनें त्रिचनापल्लीचें ठिकाण मुरारराव घोरपड्याचे स्वाधीन केलें, आणि चंदासाहेबास सातारचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. तेथें तो आठ वर्षें कैदेंत राहिला. तसेंच वर्‍हाड, गोंडवण वगैरे पूर्व हिंदुस्थानांतील प्रदेश हस्तगत करण्याची कामगिरी रघूजीस सांगून त्या प्रदेशांच्या सनदा त्यास करून दिल्या.

बाजीराव मरण पावल्यावर शिंदे, होळकर, आवजी कवडे, पिलाजी जाधव प्रभृति त्याचे सरदार सातार्‍यास परत आले. पेशवाई मिळाल्यावर नानासाहेबानें त्यांच्या विचारानें व शाहूच्या अनुमतीनें उत्तरेकडे स्वारीवर जाण्याचा बेत ठरविला. स्वारीचा उद्देश माळव्याच्या सनदा बादशहाकडून निजामामार्फत मिळवणें हा होता. बाजीरावानें स. १७३८ सांत निजामाचा भोपाळास जो मोठा पराभव केला, तेव्हां निजामानें माळव्याच्या सनदा बादशहाकडून घेऊन बाजीरावास द्याव्या असें ठरलें होतें. पण निजामाच्या मनांतून हातांत असलेला हा सुभा सोडावा असें नव्हतें. पुढें पेशव्यांच्या सरदारांनीं तो प्रांत व्यापला व दिल्लीस

नादिरशहाच्या पश्चात् उडालेल्या धामधुमीमुळें तिकडूनही मराठ्यांचे पायबंद लागणें दुरापास्त झालें, तरीही निजाम कांहीं आपलें वचन पूर्ण करीना. तेव्हां त्यास खूष करून काम साधण्याच्या हेतूनें नानासाहेबानें ही स्वारी प्रथमच हातीं घेतली. तो वऱ्हाडांत पोंचला तोंच मागें पुण्यास चुलता चिमाजी आपा ता. १७ दिसेंबर १७४० रोजीं मरण पावल्याची खबर त्यास मिळाली. बाजीरावाच्या हयातींत चिमाजीच सर्व व्यवहार पहात असे. बाजीराव फक्त बाहेरील लढाईचीं धोरणें संभाळीं. शाहूशीं चिमाजीचें वजन होतें म्हणूनच नानासाहेबास पेशवाई मिळाली. तो आणखी जगता तर नानासाहेब स्वारीवर जाण्यास मोकळा राहून मागची चिंता त्यास राहिली नसती. तो गेल्यामुळें मागची पुढची सर्व चिंता वहाणें त्या एकट्यावर आलें.

या वेळीं निजाम दिल्लीस होता. ही संधि पाहून त्याचा मुलगा नासिरजंग यानें दक्षिणेंत त्याच्या विरुद्ध बंड केलें. तेव्हां आपलें कार्य साधण्यासाठीं नानासाहेबानें मुलाविरुद्ध बापास मदत करण्याचें ठरविलें. मुलाच्या बंडाची बातमी निजामास लागली, तेव्हां तो ताबडतोब दक्षिणेंत आला. येतांना त्यानें आपला वडील मुलगा गाजीउद्दीन यास बादशहाकडून अमीरउलउमराव हें पद देववून आपलें महत्त्व दरबारीं कायम रहावें म्हणून दिल्लीस ठेवून दिलें. निजाम वऱ्हाडांत येऊन पोहोंचला तेव्हां नानासाहेबानें त्याची एदलाबाद येथें भेट घेतली. पण वृद्ध निजाम पुरा धूर्त. त्यानें नानासाहेबाचा बहुमान केला, मेजवान्या केल्या, भेट घेतली, पण सैन्याच्या मदतीबद्दल १५ लाख रुपये मिळण्यापलीकडे पेशव्यास दुसरी कांहीं प्राप्ति या भेटींत त्याजपासून झाली नाहीं. माळव्याची सुभेदारी आपली आहे, परंतु पेशवे आपल्या हुकमतींत वागतील तर त्यांस आपण नायब नेमूं असें निजामानें नानासाहेबास कळविलें, आणि शाहूचा वकील आनंदराव सुमंत त्याजवळ होता, त्याच्यामार्फत त्यानें टाळाटाळीचें राजकारण चालविलें. रघूजी भोसले व बाबूजी नाईक यांस हाताशीं धरून पेशव्याच्या उद्योगास आळा घालण्याचा निजामाचा बेत होता. इकडे फौजेच्या बळाशिवाय कोणतेही करार पुरे केले जात नाहींत, हें ओळखून नानासाहेबानें फौज घेऊन माळवा प्रांतावर चढाई केली. या वेळीं धारचा यशवंतराव पवार जवळचा मुलूख दडपून पेशव्यांच्याविरुद्ध वागत असे. तेव्हां मल्हारराव होळकरानें धारचा किल्ला घेऊन त्यास नरम केलें. त्याबरोबर पवाराचे डोळे उघडून त्यानें दाभाडे गायकवाडांचा क्रम सोडून पेशव्यांची हुकमत स्वीकारिली. त्याबद्दल माळव्याच्या सुभ्यां-

तील दहा टक्के वांटणी पवाराची म्हणून नानासाहेवानें ठरवून दिली. इकडे त्रिंबक हरी पटवर्धनानें नेमाड प्रांतांतील बांब्याचें ठाणें घेतलें; आवजी कवड्यानें देवरी हस्तगत केली. अशा रीतीनें सनदांआधींच माळव्यांतील मुलूख हस्तगत करण्याचा उद्योग नानासाहेवानें चालविला.

एदलाबादेहून नानासाहेवानें पुढें माळव्यांत जाऊन जयपूरचा राजा जयसिंग याची भेट ता. ११ मे १७४१ रोजीं धवलपूर येथें घेतली. पूर्वींच बाजीरावानें उदेपूर व जोधपूर हीं राज्यें चौथाईखालीं आणलीं होतीं, पण दिल्लीच्या दरबारांत आपला कोणी तरी दोस्त असावा या हेतूनें जयसिंगाशीं त्यानें सख्य जोडलें होतें. माळव्याचा सुभा निजामास मिळण्यापूर्वीं तो जयसिंगाकडे होता, सबब तो त्याच्या मार्फतच मिळविण्याचा मराठ्यांचा हेतु होता. एकमेकांनीं एकमेकांस साह्य करावें व जयसिंगानें बादशहास सांगून माळव्याच्या सनदा पेशव्याच्या नांवें करून द्याव्या, असें ठरलें होतें. कदाचित् कांहीं पैशाची प्राप्तिही या माळव्याच्या स्वारींत पेशव्यास झाली असावी. कारण स्वारींतून परत आल्यावर नानासाहेवानें बाबूजी नायकाच्या कर्जाची फेड करून त्यास पुण्यांतून घालवून दिलें; तेव्हां बाबूजीनें चिडून रघूजी भोसले व दमाजी गायकवाड यांचें साह्य घेऊन स्वतःच माळव्यावर स्वारी केली. यामुळें शाहूची मर्जी प्रसन्न होऊन त्यानें नायकास बारामतीची नवीन जाहागीर दिली. तेथेंच पुढें या नाईक घराण्याचें वास्तव्य झालें.

स. १७४१ त स्वारींतून परत आल्यावर त्या सालचा पावसाळा नानासाहेवानें सातारा येथें घालविला. पेशव्याचे भाऊ रघुनाथराव, जनोबा व सदाशिवराव हे नेहमीं साताऱ्यास जात येत असतच. त्यांच्याकडून दरबारची माहिती पेशव्यास स्वारींत असतांना कळे; व शाहूकडे त्याची वग राही. मागील स्वारींत कर्जाचा भार हलका करून उत्तरेंत बाजीरावानें बसविलेला दरारा त्यानें कायम राखिला, आणि नवीन पेशवा कशा करामतीचा आहे याची त्यानें निजामास ओळख दिली. यापुढें आतां उत्तरेकडील राजकारणें कशीं उलगडावीं हें कार्य नानासाहेबास ठरवावयाचें होतें. याच वेळीं रघूजी भोसले कर्नाटकच्या स्वारींत यश घेऊन परत साताऱ्यास आला होता. तेव्हां त्याची साहाजिकच शाहूवर छाप पडली. रघूजी जोरदार शिपाईगडी असून मूळपासून पेशव्यांशीं फटकून वागत असे. छत्रपतींकडे वसूल पाठविण्यासही तो अळंटळं करी. बाबूजी नाईक, प्रतिनिधि, गायकवाड वगैरे पेशव्याशीं बरें नसणाऱ्या मंडळींशीं त्याचें सूत असे. शाहूची धाकटी राणी व रघूजीची बायको या चुलत बहिणी होत्या. रघूजीचा मुलगा मुधोजी हा

शाहूनें दत्तक घ्यावा अशी या राणीची इच्छा होती. अशा संबंधामुळें शाहूलाही रघूजीचें पारिपत्य करणें कठिण होतें. रघूजीनें बाजीरावाचें साह्य कधींच केलें नाहीं. उलट प्रयागपर्यंत स्वाऱ्या करून व निजाम कैक वर्षे दिल्लीस होता या गोष्टीचा फायदा घेऊन, गोंडवणांत आपला जम त्यानें बसविला. परंतु आतां निजाम परत आल्याकारणानें व पेशव्यानें उत्तरेकडे नजर फिरविल्यानें रघूजीस पुनरपि आपल्या मुलखाची काळजी उत्पन्न झाली. म्हणूनच कर्नाटकचा सुभा फत्तेसिंग भोसले व बाबूजी नाईक यांजकडे सोंपवून तो तूर्त लगवगीनें शाहूची रजा घेऊन वऱ्हाडांत परत गेला.

रघूजी जातिवंत मराठा असून त्याच्या ठिकाणीं मराठ्यांचे विशिष्ट गुणावगुण पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस येतात. ऐषआरामाचा तिटकारा, घोड्यावर भाकरी खाऊन स्वाऱ्या करणें, बरोबरीच्या नात्यानें व ममतेनें वागून शिपायांस राजी राखणें, सावधगिरी ठेवून उद्योग फैलावणें वगैरे त्याच्या गुणांबरोबर सवत्या सुभ्याची आवड, फटकून वागण्याचा स्वभाव, नियंत्रणाचा तिटकारा, आपमतलबीपणा हे मराठ्यांचे गुण व दुर्गुण त्याच्या ठिकाणीं भरपूर होते. रघूजीची इच्छा उत्तरेंत शक्य तितके हातपाय पसरण्याची होती. याच्या उलट पेशव्याचा उपक्रम एकछत्री अंमल सुरू करण्याचा असल्यानें दोघांचीं कार्यक्षेत्रें सहजच परस्परांस आड आलीं. माळवा ताब्यांत घेणें हा नानासाहेबाचा मुख्य हेतु. तो पुरा ताब्यांत येण्यासाठीं प्रत्येक गांव जिंकीत जाण्यापेक्षां वेगळीच युक्ति त्यानें योजिली. माळव्यापलीकडे बुंदेलखंडांत बाजीराव पेशव्यास छत्रसालानें राज्याचा तिसरा हिस्सा दिला होता. पण तो ताब्यांत घेतलेला नसल्यामुळें ते देतील तो ऐवज घेऊन पेशव्यास स्वस्थ बसावें लागे. हा बुंदेलखंडांतील हिस्सा ताब्यांत आणला तर आपोआपच माळव्याचा आग्र्याशीं असलेला संबंध तुटणारा होता. म्हणजे पुढील प्रदेशाच्या भीतीनें मागील प्रदेशाच्या सनदा मिळणें सुलभ होणार होतें. हें ओळखून नानासाहेबानें सन १७४१ च्या अखेरीस बुंदेलखंडावर स्वारी केली. बुंदेलखंडांत पाऊल रुतल्यास त्या पायावर प्रयाग, काशी, गंगा यमुनांचा दुआब व बंगाल यांस आपोआप शह मिळत होता. याप्रमाणें बेत ठरवून शिंदे, होळकर, जाधव, पटवर्धन, पुरंदरे, रेठरेकर वगैरे सरदार त्यानें बरोबर घेतले. आपली बायको गोपिकाबाई ईसही नानासाहेबानें बरोबर घेतलें होतें. पण तिला कांहीं महिने गेलेले पाहून खानदेशांतूनच तिची परत पुण्यास रवानगी करण्यांत आली.

नानासाहेब प्रथम नेमावर प्रांतांतून पुढें उत्तर गोंडवणांत गेला आणि नर्मदेच्या उगमाजवळील प्रदेशापैकीं गढा व मांडलें हीं दोन जुनाट राज्यें त्यानें जिंकलीं, तेव्हां रघूजीस त्यावद्दल मोठें वैषम्य वाटलें. हा सर्व प्रदेश आपल्या कक्षेंतील होय असें रघूजी समजत होता. तेव्हां अर्थात्च पेशव्यास शह देण्याची रघूजीनें तयारी केली. नानासाहेबाच्या मनांत पेशवाई प्रकरणापासून रघूजीविषयीं वांकडें होतेंच. तेव्हां प्रसंगविशेषीं शाहूसहि दुर्दम अशा या मराठशाहींतून फटकून रहाणाऱ्या सरदारास या निमित्तानें नरम करण्याचाच नानासाहेबानें विचार योजिला. या त्याच्या विचारास बळकटी आणण्यास आणखी एक कारण या प्रसंगीं घडलें. नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशांत म्हणजे गुजराथ, माळवा वगैरे सर्व भागांत पेशव्याचा संबंध नाहीं असें दाभाडे, गायकवाड, पवार, बांडे प्रभृतींचें म्हणणें होतें. त्यांपैकीं यशवंतराव पवारास मल्हारराव होळकरानें ताळ्यावर आणून पेशव्याचा अंकित बनविलें हें मागें सांगितलेंच आहे. पुढें पेशवा बुंदेलखंडांत गुंतल्याची संधि पाहून दमाजी गायकवाड व बाबूजी नाईक यांनीं रघूजीच्या प्रोत्साहनानें माळव्यांत स्वारी केली व कांहीं खंडणी जमविली. म्हणजे पेशव्याच्या माळव्यावरील हक्कास खो देण्याचा हा उपक्रम होता. अर्थात् रघूजीचा या प्रकरणांतील भाग मनांत ठेवून, संधि साधून त्यास पेंचांत आणणें पेशव्यास जरूर वाटलें. सुदैवानें या स्वारींत असतांच रघूजीला बंगाल्याकडे शह देण्याची संधिही पेशव्यास मिळाली.

बंगाल्यांत या वेळीं अलिवर्दीखान नांवाचा एक हुषार पुरुष बादशाही सुभेदारास मारून तो प्रांत बळकावून बसला होता. बंगालच्या सुभेदाराच्या हाताखालींच बिहार व ओढ्या हे दोन पोटसुभे होते. ओढ्या प्रांतावर मीरहबीब म्हणून नायब होता. त्याचें व अलिवर्दीचें वांकडें आलें. त्यामुळें हबीबनें भोसल्याची मदत मागितली. रघूजीचा डोळा आधींच या सुपीक प्रांतावर होता, त्यांत त्यानें सन १७४२ च्या आरंभीं आपला सरदार भास्कर राम कोल्हटकर यास बंगालवर पाठविलें. याच सुमारास वार्षिक वसुलासाठीं बादशहाचे अंमलदार बंगाल्यांत आले. अलिवर्दीखानास अजून बादशहानें सुभेदारीचीं वस्त्रें पाठविलीं नव्हतीं. तेव्हां खानानें त्या अमलदारांस सांगितलें, ‘ प्रांतावर मराठे चालून आले आहेत, त्यांच्या बंदोबस्तासाठीं लौकर मोठी फौज मदतीस पाठवा, नाहीं तर सुभा हातांतून गेला असें समजा. तसेंच मला सुभेदार नेमलेलें नाहीं तेव्हां माझें ऐकतो कोण व मला वसूल देतो कोण ?’ याच वेळीं नाना-

साहेबास माळव्याच्या सनदा द्याव्या असें बोलणें जयसिंगानें बादशहाजवळ काढलें होतें. त्यास बादशहानें कळविलें कीं, आधीं पेशव्यानें बंगाल्यावरील संकट मोडून आपली बादशाही तक्ताबद्दलची राजनिष्ठा पटवून द्यावी, म्हणजे मग त्यास सनदा देऊं. तसेंच अलिवर्दीखानासहि त्यानें कळविलें कीं तूं भोसल्यास घालवून प्रांताची राखण कर म्हणजे तुझ्याकडे सुभेदारीचीं वस्त्रें पाठवितों. अशा रीतीनें खानास दिल्लीहून आपल्या पारिपत्यास कोणी येतें कीं काय याची जी प्रथम भीति पडली होती ती नाहींशी होऊन, उलट नवीन बळकावलेल्या प्रांताच्या रक्षणासाठीं त्यास पेशव्याची मदत आयती मिळाली. नानासाहेबास बादशहाची मर्जी संपादणें होतेंच, तेव्हां त्यास बंगाल्यांत जाणें भाग आलें. त्यामुळें परभारें रघूजीची खोड मोडण्यास ही संधि आली. एरवीं पेशव्यानें रघूजीवर मुद्दाम स्वारी करणें गैर दिसलें असतें. बादशहानें नानासाहेबाचें पैशासाठीं अडूं नये म्हणून पाटण्याच्या चौथाईची रक्कम पेशव्यास देण्याबद्दल अलिवर्दीखानास हुकूम पाठविला. नानासाहेब बंगाल्यांत जाणार तोंच आधीं खानानें भास्कर रामाचा पराभव करून त्यास परत हाकलून लावलें. भास्कर राम परत आल्यावर पुनः त्यास बंगालवर पाठवावयाचें रघूजीच्या मनांत होतें. पण तिकडे तो गेल्यास पेशवाही तिकडे जाणार हें त्यास कळलें होतें. तेव्हां पेशव्यास बंगालकडे जातां येऊं नये म्हणून रघूजीनें इकडेच त्यावर स्वारी केली. नानासाहेब सावध होताच. त्यानें या प्रसंगीं रघूजीचा भडालें मुक्कामीं पराभव केला. हें भडालें ठिकाण जबलपुर व प्रयाग यांचे दरम्यान असलें पाहिजे. पुढें रघूजीनें १७४३ त बंगालवर दुसऱ्यांदा स्वारी केली, ही बातमी ऐकून पेशवा एकदम प्रयाग, काशी, गया मार्गें बंगाल्यांत उतरला व त्यानें रघूजीचा मोड करून त्यास पळवून लाविलें. रघूजीवरील या स्वारीचा प्रत्यक्ष उल्लेख आजपर्यंत मराठी कागदपत्रांत सांपडत नव्हता. पण नुकताच कोटा येथील सारस्वत पंडित घराण्याच्या दप्तरांत तो सांपडला आहे. राणोजी शिंद्यानें बाळाजी यशवंतास ता. २० जून १७४३ रोजीं लिहिलेल्या पत्रांत या मकसुदाबादेवरील स्वारीची व रघूजीच्या पराभवाची हकीकत स्पष्ट दिली आहे.

या योग्य वेळीं केलेल्या मदतीमुळें बादशहा व खान यांपासून नानासाहेबास पैसा मिळाला आणि बादशहाची त्याच्या निष्ठेबद्दल खात्री झाली; तेणेंकरून माळव्याची सनद मिळणें सुलभ झालें. या घडामोडी १७४२–४३ त घडल्या.

या स्वारींत नानासाहेबानें काशी, प्रयाग व गया या तीन क्षेत्रांची त्रिस्थळी यात्रा जातां येतां मिळून पुरी केली. आपण प्रदेश लुटण्यासाठीं आलों नसून

आपलीं तीर्थस्थळें यवनांच्या हातांतून सोडविण्यासाठीं आलों आहों, अशा प्रकारचा तिकडील लोकांचा समज करून देण्याचा उद्योग या प्रसंगीं नानासाहेबानें केला. यांत त्याचें राज्यकौशल्य दिसून येतें. दरएक तीर्थाचे जागीं त्यानें सर्व विधि यथासांग केले; तेथील देवब्राह्मणांची पूजा व संभावना केली; त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि अशा रीतीनें आपल्याविषयीं एक जातीचा पूज्यभाव लोकांचे ठिकाणीं त्यानें उत्पन्न केला. प्रयाग, काशी वगैरे क्षेत्रें वजिराकडून आपल्या ताब्यांत घ्यावीं अशी पेशव्याची फार इच्छा होती व ती त्यानें वेळोवेळीं अनेक पत्रांतून सरदारांस कळविली आहे. अशी आख्यायिका आहे कीं, नानासाहेब फौजेसह काशीजवळ आला तेव्हां नबाब सफदरजंग यानें तेथील ब्राह्मणांस दहशत घातली कीं, तुम्ही आपले ब्राह्मण राजास आमच्या मुलखांतून परत फिरवा, नाहीं तर तुम्हां सर्वांस बाटवून मुसलमान करतों. तेव्हां सर्व काशीकर ब्राह्मण नारायण दीक्षित कायगांवकर यास मध्यस्थ करून उघडे बोडके पेशव्याच्या सैन्यांत भेटीस आले व त्यांनीं आपला पेंच त्यास कळविला. तेव्हां जेणेंकरून ब्राह्मणांस त्रास तें मला कर्तव्य नाहीं असें म्हणून पेशव्यानें त्यांची भीति दूर केली व आपण एकट्यानेंच ब्राह्मणांच्या मेळ्यांतून काशींत जाऊन आपली यात्रा पुरी केली. नंतर परत सैन्यांत येऊन तो गयेकडे निघून गेला. या दंतकथेंत काय तथ्य असेल तें असो. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांची दहशत हिंदूंस केवढी बसली होती हें मात्र यावरून दिसून येतें.

सैन्याच्या बळावर रघूजीस ताळ्यावर आणण्याचा हेतु या स्वारींत परभारें तडीस गेला तरी तो कांहीं स्वारीचा मुख्य हेतु नव्हता. मुख्य कार्य बुंदेलखंड जिंकून व तेथें तळ देऊन बादशाहीस शह देणें हें होतें. सन १७३४ सालीं बाजीरावास छत्रसालानें मदतीबद्दल राज्याचा तिसरा हिस्सा दिला. तो दूरचा प्रदेश त्या वेळीं पेशव्यास पूर्णपणें ताब्यांत घेतां आला नाहीं. या प्रदेशाबद्दल त्यास सालिना फक्त साहा सात लाख रुपये स्वामित्व म्हणून मिळत. याप्रमाणें वहिवाट चालली असतां सन १७४२ सालीं नानासाहेबाकडून मल्हार कृष्ण व राणोजी शिंदे हे दोघे सरदार खंडणीच्या वसुलास आले. त्यांनीं झांशींत मुक्काम केला. रात्रौ ओर्च्छेकर बुंदेल्यांनीं त्यांवर छापा घातला व मल्हार कृष्णाचें व राणोजीचा मुलगा ज्योत्याजी याचें शीर कापून नेलें. हें वर्तमान ऐकून नानासाहेबानें नारो

१ उपनांव अलगीवाले. यांचे वंशज ग्वाल्हेरीस आहेत.

शंकर राजेबहाद्दर यास बुंदेल्यांवर पाठविलें. त्यानें मोठ्या पराक्रमानें ओर्च्छा शहर जिंकून त्यांत गाढवाचा नांगर फिरविला, आणि तेथील राजास कैद केलें. तेव्हां राजानें मराठ्यांचा हिस्सा व खेरीज डोईकापणीबद्दल मल्हार कृष्ण प्रभृतींच्या वंशजांस बरुवासागर वगैरे मुलूख कायमचा तोडून दिला. ओर्च्छाच्या राजानें तदुत्तर आपली राजधानी तेहरी येथें नेली. नारो शंकरानें या वेळीं झांशी शहर मराठ्यांची राजधानी केली आणि तेथें जुन्या ओर्च्छांतील कारागीर सक्तीनें आणवून शहराची भरभराट केली. तसेंच दक्षिणेंतील अनेक कुटुंबें झांशींत आणवून तेथें दक्षिणी लोकांची वसाहत करविली. झांशी हें दक्षिणेस जाणाऱ्या हमरस्त्यावर असल्यामुळें वरील उपक्रमानें तेथील व्यापार वाढून तें लवकरच सधन झालें. या भागांत मराठ्यांचा मोठा भरणा अद्याप पावेतों आहे. त्याचा मूळ उगम याप्रमाणें नानासाहेबाचे वेळचा आहे.

नानासाहेब बंगाल्याकडे जातांना व येतांना ओर्च्छांतच तळ देऊन राहिला होता आणि तेथूनच त्यानें चहूंकडील योजना केली. अशा रीतीनें बुंदेलखंडांत पेशव्याचा अंमल बसला तेव्हां बादशहास माळव्याच्या सनदा देतों न देतों म्हणण्याची सोय राहिली नाहीं. त्यांतूनही रघूजीकडून पेशव्याचा पराभव होता तर बादशहास पळवाट तरी सांपडली असती. इतकें झालें तरी मराठ्यांस सुभा देणें हा बादशहास अपमानच वाटला, म्हणून त्याच्या समजुती खातर जयसिंग व निजाम यांनीं अशी शक्कल काढली कीं, शहाजादा अहंमद याचे नांवें सुभेदारी करून पेशव्यास त्याचा नायब म्हणावें. ही शक्कल तूर्तातूर्त उभयपक्षीं मान्य झाली. जुन्या बादशाही सनदांचें स्वरूप नेहमीं असें असे कीं, नोकरानें लेखी अर्ज करून बादशहानें तो मंजूर करावयाचा. असल्या सनदांचें स्वरूप समजण्यासाठीं पुढें त्यांतील कांहीं अटी दिल्या आहेतः—

१ मराठ्यांनीं माळवा प्रांत सोडून दुसऱ्या प्रांतांवर स्वाऱ्या करूं नयेत.

२ इतर प्रांतांत मराठे सरदार गेल्यास त्यांचा बंदोबस्त पेशव्यानें करावा.

३ पेशव्यांनीं पांचशें स्वारांनिशीं आपला एक सरदार बादशहाच्या चाकरीस ठेवावा.

४ बादशहास जरूर पडेल तेव्हां चार हजार मराठी फौज त्याच्या मदतीस पेशव्यानें पाठवावी. जास्त फौज मागितल्यास त्याचा खर्च बादशाहींतून मिळावा.

५ बादशहानें हल्लीं दिलेल्या ऐवजावाहेर पुनः जास्त मागणी पेशव्यानें करूं नये.

६ माळवा प्रांतांत बादशहांनीं दिलेलीं इनामें, जहागिरी, धर्मादाय वगैरे पेशव्यांनीं दरोबस्त मुनासब चालविले पाहिजेत.

७ जमीनदार लोकांकडून कर वगैरे घेणें ते ठरलेल्या शिरस्त्या बाहेर घेऊं नयेत.

या शर्तींवर पेशव्यास माळव्याची नायब सुभेदारी देण्यांत येत आहे.

प्रत्येक अटीपुढें पेशव्यानें कबुली लिहावयाची होती. या करारास राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर, यशवंतराव पवार व पिलाजी जाधव यांनीं पेशव्याचे जामीनदार म्हणून बादशहास कबुलायत लिहून दिली कीं, बाळाजीरावानें करार न पाळल्यास आम्ही त्याची नोकरी सोडून देऊं. ही कबुलायत लिहून गेल्यानंतर बादशाही सनदा सहीशिक्यानिशीं पेशव्याकडे आल्या. नानासाहेब या स्वारींत डिसेंबर सन १७४१ पासून १७४३ च्या जूनपर्यंत दीडवर्ष बाहेर होता. तितक्यांत शाहू छत्रपति आजारी आहेत असें समजल्यामुळें तो तांतडीनें साताऱ्यास परत आला. दरबारीं काय होईल याची धास्ती त्यास नेहमींच असल्यानें एकाच ठिकाणीं तळ देऊन त्यास ठांसून कधींच रहातां आलें नाहीं. या कारणामुळें त्याच्या प्रत्येक स्वारींत उणेपणा रहात गेला. स. १७४३ च्या जून महिन्यांत तो येतो तों शाहू बरा झाल्याचें त्यास कळलें. म्हणजे घाईनें येण्यांत त्याचा वृथा कालक्षेप झाला. त्या काळीं जाण्यायेण्यांतच असा पुष्कळ काळ फुकट जाई, तो आजच्या वाचकांच्या चटकन लक्षांत येत नाहीं. रघूजी व पेशवा यांच्या युद्धप्रसंगाचें वर्तमान साताऱ्यास शाहूच्या कानावर आलेंच होतें. दोघांतील तेढ पेशवाई मिळण्यापासून होती हें शाहूस अवगत होतें. दोन पक्ष निकरावर येऊन आपलें न ऐकतां वागूं लागत, तेव्हां त्यांस ताळ्यावर आणण्याचा शाहूचा मार्ग ठरलेला होता. दोघांस परभारें झुंझावयास लावून एकाचा पाडाव झाल्यावर मग शिष्टाचाराच्या गोष्टी सांगून त्यांची समजूत घालावयाची असा शाहूचा प्रघात असे. पराभवामुळें रघूजीचा हिरमोड झालाच होता, तेव्हां त्यासही शाहूनें साताऱ्यास बोलावून आणलें. बंगाल्यांत पराभव झाल्यावर सुद्धां रघूजी साशंक वृत्तीनें पेशव्याच्या पाठीवर सैन्य ठेवून वागत असे. न जाणों, पेशव्यानें नागपुराकडे मोर्चा वळविल्यास त्यास अडवितां यावें हा त्याचा हेतु होता. नानासाहेब साताऱ्यास गेल्याचें त्यास कळलें तेव्हां

त्यासही सातान्यास येतांना धास्ती वाटली नाहीं. तेथें शाहूनें दोघांच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा ठरवून दिल्या आणि कराराप्रमाणें वागूं असे दोघांकडूनही लेख लिहून घेतले. ते येणेंप्रमाणें:—

१ पेशव्यांनीं पूर्वीं संपादिलेला मोकासा व जहागिरी; कोंकण व माळवा प्रांतांचा कारभार; आग्रा, प्रयाग व अजमीर प्रांतांची खंडणी, पाटणा प्रांतांतील तीन तालुके, कर्नाटकचे हद्दींत २० हजारांचे वर रघूजीच्या हद्दींत पेशव्यास दिलेले इनाम गांव, इतक्या बाबी पेशव्याच्या समजाव्या. त्यास इतरांनीं हरकत करूं नये.

२ लखनौ, बहार व पैन बंगाल, तसेंच वऱ्हाडपासून कटकपर्यंतचा प्रदेश एवढ्या भागांतील खंडणीचे वगैरे सर्व हक्क रघूजीनें घ्यावे, त्यास पेशव्यानें किंवा इतरांनीं हरकत करूं नये.

'याप्रमाणें हद्दीनें राहून कोणी कोणाशीं कथळा करूं नये. त्या प्रांतीं सरकारांत पेशकशी घेण्याचे ठराव करून दिले आणि उभयतांचें सख्य करून मेजवान्या परस्परांस करविल्या. उभयतांनीं विकल्प ठेवूं नये ऐसे पायांवर हात ठेवून घेतले. सरकारांत उभयतांनीं मेजवान्या केल्या. ठरावाचे ऐवज दिले. नंतर महाराजांनीं उभयतांस मेजवानी बहुमान देऊन निरोप दिला.'

या वेळीं रघूजीविषयीं शाहूचें मत काय होतें याचा एका आख्यायिकेंत उल्लेख आहे. नानासाहेबानें बंगाल्यांत रघूजीचा पराभव केला तेव्हां महाराजांजवळ "मराठे लोकांनीं नानाप्रकारें 'ब्राह्मण माजले, भोसलेस लुटलें' म्हणाले." महाराजांनीं दोन दिवस ऐकोन उत्तर केलें, "माझे ब्राह्मणांनीं लाथा मारल्या तरी पुरवलें, परंतु त्यांची (रघूजीची) सावली लागत नाहीं (लागूं नये), मद्यप्राशन करून दौलत बुडविली." रघूजीनें कर्नाटकच्या स्वारींत पांडिचेरीवर स्वारी केली आणि चंदासाहेबाचा खजिना परत मागितला, त्या वेळीं पांडिचेरीचा फ्रेंच गव्हर्नर डुमास यानें रघूजीस दारूच्या बाटल्या नजर करून त्याची समजूत काढिली. तेणेंकरून रघूजी पांडिचेरीचा उद्योग सोडून परत आला. या सन १७४० मधील गोष्टीस अनुलक्षून शाहूनें वरील उद्गार काढले असावे. रघूजी व डुमासचा पत्रव्यवहार ब्रि. रि. पृ. ४०५ वर दिला आहे.

याप्रमाणें नानासाहेबाच्या पहिल्या तीन वर्षांच्या कामाचा आढावा घेतां या तरुण पेशव्यानें केवढी तडफ दाखविली, व किती भानगडींचीं प्रकरणें युक्तीनें विल्हेस लावलीं, याची कल्पना होईल. आलें तेवढें पदरांत पाडून घेऊन पुढें

जास्त मिळण्याची सोय त्यानें करून ठेवली. बादशहा, निजाम, रजपूत राजे, बुंदेले या सर्वांवर त्यानें आपला शह बसविला; इतकेंच नाहीं तर प्रतिनिधि, रघूजी, दमाजी प्रभृति स्वकीय विरोधकांवर सुद्धां त्याची छाप पडली. यामुळें शाहूसही राज्याचा गाडा ओढण्यास दुसरा इतका लायक पुरुष नाहीं अशी खूण पटली. बाजीरावाचें कर्ज फेडून पुढील खर्चाची सोय पेशव्यानें लावली. तिच्या बळावर पुढें उपस्थित होतील त्या भानगडी व अडचणी यांचें निरसन करण्याची ऐपत त्यास आली. मात्र या पहिल्या दोन तीन स्वाऱ्यांतील उत्साह व तडफ, शाहूच्या पश्चात् त्यानें कायम ठेविलीं नाहींत.

वर सांगितलेला करार झाल्यानंतर रघूजी व नानासाहेब यांचें मुलूखगिरीच्या क्षेत्राबद्दल पुनः कधीं वाकडें आलें नाहीं. रघूजीनें बंगालकडचा आपला उद्योग जोरानें चालवून तो प्रदेश चौथाईखालीं आणला, त्यासंबंधीं हकीकत पुढें येईल. आपसांतील भांडणापुरता या कराराचा चांगला परिणाम झाला, तरी मराठ्यांच्या समन्वित राजकारणास कार्यक्षेत्रांच्या या वांटणीमुळें उणेपणा आला; त्यामुळें बंगाल व अयोध्या या भोसल्यांच्या क्षेत्रांतील बादशाही सुभेदार कालांतरानें असहाय होऊन परकी इंग्रजांच्या छत्राखालीं गेले, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

---

## प्रकरण ५ वें.

# दक्षिणोत्तर भानगडी.

नानासाहेबाच्या कारकीर्दीतील मराठ्यांच्या राज्यविस्ताराचें धोरण समजण्यास एकंदर हिंदुस्थानच्या राज्यघटनेचें स्वरूप डोळ्यांपुढें आलें पाहिजे. यासाठीं थोडें मागें जाऊन त्याचें सिंहालोकन करूं.

मोगल बादशहा आपणांस आसेतुहिमाचल हिंदुस्थानचे बादशहा म्हणवीत. ही त्यांची बादशाही अनेक सुभ्यांत विभागलेली होती. रजपूत राजांसारख्या राजांचीं राज्यें, गोंडवणासारखे जंगली भाग व हिंदुस्थानांतील न जिंकलेला प्रदेश, या सर्वांचाच कोणत्या ना कोणत्या सुभ्यांत समावेश होत असे. मोगलांनीं दक्षिणेंत प्रवेश करून अकबरापासून औरंगजेबापर्यंतच्या शतकांत तेथील सहा राज्यें जिंकून त्याचे सहा सुभे केले. परंतु या सहा राज्यांत वस्तुतः तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील मुलूख बहुधा कधींच समाविष्ट नव्हता. विजापुर व गोवळकोंडें येथील सुलतानांनीं विजयनगर धुळीस मिळविल्यानंतर त्या राज्यांतील कांहीं

मुलूख पूर्ण जिंकिला, पण बाकीचा म्हैसूरप्रभृति पाळेगारांच्याच ताब्यांत होता. औरंगजेबानें कावेरीपर्यंत लगट केली तेव्हां हा सर्व मुलूख त्यानें या दोन सुभ्यांच्या कक्षेंतील ठरविला. तरीही मदुरा, मलबार सारखीं संस्थानें किंवा राज्यें वस्तुतः स्वतंत्रच होतीं. बाळाजी विश्वनाथानें दक्षिणच्या सहा सुभ्यांची म्हणजे विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशाची चौथाई बादशहाकडून करार करून घेतली, तेव्हां नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत संचार करण्यास मराठ्यांच्या घोड्यांस बादशाही परवानगी मिळाली. खरोखरी पाहतां चौथाई सरदेशमुखीचा ऐवज मोगल सुभेदारानें आपल्याकडे होणाऱ्या जमेंतून द्यावयाचा होता. परंतु हे सहा सुभे निजामाच्या कबजांत आले असल्यानें व त्याची इच्छा त्यानेंच गुंडाळून ठेवलेल्या बादशहाच्या हुकमास मानण्याची नसल्यानें, मराठ्यांस त्यांच्या हक्काबद्दल शक्य तितका मुलूख जिंकणें व खंडणी गोळा करणें याखेरीज दुसरा मार्ग नव्हता, व तें काम ते शक्य तेवढें करीत. पुढें बाजीराव, दाभाडे, पवार, भोसले, कदम, बांडे प्रभृतींनीं नर्मदाही ओलांडून उत्तरेकडील बादशाही सुभ्यांत संचारास सुरवात केली व गंगेपर्यंत लगट केली. त्याचाच परिणाम असा झाला, कीं या प्रदेशांतही ते चौथाईचे हक्क गाजवूं लागले. सरदारांच्या आपसांतील चुरशीमुळें छत्रपतीसही या नवीन कार्यक्षेत्राची वांटणी करून देणें भाग आलें. गुजराथेंत दाभाडे, कदम, गायकवाड प्रभृती, माळवा व खानदेशांत पेशवे, वऱ्हाड, गोंडवणांत वगैरे भोसले असे प्रदेश ठरविण्यांत आले. त्यांपैकीं गुजराथचा सुभा दाभाड्याचा हस्तक म्हणून गायकवाड वहिवाटींत असे. गोंडवणांत तळ देऊन जवळच्या प्रदेशांत भोसले खंडणी गोळा करी, व बाजीरावानें तर माळव्याच्या सनदाच बादशहाकडून काढण्याचा उपक्रम केला. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शाहूनें नानासाहेब व भोसले यांचें भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला, तेव्हां पेशव्यास माळव्यापलीकडील सुभ्यांचीहि वांटणी सांगावी लागली. कारण मराठ्यांचे घोडे नेहमीं पुढें धांवतच होते. वांटणींत सामान्यतः पश्चिम दिशा पेशव्याची व पूर्व भोसल्याची ठरली. अशी वांटणी ठरण्याचें कारण, अगोदरपासूनच त्या त्या प्रदेशांत दोघांचा संचार झालेला होता. बाजीरावानें उदेपुर व जोधपुर या रजपुत संस्थानांकडून खंडणी वसूल करण्याचा पायंडा घातला, तेव्हां हीं संस्थानें ज्या अजमीर सुभ्याखालीं होतीं तो सुभा पेशव्याचा ठरला. बुंदेलखंडांत तिसरा हिस्सा वांटणी छत्रसालानें पेशव्यास दिली तो प्रदेश मोगलांच्या अलाहाबाद ऊर्फ प्रयाग या सुभ्याच्या हद्दींत मोडत असल्यामुळें, तोही

प्रदेश पेशव्याच्या कक्षेंत आला. दक्षिणेकडील माळवा बाजीरावानें निजामाचा पराभव करून व बंगषास पिटून लावून हक्कानें आपला केला होता. अर्थात् या तीन सुभ्यांच्या मध्यें राहिलेला व जाट प्रभृति नवीन जेत्यांनीं व्यापलेला आगऱ्याचा सुभाही पेशव्याचा ठरणें अपरिहार्य झालें. त्याप्रमाणेंच वऱ्हाडच्या माथाटीवर नागपुरास तळ देऊन व सभोंवारच्या गोंड राजांस जिंकून रघूजी बसला असल्यामुळें, ते सुभे व पुढील कार्यक्षेत्र म्हणून त्यानें संचार सुरू केलेले बंगाल, बहार, ओढया वगैरे त्याच्या पूर्वेकडील सुभे व उत्तरेस वजिराचा अयोध्येचा सुभा हे सर्व शाहूनें रघूजीकडे सोंपविले. गंगेच्या दक्षिणेकडील, शोण नदाच्या पश्चिमेकडील व नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश, शाहूच्या वांटणी-प्रमाणें पेशव्याकडे सोंपविला गेला. या सुभ्यांखेरीज उत्तरेकडे बादशाही सुभे पांच; दिल्ली, लाहोर, मुलतान, ठठ्ठा ( सिंध ) व काबूल ( काश्मीरसह ). यांपैकीं काबूल व सिंध हे नादिरशहानें या पूर्वींच घेतले होते. मुलतान, लाहोर, दिल्ली व आग्रा या चार सुभ्यांवर काय तो बादशाही अंमल कांहींसा चालू होता. अयोध्या व प्रयाग हे सुभे वजीर, बुंदेले, रोहिले वगैरेंनीं व्यापिले होते. बिहार, बंगाल व ओढया अलिवर्दीखान दाबून बसला होता. अशी सर्व हिंदुस्थानची वांटणी त्या वेळीं झालेली होती.

दक्षिणची परिस्थितिही त्याहून फारशी भिन्न नव्हती. सहा सुभ्यांचा नाझीम निजामुल्मुल्क मोडल्या बादशाहीचा अभिमान धरून ठांसून बसला होता. बाळाजी विश्वनाथानें सय्यदांस मदत करून सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी मिळ-विली त्याचा अर्थ इतकाच, कीं शिवाजीच्या स्वराज्या पुरता मराठ्यांचा प्रत्यक्ष अंमल व बाकीच्या दक्षिणेंत ते बादशाहीचे संरक्षक. शिवाजीचें स्वराज्य म्हणजे महाराष्ट्राचा उणापुरा अर्धाभाग. हा करार अक्षरशः पाळावयाचा तर बाकीचा महाराष्ट्र मोगलाई अंमलाखालीं चिरंतन रहाणारा होता. या कराराची बजावणी शक्य तर मुळींच होऊं द्यावयाची नाहीं हा डाव निजामाचा होता. परशत्रूंस परते ठेवून व अंतस्थ बंडखोरांचा बींमोड करून बादशाही सुभ्यांत शांतता राखण्याची हमी मराठ्यांनीं घेतली होती. हें काम करावयाचें तर मराठ्यांचा घोडा साऱ्या दक्षि-णेंत अडवल्याशिवाय फिरला पाहिजे. असा संचार होऊं देऊन आपल्या संरक्ष-णाची जबाबदारी दुसऱ्याच्या हातांत देणें म्हणजे आपलीच कबर आपण बांधणें होय, हें निजाम पुरेंपुरें ओळखून होता. तेव्हां तुमची मदतही नको व संचार तर नकोच नको, असें त्याचें मराठ्यांस सांगणें. पण मराठे तें कां ऐकतील ?

मोगली मोजणीप्रमाणें सहा सुभ्यांचा वसूल १८ अठरा कोटींचा. त्यांतील चौथाईचे २५ टक्के व सरदेशमुखीचे १० टक्के मराठ्यांस द्यावयाचे तर सहा कोटींवर रक्कम होते. पण त्याचा चतुर्थांश तरी निजामास मिळत होता कीं नाहीं याची वानवा आहे. बाकी सर्व हिशेब कागदावर होता. पण मराठ्यांस हिशेब पटवावयाचा तर प्रत्येक तर्फेच्या वसुलांत त्यास होईल त्या ऐन वसुलाचा हिस्सा देणें जरूर होतें. म्हणजे मराठ्यांच्या कमाविसदारांचा सहा सुभ्यांत दुतर्फी अंमल. असा साराच पेंच निजामास होता. तेव्हां आपणांस राखतां येईल तें राखावें हा एकच पक्ष निजामास शिल्लक राहिला. उलट पक्षीं जेवढें चापतां येईल तेवढें चापणें हें मराठ्यांचें कर्तव्य ठरलें. निजाम आपणांस बादशाहीचा रक्षक म्हणवी, तर मराठे त्यास दक्षिण वळकावून वसणारा शिरजोर सुभेदार समजत. कारण निजाम दिल्लीस थोडेंच कांहीं पाठवीत होता!

या निजामाचें मराठ्यांविषयींचें मत त्यानें आपल्या मुलास मृत्युसमयीं केलेल्या उपदेशांत नमूद आहे. "दक्षिणी ब्राह्मण म्हणजे डोचकें मारण्यास लायख" असा उपदेश करण्याइतका त्याचा पेशव्यांशीं दीर्घद्वेष होता. राजनीतीच्या चतुर्विध उपायांपैकीं दाम व भेद यांचा उपयोग करून त्यानें आपलें अस्तित्व कायम राखलें, इतकेंच नव्हे, तर मराठ्यांच्या साम्राज्यविषयक भरारीस आळा घालण्याचा त्यानें विडाच उचलला होता. सारें हिंदुस्थान मोगलांचें हा महामंत्र त्यानें कधींही सोडिला नाहीं. त्याच्याच रक्षणार्थ त्यानें याच वेळीं मराठ्यांवर शस्त्र उचललें, व रघूजी भोसल्यानें कावेरीतीरापर्यंत पसरविलेला मराठ्यांचा पसारा चुटकीसरशीं उडवून दिला.

त्रिचनापल्ली जिंकून ती रघूजीनें मुरारराव घोरपड्याच्या ताब्यांत दिली व कर्नाटकची नवाबी एक कोट रुपये घेऊन त्यानें सफदरअल्लीस दिली. या हकीकती घडल्या तेव्हां निजाम उत्तरेस दिल्लींत होता; त्यामुळें त्या वेळीं मराठ्यांस पायबंद लावणें त्यास शक्य झालें नाहीं. खेरीज तयार शत्रूशीं गांठ घालण्याची निजामाची युद्धनीति नव्हती. रघूजी दक्षिणेंत असतांना निजाम कर्नाटकावर येता तर त्याचाच धुव्वा उडाला असता. म्हणून रघूजी उत्तरेंत जाईपर्यंत त्यानें वाट पाहिली. याच वेळीं नानासाहेबही उत्तरेंत गेला होता. मराठ्यांचे हे दोघे मातबर सरदार उत्तरेंत गुंतले आहेत ही संधि साधून, आपली सर्व फौज गोळा करून निजाम स० १७४३ च्या जानेवारींत कर्नाटकांत उतरला. नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व मोगली मुलखाचे नाझीम आपण, अर्थात्

आपल्या परवानगीशिवाय या मुलखांतील कोणतेंही राजकारण न्याय्य नव्हे या सूत्रावर त्याची बैठक होती. अर्काटचे नबाब हे औरंगझेबानें तत्प्रांतीं जिंकलेल्या मुलखाचे सुभेदार; पण तो सुभाच गोवळकोंड्याचा पोटभाग असल्यामुळें तेथील सुभेदार नेमणें, बदलणें, काढून टाकणें वगैरे सर्व कामें आपल्या अखत्यारांतील; मराठ्यांस वा इतरांस त्यांत हात घालतां येत नाहीं, असा निजामाचा बहाणा होता. वास्तविक स्वतः निजाम जसा मोगलाईचा कांहीं भाग दाबून बसलेला अंमलदार, तसाच अर्काटचा नबाबही होय. जर निजाम दिल्लीस जुमानीत नाहीं तर अर्काटकरानें निजामास कां मानावें? हा प्रश्न त्या वेळीं न्यायअन्यायाच्या बाहेर गेला असून, जो जितका बलिष्ठ तितका त्याचा अखत्यार, एवढाच त्यांत अर्थ होता.

आपण खुद्द दिल्लीच्या बादशहाचे प्रत्यक्ष सुभेदार, निजामाचे दुय्यम नव्हे, या सबबीवर दोस्तअली निजामास कधींच खंडणी देत नसे. पुढें मराठ्यांनीं सफदरअलीस नबाब केलें तेव्हां त्याकडे निजामानें खंडणीची मागणी केली. सफदरअलीनें खंडणीच्या सबबीवर आपल्या रयतेकडून मात्र पैसा पिळून काढिला, पण निजामास त्यांतलें कांहीं दिलें नाहीं. रयत नाखूष आहे ही संधि साधून व आपण निजामाचा अंकित असें जाहीर करून नबाब घराण्यांतील मुर्तजाअलीनें सफदरचा खून केला आणि आपणच नबाबाचें पद स्वीकारलें. या बंडाळीचा फायदा घेऊन व पेशवा उत्तरेंत आहे ही संधि साधून निजाम मार्च १७४३ मध्यें अर्काटवर आला. त्याच्या प्रचंड सैन्यास घाबरून त्या प्रांतींचे लहान मोठे नबाब, पाळेगार व पुंड जागच्या जागीं बसले. निजामानें अन्वरुद्दीन म्हणून नवीनच माणूस अर्काटास नेमिला. नंतर निजाम त्रिचनापल्लीवर आला, व तें ठिकाण त्यानें मुराररावघोरपड्यापासून लढल्याशिवायच घेतलें. मुराररावास किल्ला झुंझवितां आला असता, पण ज्यांत आपला फायदा नाहीं ती गोष्ट करण्यांत मुरारराव कधीं झटून प्रयत्न करीत नसे. आपण मराठ्यांच्या साम्राज्याचा एक घटक आहों, असें त्याचें वर्तन कधींच नसे. एकटाच एका बाजूस पडल्यामुळें, ज्यांच्याकडून आपला तात्पुरता फायदा त्यांच्यासाठींच लढणें त्यास भाग पडे या प्रसंगीं निजामाशीं लढून सर्वच गमावण्याचें धाडस करण्यापेक्षां आपली गुत्तीची जहागीर कायम करून घेण्यांत त्यानें शहाणपणा मानिला. अशा रीतीनें मराठ्यांचा दोन वर्षांचा उद्योग एका क्षणांत वांया गेला. अर्काटप्रमाणेंच सावनूर, शिरें, कडपें, कर्नूळ वगैरे ठिकाणचे नबाब आपणांस स्वतंत्र समजूं लागले होते, त्यांसही

मोगली मोजणीप्रमाणें सहा सुभ्यांचा वसूल १८ अठरा कोटींचा. त्यांतील चौथाईचे २५ टक्के व सरदेशमुखीचे १० टक्के मराठ्यांस द्यावयाचे तर सहा कोटींवर रक्कम होते. पण त्याचा चतुर्थांश तरी निजामास मिळत होता कीं नाहीं याची वानवा आहे. बाकी सर्व हिशेब कागदावर होता. पण मराठ्यांस हिशेब पटवावयाचा तर प्रत्येक तर्फेच्या वसुलांत त्यास होईल त्या ऐन वसुलाचा हिस्सा देणें जरूर होतें. म्हणजे मराठ्यांच्या कमाविसदारांचा सहा सुभ्यांत दुतर्फी अंमल. असा साराच पेंच निजामास होता. तेव्हां आपणांस राखतां येईल तें राखावें हा एकच पक्ष निजामास शिल्लक राहिला. उलट पक्षीं जेवढें चापतां येईल तेवढें चापणें हें मराठ्यांचें कर्तव्य ठरलें. निजाम आपणांस बादशाहीचा रक्षक म्हणवी, तर मराठे त्यास दक्षिण बळकावून बसणारा शिरजोर सुभेदार समजत. कारण निजाम दिल्लीस थोडेंच कांहीं पाठवीत होता !

या निजामाचें मराठ्यांविषयींचें मत त्यानें आपल्या मुलास मृत्युसमयीं केलेल्या उपदेशांत नमूद आहे. " दक्षिणी ब्राह्मण म्हणजे डोचकें मारण्यास लायख " असा उपदेश करण्याइतका त्याचा पेशव्यांशीं दीर्घद्वेष होता. राजनीतीच्या चतुर्विध उपायांपैकीं दाम व भेद यांचा उपयोग करून त्यानें आपलें अस्तित्व कायम राखलें, इतकेंच नव्हे, तर मराठ्यांच्या साम्राज्यविषयक भरारीस आळा घालण्याचा त्यानें विडाच उचलला होता. सारें हिंदुस्थान मोगलांचें हा महामंत्र त्यानें कधींही सोडिला नाहीं. त्याच्याच रक्षणार्थ त्यानें याच वेळीं मराठ्यांवर शस्त्र उचललें, व रघूजी भोसल्यानें कावेरीतीरापर्यंत पसरविलेला मराठ्यांचा पसारा चुटकीसरशीं उडवून दिला.

त्रिचनापल्ली जिंकून ती रघूजीनें मुरारराव घोरपड्याच्या ताब्यांत दिली व कर्नाटकची नवाबी एक कोट रुपये घेऊन त्यानें सफदरअल्लीस दिली. या हकीकती घडल्या तेव्हां निजाम उत्तरेस दिल्लींत होता; त्यामुळें त्या वेळीं मराठ्यांस पायबंद लावणें त्यास शक्य झालें नाहीं. खेरीज तयार शत्रूशीं गांठ घालण्याची निजामाची युद्धनीति नव्हती. रघूजी दक्षिणेंत असतांना निजाम कर्नाटकावर येता तर त्याचाच धुव्वा उडाला असता. म्हणून रघूजी उत्तरेंत जाईपर्यंत त्यानें वाट पाहिली. याच वेळीं नानासाहेबही उत्तरेंत गेला होता. मराठ्यांचे हे दोघे मातबर सरदार उत्तरेंत गुंतले आहेत ही संधि साधून, आपली सर्व फौज गोळा करून निजाम स० १७४३ च्या जानेवारींत कर्नाटकांत उतरला. नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व मोगली मुलखाचे नाझीम आपण, अर्थात्

आपल्या परवानगीशिवाय या मुलखांतील कोणतेंही राजकारण न्याय्य नव्हे या सूत्रावर त्याची बैठक होती. अर्काटचे नबाब हे औरंगझेबानें तत्प्रांतीं जिंकलेल्या मुलखाचे सुभेदार; पण तो सुभाच गोवळकोंड्याचा पोटभाग असल्यामुळें तेथील सुभेदार नेमणें, बदलणें, काढून टाकणें वगैरे सर्व कामें आपल्या अखत्यारांतील; मराठ्यांस वा इतरांस त्यांत हात घालतां येत नाहीं, असा निजामाचा वहाणा होता. वास्तविक स्वतः निजाम जसा मोगलाईचा कांहीं भाग दाबून बसलेला अंमलदार, तसाच अर्काटचा नबाबही होय. जर निजाम दिल्लीस जुमानीत नाहीं तर अर्काटकरानें निजामास कां मानावें? हा प्रश्न त्या वेळीं न्यायअन्यायाच्या बाहेर गेला असून, जो जितका बलिष्ठ तितका त्याचा अखत्यार, एवढाच त्यांत अर्थ होता.

आपण खुद्द दिल्लीच्या बादशहाचे प्रत्यक्ष सुभेदार, निजामाचे दुय्यम नव्हे, या सबबीवर दोस्तअली निजामास कधींच खंडणी देत नसे. पुढें मराठ्यांनीं सफदरअलीस नबाब केलें तेव्हां त्याकडे निजामानें खंडणीची मागणी केली. सफदरअलीनें खंडणीच्या सबबीवर आपल्या रयतेकडून मात्र पैसा पिळून काढिला, पण निजामास त्यांतलें कांहीं दिलें नाहीं. रयत नाखूष आहे ही संधि साधून व आपण निजामाचा अंकित असें जाहीर करून नबाब घराण्यांतील मुर्तजाअलीनें सफदरचा खून केला आणि आपणच नबाबाचें पद स्वीकारलें. या वंडाळीचा फायदा घेऊन व पेशवा उत्तरेंत आहे ही संधि साधून निजाम मार्च १७४३ मध्यें अर्काटवर आला. त्याच्या प्रचंड सैन्यास घाबरून त्या प्रांतींचे लहान मोठे नबाब, पाळेगार व पुंड जागच्या जागीं बसले. निजामानें अन्वरुद्दीन म्हणून नवीनच माणूस अर्काटास नेमिला. नंतर निजाम त्रिचनापल्लीवर आला, व तें ठिकाण त्यानें मुराररात्र घोरपड्यापासून लढल्याशिवायच घेतलें. मुराररावास किल्ला झुंझवितां आला असता, पण ज्यांत आपला फायदा नाहीं ती गोष्ट करण्यांत मुरारराव कधीं झटून प्रयत्न करीत नसे. आपण मराठ्यांच्या साम्राज्याचा एक घटक आहों, असें त्याचें वर्तन कधींच नसे. एकटाच एका बाजूस पडल्यामुळें, ज्यांच्याकडून आपला तात्पुरता फायदा त्यांच्यासाठींच लढणें त्यास भाग पडे या प्रसंगीं निजामाशीं लढून सर्वच गमावण्याचें धाडस करण्यापेक्षां आपली गुत्तीची जहागीर कायम करून घेण्यांत त्यानें शहाणपणा मानिला. अशा रीतीनें मराठ्यांचा दोन वर्षांचा उद्योग एका क्षणांत वांया गेला. अर्काटप्रमाणेंच सावनूर, शिरें, कडपें, कर्नूळ वगैरे ठिकाणचे नबाब आपणांस स्वतंत्र समजूं लागले होते, त्यांसही

निजामानें लगोलग आपल्या कह्यांत आणिलें, आणि दक्षिणेकडचा सर्व मुलूख मोगलाईचाच भाग होय, हें सूत्र खरें करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. कर्नाटक बालाघाटचा कारभार त्यानें आपला नातू मुझफरजंग याकडे सोंपविला.

कर्नाटकचा सुभा शाहूनें मागील स्वारीनंतर फत्तेसिंग भोसले व त्याचा स्नेही बाबूजी नाईक यांजकडे सोंपविला होता. पेशव्याच्या अखत्यारांत तो मुलूख नव्हता. त्या दोघांनीं या प्रसंगीं कर्नाटकांत जाऊन मराठ्यांचा त्या प्रांतावरील अंमल कायम ठेवावा, पण ते दोघेही दुर्बल, सुखासीन व खेरीज लोभी होते. त्या प्रांतींचा मराठ्यांचा अंमल म्हणजे तेथील देसाई, राजे, पाळेगार, नाईक, नबाब या सर्व लहानमोठ्या आपापल्या ठायीं स्वतंत्र होऊन बसलेल्या पुंडांकडून खंडणी वसूल करण्याचा हक्क. दारांत फौज आल्याशिवाय यांतील कोणींही बिन-बोभाट खंडणी कधींच पाठविली नाहीं. रयत प्रत्यक्ष आपल्या अंमलाखालीं आणून व या स्थानिक पुंडांचें उच्चाटन करून कारभाराचा आटोप करावा, ही मराठ्यांची रीतच नव्हती. त्याचा परिणाम असा होई कीं, सैन्य मुलुखगिरीवर आहे तोंपर्यंत सर्वत्र मराठ्यांचें साम्राज्य भासावें, परत फिरलें कीं तें ढगाप्रमाणें वितळून जावें. सन १७४१ सालीं नानासाहेब पेशव्यानें बाबूजी नायकास पुण्यांतून हांकून दिल्यानंतर रघूजी व फत्तेसिंग यांच्या मदतीनें त्यानें शाहूकडून बारामतीची जहागीर मिळविली, आणि कर्नाटकचा सुभा फत्तेसिंग भोसल्याच्या निसबतीनें आपल्या वहिवाटीस घेतला. त्याचा उद्देश केवळ पैसे करण्याचा सावकारी बाण्याचा असे. तेवढ्यापुरताच त्याचा खटाटोप असता तर नानासाहेबास त्याच्याकडे लक्ष पुरविण्याची जरूरी नव्हती. परंतु तो नेहमीं रघूजी प्रभृति पेशव्यांच्या विरोधकांत वेळीं अवेळीं सामील होऊन पेशव्यास त्रास देई; व नाना-साहेबाची पेशवाई काढून आपण ती पटकवावी असा बाणा ठेवी; त्यामुळें नानासाहेबास त्याच्यावर नेहमींच करडी नजर ठेवणें भाग पडलें. पेशव्याची नालस्ती करून शक्य तर भट घराण्यांतून पेशवाई काढून टाकावी, असा विरोधी पक्षाचा उद्योग शाहूच्या मृत्यूपर्यंत व नंतरही थोडाबहुत चालूच असे. अर्थात् आपलें बद्धमूल टिकविणें नानासाहेबासही अपरिहार्यच झालें. या सर्व गोष्टींमुळें नायकाच्या कर्नाटकांतील उद्योगास पेशव्याचा पाठिंबा किंवा सहानुभूति कधींच मिळाली नाहीं. नायकाचें कर्नाटकांत बस्तान बसणें म्हणजे तिकडील क्षेत्र पेश-व्याच्या उद्योगाच्या क्षेत्रांतून नाहींसें होणें असा अर्थ होता. शिवाय अशा मुलुख-गिरीस काय तयारी पाहिजे व त्यांत काय अडचणी असतात, त्याची जाणीव

पेशव्या इतकी नायकास नव्हती. या आपसांतील कुरघोडीचा परिणाम असा झाला कीं, त्या प्रदेशांत मराठ्यांचें पाऊल योग्य वेळीं रुतलें नाहीं, व कालांतरानें तो टापू हैदर व इंग्रज यांच्या कक्षेंत गेला.

कर्नाटकचा कारभार आपणाकडे घेतला तेव्हां नायकाची कल्पना होती कीं, आपण नुसते तिकडे जातांच तिकडील देसाई आपणांस वार्षिक खंडणी देतील. पण त्या देसायांनीं जेव्हां नायकाजवळ फारशी फौज नाहीं हें पाहिलें, तेव्हां त्यांनीं खंडणीची टाळाटाळ चालविली. अर्थात् या पुंड देसायांस कावूंत आणण्यासाठीं नायकानें ठिकठिकाणीं शिबंदी फौज ठेवली. पण यामुळें खर्च बेसुमार वाढला, आणि बलिष्ठ संस्थानिक खंडणी देत नसत ते नसतच. इतकेंच काय, पण त्या संस्थानिकांनीं एक होऊन बाबूजीचा मोड केला व त्यासच लुटलें. अशा रीतीनें सुभेदारी आंगाशीं आली तेव्हां बाबूजीनें शाहूची वडील राणी सकवारबाई इच्यापासून कर्ज घेतलें. मनांतला हेतु कीं, राणीचें कर्ज उगवण्यासाठीं तरी शाहू आपणांस मदत करील. शाहूचा नाईक घराण्यावर लोभ होता ही तर गोष्ट खरीच. पण सरदारांचे पेंच वारण्याचें सामर्थ्य त्यास कधींच नव्हतें. फार तर त्यानें दुसऱ्या सरदारास नायकाच्या मदतीस जाण्यास सांगावें एवढेंच. पण जो दुसरा सरदार तरी मनापासून त्यास थोडेंच साह्य करणार. संकटांत सांपडलेल्या सरदाराशीं त्याचें बरें असेल, किंवा पुढें केव्हां त्याच्या मदतीची त्यास अपेक्षा असेल, तरच तो त्याच्या मदतीस जाणार, अशी स्थिति होती. नायकाच्या मित्रांपैकीं फत्तेसिंग भोसले केवळ दुबळा होता. रघूजीस तर स्वतःचा उत्तरेंतील उद्योगच पुरेसा झाला होता. त्यानें आपला दिवाण कोन्हेर राम कोल्हटकर याच्या मार्फत साताऱ्यास शक्य ती खटपट नायकातर्फे केली; पण पैसा व फौज यांच्या अभावीं ती लंगडी पडली. राणीकडून कर्जाचा फारच तगादा लागला, तेव्हां बाबूजीनें छत्रपतीच्याच दाराशीं धरणें घेतलें व उपोषणें चालविलीं. ऋणकोनें धनकोच्या दाराशीं धरणें घेण्याचा हा प्रकार उलटा होता व त्यामुळें शाहू फारच चिडला. बाबूजीनें सोमल खाल्ला तो शाहूनें आपला हात लावलेलें दूध पाठवून उतरविला. इतका प्रलय करूनही शाहूच्या हातून पेंच निवारेना, तेव्हां नाईक थकला. पेशव्याचें म्हणणें असें होतें कीं, नायकानें कर्नाटकावरील हक्क सोडून द्यावा तरच आपण त्या प्रांताचा बंदोबस्त करूं. नायकास असें करण्यास भाग पाडण्याची आणखी एक किल्ली पेशव्याजवळ होती. पेशवा व कोल्हापुरकर संभाजी छत्रपति यांचें सूत असे. वारणेच्या तहानें वास्तविक वारणा व

तुंगभद्रा या नद्यांमधला मुलूख हा कोल्हापुरकरांच्या मुलुखगिरीच्या क्षेत्रांतला ठरला होता. पण त्यांच्याकडून हें मुलुखगिरीचें काम कधींच अंगावर घेतलें गेलें नाहीं. तरीही भयामुळें सोंधें, बिदनूर वगैरे संस्थानें कोल्हापुरकरांस नाममात्र मानीत. पुढें सातारकर छत्रपतीचें सैन्य दक्षिणेकडे गेलें, तेव्हां त्यास वाटेंतील या संस्थानांकडून खंडणी वसूल करणें प्राप्त झालें. पण संभाजीस ही गोष्ट तहाविरुद्ध आपल्या हक्कावर गदा आहे असें वाटे. आपल्या स्वतःच्या अंगांत ही खंडणी वसूल करण्याचें सामर्थ्य नाहीं हें तो ओळखीत होता, पण त्याचा हेतु एवढाच कीं जो हें काम करील त्यानें तें आपल्या नांवें करून आपणास कांहीं त्यांतील अंश पोंचवावा. हें काम संभाजीतर्फे करण्याचें नानासाहेबानें अंगावर घेतलें. एखाद्या घराण्याचा पूर्वी चालत आलेला हक्क दुसऱ्यास देण्यास शाहू सदैव नाखूष असे. तेव्हां बाबूजीचा भाऊ आबाजी नाईक यानें हें काम आंगावर घ्यावें असें शाहूनें सुचविलें. पण आबाजीही रघूजीच्याच स्वाधीन. तेव्हां पर्यायानें कर्नाटकांत रघूजीचें बोट राहणार हें पेशव्यास इष्ट नव्हतें. त्यापेक्षां स्वतःच हें काम फत्तेसिंह भोसल्याच्या नांवानें स्वीकारून तें त्याजकडून आपणाकडे वहिवाटीस घेणें पेशव्यास जास्त सोइस्कर होतें. पेशवे नायकांच्या या चुरशी सन १७४५–४६ सालांत साताऱ्यास चालल्या होत्या. त्यांतील उत्तरभाग देण्यापूर्वी नानासाहेबाची या वेळीं काय परिस्थिति होती तें प्रथम पाहिलें पाहिजे.

बंगालच्या स्वारींतून परत आल्यावर नानासाहेबानें १७४४ चें साल महाराष्ट्रांतच काढिलें. चिमाजीआपानें स. १७३९ त वसई जिंकली व उत्तर कोंकण घेतलें, तरी पोर्तुगीज लोकांचा त्रास पुरा सुटला नव्हता. पेशव्याजवळ म्हणण्यासारखें आरमार नव्हतें. जें थोडें होतें त्याचाही इतरत्र उपयोग नसल्यामुळें त्यापायीं होणारा खर्च पेशव्यांस फुकट गेलासें वाटे. "आरमाराची मिळकत थोडी व खर्च फार आहे यास्तव आरमार ( किनाऱ्या ) जवळच ठेवावें, म्हणजे आरनाळ्यांत लोक उत्तम राहातील." असें नानासाहेबानें पिलाजी जाधवास वसईप्रांतींचा बंदोबस्त राखण्यास सांगतांना कळविलें. यावरून आरमाराचें राष्ट्रीय महत्त्व त्यास कळलें नव्हतें असें म्हणणें भाग आहे. किनाऱ्याजवळ ठेवून आरमार सुरक्षित राखणें म्हणजे लढाईत मागें राहून घोडें राखण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच होय. सैन्याप्रमाणें आरमार ही वस्तु हिंदुस्थानांत वाटेल तिकडे पाठविण्यासारखी नव्हती हें खरें; पण पाश्चात्यांपासून आपलें रक्षण करण्यास त्याखेरीज दुसरें साधन नव्हतें. आरमारी खर्च बुडीत वाटला तरी राज्यरक्ष-

णास त्याचीच अत्यंत जरूर होती. मराठ्यांचें असें परंपरागत अनुभवानें पाश्चात्यांशीं टक्कर देण्याजोगें खरें आरमार फक्त आंग्र्यांजवळ होतें. परंतु आपली मातृभूमि आपल्या स्वतःच्या अंमलाखालीं आणण्याच्या ईर्ष्येंत राष्ट्रहिताचें स्मरण पेशव्यास राहिलें नाहीं. शक्य त्या बऱ्यावाईट उपायांनीं नानासाहेबानें आंग्र्यांचें वैभव व सत्ता मोडण्याचा क्रम ठेविला होता. वास्तविक पाहतां वसईची मोहीम व पोर्तुगीजांचा पाडाव हीं कामें आंग्र्याच्या अधिकारक्षेत्रांतील होतीं. परंतु व्यापारानें श्रीमंत झालेल्या व युद्धशास्त्रांत फार पुढें असलेल्या पाश्चात्य लोकांस कोंकणच्या अल्प उत्पन्नांत जरबेंत ठेवणें आंग्र्यांस अशक्य होतें. त्यास मराठ्यांच्या इतर प्रांतांच्या उत्पन्नांतून सतत मदत पाहिजे होती. परंतु शाहूकालीन कारभारांत प्रत्येक सरदारानें आपला खर्च आपण भागवावा अशीच पद्धत असल्यामुळें, शूर आंग्र्यांस मुख्य राज्यांतून फारशी मदत होत नसे. त्यांतही कान्होजी आंग्रे ताराबाईच्या पक्षाचा होता तेव्हांपासून पेशव्यांचें व त्यांचें सूत कधींच नसे. त्याचे मुलगेसुद्धां पेशव्याची हुकमत जुमानीत नसत. त्यामुळें वसईची मोहीम, हबशावरील मोहीम वगैरे कामें मुख्यतः पेशव्यांनींच स्वतःच्या अंगावर घेऊन पार पाडिलीं. हेतु हा कीं, या मार्गानें परस्पर आंग्र्याचें महत्त्व नष्ट व्हावें. पुढें उत्तर कोंकण जिंकल्यावर पेशव्यानें तो प्रांत स्वतःच्याच नांवें करून घेतला. पण त्याच्या संरक्षणास अवश्य असणारें आरमार मात्र त्याजवळ नव्हतें, तें पेशव्यास ठेवावें लागलें. वास्तविक मराठ्यांचें सर्व आरमार एकट्या आंग्र्याच्या हुकमतींत जय्यत राखून पेशव्यानें त्याकडे सर्व बंदोस्ताचें काम ठेविलें पाहिजे होतें; पण असें करून आपल्या विरुद्ध काम करणाऱ्या आंग्र्यास वाढीस लावण्याचें पेशव्यांच्या मनांत बिलकूल नव्हतें. उलट संभाजी आंग्रे १७४१ त मरण पावल्यावर मानाजी व तुळाजी या दोघां भावांत भांडणें लागलीं असतां, दुर्बल मानाजीचा पक्ष घेऊन पेशव्यानें आंग्र्यांचाच कांहीं मुलूख दाबला. नानासाहेबाचा हेतु आंग्र्याचें समूळ उच्चाटन करण्याचा होता. परंतु शाहू परंपरागत सरदार मोडण्याच्या अगदीं विरुद्ध असल्यामुळें हा प्रकार पेशव्यास पूर्णपणें साध्य झाला नाहीं. आंग्र्याकडून साताऱ्यास तक्रार गेली तेव्हां शाहूनें खरमरीत आज्ञापत्र लिहवून माणीकगड वगैरे प्रांत पेशव्यानें घेतला होता, तो सोडून देण्याविषयीं सदाशिवरावास आज्ञा केली. ही गोष्ट मानाजीच्या मुलखाची झाली. मानाजी पेशव्यांस धरून असल्यामुळें तुळाजी त्यावर फारच चिडला होता, म्हणून तो दोघांच्याही प्रांतास उपद्रव करी. बाणकोटच्या दक्षिणेकडील कोंकण किनारा त्याच्या ताब्यांत होता. त्यानें सर्वांसच

लुटून आपण बलिष्ठ होण्याचा उपक्रम चालविला होता. त्याचें व पेशव्याचें भांडण शाहूच्या निधनानंतर विकोपास गेलें. तो प्रकार पुढें येईल.

इ. स. १७४५ च्या आरंभीं नानासाहेबानें उत्तरेंत पुनः माळव्यावर स्वारी केली. फैझमहंमदखान रोहिला, भोपाळ व जवळचा प्रदेश वळकावून बसला होता, त्यास ताब्यांत आणणें हा या स्वारीचा उद्देश होता. स्वारीचा मुख्य तळ भेलसा शहरीं असल्यामुळें हीस भेलशाची स्वारी म्हणतात. मोहिमेचें मुख्य काम पिलाजी जाधवाकडे होतें. ता. २२ मार्च रोजीं भेलसा हस्तगत झालें, तेव्हां फैझमहंमदखान शरण येऊन त्यानें निम्में राज्य पेशव्यास दिलें. बाकीचें निम्में त्याच्या वंशजाकडे चालत आहे तें हल्लींचें भोपाळचें राज्य होय. या खेरीज माळव्यांतील वसुलाची व्यवस्था बांधून देणें, तिकडील परगणे निरनिराळ्या सरदारांस वांटून देणें, चंदेरीची व्यवस्था लावणें, सभासिंग बुंदेल्याशीं करार करणें, वगैरे कामें पेशव्यानें या स्वारींत उलगडलीं, आणि तो वरसातीचे सुरवातीस परत साताऱ्यास आला.

१७४६ सालीं उत्तरेस शिंदे होळकर बुंदेलखंडांत मराठ्यांचा अंमल बसवीत होते. त्या स्वारीबद्दलचा व्यवहार नानासाहेबास साताऱ्यास राहूनच चालवावा लागला. यापूर्वीच १७४५ च्या जुलै महिन्यांत राणोजी शिंदे सुजावलपूर येथें मरण पावला. राणोजीच्या मृत्यूची तारीख अस्सल पत्राच्या अभावामुळें आजपर्यंत अनिश्चित होती ती आतां कोटेकर पंडितांच्या दप्तरांतील पत्रावरून स्पष्ट झाली आहे. राणोजीस मुलगे मैनाबाईच्या पोटीं चार, जयाप्पा, दत्ताजी, जोत्याजी, व तुकोजी, आणि रक्षा चिमाबाईच्या पोटीं एक महादजी. राणोजीच्या पश्चात् त्याचा वडील मुलगा जयाप्पा याची सरदारीवर नेमणूक झाली. नानासाहेब प्रथम बुंदेलखंडांत गेला, तेव्हां तेथील एक राजा अर्जुनसिंग धंधेरे हा पेशव्याचा अंकित झाला. तो पुढें नेहमीं मराठ्यांस धरून असे. त्यामुळें सभासिंग वगैरे इतर राजे लोकांनीं त्याच्या एका पुत्रास आपणाकडे वळवून त्याचा मोड केला व सर्व राज्य घेतलें. अशा स्थितींत त्याचें राज्य जिंकून त्यास परत देण्याबद्दल पेशव्यानें शिंद्यास १७४६ सालीं आज्ञा केली. पुढें शिंदेहोळकरांनीं बुंदेल्यांचा पराभव करून जैतपूरचें मजबूत ठाणें मोठ्या शौर्यानें हस्तगत केलें. ही बातमी ऐकून नानासाहेबानें पुढील शाबासकीचें पत्र त्यांस लिहिलें. त्यावरून सरदारांस नांवाजून त्यांकडून कामें करून घेण्याची नानासाहेबाची हातोटी निदर्शनास येते. "बुंदेल्यांनीं जैतपुरास तोफा, जेजाला, बर्कंदाज, दारूगोळा वगैरे विपुल सामान ठेवलें होतें. रेव-

णींतून हंमेशा झुंझत. आपलेकडील हजार माणूस मेले, चार हजार जखमी झाले. तथापि सुरुंगांनीं भिताड पडलें, तेणेंकरून अजीच किल्ला सर केला, म्हणोन विस्तारें लिहिलें तें श्रवण होऊन संतोष झाला. जैतपूर बांकी जागा. बाजे सरदारांनीं व लोकांनीं श्रमसाहस करून फत्ते केली. शाबास तुमची व शाबास लोकांची. मोठी गोष्ट जाहली. तुम्हांसारखे उमदे सरदार इरेस पडल्यावर जैतपूरची कथा काय ! याहूनही विकट जागा हस्तगत कराल. याउपरी तिकडील कर्तव्य मनसुवा उल्लेखपुरःसर लिहीत जाणें." बुंदेले हे मराठ्यांसारखेच कणखर लोक असून फार शूर होते; त्यांच्या इतके कडवे शत्रू मराठ्यांस थोडेच भेटले. पुढें बुंदेल्यांशीं तह होऊन जैतपूर जगतराज बुंदेल्यास देण्यांत आलें, व पेशव्यांच्या महालांची वांटणी व व्यवस्था गोविंदपंत बुंदेले व लक्ष्मण शंकर यांजमध्यें नानासाहेबानें ठरवून दिली.

पेशवा सातान्यास असल्यामुळें उत्तरेंतील सर्व कारभार या वेळीं शिंद्यांचा दिवाण प्रसिद्ध रामचंद्रपंत बाबा करीत असे. रामचंद्र मल्हार ऊर्फ रामचंद्रबाबा हा मालवणाकडील आरवली गांवचा कुळकर्णी निर्वाहासाठीं सातान्यास येऊन राजगुरु कचेश्वरबाबा ओतूरकर यांच्या आश्रयास राहिला होता. या सारस्वत मुत्सद्याचा उदय बाळाजी विश्वनाथाचे वेळींच झाला. येथें हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, हिशेबी लिहिणें व जमाखर्चाची आंखणी ठरवून देणें, हीं दोन कामें त्या वेळीं इतरांपेक्षां या सारस्वतांनाच चांगलीं साधलीं होतीं; आणि बहुधा त्यांजपासूनच तीं पेशव्यांनीं उचललीं असें दिसतें. बाळाजी विश्वनाथानें राज्याच्या वसुलाची पद्धत ठरविली, तींत रामचंद्रबाबाचा हात होता. माळव्याची वांटणी रामचंद्रबाबानेंच करून दिली होती. पुढें नानासाहेब व सदाशिवराव हे तर प्रत्यक्ष रामचंद्रबाबाचेच हाताखालीं तयार झाले. पेशव्यांच्या फडाची म्हणजे हिशेबी कचेरीची स्थापना नानासाहेबाचे वेळीं रामचंद्रबाबानें केली. या रामचंद्रबाबाविषयीं नानासाहेबाचे पत्रांतून मोठा आदर व्यक्त होतो. उत्तर हिंदुस्थानांत प्रथम शिंदे होळकर वावरूं लागले त्या वेळीं रामचंद्रबाबाच तिकडील कारभार करीत असे. त्यांचे वशिल्यानें आणखी अनेक सारस्वत कुटुंबें उत्तरेंत व विशेषतः शिंदेशाहींत पुढें प्रसिद्धीस आलीं. कोटेकर लालाजी बल्लाळ पंडित गुळगुळे हे अशाच पैकीं एक होत.

## प्रकरण ६ वें.

# पेशवाईवरून अल्पकाळ दूर.

मागील प्रकरणांत बाबूजी नायकाच्या भानगडी सांगतांना शाहूच्या दरबारांतील कारस्थानांचा उल्लेख आलाच आहे. सन १७४३ पासून शाहूची प्रकृति ढांसळली. त्या वर्षी झालेल्या वाख्यांतून जरी तो उठला, तरी पुनः त्याची प्रकृति पहिल्यासारखी कणखर राहिली नाहीं. तेव्हां पुढें राज्याचें काय होणार याची त्यास उत्तरोत्तर फारच काळजी लागली. त्यांतच त्याच्या राण्यांच्या घरगुती भांडणांची व कारस्थानांची भर पडली. रघूजी, प्रतिनिधि, नाईक वगैरे सरदारांचीं भांडणें व राजकारणें सोडवितांना त्याच्या नाकीं नऊ येत. शाहू स्वतः हाताचा सढळ होता. आपल्यावर यत्किंचित् उपकार कोणीं केला किंवा राज्याचें कार्य उरकलें तर त्यास तो इनामें, जाहागिरी, नेमणुका वगैरे भरपूर करून देई. जसें राज्याच्या खर्चांत आपलें स्वतःचें चालतें तसेंच तें इतरांचेंही चालावें, अशी शाहूची मोठी उदार भावना होती. बापानें सर्वांस दुखविलें त्याचा परिणाम सदैव त्याच्या डोळ्यांसमोर असल्यानें, मनुष्य तोडण्यास तो अत्यंत नाखूष असे. देवब्राह्मणांवर शाहूची विशेष निष्ठा होती. जयपुरच्या सवाई जयसिंगास स्वतःच्या धार्मिकतेचा व दानशूरपणाचा अभिमान होता. तेव्हां आपली प्रौढी मिरवण्यासाठीं "आपण देवब्राह्मणांसाठीं काय करतां" असें जयसिंगानें शाहूस विचारलें. त्यास शाहूनें प्रत्युत्तर दिलें कीं, "माझें सर्व राज्यच मी ब्राह्मणांच्या हवालीं केलें आहे, तेथें अन्य देण्यास काय राहिलें?" अशी शाहूसंबंधीं आख्यायिका आहे. या उदारपणाचा असा परिणाम झाला कीं, शाहूचें उत्पन्न त्यास पुरत नसे. त्यांत राण्यांच्या उधळपट्टीची भर पडली. बाबूजी नायकासारख्यांस मदत करण्यांत शाहूस स्वतःस कर्ज झालें. तें कोणत्याही सरदाराकडून फिटेना. त्या वेळीं मराठ्यांचें राज्य राजकीय सत्तेच्या दृष्टीनें वर्धिष्णु होतें, तरी उत्पन्नाच्या दृष्टीनें तो एक आंतबट्ट्याचाच व्यवहार होता. मोठमोठ्या फौजा, बुभुक्षित सावकार व व्यापारी, लोभी सरदार व दरखदार, हे सर्व येणारें उत्पन्न खाऊन टाकीत. त्यामुळें मोहिमांचे खर्च भागवून साताऱ्यास कांहीं पाठविण्याऐवजीं हे सरदार उलट राजधानींतूनच कर्ज मागत. अशा मनाच्या व्यग्रतेंत असतांच अनेक बरोबरीचीं माणसें शाहूच्या डोळ्यांदेखत मरण पावलीं. तेव्हां तर तो विशेष उद्विग्न झाला. त्याची राख विरूबाई, श्रीपतराव प्रतिनिधि, नारो राम मंत्री, जिवाजी

खंडो चिटणीस, ब्रह्मेंद्र स्वामी, गंगाधर स्वामी चाफळकर वगैरे शाहूचे बरोबरीचे नोकरवजा मित्र याच सुमारास दिवंगत झाल्यानें, त्याच्या चित्तास अत्यंत उदासीनता आली. आपला नोकरच काय, गण मदारी हत्ती किंवा खंड्या कुत्रा मेला तरी ती गोष्ट शाहूच्या जिवास फार लागूं लागली. आपलेंही मरण आतां जवळ आलें असें या गोष्टींनीं त्याच्या मनास साहजिकच वाटे.

यजमान छत्रपति अशा उद्विग्न स्थितींत असल्यामुळें नानासाहेबास अनेक भानगडींचे निकाल करणें कठीण पडूं लागलें. राज्यांतील सरदार निरनिराळ्या दिशांनीं ओढाताण करूं लागले, तर तत्काळ निश्चयानें एक हुकूम करून ती ओढाताण थांबविण्याचें मनोबल शाहूच्या ठिकाणीं आधींच फार थोडें होतें. त्यांतून आतां तर या दौर्बल्याची कमाल झाली. म्हणूनच बाजीराव व दाभाडे, रघूजी व नानासाहेब, यांचीं प्रकरणें विकोपास जाऊन एकाच धन्याचे नोकर आपसांत लढूं लागत. अपराध्यांसही कडक शासन करणें शाहूस पसंत नव्हतें. मनुष्य प्राणी जात्याच दुर्बल म्हणून कींव करण्यासारखा आहे असें त्याच्या दयाळू व क्षमाशील अंतःकरणास वाटे. शाहू कोणाच्या चुगल्यांवर विश्वास ठेवणारा नव्हता. एखाद्याबद्दल कोणीं कितीहि वाईट सांगितलें तरी त्याची सत्यता त्यास पटणें दुष्कर होतें. या शाहूच्या मनोदौर्बल्याची ओळख असल्यानें बंडखोर सरदारांसही आपलें कधीं डोचकें उडेल किंवा अन्य नुकसान होईल, अशी दहशत राहिली नाहीं. या प्रकारामुळें कोणत्याही बाबीचा त्वरित योग्य निकाल झाला असें क्वचितच घडे; सर्व गोष्टी दिवसगतीवर जात. अशी दिवसगत लागल्यानें अनेक राजकारणें बिघडत गेलीं. प्रत्येक भानगडीचें कांहींना कांहीं शेपूट मागें राही व त्यामुळें आपसांत कायम द्वेष व वैर मात्र मागें शिल्लक राही. तडजोडीनें गोडी करण्याची हातोटी शाहूंत जी प्रथम होती, ती पण आतां मनाच्या व्यग्रतेमुळें व वयोमानानें सर्वथा लोपून गेली.

पेशव्याचा सर्व अधिकार केवळ शाहूच्या इच्छेवर अवलंबून असल्यानें नानासाहेबास सहजींच दरबारच्या तमाम कारस्थानांवर बारीक लक्ष ठेवणें भाग होतें. राज्याची धुरा आपण वहावयाची तर आधीं आपलें पद सुरक्षित करणें हें पेशव्याचें कर्तव्य झालें. त्या काळीं दळणवळण दुःसाध्य व दिवसगतीचें असल्यामुळें, पेशव्यास सातारा सोडून फार लांब राहाणें शक्य नव्हतें. असल्या काळजींत नानासाहेबाचीं १७४६ व १७४७ हीं दोन वर्षें घरबसल्या फुकट गेलीं, व त्यामुळें मराठशाहीच्या बाहेरच्या उद्योगास उणेपणा आला. ही गोष्ट त्यानें उत्तरेंत रामचं-

द्रबाबास पत्र पाठविलें त्यावरून स्पष्ट कळते. तो लिहितो,"दरबारचा मजकूर विस्तारानें सरदारांस लिहिला आहे त्यावरून कळेल. आमचा गुंता आजपर्यंत दरबारांत व्हावयास कारण, रा. स्वामींचें सरकार कर्जदार झालें; महालचे ( राण्यांचे ) खर्च अनिवार, नित्य कथळे, यास्तव राजश्रींनीं आपले कारभाऱ्यांस ताकीद करून बंदोबस्त करतात. घरच्याच कारभारांत राजश्री स्वामी दंग आहेत. त्यांहीं होऊन आम्हांस निरोप द्यावा तर ते आपल्या कारभारांत निमग्न. आम्हीं विनंति करावी तर त्यांची मर्जी दिक्क पाहून आजपावेतों चर्चा न केली. राहत राहत गोष्ट राहिली. आम्ही निरोपाच्या विचारांत आहों. रा. स्वामींची मर्जी पाहून निरोप घेऊं. परंतु यंदां येणें आमचें तिकडे होतें असा विचार नाहीं. निरोपासच किती दिवस लागतील तें नकळे." "अद्याप कांहीं बोलाचाली नाहीं. सारांश, उभयतां महालचें अतिप्राबल्य झालें आहे. त्याचा विस्तार कोठवरी लिहावा. आम्ही युक्ति करून रेटणें तें रेटतों. कांहीं ऐकावें लागतें. कांहीं करून देतों म्हणतों. या रीतीचा येथील विचार आहे. रा. रघूजी भोसले वऱ्हाडांतून माहूर प्रांतें आले. त्यांच्या चित्तांत आमच्या मुलखांत घांसदाणे घ्यावे ऐसा विचार आहे. जागजागांहून महालकरी यांचीं पत्रें येतात. मशारनिल्हे तों स्नेहयुक्ति भावभक्तीचीं पत्रें पाठवितात. तथापि त्यांचा प्रकार कपटी आहे. तो तुम्हीं जाणतच आहां. आम्हीही कागदोपत्रीं स्नेहयुक्तच लिहित असतों. येथें येणार ऐसेंही वर्तमान आहे," असें दुसऱ्या पत्रांत पेशवा लिहितो. त्यावरून दरबारच्या भानगडींची व नानासाहेबाच्या व्यग्रतेची कल्पना होईल.

बाबूजी नायकास पुढें करून पेशव्यास नामोहरम करण्याचा रघूजी, प्रतिनिधि व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव, सकवारबाई प्रभृतींचा उद्योग सारखा चालूच होता. त्या वेळचे मराठ्यांचे सरदार आपसांतील भांडणांत निजामासारख्या परक्यांची मदत घेण्यास मागें पुढें पहात नसत. उलट मोगलाई टिकवूं इच्छिणारा वृद्ध निजाम शक्य तितक्या मराठ्यांस वाटेल ती लालूच दाखवून आपणांकडे वळविण्यास टपून बसलाच होता. बाबूजी नायकास ज्या उत्तर कर्नाटकाची सुभेदारी मिळाली होती, तो प्रदेश निजामाच्या सहा सुभ्यांपैकीं विजापुरांत मोडत असे. तेव्हां शक्य तर त्या प्रदेशांत मराठ्यांचें पाऊल पडूंच नये असें त्यास वाटत होतें. मराठ्यांचा सुभेदारच अशा प्रकरणांत आपणांस मिळाला तर त्याहून निजामास दुसरें इष्ट काय असणार ! वेगवेगळ्या मराठे सरदारांचीं निजामाशीं काय कारस्थानें चाललीं होतीं तें खुलासेवार समजण्यास आज

साधन नाहीं; कदाचित् निजामाच्या दप्तरांतील फारशी पत्रव्यवहारांत असा पुरावा पुढें मागें सांपडेल. पण आज एखाद्या मराठी पत्रावरूनच त्याचें अनुमान करणें भाग आहे.

पेशव्याच्या मुलखांतून घांसदाणा या नांवाखालीं खंडणी उपटण्याची रघूजीची तयारी वर नानासाहेबाच्या पत्रांत आलीच आहे. वास्तविक ती बाबूजी वरील पेशव्याच्या शहास शह म्हणून होती हें उघड आहे. विरुद्ध पक्षानें पेशव्याबद्दल शाहूचें मन अति कलुषित केलें होतें. नानासाहेब पेशवाई पदावर राहील तर शाहूचे पश्चात् दुसरा कोणीही राजा गादीवर आला, किंवा दुसरी कोणतीही व्यवस्था झाली, तरी पेशव्याचे हातांत सत्ता जाणार, ही गोष्ट सर्वांस उघड दिसत होती. अशा प्रसंगीं सामान्य जनसमूहाचे मनावर विचारापेक्षां विकाराचाच असर जास्त होत असतो. हा प्रश्न हुशारीचा किंवा कर्तबगारीचा नव्हता. सर्व सरदार व प्रधान मंडळी शाहूच्या आज्ञेंत वागण्यास तत्पर होती, परंतु ती आज्ञाधारकता त्यांनीं पंचवीस वर्षांच्या पोरास काय म्हणून दाखवावी ! आजपर्यंत पेशव्यांशीं विरोध करीत आल्यामुळें, पेशव्याकडेच सगळी सत्ता आली म्हणजे तो आपली वाट लावल्याशिवाय राहणार नाहीं, अशी भीति राण्यांच्या व इतर मंडळींच्या मनांत निःसंशय वागत होती. या भीतीचा निरास करण्याची पहिली युक्ति म्हणजे पेशव्यास भिकारी करून सोडणें असें या मंडळीस वाटलें. शाहू कर्जाच्या पेंचांत होता. बाबूजी नायकास दिलेले पैसे परत येतील अशी आशा राहिली नाहीं. खर्च मोठा. पेशव्यानें उत्तरेंत चांगला धनसंचय केला आहे पण शाहूस पकडींत धरण्यासाठीं तो पैसा देत नाहीं, अशी सर्वांची समजूत होती. याच वेळीं बाबूजी नाईक याचें प्रकरण हातघाईवर आलेलें होतें. कर्नाटकांतील संभाजीच्या कक्षेंतील प्रदेशाची खंडणी वसूल करण्याचें काम नानासाहेबानें कोल्हापुरशीं संधान जोडून आपणांकडे घेतलें. अर्थात् नाईक तिकडे जाऊं म्हणेल तर त्यास हा शह आयताच होता. नायकास स्वतःच्या बळावर स्वारी करण्याची ऐपत नव्हती, व दुसऱ्यास सुभेदारी देण्यास तर तो नाखूष होता. शाहूनें निक्षून सांगून त्याची सुभेदारी काढावी तर त्यास शाहूची मनोवृत्ति आड येई. राज्याचें काम व व्यक्तीच्या हक्काचें संरक्षण यांचा शाहूच्या मनांत नेहमींच गोंधळ माजे. काम न रेटणाऱ्या नोकरास कामावरून काढणें हें राजाचें आद्य कर्तव्य होय. पण एखादी नोकरीची जागा म्हणजे ती एकदां नेमलेल्या व्यक्तीची, असें शाहूस वाटे. तशांत शाहूच्या वडील राणीनें नायकास मागील स्वारीच्या वेळीं कर्ज दिलें होतें तें

परत यावयास पाहिजे तर पुनः माझें साहित्य करून मला कर्नाटकांत पाठवा, असें नायकाचें म्हणणें पडलें. तें कबूल करावें असा तिचा आग्रह होता. दुसरी राणी सगुणाबाई, ही रघूजीच्या बायकोची बहिण असून त्या बहिणीचा मुलगा मुधोजी यास शाहूनें दत्तक घ्यावें असें तिचें कारस्थान चालू होतें. अर्थात् त्यास पोषक असे जे रघूजीचे बाबूजी प्रभृति स्नेही होते त्यांच्या विरुद्ध जाणें तिला शक्य नव्हतें. कारण पेशवा रघूजीच्या मुलाच्या विरुद्ध राहणार हें तिला कळत होतें. कर्नाटक प्रकरणीं शाहूचा निश्चय होत नाहीं असें नानासाहेबानें पाहिलें तेव्हां स्वतःच्या जबाबदारीवर तिकडे स्वारी करून कर्नाटक राखण्याचा त्यानें विचार केला. हा प्रांत आपल्या अंमलाखालीं आणण्याचा या वेळीं निजामाचा विचार चालला होता. संस्थानिक स्वतंत्र होण्याच्या बेतांत होते. याच वेळीं गोव्याच्या हद्दीवर पोर्तुगीझांनीं मराठ्यांविरुद्ध उचल केली होती. सोंधें, बिदनूर वगैरे संस्थानिकांस त्यांची मदत होती. त्यांनीं सावंतवाडीकरांच्या मुलखावर हल्ला करून त्यांचीं ठाणीं घेतलीं. वेळींच तिकडे मोठें सैन्य न गेलें, तर मराठ्यांचा त्या प्रांतांतील अंमल पार उडाला असता. नानासाहेबानें तिकडे सदाशिवरावास पाठविण्याचें ठरविलें. हें नायकानें पाहिलें तेव्हां त्याची फारच गाळण उडाली. सुभा हातचा जातो हें त्यानें पाहिलें तेव्हां, नानासाहेब रामचंद्रबाबास कळवतो, "दर्शनास बाबूजी नाईक आले. भेटी झाली. संभाजी महाराजांचे सोंधें, बिदनूर इत्यादि तालुक्यांस उपद्रव न द्यावा येविशीं नाइकांनीं संभाजी महाराजांचे गळ्यावर हात ठेविला. संभाजी महाराज पांच सहा महिने अडले होते. स्वामींनीं आम्हांस जामीन व्हावयास आज्ञा केली. आम्हीं झालों. नाइकांनीं येथील ताळतंत्र आठ रोज पाहिलें. उपरांतिक स्वामींच्या दारीं बसून उपोषणें करतात. धाकटी बाई रदबदल करितात. उपास केल्यामुळें स्वामी सक्रोध झाले. मशारनिल्हेची अब्रू राहिली नाहीं. त्यांचे मध्यस्तांस वारंवार शिरपांव होत गेला, व अद्यापि होतात. राजश्रींची मर्जी फारच कूट आहे. नाईक प्राक्तनवान् साहसी आहेत, ईश्वरें काय परिणाम नेमिला असेल न कळे." नानासाहेबाच्या या लिहिण्यावरून नायकाची तारांबळ व आततार्इपणा नजरेस येतो. ता. १ दिसेंबर १७४६ रोजीं पेशव्यानें पिलाजी जाधवास पत्र लिहिलें त्यांत या सदाशिवरावभाऊच्या पहिल्या स्वारीचा उद्देश स्पष्ट लिहिला आहे, तें पत्र येणेंप्रमाणें—"रा. संभाजी महाराजांचा तालुका सोंधें व बिदनूर व सावनूर, बंकापूर हीं संस्थानें स्वामीनें आमच्या स्वाधीन केलीं. तिकडे रा. बाबूजी नाईक

यांनीं तालुक्यांत न जावें ऐसा करार केला आहे. त्यास सदरहू तालुक्यांचा पैका आला पाहिजे. विना फौज सुप्रयुक्तीनें हे लोक पैका देतील न देतील हा अर्थ तुम्हांस न कळेसा नाहीं. यास्तव तिकडे फौज गेली पाहिजे. दुसरें, सावंतांशीं फिरंग्यांनीं कलह मांडला आहे. सावंतांचीं दोन तीन ठाणीं फिरंग्यानें घेतलीं. सावंत पहिल्यासून पदरचे. त्यांणीं चाकरी केली. त्यांचें साहित्य करावें जरूर आहे. यास्तव फौज रवाना करावयाची तजवीज केली आहे. चिरंजीव राजश्री सदोबा यास निरोप देऊन त्या प्रांतें रवाना करावें ऐसा विचार केला. दोचौं रोजांत राजश्री स्वामींचा निरोप होईल. चिरंजीव कधीं स्वारीस गेले नाहींत. यास्तव तुम्हांस जावें लागेल. तुम्हांविना दुसरें कोणीं जावें ! तुम्हीं यांजबरोबर असलिया आम्हीं निश्चित असों. फौजेसह तुम्हीं व त्यांनीं नरसिंहसरस्वती या जागां जावें. दोचहूं संस्थानचा निर्गम करून घेणें तो घ्यावा. तिकडे सांवंतावर फिरंगियानें हाट केली तरी तिकडे दोन हजार फौज पाठविणें तिकडे पाठवून, त्याचेंही साहित्य करावें. सारांश, तुम्हांबरोबर पथकें आहेत, तीं वसईस पाठवावीं. तुम्हीं आपले समस्त पथकांनिशीं सिद्ध असणें. चिरंजिवास रा. स्वामींचा निरोप होतांच तुम्हांस लेहून पाठवूं. ते समयीं तुम्हीं स्वार होऊन अतिसत्वर येणें. जाणिजे.'' या पत्रांत लिहिल्याप्रमाणें शाहूची परवानगी या स्वारीस होती कीं नाहीं कळत नाहीं, पण बहुधा मौनपणाची संमति असावी. शाहू या वेळीं नानासाहेबाच्या हेतूसंबंधीं साशंक हाता. शाहूच्या पूर्ण मनाप्रमाणें वागावयाचें म्हणजे नायकास फुकट मदत करून त्याच्यासाठीं कर्नाटकचा वसूल करून देणें व त्या पैशांत शाहूचें कर्ज वारणें. पण स्वतःची फौज पाठवावयाची तर आपल्याविरुद्ध असलेल्या नायकाचें कर्ज नानासाहेबानें काय म्हणून फेडून द्यावें ! त्यानें खुशाल शाहूच्या दाराशीं उपास करून आपल्या कर्जाची माफी मिळवावी ! शाहूनें अशी माफीही दिली असती, पण त्यास स्वतःसच इतकें कर्ज झालें होतें कीं, महालचे खर्च चालणेंही कठीण झालें होतें. नानासाहेबानें वरील पत्रांनंतर पिलाजी जाधवास कर्नाटकांत पाठविण्याचा आपला बेत रद्द केला. कारण पोर्तुगीजांनीं सांवंतावर जोर केला तेव्हां त्यांस तावडतोब शह मिळावा म्हणून पिलाजीनें उत्तर कोकणांत राहून तिकडेच पोर्तुगीजांस डांबून ठेवावें, म्हणजे तिकडून गोव्यास मदत होऊं शकणार नाहीं, असें पेशव्यानें ठरविलें.

ता. २१ फेब्रुवारी १७४७ रोजीं पेशव्यानें उत्तरेस रामचंद्रबाबास पत्र लिहिलें. त्यांत या स्वारीची पुढील हकीकत येते. "बाबूजी नाईक यांनीं कर्नाटक प्रांतीं न

जावें, गेले तरी धुडावून काढावे, याजकरितां चिरंजीवाची रवानगी कर्नाटक प्रांतीं केली. प्रस्तुत नाईक यांनीं राजश्री स्वामींस दोन लाख रुपये रोख द्यावे ऐसें केलें होतें, ते रोख निशा केली. बाकी राहिले ऐवजाचे हप्ते करून याद रा. येसाजी भोसले याजपाशीं दिली; व बेदनूरचा साडेतीन लक्षांचा कतबा होता, तो मशार-निल्हेजवळ देऊन निरोप घेऊन गेले. पुढें नबाबास भेटून नबाब म्हणतील तें द्यावें आणि तेवढ्यावरी ठाकुरकी वाढवून कर्नाटक प्रांतीं जावें ऐसें आहे. नबाबाचा विचार पाहतां दोनी दगडींवर हात आहेत. नाइकाची प्रतीक्षा करीत आहेत; व आमची फौज सोंधें बिदनूर प्रांतीं गेली आहे त्यांसही पैका न मिळावा याही उद्योगांत आहेत. श्री इच्छेनें इतक्याही गोष्टींचें निराकरण होऊन उत्तमच होईल. कांहीं फिकीर आहे ऐसें नाहीं. मनसब्याचे मजकूर किरकोळ फार आहेत. पत्रीं काय लिहावे, दर्शनोत्तर कळतील." पुढील पत्रांत "चिरंजीव भाऊ निरोप घेऊन गेल्यावर कित्तुर ठाणें नारायणराव घोरपड्यांचें गेलें होतें, तें घेऊन दिलें. पुढें मजल दर मजल सोंधियाचें लगत्यांत गेले आहेत. सावनूरकरांचा तह रद्द होणें तो होत आहे. सोंधेकरी यांची रदबदल लागली आहे. बिदनुरास वकील गेले आहेत. फिरंगियावर दबाव असे. जयराम सांवंत येऊन भेटले आहेत. तेही आपले साहित्याच्या गोष्टी बोलतात कीं, रेडी वगैरे फिरंगियानें घेतले आहेत त्यांस तंबी पोहोंचावून द्यावी, आपली स्थापना करावी. फिरंगी आपली बोली बोलतात कीं, सांवंत आम्ही समजोन घेऊं, तुम्हीं त्यांचा पक्ष न धरावा. या प्रकारचें वर्तमान आहे. पहातां अर्थी फिरंगी बेइमान, त्यांचें पारिपत्य करावें, तरी ये समयीं बनत नाहीं. दोनही अलग अलग राखिले आहेत. कांकीं सावनूरचा दार मदार करणें तो करून घेऊन, सोंधेकरांचीही मामलियत चुकवून बिदनूरकरांकडे जावें, तेथील मामलियत विल्हेस लावून खबरदार होऊन राखावें. सारे पठाण एकवट करावे, नाईक आले तरी त्यांस धुडवून द्यावें, ऐसा विचार असे." असें पेशवा कळवितो. यावरून तिकडील भानगडींची चांगली कल्पना होते. नायकाचें निजाम, साव-नूरकर नबाब वगैरेंशीं चाललेलें सूत मोडून काढून, सर्वांवर मराठ्यांचा दरारा राखणें हें पेशव्याच्या स्वारीचें मुख्य कार्य. तें तात्पुरतें सदाशिवरावानें या स्वारींत पुरें केलें. सावनूरकरानें आपला उत्तरेकडील प्रदेशावरचा हक्क सोडून दिला. याचा अर्थ सर्व प्रदेश मराठ्यांनीं या वेळीं ताब्यांत घेतला असा नव्हे, तर त्या त्या प्रांतांतील देसायांस सावनूरकराचे ताब्यांतून त्यांनीं सोडविलें. त्यांनीं नबाबास खंडणी देण्याची जरूर राहिली नाहीं. सावनूरकराचे बिदनूर,

सोंधें या संस्थानांवरील हक्कही रद्द करून त्यांस मराठ्यांचे अंकित करण्यांत आलें. या स्वारींत पेशव्यास पैशाची फारशी प्राप्ति झाली नाहीं. सैन्य घर बसलें रहावयाचें तें कामावर राहून सदाशिवराव भाऊस स्वारीचा अनुभव मिळाला एवढेंच या स्वारीचें फल. सदाशिवरावाचें वय या वेळीं केवळ सतरा वर्षांचें असून त्याच्यावरोबर कारभार करण्यास महादजीपंत पुरंदरे व त्याचा हुशार कारकून सखारामबापू बोकील हे इसम दिलेले होते.

सदाशिवरावाची ही स्वारी चालू असतांच नानासाहेबाविरुद्ध साताऱ्यास चाललेल्या कारस्थानांस ऊत आला. शाहूच्या दोन राण्यांत चुरस चालूच होती. प्रत्येकीला वेगवेगळा सरंजाम व स्वतंत्र कारभार, पाहिजे होता. एकीस कांहीं जास्त मिळालें तर तावडतोब दुसरीनें रागवावें. शहरांतील फिर्यादी वगैरे मनसुबे तोडणें हें राण्यांचें काम नसतांही या राण्या आपल्या नोकरांमार्फत असल्या उठाठेवी करूं लागल्या. बाहेर गांवचीं वतनें विकत घेऊन तिकडे सावकारीचा व्यवहारही या बाया करीत. त्यामुळें अनेक तक्रारी अधिकाऱ्यांकडून शाहूकडे येऊं लागल्या. त्यांनीं शाहूचें डोकें भणाणून गेलें. याच वेळीं शाहूच्या सावकारांनीं व जिन्नस पुरवणाऱ्या व्यापाऱ्यांनीं गिल्ला केला. त्यांतच नानासाहेबाचा हेतु कर्नाटकच्या स्वारीवर जाऊन बाबूजी नायकास पीडण्याचा आहे अशी वार्ता शाहूच्या कानीं आली. तेव्हां पेशव्यास अधिकारावरून दूर केलें तर तो नरम येऊन शाहूस नजराणाही मिळेल असें जवळच्या कोणीं त्यास सुचविलें असावें. या सर्वांचा परिणाम असा झाला, कीं नानासाहेब साताऱ्याजवळ छावणी करून असतां "शाहूनें चिटणीस यांस बोलावून आज्ञा केली कीं, प्रधान यांस चिठ्ठी लिहावी जे, 'तुमचें प्रधानपद दूर केलें आहे, तरी शिक्के कट्यार व जरीपटका हुजरे पाठविले यांजबरोबर जामदारखान्यांत दाखल करणें.'" प्रधानपंतांनीं चिठ्ठी वाचून, तसेच उठोन शिक्केकटार व जरीपटका हुजरे यांचे स्वाधीन करून रवाना केले, आणि लष्करापासून दूर एक राहुटी देऊन स्वयंपाक करविला. नंतर महाराजांस चिठ्ठी लिहिली कीं, 'सरकारी कारखाना व फौज सरकारची आहे. ती कोणाचे हवालीं करावी तें लिहून यावें, त्याप्रमाणें करून पायांपाशीं दर्शनास येतों.' त्यावर शाहूनें जवाब पाठविला कीं, 'सरकारकून पाठवितों तोंपर्यंत तेथेंच राहवें.' याप्रमाणें आठदहा दिवस गुदरले. मुत्सद्दी मंडळींनीं महाराजांस विचारलें, 'पुढें विचार काय ? हिंदुस्थान प्रांतीं हे बातमी गेली व जाईल. चहूंकडे सरदार पेशव्यांचे विद्यमानें आहेत त्यांत वखेडे होतील. यास्तव

यांजवर कृपा करणें किंवा दुसऱ्यास पद सांगून आधीं बंदोबस्त व्हावा.' इकडे नानासाहेबानें चिटणीस व मन्त्री यांजपासोन महाराजांस विनंति करविली कीं, 'आम्हीं एका राहुटीनें बाहेर राहिलों, चरणांपाशीं येण्याची आज्ञा व्हावी, किंवा दुसरी सेवा कांहीं सांगावी.' तेव्हां उत्तर आलें कीं, ' नजर काय देतां बोलावें.' त्यावर सांगून पाठविलें जे, ' आम्हीं एकटे येथें आहों, सलतनत सरकारची सरकारांत आली. घर व सर्व जें आहे तें सरकारांत नजर आहे, आणवावें.' याजवर 'प्रधानपद दुसरीकडे सांगायचें ' इतकेंच महाराजांनीं उत्तर केलें."

याप्रमाणें स. १७४७ च्या आरंभीं नानासाहेब तात्पुरता अधिकारभ्रष्ट होऊन काळजी करीत स्वस्थ वसला होता. ही अधिकारभ्रष्टता किती दिवस होती हें नमूद नाहीं, पण निदान दोन महिने ह्या प्रकरणांत गेले असावे. विरुद्ध पक्षाची अटकळ पेशवा भरपूर नजराणा भरून पदप्राप्तीसाठीं गयांवयां करील अशी होती, ती साफ खोटी ठरली. तसेंच पेशव्याच्या द्रव्यसंचयाचाहि भोंपळा फुटला. शाहूची आज्ञा मान्य न करितां पेशवा बंडावा पुकारून स्वतंत्र होण्याची खटपट करील अशी कित्येकांची समजूत असल्यास तीही खोटी ठरली. त्या वेळच्या सरदारांपैकीं कितीजण पेशव्याप्रमाणें तावडतोब जवळचें सैन्य हुजरातीचें समजून हुजूरच्या स्वाधीन जसेंच्या तसें करण्यास तयार झाले असते, ह्याबद्दल अनुमानावर स्वस्थ वसणें भाग आहे. परंतु बऱ्याच जणांनीं बऱ्या बोलानें अधिकारन्यास केला असता असें खास वाटत नाहीं. परंतु नानासाहेब पुरा धोरणी होता. शाहूचा स्वभाव व दरबारची परिस्थिति त्यास पूर्णपणें कळत असून कसें वागल्यानें त्याची मर्जी राखतां येईल याचीही त्यास जाणीव होती. म्हणून त्यानें अगदीं पडतें घेऊन नम्रभावानें उद्योग चालविला. दोन महिने या भलत्याच विवंचनेंत गेले तरी शाहूचा निश्चय होईना, तेव्हां त्यानें निर्वाणींचा म्हणून पुढील खलिता महाराजांस सादर करण्यासाठीं चिटणिसाकडे पाठविला. तो असा—"आशीर्वाद उपरी, रात्रीं राजश्री स्वामींची गांठ पडली नाहीं म्हणून लिहिलें, ऐशास ईश्वरी इच्छेस तुमचा इलाज काय ? या उपरी तरी खामखाय गांठ दुपारीं घालून येणेंप्रमाणें ( महाराजांस ) विनंती करणें:—

कलम १—दोनही महालांतील गुंते फार करून दूर केले. रोज नवे निघतात त्यांस मात्र आमचा इलाज नाहीं. सांप्रत महालांतील गुंता नाहीं. मोघम बोलले चालले असतील, वारूं. महाराजांचे कर्जाचे मजकुराचा गुंता तो, महाराज सर्व विचार ध्यानांत आणून आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक, जेथें असूं तेथें करूं.

हुजूर असल्यास आज्ञा मान्य करूं, बाहेर गेल्यास न करूं ही सबब होणार नाहीं. परंतु निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे. सांप्रत मनसबा होऊन खचित जहाला आहे. मनसब्याचा कळस रक्षण करावयाचे दिवस थोडे असतात. यास्तव दोन्ही वाब्यांत समजून सेवकास निरोप द्यावा. एक दोन दिवसांत हा अर्थ उत्तम. असें महाराजांनीं कृपा करून करावें.

क. २—महाराजांचे कर्जाचा उरक करावा तेव्हांच जावें ऐशीच मर्जी असली तर पुण्यास न जातांच, इकडून फिरून सेवेशीं येऊं. सावकाशीनें महाराज कृपा करून पुण्यास व वसईस जावयास आज्ञा देतील तेव्हां जाऊं. या मनसब्याचा डौल पंधरा दिवसां अलीकडे आहे. तेव्हां मालकास ऐसा गुंता काढल्यानें मनसबा नासतो. ये समयीं महिना दोन महिन्यांचा निरोप द्यावा. फिरोन सावकाशीनें सुमुहूर्त महाराजांनीं देणें तर द्यावा.

क. ३—नायकाशीं कब्जा करावयासी जातां ऐसा संदेह जनवार्तेवरून मनांत वाटला असला, तर त्याविशीं निशा करून घ्यावी. जो तालुका महाराजांनीं नायकास करार केला त्यांत त्यांनीं जावें. कब्जा करावा हे गोष्ट महाराजांचे हुकमावांचून सहसा होणार नाहीं.

क. ४—चिरंजीव भाऊ तिकडे गेले आहेत. नवाब (निजाम) ही तिकडे गेले म्हणजे गोव्याच्या शहास अंतर होऊन, आणखी किरकोळ गुंते तसेच अडकून पडतील. तेव्हां त्याचा लौकीक एक प्रकारें होऊन येईल, हा अर्थ महाराजांनीं ध्यानांत आणावा. सरकारांत भर करूं द्यावा तो उगवला (=वसूल केला) पाहिजे. सर्वांही गोष्टींत आम्हांवर तोटा पडे असें करावें कीं काय ? निदान येथून दों मजलीवर जाण्यास आज्ञा करावी. सर्व फौज व पिलाजी जाधव यांस चिरंजिवाकडे रवाना करितों आणि सेवेशीं फिरोन येतों.

क. ५—महाराज निरोप देतात हा लौकीक जनांत जाहला. नवाबापावेतों बातमी जाईल. फिरोन दिल्हें हेंही वर्तमान जाईल, तेव्हां सर्व प्रकारें आम्ही इतराजींत हा लौकीक जाहला आहे व बाकी राहिला आहे हाही होईल.

इतके प्रकार निखालसतेनें विनंति केली असतां ( ही ) महाराज ध्यानांत न आणीत तर ईश्वरें या दौलतीवर ( राज्यावर ) इतराजी केली अशी जाणावी.

मग बाहेरीलही इज्जतीचा दरकार सोडून बसूं. सर्व मजकूर, वरल्याप्रमाणें विनंति करून, उत्तर घेऊन येणें. *

या अत्यंत महत्वाच्या पत्रावरून नानासाहेबाची बाजू उत्तम समजते. आपण आज्ञा मानण्यास तर तयार, पण धन्यानेंही 'निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे.' परिस्थिति न जाणतां धन्यानें आज्ञा केली तर ती चाकरानें कशी पाळावयाची ? आपणाजवळ पैसा नाहीं, मग शाहूनें आज्ञा केली म्हणजे काय पैशाचा झरा लागतो असें थोडेंच आहे. मुलुखगिरीस परवानगी दिली तर मिळेल त्याप्रमाणें देण्याचा प्रयत्न करूं. पण सैन्य जागेवर बसवून ठेवलें तर पैसा कोठून मिळणार ? नायकाशीं कारणावांचून तंटा करण्याची आपली इच्छा नाहीं, पण निजाम मध्यें यावयास लागला तर राज्याची जोखीम घेणारास स्वस्थ कसें बसतां येईल ? तसेंच चुगलखोरांवर विश्वास ठेवून मुख्य प्रधानास बडतर्फ करावें अशी जेथील राज्यनीति तेथें प्रधानानें कारभार तरी कसा चालवावा ? तेव्हां वेळींच चुकीची दुरुस्ती शाहूनें केली तर उत्तम, नाहीं तर या चुकीमुळें दौलतीवरच घाला येईल. मग आपणांस अन्नासाठीं गप्प बसण्याचीही जरूरी राहणार नाहीं असा पेशव्यानें स्पष्ट इषारा वरील कागदांत शाहूस दिला आहे.

---

* या वेळच्या खटपटींसंबंधानें आणखी त्रुटित पत्र नुकतेंच मिळालें तें एप्रिल स. १७४७ चें आहे. त्यांत नानासाहेब धाकट्या राणीकडे व गोविंदराव चिटणीसाकडे अंतस्थ रीतीनें या वेळीं कशी खटपट करीत होता, त्याचा खुलासा आहे. साताऱ्याहून हें पत्र महादोबा पुरंदऱ्यानें नानासाहेबास लिहिलेलें दिसतें.
"पु॥ सेवेशीं विज्ञापना. आजी शनिवार प्रातःकाळीं दरबारास गेलों होतों. राजश्रींचा मुजरा जाहाला. दरबार भरला होता. चार घटका दरबार जाहला. तदोत्तर राजश्री स्नानास गेले. मी धाकटे बाईकडे मुजऱ्यास गेलों. दहापांच जण बाईजवळ बसले होते. त्यांस बाईनीं सर्वांस उठोन जा म्हणून आज्ञा केली. सारे उठोन गेले. मला व मुक्तानंद यास बसा म्हणाली. तदोत्तर आज्ञा केली कीं, नानाला राजश्रींची मर्जी राखणें आहे कीं नाहीं. महाराज अतिशय रात्रौ रागें नानावर भरले; व त्रिवर्ग राऊ मशारनिल्हे यांजवरही भरले. त्यावरून बाई म्हणाली कीं, म्यां महाराजांस अर्ज केला कीं, आपण उगीच रागें भरूं नये. विचारें करून नानास आज्ञा केली तर साहेबांचे सेवेशी हजीर आहेत. साहेबीं दुसरा विचार न आणावा. नानाची एकनिष्ठता साहेबांचे पायांशीं फार आहे.

 ३०९८५१

या वेळीं पेशव्याची व शाहूची भेट होत नव्हती. सर्व बोलणें गोविंदराव चिट-णिसामार्फत चालत असे. शाहूच्या कर्जाची फेड सवडीनुसार आपण करूं म्हणून पेशवा सांगतो, पण त्या केवळ तोंडच्या गप्पा, पोकळ वायदे करून पेशवा वेळ मारून नेतो इतकेंच, असें शाहूस राण्यांचें म्हणणें होतें. तसेंच तुमच्या डोळ्यां देखत तो बाबूजी नायकास छळतो, तर सर्वाधिकार दिल्यास पुढें काय करणार नाहीं असेंही चुगलखोरांनीं त्यास भासविलें असावें. शाहूचें मन या परस्परविरोधी काहुरांमुळें गोंधळून जाऊन त्याचा निश्चय होईना. वास्तविक सदाशिवराव भाऊस कर्नाटकांत पाठविण्याचा हेतु शाहूच्या कर्जफेडीसाठीं पैसा गोळा करण्याचाच होता. याच-साठीं नानासाहेबानें उत्तरेंत रजपुतांशीं संधान जोडून पैसा पाठविण्यासाठीं शिंदेहोळकरांस आंच लावली होती. पण सैन्यखर्च भागून पैसा उरत नसे. वरील पत्र पाठवूनही शाहू निकाल करीना, तेव्हां ता. २० मार्च १७४७ रोजीं

---

तेव्हां राजश्रींनीं बाईशीं उत्तर दिलें कीं, ' मी नानाजवळ एक तिरुका मागेन तर बाळकृष्णाची मला आण, व तुमच्या गळ्याची आण. मला पुरे जाहलें. नानाला म्यां कागद लिहिला, त्याचें उत्तर " तिघांजवळ बोललों आहेंच " असें लिहितो. तस्मात् माझा चाकर नाना नव्हे. या त्रिवर्गांचा चाकर नाना. असो. मला कांहींच मागणें नाहीं. नाना माझा माझा मी म्हणत होतों, त्याची गत ही जाहली. त्रिव-र्गांनीं जी केली ती बरीच केली. त्यांहींमध्यें गोविंदरायाचा उपकार तो मजवर फारच आहे. मला गोविंदरायानें करंगळीवर खेळवून असा परिणाम केला. असो. मी तिघांच्या पायांवर डोकी ठेवितों. ऐसें फार फार रागास येऊन गोष्टी बोलले.' बाई म्हणाली कीं, म्यां फार गोष्टी सांगितल्या. विचारें करून गोष्ट सांगा, मी नानास सांगोन ऐकवितें. तेव्हां मागती महाराज बाईशीं बोलले कीं " तुम्हीं तोंडघशीं पडाल. ते तुम्हांस पाडितील, तुम्ही मूर्ख आहां, तुम्हांस कळत नाहीं. नाना कांहीं ऐकतो असें नाहीं." ऐसे बोलल्याचा विचार तुम्ही काय करितां ? खावंदाला खट्टे केल्यांत जीव नाहीं. देणें तें द्यालच, परंतु नासवूं नका. तेव्हां म्यां बाईसाहेबांस अर्ज केला कीं, महाराज जर विचारेंकरून आज्ञा करितील तर प्रधानपंतांस लेहून पाठवूं. साहेबांचे आज्ञेशिवाय काय आहे ? व नानाचें पत्रही महाराजांस असेंच आलें आहे. आपणच विचारें करोन आज्ञा करणें ते करावी. आज्ञेशिवाय नाना नाहींत. तेव्हां मागती बाईनीं आशंका हे पुसिली कीं, कदाचित् महाराजांचे मर्जी पाहून म्यां अर्ज केला तर नाना ऐकतील ? गोविंदराव व तुम्ही"..........

नानासाहेब वडुथाहून कुच करून वुधास आला व त्यानें पिलाजी जाधवास तेथें बोलाविलें. आपला निरोप मिळाल्याखेरीजच नानासाहेब बाहेर पडतो हें जेव्हां शाहूनें पाहिलें तेव्हां रुसून हा भलतेंच कांहीं करील अशी त्यास भीति वाटली व परिणामीं याच्यावांचून राज्यधुरा वाहणारा दुसरा लायख इसम नाहीं, टीका करावयास मात्र सगळेजण आहेत हें उमजून त्यानें पेशव्यास मागें बोलावलें व पुनः अधिकाराचीं वस्त्रें दिलीं, हत्ती दिला व स्वारीवर जाण्यास निरोप दिला. 'श्रीकृपेनें उत्तम प्रकारें रंग उतरला' असं पेशव्यानें ता. १५ एप्रील रोजीं पिलाजीस कळविलें. याच सुमारास सदाशिवराव कर्नाटकच्या स्वारींतून परत आला व नंतरच्या कागदांतून कर्जाचा उल्लेख नाहीं. त्यावरून नानासाहेबानें शाहूच्या कर्जाचा निकाल केला असला पाहिजे असें मानतां येतें.

नानासाहेब साताऱ्याहून पंढरपुरास जाऊन परत येतांना ता. ९ मे रोजीं जेजुरी येथें सदाशिवरावास भेटला व दोघेजण २४ मे रोजीं पुण्यास दाखल झाले. अधिकारभ्रष्टतेच्या या प्रकरणांत पेशव्याचे बरेच दिवस वांया गेले, पण एका अर्थी हालवून खुंटी घट्ट केल्यासारखें झालें. याउप्पर पेशव्यावर शाहूनें सर्वस्वी भार घातला व जनवार्तेनें त्याचें मन कधीं कधीं दुर्बळतेमुळें साशंक होई तरी राज्याचा सर्वाधिकार पेशव्याकडेच येणार ही गोष्ट या प्रसंगानें निश्चित झाली.

---

## प्रकरण ७ वें.

# शिंदेहोळकरांचा बेबनाव.

मागील प्रकरणांत सांगितलेलीं साताऱ्यांतील कारस्थानें चालू असतांना उत्तरेस पेशव्याच्या सरदारांनीं रजपुतांच्या भांडणांत मन घातलें. राणोजी शिंदे मरून त्याचा वडील पुत्र जयाप्पा शिंद्यांचे सरदारीवर दाखल झाला. त्याचा कारभार रामचंद्रपंतबाबा करीत असे. हा अत्यंत हुशार गृहस्थ नानासाहेबाच्या मर्जीतला असून उत्तरेंतील प्रकरणीं त्याचा बाबाशींच बराचसा पत्रव्यवहार होई. शिंदे, होळकर व पवार हे तीन पेशव्याचे माळव्यांतील सरदार; पेशव्याच्या सैन्यापैकीं निंमें सैन्य या सरदारांचें होतें. उत्तरेंतील स्वाऱ्या बहुतेक त्यांच्याच कडून होत. तसेंच मोठें कार्य असल्याशिवाय पेशवा स्वतः उत्तरेंत जात नसे. नानासाहेबानें आपल्या मनांत यावेळीं तिकडील कामाच्या क्षेत्राची वांटणी केलेली असावी.

दक्षिणेंतील कारभार प्रत्यक्ष आपल्या हातांत ठेवून उत्तरेंतील त्यानें बहुतेक शिंदे होळकरांकडे सोंपविला होता. हे दोन सरदार एकमतानें वागते तर तिकडील कारभार त्यांस झेंपण्यासारखा होता. पण मराठ्यांच्या दुर्दैवानें राणोजीच्या मृत्यू-नंतर कोणत्याना कोणत्या कारणानें या मराठशाहीच्या केवळ आधारस्तंभरूप सरदारांत बेदिली उत्पन्न झाली. त्यामुळें मराठ्यांच्या वाढत्या आकांक्षेस मोठाच धक्का बसला.

सन १७४३ सालीं जयपूरचा विद्याभिलाषी व शहाणा राजा सवाई जयसिंग मरण पावला. त्याच्या हिंदुत्वाच्या अभिमानामुळें बाजीरावानें उत्तरेंत भरारी मारली तेव्हांपासून त्याचा मराठ्यांकडे ओढा होता. जयपूरचें राज्य दिल्लीच्या लगत्यास दक्षिणेस असल्यानें बादशाहाशीं प्रत्यक्ष बंडखोरी करून जयपूरचें चाल-ण्यासारखें नव्हतें. कारण हा वेळपर्यंत बादशाही अंमल त्याप्रदेशापुरता बराच कायम होता. परंतु दिल्लीचा शुद्ध मुसलमानी पक्ष बळावूं न देण्या इतका आपला दाब दिल्ली दरबारांत राहावा अशी जयसिंगाची खटपट असे. माळव्याचा सुभा बहुधा जयपूरकरांकडे असे, तो त्यांच्याकडून काढून निजामानें आपल्याकडे घेतला. तेव्हां साहजिकच जयसिंगास वैषम्य वाटलें, आणि त्याच्याच मूक संम-तीनें व प्रोत्साहनानें बाजीरावानें माळव्यावर स्वाऱ्या सुरू केल्या. जयसिंगाशीं ऋणा-नुबंध असणारे माळव्यांतील स्थानिक अंमलदार बहुतेक रजपूत होते, ते बाजी-रावाशीं संधान राखून असत. मराठ्यांच्या बाजूनें दिल्लीच्या दरबारांत चार शब्द बोलणारा एकटा जयसिंगच असे. अशी आख्यायिका आहे कीं, बाळाजी विश्वनाथाची बायको राधाबाई त्या बाजूस गेली होती तेव्हां जयसिंगानें आपली मुलगी तिच्या मांडीवर दिली. राधाबाईनें त्या प्रसंगीं वचन दिलें कीं, माझ्या वंशांतील कोणी जयपूरच्या राज्याकडे वांकड्या नजरेनें पाहणार नाहीं. या गोष्टीच्या स्मरणार्थ जयपूरकर पन्नास हजार रुपये ‘ बाईची भेट ’ या नांवानें पेशव्यास देत. बाजी-राव मेवाड व मारवाड या राज्यांकडून चौथाई वसूल करी, तरी जयपूरकरांस तो उपसर्ग पोंचवीत नसे.

जयसिंगास दोन मुलगे होते, वडील ईश्वरसिंग व धाकटा माधवसिंग. माधव-सिंग मेवाडच्या राजकन्येच्या पोटचा होता. राजपुतान्यांत त्या वेळीं असा प्रघात असे कीं, मेवाडच्या राजकन्येचा मुलगा धाकटा असला तरी तोच राज्याचा वारस व्हावयाचा. हें पुढील संकट ठाऊक असल्यामुळें जयसिंगानें जिवंत अस-तांच मेवाडच्या राण्याशीं ठराव करून माधवसिंगानें जयपूरचा वारसा सोडून

रामपुरा परगण्याची जहागीर घेऊन तिजबद्दल मेवाडच्या राण्यांची चाकरी करावी असें ठरवून दिलें होतें. या व्यवस्थेस धरून जयसिंगाचे पश्चात् ईश्वरसिंग जयपूरचे गादीवर बसला, व माधवसिंग उदेपुरास जाऊन जगत्सिंगाजवळ राहिला. याप्रमाणें तीन वर्षें लोटल्यावर सन १७४६ सालीं जगत्सिंगानें माधवसिंगास जयपूरचें राज्य मिळावें या हेतूनें ईश्वरसिंगाशीं युद्ध सुरू केलें. त्या वेळीं ईश्वरसिंगानें मराठ्यांची मदत मागितली. तेव्हां पेशव्याशीं वाटाघाट करून शिंदेहोळकरांनीं ईश्वरसिंगास साह्य करण्याचें ठरविलें. जयसिंग मरण पावला तेव्हांच हा वारशाचा कलह उपस्थित झाला होता. मोंगलांच्या राज्यव्यवस्थेंत रजपूत राजे हे केवळ जहागिरदार म्हणून समजले जात; आणि एक राजा मेल्यावर पुढें राज्य कोणास द्यावयाचें हें नजराणा घेऊन दिल्लीच्या पातशाहानें ठरवावयाचें असा नियम असे. जगत्सिंगानें पातशाहास कळविलें होतें कीं, माधवसिंगास राज्य दिल्यास आम्ही एक कोट रुपये नजराणा देतों. परंतु पेशव्यानें ईश्वरसिंगासच राज्य द्यावें अशी इच्छा दर्शविल्यावरून बादशहानें पेशव्यास खूष करण्यासाठीं ईश्वरसिंगासच राज्य दिलें. अर्थात् आतांही नानासाहेबानें त्याचाच पक्ष घेणें हें योग्य होतें. परंतु याच वेळीं उदेपूरचे वकील नानासाहेबाकडे राजकारण करण्यास आले. पेशव्यास शाहूच्या कर्जाची वगैरे फार ओढ होती. त्यामुळें जिकडून पैसा मिळण्याचा संभव जास्त तिकडे लक्ष पुरवणें त्यास भाग पडलें. पेशव्यानें रामचंद्रपंतबावास लिहिलें कीं, “ राणाजीकडील वकील येथें ( पुण्यास ) आले आहेत, माधोसिंगाचा मजकूर बोलतात. त्यांत मुख्यार्थ हाच कीं, ‘ ईश्वरसिंगानें माधोसिंगास चोवीस लक्षांचे जागा द्यावयाचे करार केले. त्यावर सरदारांनीं ( शिंदे होळकरांनीं ) कारभार बिघडून दिल्यामुळें माधोसिंगाचें काम खराब झालें. दोघेही सवाईजींचेच पुत्र. ईश्वरसिंगानें राज्य करावें आणि माधोसिंग नालायख आहे असें नाहीं. परंतु ईश्वरसिंगानीं चोवीस लक्षांची जागा देण्याचा करार केला, ती द्यावी. आम्हीं स्वामींस ( पेशव्यांस ) नजर करणें ती करूं.’ म्हणोन राणाजींचे वकील बोलतात. तर या गोष्टीचा विचार तुमचे मतें काय तो लिहून पाठविणें. आमच्या विचारें ईश्वरसिंगांनीं कराराप्रमाणें माधोसिंगास जागा द्यावी. आणि माधोसिंगापासून बारा, पंधरा, बल्की याहून विशेष, जेथवर साधेल तेथवर, साधावी. यांत तुमचा पोख्त विचार लिहून पाठविणें. ईश्वरसिंगानें चोवीस लाखांची जहागीर कबूल केली होती, परंतु तुम्हीं त्वरेनें जाऊन ईश्वरसिंगाचें मनोभीष्ट सिद्धीस नेलें आणि माधोसिंगास तीन लाखांवर समजाविला, तर ही गोष्ट चिंतन-

कारीच आहे. सांप्रत राणाजीचे वकील १५ पंधरा लाखांची नजर कबूल करतात, तर कराराप्रमाणें ईश्वरसिंगास सांगून जागा देववावी. यांत दोनही साधतात. "

या पत्रावरून दिसतें कीं, माधोसिंग युद्ध करणार असें कळलें तेव्हां प्रथमारंभीं भिऊन ईश्वरसिंगानें २४ चोवीस लाखांचे परगणे त्यास देण्याचें कबूल केलें. पुढें शिंदेहोळकर मदतीस आले तेव्हां त्यानें माधोसिंगाचा राजमहाल येथें पराभव केला आणि फक्त ३ तीन लाखांच्या महालांवर माधोसिंगाची समजूत केली. इतकेंच नव्हे तर बुंदी व कोटा येथील राजे माधोसिंगाच्या बाजूनें लढले म्हणून कोट्यास वेढा घालून तेथील राजा जालीमसिंग याचा ईश्वरसिंगानें पराभव केला. या प्रसंगांत जयाप्पा शिंद्याचा एक हात गोळी लागून जायां झाला, त्यामुळें त्यास मोठी खंडणी मिळाली.

जयाप्पास बुंदीकोट्यांतून पैसा मिळाला तेव्हां मल्हारराव होळकराचे तोंडास पाणी सुटलें. इतक्यांत 'पासष्ट लक्ष रुपये देतों, तुमची मदत आम्हांस द्या' असें माधवसिंगानें होळकरास कळविलें. ही गोष्ट मान्य करून होळकरानें ईश्वरसिंगावर चाल केली. हा प्रकार रामचंद्रबाबास बिलकूल आवडला नाहीं. तो पेशव्यास लिहितो, 'माधवसिंगाचें राजकरण लटकें, त्यांत जीव नाहीं, पैका प्राप्त होणें नाहीं. स्वामींनीं ईश्वरसिंगाचा अभिमान धरला ऐसें लोकांत झालें, त्यास आतां हे गोष्ट विरुद्ध आहे. आम्हीं चाकर आज्ञांकित असों.' बाबानें पेशव्यास एवढें निक्षून लिहिलें पण या प्रकरणांत होळकराचे शिरजोरपणापुढें पेशव्यास मान वांकवावी लागली. पेशवा लिहितो "राणाजींनीं मोगलाई अमिरांकडे राजकारण करून मल्हारजीकडे प्रवेश केला. एतद्विषयीं मल्हारबांनीं आम्हांस बहुतां प्रकारें लिहिलें कीं, राजकारण खरेंखुरें आहे. उभयतांची समजावीस होऊन कलह तुटतो, स्वामीस पैसा मिळतो. म्हणून कित्येक आग्रहपुर:सर लिहिलें आहे. मल्हारबास या गोष्टीचा पुर्ता अभिमान आहे. तुम्हांस ( म्हणजे शिंद्यास ) कोणे गोष्टीचा अभिमान आहे ऐसें नाहीं. तुम्हीं सेवा निष्ठायुक्त करीत आलेत. ज्यांत खावंदाची मर्जी, हित व नक्ष, तेंच केलें. तन्मुळेंच सर्वही उत्तम प्रकारें दिसोन स्वामिसेवा घडत गेली. सांप्रत मल्हारबा अभिमानी, तुम्हीं ईश्वरसिंगाचाच पक्ष धरिल्यास, तुमची त्यांची ऐक्यता चालणार नाहीं. द्वैत दाखवितील. आजपर्यंतचा ऐक्यभाव विथर दिसेल. हिंदुस्थानांत दुलौंकिक होऊन कार्यनाश होऊं शकतो. उमदे उमदे मनुष्यांस अंतर पडून, कित्येक फितवे अंग्रेज लोकांस बोटें घालावयास जागा होणार, ऐसें चित्तांत येतें. त्यास तुम्हीं येविशीं दुराग्रह न करतां, फूट

न दिसतां, मल्हारबाचा मनोदय रक्षून संपादिल्या यशाची अभिवृद्धि होय तें करणें. आमच्या विचारें तुम्हीं ऐक्यरूप मनसुबा करीत आलां, तदनुरूपच चालावें; त्यास विपर्यास नसावा, हेंच सर्वात्मना आमच्या चित्तांत आहे. विस्तार लिहिण्यास कारण हेंच कीं, दुराग्रह मल्हारबाचा, नाहीं करीत म्हटल्यानें वाईट मानतील. तुम्हांपासून जावयाचा आग्रह धरितील. दुसरें, पंधरा लाख राणाजी देणार असें असतां, दुराग्रह केलिया उत्तम दिसत नाहीं. यास्तव ज्याप्रकारें लौकिक फटकळ, ग्रहकलहाचा न होतां, कार्य करणें."

वरील पत्रावरून आपल्या सरदारांत फूट पडूं नये यासाठीं पेशवा न्यायाची बाजूसुद्धां सोडण्यास तयार झाला असें स्पष्ट दिसतें. तसेंच शाहूच्या कर्जामुळें तो साताऱ्यास दोन वर्षें अडकून पडला होता, फौज घरीं बसल्यामुळें जास्तच कर्ज झालें व प्राप्ति नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली. या परिस्थितींतून पार पडण्यायाठीं जेथून पैसा येईल ती कामगिरी न्यायान्यायाची चर्चा न करितां आंगावर घेणें पेशव्यास भाग पडलें. पुढील पत्रांत नानासाहेबाचें सर्व हृद्गत प्रकट झालें आहे म्हणून तें विस्तृत आहे तरी येथें पूर्णच देणें योग्य होय.–रामचंद्रबाबास—

"तुमचा व मल्हारजी होळकराचा परस्पर पेंच वाढला आहे म्हणोन वर्तमान बहुतां मुखें ऐकलें जातें. ऐशास आपल्या घरांत सरदारांत काडीमात्र द्वैतभाव नसावा, हा उत्तम पक्ष आहे. तथापि घर आहे तेथें बोलीचाली आहेच, परंतु परस्पर रुष्टता कोणी बाळगीत नव्हते. सर्वही एकचित्तेंकरून ज्यांत धन्याचें हित व नक्ष तोच मनसुबा करीत गेले. श्रीकृपें व वडिलांचे पुण्येंकरून जें ज्यानीं चित्तांत आणिलें तें सिद्धीतें पावत गेलें. यशावह कर्मं तुम्हींच संपादिलीं. नक्ष लौकिक म्हणावा तसा लोकोत्तर झाला. पुढेंही तुम्ही स्वामिसेवेस चुकतां असा अर्थ नाहीं. सर्वप्रकारें या दौलतीचे तुम्ही स्तंभच आहां. उचित मससुबा असेल तो करतां व करालच, संदेह नाहीं. परंतु घरांत घरभेद सर्वस्वी नसावा. या मागें तुमचें सांगणें मल्हारबांनीं केलें, त्यांचा मनोभाव तुम्हीं सिद्धीस नेला. म्हणोनच उत्तम शोभा जाहली. एकतत्वी फौज, एकदील. कोणाचाही बुद्धिभेद चालला नाहीं. प्रस्तुत तुमची परस्पर रुष्टता याकरितां, या राज्यांत काय, मोगलाईंत काय, उमद्या उमद्यांचे घरीं मन माने तैशा चर्चा करितात. आमचें कोणास सुख आहे ऐसें नाहीं. परंतु वडिलांचे तपोबळें आमची फौज भारी, सरदार एकदील, मर्द, कर्ते; अस्मानहि कडाडलें तरी आपल्या मर्दानगीस, हिंमतीस, अंतर करणार नाहींत. व केलें नाहीं; ज्यांच्या मर्दुमी व दिलेदारीची तारीफ सर्वही करितात

सांप्रत मल्हारवा इंदुरासच राहून राणाजीच्या भेटीस जाणार, तुम्हीं देशास येणार म्हणोन तत्वतां ऐकतों. तर ते तिकडे राहिले, तुम्हीं एकटे इकडे आल्यास लोकांत कसें दिसेल ? उमदे लोक चर्चा करितात; आमच्या सरदारींत फूट पडावी, आपली कामगिरी चालावी, हें इच्छितात, तेंच घडूं सकेल. रघूजी भोसले व बाबूजी नाईक औरंगाबादेस जाऊन नबाब आसफजाची भेट घेतली. आम्हांकडील विपरीतार्थाच्या गोष्टी सांगतात. नबाव करूं तो सकत नाहीं, परंतु मनोरंजकेसाठीं अनुमोदन देतात, गोड बोलतात. राजश्री स्वामीस ( शाहूस ) कर्ज झालें आहे, तें परिहार झालें पाहिजे, याजकरितां मन माने तो पैका मागतात. त्यांच्या सांगितल्याप्रमाणें आमचे वस्तू कवूल करवत नाहीं. यास्तव परम विमनस्कतेच्या गोष्टी घरांत बाहेर बोलतात. येणें करूनही लोकांस सुखावह वाटून मन माने त्या चर्चा करितात. नबाव आसफजाचा विचार दगाबाजीचा, एकास पळ म्हणावें, एकास पाठीस लाग म्हणावें. हा त्याचा विचार तुम्ही जाणतच आहां. त्यास कांहीं चमत्कार दाखवावा, विचारावरी आणावें, येविषयींचा विचार करावा. दुसरें राजश्रींच्या कर्जाच्या विचारास तुम्हीं असलें पाहिजे. तुम्हांस येणेविषयीं वारंवार लिहिलें, परंतु अद्याप येणें जालें नाहीं. भेटी होऊन विचार करून आश्विन कार्तिकांत मनसुबा कर्तव्य तो करावा. सारांश, तुम्हीं उभयतांनीं यावें, घरचे बाहेरचे मनसुबे उचित दिसतील तैसे तुम्हां सर्वांच्या विचारें करावे, असा विचार आहे. तरी मल्हारबांस उत्तम प्रकारें सांगून त्यांस घेऊन येणें, ते इकडे न यावयाचे हर प्रकारें पर्याय लावतील, तथापि बहुतां प्रकारें प्रसन्न करून खामखा घेऊन यावेंच यावें. उभयतां एक जागां जालियावर त्यांच्या चित्तांतील कलुषता दूर करून पूर्ववत् प्रमाणें तुम्ही ते वर्ता. दरम्यान विकृतभाव नव्हे, ऐसाच विचार देवाच्या दयेंकरून होईल, चिंता नाहीं. मुख्य गोष्ट, आमच्या सरदारांत फूट व्हावी, आमचा पक्ष हलका दिसावा, ( पुढील एक बंद गहाळ. )..................दुसरा पेंच राजश्री ( शाहू ) आम्हांपासून पंधरा वीस ( लाख ) कर्जाऊ इच्छितात, ते प्राप्त न होत त्यामुळें कष्टी. थोरले वाड्यांतील पेंच निरंतर वृद्धीसच पावत आहे. मानाजी आंग्र्याचा किल्ला खापरगड घेतला, त्यामुळें धाकटे वाड्यांतील कृपा होती तीही इतराज. इतकेही पेंच, गृहकलह नसतील तर, श्रीकृपेनें उलगडूं शकतों. सबब हरप्रकारें मल्हारबांस समजावून स्वकार्यसाधनेसाठीं घेऊन यावें. घरीं दोन वर्षें फौज बसली. कर्ज नवें दहा पंधरा झालें. यंदा स्वारीस जावयास योग्यता, राजश्रींनीं निरोप दिला,

याजमुळें झाली. सत्वर सर्वांनीं एक जागां होऊन तमाम डौल पाडावे, हे अर्थ तुम्हांस लिहिणें लागतात ऐसें नाहीं. सर्व तुम्ही करून म्हातारे जालां. सारांश, बाहेर वाईट न दिसे, घरकलहामुळें दौलतेची उचित कार्यास अटकाव न पडे, ती योजना जेणेंकरून होय तें सत्वर करून त्यांस समजाऊन घेऊन यावें. तुम्हींही निखालस जन्माचे सोबती आहांत. विस्तारें काय लिहिणें हे विनंति. तुम्हीं मल्हारबाच्या चित्तांतील किल्मिष दूर करून त्यांस घेऊन अतित्वरेनें यावें."

हें पत्र सन १७४७ च्या मे महिन्याच्या सुमारचें आहे. त्यावरून आपल्या दोन सरदारांच्या भांडणामुळें आपली बाजू घसरेल याची पेशव्यास केवढी भीति वाटत होती; सरदारांची मर्जी राखण्यासाठीं तो त्यांस किती गौरवानें लिहीत असे; शाहूच्या कर्जाची विवंचना, राण्यांची मर्जी राखणें व लोकांत आपला आब न घालवणें इत्यादि गोष्टींच्या काळजींत त्याच्या मनाची स्थिति कशी क्षुब्ध होई व इतक्यांकडे लक्ष पुरवून खेरीज निजाम, रघूजी भोसले, बाबूजी नाईक वगैरेंचीं कारस्थानें हाणून पाडण्याची त्यास किती तयारी ठेवावी लागे, हें स्पष्ट दिसतें. या पत्रांत कर्तव्य मनसुबा म्हणून ज्याचा उल्लेख पेशवा करतो तो व मागें शाहूस पाठविलेल्या खलित्यांत ज्याचा उल्लेख आहे तो 'खचित झालेला मनसबा' हा एकच, म्हणजे निजामाच्या कारस्थानांस तोंड देण्याचा. तसेंच आपल्या सर्वस्व-रक्षणाचा पाया केवळ एक 'भारी फौज' याची पुरी जाणीव पेशवा दाखवितो. शाहूची इतराजी तात्पुरती नाहींशी झाली होती तरी पुढील राज्यव्यवस्थेसंबंधींचीं कारस्थानें जोरांत चालू होतीं. या वेळीं ताराबाईनें शाहूस रामराजाच्या अस्तित्वाची खबर दिलेली असून शाहूच्या राण्यांच्या जोडीस तिच्याही खटपटी चालू झाल्या. तिचा ऋणानुबंधी रामचंद्रपंत अमात्याचा मुलगा भगवंतराव याच्यावर कोल्हापुरच्या जिजाबाईची गैरमर्जी झाल्यामुळें तोही बाहेर पडून शाहूच्या राज्यांत नांव मिळविण्याच्या विचारांत होता. शाहूनें त्यास अमात्यपद देऊं असें वचन दिलें होतें, पण तें सिद्धीस गेलें नाहीं, तेव्हां त्यानें निजामाकडे धांव घेतली. सबंध मराठशाहीच्या अमदानींत आपल्या राज्याच्या अस्तित्वाविषयीं व स्वतःच्या दौलतीच्या रक्षणाविषयीं सर्व मराठे सरदार इतके साशंक असत कीं, त्या सर्वांस बादशाहाचा प्रतिनिधि जो निजाम त्याच्याशीं संधान ठेवणें आवश्यक वाटे. केवळ छत्रपतीच्या सनदांनीं त्यांचें समाधान होत नसून आपल्या शाहूनें दिलेल्या जहागिरीच्या सनदा निजामाच्या बादशाही शिक्क्याच्या करून घेण्यांत सुद्धां ते भूषण मानीत. हेंच काय, पण आपली बाजू जरा कमीशी वाटली

कीं, निजामास मिळून ती मजबूत करून घेण्यासही ते मागेंपुढें पाहत नसत. किंबहुना निजामास जाऊन मिळण्याची दहशत म्हणजे, पेशवे किंवा छत्रपति हे राज्याच्या हितासाठीं एखाद्या सरदारास शासन करूं म्हणते तर, त्यांस मागें पाऊल घेण्यास लावण्यासारखी गोष्ट होती. भगवंतरावानें येतों म्हटल्याबरोबर पेशव्यास तोंड देण्यास हा बरा उपयोगी पडेल असें वाटून निजामानें त्यास 'पन्नास हजार स्वार, पंचवीस हजार बर्कंदाज,' एवढें सैन्य जमवून घेऊन यावें, त्याबद्दल जहागीर देतों असें भरमसाट आश्वासन दिलें. हेतु हा कीं मोठ्या आमिषास बळी पडून तरी एवढा सरदार मराठशाहींतून फुटावा. पण भगवंतरावास या वेळीं पांचशें स्वार तरी ठेवण्याची ऐपत होती कीं नाहीं याचीच वानवा असल्यानें तो कसा निघून जाणार ? त्यास जाण्याचें धैर्य झालें नाहीं. त्यावरून भगवंतरावाच्या वकिलानें त्यास लिहिलें 'स्वामींचा ( भगवंतरावांचा ) तो नांवलौकिक थोर असोन, नबाबसाहेब आपण होऊन हंमेशा स्मरण करीत असतात. असें असतां आपण न यावें हें अपूर्व दिसोन आलें. राजश्री बाळाजी बाजीरावापेक्षां स्वामीस नबाबसाहेब बहुत चाहतात. जैशी फौज येईल तैशी जहागीर देतील. तरी गंगाजीस सरंजाम देऊन सत्वर पाठवीजे. राजश्री पिलाजी जाधवाचा लेक जोत्याजी येऊन नबाबास भेटले. त्यांसी मदत लक्ष रुपये दिल्हे आणि जहागिऱ्या चौं लक्षांच्या दिल्या. रा. मल्हारजी होळकर हेही पातशाही चाकर झाले; त्यांचा मुलूख माळव्यांत आहे ती जहागीर हुजूरहून ( बादशहानें ) दिल्ही. व यशवंतराव पवार यासही जहागीर माळवा प्रांतीं दिल्ही; आणि किताब पंचहजारी साहेब नौबद केलें. यंदां बाळाजी बाजीरावाचा व नबाबाचा कटाक्ष बहुत आहे म्हणून त्यांस फौजेची जरूरी बहुत आहे. तरी स्वामींनीं आपला दुर्ग सरंजाम सत्वर पाठवीजे. दमाजी गायकवाडाचा वकील येऊन भेटला. गायकवाडांनीं तीन क्रोड रुपये नजर कबूल केली आणि मोगलाईंत येतात. ऐसें असतां अपूर्व आहे जे स्वामी चित्तीं धरीत नाहींत. हा समय फिरोन येणार नाहीं.'

हें पत्र येथें देण्याचा हेतु एवढाच कीं, या आनुषंगिक बातमीपत्रावरून मराठे सरदारांची त्या काळीं वागण्याची तऱ्हा कशी होती हें कळतें. पिलाजी जाधव हा पेशव्याचा खास सरदार निजामावर देखरेख ठेवणारा असून त्याचा मुलगा बिनदिक्कत निजामाची जहागीर स्वीकारून त्याचा सरदार बनतो. मल्हारराव होळकरास एकट्या पेशव्यांची सेवा पुरी न होऊन तो पातशाही चाकर होतो, व

हातांत आधींच असलेली जहागीर बादशहाकडून लिहून घेण्यांत भूषण' व सुरक्षितता मानतो. तीच गोष्ट पवाराची. दमाजीस पेशवा, छत्रपति व दाभाडे या तिघांचेंही नियंत्रण नको होतें. तेव्हां तीन कोट नजर देऊन गुजराथचा सुभाच आपल्या नांवें करून घेण्याचा त्याचा बेत असावा! निजामास घरबसल्या पेशव्यापेक्षां भगवंतराव शहाणा असें म्हणण्यास कोणती हरकत होती? असें ढोंग करूनच निजाम आपलें राज्य राखीत होता. या पत्रांत निजामास पेशव्याचें आपलें या सालीं युद्ध जुंपणार अशी अटकळ झालेली दिसते. वर नानासाहेबाच्या पत्रांत रघूजी भोसले व बाबूजी नाईक त्यास भेटल्याचा व मनसुबा करण्याचा जो उल्लेख आहे तो हाच असावा. यावरून मल्हारबास न दुखविण्याविषयीं पेशवा कां शिकस्त करीत होता हेंही कळतें. मराठे मंडळाची त्या वेळची रचनाच अशी होती कीं पेशवा काय किंवा दुसरा कोणी काय, त्यांची एक मोट बांधूं पहाता तर त्यास दुस्तर अडचणी होत्या. मूळ राज्याची घटना व्यवस्थित नाहीं, घटकांत एकदील नाहीं, लोकांत राष्ट्रभाव नाहीं. अशा आपत्तींस तोंड देऊन पेशवे शक्य तो ऐक्यभाव मराठ्यांत राखूं पाहत होते हेंच विशेष, असें म्हणणें भाग आहे. नानासाहेबानें असलेल्या परिस्थितींत जो अर्थ साधला, तितका कोणी साधला असता असें अनुमान होत नाहीं.

रामचंद्रबाबास एवढीं निक्षून पत्रें गेलीं तरी शिंदे होळकरांचें जमेना, तेव्हां नानासाहेबानें स्वतः उत्तरेंत जाण्याचें ठरविलें. तो १०-१२-१७४७ रोजीं पुण्याहून निघाला आणि सहा सात महिने बाहेर राहून ९-७-१७४८ रोजीं परत आला. या स्वारीस नेवाईची स्वारी असें म्हणतात. एप्रील महिन्यांत त्याची व माधवसिंगाची भेट झाली. माधवसिंगाचा पक्ष पेशव्यानें उचललेला पाहून ईश्वरसिंगानें तडजोड केली; आणि नेवाईसुद्धां चार महाल माधवसिंगास देण्याचें त्यानें कबूल केलें. या वेळीं माधवसिंगाकडून पेशव्यांस दाहा लाख रुपये नजर मिळाली. ईश्वरसिंगानेंही पेशव्यांस तीन लाख व त्याचा कारभारी महादजीपंत पुरंदरे यास पंचवीस हजार नजर कबूल केली. परंतु पेशवा परत फिरल्यावर ईश्वरसिंगानें या पैशाची टाळाटाळ चालविली. पेशव्यानें एकदां घेतलेली आपली बाजू पैशाच्या लोभानें सोडली तेव्हांपासून रजपुतांनें मन मराठ्यांबद्दल कलुषित झालें, आणि त्यांस मराठ्यांच्या शब्दाचा विश्वास वाटेनासा झाला. प्रथम जयाप्पाची मदत घेतली तेव्हां एकदा मदतीबद्दल ईश्वरसिंगाचा पैसा खर्च झालाच होता; व आतां पुनः भावास दुखवून त्याचें शत्रुत्व करून घेऊन व खिसा खलास

होऊन मुलूख राखला होता तोही गेला असें पाहून, यापुढें ईश्वरसिंगानें युद्ध करूनच काय होतें तें पाहण्याचा निश्चय केला. परंतु होळकरानें लगोलग त्याचा मुलूख उध्वस्त करून पराभव केला, तेव्हां ईश्वरसिंगास आपला करार पुरा करणें भाग पडलें. या होळकराच्या जबरदस्तीनें ईश्वरसिंगास उत्तरोत्तर इतका जाच होऊं लागला कीं 'जिणें असह्य होऊन ईश्वरसिंगें विष भक्षिलें. मेले. राज्य माधोसिंगास दिलें.' माधवसिंगानें आपला रामपुरा परगणा होळकरास मदतीदाखल दिला तो अजून होळकरांकडेच आहे.

मल्हाररावास न दुखविण्यासाठीं नानासाहेबानें या प्रकरणीं जी धरसोड केली तीमुळें मराठ्यांचा तिकडे दुर्लौकिक झाला. पैशाच्या लोभानें वचनें मोडून पाहिजे त्या पक्षास मराठे मिळतात असें दिसून येतांच रजपुतांस सवाई जयसिंगाचे वेळेपासून मराठ्यांबद्दल हिंदुत्वाच्या अभिमानामुळें जो आदर वाटे तो लयास गेला. जयाप्पास ही धरसोड बिलकूल पसंत नव्हती. रामचंद्रबाबाच्या स्वार्थी व गुळमुळीत वागण्यामुळें तो होळकरास मिळाफी आहे अशीही जयाप्पाची समजूत झाली. त्यामुळेंच त्यानें पुढें हट्ट घेऊन पेशव्यांकडून बाबास आपल्या कारभारावरून साफ काढून टाकिलें.

या प्रकरणापासून शिंदेहोळकरांची जी तेढ उत्पन्न झाली ती पुढें कायमचीच बनली. यापुढें जेथें जेथें उत्तरेंत राजकारणाचा संबंध आला तेथें तेथें पेशव्यांचे हे दोघे सरदार उघडपणें किंवा गुप्तरूपें विरुद्ध पक्षांशीं सूत राखीत. त्यामुळें मराठ्यांचें राजकारण ढिलें पडूं लागलें. रजपुतांसही मराठ्यांत भेद आहे हें पाहून आपलीं राज्यें राखण्यास धीर आला. त्यांच्यांतील अन्यायी माणसांस सुद्धां आपणांस कोणा ना कोणा मराठ्याची मदत मिळेलच अशी खात्री वाटूं लागल्यामुळें, निष्कारण बखेडे उत्पन्न करणें सुलभ झालें. त्यामुळें शूर रजपुतांची शक्ति आपसांतच खर्ची झाली किंवा मराठ्यांस तोंड देण्यांत खर्च झाली. हिंदुपदपातशाहीच्या उद्योगास तिचा मुळींच उपयोग होऊं शकला नाहीं हें राष्ट्राचें दुर्दैव होय.

## प्रकरण ८ वें.

# शाहूची अखेर.

शाहूची इतराजी दूर होऊन नानासाहेबास पुनः पदप्राप्ति झाली तरी निदान त्या पदाचें महत्व कमी करून टाकावें असा पेशव्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं विचार केला. वास्तविक महत्त्व पदाचें नसून व्यक्तीच्या कर्तृत्वाचें असतें. यशवंतराव दाभाडे नांवाला सेनापति होता, पण त्यास राज्यकारभारांत काडीचें महत्व नव्हतें. त्याच्याकडे गुजराथ तरी केवळ शाहूच्या कृपेमुळेंच राहिली होती. नाहींतर दमाजी गायकवाडानें गुजराथचें रक्षण बादशहा, मुसलमान सरदार, स्थानिक राजे व प्रतिस्पर्धी मराठे सरदार यांपासून करावें, व यशवंतरावानें खुशाल घरीं बसून उत्पन्न भोगावें हा न्याय कोठला ? असल्या न्यायानें कोणतें राज्य टिकेल ? असो. तर या वेळीं तरी मराठ्यांच्या राजकारणांत महत्व पदाचें नसून व्यक्तीच्या पराक्रमाचें होतें. चुगलखोरांनीं आतां नानाच्या नीतिमत्तेवर व राज्यकारभारावर हल्ला चढविला. त्याच्या खासगी वर्तनाविषयीं त्यांनीं शाहूकडे कागाळ्या केल्या. तेव्हां त्यानें आपला परम विश्वासु खिजमतगार शेव्याबा संकपाळ ऊर्फ शेटी मलीक यास गुप्तपणें पुण्यास जाऊन पेशव्याबद्दल बारकाईनें चौकशी करून आणण्याची कामगिरी सांगितली. तिचा शेवट कसा झाला ही हकीकत पुढील महादजी पुरंदऱ्यानें साताऱ्याहून पेशव्यास लिहिलेल्या पत्रांत यथास्थित दिली आहे. ती अशीः—

"शेटी मलीक स्वामींकडून येथें आला त्याजबरोबर पत्र आलें तें पावलें. शेटीनें राजश्रींस वर्तमान सविस्तर स्वामीकडील सांगितलें. महाराजांनीं सर्व ऐकून घेऊन मागती येकीकडे शेटीस नेऊन पुसलें. त्यानें सांगितलें, कीं पेशवे सुखरूप आहेत. काम कारभार पूर्ववत् प्रमाणेंच होत आहे. आपल्या बंदोबस्तानें आहेत. 'ब्राह्मणांचे हात तोडले, कलावंतिणी राखिल्या, दारू पितात, धुंद जाहले' म्हणून महाराजांनीं ऐकिलें होतें. परंतु सर्व शोध बारकाईनें घेतला व दिसोनही सर्व आला. अगदीं बाष्कळ. नाना बहुत खबरदार आहेत. तेव्हां महाराज बोलले कीं 'लंबडीचे लोक भलतेंच सांगतात. सर्व लटकें. नाना खुशाल आहे कीं (तरमग)!' तेव्हां शेटी म्हणाला कीं खुशाल आहेत. महाराज बोलले, इतकेंच असलें म्हणजे जाहलें. नाना जिवानें खुशाल असला म्हणजे सर्व बरें आहे. लोकांचे आम्ही मजकूर कोठें मानतों. तूं सांगतोस हें खरें. बारांना नाना वाईट. माझा तेवढा माझा चाकर पदरीं माझे मातबर आहे. सुखरूप असला म्हणजे

झालें. मग शेटी म्हणाला कीं सुखरूप आहेत. तें वर्तमान शेटीनें येथें येऊन आम्हांजवळ सांगितलें. खरेंच आहे. परभारें शेटीनें जेव्हां राजश्रींजवळ स्वामींचें पत्र दिलें, महाराजांनीं वाचलें, दरवारीं लोक फार होते तेव्हां शेटीला म्हणाले, इकडे ये, तुला वर्तमान पुसावयाचें आहे. असें सदरेस बोलून, पलीकडे शेटीला घेऊन गेले. वर्तमान पुशिलें. यानेंही सांगितलें. हेंही वर्तमान राजश्री गोविंदराव यांनीं सांगितलें कीं, नानाचें वर्तमान पुसावयासी शेटीस याप्रमाणें पुशिलें व जावसालही उत्तम जाहला. आतां महाराजांचे निदर्शनास आलें. इतक्या उपरी राजश्री दरबारीं काय चर्चा करितात व बाईजवळ काय करितात हेंही येक दो दिवशीं कळेल. तदुत्तर सेवेशीं लिहीन." या पत्रांत वर्णिल्याप्रमाणेंच दुसऱ्याही ठिकाणीं पेशव्याच्या नालस्तीचें वर्तमान आढळतें, पण त्यांत कितपत तथ्य असावें हें सांगणें शक्य नाहीं. नानासाहेब हा तत्कालीन नीतिमत्तेला अपवादक नव्हता व त्याच्या नाटकशाळा होत्या ही गोष्ट निश्चित आहे. पण हा प्रकार लोक त्या काळीं ऐश्वर्याचें एक अंग मानीत असत. कसेंही असलें तरी असल्या बाह्य कारणांनीं राज्याच्या कामांत पेशव्याकडून गाफिलगिरी किंवा अन्याय झालेला नमूद नाहीं.

नानासाहेब उत्तरेंत नेवाईच्या स्वारींत असतांनांच निजाम मराठ्यांवर चढाई करणार अशी हूल उठली. ती खरी कीं खोटी होती हें समजणें कठिण आहे. पण निजाम सुरतेवर येऊन गुजराथ घेणार असें भय दाभाड्यास पडलें होतें ही गोष्ट नमूद आहे. गुजराथ व माळवा हे सुभे निजामानें दिल्लीस असतांना पूर्वी एकदा आपल्या नांवानें करून घेतले होते. त्यांपैकीं माळवा त्यानें भोपाळच्या तहानंतर सोडला. पण गुजराथचा सुभा यावेळीं बादशाहानें मराठ्यांस दिलेला नसून अहमदाबाद व सुरत हीं मुख्य शहरेंही अजून त्यांच्या ताब्यांत आलीं नव्हतीं. तेव्हां दक्षिणेकडून पेशवा व उत्तरेकडून दमाजी गायकवाड यांच्या पकडींत सांपडलेला सुरतेचा मोगल अधिकारी जो सीदी त्यास मदत करून मोगलाई मुलूख मोकळा करणें, हें निजामास इष्ट होतें. सुरतेच्या मोगल सुभेदाराशीं पेशव्याचें वर्तन कसें होतें हें त्यानें पिलाजी जाधवास वसई मुक्कामास पाठविलेल्या पत्रांत पहावयास सांपडतें. सुरतकरांचें एक जहाज वसईच्या मराठी आरमारानें पकडून ठेवलें, तेव्हां तें सोडून देण्याबद्दल त्यांनीं पेशव्याकडे मागणी केली. पिलाजीनें नानासाहेबाची परवानगी विचारली, त्यास पेशवा लिहितो 'त्या गलबतास आठ महिन्यांचा कौल दिला, त्याप्रमाणें मुदत होऊन गेली. उपरांत गलबत दस्त केलें. त्यास बंदरचा शिरस्ता ऐसा आहे, त्यांत त्यांनीं रदबदल

करावी ऐसें नाहीं. सुरतकरांनीं तह करून अंमल दिल्हा म्हणजे मग जहाज पुढें कशास धरतील ! त्यानें रुजू व्हावें उचित असे.' म्हणजे सुरतेस मराठ्यांची सत्ता स्थापन करूं देत नाहीं म्हणून त्यांचें जहाज धरणें आम्हांस भाग आलें असें पेशव्याचें स्पष्ट सांगणें आहे. मात्र गुजराथ सेनापतीची ठरली असल्यामुळें, स्वतः पेशव्यास तिकडे स्वारी करतां येत नव्हती, इतकेंच. सुरत सुद्धां सर्व प्रदेश मराठ्यांच्या कक्षेंतीलच होता.

सेनापति दाभाड्यांचा मुतालिक या नात्यानें दमाजी गायकवाड गुजराथेंतील मराठ्यांचा अंमल चालवी. गुजराथच्या सुभ्याखालच्या काठेवाडावर या वेळीं मराठ्यांची सत्ता मुळींच नसून खुद्द गुजराथपैकीं फक्त अर्धा मुलूखच मराठ्यांस खंडणी देत असे. सुरत व जवळचा मुलूख तेथील नवाबाचे ताब्यांत असून त्यास इंग्रज, पोर्तुगीज वगैरे परक्यांची चांगलीच मदत असे. सुरतेच्या दक्षिणेस पोर्तुगिजांचा दमण वगैरे मुलूख असून, वसई घेतल्यापासून त्यांचें मराठ्यांशीं बरें नसे. अहमदाबाद वगैरे उत्तरेकडील मुलूख मोगल अधिकाऱ्यांनीं वळकावलेला असून ते दिल्लीस कांहींच पाठवीत नसत. स्थानिक रजपूत राजे व जहागिरदारसुद्धां मराठ्यांस नाखुषीनेंच खंडणी देत. या सर्वांस धाकांत ठेवून गायकवाडास अंमल करावा लागे. त्यांतच यजमान दाभाडे यांची ओढ चालू होती. यशवंतराव दाभाडे व्यसनी व पराक्रमशून्य होता. तळेगांवास वसून त्यानें मन मानेल तो खर्च करावा व त्याचें कर्ज दमाजीनें फेडावें असा नित्यक्रम झाल्यामुळें, गायकवाड या गोष्टीस अगदीं कंटाळला होता. शाहूस सरदेशमुखीचा वसूल मिळावयाचा तो मिळत नसल्या कारणानें त्याचे कारभारी पेशवे साहाजिकच कुरकुरत. खेरीज राज्याचें जोखीम तिळमात्र न वाहाणाऱ्या सेनापतीनें घरबसल्या गुजराथसारख्या सुपीक मुलखाचा वसूल फस्त करावा, हें नानासाहेबास मुळींच पसंत नव्हतें. त्यामुळें गुजराथ त्याच्याकडून काढून आपण व गायकवाड यांनीं निमेनिम वांटून घ्यावी असा पेशव्यांचा मूळपासून कटाक्ष होता मराठ्यांचा नर्मदेच्या उत्तरेस संचार सुरू झाला तेव्हां पेशवे, दाभाडे, गायकवाड, पवार, कदमवांडे वगैरे अनेक सरदार सोयीस पडेल तिकडे जाऊन मुलुखगिरी करीत. पुढें त्यांच्यांत भांडणें लागूं लागलीं, तेव्हां शाहूनें कार्यक्षेत्रें तोडून देण्याचें धोरण धरलें. पण त्यामुळें वेगवेगळे सरदार आपआपल्या जागीं स्वतंत्र होऊन मराठशाहीची जूट मोडण्याचा संभव होता. म्हणून पेशवे आरंभापासून या तुटक पद्धतीच्या विरुद्ध असत. आरंभीं चिमाजी आप्पाकडे असलेला गुजराथचा अर्धा

गुजराथ आपणांस देण्याचें ठरेल तरच आपण मदत करूं असें दमाजीस साफ कळविलें. दमाजी एक लक्ष रुपये व चार पांच परगणे देऊं असें गोविंदरावामार्फत म्हणूं लागला. पण पेशव्यानें मुद्दामच ताणून धरलें. उमाबाईस ही गोष्ट कळली तेव्हां तिनें तर मुलूख देणें मुळींच नाकारिलें, फक्त रोख पैसा देऊं असें ती म्हणाली. या वाटाघाटी नानासाहेब उत्तरेंत नेवाईच्या स्वारींत असतांना चालल्या होत्या. पुढें निजाम २१ मे सन १७४८ मध्यें ७६ वर्षांचा होऊन मरण पावल्यामुळें दाभाड्याचा पेंच सुटला. निजामुल्मुल्काच्या आधीं एक महिना दिल्लीचा बादशहा महमदशहा मरण पावला होता.

निजाम आसन्नमरण होण्यापूर्वींच, तो मेल्यावर जो गोंधळ उडेल त्या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांचा अंमल दक्षिणेंत पुढें सारण्याचा नानासाहेबानें दूरदृष्टीनें विचार चालविला होता. त्यासाठींच शिंदे होळकर दक्षिणेंत असावे अशी योजना त्यानें केली होती. निजामास गाजीउद्दीन, नासिरजंग, सलाबतजंग, निजामल्ली, बसालतजंग व मीरमोगल असे सहा पुत्र असून खेरीज मुलीचा मुलगा मुजफरजंग हाही राज्यावर नजर ठेवून होता. निजामाचा हेतु आरंभीं गाजीउद्दीननें दिल्लीस राहून तेथील राजकारण राखावें व दक्षिणेंत नासिरजंगानें कारभार करावा असा होता. त्यानें इतरांस लहान मोठ्या जहागिरी व अधिकार त्यांनीं भांडूं नये म्हणून तोडून दिले होते. पुढें नासिरजंगानें बाप जिवंत असतांनाच त्याच्या विरुद्ध अनेक वेळीं बंडावा केल्यामुळें निजामाची मर्जी त्यावरून उडाली व मुजफरजंगास निजामी मिळावी असें त्यानें ठरवून ठेविलें. गाजीउद्दीनचें शिंदे, होळकर प्रभृति मराठे सरदारांशीं सख्य असे व मराठ्यांचे दिल्लींतील वकील हिंगणे * यांच्यामार्फत त्यानें पेशव्याशींही संधान जोडिलें होतें. मराठ्यांचा

* महादेव भट हिंगणे—स्वराज्यांत कर्तृत्वास अवकाश मिळाला म्हणजे लायक माणसें कशीं तयार होतात, त्याचें उदाहरण हिंगणे घराण्याचें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. हे पेशव्यांचे नासिकचे तीर्थोपाध्ये. शंकराजी मल्हार सचिवाबरोबर महादेवभट हिंगणे प्रथम बाळाजी विश्वनाथाचे स्वारींत दिल्लीस गेला; आणि पुढें पंचवीस वर्षेंपर्यंत दिल्लींत मराठी सत्तेचा जम बसविण्याची त्यानें विलक्षण खटपट केली. महादेवभट पिशाच्च लिपी व फारसी भाषा जाणत होता. वक्तृत्व व बहुश्रुतपणा या गुणांचे योगानें त्यानें आपली छाप सर्वत्र बसविली. सन १७३० पासून हा दिल्लीचे मराठी वकिलातीवर असल्याचा उल्लेख सांपडतो. माळवा

पाठिंवा त्यास दिल्लीच्या कारस्थानांत फार उपयोगी पडे. पेशव्याचा हेतु असा होता कीं, गाजिउद्दीनास दक्षिणेचा निजाम करून त्याच्या मित्रत्वाच्या बळावर दक्षिणेंतील आपला अंमल सरळ चालेल अशी व्यवस्था लावून घ्यावी. पण याच वेळीं अहंमदशाहा अवदाली यानें पंजाबावर स्वारी केल्यामुळें दिल्लीस गडबड उडाली आणि गाजिउद्दिनास दक्षिणेकडे लक्ष पुरवितां आलें नाहीं. नासिरजंगानें आपला दिवाण तेलंगा ब्राह्मण रामदासपंत याच्यामार्फत पेशव्याशीं सख्य जोडण्याची खटपट चालविली. पण तत्पूर्वीच मुजफरजंगानें मराठ्यांशीं संधान लाविलें होतें. नासिरजंगानें सैन्याच्या मदतीनें निजामी बळकावून मुजफरजंगास घालवून दिलें, तेव्हां तो साताऱ्यास आला आणि त्यानें मराठ्यांच्या कैदेंत असलेल्या चंदासाहेबाची भेट घेतली. दोघांनीं मिळून मराठ्यांची मदत घेऊन दक्षि-

---

प्रांताच्या सनदा मिळविण्यांत महादेवभटानें मोठी खटपट दिल्लीस केली. ( खं ६—९५, ९७ ). या कामगिरीबद्दल संतोष दर्शवून बाजीरावानें त्यास वर्षासन ठरवून दिलें ( सदर १२३ ). हिंगण्यावरोबरच बाजीरावाचा मातुल मल्हार दादा बर्वे व त्याचे मुलगे बाबूराव व रामचंद्र मल्हार, तसेंच यादव मल्हार ( सन १७३२–३९ ), मयाराम [ १७४२ ], आसाराम [ १७४५-४७ ] असे आणखी अनेक गृहस्थ दिल्लीच्या मराठी वकिलातीवर त्या वेळीं असलेले आढळतात. इंग्रजांचे परराष्ट्रीय खातें वाढत गेलें, तसाच प्रकार त्या वेळीं मराठ्यांच्या वाढत्या अमदानींत झाला. सवाई जयसिंगाकडून पैसे मिळवून कर्जमुक्त होण्याची खटपट नानासाहेबानें महादेवभट हिंगण्याचे मार्फत सिद्धीस नेली. हळूहळू हिंगण्यांनीं उत्तरेंत सावकारीचाही धंदा आरंभिला आणि सर्व उत्तर हिंदुस्थानांत प्रतिष्ठा मिळविली. सन १७४४ त महादेवभटाचा चमत्कारिक रितीनें खून झाला, तो प्रकार खालील पुण्याहून साताऱ्यास लिहिलेल्या पत्रांत उपलब्ध होतो ! ‘ चिरंजीव राजमान्य राजश्री धोंडोबा यांसी सदाशिव चिमणाजी आशीर्वाद. उपरी ता. २५ मोहोरम विशेष. काल दोनप्रहरां दिल्लीहून इछाराम वकिलाचें पत्र तेविसावे रोजीं येथें आलें कीं, मनसूरअलीखान व अमीरखानही दिल्लीस आले आहेत, त्यांस सांप्रत महादेवभटांनीं सवाईजी मेलियावर त्यांची वकिली आपणाकडे करून घेतली आहे. पहिला कृपाराम होता, त्यास जयनगरांत ठेविलें. महादेवभट मनसूरअलीखानाच्या दरवारीं गेले, त्यास बरोबर सवाईकडील जमातदार व प्यादे होते, त्यास त्यांची यांची हक्काविशीं बोली जाहली,

णचीं व कर्नाटकचीं राज्यें मिळवावीं असा बेत मुजफरजंगानें चंदासाहेबापुढें मांडला, तो त्यास आवडला नाहीं. कारण त्यास मराठ्यांनीं १७४१ सालीं त्रिचनापल्लीस कैद केल्यापासून आठ वर्षें तो सातारच्या किल्ल्यांत पडून राहिल्यामुळें त्याचा मराठ्यांवर फार राग होता. पण त्याची बायको पांदिचरीस फ्रेंचांच्या आश्रयास होती तिनें डुप्लेच्या सल्ल्यानें नवऱ्यास कळविलें कीं, तुम्ही वाटेल तें करून कैदेंतून सुटून या, मात्र मराठ्यांची मदत घेण्याची गोष्ट कबूल करूं नका. आपण इकडे आल्यावर त्याबद्दल पुढें पाहूं. सादतअल्लीस भय न राहावें, म्हणून मराठ्यांनीं चंदासाहेबास कैदेंत ठेवलें होतें. पण निजामानें १७४३ सालीं सादतअल्लीस मारून अन्वरुद्दिनास कर्नाटकचा नवाब केलें, तेव्हांपासून मराठ्यांची खंडणी येईनाशी झाली. अर्थात् चंदासाहेबास तुरुंगांत ठेव-

---

त्यास महादेवभटांनीं शिवी दिली आणि आपले लोकांस बोलले कीं, धरा. त्यावरून त्यांची यांची लटापटी जाहली. महादेवभटांस जखमा लागल्या. संध्याकाळीं घरास नेले. मध्यरात्रीं मृत्यु पावले. पुत्र मात्र वांचले. मोठी गोष्ट वाईट जाहली. पत्रें आलीं तीं तीर्थरूपांकडे रवाना केलीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. ( भा. इ. सं. स. पुणें पुरंदरे दप्तर ). पौ. २५ मोहोरम.' जयसिंग १७४३ त मरण पावल्यावरचा मोहोरम १७४४ फेब्रुआरींत येतो. सन १७४५ च्या पुढें महादेवभटाचें नांव येत नाहीं. म्हणून त्याचे मृत्यूचा काळ स. १७४४ चा फेब्रुवारी किंवा १७४५ चा जानेवारी असूं शकेल. मनसूरअलीखान म्हणजे सफदरजंग अयोध्येचा सुभेदार, बादशहाजवळ प्रमुख सरदार होता. त्यास तोंडावर शिवी देण्याचें सामर्थ्य महादेवभटासारख्या मराठी वकिलानें दिल्ली राजधानींत दाखविलें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. महादेवभटाचे मुलगे दामोदर दादा, बापूजी, पुरुषोत्तम नाना व देवराव तात्या हे सर्व इसम प्रख्यात लेखक, वकील व सावकार असून, उत्तरेंतील कारभारांत त्यांचें वजन पुष्कळ वर्षें अव्याहत चालू होतें. बापूजीपंताचा पानपतावर शिरच्छेद झाला, त्याचा उल्लेख नानाफडणिसानें आपल्या आत्मचरित्रांत केला आहे. नानासाहेबाच्या कारभारांत मराठ्यांस उद्योगक्षेत्र कसें निर्माण झालें हें या हकीकतीवरून समजून येईल. नारायण दीक्षित पाटणकर, गोविंदपंत बुंदेले, गणेश व गोपाळ संभाजी खांडेकर वगैरे ब्राह्मण घराणीं; तसेंच नागपुरकर भोसले, पिलाजी जाधव, धारचे पवार वगैरे अनेक मराठे घराणीं यांची भरभराट नानासाहेबाच्या वेळचीच आहे.

ण्याचें त्यांस कारण राहिलें नाहीं. पण त्याचा दंड कोणीच भरीना. स. १७४८ त डुप्लेनें सात लक्ष दंड देण्याची जामिनगिरी पत्करली, तेव्हां पेशव्यानें त्यास बंधमुक्त केलें, आणि बरोबर तीन हजार स्वार देऊन कर्नाटकांत पोंचतें केलें. रस्त्यानें जास्त फौज जमवीत व शत्रूचा पाडाव करीत चंदासाहेब पांदिचरीस जाऊन डुप्लेस भेटला. डुप्लेनें चंदासाहेब व मुजफरजंग यांशीं संगनमत करून अन्वरुद्दीनावर स्वारी करून त्यास अंबूर येथें ठार मारलें ( आगष्ट १७४९ ). तेव्हां त्याचा वडील मुलगा फ्रेंचांच्या हातांत सांपडला व धाकटा महंमदअल्ली पळून इंग्रजांच्या आश्रयास गेला. अर्काट येथें चंदासाहेबानें कर्नाटकची व मुजफरजंगानें दक्षिणची सुभेदारी धारण केली आणि त्यांनीं संगनमतानें पुढें नासिरजंगावर चालून येण्याचा बेत चालविला.

निजामाच्या मृत्यूनें आलेल्या या संधीचा पेशव्यानें चांगला उपयोग करून घेतला असता; पण याच वेळीं शाहूच्या आसन्नमरण स्थितीमुळें त्यास घरचेच पेंच सांभाळणें कठीण झालें. शाहूच्या नंतर छत्रपति कोण होणार व मराठशाहीचें ओझें कोणावर येऊन पडणार हे दोन प्रश्न या वेळीं मराठे सरदारांपुढें मुख्य होते. दुर्बल सरदार आपलें आजपर्यंत चाललें तें पुढें तसेंच कांहींएक न करितां यथास्थित कसें चालेल या विवंचनेंत होते. प्रमुख होते ते आपल्या हातांत सूत्रें आणण्याच्या खटपटींत होते. पेशव्याच्या विरुद्ध असलेले त्याचे हातीं कारभार न जाऊं देण्याचा बेत करीत होते. या सर्वांची योग्य ती विल्हेवाट लावून आपल्या हातांत सूत्रें राखण्याचा खुद्द पेशव्याचा प्रयत्न होता.

पहिला प्रश्न शाहूच्या वारसाचा. शाहूच्या राण्या दोन. वडील सकवारबाई. ही मनस्वी असून आपल्या मर्जीनें चालणारा इसम दत्तक घेण्याच्या विचारांत होती. धाकटी सगुणाबाई. ती गरीब असून तिचा ओढा आपल्या चुलत बहिणीचा मुलगा रघूजीचा पुत्र मुधोजी याजकडे होता. पण हा मुलगा रघूजीचा नावडता असल्यामुळें रघूजी त्याच्यासाठीं कांहीं हातपाय हालवील असा संभव नव्हता. तशांत तो मालोजीच्या वंशजांपैकीं नसल्यामुळें, गोत्रजदृष्ट्या शाहूला लांबचा होता. सगुणाबाई कारस्थानी नसल्यामुळें कोणा सरदारांस आपल्या पक्षांत ओढण्याची करामतही तिच्यांत नव्हती. पण हें वारशाचें प्रकरण रंगास येण्यापूर्वींच ता. २५ आगष्ट १७४८ रोजीं सगुणाबाई वारली. अर्थात्‌च तिचा प्रश्न सुटला. दुसरी राणी सकवारबाई आपल्या मुठींत राहण्याजोगा दत्तक घेऊन स्वतः कारभार करण्याची तिची महत्वाकांक्षा असल्यामुळें

पेशव्यासारखा आपलें महत्व अस्तंगत करील असा कारभारी राहूं नये अशी तिची इच्छा होती. त्यासाठीं आपल्या तंत्रानें वागण्याजोगे दादोबा प्रतिनिधि व त्याचा चळवळ्या मुतालिक यमाजी शिवदेव यांचा तिनें मुख्यत्वें आश्रय केला होता. पेशव्याचा पक्ष हलका करूं इच्छिणारे रघूजी, दमाजी, बाबूजी नाईक प्रभृति सरदार, यांचें सकवारबाईविषयीं व्यक्तिशः कसेंही मत असलें तरी पेशव्याच्या विरोधासाठीं तिच्या पक्षास मिळण्याचा संभव होता.

उलट पक्षीं पेशव्याचा हेतु मराठशाहीचें गाडें जेणेंकरून सुरक्षित व शांतपणें चालूं शकेल अशी व्यवस्था करण्याचा होता. यासाठीं शक्यतर आपण करार ठरविल्याप्रमाणें कोल्हापूरचा संभाजी गादीवर आणून शिवशाहीचीं दोन छकलें सांधलीं जावीं अशी त्याची खटपट होती. पण यास दोन अडचणी होत्या. एकतर स्वतः संभाजीच वयानें उतार असून निपुत्रिक होता. अर्थात् त्यास गादीवर आणणें म्हणजे दत्तकाचा प्रश्न आजचा उद्यांवर लोटणें या पलीकडे जास्त नव्हतें. दुसरें स्वतः शाहूस संभाजी मुळींच नको होता.

शाहूची इच्छा मालोजीच्या वंशजांपैकीं योग्य निवड केलेला मुलगा दत्तक घेऊन सकवारबाईनें पेशव्याच्या अनुमतानें कारभार करावा अशी आरंभीं होती. परंतु दत्तकाच्या प्रश्नाची वाटाघाट चालू झाली, तेव्हां राजारामाची बायको प्रसिद्ध ताराबाई साताराच्या किल्ल्यावर कैदेंत होती तिनें शाहूस कळविलें कीं, माझा नातू मृत शिवाजीचा मुलगा रामराजा मी कोल्हापुरकरांच्या भीतीनें गुप्त ठेविला आहे. तो जवळचा वारस असतां बाहेरचा दत्तक घेण्याचें कारण काय? ही वातमी ऐकून या नव्या वारसाचा विचार करणें शाहूस भाग आलें. त्यामुळें बाहेरचा दत्तक घेण्याचा विचार अर्थातच मागें पडला. ‘अस्सल वंश असतां बाहेरचा केल्यास पुढें निभावणेस कलह पडतील’ असा शाहूनें व्यवहारदृष्ट्या या बाबीचा विचार केला. उलटपक्षीं हा गुप्त मुलगा हें ताराबाईचें निव्वळ थोतांड आहे असा सकवारबाईच्या पक्षानें डंका पिकविला. सकवारबाईस अशी भीति पडली कीं हा ताराबाईचा नातू गादीवर आल्यास आपणास ताराबाईच्या आज्ञेंत वागावें लागेल; तेव्हां दुसराच इसम दत्तक घेऊन आपले मंडळीवर कारभार सोंपवून व विरुद्ध बाजूच्या माणसांस कैद करून, राज्याचा आटोप करण्याची तिची धडपड सुरू झाली. शाहूनें हें ऐकून आरंभीं भगवंतराव अमात्याकडून रामराजा हा औरस वारस आहे अशी खात्री करून घेतली. शाहू या वेळीं अगदीं थकलेला असून शहराबाहेर कृष्णातीरीं रहात होता. त्याचें हें बाहेर रहाणें सकवारबाईच्या

पक्षास नक्की होतें. त्यांनीं मसलत करून शाहूस शहरांत राजवाड्यांत आणून ठेविलें, आणि तेथें आपले चौकीपहारे ठेवून प्रधान, चिटणीस, देवराव पोतनीस वगैरेंचा प्रवेश आपल्या परवानगीवांचून त्याजकडे होऊं नये असा वंदोबस्त केला. महाराजांजवळ फक्त आपल्याच पक्षांतील मंडळी तिनें ठेवून दिली. इतकेंच काय पण पेशवा व चिटणीस यांस दगा करावा असाही तिचा विचार होता. गोविंदराव चिटणिसास आपल्या पक्षांत ओढण्याची सकवारबाईनें शिकस्त केली. पण शाहूचा मनोदय तडीस नेण्याचा त्याचा प्रयत्न असल्यामुळें तो या प्रसंगीं लोभास बळी पडला नाहीं. तेव्हां वाड्यांतून परत जातांना चिटणीसाचा खून करण्याचा तिनें घाट घातला, पण तो फुकट जाऊन भूलचुकीनें तुळाजी खिजमतगार मात्र मारला गेला. या थरास गोष्टी आल्या तेव्हां आतां एकचित्त होत नाहीं अशी पेशव्याची खात्री झाली. तेव्हां त्यानें चिटणीस, पुरंदरे, ताराबाई वगैरेंशीं संगनमत करून आणि साताऱ्याच्या किल्लेदारास वश करून ठेवून आपल्या पक्षाची बळकटी चालविली. सकवारबाईनें पेशव्यास तोड म्हणून कोल्हापुरच्या संभाजीस साताऱ्यास बोलाविलें; पण शाहूनें संभाजीस गुप्तपणें निरोप पाठवून त्यानें सातारच्या भानगडींत पडूं नये अशी सूचना दिली, तेव्हां संभाजी निघून आलेला परत गेला. शाहूनें या प्रसंगीं गोविंदराव चिटणिसास विश्वासांत घेऊन त्यास प्रतिनिधि, फत्तेसिंग भोसले, सेनापति, रघूजी वगैरे सरदारांस हें राज्य सर्वभार घेऊन संभाळण्याची कोणाची तयारी आहे हें विचारण्यास सांगितलें. " परंतु कोणाचा हिय्या होऊन ' मी राज्य संभाळतों ' असें उत्तर न जालें; त्यांनीं उत्तर करावें कीं, ' महाराजांची आज्ञा आम्हांस शिरसा मान्य, परंतु पेशवे यांची स्पर्धा करून दौलत संरक्षावयास आमच्यांत सामर्थ्य नाहीं. " शाहूनें सकवारबाईस रामराजा दत्तक घेऊन सर्व कारभारी यांचे विचारें राज्य चालवावें असें सांगून पाहिलें पण तिनें तें ऐकिलें नाहीं. वास्तविक सकवारबाईच्या वागणुकीचा त्यास अगदीं कंटाळा आला होता. तेव्हां शेवटचा निश्चय करून, आपल्या पश्चात् मराठी राज्याचा कारभार कसा चालावा यासंबंधानें शाहूनें स्वदस्तूरचे दोन कागद गोविंदराव चिटणिसामार्फत नानासाहेब पेशव्यास करून दिले. ते महत्वाचे असल्यामुळें येथें देतों. या याद्या अस्सलच छापलेल्या असून त्या खुद्द शाहूच्या हातच्या व पूर्ण विचारपूर्वक लिहिलेल्या आहेत याविषयीं संशय नाहीं.

यादी नंबर १—राजमान रा. बाळाजी प्रधान पंडित यास आज्ञा. तुम्ही फौज धरनें. सर्वांस आज्ञा केली त्यांच्या दैवीं नाहीं. महाराजास लिखनें झालें नाहीं.

बरे होत नाहींत. राज्यभार चालला पाहिजे. तर पुढें वंश बसवनें. कोलापुरचें न करणें, चिटणिसास सर्व सांगितलें तसें करनें. वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालून राजमंडळ चालवनें. चिटणीस स्वामीचे विश्वासू. त्याच्या तुमच्या विचारें राज्य राखनें. वंश होईल तो तुमची घालमेल करनार नाहीं. सुज्ञ असा.

यादी नंबर २—राजमान रा. बाळाजी पंडित प्रधान आज्ञा जे. राज्यभार तुम्ही चालवाल हा भरंवसा स्वामीस आहे. पहिलें सांगितलें ( त्याची ) खातरजमा, ती चिटणिसांनीं आढळ केली. तुमचे मस्तकीं हात ठेविला आहे; वंश होईल तो तुमचं प्रधानपद चालवील. करील अंतर तर शपथ असे. त्याचे आज्ञेंत चालून सेवा करनें. राज्य राखनें. बहुत काय लिहिनें सुज्ञ असा.

या दोन याद्या म्हणजे मराठशाहीच्या सूत्रचालकत्वाची शाहूनें पेशव्यास करुन दिलेली सनद होय. या याद्यांवरून शाहूची मरणापूर्वी पेशव्यासंबंधीं संशयनिवृत्ति झाली, हें स्पष्ट होतें. तसेंच इतर कोणी सरदार राज्यभार घेण्यास तयार झाले नाहींत हेंही कळतें. वंशासंबंधीं कोल्हापुरचा तिटकारा शाहूस उल्लंघितां आला नाहीं व म्हणूनच राज्यांत यादवी माजूं नये अशा हेतूनें त्यानें रामराजा हाच दत्तक ठरवून दिला. पेशव्याची पेशवाई कोणी काढूं नये अशी आज्ञा त्यानें पुढील वंशजांस केली आहे ती शाहूच्या मनोरचनेस साजेशी आहे. आनुवंशिक तत्वाचा केवढा परिणाम हिंदु समाजावर झालेला होता हें या उदाहरणांत दृष्टीस पडतें.

शाहूची खात्री पटल्यावर त्यानें रामराजास दत्तक घ्यावयाचें पण तें त्याच्या हयातींत घडलें नाहीं. रामराजास सातान्यास आणलें तर आपल्या डोळ्यांदेखत बखेडे होतील व मरणसमयीं चित्तास शांति राहणार नाहीं, कदाचित् रामराजाच्या जिवासही धोका पोंचण्याचा संभव, तेव्हां ज्याच्याकडे राज्यधुरा आपण देणार त्या पेशव्यानेंच नंतर आपल्या पश्चात् तो प्रसंग आपल्या बळावर युक्तीनें पार पाडावा असा हेतु मनांत धरून मुद्दाम शाहूनें रामराजास आणण्याची गोष्ट टाळली असावी. आपल्या हयातींत आपल्या बायकोनें नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध बखेडा करावा, आणि तो आपण पाहवा, ही गोष्ट शाहूस रुचणारी नव्हती. मग मागाहून काय होणार तें होवो, स्वतःच्या बायकोस अटक करा असें प्रधानास सांगण्याची पाळी आपणावर न यावी, एवढीच सोय शाहूनें पाहिली. आपले पश्चात् सकवारबाई सती जाईल व मग आपोआपच हा प्रश्न सुटेल असाही त्याचा उद्देश असावा.

सर्व अधिकार पेशव्याकडे सोंपविण्यांत शाहूचा मुख्य हेतु व्यक्तिप्रेम नसून राज्यहिताचाच होता. पेशव्याखेरीज इतर कोणी सरदार बलाढ्य व राज्यहितषी असा शाहूस दिसता तर शाहूनें त्याच्याकडेच कारभार सोंपविला असता. पण जे कांहीं थोडे सेवक राज्य संभाळण्यास लायक होते त्यांस सर्व सरदारांवर धाक ठेवून राज्य राखण्याचें सामर्थ्य नव्हतें. म्हणून जेणें करून शांतपणें सर्व व्यवस्था पार पाडण्याचा संभव शाहूस दिसला तो मार्ग त्यानें मुक्रर करून ठेविला. रामराजास दत्तक घ्यावें म्हणून सांगतांना सुद्धां राज्यहिताचीच दृष्टी शाहूनें ठेविली होती. नाहींतर ताराबाईचा नातू शाहूस प्रिय असण्याचें कारण नव्हतें. सर्व गोष्टींचा भरपूर खल अनेक वर्षें करून, माणसांची कुवत जोखून, शंकांचें निरसन करून घेऊन, नंतर शाहूनें वरील *याद्या* पेशव्यास लिहून दिल्या असेंच सर्व हकीगत वाचून मनावर ठसतें.

याप्रमाणें निरवानिरव करून ता. १५ डिसेंबर १७४९ रोजीं शाहूछत्रपति मरण पावला. ‘ राज्यास धनी पुत्र करून, सर्वांनीं आज्ञेंत चालून, राज्य देव-ब्राह्मणांचें, तें एकविचारें रक्षावें ’ असें सर्वांस सांगून शाहूनें पेशव्यास बजाविलें कीं, “ आम्हीं देवब्राह्मणांस धर्मादाय, अग्रहार व खेरखैरात, व ज्यांस, भाऊबंद व गोत्रज व आणखी इतर कुणबी मराठे लोक वगैरे नानाजाति यांस, चाकरी-बद्दल व सरंजाम व जहागिरा, व गांव, जमिनी वगैरे लोकांस आम्ही इनाम देणगी दिली आहे, ती तुम्हीं आमचे पाठीमागें चालवावी. कोणास अटकाव करूं नये. आमच्या हातचे देणगीस बाध आणिल्यास व आम्हीं मान दिलेल्या लोकांचा छळ वगैरे केल्यास तुम्हांकडे पेशवाई पद कायम रहाणार नाहीं. ”

शाहू मरण पावल्यावर पेशव्यानें शहराचा बंदोबस्त करून व दादोबा प्रतिनिधि, यमाजी शिवदेव प्रभृति जे सकवारबाईतर्फे बखेडा घालणार होते त्यांवर नजर ठेवून सकवारबाईकडे निरोप पाठविला कीं, ‘आपलें मानस सर्वांस घेऊन महा-राजांच्या आज्ञेप्रमाणें राज्यभार हांकण्याचें आहे, कीं सहगमन करावें असें आहे ?’ जरी सकवारबाई आधीं मनांत अनेक बेत करीत होती तरी शाहूच्या मृत्यूनंतर एकंदर भविष्य डोळ्यांसमोर येऊन तिचा बेत ढळला. तिनें पाहिलें कीं, दादोबा प्रभृति आपल्या साथिदारांत पेशव्यास आवरण्याचा पराक्रम नाहीं. ताराबाईचा नातू तर राज्यावर येणारच; मग मागें राहून इतरांच्या आज्ञेंत वागण्यापेक्षां धर्मा-प्रमाणें कीर्ति मिळवावी हेंच श्रेयस्कर. तेव्हां तिनें पेशव्यास सहगमनाचें साहित्य तयार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तयारी करून कृष्णेच्या कांठीं माहुली येथें संग-

मावर शाहूबरोबर ती सती गेली. इतर तीन नाटकशाळाही सती गेल्या. दहनाच्या जागेवर स्थापिलेली शाळुंका म्हणजे शाहूची पाषाणमूर्ति त्या जागीं अद्याप असून तिची पूजाअर्चा, नैवेद्य, चौघडा वगैरेहि यथास्थित चालत आहे.

मृत्यूनंतर दुसरेच दिवशीं नानासाहेबानें बापूजी खंडेराव चिटणीस, लिंबाजी अनंत व इंद्रोजी कदम ह्या सरदारांस हत्ती, घोडे, जवाहीर, पोषाक, खजिना, कारखाने, शागीर्द वगैरे यथोचित सामान बरोबर देऊन पानगांवास पाठविलें. त्यांनीं रामराजास साताऱ्यास आणिलें. ता. ४ जानेवारी १७५० रोजीं सुमुहूर्तानें शहरांत प्रवेश करवून रामराजास राज्याभिषेक मोठ्या थाटानें करण्यांत आला. पेशव्यानें ठेविलेल्या बंदोबस्तामुळें कांहींही अडचण किंवा विघ्न येऊं शकलें नाहीं. सर्वांची खात्री पटावी म्हणून ताराबाईनें रामराजास घेऊन एका ताटांत भोजन केलें. अष्टप्रधानांच्या नेमणुकाही या प्रसंगीं करण्यांत आल्या. त्यांत फक्त भगवंतराव अमात्य हाच कायतो नवीन माणूस नेमला गेला. पुढें रामराजाची मुंज, लग्नें वगैरे समारंभही माघमासीं झाले. नानासाहेब पेशव्यास आरंभीं तरी रामराजा "तारुण्य राजतेजयुक्त प्राक्तनवान्" असा दिसला. हा पुढें कर्तृत्वशून्य निघेल अशी यत्किंचित् शंका त्या वेळीं कोणाचे मनांत उत्पन्न झालेली दिसत नाहीं.

शाहूच्या राष्ट्रेतिहासांतील कामगिरीचें व स्थानाचें महत्व येथेंच सांगणें योग्य आहे. शाहू छत्रपतीनें नानासाहेबास सुद्धां बोलबोल म्हणतां नरम आणिलें हा प्रकार ध्यानांत घेतल्यास त्या छत्रपतीची इभ्रत व दरारा त्या वेळीं मराठशाहींत केवढा होता याची अटकळ बांधतां येईल. शाहूच्या खऱ्या कर्तबगारीची आठवण मराठमंडळांत हल्लीं बुजालेली दिसते. स. १६८२ त जन्म झाल्यापासून त्याचें बालपण बापाच्या धामधुमीच्या प्रसंगांत संकटमयच झालें. स. १६८९ त संभाजीचा वध होऊन शाहू व त्याची मातुश्री रायगडाबरोबर औरंगजेबाचे हातांत पडलीं, तेथून पुढें त्यांचीं १८ वर्षें बादशहाच्या छावणीबरोबर हिंडण्यांत जनानखान्याच्या कैदेंत गेलीं. हा अठरा वर्षांचा ऐन उमेदीचा शिक्षणाचा काळ जनानी छायेंत कंठण्याची पाळी त्याजवर आल्यामुळें, त्याचा स्वभाव मृदु व निःसत्व बनला. अठरा वर्षें मराठ्यांनीं बादशहाशीं जो प्रचंड झगडा केला, त्याच्या खबरासुद्धां नुसत्या एक तर्फी शाहूस कानानें मात्र ऐकावयास मिळत, त्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याचें त्याच्या नशिबीं नव्हतें. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्यांत दुफळी उत्पन्न करण्याच्या बुद्धीनें अजीमशहानें त्यास बंधमुक्त करून दक्षिणेंत पाठविलें. त्या कठिण प्रसंगीं केवळ उदार व परोपकारी स्वभावा-

मुळेंच त्याचा इकडे निभाव लागला. ताराबाई व संभाजी यांस लगोलग अर्धें राज्य तोडून देऊन त्यांची त्यानें समजूत केली. प्रतिनिधि, दाभाडे, आंगरे, सेनापति जाधव वगैरे मंडळीस कडक शासनानें न दुखवितां त्यानें ममत्वाच्या दृष्टीनें वागविलें आणि मागील अन्याय पोटांत घातले. बाळाजी विश्वनाथ व त्याचे मुलगे पराक्रमी व यशस्वी कार्यसेवक असे ओळखून त्यांस हाताशीं धरून शाहूनें उत्तर हिंदुस्थानांत नवीन राज्यविस्तार करण्याचा उद्योग फैलाविला. दक्षिण हिंदुस्थानचा कार्यभाग त्यानें कोल्हापुरकर संभाजीच्या कर्तृत्वास विभागून दिला होता. तथापि संभाजीच्या हातून तो कार्यभाग रेटेना, हें पाहून कर्नाटकांतही शाहूनें मराठ्यांचा शह बसविण्यांत कसूर केली नाहीं. सारांश, जन्मापासून मरेपर्यंत मराठशाहीशीं या भाग्यशाली शाहूचें पूर्ण तादात्म्य झालें असून त्याजबद्दल सर्वत्र मोठी पूज्यबुद्धि उत्पन्न झालेली होती. त्याजला कोणतेंही व्यसन असल्याचा उल्लेख नाहीं. फाजील मृदु व आरामप्रिय असल्याबद्दल मात्र कित्येक ग्रंथकार त्यास दोष देतात. परंतु या त्याच्या गोड स्वभावामुळेंच मराठशाहीचा विस्तार इतक्या त्वरेनें झाला यांत संशय नाहीं. त्याची राहणी अत्यंत साधी व निरिच्छ होती, त्यामुळें खून करण्यास आलेल्या मारेकऱ्यांसही त्याजवर शस्त्र चालविण्यास धैर्य न होतां, त्यांच्या हातांतलीं शस्त्रें गळून पडलीं. इंद्रोजी कदमासारखे दिमाखदार गृहस्थ लाजेनें खालीं मान घालूं लागले. त्रिंबकराव दाभाडे व रघूजी भोसले यांचा पेशव्याशीं झालेला बेवनाव शाहूनें केवळ आपल्या वजनानें मिटविला. इंग्लंडच्या इतिहासांत व्हिक्टोरिया महाराणीचा लौकिक पुण्यश्लोक म्हणून झळकतो, तशाच स्वरूपाचा शाहूचाही लौकिक त्या वेळीं होता. सर्वांस ममतेनें वागवून दोघांनींही प्रत्येकाच्या लायकीचा उपयोग राष्ट्रकार्याकडे करून घेतला, म्हणून त्यांचे विरोधी लोकसुद्धां त्यांचे भजनीं राहून राष्ट्रकार्य करण्यास प्रवृत्त झाले. पन्नास वर्षें पावेतों मराठी राज्याचें अंतर्बंधन कोणतें म्हणून विचारिलें तर शाहू ही एक व्यक्ति, एवढेंच उत्तर देतां येतें. दुर्दैवानें शाहूच्या पश्चात् राज्यभार उठवून सर्वांवर छाप बसविणारा पुरुष भोसले घराण्यांत निपजला नाहीं, कायदे किंवा नियम कितीही व्यवस्थित केले तरी राष्ट्राचा व्याप उठविण्यास शेवटीं व्यक्तीलाच सामर्थ्य असतें. तशी एक व्यक्ति शाहू ही होती व ती नष्ट होतांच मराठशाहीचें भाग्यही नष्ट होऊं लागलें. एवढ्याचसाठीं शाहूच्या विशिष्ट कर्तबगारीचा वरील उल्लेख येथें करावा लागला आहे. हा मजकूर ध्यानांत ठेवूनच आतां पुढील घडामोडींचा विचार करूं.

## प्रकरण ९ वें.

# मराठशाहींतील परिवर्तन.

शाहू छत्रपतीच्या मृत्यूनें मराठशाहीस निराळें वळण लागलें. छत्रपति हाच सर्व घटकावयवांस एकत्र करणारा मुख्य बंध होता. शिवाजीच्या वेळेपासून मराठशाहींत हें मध्यवर्ती बंधन थोड्याबहुत अंशानें प्रचलित होऊन शाहूच्या अखेरीपर्यंत टिकलें. परंतु तशी छाप सर्व मराठमंडळावर बसविणारा दुसरा पुरुष शाहूचे पश्चात् गादीवर आला नाहीं, त्यामुळें शाहूच्या आज्ञांस अनुसरून जो कारभार पुढें चालू झाला, त्यांत कित्येक नवीन भानगडी उपस्थित झाल्या. छत्रपति नालायक दिसतांच, साताऱ्यास राहून कारभार करणें पेशव्यांस अशक्य होऊन, त्यांनीं पुण्यासच कायमचें वास्तव्य केलें, तेणें करून छत्रपतींचें माहात्म्य खालावून पेशव्यांचें वाढलें. मात्र सरदार व प्रधानमंडळी छत्रपतीपुढें जी नम्रता व पूज्यबुद्धि दाखवीत, ती ते पेशव्यांस दाखविनातसे झाले. त्यामुळें पेशव्यांच्या कारभारास-व अधिकारास मोठेंच वैगुण्य उपस्थित झालें. तसेंच छत्रपतींच्या वेळेस साताऱ्यास मराठशाहीचें स्वरूप होतें, तें इतउत्तर पालटून त्याचे जागीं ब्राह्मणी व्यवस्थेचा प्रादुर्भाव होऊं लागला. जुन्या पिढीजाद मंडळींस हा प्रकार अर्थातच रुचला नाहीं आणि ते पुष्कळ प्रसंगीं पेशव्यांचे विरुद्ध वागूं लागले. ह्या विरोधाचा निरास अद्यापि झालेला नसून त्यांतील कित्येक ठळक मुद्दे पेशव्यांवरचे आरोप म्हणून प्रसंगानुसार चर्चेस निघतात. या आरोपांत मूलतः काय तथ्य आहे, त्याचा साधकबाधक विचार केल्याशिवाय पुढील कारभारांतील भानगडी स्पष्टपणें समजणार नाहींत. एतदर्थ प्रथम अशा कांहीं प्रसिद्ध आरोपांचा आरंभींच विचार करूं.

शाहू महाराजांचे निधनप्रसंगीं पेशव्यानें सकवारबाईस जबरदस्तीनें सती घालविलें असा एक आरोप पेशव्यावर आणण्यांत येतो. ही राणी सती जाऊन तिचा पक्ष आपोआपच गळाल्यामुळें नानासाहेबास रामराजा गादीवर आणतांना फारसे प्रयत्न पडले नाहींत व व्यवस्था लावणें सोपें झालें. ही गोष्ट सहजासहजीं झाली. परंतु पेशव्याचे टीकाकर या साध्या प्रकारामागें जाऊन नानासाहेबानें ही गोष्ट मोठा कट करून मुद्दाम आपल्या फायद्यासाठीं घडवून आणली असा आरोप त्यावर लादतात. हा आरोप मुळांत प्रतिनिधि व यमाजी शिवदेव प्रभृति पेशव्याच्या विरोधकांकडून निघाला कीं काय तें समजत

नाहीं. मात्र त्यास वकिली बाण्याचें स्वरूप इंग्रजशाहीच्या आरंभीं दिलें गेलें. गेलं तें राज्य पुंड पेशव्यांचें, महाराज छत्रपतींचें राज्य कायमच आहे, असा भेदबुद्धीचा बहाणा इंग्रज राज्यकर्ते सातारच्या प्रतापसिंहाच्या वेळेस मतलबानें करूं लागले, तेव्हां त्या मताचें प्रतिपादन करणारे इतिहासलेखकही निर्माण झाले. शिवाय बाजीरावाच्या कारभारानें असा परिणाम लोकांच्या मनावर थोडाबहुत होणें शक्यही होतें. ग्रँड डफनें या प्रकरणीं असा अभिप्राय दिला आहे कीं, "अशा रीतीनें जबरदस्तीनें सकवारबाईला आगींत लोटण्यापेक्षां पेशव्यानें तिला उघडपणें फांशीं देणेंही कमी नीच झालें असतें, आणि तें पुरुषार्थाला शोभलें तरी असतें." ग्रँड डफच्या या अप्रयोजक आरोपाचें खंडण करण्याचें प्रयोजन आतां राहिलेलें नाहीं. दुराग्रहदूषित जे लेखक असतात ते असल्या बाबतींत न्यायबुद्धीनें अभिप्राय देण्यास लायक नाहींत. त्याप्रमाणेंच पाश्चात्यांस व आजच्या दृष्टीनें पहाणाऱ्या आपल्यांतील टीकाकारांसही सतीचा त्या वेळचा प्रकार कितीही किळसवाणा वाटला तरी त्याचा निर्णय तत्कालीन लौकिक भावना ध्यानांत घेऊनच केला पाहिजे. बाई सती गेल्यानें पेशव्याचें काम कदाचित् थोडेंबहुत हलकें झालें असेल, पण एवढयावरून केवळ स्वार्थबुद्धीनें पेशव्यानें तिला चिडवून सती घालविलें असें सिद्ध होत नाहीं आपण हिंदूच आहोंत; तरी पण तत्कालीन स्थितीशीं तादात्म्य कल्पून या गोष्टीकडे पाहिल्याशिवाय या बाबतीचें रहस्य कळणार नाहीं. तशा दृष्टीनें पाहतां कै. वासुदेवशास्त्री खरे यांनीं मांडलेले पुढील मुद्दे कोणाच्याही लक्षांत उतरतील व त्यांचें यथार्थत्व मनास पटेल. ते मुद्दे येणेंप्रमाणें:—

( १ ) पुराव्यावरून पाहतां सकवारबाईस सती जाण्याचा निरोप पाठविण्यांत एकटा पेशवाच प्रमुख नसून, त्या वेळीं जमलेल्या सर्व प्रमुख मंडळीचा त्यांत भाग होता. किंबहुना त्यांत ताराबाई अग्रेसर होती. सकवारबाईसही कदाचित् कारभाऱ्यांचा ताबा पुरवला असता, परंतु ताराबाईचा पुरवणार नव्हता. प्रत्यक्ष सकवारबाईचा बाप व भाऊ यांनींच तो प्रकार घडवून आणिला.

( २ ) ही चाल हल्लीं कितीही क्रूर व वेडगळ भासत असली तरी त्या वेळीं सर्वत्र प्रचलित होती. बहुधा सती जाणें हा नियम व न जाणें हा अपवाद समजला जाई. न जाण्यास योग्य प्रापंचिक कारणें असतील तर गोष्ट निराळी. एरवीं जिला असें कांहीं कारण लागू नाहीं, तिची साहाजिक प्रवृत्ति सती जाण्याकडे कोणीं न सांगतांच होत असे.

( ३ ) राजे लोकांच्या सत्कीर्तीचें व वैभवाचें वर्णन कर्तव्य असतां, त्यांच्या शवाबरोबर किती बायका व दासी सती गेल्या हेंही मुद्दाम सांगण्यांत येई. कान्होजी आंगरे, रघूजी भोसले, प्रतिनिधि वगैरे सर्व तत्कालीन प्रसिद्ध पुरुषांबरोबर अनेक बायका व दासीसुद्धां सती गेल्या असें नमूद आहे. तात्पर्य, वैभवाचें व सुकीर्तीचें अनुमान करण्यास हें एक गमक मानण्यांत येई. हें विधान विशेषतः रजपुतान्यास सर्वथा लागू होतें. उदेपूर, जयपूर येथील राजांशीं बरोबरी, किंबहुना वरचढ करण्याची शाहूला हौस होती हें निर्विवाद आहे. हिंदुधर्मासाटीं तूं काय केलेंस, मीं काय केलें, असा त्याचा जयसिंगाशीं वादही झाला होता.

( ४ ) सकवारबाईच्या वयास पन्नाशी उलटली असावी. तिला मूल वगैरे पाश कांहींही नव्हता. तिचा प्रपंच झालेला होता. शाहूची सती जाण्यासारखी दुसरी लग्नाची राणी हयात नव्हती. तेव्हां सकवारबाईनें सती जाणें हें शाहूच्या लौकिकाला, बाईच्या कीर्तीला व महाराष्ट्राच्या नांवाला साजेसेंचसें काय, पण आवश्यक होतें.

( ५ ) शाहूविषयीं नानासाहेबाची भक्ति केवळ लौकिकी नसून निस्सीम होती ही गोष्ट अनेक बाबींवरून सिद्ध करतां येण्याजोगी आहे. शाहू मेल्यावर त्याच्या पादुका पर्वतीवरील मुख्य मंदिरांत ठेवून पुजणाऱ्या नानासाहेबास काय, किंवा शाहूच्या बरोबरच्या इतर नोकरांस काय, धनी मेल्यावर त्याच्या कीर्तीस कलंक लागेल अथवा न्यूनता येईल असें त्याच्या लग्नाच्या स्त्रीनें वर्तन करणें, रुचणारें नव्हतें. सती जाण्याचा निश्चय आगाऊ महिना दोन महिने सर्व राज्यांत जाहीर करून आयत्या वेळीं आपण जात नाहीं असें सकवारबाईनें म्हणणें; जन्मभर सहचारिणीचें वैभव भोगून, नवऱ्यास परलोकींच्या प्रवासांत एकटाच सोडून, इहलोकीं केवळ बखेडे करण्याची हौस पुरवण्याकरितां, शाहूच्या विधवेनें, जिला मूलबाळ नाहीं व जी वृद्ध झालेली अशा स्त्रीनें सती न जाणें हें त्या काळीं कोणासच पसंत पडण्याजोगें नव्हतें. कार्य साधण्यासाठीं कांगावा करण्याचे प्रकार आहेत त्यांतला सती जाण्याचा पुकारा करणें हा एक प्रकार असें कोणीही म्हणणार नाहीं. मृताविषयीं लोकांत जी पूज्यबुद्धि असते तिला असल्या कांगाव्यानें धक्का बसतो, त्यांत मृताची चेष्टा केल्यासारखें होतें.

शिवाय, सकवारबाई सती न जाती तर पुढील इतिहासाचा ओघ बदलला असता किंवा जास्त यशस्वी झाला असता, असें मानण्यासही कांहीं कारण दिसत नाहीं. पुराव्याच्या दृष्टीनें पाहतां या कामीं ताराबाईचा आग्रह विशेष होता, हें

नमूद आहे. 'सकवार राहिल्यास राज्याचा डोहाणा करील, राज्य बुडवील, कोणाचे पाय भुईस लागूं देणार नाहीं, याकरितां ( शाहू ) वरोबर राहील तर फार चांगलें, सहगमनाचा विचार कळेल तसा तिनें करावा,' असे ताराबाईचे शाहूच्या मृत्युसमयींचे उद्गार आहेत. तसेंच 'प्रतिनिधि, अक्कलकोटकर, दाभाडे, राजाज्ञा आदिकरून लहानथोर एक विचारें मनसोबा ठरला कीं, 'सकवारबाई-साहेबांस सती घालवावी, न जातील तर बळें न्यावी. महाराजांमागें दुर्लौकिक बखेडा करितील.' असेंही नमूद आहे. बाईच्या बंधूंनींच पेशव्यास व चिटणीसास येऊन सांगितलें कीं, '( सहगमनाची ) सिद्धता करावी, गेली तर बरें न गेली तर आम्ही तिला नेतों.' 'राजश्री ( शाहू ) च्या कानांतील कुड्यांची जोडी प्रसाद म्हणून सकवारबाईनें पेशव्यास दिली' असें लिखित आहे. अशा सर्व लिखाणांचा विचार करितां असें स्पष्ट दिसून येतें कीं, पेशव्याची मनोभावना त्या कालास अनुसरून बाई सती गेल्यास उत्तम अशी असली, तरी तिनें मागें राहण्याचा हट्ट धरल्यास जबरदस्तीनें तीस सती घालवण्याची त्याची इच्छा सिद्ध होत नाहीं. मात्र राज्य-यंत्र ताब्यांत घेण्याचा त्यानें पूर्ण निश्चय केला होता व तशीच वेळ आल्यास जय्यत तयारीही ठेवली होती. आतां लोकांचा रोष, स्वजनांची निंदा व बाईच्या साहाय्यकांस गुंडाळून ठेवून शाहूच्या आज्ञेप्रमाणें राज्याचा आटोप करण्याची पेशव्याची तयारी, येणेंकरून बाईच्या मनांतील इंगितांत सती न जाण्याची ( टीकाकार म्हणतात तशी ) इच्छा असलो असें धरलें, तर त्यांत पेशव्याचा कोणता अपराध ?

पेशव्यावरील दुसरा आरोप असा आहे कीं, त्यानें मुद्दाम अकर्तृत्ववान् राम-राजास गादीवर आणून छत्रपतींकडून राज्य बळकावण्याची पूर्वतयारी केली. हाही आरोप पहिल्यासारखाच परिणामावरून हेतु ठरविणारा, मत्सरग्रस्त टीकाकारां-कडून निघालेला आहे. उपलब्ध पुरावा पाहतां, खुद्द स्वतः नानासाहेबाच्या मता-वरच सर्व अवलंबून असतें तर, त्यानें आधींच करार केल्याप्रमाणें कोल्हापुरच्या संभाजीस गादीवर आणून शिवशाहीचीं दोन छकलें जोडलीं असतीं. पेशव्याचा ओढा कोणत्याही व्यक्तीकडे प्रामुख्यानें असा त्या वेळीं मुळींच नव्हता. राज्यहित एवढाच हेतु सदैव मनांत वागवून त्याप्रमाणें तो वागत होता. परंतु पेशव्याच्या वरील इच्छेविरुद्ध शाहूचीच भावना होती. त्यानें स्पष्टच 'कोलापुरचें न करणें' अशी आज्ञा केली; तेव्हां पेशव्यास आपले करार व इच्छा बाजूस ठेवावीं लागलीं. सकवारबाईस पेशव्याचा ओढा संभाजीकडे आहे हें ठाऊक असल्यामुळें, शाहूनें

रामराजाचा विचार केला तेव्हां तिनें संभाजीसच साताऱ्यास बोलावलें. हेतु हा कीं यामुळें तरी पेशव्यास पेंच पडून तो आपल्या बाजूस वळेल. परंतु नानासाहेबाचा हेतु शाहूच्या आज्ञेचें उल्लंघन करण्याचा कधींच नव्हता. तशी त्याची प्रवृत्ति असती तर, राजकारणांत अनेक वेळां शाहूची इच्छा शिस्तीच्या व न्याय्य राज्यकारभाराच्या आड येई, तेव्हां पेशव्यास आपल्या इच्छेप्रमाणें वागणें हें राज्यहितास पोषक व सोइस्कर झालें असतें. परंतु शाहूची 'जुनें मोडूं नये व नवें करूं नये' ही अशक्यप्राय इच्छा पेशव्यांचे हातपाय अनेक प्रसंगीं बांधून ठेवीत असे. शाहूच्या निधनानंतर सुद्धां पेशव्यांना आपलें राजकारण या इच्छेच्या अनुरोधानें चालवावें लागे. या वेळीं शाहूनेंच संभाजीस 'तुम्हीं साताऱ्च्या भानगडींत पडूं नये' असें कळविल्यामुळें सकवारबाईनें घातलेला पेंच, परस्पर सुटला. पण त्यामुळें दोन गादींचा प्रश्न कायमचा पेशव्याच्या आड येत राहिला; आणि त्यामुळें एकंदर राज्याचें कसें नुकसान झालें हें पुढें दिसून येईल. सारांश, या बाबतींत पेशव्यानें कायमचा त्रास सोसण्याचें अंगावर घेऊन सुद्धां शाहूची आज्ञा पाळली.

ताराबाईसारख्या कारस्थानी बाईचा नातू गादीवर आणण्यांत पेशव्यानें शाहूची आज्ञा पाळली, यांत त्याचा असाही हेतु असावा कीं, त्यामुळें बाईचे पक्षपाती लोक नव्या राजाच्या बाजूस यावे, तेणेंकरून राज्यास मदत व्हावी, आणि त्यांनीं निजामासारख्यांशीं घातक कारस्थानें करीत बसूं नये. परंतु अंतीं हाही हेतु सिद्धीस न जातां बाईस गुंडाळून ठेवूनच नानासाहेबास राज्यभार वाहावा लागला.

वास्तविक पहातां पुढें होणारा राजा स्वबुद्धीचा, खंबीर, पराक्रमी व स्वतः राज्याचा कारभार पाहणारा असणें हेंच पेशव्यास इष्ट होतें. त्यामुळें घरच्या क्षुल्लक भानगडींत वेळ न मोडून, आपलें हिंदुपदपातशाहीचें काम तडीस नेण्यास त्यास मोकळीक मिळाली असती. त्या काळीं लोकांत राष्ट्राभिमानाचा अभाव असून, फक्त राज्याभिमानाचेंच प्राबल्य असल्यानें स्वतःच्या पराक्रमानें सर्व सरदारांस जरबेंत ठेवून त्यापासून राज्याचीं कामें घेणारा छत्रपति गादीवर असता तर हिंदुपदपातशाहीचें कार्य पेशव्यानें हां हां म्हणतां तडीस नेलें असतें. पण रामराजा अगदींच मळमळीत निघाल्यामुळें नानासाहेबाचें कार्य दुष्कर झालें व तें शेवटीं बिघडलेंही. उलटपक्षीं रामराजास बाहेर काढण्यांत ताराबाईचा असा हेतु होता कीं, त्यास हाताशीं घेऊन त्याच्या नांवानें आपण मन मानेल तसा कारभार करावा. राष्ट्राभिमानापेक्षां तिच्यांत वैयक्तिक महत्वाकांक्षा व मत्सर हीं जास्त प्रबल होतीं. पण

तिच्याही जेव्हां प्रत्ययास आलें कीं रामराजा केवळ मेषपात्र आहे, कारभाऱ्यांस लगामीं ठेवून राज्याचा आटोप करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नाहीं, तेव्हां तिची तोंडघशीं पडल्याप्रमाणें स्थिति झाली, व पेशव्याविरुद्ध तिचीं कारस्थानें सुरू झालीं. हीं कारस्थानें मोडून काढतां काढतां पेशव्यास पुरेवाट झाली. त्यांची हकीकत पुढें देण्यांत येईल.

सारांश, या आरोपाचा विचार करतां असें स्पष्ट दिसतें, कीं नानासाहेबानें रामराजास कधींच पाहिलें नसल्यामुळें तो पराक्रमी आहे कीं कर्तृत्वहीन आहे हें त्यास ठाऊक नव्हतें. उलट ज्याच्या नशिबीं राज्य येतें तो भाग्यवान् असतोच या अंध श्रद्धेनें त्यानें 'राजश्री राजतेजयुक्त प्राक्तनवान्' आहेत, असेंच आरंभीं सरदारांस कळविलें; आणि या राजतेजामुळेंच अडचणी न येतां राज्याचा वंदोबस्त झाला असेंही थोडा वेळ पेशव्यास वाटलें. खरें पाहिलें तर नानासाहेबाच्या चोख व्यवस्थेमुळें व जय्यत तयारीनेंच येऊं घातलेल्या विघ्नांचें निरसन झालें; केवळ श्रद्धाळुपणामुळें पेशव्यास तो राजाच्या भाग्याचा प्रताप वाटला. अर्थात् पेशव्यानें कर्तृत्वहीन राजा मुद्दाम राज्यावर आणला हें म्हणणें मुळांतच खोटें ठरतें. पुढें पेशव्यांची या 'राजश्री'बद्दल निराशा झाली तेव्हां दोनच महिन्यांत म्हणजे (ता. १६ मार्च १७५०) रोजीं पेशवा दीक्षितांस लिहितो, 'राजश्री स्वामी तों मळमळीत. दोन्हीकडे आहेत. आणखी किती दिवस गुंता होईल तो न कळे. एतदर्थी कांहीं दैवी उपाय, राजश्रींची कृपा आम्हांवर होय, आम्हांस निरोप देत, ऐसा असला तरी करावा.' म्हणजे रामराजास स्वतःचें ज्ञान बिलकुल नाहीं, त्यामुळें उपद्व्यापी लोकांस गोंधळ घालण्यास सवड होते व आपली निष्कारण कुचंबणी होते हें ओळखून या प्रकारास पेशवा इतका कंटाळला कीं, दैवी उपायांची त्यास आवश्यकता भासूं लागली. यावरून हेंही स्पष्ट होतें कीं अशा मळमळीत राजाचीही अवज्ञा करण्याचा पेशव्याचा इरादा नव्हता. ईश्वरानेंच त्यास सुबुद्धि द्यावी अशी त्याची इच्छा होती. राज्याचा अपहार करावा एवढीच पेशव्याची आकांक्षा असती तर राजा वाईट निघण्यांत त्याचें काय वेंचत होतें ?

पुढें ताराबाईनें हा मुलगा कर्तृत्वहीन निघाला असें पाहून, तो आपला नातूच नव्हे असा कांगावा आरंभिला. रामराजाच्या अस्तित्वाचा पुकारा करून त्याला पुढें आणण्याला हीच बाई कारणीभूत झाली; इतरांस मागें सारून त्यास राजा करण्यांतही तिनेंच पुढाकार घेतला; लोकांस आलेली शंका एका ताटांत जेवून हिनेंच फेडून

टाकली; व इतकें करून पुन्हां तो मनाप्रमाणें निघाला नाहीं तेव्हां तो खोटाच असा उलट पुकारा करण्यासही ती मागें सरली नाहीं. या सर्व गोष्टींत ताराबाईचा स्वभाव पुरा कळून येतो, त्यावर टीका नलगे. पण पेशव्यानें मात्र एकदां जो रामराजाचा पक्ष धरला तो सोडला नाहीं. खरा असो खोटा असो, एकदां गादीवर आला त्याची तड पेशव्यांनीं अखेरपर्यंत पोंचविली. ताराबाईनें त्यास कैदेंत ठेविलें तेव्हां त्याची सोडवणूक व्हावी म्हणून पेशव्यानें अनेक खटपटी केल्या, पण या नाजूक प्रकरणीं धन्यावरच तोफा रोखून त्याची सुटका करणें शक्य नसल्यानें गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. पण त्यामुळें नानासाहेबाची छत्रपतींवरील भक्ति खरी कीं लौकिकी होती याचा उलगडा होतो. रामराजा खोटा होय अशी पुढें खात्री झाल्यावर त्यासंबंधानें करार वगैरे करण्यांत आले ते पहाण्याजोगे आहेत.

पेशव्यावरील तिसरा आरोप त्यानें छत्रपतीचें सर्व राज्य बळकावलें असा आहे. या आरोपांत तरी वरच्या आरोपांइतकेंच तथ्य आहे. पेशव्यानें आपण होऊन राजास गुंडाळून ठेवलें कीं तेच कर्तृत्वहीन म्हणून मागें पडले ? दुसऱ्या सरदारांनीं केवळ स्वार्थावर नजर ठेवून राज्याचा भार आंगावर घेण्याची टाळाटाळी चालविली म्हणून पेशव्यास तो भार आपणावर घ्यावा लागला कीं त्यांस दूर सारून पेशव्यानें तो आपणाकडे घेतला ? वगैरे प्रश्न प्रत्येक प्रसंगाचा वेगवेगळा विचार करून ठरविले पाहिजेत. पण ही गोष्ट निःसंशय आहे कीं, शाहूनें रघूजी भोसले, सेनापति दाभाडे प्रभृति मंडळीस साताऱ्यास येऊन राज्याचा भार आंगावर घेण्याची त्यांची तयारी आहे किंवा कसें असें विचारलें असतां एकानेंही जबाबदारी आंगावर घेण्याची तयारी दाखविली नाहीं. शिवाजीच्या निधनानंतर साऱ्या दक्षिणेंत अराजक माजलें. त्यांत जे मराठे सरदार पुढें आले त्यांच्यांत दिवसें दिवस राज्याची शिस्त लयास जाऊन केवळ स्वार्थ बोकाळला. त्यामुळें छत्रपतींस ते नांवापुरते तरी आपणांस मानतात हेंच पुष्कळ असें मानून स्वस्थ बसणें भाग पडलें. शाहूनें अनेकवार सरदारांची कान उघाडणी करावी तरी ते एक राज्याच्या शिस्तीनें कधींच वागत नसत. त्यांस थोडाबहुत आळा पेशव्यांनींच घातला असें इतिहास स्पष्ट सांगतो. जोंपर्यंत मोहिमांवर जाणारे सर्व सरदार व प्रधान एका सेनापतीच्या हुकमतींत असत, तोंपर्यंत राज्याचे इतर कारभारही छत्रपतींच्या मध्यवर्ती राजधानींतून चालत. पण आतां हे सरदार आपआपल्या पुरते सेनापति बनल्यामुळें त्यांच्यावर हुकमत चालवायची तर ती कागदी हुकमानें न चालतां फक्त

फौजेच्या बळावर चालवण्याचा काळ आला. त्रिंबकराव दाभाड्याच्या मरणानंतर हुजरातीची अशी फौज फक्त पेशव्याच्या हातांत होती, व इच्याच जोरावर राज्यांत हुकमत चालवायची असल्यामुळें ती चालविणारा जो पेशवा तो इतरांच्या स्वार्थाच्या आड येऊं लागून सवत्या सरदारांचा जणूं दुष्मन् बनला. जर पेशव्यानें अशी हुकमत चालविणें हेंच राज्य बळकावणें असेल तर अशी हुकमत चालवल्याखेरीज, मराठ्यांची जी थोडीबहुत, स्वार्थमूलक व मतलबापुरती तरी एकी इतर सत्ताधीशांस जाणवे, ती कशी राहूं शकली असती? केवळ राज्याच्या हिताच्या दृष्टीनें बोलावयाचें तर, पेशव्यानें वेळोवेळीं चालविली त्यापेक्षांही जास्त हुकमत चालविली पाहिजे होती, तशी चालविण्यास तो समर्थ व स्वतंत्र नसल्यामुळें मराठ्यांचें राजकारण नेहमीं विस्कळीत राहिलें व अंतीं त्यामुळेंच राज्यनाश झाला असें इतिहासावरून दिसून येतें.

छत्रपतींच्या पेशवाईचा कारभार चालविणें हें हिंदुस्थानच्या तत्कालीन परिस्थितींत किती भानगडीचें व जोखमेचें काम होतें याचें विवेचन मागें दिलेंच आहे. शाहूच्या आज्ञेनें पेशव्यांस आतां शिवशाहीची कुलमुखत्यारी मिळाली, तरी त्याच्याच दुसऱ्या आज्ञेनें त्याचे हातपाय कायमचे बांधले जाऊन त्यास राज्याच्या हितासाठींसुद्धां अनेक गोष्टी करण्याची मोकळीक राहिली नाहीं. ती आज्ञा म्हणजे जुनें न मोडण्याची व नवें न करण्याची. जुनें मोडूं नये याचा अर्थ छत्रपतीनें दिलेली जहागीर काढून घेण्याचा वा दुसऱ्यास नवीन देण्याचा अधिकार पेशव्यास नाहीं असा त्याचा अर्थ, स्वार्थी, मेषपात्र, व ज्यासाठीं जहागीर दिली तें कर्तव्य करण्यास असमर्थ असे जहागिरदार करीत. आधींच सरंजाम देतांना जितकी फौज घेऊन चाकरीस येण्याचा करार असे त्याच्या योग्य खर्चापेक्षां पुष्कळच मोठी जहागीर हे सरदार शाहूकडून उपटीत; व इतकें करूनही ती थोडी फौजही मोहिमेस योग्य स्थितींत न ठेवतां उत्पन्नें मात्र खर्चून टाकीत. जर अशा कामचुकार लोकांस व शत्रूंसही मिळतांना मागेंपुढें न पाहणारास शिक्षा करण्याचा अधिकार पेशव्यास नाहीं तर त्यानें राज्याचें रक्षण कसें करावयाचें? ही शिक्षा एकच स्वरूपाची असली तरच ती परिणामकारक होणार व तें स्वरूप म्हणजे जहागीर खालसा करण्याची तयारी. पण हा अधिकार तर शाहूच्या सनदेनें पेशव्यास राहिला नव्हता. छत्रपतीचें बहुतेक राज्य अशा सरंजामी सरदारांत विभागलेलें असल्यामुळें राज्याच्या वृद्धीस व रक्षणास लागणाऱ्या फौजेचा खर्च पेशव्यास अन्य मार्गांनीं बरेच वेळां भागवावा लागे व जरूरीमुळें हे मार्गही

बरेवाईट, न्याय्यअन्याय्य असणें अपरिहार्य होई. अशा विलक्षण पेंचांतून पेशव्यानें तारतम्यज्ञान, कालविशेष पाहून राज्य हांकण्याची शिकस्त केली व तें करतांना हिंदुपदपातशाहीची मराठ्यांची मूळ आकांक्षाही शक्य तितकी पुरी करण्याचा प्रयत्न केला, याबद्दल विचारवंतांस संशय राहात नाहीं. आतां हा सर्वाधिकार चालवितांना त्यांस हिंदुस्थानच्या राजकारणांत जें साहाजिकच प्रमुखपण प्राप्त झालें त्यास छत्रपतींच्या राज्याचा अपहार असें कोणी म्हणत असल्यास खुशाल म्हणावें.

प्रमुखपण हें कर्तबगारीवर अवलंबून राहतें. जीं घराणीं पराक्रमांत मागें पडलीं त्यांची प्रमुखपणापासून च्युति झाली तर त्यांत सृष्टिनियमबाह्य तें काय? ही जगाची अनादिसिद्ध राहाटी आहे. पण त्यामुळें जे मागें पडले त्यांचें सर्वस्वहरण जे पुढें आले त्यांनीं केलें असें म्हणणें योग्य होईल काय? भोसले, प्रतिनिधि, दाभाडे वगैरे घराणीं मागें पडलीं ही काय पेशव्याची कारवाई समजावयाची? किंवा शिंदे, होळकर, पवार, गायकवाड हे पुढें सरसावले ते काय केवळ पेशव्याच्या कृपाप्रसादानें? त्या काळीं कोणत्याही कर्तबगार माणसास एवढें कार्यक्षेत्र मोकळें होतें कीं दुसऱ्याच्या कृपेची वा रोषाची, कदर करण्याचें त्यास कारण नव्हतें. ज्यांनीं अशा संधीचा फायदा घेतला नाहीं ते नालायक होते असेंच म्हटलें पाहिजे. त्यांनीं आपल्या कमकुवतपणाचें खापर पेशव्यावर फोडून कसें चालेल?

वास्तविक एखाद्या व्यक्तीच्या कृत्यांची न्यायमीमांसा कर्तव्य असतां, ती व्यक्ति तें कृत्य करण्यास समर्थ कशी झाली हें न पाहतां त्या कृत्यामुळें त्या व्यक्तीनें स्वतःचा स्वार्थ साधला कीं कसें हें पाहणेंच योग्य होय. पेशव्यास सर्वाधिकार मिळून मराठशाहीचा पुढारी होण्याची त्यास कशी पात्रता आली हें विचारणेंच अप्रयोजकपणाचें आहे. पात्रता ही लायकीमुळें येते हेंच असल्या प्रश्नांचें कायमचें उत्तर. पुढारीपण आल्यावर मात्र पेशव्यानें केवळ स्वार्थच साधला कीं राष्ट्रहित पाहिलें? या प्रश्नाचें उत्तर पाहिजे असल्यास, मराठ्यांच्या इतिहासांतून पेशव्यांच्या कारकीर्दी वजा करा आणि बाकी काय राहातें तें पहा. आज मराठ्यांचें नांव जें आसेतुहिमाचल गाजत आहे त्याचें बरेंचसें श्रेय पेशव्यांच्या धडाडीस आहे. त्यांच्याच कर्तबगारीमुळें व राष्ट्रहितेषणेमुळें शिवाजीचा उपक्रम उठावदार दिसतो. पायावांचून कळस नाहीं हें यद्यपि खरें आहे, तरी कळस उठविणाराची योग्यता त्यामुळें कमी म्हणतां येत नाहीं.

निर्मल दृष्टीनें पहाणारांस वरील विवेचनावरून कळून चुकलेंच असेल कीं, प्रतिनिधि, रघूजी भोसले, गायकवाड प्रभृति पेशव्यांच्या विरोधकांत व त्याच्या नांवानें बोटें मोडणाऱ्यांतच पेशव्यापेक्षां जास्त अपहारबुद्धि होती. त्यांस नागपूर, बडोदें वगैरे आपआपल्या ठिकाणांत राहून स्वतंत्र राज्यें वाढविण्याची हांव होती. म्हणून त्यांतील कोणी पेशव्याप्रमाणें राज्याचा बोजा घेण्यास तयार झाला नाहीं. उलटपक्षीं पेशव्यास अपहारबुद्धि होती असें मानलें तरी राष्ट्राच्या हितास धरून पोषक स्वरूपाची ती असल्यामुळें निंद्य नाहीं.

सरदारांच्या गृहकलहांत हात घालून त्यांचा उच्छेद करण्याची नानासाहेबाची रीत असे, असा एक आरोप कित्येक ठिकाणीं केलेला आढळतो. हा आरोप पुराव्यानें सिद्ध होत नाहीं. उलट अनेक घराण्यांच्या दौलतींचें रक्षण करण्याची पेशव्यानें शिकस्त केली असे पुरावे आहेत. उदाहरणार्थ जयराम सावंत व रामचंद्र सावंत या चुलत्यापुतण्यांत भांडणें लागलीं तेव्हां पेशवा लिहितो. "........उभयतां कलहास प्रवर्तले ही गोष्ट त्यांचे महत्वास व दौलतोचे रक्षणास योग्य नव्हे. गृहकलह निर्माण होणें हेंच दौलतीचे अपायास कारण. तुम्ही बुद्धिमंत आहां, तुम्हांस न कळेसारखें काय आहे ? आमचा व त्यांचा स्नेह, उभयपक्षीं भिन्नता नाहीं. **त्या दौलतीस अपाय म्हणजे आपलेच पदरचें गेलें असें आहे......** ...तुम्हीं सर्व मंडळी एक विचार होऊन उभयतांचा कलह निवारणें. क्षुद्र बुद्धीनें कोणी उभयतांस लढवितील, त्यांचा परिच्छिन्न मुलाहिजा होणार नाहीं, अशी सर्वत्रांस ताकीद करणें—" पेशव्याचे हेतु समजण्यास असलीं पत्रें फार उपयोगी आहेत. शिंदे होळकरांत भांडणें वाढूं नयेत म्हणून नानासाहेबानें केवढी शिकस्त केली हें मागें सांगितलेंच आहे.

पेशव्यांनीं आपलेच जातभाई पुढें आणले असाही आरोप पेशव्यांवर आहे. हा आरोपही आभासात्मक आहे. सबंध पेशवाईंत, शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड वगैरे मराठे सरदारांहून मुलुखगिरींत श्रेष्ठतर अशीं ब्राह्मण घराणीं झालीं नाहींत. त्यांच्यापुढें पटवर्धन, विंचुरकर, पुरंदरे, पेठे, एकबोटे, बुंदेले प्रभृति ब्राह्मण सरदार हे क्षुद्र दिसतात. वकिलात, कारकुनी, हिशेबी, वगैरे राज्यकारभाराच्या क्षेत्रांत ब्राह्मण पुढें होते ते त्यांच्या कारकुनी लायकीमुळें. मराठे मंडळीस कारकुनीपेक्षां सरदारी जास्त प्रिय होती. शिवाजीसारखा छत्रपति असता तरी या क्षेत्रांत ब्राह्मणांचीच गर्दी दिसली असती. त्यांत पेशव्यांचा

पक्षपात हें मुख्य कारण नसून समाजरचनाच त्या स्वरूपाची होती. तसेंच कोणीही कारभारी झाला तरी महत्वाच्या कामांवर आपल्या जवळचे भरंवशाचे आप्तइष्टमित्रच तो नेमणार, त्यांत जातीचा पक्षपात नसून मनुष्याच्या मनोरचनेचें तें एक दृश्य आहे एवढेंच. तसेंच शिंदे, होळकर, भोसले प्रभृतींच्या पदरीं जे ब्राह्मण होते ते पेशव्याचे पक्षपाती होते असें थोडेंच आहे ? ते पेशव्याचें नुकसान करूनसुद्धां आपल्या धन्यांचीं हितें साधण्यास मागेंपुढें पाहत नसत. या सर्व विवेचनावरून हा पक्षपाताचा आरोपही लंगडाच ठरतो.

वरील खंडणावरून असें समजावयाचें नाहीं कीं पेशवे हे मूर्तिमंत सद्गुणांचे पुतळे होते. त्यांच्यांतही मनुजसहज गुणदोष होते. पण ते मात्र लबाड व इतर सर्व साव असें प्रतिपादन करणाऱ्यांस हें उत्तर आहे. गुणदोषांचा, कर्तबगारीचा व राष्ट्रहिताचा एकत्र विचार करतां तत्कालीन सत्ताधीशांत पेशवे हे पुष्कळच वरच्या पायरीचे होते हें कोणासही कबूल करावें लागेल.

---

## प्रकरण १० वें.

# सांगोल्याची व्यवस्था.

ता. ४ जानेवारी स. १७५० रोजीं रामराजास छत्रपतिपद मिळालें. याचें नांव मूळचें राजाराम असेंच होतें. परंतु ताराबाईला नवऱ्याचें नांव उच्चारावयाचें नसल्यामुळें तिनें या नातवाच्या नांवाचा व्युत्क्रम केला. पेशवा नानासाहेब ता. २३ जून १७६१ रोजीं वारला. हा अकरा वर्षांचा काल जसा मराठशाहीच्या विस्तारासंबंधानें अत्यंत स्मरणीय आहे, तसाच तो विशेष भानगडीचा व मतवैचित्र्याचाही आहे. या कालांत शिवशाहीच्या कारभाराचें रूपांतर होऊन त्याचें चालकत्व छत्रपतींच्या घराण्याकडून पेशव्यांकडे आलें. या अकरा वर्षांत ब्राह्मण व मराठे मुत्सद्यांनीं व सरदारांनीं राज्यकारभार व रणसंग्राम या दोनही बाबतींत आपल्या करामतीची पराकाष्ठा करून दाखविली. शिवछत्रपतीच्या मनांतलें अंतिम ध्येय पूर्णत्वास पोंचविण्याची जबरदस्त हांव व तत्संबंधीं निकराचा उद्योग मराठमंडळाच्या ठिकाणीं याच कालांत निदर्शनास आला. याच अकरा वर्षांत सूर्यास्तरहित, जगद्व्यापी, ब्रिटिश साम्राज्याचा पाया हिंदुस्थानच्या दक्षिणोत्तर भागीं भक्कम व अचल

स्थापला गेला. हा पाया पुढेंमागें उखडून देण्याची थोडीवहुत ताकद दक्षिणच्या मराठ्यांत व उत्तरेंतील मुसलमानांत आहे असा कांहीं संभव असला तर तो संभव या दोनही सत्तांचा पानपतावर चुराडा होऊन नाहींसा झाला. सारांश, राजकीय दृष्ट्या हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत या कालाचें महत्व अतोनात आहे. सन १७१८ त बाळाजी विश्वनाथानें चौथाई सरदेशमुखीच्या सनदा मिळवून जो उपक्रम केला त्यांचा फलितार्थ या अकरा वर्षांच्या धडपडींत दृग्गोचर होतो. अर्काट, म्हैसूर, बेदनूर, अहमदाबाद, लाहोर, अटक, अंतर्वेद, अयोध्या, काशीवरून पूर्वेस बंगाल कटक पावेतों हिंदुस्थानच्या आत्यंतिक स्पष्ट मर्यादांस या अकरा वर्षांतील मराठ्यांच्या उद्योगानें व्यापलें होतें. स्थळ, काल, व्यक्ति, संग्राम, विजय, पराभव, खून, मृत्यु, गैरसमज इत्यादिकांची अशी कांहीं गर्दी या अकरा वर्षांत होते कीं, त्यांची गुंतागुंत सोडवून खरी ऐतिहासिक संगति जुळविण्याचें काम बिकट होतें. ऐतिहासिक साधनांच्या विरोधी रेलचेलीनें व नानाविध लेखकांच्या मनरोक्त व विकारवश टीकांनीं ही गुंतागुंत जास्तच बिकट झाली आहे. सबब त्या काळाचें शक्य तितकें आकलन करून, धिकारवशतेस थारा न देतां त्यांतील घडामोडींचें स्वरूप होईल तितकें विशद करण्याचा विचार आहे.

नानासाहेबाच्या राज्यकारभाराचीं धोरणें काय होतीं, यांचें विवेचन मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे. बाजीरावाच्या हयातींत शाहूचा दरारा कायम होता. हा दरारा अर्थातच जाग्यावर बसून कागदी हुकूम सोडण्या पुरताच होता. नानासाहेबास पेशवाई मिळाल्यानंतर शाहूच्या उतारवयांत व रोगग्रस्त स्थितींत हा कागदी जोमही उत्तरोत्तर ढिला होत जाऊन, नानासाहेबानें हळू हळू सर्व सत्तेचा आटोप केला. तथापि शाहूच्या हयातींत त्यास इतर प्रमुख मुत्सद्यांच्या तंत्रानेंच बरेंचसें चालावें लागे. ही पराधीनता सन १७५० पासून सुटली. पेशव्याचे अनेक सल्लागार होते, आणि हरएक प्रसंगीं निरनिराळ्या मंडळींचा सर्व बाजूंच्या मतांचा सल्ला ऐकून व स्वतः विचार करून काम करण्याची नानासाहेबास उत्कृष्ट हातोटी साधली होती. परंतु त्याजवर प्रत्यक्ष हुकमत चालवून, तूं हें कर किंवा तें करूं नको, अशी त्यास आज्ञा करणारें दडपण यापुढें राहिलें नाहीं. पराधीनता जाऊन त्याच्या जागीं अडथळे मात्र आतां आले. ताराबाई, यमाजी शिवदेव, दमाजी गायकवाड, सचिव प्रभृति स्वकीयांचे बखेडे त्यास मोडावे लागून त्यांत वृथा कालक्षेप बराच झाला. नंतर राज्याची नवीन व्यवस्था ठरवून देण्यांत त्यानें लक्ष

घातलें. सरदारांचे व त्यांच्या हाताखालील सरंजामी फौजांचे ठराव करून देणें, त्यांस मुलुखगिरीवर पाठविणें, त्यांच्या कामाचा व खर्चाचा झाडा घेणें, त्यांच्या कार्यानुरूप त्यांस बक्षिसी किंवा शासन देणें, हीं कामें मुख्य होतीं. हीं करीत असतांनाच राज्याच्या वसुलाची, हिशेबाची व न्यायाची व्यवस्था त्यानें ठरवून दिली. हीं घरगुती कामें विल्हेस लावीत असतां हिंदुपदपातशाहीच्या मुख्य ध्येयावरूनही त्यानें आपलें लक्ष ढळूं दिलें नाहीं. हिंदुस्थानच्या चारही दिशांस जे मराठ्यांचे उद्योग चालू होते, त्यांस एकतंत्री स्वरूप आणून देण्याचें वरेंचसें काम नानासाहेबानें केलें. चौथाई सरदेशमुखींचे हक्क संपादून बापआजांनीं जी पद्धति घालून दिली होती तीच त्यास पूर्ण करावयाची होती. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत शांतता ठेवून, सर्व कारभार आपल्या मध्यस्थीशिवाय होऊं नये अशी व्यवस्था बांधून देणें हेंच मुख्य कार्य त्यास पुरें करावयाचें होतें. वेल्स्लीच्या तैनाती फौजे सारखीच ही मराठ्यांच्या हक्कांची पद्धत होती. या हेतूच्या सिद्धी-साठीं नानासाहेबानें जे उद्योग केले त्याचे तीन विभाग पडतात. पहिल्यांत निजा-माशीं घडलेले व्यवहार; दुसरा कर्नाटकांतील उद्योग व तिसरा उत्तरेंतील पसारा. उत्तरेंतील व्यवहारांत खुद्द पेशव्याच्या सरदारांप्रमाणें गायकवाड व भोसले यांच्याही उद्योगाचा समावेश होतो. कारण हे उद्योग कांहीं अशीं स्वतंत्रपणें चालत होते तरी सर्वांचा उद्देश एकच होता.

पहिल्या नऊ वर्षांच्या काळांत नानासाहेबानें निजामाशीं कधीं गोडीनें, कधीं राजकारणानें, तर कधीं लष्करी जोरानें वागून त्यास बहुतेक संपुष्टांत आणिलें. या उद्योगाची सफलता सन १७६० सालीं उदगीरच्या रणभूमीवर बरीचशी झाली. कर्नाटकांतील उद्योग नानासाहेबानें अनेक स्वाऱ्या करून हळू हळू पुढें रेटून अखेरीस स. १७५८ त खुद्द म्हैसुरास शह दिला. पण तो कार्यभाग तडीस जाण्याच्या सुमारासच पानिपतची मोहीम उद्भवून हैदरअल्लीस पुढें येण्यास संधि मिळाली. याच वेळीं या दक्षिणेंतील व्यवहारांत नवीन सत्तांचा प्रवेश होऊन सर्वच कामें दुष्कर होऊन कालगतीं पडलीं. या नवीन सत्ता म्हणजे इंग्रज व फ्रेंच हीं पाश्चात्य राष्ट्रें. निजामाच्या दरबारांतील बुसीच्या महत्वाचें उच्चाटन करून यांपैकीं फ्रेंचांच्या सत्तेस पेशव्यानें हाणून पाडिलें; परंतु इंग्रजांचा कावा आरंभीं तरी फ्रेंचांच्या इतका उघडा व स्पष्ट नसल्यामुळें नानासाहेबास त्यांचा अंदाज होऊं शकला नाहीं. या गोष्टीमुळें पुढें हिंदुस्थानच्या भावी इतिहासास नवीन स्वरूप प्राप्त झालें.

उत्तरेंतील व्यवहारांत कार्यक्षेत्रांची वांटणी कांहीं ठरलेली होती व कांहीं नव्हती. या दोनही कारणांनीं तोटे झाले. बंगालकडील क्षेत्र भोसल्याकडे सोंपविलें असल्यानें त्यावर पेशव्याचा ताबा राहिला नाहीं; त्यामुळें इंग्रजांचा पाय, मराठ्यांच्या विरोधाच्या अभावीं, विनासायास, अल्पावधींत रुतला. तसेंच गुजराथकडील क्षेत्र गायकवाडांकडे सोंपविलेलें असल्यामुळें, सुरतेच्या क्षुद्र नबाबासारखे परक्यांशीं मैत्री राखणारे व त्यांस मदत करणारे सत्ताधीश कायम राहून, अंतीं परक्यांच्या मदतीनें ते घातक झाले. याच्या उलट खुद्द पेशव्यांच्या सरदारांत, कार्यक्षेत्र विभागलें नसल्यामुळें, वैमनस्यें माजलीं; त्याचें पर्यवसान पानिपतीं झालें. उत्तरेंतील राजकारण विस्कळीत राहण्यास दुसरें एक कारण झालें. तें असें कीं, नानासाहेबानें स्वतः उत्तरेंत मधून मधून तरी जाण्याचा प्रघात बंद केला. उत्तरेंत प्रथमपासूनच पेशव्यानें अल्पवयस्क व अननुभवी रघुनाथरावास पाठविण्याचा क्रम ठेविला. त्यामुळें आपसांतील वैरामुळें उद्भवलेला विस्कळितपणा वेळींच नाहींसा होऊं शकला नाहीं. पेशव्यास स्वतः तिकडे जाण्यास फुरसत नव्हती असें धरलें, तर निदान सदाशिवरावासारख्या हुशार गृहस्थास तरी त्यानें तिकडे पाठवावयाचें, तेंही घडलें नाहीं. नानासाहेबाच्या करामतींत व मुत्सद्देगिरींत यामुळें मोठा कमीपणा दिसतो.

नानासाहेबाच्या कारकीर्दीच्या आरंभीं रघूजी भोसले हा त्याच्या विरोधकांत पुढारी होता. त्याचा नानासाहेबास आतां जास्तच विरोध व्हावा, पण पेशव्याच्या कारकीर्दीचीं कांहीं वर्षें पाहिल्यावर रघूजीचा विरोध बहुतेक नष्ट झाला. ताराबाईच्या कारस्थानांत त्यानें मुळींच मन घातलें नाहीं. आपल्या स्वतःच्या क्षेत्रांत पेशवा आपणास आड येत नाहीं असें पाहून त्यास त्याचा विश्वास आला. त्यानें पूर्वेकडील बंगालचें व वऱ्हाडचें क्षेत्र आपणाकडे मुकर करून घेतलें होतें, तिकडीलच उद्योग त्यास पुरेसा होता. त्याच्या उद्योगाचा नानासाहेबाच्या उद्योगाशीं प्रत्यक्ष संबंध नसला तरी मराठशाहीच्या उद्योगाचा तो एक भाग म्हणून त्याची थोडी हकीकत येथें देणें रास्त आहे.

सन १७४३ सालीं शाहूनें नाना व रघूजी यांच्या उद्योगाचें क्षेत्र निश्चित केलें, तेव्हां रघूजीनें बंगालकडील कामगिरी जोरानें पुढें चालविली. रघूजीचा सेनापति भास्कर राम कोल्हटकर यानें १७४३ च्या पहिल्या स्वारींत बंगाल प्रांतांत धुमाकूळ घातला, व हुगळी नदीच्या पश्चिमेकडील मुलूख बेचिराख केला, तेव्हां अलिवर्दीखान ओढ्या प्रांतांतून येऊन मुर्शिदाबादेकडे चालला होता. त्याची

लष्करी तयारी बरोबर नसून मराठ्यांच्या आकस्मिक स्वारीमुळें त्यास मोठा पेंच पडला. तेव्हां तो जुजबी चौथाई देण्यास कबूल झाला. पण भास्कर रामानें आपली मागणी एक कोटीवर चढविली, तेव्हां त्यानें मुस्ताफाखान वगैरे आपल्या सरदारांचा सल्ला घेतला. त्यांनीं सांगितलें कीं, एवढी रकम दिल्यानें मराठ्यांची बाजू आधींच वलिष्ठ आहे ती आणखी जास्त बळकट होईल, त्यापेक्षां आपल्याच सैन्यास ती बक्षीस दिली तर तें निकरानें लढून मराठ्यांस तोंड देईल. खानानें त्यांचा सल्ला ऐकून त्याप्रमाणें केलें व बरद्वानहून लढत लढत तो मागें खटव्यापर्यंत हटत आला; आणि तेथें त्यानें मजबूत छावणी केली. त्यास गंगेच्या पूर्वतीरावरून सामुग्रीही मिळूं लागली. खटवा येथील गंगेच्या वेष्टणांतील छावणीवर हल्ला करणें मराठ्यांस दुरापास्त होतें. अलिवर्दीचा एक सरदार मीरहबीब मराठ्यांनीं कैद केलेला त्यांस मिळाला होता. त्यानें भास्कर रामास अशी सल्ला दिली, कीं नवाबास खटव्यांतच कोंडून ठेवून तुम्ही निवडक स्वारांनिशीं मुर्शिदाबादेवर चोरघाला घालून तें लुटावें. त्याप्रमाणें भास्करपंतानें करून मुर्शिदाबाद लुटून अलोट संपत्ति मिळविली. या लाभामुळें तोंडास पाणी सुटून मराठ्यांनीं अलिवर्दीखान राजधानीस परत गेल्यावर खटव्यासच पावसाळ्यांत छावणी केली. बंगाल्यांतील पावसाळा जोराचा असल्यानें मराठ्यांच्या घोडदळाची दौड त्या वेळीं आपोआप बंद झाली. गंगेच्या पूर्वतीरावर नबाबाचा अंमल असून पश्चिमेस मराठ्यांचा होता. नदीस पूर असल्यामुळें नवाब आपणावर येईल अशी मराठ्यांची कल्पना नव्हती. पण त्यानें गुप्त तयारी करून, नवरात्रांतील दुर्गापूजेचा उत्सव बंगाल्यांतील पद्धतीप्रमाणें थाटानें करण्यांत भास्करपंत गुंतला आहे असें पाहून त्यावर एकाएकीं हल्ला केला. ताफ्यांवरून नबाबचें सैन्य नदी ओलांडून खटव्यास आलें तें मराठ्यांस उमगलें नाहीं. या वेळीं मराठ्यांचा सर्वथा नाशच व्हावयाचा. पण इतक्यांत एक अपघात झाला. अलिवर्दीनें एक सरदार पाटण्याहून बोलावला होता. तो खटव्याच्या उत्तरेकडील गंगेस मिळणारी अजय नदी ओलांडून मराठे तिकडे पळूं लागल्यास, त्यांस कोंडून धरावें अशा योजनेंत होता. त्याप्रमाणें ते लोक येत असतां एका ताफ्यावर जास्त स्वार चढल्यानें तो बुडाला; तेव्हां बुडणारांच्या आरडाओरडीनें मराठ्यांच्या छावणींतील एका टोंकाचे लोक जागे झाले, आणि दग्याच्या भीतीनें घोड्यावर बसून पळत सुटले. त्यामुळें इतर छावणीही सावध होऊन भास्करपंतानें पळ काढला. या प्रकारामुळें मराठ्यांचें सामानसुमान सर्व गेलें, तरी प्रत्यक्ष सैन्यास फारसा धक्का पोंचला नाहीं. याच वेळीं रघूजी भोसले बंगा-

लकडे येत असतां त्याचा नानासाहेबानें पंचकोट ऊर्फ पचोट येथें पराभव केला ती हकीकत मागें दिलीच आहे. पुढें रघूजी साताऱ्यास आला तेथें तडजोड होऊन बंगालप्रांत शाहूनें रघूजीचा ठरवून दिला. नंतर स. १७४४ सालीं त्यानें भास्करपंतास पुन्हा बंगाल्यावर पाठविलें. मराठ्यांनीं मागच्या वर्षीप्रमाणें या वर्षीही सर्व प्रांतांत धुमाकूळ घातला. या वेळीं अलिवर्दीखानानें कपटविद्येचा अवलंब केला. त्यानें अलीभाई नांवाच्या भास्करपंताच्या मुसलमान सल्लागारामार्फत तहाचें बोलणें चालविलें, व नजराणे, सामुग्री वगैरे पाठवून भास्करपंताच्याही मनांत विश्वास उत्पन्न केला. नंतर एक दिवस उभयतांची भेट व्हावी असा संकेत त्यानें ठरविला. भास्करपंत आपले वीस निवडक मराठे सरदार बरोबर घेऊन नबाबाच्या छावणींत त्याचे भेटीस निर्भय मनानें निःशस्त्र गेला. तेथें खानाच्या तंबूंत भेट होऊन तहाचें बोलणें निघावयाचें तोंच अलिवर्दीखान सल्ला घेण्याच्या निमित्तानें तंबूच्या बाहेर जाऊन येतों असें म्हणाला. इकडे भास्करपंत व इतर सरदार त्याची वाट पहात बसले. शेवटीं दोन प्रहर झाली, तेव्हां पंत उठून बाहेर येऊं लागला इतक्यांत मारेकऱ्यांनीं पूर्व संकेतानुरूप हल्ला करून भास्करपंत व त्याचे ते वीस सरदार या सर्वांस कापून काढलें. हें वर्तमान समजतांच भास्करपंताची फौज पळून नागपुरास आली, व अलिवर्दीखानानें आपल्यावरील मोठें संकट टळलें म्हणून आनंदोत्सव केला.

या कपटाबद्दल अलिवर्दीखानाचें पारिपत्य करून भास्करपंताच्या खुनाचा सूड घेण्यास रघूजीस पुढें तीन वर्षें बिलकुल फुरसत झाली नाहीं. गोंडवणांतील दंगे व दक्षिणेस निजामाचा धाक, तसेंच शाहूच्या आजारीपणामुळें साताराचीं कारस्थानें यांतच रघूजी गुंतून राहिला. पुढें स. १७४८ सालीं त्यानें ओढ्याप्रांतावर स्वारी करून तो प्रांत ताब्यांत आणला; व अलिवर्दीकडे बावीस सरदारांच्या खुनाबद्दल मुंडकटाई म्हणून तीन कोटींची मागणी केली. पण खानानें मराठ्यांशीं गनिमी काव्यानें लढून त्यांस पळवून लावलें. याच वेळीं शाहूच्या आजारामुळें व निजामाच्या मरणामुळें रघूजीस महाराष्ट्रांत यावें लागलें; तरी त्यानें आपला मुलगा जानोजी यास मीरहबीब बरोबर देऊन पुनः ओढ्यांत पाठविलें व त्यांनीं तीन वर्षें त्याच प्रांतांत कायमचा तळ देऊन अलिवर्दीस दे माय धरणी ठाय करून सोडिलें. मराठ्यांचा हा ससेमिरा सुटणारा नाहीं हें ओळखून खानानें कायमचा या बाबीचा निकाल करण्याचें ठरविलें व मराठ्यांस सुवर्णरेखेच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख म्हणजे ओढ्या प्रांत सबंध देऊन बंगाल

व बिहार प्रांतांबद्दल १२ लाख चौथाई दरसाल देण्याचें कबूल केलें. अलिवर्दीखान मरेपर्यंत त्यानें हा करार तंतोतंत पाळला. ही गोष्ट सन १७५१ त घडली. अशा रीतीनें रघूजीच्या पूर्वेकडील उद्योगाची सांगता झाली.

शाहूनें मरणसमयीं रघूजीस साताऱ्यास येण्याविषयीं बोलावणें पाठविलें होतें, पण तो मुद्दामच आला नाहीं. पूर्वी पेशव्याशीं विरोध करून रघूजी शहाणा झाला होता. सातारच्या ‘ तेलामिठाच्या ’ कारस्थानांत डोकें घालून वृथा कालक्षेप करण्यास त्यास सवड नव्हती. रामराजाच्या राज्याभिषेकासाठीं तो आला तो पुणें सातारा टापूंत आठ महिने होता. तेथें ताराबाई, रामराजा, यमाजी शिवदेव प्रभृति मंडळीची परीक्षा करून राज्याचें जोखीम नानासाहेब घेतो आहे तेंच बरें, असें त्यास वाटलें. रामराजाची अपात्रता थोड्याच वेळांत सर्वांच्या निदर्शनास येऊन, असल्या राजाची बाजू घेऊन आपला स्वार्थ सोडण्यास कोणीही तयार झाले नाहींत. सर्व कारभार आपल्या तंत्रानें चालावा म्हणून ताराबाईनें रामराजाला बाहेर काढलें होतें, पण कारभार आपल्या हातीं येत नाहीं असें पहातांच पेशव्यावर रुसून ती सिंहगडावर सचिवाच्या आश्रयास जाऊन राहिली. तेथें राजाराम छत्रपतीची छत्री असल्यामुळें नवऱ्याच्या छत्रीकडे जाऊं नको असें सांगण्याची पेशव्यास सोयच नव्हती. तेव्हां पुण्याच्या जवळचा हा मजबूत किल्ला सचिवाकडून आपल्याच ताब्यांत पेशव्यानें घेतला व सचिवास कैदेंत ठेविलें. याच वेळीं म्हणजे स. १७५० च्या मे महिन्यांत सदाशिवरावाची पहिली बायको वारल्यानें त्याचें दुसरें लग्न व्हावयाचें होतें तें व वडील मुलगा विश्वासराव याचें पहिलें अशीं दोन लग्नें पुण्यास करण्याचें ठरवून त्या निमित्तानें नानासाहेबानें ताराबाईस पुण्यास बोलाविलें आणि तिचा उत्तम मानमरातब राखून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तिची समजूत न होऊन प्रतिनिधि, सचिव, बाबूजी नाईक, दाभाडे व यमाजी शिवदेव या दुर्बळ मंडळीच्या साहाय्यानें पेशव्याचे कामांत बखेडा घालण्याची तिनें तयारी चालविली.

ताराबाई पेशव्याकडील लग्नास आली नाहीं, पण सिंहगड सचिवाकडून गेला तेव्हां पुण्यास येण्याखेरीज तीस गत्यंतरच राहिलें नाहीं. जून महिन्यांत ती पुण्यास आली तेव्हां तिची समजूत करून तीस परत न्यावें असें रामराजास पेशव्यानें कळविलें. त्यावरून रघूजी भोसल्याबरोबर रामराजाही पुण्यास आला. त्यांसही ताराबाईचें समाधान करतां आलें नाहीं. रघूजीस पेशव्यानें या वेळीं वऱ्हाड, गोंडवण, बंगाल वगैरे प्रदेशांच्या नवीन राजसनदा करवून दिल्या व

खेरीज प्रतिनिधीचा कांहीं मुलूख वऱ्हाडांत होता तोही त्यानें रघूजीस दिला. नानासाहेबानें या प्रकारानें सलंग मुलूख प्रत्येक सरदाराकडे राहावा अशी योजना केली. शाहू वाटेल त्या सरदारास कोठेंही मुलुख देत असे. ही बाळाजी विश्वनाथाचीच व्यवस्था होती. तिचा हेतु असा कीं सरदारांच्या जहागिरी एकमेकांत मिसळलेल्या राहिल्या म्हणजे परस्परांचा परस्परांवर दाब राहून कोणीही सरदार एखाद्या प्रदेशांत स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. या पद्धतीपासून फायदा न होतां तोटा होतो असा अनुभव आल्यामुळें नानासाहेबानें यापुढें प्रत्येकाच्या अधिकाराचा मुलूख सलंग करण्याची योजना केली. अशा रीतीनें रघूजीशीं गोडी करून पेशव्यानें त्यास नागपुरास परत जाण्यास परवानगी दिली.

याच सुमारास जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांचा रुसवा काढून टाकण्याची खटपट पेशव्यानें केली. मागें सांगितलेल्या जयपूर प्रकरणापासून उभयतांची तेढ वाढली असून, शिंद्याचा कारभारी रामचंद्रबाबा याच्याविषयीं जयाप्पाचें मत वाईट झालें होतें. पेशव्याच्या आज्ञेनुरूप बाबानें होळकराच्या बाजूनें जयपूर प्रकरणीं वागणूक ठेवली व शिंद्यांच्या कारभारांतही आपला तळीराम गार करून घेतला. त्यामुळें बाबास कारभारांतून काढल्याखेरीज आपली आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं अशी जयाप्पाची समजूत झाली ती केवळच चुकीची नव्हती. नानासाहेबानें मराठशाहीचें दप्तर पुण्यास आणलें असल्यामुळें त्यास बाबासारख्या जमाबंदी व हिशेबी खात्यांतील वाकबगार माणसाची जरूर होतीच. तेव्हां दोघांचेंही हित ओळखून पेशव्यानें बाबास पुण्यास ठेवून घेतलें व रामाजी अनंत काळे दाभोळकर यास शिंद्याबरोबर कारभारी म्हणून नेमून दिलें. या वेळीं रामचंद्रबाबानें सदाशिवराव, जनार्दनपंत फडणीस, सखाराम बापू, पुरंदरे प्रभृति अनेक गृहस्थांस हाताशीं घेऊन पेशव्याच्या जमाबंदी व हिशेबी खात्याची रचना व्यवस्थित करून दिली. त्यायोगें पुण्याची पेशव्याची कचेरी ही अशा कारकुनी शिक्षणाची नमुनेदार शाळा असा लौकीक हिंदुस्थानभर पसरला.

रामराजा व ताराबाई पुण्यास आल्यावर वाटाघाटीच्या सोईसाठीं पेशव्यानें दादोबा प्रतिनिधि व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव यांस कैदेंतून मोकळें केलें. साताऱ्याजवळचा सर्व मुलूख प्रतिनिधीकडे होता त्यामुळें छत्रपतींवर दाब ठेवून कारस्थानें करण्यास प्रतिनिधीस फार सवड मिळे. तेव्हां शक्य तितका त्यांतील मुलूख खुद्द छत्रपतींच्या खासगीकडे घेतला तर राजधानी भोंवतालचे बंडावे

मोडणें हें पेशव्यास सोपें होणार होतें. राज्याभिषेकसमयीं पेशव्यांनें दादोबास कैदेंत ठेवून भवानरावास प्रतिनिधिपद दिलें होतें. पण मुलूख दादोबाच्या सैन्याच्या हातांत होता त्यामुळें भवानरावास त्यांतलें कांहींच मिळेना. पुण्यास नानासाहेवानें प्रतिनिधीकडून बराचसा मुलूख सोडून देण्याची कबुली लिहून घेतली. तसेंच सचिवाकडून सिंहगड वगैरे पुण्यालगतचा मुलूख आपणाकडे घेऊन त्यास राजसनदेनें मोबदला मुलूख दक्षिणेकडे देवविला. दादोबाची कबुली अर्थातच मनापासूनची नव्हती. त्यानें मुलूख पेशव्याच्या हस्तकांच्या स्वाधीन करण्यासाठीं म्हणून यमाजीस सांगोल्यास पाठविलें. पण यमाजीनें तेथें राहून उलट बंडावा मात्र सुरू केला. यमाजी हा प्रतिनिधीचा मुतालिक व प्रतिनिधि पेशव्यापेक्षां वरच्या दर्जाचा अधिकारी, तेव्हां त्याच्यावर स्वारी करावयाची तर ती खुद्द छत्रपतींनीं केली पाहिजे होती. म्हणून प्रतिनिधीचा बंडावा मोडण्यासाठीं सदाशिवरावाबरोबर रामराजानें सांगोल्यावर चालून जावें असा बेत नानासाहेबानें ठरविला. रामराजाबरोबर गोविंदराव चिटणीस, रामचंद्रबाबा वगैरे मंडळीही त्यानें दिली. ताराबाईनें आपला हट्ट न सोडल्यामुळें पेशव्यानें पुढें तिचा नाद सोडून दिला. तेव्हां रामराजा पुन्हां आपल्या ताब्यांत कसा येईल याची खटपट करण्यासाठीं ताराबाईनें रामराजाच्या बायकांस बरोबर घेऊन साताऱ्यास प्रयाण केलें; तेथें शेखमिऱ्याच्या मदतीनें किल्ला ताब्यांत घेऊन ती बंदोबस्तानें राहूं लागली. अशा रीतीनें पेशव्याविरुद्ध ताराबाईच्या कारस्थानांस जी सुरवात झाली, ती खरें पाहतां नानासाहेबाच्या हयातीस पुरली.

रामराजास बरोबर घेऊन सदाशिवराव जेजुरीवरून सांगोल्यास गेला. तेथें यमाजीस कोंडून गढीस मोर्चे दिले. यमाजीनें पंधरा दिवस टिकाव धरला, पण शेवटीं गढी पेशव्याचे स्वाधीन करणें त्यास भाग पडलें. तसेंच मंगळवेढेंही घेण्यांत आलें. हा नवीन प्रदेश रामराजाच्या खासगीकडे देण्यांत आला. सांगोल्यास रामचंद्रबाबाच्या मदतीनें सदाशिवरावानें रामराजाकडून राज्याच्या व्यवस्थेबद्दल नवीन लेख करून घेतले. राजधानीबाहेरच्या या ठिकाणीं हीं महत्वाचीं कामें मुद्दाम उरकण्याचें कारण असें होतें कीं, या ठिकाणीं साताऱ्च्या मंडळीचें दडपण रामराजावर न राहून त्याजकडून पेशव्यास सोईस्कर अशी व्यवस्था बिनबोभाट ठरवून घेतां आली. ताराबाई व तिचे साथीदार, तसेंच महादोबा पुरंदरे, गोविंदराव चिटणीस प्रभृति छत्रपतींवर व जुन्या पद्धतीवर प्रेम असणारे इसम, यांस कोणतीही व्यवस्था तिच्या नवीनपणामुळें अन्यायाचीच वाटण्याचा संभव फार होता. राज्याचें हित व

व्यक्तींचें हित असा भेद त्यांस करतां येत नसे. कर्तृत्वहीन व्यक्तींचा योगक्षेम, वडिलांच्या कीर्तीवर पूर्वापार चालत होता तसाच चालावा, अशी या सर्वांची समजूत असे. पण जुन्या अधिकाऱ्यांच्या पुत्रपौत्रांस वेतन देऊन, खेरीज नवीन अधिकाऱ्यांस तनखा देण्याचा खर्च कोणत्याही राज्यास झेंपणें शक्य नसतें. आनुवंशिक पद्धतीचा अभिमान धरणारीं जुनीं राज्यें याच कारणामुळें डबघाईस येत. मोगलांच्या राज्यांत असला प्रकार बिलकूल नसे, इतकेंच काय, पण मृत सरदाराची जंगम मालमत्ताही जहागिरीबरोबर जप्त करण्यांत येई. या पद्धतीमुळेंच मोगलांचें राज्य पुष्कळ काळ चालूं शकलें. या बाबतींत हिंदूंची आनुवंशिक पद्धति अत्यंत दोषास्पद व राज्यविघातक म्हटली पाहिजे. सांगोल्यास ठरलेल्या व्यवस्थेनें अष्टप्रधानादि पूर्वींचे अधिकारी कायम करण्यांत आले. प्रतिनिधिपद भवानरावास, व अमात्यपद भगवंतरावास देण्यांत आलें. बाकीचे पूर्वींचे होते तेच राहिले. प्रतिनिधीचें मुतालिकपण, यमाजीचा पुतण्या वासुदेव, पेशव्याचा पक्षपाती होता, त्यास दिलें. सेनापतिपद यशवंतरावाच्या नांवानें न करतां त्याच्या आवडत्या बायकोचा मुलगा त्र्यंबकराव दाभाडे याच्या नांवानें करण्यांत आलें. यशवंतराव दारूबाज, व ताराबाईचा पक्षपाती. त्याची गुजराथ काढून घेऊन पेशवे व गायकवाड या उभयतांत निमेनिम वांटावयाची होती. तेव्हां या नवीन व्यवस्थेस आडकाठी येऊं नये एतदर्थ अल्पवयी त्र्यंबकरावास सेनापतिपद देण्यांत आलें, व गायकवाडांनीं त्यास खर्चापुरती रक्कम द्यावी असें ठरविलें. आणि गुजराथ प्रांत पेशवे गायकवाडांत निमेनिम वांटण्याचें ठरलें. बाबूजी नाइकाकडून कर्नाटक काढण्यांत येऊन तें पेशव्यांस दिलें. गोविंदराव चिटणीस व यशवंतराव पोतनीस यांस खर्चास सरंजाम देऊन त्यांनीं छत्रपतीचा खासगी कारभार व कारखान्यांची व्यवस्था करावी असें ठरवून दिलें. तसेंच अष्टप्रधानांकडून व इतर सरंजामदारांकडून छत्रपतींच्या खर्चास सालाबाद पाठवावयाची रक्कम ठरवून देण्यांत आली. अशी ही नवीन व्यवस्था सांगोल्यास करण्यांत आली. कर्तृत्वहीन घराण्यांचीं उत्पन्नें कमी करून कामगिरी बजावणारांस तीं देण्याचा नवीन उपक्रम या प्रकारांत करण्यांत आला. मात्र जुन्या लोकांचीं पदें सरसहा हिरावून घेतलीं, असा आरोप आपणांवर येऊं नये व त्यामुळें आपणांवर बाजू उलटूं नये या हेतूनें, धूर्ततेनें कोरड्या पदव्या व थोडेंसें उत्पन्न हीं जुन्या घराण्याच्या वंशजांकडे ठेवण्यांत आलीं. या वेळीं किल्लेदार, मामलेदार वगैरे राज्यांतले अधिकारी पेशव्यानें आपल्या विश्वासाचे नवीन नेमले.

ही सर्व व्यवस्था ठरवून देण्यांत सदाशिवरावास मुख्यत्वें रामचंद्रबाबाचें साह्य होतें. गोविंदराव चिटणीस रामराजाबरोबर सांगोल्यास होता तरी त्याचा हात या व्यवस्थेंत नसावा. पेशव्याचे सातारचे कारभारी महादोबा पुरंदरे याचें व गोविंदरावाचें जूग असून त्यांचा ओढा छत्रपतीकडे होता व ताराबाईशींही ते सेवकधर्मानें वागत. अर्थात् ताराबाईचा हात राज्यकारभारांतून काढून टाकणें हा पेशव्याचा मुख्य हेतु त्यांस पसंत नसावा. शाहूकालीन दृष्टीनें ते पाहत असल्यानें हा प्रकार त्यांस गैर वाटत असेल. रामचंद्रबाबास पेशव्यानें शिंद्याच्या कारभारावरून काढून टाकून पुण्यास ठेवलें तेव्हां बाबानें आपलें महत्व पूर्ववत् चालावें म्हणून सदाशिवरावास हाताशीं धरलें. उलट बाबानें अलोट संपत्ती मिळविली आहे अशी ख्याती असल्यानें, नानासाहेब व सदाशिवराव या उभयतांस तो हवासा होता. बाबानें सदाशिवरावास सदतीस लाख रुपये दिले होते. हेतु हा कीं पेशव्यांच्या राज्यकारभारांत त्यामुळें सदाशिवरावास महत्व आणून त्याच्या द्वारें आपलें महत्त्व वाढावें. असें होतांना नानासाहेबाचें महत्त्व कांहीं कमी झालें तरी बाबास इष्टच होतें. त्याचें मल्हारराव होळकरासारख्या सरदारांशींही सूत होतें. सदाशिवरावाकडून पुढाकार घेववून छत्रपतींच्या दरबाराचीं सूत्रें शक्य तर आपल्या हातीं घेण्याचा त्याचा विचार असावा. पेशव्याचा कारभार सदाशिवरावाकडे यावयाचा तर जुना कारभारी महादोबा पुरंदरे यास काढून टाकणें जरूर होतें. पुरंदरे हे छत्रपतींशीं अनुरक्त पण पेशव्यांचे इतबारी नोकर होते. त्यांचें व रामचंद्रबाबांचें सख्य होतें. नानासाहेबाचा हेतु रामराजानें ताराबाईस दाबून आपण स्वतंत्र कारभार करावा असा होता. परंतु रामराजा केवळ मेषपात्र असल्यामुळें, त्याचें तेज ताराबाईवर पडण्यासारखें नव्हतें. उलटपक्षीं ताराबाईचा हेतु रामराजानें पेशव्यास दाबून आपल्या विचारें कारभार करावा असा होता. सदाशिवरावानें रामराजाकडून नवीन करार करून घेतले हें ताराबाईस कळलें, तेव्हां तिला राग आला. तिला वाटलें कीं, रामराजा पेशव्याच्या ताब्यांत आहे म्हणून त्यास वाटेल तें करतां येतें. तर रामराजासच आपल्या ताब्यांत घेतल्यास आपले ताब्यांत कारभार येईल. हीं घरगुती कारस्थानें होत असतांनाच थोडीशी भाऊबंदकीही पेशव्यांच्या घरांत उद्भवली. अस्सल कागदांच्या अभावीं या भाऊबंदकीचें स्वरूप, कारण व परिणाम समजणें कठीण आहे. नानासाहेबाची बायको गोपिकाबाई हुशार व बाह्यकारभारांत लक्ष घालणारी होती. तिनें भाऊबद्दल पेशव्याचें मन कलुषित केलें, असा प्रवाद होता. रामचंद्रबाबाच्या मदतीच्या

जोरावर छत्रपतीची पेशवाईच स्वतः उपटण्याचा सदाशिवरावाचा बेत आहे असें गोपिकाबाईनें नानासाहेबाच्या मनांत भरविलें असावें. या प्रकरणीं पेशव्याचें मन संशयग्रस्त झालें होतें हें निर्विवाद आहे. रामचंद्रबाबाचा हेतु ताराबाईच्या कलानें वागून सदाशिवरावानें सातान्यास आपलें स्वतंत्र बस्तान बसवावें असा असावा. नानासाहेब ताणून धरील तर त्याच्यावर मात करण्यासाठीं बाबानें एक युक्ति योजिली. कोल्हापुरास संभाजी व जिजाबाई यांच्याशीं संधान जोडून त्यांजकडून एक पत्र नानासाहेबास आणविलें कीं, सदाशिवरावास आम्ही पेशवाई व जहागीर देतों. अर्थात् सदाशिवरावासारखा हुशार माणूस गमावून पुनः त्यास एक प्रकारें आपला प्रतिस्पर्धी होऊं देणें हें नानासाहेबास रुचण्यासारखें नव्हतें. रामराजाइतकाच सातारच्या गादीवर नात्याच्या दृष्टीनें संभाजीचा वारसा होता. रामराजा पराक्रमहीन निघून, पेशव्यानें सर्व कारभार आपल्या ताब्यांत घेतल्यापासून, त्यास शह देण्यासाठीं संभाजीस सुद्धां सातान्यास आणण्याची ताराबाईची तयारी होती. याच हेतूनें तिनें पुढें रामराजा खोटा असा पुकारा आरंभिला. पण नानासाहेबाचें जिजाबाईशीं चांगलेंच संधान होतें व तिलाही ताराबाईच्या मुठींत आपण जावें असें मुळींच वाटत नव्हतें. तरीपण या वेळीं पेशव्यास साहजिकच अशी शंका येणें शक्य होतें कीं, ताराबाई, संभाजी, सदाशिवराव, रामचंद्रबाबा, पुरंदरे, चिटणीस यांचें आपणांविरुद्ध कांहीं कारस्थान आहे कीं काय ? म्हणून पेशव्यानें निक्षून पत्र लिहून सदाशिवरावास रामचंद्रबाबासह पुण्यास बोलावलें. त्याप्रमाणें ते आले तेव्हां अर्थातच पेशव्याची संशयनिवृत्ति झाली आणि त्यानें दोघांस आपला कारभार सांगितला. घरच्या पुरतें हें संशयपिशाच्च इतक्यावरच नष्ट झालें तरी ताराबाईस तोंड देणें पेशव्यास भाग आलेंच. त्या प्रकाराची हकीकत पुढील प्रकरणांत येईल.

---

## प्रकरण ११ वें.

# ताराबाईशीं घासाघीस.

सांगोल्याच्या व्यवस्थेनें ज्यांचें नुकसान झालें त्या दाभाडे, बाबूजी नाईक, यमाजी शिवदेव प्रभृति मंडळीस आतां ताराबाईस मिळण्यावांचून गत्यंतरच राहिलें नाहीं. रामराजा सांगोल्याहून शंभूमहादेवावरून ता. १७ नोवेंबर १७५०

रोजीं साताऱ्यास परत गेला. तेव्हां ताराबाईचे सल्लागार चिंतो अनंत देवस्थळे प्रभृति पुराणिक, भटभिक्षुक वगैरे मंडळी होती त्यांनीं रामराजास साताराच्या किल्ल्यावर आणून कैदेंत ठेवण्याची मसलत तीस सुचविली. किल्लेदार वगैरे मंडळी ताराबाईनें अनुकूल करून घेतली होतीच. ता. २३ नोवेंबर रोजीं रामराजा किल्ल्यावर ताराबाईच्या भेटीस गेला तेव्हां तिनें त्याची निर्भर्त्सना करून यापुढें तरी पेशव्यास दाबून कारभार करावा असें त्यास सांगितलें. तें रामराजास मानलें नाहीं व तो परत शहरांत आला. दुसरे दिवशीं चंपाषष्ठी होती त्यानिमित्तानें पारण्यास म्हणून ताराबाईनें पुनः रामराजास गडावर बोलावलें. आधल्या दिवसाच्या प्रकारावरून व इतर कुणकुणीवरून, राजाचे रक्षक व सैन्यावरील मुख्य बापूजी खंडेराव चिटणीस, यास संशय आला होता म्हणून त्यानें रामराजास विनंति केली कीं, आज आपण गडावर जाऊं नये. पण काल आईसाहेब रागावल्या होत्या त्या आज न गेल्यानें जास्त रागावतील म्हणून निखालसता दाखविण्यासाठीं रामराजा मुद्दाम गडावर गेला. मागून बापूजी आपल्या स्वारांसह गेला, त्यास दरवाज्यावर मनाई करण्यांत आली. पुढें रामराजा परत यावयास निघाला त्यास गडावरील हवालदारानें प्रतिबंध करून परत फिरविलें. रामराजानें तसाच घोडा चालवला तेव्हां किल्लेदारानें दरवाजे लावून घेतले. त्यावेळीं रामराजानें जरा जोर दाखविला असता तर त्यास वाट न देण्याची हवालदाराची हिंमत नव्हती. पण इतकें धाडस त्यास नव्हतें. तो विषण्ण मनानें परत गेला. वाड्याभोंवतीं चौकी पहारे ठेवून ताराबाईनें किल्ल्यावरच त्यास अटकेंत ठेविलें.

रामराजास अटकेंत ठेवून ताराबाईनें, दाभाडे, गायकवाड, दादोबा प्रतिनिधि, यमाजी शिवदेव, बाबूजी नाईक, इतकेंच काय पण खुद्द पेशव्याचे सरदार शिंदे, होळकर व शत्रु निजाम, नासिरजंग व त्याचा दिवाण रामदासपंत यांजकडे खलिते पाठवून नानासाहेबाविरुद्ध जंगी तयारी चालविली. या कारस्थानांत महादोबा पुरंदरे व गोविंदराव चिटणीस आहेत असा पेशव्यास बळकट संशय आला. सदाशिवराव व रामचंद्रबाबा यांजकडे त्यांचा ओढा असल्यामुळेंही पेशव्याचा त्यांवर राग होता. यावेळीं पेशव्यानें, रामराजाच्या आज्ञेप्रमाणें दाभाड्यांनीं गुजराथेवरील आपला हक्क सोडावा अशी निकड यशवंतरावास लावली, तेव्हां दाभाड्याचें प्रकरण वर्दळीवर आलें. पेशव्याच्या कांहीं शब्दांवरून

१ हा इसम पुढें माधवराव पेशव्याचे वेळेस रघुनाथरावाचे पक्षांत मिळाला.

महादोबा पुरंदरे यास वाईट वाटलें व कारभार सोडून घरीं बसण्याची परवानगी मागून तो पुरंदरास गेला. मागें त्याचा पुतण्या त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे हा सातान्यास पेशव्याच्या वतीनें काम पाहूं लागला. गोविंदराव चिटणीसही पेशव्यावर रुसला होता. या प्रकरणीं पेशव्याची बाजू समजण्यासाठीं त्याचींच पत्रें पुढें दिलीं आहेत. पेशव्याचा हेतु रामराजा बंधमुक्त व्हावा असा होता, तरी ताराबाईवर चालून जाण्याची त्याची इच्छा नव्हती. नाहींतर गडावर सामुग्री जाण्यास अटक करून ताराबाईस ताळ्यावर आणणें सोपें होतें. पेशवा गोविंदरावास लिहितो:—“ अलीकडे सर्व दरबारचे मुत्सद्दी एक प्रकारचें जाणून सर्वप्रकारें तुम्हांसच हातीं धरून, बरा वाईट सवालजाब तुमचे हातून केला. तुम्हीं यथाशक्ति आमचे कार्यास न चुकलेस. गतवर्षीं रामाजीपंतांनीं भर देऊन सकवारबाई तुमचे केवळ पाठीसच लाविली ते प्रसंगीं तुमचें दरबारीं कांहीं चालेना. तथापि तुम्हांमुळें सकवारबाईचा दावा, सर्व ब्राह्मणांचा पेंच, कबूल करून तुमचीं मुलें माणसें पुण्यास आणून ठेविलीं. तुम्हांस रक्षावयास फौज दिली. तुम्हांमुळें आम्हांवर सकवारबाईनीं इतराजी, त्यांचा काळ होय तों, कशी केली, हें तुम्हांस स्मरण असेलच. तुम्हीं रामाजीपंताचे पेंचामुळें, सकवारबाईचे पेंचामुळें, गडकरी सर्वप्रकारें आपले विचारांत घेऊन आमचा आश्रय केलात. आम्हींही तोच विचार शेवट पावेतों निभावला. तोंपावेतों, आमचे चित्तांत तुमचे ठायीं ममतेस अंतर नव्हतें. ज्याप्रमाणें बाबांचे ( महादोबा पुरंदरे ) चित्तांत तुमचा पक्ष त्याचप्रकारें आमचे चित्तांत. कां कीं तुमची बाबांचे ठायीं निष्ठा तशीच आमचे ठायीं. तदोत्तर राजश्री स्वामींनीं तुम्हांस कीं त्यांस लिहून, जवा बसे तें करावें, तेंही न करतां उफराटें, राज्यभारास युक्त, आम्हांस संमत, तुमचें हित, ऐसा विचार आरंभिला असतां टाकून लांबणीवर घालून बसलेत, तुम्हांस काय म्हणावें ? बाबूजी नाईक, देवराव, यांचा दरबारीं अभिमान आम्हीं धरला. वेडेपणें अथवा शहाणपणें तेवढेंच तुम्हीं व बाबानीं तटीं लावून राज्य बुडविलेंत, या शहाणपणास काय म्हणावें ! कलयुगांत खावंद तों वेडेच असतात, परंतु कार्यकर्ते शहाणे असतात ऐसें ऐकत होतों. तेंही येथें विपरीत दिसून आलें. अद्यापही दुराग्रह टाकाल, विचारावर घ्याल, तर आमचा लौकीक राहील, राज्य वांचेल; येणेंप्रमाणें केलिया तुमचेंही बरें होईल. याउपरी मनापासून आईसाहेबांस समजावून, भरवंसा पुरवून खालीं आणावी. नानानीं तुम्हीं मिळून राज्य चालवावें. आज नासरजंग मेला; अशा प्रसंगांत मोठा मनसबा केला

पाहिजे. बाबा ( महादवा ) रागीट, उठोन गेले. त्यास आमचा लौकीकमात्र जहाला. परंतु थोडक्याच मजकुरावर आज एक वर्ष दुराग्रह वाढवून या थरास आणलें. आतां तरी विचार करून, समयसूचकता कराल तर सर्व कुशल होईल. नाहींतर ईश्वरप्रमाण. आशीर्वाद" या पत्रावरून पेशव्याचा व गोविंदरावाचा पूर्व स्नेहसंबंध व सध्यांचा विरोध यांची ओळख पटते. पुढील पत्र पेशव्यानें जयापा शिंद्यास लिहिलें त्यांत महादोबाच्या रुसव्यापूर्वीचीही हकीकत आहे; त्यावरून पुरंदरे घरीं बसण्यास केवळ नवीनच कारण घडलें असें दिसत नाहीं. "महादोबाची आमची विमनस्कता तीन वर्षें आहे. सातारियापासून विशेष वृद्धि पावली. तुमचे पक्षपातामुळें अति कष्टी होतें. आम्हांस हरएक कामांत मुरदाड करावयाची तजवीज. रामचंद्रबाबा व भाऊंकडे पत्रें जात येत असत. आम्हांपासून हरएक मसलत पायाशुद्ध शेवटास न जावी या भावें, भाऊकडेच फौज पाठवावी, आम्हांस घरीं बसवून ताराबाईस गोविंदरायाचे मार्फतीनें चढवावें, आम्हांवर सर्वांचे हुकूम राहवे, ऐसा विचार ( महादोबाचा ) दिसोन आला. तेव्हां आम्हीं भाऊस साफ लिहिलें कीं, जर भाऊ असलेस तर पत्रदर्शनीं येणें. दाभाडिया कडील काम चांगलें करूं. त्यावरून भिडेस पडून आले. दाभाडियाकडील काम रगडून आरंभिलें. नासिरजंग गेला, जप्ती करावी, दहावीस लाख मेळवावे, ऐसा विचार आम्हीं केला. त्यामुळें महादोबांनीं बहुत वाईट मानून घरास गेले. कोणी म्हणतात कीं ताराबाईकडे जातील. परंतु ते कुलीन, जुने चाकर, हरामखोरी कधीं करणार नाहींत असें वाटतें. कालगत मात्र न कळे. असो. आम्हांशीं, बाबाशीं ( महादोबाशीं ) तूट पडली. भाऊ अर्धे इकडे, अर्धे तिकडे. रामचंद्रबाबा वाह्यात्कारें आम्हांकडे, अंतर्यामीं बहुत गुप्त रीतीनें बावा ( महादोबा पुरंदरे ) कडे. येथें बाहेर तों दाखवितात कीं, खावंदांची मर्जी तेंच प्रमाण, परंतु अंतर्याम तुम्ही जाणतच आहां. त्रिंबक विनायक, कोन्हेरपंत हे केवळ बाबांचे. गंगोबाशीं याशीं राजकारण पूर्ण. आमची तवकल ईश्वरावर आहे. तुमचे भरंवशावर ऐसें केलें." हें अत्यंत महत्वाचें पत्र पेशव्यानें जयापास आपले विश्वासाचे समजून लिहिलें असल्यामुळें त्यांत त्याचें हृद्गत स्पष्ट दिसतें. यावरून नानासाहेब, सदाशिवराव, पुरंदरे व रामचंद्रबावा यांच्या विकल्पाचें अंतस्थ कारण न समजलें तरी त्याचा अंदाज करतां येतो. ताराबाईस खूष ठेवून कारभार करण्याची इतरांची इच्छा व बाईची मनधरणी शक्य तितकी न करतां आपणास योग्य दिसेल तसा राज्यकारभार चालवावा असें पेशव्याचें मत यावरून

कळतें. सदाशिवरावाबद्दलचेंही पेशव्याचें मत त्यांत दिसतें. रामचंद्रबावाबद्दल त्याचें मत कलुषित दिसतें. तसेंच रामचंद्रबावा, रघुजीचे कारभारी कोन्हेर राम, होळकराचा दिवाण गंगोवा चंद्रचूड व महादोबा पुरंदरे, प्रभृति राज्यांतील कारभारी एकमेकांत सूत ठेवून एकमेकांच्या कारस्थानांस कसा पाठिंबा देत असावे हें कळतें. ताराबाईचा हेतु पुरंदऱ्यामार्फत होळकर, रघूजी, वगैरे शक्य ते सरदार आपल्या बाजूस मिळविण्याचा होता असेंही यांत दिसून येतें.

या काळीं पेशव्याची आर्थिक स्थिति कशी होती हें गोविंदपंत बुंदेल्यास लिहिलेल्या पुढील पत्रांत कळतें. "येथें दाभाडियाशीं कज्जा प्राप्त झाला; व ताराबाईंनीं राजश्रीस गडावर अडकावून ठेविलें. आमचे ठायीं विषम मानून आहेत. नानाप्रकारें मनसबे करतात. असो. श्रीकृपेनें उत्तमच होईल. गुदस्तांपासून फौज घरीं बसली. त्यामुळें चाळीस लाख कर्ज झालें. पुढेंही होतच आहे. फौजेचे समजाविशीस तोटा पांच सात लाख जाला. कर्जही मिळत नाहीं. गुजराथेंतूनही पैसा येणें दिसत नाहीं. सविस्तर तुम्हीं समजून, खावंदाची ओढ जाणून, हरप्रकारें ऐवज प्रविष्ट करावा. दुसरे खर्च सर्व तोडून रुपया जमा करून कर्ज वारावें. पत्राचें उत्तर तपशिलें न लिहितां सरकारची ओढ वारेल तैशी तर्तूद करणें."

पैशाची ओढ हें मराठशाहीचें एक कायमचें व्यंग होतें. महाराष्ट्र देश गरीब. धनोत्पादनाचे मार्ग तेथें फारसे नाहींत. प्रचंड फौजा ठेवल्याखेरीज जवळच्या शत्रूंपासून राज्याचें रक्षण करणें कठीण. त्यामुळें बाहेरच्या प्रदेशांतून जबरदस्तीनें खंडण्या वसूल करणें हाच एक मार्ग मराठ्यांस द्रव्यार्जनार्थ पकडावा लागला. या पैशाच्या अडचणीमुळेंच वर लिहिलें आहे त्याप्रमाणें नानासाहेब, सदाशिवराव, रामचंद्रबाबा हे 'जेणेंकरून कर्जपरिहार होय तो अर्थ करावा,' एतदर्थ निजामावर जाण्यासाठीं बाहेर पडले. दाभाड्याचा कज्जा म्हणून वर म्हटला आहे तो गुजराथच्या स्वामित्वाबद्दलचा. सांगोल्यास केलेल्या व्यवस्थेप्रमाणें अर्धा गुजराथ पेशव्याकडे यावयाची, पण दाभाडे व त्यांचा हस्तक गायकवाड हे बऱ्या बोलानें ती देण्यास तयार नव्हते. ताराबाईचीं कारस्थानें चाललीं होतीं त्यांत गायकवाड व दाभाडे सामील असून नासिरजंगाकडेही त्यांचें संधान होतें. नासिरजंगास पेशव्यांच्या सत्तेस आळा घालण्यास ही संधि असल्यामुळें तोही या बेतास अनुकूल होता. पण याच वेळीं कर्नाटकांत त्याच्या विरुद्ध मुजफरजंगानें उचल केली. त्याचा मोड करण्यासाठीं नासिरजंग तिकडे गेला. रघूजी भोसल्याचेंही साह्य त्यानें मिळविलें. प्रचंड फौजेच्या बळावर नासिरजंगानें मुजफरजंग व त्याचे इतर साथिदार

यांचा पराभव करून सर्वत्र आपला वचक बसविला, आणि मुजफरजंगास त्यानें कैदेंत ठेवलें. तेव्हां त्याच्या फ्रेंच जोडीदारांनीं नासिरजंगाविरुद्ध कारस्थान चालविलें. कडाप्याचा नवाव नासिरजंगावरोबर होता त्यास वश करून घेऊन, लढाईच्या प्रसंगीं त्यानें नासिरजंगाचा खून करावा असें ठरलें व त्याप्रमाणें चंदासाहेब व फ्रेंच यांनीं नासीरवर हल्ला केला तेव्हां स्वतःच्याच बाजूकडून एक बाण त्यास लागून तो मारला गेला. निजाम कर्नाटकांत गुंतल्यामुळें पेशव्यास या वेळीं उत्तम संधि आली होती पण ती ताराबाई, दमाजी, प्रभृतींच्या विरोधांत फुकट गेली. रामराजास गादीवर बसवून शिंदे होळकर उत्तरेंत गेले, तेव्हां त्यांचा व पेशव्याचा असा बेत ठरला होता कीं, त्यांनीं मृत निजामाचा वडील पुत्र गाजीउद्दीन फिरोजजंग यास दिल्लीहून दक्षिणेंत घेऊन यावें व त्याच्या मदतीनें पेशव्यानें दक्षिणची व्यवस्था आपल्या मनाप्रमाणें लावून घ्यावी. गाजीउद्दीन नुसता दरबारी माणूस असून युद्धकलेचें त्यास फारसें ज्ञान किंवा आवड नव्हती. स्वभावानें गोड व सरळ असल्यामुळें हा मराठ्यांच्या उपकारानें बद्ध होता तर पेशव्यास त्याच्याकडून आपला हेतु साधणें सोपें गेलें असतें. परंतु याच वेळीं शिंदेहोळकरांनीं उत्तरेंत वजिराचा पक्ष धरून रोहिले पठाणांवर लढाई सुरू केली होती, त्यामुळें स. १७५१ सालीं त्यांस दक्षिणेंत येतां आलें नाहीं. नानासासाहेवानें निजामाच्या दरबारीं दुहेरी राजकारण सुरू ठेविलें होतें. गाजिउद्दीन आला तर बरेंच झालें, न येईल तर त्याची भीति दाखवून नासिरजंगाकडून शक्य तें उकळावें, असा पेशव्यानें बेत केला. पुढें नासिरजंग मेल्याचें वर्तमान आलें तेव्हां पेशवा औरंगाबादचा आपला वकील वासुदेव दीक्षित यास लिहितो. "नासरजंगास पटाण व फिरंगी ( फ्रेंच ) यांनीं लढाईचे गडबडींत दंगा करून मारिलें. वर्तमान खरें असेल, तर याचा विचार आमचे मनांत येणेंप्रमाणें आहे. तुमची सय्यद लष्करखानाशीं निखालसता असेल तर एकांतीं जाऊन बोलावें कीं, खानाची आमची मैत्री. ये प्रसंगीं खानांनीं सर्व प्रकारें आमचे पदरीं पडावें. औरंगाबाद व बऱ्हाणपुर दोनही सुभे आमचे हवालीं करावे. शहरांतील खजाना सर्व आमचे हवालीं करून कर्जपरिहार होय तें करावें. आपलें सर्वप्रकारें जहागीर मनसब घेऊन आमचे हातून आपलें बरें करून घ्यावें. हा उत्तम पक्ष. दुसरा प्रकार नासरजंगाचे लेक किंवा भाऊ यांस उभें करून आम्हांस कर्जपरिहारार्थ व फौजेचे एक वर्षाचे बेगमीस ऐवज देऊन, आम्हांस सामील करून घ्यावें. आम्हीं चाळीस हजार फौजेनिशीं सिद्ध आहों. नीट मुज्फरजंगावर चाल देतों. येणेंप्रमाणें ऐकिल्यास यांचे

आमचे मित्रत्वाचें सार्थक, त्यांचेंही ऊर्जित. यांत कांहीं बेइमानी त्यांचे पदरीं येत नाहीं. इतकेंही न करीत तर आम्हांस ईश्वर बुद्धि देईल तें आम्ही करूं. त्यांची आमची मैत्री मात्र व्यर्थ होईल. ये प्रसंगीं आमचें कार्य व आपलें ऊर्जित करून घ्यावयाचा समय आहे. खानाची आमची क्रिया आहे कीं, हरएक प्रसंगीं आमचे कार्यास त्यांनीं व त्यांचे कार्यास आम्हीं न चुकावें. एकांतीं साफ बोलणें."

या पत्रांत उल्लेख आलेला सय्यद लष्करखान हा औरंगाबादचा सुभेदार असून त्याचा ओढा गाजिउद्दीनाकडे होता. पेशव्यानें त्याच्याशीं संधान ठेविलें होतें. खानानें दीक्षितास साफ उत्तर दिलें नाहीं तेव्हां नानाहेबानें पुनः लिहिलें ( ता. ८ जानेवारी १७५१ ), " उत्तम पक्ष, फिरोजजंगास स्थापावें. तो न येई तर नासरजंगाचा लेक स्थापावा. तेंही न होय तर आमचेंच कार्य मातवर करावें. यांत तिळमात्र निमकहरामी होणार नाहीं. खानाचे मतें मनसवा आम्हीं लिहिला, त्याप्रमाणेंच करावा असें आहे. फिरोजजंग आले तरी बरें, नाहींतर आम्हीं एकले श्रीकृपेनें पारिपत्यास समर्थ आहों. खजीना जमा करावा. तूर्त पंचवीस तीस आम्हांस द्यावा. आपण बाहेर निघावें. इकडे हे पठाण मातले, कोणी वर्षभरा आटोपणार नाहीं. रोग नवा आहे तोंच दूर केला पाहिजे. खानास योग्यता मोठी. नासरजंग मेले तर फिरोजजंगाचें नांव घ्यावें. आम्हांस त्यांस एकविचार करावे. आमचें कर्ज फेडावें. म्हणजे सरदार बोलावतों. गंगातीरावर येऊन भेटावें. सुलतानजीचा लेक ( जानबा निंबाळकर ) हातांखालीं घ्यावा. तिळमात्र दोष पदरीं न येतां, दिल्ली, लाहोर, मुलतान, पावेतों लौकीक खानाचा होईल कीं, खानांनीं प्रधानास मेळवून घेऊन नबाबाच्या दौलतीचें नांव राखिलें. जो जवानमर्द आहे त्यानें दोष येत नाहीं ऐसा समय पाहून, आपलें कार्य, मित्रकार्य संपादून कीर्तीस पात्र व्हावें उचित असे. " पेशव्यानें असे बेत चालविले होते ते तडीस जाण्यापूर्वीच, जानेवारीच्या अखेरीस मुजफरजंगही मारला जाऊन राजकारणास आणखी निराळें वळण लागलें.

मुजफरजंग मेला तेव्हां निजामशाहींत गोंधळच व्हावयाचा, पण रामदासपंत म्हणून तेलंगा ब्राह्मण, प्रथम नासिरजंगाचा नोकर असून नंतर डुप्लेच्या कारस्थानांत शिरून मुजफरजंगाचा कारभारी बनलेला होता, त्यानें समयसूचकतेनें मुजफरजंग जिवंत आहे असें कांहीं दिवस भासवून, नंतर सैन्यास वश करून घेऊन सलाबतजंगास निजाम केलें. यावेळीं निजामास साह्य करण्यास आलेल्या फ्रेंच सैन्यावर मुख्य सेनापति इतिहासप्रसिद्ध बुसी हा होता. त्याचें व रामदासपंताचें

रहस्य होतें. बुसीचा दुभाष्या अबदुल रहिमान हैदरजंग ह्याच्या मार्फत रामदासपंताचीं फ्रेंचांकडे कारस्थानें चालत. बुसीच्या सैन्याच्या जोरावर रामदासपंत सलावतजंगास घेऊन औरंगाबादेस येऊं लागला, तेव्हां नानासाहेब पेशव्यानें निजामाचे दौलताबाद व खानदेश हे दोन सुभे जप्त केले. पुढें सलावतजंग उत्तरेस येत असतां त्यास अडविण्यास नानासाहेब निघाला तेव्हां सैयद लष्करखानाजवळून सत्रा लक्ष रुपये खंडणी घेऊन ते दोन सुभे नानासाहेबानें मोकळे केले. नानासाहेब निजामाचे राज्यांत शिरून वाटेनें घासदाणा, खंडणी घेत घेत रघूजी व फत्तेसिंग भोंसले यांच्या सैन्यासह रायचूरच्या पूर्वेस चाळीस मैल कृष्णाकांठीं पानगळपर्यंत आला. परंतु इकडे सलावतजंगाचा धाकटा भाऊ निजामअली यास हाताशीं धरून रामदासपंतानें ताराबाईशीं नवीनच कारस्थान उभारलें. सलाबतजंग यास शह देण्याचा निजामअलीचा विचार होता. पण याच वेळीं दमाजी गायकवाडानें पेशव्याच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन पुणें सातारा भागांत ताराबाईतर्फे धुमाकूळ घातला, ही बातमी ऐकून नानासाहेब लगोलग साताऱ्याकडे येण्यासाठीं परत फिरला. सलावतजंगानें जानवा निंबाळकरामार्फत कांहीं पैका पेशव्यास दिला त्यावरच त्यास संतुष्ट व्हावें लागलें. अशा रीतीनें निजामाचे दोन सुभे चापण्याचा नानासाहेबाचा हेतु घरच्या भांडणामुळें विफल झाला आणि सलावतजंगास बुसीच्या मदतीनें आपल्या प्रदेशाची स्थीरस्थावर करण्यास अवकाश मिळाला.

शाहूछत्रपतीच्या निधनानंतर रघूजी भोसले प्रभृति सरदार साताऱ्यास गोळा झाले, त्यांत दमाजी गायकवाड आला नव्हता. तो येता तर नानासाहेबानें रघूजी प्रमाणेंच त्याचीही समजूत घातली असती आणि पेशव्यावर उठण्याचें त्यास कारणच पडलें नसतें. दमाजीची स्थिति कांहींशी चमत्कारिक झाली होती. छत्रपति शाहू हयात असतांना तो सकवारबाईचा पक्षपाती होता. त्या वेळीं गोविंदराव चिटणिसामार्फत पेशवा व शाहू यांशीं त्यानें आपला व दाभाड्याचा संबंध कसा चालावा या बाबत बोलणें काढलें होतें. दाभाडे गुजराथेचे मालक. पण ते स्वतः कांहींच मेहनत न करतां घर बसल्या दमाजीच्या कमाईवर आपला हक्क सांगण्या पलीकडे दुसरा विशिष्ट उद्योग कांहींच करीत नसत. त्यांच्या सावकारांच्या कर्जांची फेड करतां करतां दमाजीस पुरे वाट होई. दाभाड्यांकडून छत्रपतींस जी रक्कम पोंचावयाची ती ते कधींच वेळेवर देत नसत, त्यामुळें त्याचा ठपका दमाजीवरच येई. गुजराथेंतील वसूल तरी सुरळित यावा तर तेथें असलेले जुने मोगल

अंमलदार त्यास फौजेच्या जोराशिवाय कांहींच देत नसत. पेशव्यांचा डोळा या सुपीक प्रदेशावर फार होता. पण बाजीरावाच्या हातून त्रिंबकराव दाभाडे मेल्यापासून पेशव्यांस दाभाड्यांविरुद्ध तोंड काढतां येत नसे. राज्याचें कांहींही काम न करतां दाभाडे गुजराथचा वसूल फस्त करीत व छत्रपतीचा ऐवजही त्यांनीं बिनबोभाट पोंहोचवूं नये, ही गोष्ट पेशव्यास इतःपर खपणारी नव्हती. सांगोल्यास ठरवलेल्या नव्या व्यवस्थेंत रामराजानें अर्धी गुजराथ पेशव्यास दिली व अर्धी दमाजीकडे राहावी असें ठरविलें. पण साऱ्याच गुजराथचे मालक आपणांस समजणारे दाभाडे ही व्यवस्था मुळींच मान्य करीनात. उमाबाईनें ताराबाईशीं संधान जोडून पेशव्यास शह देण्याचा बेत चालविला तेव्हां दमाजीची कठीण स्थिति झाली. रामराजानें केलेली व्यवस्था, पेशव्यानें त्याजकडून जबरीनें करून घेतली, अर्थात् ती अन्यायाची होय असा त्याचा समज झाला असावा. तसेंच धनी उमाबाई दाभाडे यांस सर्वस्वी पेशव्याच्या हवालीं करणें हेंही त्यास बरें वाटलें नाहीं. त्यांच्यासाठीं पेशव्याशीं दोन हात करावे लागले तरी हरकत नाहीं असें त्यानें ठरविलें. बरें जो पेशवा, शाहूनें जुनीं वतनें जशींच्यातशीं राखावीं असें सांगितलें असतांसुद्धां, दाभाड्याकडील गुजराथ काढतो, तो पुढें आपली अर्धी तरी आपणाकडे ठेवील याचा काय विश्वास मानावा, असा संशय दमाजीस असावा. तो सरळ शिपाई गडी व्यवस्थितपणें वागणारा असून दगलबाज नव्हता. मराठ्यांच्या एकछत्री राज्याच्या हिताची कल्पना मराठे सरदारांत मुळांतच फारशी नव्हती. म्हणून ताराबाईच्या तंत्रानें वागून दमाजीनें छत्रपतीस आपल्या ताब्यांत राखणाऱ्या शिरजोर पेशव्यास तोंड देऊन, राजास मोकळें करण्याचा हेतु योजला. रामदासपंत, प्रतिनिधि, यमाजी शिवदेव वगैरेंच्या मदतीनें पेशव्याचा आपण मोड करूं शकूं असें त्यास वाटलें. असा विचार करून, पेशवा दूर आहे ही संधि पाहून, दमाजी गुजराथेंतून खानदेशांत उतरून पेशव्याचीं ठाणीं उठवूं लागला. त्याच्या दराऱ्यानें रयत पळाली. गांवें ओसाड पडलीं. पुण्याहून पेशव्याचीं माणसेंसुद्धां सिंहगडच्या आश्रयास गेलीं. पुण्याच्या उत्तरेस पेशव्याच्या सरदारांशीं दमाजीनें लढाई दिली. त्यांत रंभाजी पांढरे, दत्ताजी भापकर, दादजी माणकर, वगैरे पेशव्याचे सरदार पडले; आणि हत्ती, घोडे, व सामुग्री गायकवाडास मिळाली. पुण्यांत जनार्दनबाबा फडणीस कारभारी होते, त्यांनीं महादोबा पुरंदरे याकडून दमाजीस विनंति करविली, त्यामुळें तो पुण्यावर न येतां साताऱ्याकडेच वळला. त्यास चुकवून साताऱ्यास ठेवलेली

पेशव्याची फौज बरोबर घेऊन नाना पुरंदरे पुण्याकडे त्याजवर चालून आला. तेथें त्र्यंबकरावमामा पेठे, बळवंतराव मेहेंदळे, रेठरेकर, विठ्ठल शिवदेव, निंबाळकर, बापूजी खंडो चिटणीस वगैरे पेशव्याच्या बाजूचे सरदार पुरंदऱ्यास येऊन मिळाले. त्या सर्वांनीं मिळून दमाजीचा पाठलाग चालविला. कृष्णावेण्यांचे संगमाजवळ लढाई झाली. तींत आरंभीं दमाजीची सरशी होती, परंतु मागाहून नेटानें हल्ला झाला त्यांत गायकवाडाचा मोड झाला. त्याची सर्व चीजवस्त पेशव्याच्या सरदारांच्या हातीं लागली. ही लढाई ता. १५ मार्च १७५१ रोजीं झाली. तिचें वर्तमान ता. २९ रोजीं निजामकोंब्यावर नानासाहेबास समजलें. तेव्हां लगेच त्यानें सरदारांस उत्तेजनाचीं पत्रें पाठविलीं कीं, " लेखनार्थश्रवणें संतोष झाला. मोठी गोष्ट झाली. शाबास तुमची लोकांची. बरी केली. सारे एकदिल होऊन गायकवाडास जाऊं देणें. जोर पोंचल्यास लुटून नेस्तनाबूद करणें. जोंपर्यंत गायकवाडाचा वारापाणी झाला नाहीं, तोंपर्यंत फौज न फोडणें. आमचा मोगलांचा सलुख झाला. इकडील सर्व गुंते उरकले. आम्ही मजल दरमजल येत असों. गायकवाड जाऊं न यावे तें करणें. तुम्हीं सर्वांचीं समाधानें करणें. बाजी तुम्हीं सांवरली. जी गोष्ट तुमचे वडिलांचे वडिलांस योग्य तें तुम्हीं केलें. या उपर बहुत सावधतेनें जरब देणें. मळमळीत न करणें. " या पत्रावरून नानासाहेबाच्या मनांतून दमाजीची पुरी खोड मोडून आपणांविरुद्ध कारस्थानें रचणारांस दहशत बसविण्याचें होतें असें दिसतें. पेशव्याच्या सरदारांनीं या प्रसंगीं जोर करून गायकवाडाचा अगदीं कोंडमारा केला. सातारच्या भोंवतालचा प्रदेश उध्वस्त करून त्यास दाणापाणी न मिळे अशी व्यवस्था केली. त्यास कोणीही या संकटांत कुमक केली नाहीं. ताराबाईनेंही दमाजीचा पराभव झालेला पाहून त्यास वर वर गोष्टीच सांगण्याचा क्रम ठेविला. अशा रीतीनें दमाजी फसला गेला, तरी त्याची फौज सातारा शहरांत तळ धरून होती, त्यामुळें व पेशव्याचें व निजामाचें कोठपर्यंत आलें तें ठाऊक नसल्यामुळें, नाना पुरंदरे वगैरेंनीं दमाजीशीं तहाचें बोलणें लावलें. परंतु ' निजामाचें प्रकरण यशस्वी करून आम्ही लौकरच येतों, गायकवाडास निरोप दिला नसेल तर तसाच अडकावून धरावा. दम धरून त्याचें कविलाबाड बंद करून शर्मिंदा करणें. आम्हीं येऊन पावतों. त्याजपासून दोनच गोष्टींचा निकाल करून घेणें आहे, ' असें नानासाहेबानें पुन: कळविलें. ता. २३ मार्च रोजीं ताराबाईकडील बऱ्हाणजी मोहिते; फरादखान, जाधव वगैरेंशीं पेशव्याचा सरदार मानाजी पायगुडे याचें झुंज

झालें. त्यांत परस्परांस जखमा लागल्या. पुढें नानासाहेब ता. २४ एप्रील रोजीं सदाशिवरावासह साताऱ्यास आला. तेव्हां प्रथम त्यानें गायकवाडावर जोराचा हल्ला चढविला. आपला निभाव नाहीं असें पाहून दमाजीनें सलुखाचें बोलणें काढलें. सटवोजी जाधव, जानोजी ढमढेरे, नाना पुरंदरे, रामचंद्रबाबा यांच्या मध्यस्थीनें भेटी झाल्या. पेशव्यानें दमाजीस शहर सोडून वेण्या दक्षिण-तीरीं जाऊन राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो गेला. पेशवा उत्तरतीरीं राहिला. नानासाहेबानें भेटींत निंमे गुजराथ व पंचवीस लक्ष रुपये मागितले; तेव्हां दमाजीनें शिक्केकटार उमाबाईसमोर ठेवून, दाभाडे धनी आहेत त्यांशीं कायतें बोला, असें टाळाटाळीचें उत्तर दिलें. यानंतर चार दिवसांनीं काय कारण घडलें कोण जाणे, पेशव्यानें गायकवाड बेसावध असतां त्याजवर हल्ला करून त्यास लुटलें. या प्रसंगीं दमाजीनें त्यास प्रतिबंध केला नाहीं, त्यामुळें दाभाडे सेनापति, दमाजी वगैरे सर्व कैद झाले. पेशव्यानें या वेळीं दगाबाजी केली असा या प्रकरणीं त्याच्यावर प्रवाद उठला होता. पण नानासाहेब पुढें याबद्दल म्हणतो " आम्हीं गायकवाडाचें पारिपत्य केलें, त्यांत आम्हीं बेइमानी, दगाबाजी केली, असें नानाप्रकारें लोकांनीं दर्शविलें. परंतु ईश्वर साक्ष आहे. मोठमोठे मराठे, मोठे कारभारी यांणीं त्याचें घर बुडविलें. आम्हांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरे, त्यामुळें बंदीखाने, गड, सर्वही प्राप्त त्याचे कर्मानुरूप झालें. एतद्विषयीं विस्तार कशास! परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध वाढलें. त्यांचे मतें सर्वप्रकारें आम्हांस मोडावें. रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई द्यावी; त्यांनीं आम्हांस बुडवावें; दाभाडे, प्रतिनिधि, रघूजीबाबा सर्वांनीं त्यास मिळावें, ऐसा पूर्ण भाव." यावरून असें दिसतें कीं, दमाजी कैद झाला तरी त्याचीं कारस्थानें चालूच राहिलीं होतीं. त्यांची पेशव्यास चीड येऊन त्यानें कडकपणानें या गोष्टीचा निकाल व्हावा असें योजिलें व सर्वांस बायकामुलांसह कैद केलें. तेव्हां अनन्यगतिक होऊन दाभाड्यानें छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणें गुजराथ पेशव्यांच्या हवालीं केली व गायकवाडानें देवविली. परंतु दमाजी व दाभाडे यांबद्दल पेशव्यास बळकट संशय असल्यानें गुजराथेंतील ठाणीं ताब्यांत येईपर्यंत त्यानें दाभाडे गायकवाडांस कैदेंतून न सोडण्याचा निश्चय केला आणि सर्वांस पुण्यास आणून नजर कैदेंत ठेविलें. नानासाहेबानें ताराबाईशीं बोलणें काढलें तरी ती स्वतः गडावरून खालीं येईना किंवा रामराजासही सोडीना. निरुपाय होऊन पेशवा ता. २२ रोजीं पुण्यास आला आणि ताबडतोब महादाजी पुरंदऱ्यास भेटला. पुण्यावर दमाजी येत होता तो

केवळ महादाजीच्या भिडेनें परतला व नाना पुरंदऱ्यानें हिंमत धरली म्हणून दमाजीचा गेंड्याच्या माळावर पराभव झाला, या गोष्टींनीं पेशव्याचें मत पुरंदऱ्याच्या इमानाबद्दल शुद्ध झालें. त्यानें महादोबा पुरंदऱ्यास पुण्यास बोलावून आपला कारभारी नेमिलें; आणि साताऱ्यास ताराबाईजवळ त्रिंबकरावमामा पेठे याची नेमणूक केली. या वेळीं पुरंदऱ्यांस चार हजार फौजेचा सरंजाम देण्यांत आला. पुण्याची सुभेदारी व पुरंदर किल्लाही त्यांस बहाल करण्यांत आला. अशा रीतीनें रुसलेल्या एका इमानी घराण्याची पेशव्यानें पुनः जोड करून घेतली.

रामराजाची कैद हा ताराबाईचा राज्यकारभार स्वहस्तीं घेण्याचा डाव होता. साताऱ्यास नाना पुरंदरे मोठ्या शिताफीनें सर्व गोष्टी करीत असल्यामुळें हा डाव फसला. एका दमाजी गायकवाडाशिवाय दुसरा कोणी बलवान् सरदार ताराबाईस सामील झाला नाहीं. दमाजीचा पराभव झाला तेव्हां ताराबाईचा बंडावा मोडल्यासारखाच झाला. परंतु ताराबाई तापट व मानी होती. सुंभ जळलें तरी त्याचा पीळ कायमच असतो. पेशव्यानें खालीं येण्याविषयीं गोष्ट काढली, तेव्हां ताराबाई लिहिते, ' तुम्हीं फौजेसुद्धां येऊन परीघ घातला आहे तो उठवून स्वस्थळास जावें. तदनंतर जें बोलणें तें सांगोन हरकोणी आपले तर्फेनें पाठवून द्यावा. त्यांस जावसाल करावा तो केला जाईल '. रामराजास अटक झाली ही गोष्ट ताराबाईच्या पक्षांतील लोकांसही रुचत नव्हती. पण आजीस दुःख वाटेल म्हणून स्वतः तो कांहींच नेट धरीना, त्यामुळें इतरांचा नाइलाज झाला. तो एखादा दिवस उपास करून थोडी निष्ठुरता दाखविता तर गडकरी वगैरेंनीं त्यास अटकेंत ठेवलेंच नसतें. ताराबाईची जरब दांडगी व शासन कडक असल्यामुळें, त्यांस हिचमिचावयास जागा नव्हती इतकेंच. किल्ल्यावरील हवालदार आनंदराव जाधव याची लोकांनीं निर्भर्त्सना केली तेव्हां त्यानें महाराजांस खालीं आणून सोडण्याच्या कामांत पुढाकार घेतला. ही बातमी ताराबाईस कळतांच तिनें जाधवास खलबतास म्हणून बोलावून त्याचा शिरच्छेद करविला. त्याचे इतर साथिदारही मारले. असल्या दहशतीमुळें तिच्याविरुद्ध जाण्याचें कोणास धाडस होत नसे. रामराजा पेशव्याविरुद्ध हातपाय हलवीत नाहीं या गोष्टीचा तिला मोठा त्वेष येई. ' तूं राजबीजाचा नव्हस, उचल्या आहेस ' असेंही म्हणण्यास ती कमी करीत नसे. ही बातमी लोकांत पसरून एक रामराजाचा तोतयासुद्धां त्यामुळें उत्पन्न झाला होता. तसेंच यावेळीं ज्या क्षुद्र इसमांस पेशवे-ताराबाईच्या कलहामुळें नसतें महत्त्व प्राप्त झालें होतें त्यांचा असा बेत होता कीं, दोघांचें गोड होऊं देऊं

नये. कारण 'मातुश्री व पेशवे एक झाल्यावर आम्हांस कोण विचारतो?' या वेळचें वर्तमान पेशवा शिंद्यास लिहितो, 'येथील वर्तमान तरी वरकड सर्व राज्य आमचे लक्षाशिवाय नाहीं. मातुश्री चढीं लागलीं आहेत. त्यास गडावर दोन फळया, राजश्री निराळे, मातुश्री निराळी. प्रस्तुत राजश्रींचें प्राबल्य आहे. बहुधा उतरतील. श्रीकृपेनें लवकरच राज्याचें कल्याण, दुष्ट दुर्बुद्धीनें राज्यांत बखेडा करतात त्यांचीं काळीं तोंडें होऊन, राज्य स्वस्थ होईल.'

यावेळीं उत्तरेंत शिंदे होळकरांनीं वजिराची बाजू घेऊन रोहिल्यांवर स्वारी चालविली होती, व तींत ते यशस्वीही होत होते. पण नानासाहेबाची मात्र घरच्या भांडणांत कुचंबणा झाली. फौज घरीं अडकून राहिल्यामुळें तिच्या पोटास नाहींसें झालें. मराठशाहींत घरबसल्या फौजेचा निर्वाह एक वर्षही होत नसे. पेशवा शिंद्यास लिहितो, 'ताराबाईशीं बिघाड पडल्यामुळें त्यांनीं नानाप्रकारें पेंच केले. ज्यांशीं आम्हीं गोड न बोललों तो त्यांचे लगामीं; ज्यांशीं गोड बोललों, तोही त्यांनीं आपले लगामीं लावला. कोठें ताळ राहिला नाहीं. यास्तव आम्हीं कबूल केलें कीं, दादोबास प्रतिनिधि द्यावी. त्यांनीं सर्व कारभार करावा. गुजराथ कर्नाटकची व्यवस्था आम्हीं केल्याप्रमाणें चालावी. त्यांनीं कबूल केलें; परंतु खालीं उतरल्यावांचून, भेट झाल्यावांचून, जनांत नीट दिसत नाहीं, संशय तुटत नाहीं. यास्तव बहुतां प्रकारें आर्जव करतों. परंतु खालीं उतरतांच राजा पळून जाईल, अगर आम्हीं मागती राजास हातीं धरून आपणांस मुरदाड करतील हा संशय मानून संकटांत आहेत. भोंवतीं भलताच गुरें वळवितो. पोटास एक पैसा येत नाहीं. सोनें रुपें मोडून खावें, येथ पावेतों आलें. यास्तव मातबर मराठे मध्यस्थ घेऊन उतरावें ऐसा करार झाला आहे. उतरलीं तर उत्तम, नाहीं तर एका खाशानें दहा हजार फौजेनिशीं येथें असलें पाहिजे. मुरारजी घोरपडे व निजाम यांजकडे राजकारणें करतात. सर्व संभाळलें पाहिजे. गृहकलह कठिण आहे. एतद्विषयीं कसें करावें! तुम्हांकडे मल्हारबांकडे देखील राजकारणें करितात ऐसें ऐकितों. त्यांस तुम्हांशीं राजकारण केल्यास काय होणें? परंतु यत्नास चुकत नाहींत.' या प्रकरणांत पेशवा किती त्रासला होता हें ताराबाईजवळील त्याचा कारभारी दिनकर महादेव यास लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें. तें पत्र असें:—राजश्रीस गडावर अटकाव झाला, यासाठीं इतके दिवस भांडलों. ज्यांनीं अटकाव केला, त्यांचे दावेदार झालों. सर्व मातब्बरांचा डौल एकीकडे. एक आमचा मात्र निश्चय कीं, भांडून अथवा सलुखानें राजा सुटावा. ज्याचे चाकर म्हणविलें,

त्यासाठीं मेहेनत करावी. मग जो वूज करून कृपा करील तेच विशेष. याअर्थें, लाखों रुपये खाऊन, आपले मनसुबे बुडवून, राजा सुटावा या थरास आणिलें. सर्व बाईसाहेबांचे पक्षीं मिळाले होते. एक आम्हीं मात्र राजश्रींच्या पक्षींचे जाणून, आमचे पारिपत्यास सर्व राज्यांतील सरदार प्रेरिले. गायकवाड तों सर्व देश लुटीत साताऱ्यासच आला. यामुळें भागानगर व कर्नाटकचीं कामें अफ्तर जाहलीं. इतके पदार्थ, राजश्रींचे सुटकेचे उपयोगास लागलों, यास्तव प्राप्त झाले. आतां गडावर सर्वाध्यक्षता राजश्रींची जाहलियाउपर आमचे मनोरथ बाकी राहिले नाहींत. मतलबाचे यादीवर करार, त्यांनीं संतोषें करून देणें उचित. यद्यपि न दिल्हे तरी आम्हीं त्यासाठीं आड यावें असें नाहीं. जेव्हां खालीं येतील तेव्हां सर्व सेवकांच्या रीति व आमचे स्थितीची तुलना करितील. तेव्हां जें त्यांचे खावंदगिरीस व कदरदानीस उचित, तेंच करतील. राजांना वर बसविलें होतें, यास्तव किल्ल्याशीं भांडत होतों. आतां राज्याचा अखत्यार परिच्छिन्न जाहला असला, तर एके दिवसांत आमची फौज उठोन येईल. खाऊन बसावयाचें प्रयोजन काय? परंतु सांगोल्याहून राजे गेले ते समयीं चि. नाना व चि. भाऊंनीं अर्ज राजश्रींस केला होता कीं, गडावर न जावें; परंतु आमचा अविश्वास यामुळें गेले. शेवटीं कर्मभोग, अपकीर्ति येथपावेतों जाहली. आतां राजे वर राहिले, आमचे फौजेस उठवून लाविलें, तरी मागती अनेक कल्पना व्हावयास अंतर होणार नाहीं. करवीरकरांकडील वगैरे पेंच बहुत आहेत. खावंद लोकांनीं, जे हल्लीं तेथें मंत्र सांगणार असतील, त्यांसीं दीर्घ विचारून जें करणें तें करावें. सर्वोत्तम पक्ष हाच कीं, तिळमात्र संशय न धरतां राजश्रींनीं खालीं यावें. दिल्ली, इराण, तुराणपासून रामेश्वर पावेतों दुर्लौकिक जाहला आहे, तो दूर करावा. कारभाराचा अर्थ तर, जोरावारीनें आजपर्यंत कोठेंही कारभार शेवटास गेले नाहींत. सर्व योग खावंदांची रजाबंदी राखावी, हेच आमची इच्छा. खावंद आपले आवडीनें कारभार घेतील तेव्हांच करू. कारभाराकरितां बहुतांचा दावा पदरीं पडतो, तो दावा कशास पाहिजे? खावंदांनीं दिल्हे दौलतींत कारभार बहुत आहेत. नवा तोतया, लबाडी करील यास्तव, ठेविला; त्यास जिवें न मारावें. वरकड खात्रेस येईल तेथें ठेवावा, आमचा गुंता तिळमात्र नाहीं. खावंदांनीं सुखरूप राज्य करावें. याप्रकारें बोलोन हवालदारास समजोन सांगोन खालीं प्रतिपदेस येत तें करणें. वेरझारेवर काम पडल्यास अनेक विघ्नें उपस्थित होतात. यास्तव रंग भरून त्यांची निशा करून खालीं येत, आम्हीं श्रम केलियाचें सार्थक होय, तें करणें.'

या पत्रांवरून पेशव्याच्या भावना व्यक्त होतात. कारभाराचें ओझें पेशव्यानें आपणावर कां घेतलें याचा बोध या पत्रावरून होतो. या पत्रावरून रामराजानें गडावर राहून अधिकार स्वतंत्रपणें चालवावा असें कांहीं ठरल्याचा भास होतो. रामराजा वर राहिल्यामुळें, नानासाहेबास आपली अपकीर्ति किती व कोठवर झाली याची पुरी जाणीव या पत्रांत मनास झोंबल्याप्रमाणें दिसते. रामराजास इतरांच्या सांगण्यामुळें पेशवा लवाड वाटे. ताराबाईच्या कारस्थानानें पेशवा टेकीस आला होता तरी तिच्या कर्तबगारीबद्दल पेशव्यास वाटणारा आदर पुढील पत्रांत दिसून येतो. ‘ तुम्हीं पत्र पाठविलें तें पाहून संतोष जाहला. तुमचा समज आजच असा आहे असें नाहीं. पूर्वीपासून आहे. वरकड जें करतां तें वरेंच. त्याचा विषय फार थोडा. परंतु मातुःश्री बोलवीत नाहींत, कामकाज सांगत नाहींत, हें तरी फारच चांगलें ! असें या मागें कधीं जाहलें नाहीं. मुख्य, मातुःश्रीचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी, त्यांचे मर्जीस विरुद्ध न पडेल असें असावें, तें तुम्हीं आज लिहिले वरून कळलें. याउपर काय म्हणावें ! खर्चवेंच जसा मातुःश्री आज्ञा करितील तो करावा. मातुःश्रीस एखादा भीड घालतो, आपण समजून सांगावें, आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. मातुःश्रीस संसार अगर सर्व विषय कळतो; तो तुम्हांस कळावयासी बहुत जन्म पाहिजेत. सारांश, मातुःश्रीचे आज्ञेचा प्रकार, अगर मातुःश्रींनीं खर्चवेंच केला तरी उत्तम आहे. ते जें करतात तें समजून करितात. तुम्हांस मात्र समजत नाहीं, इतकाच अर्थ. जसें मातुःश्री सांगतील तसें करीत जाणें; म्हणजे लक्ष जोड तुम्हीं आम्हांस दिली. वरकड संसार, तुम्हीं आपले तर्फेनें अधिक उणें समजोन करणें, हें आम्हांसच धार्जिणें नाहीं. तुम्हांस तरी हें प्राप्त कसें असावें, तें श्रुत नाहीं. जें चालतें तें बरेंच आहे. मातुःश्री बोलावित नाहींत, हें मात्र सर्वार्थी वाईट समजून, त्यांचे आज्ञेचा अर्थ समजोन वर्तणूक करणें.” ताराबाईचें न ऐकणें म्हणजेच पेशव्याचें हित साधणें अशी समजूत असलेल्या कोणा मूर्ख कारकुनास हें पत्र लिहिलें आहे असें वाटतें. कदाचित् ताराबाईस बरें वाटावें म्हणून नानानें मुद्दाम आपल्या कारकुनास हा ठपका दिला असेल.

वरच्या पहिल्या पत्रांत सांगितलेला करार सवालजबाबांच्या स्वरूपाचा होता. त्यांत मुख्य कलमें होतीं तीं अशीं:—शाहूच्या वेळीं होत होता तसाच कारभार आतांही व्हावा; ज्या नोकरांवर पेशव्याच्या बाजूचे म्हणून ताराबाईची इतराजी झालेली होती त्या गोविंदराव चिटणीस प्रभृति लोकांस पूर्वींचीं कामें सांगावीं; राजस-

नदेखेरीज झालेली मुलखाची घालमेल रद्द समजावी; यमाजीस मुतालिकी न सांगतां घरीं बसण्यास सांगावें; गायकवाड, दाभाडे यांचीं कैद माणसें सोडावीं. शाहूच्या वेळेप्रमाणें कारभार म्हणजे पर्यायानें पेशव्यास मिळालेला सर्वाधिकार रद्द अशी खोंच त्या अटींत होती; पण पेशव्यानें तीही आपत्ति पत्करली, पण घरचीं भांडणें मिटोत, असा हेतु धरला होता. यावरून इतरांस बाजूस ठेवून राज्य बळकावण्याचा त्याचा हेतु होता हें म्हणणें किती फोल आहे हें उत्तम कळतें. मराठ्यांच्या राज्याचा कारभार सुरळित चालावा, त्याची जगभर अपकीर्ति, बोभाटा न व्हावा, एवढीच गोष्ट पेशव्यास हवी होती. दाभाडे गायकवाडांचीं माणसें, गुजराथचा करार पुरा झाल्यावर सोडण्याचें, पेशव्यानें कबूल केलें. मात्र राजसनदेनें झालेल्या गुजराथ, कर्नाटक वगैरे मुलखांच्या बदल्या फिरविण्यास पेशव्याची तयारी नव्हती. या कराराप्रमाणें ताराबाई रामराजासह ता. १३ आक्टोबर १७५१ रोजीं सातारा शहरांत उतरली. रामराजानें स्वतः कारभार पाहवा अशाविषयीं पेशव्यानें आपल्याकडून शिकस्त केली. पण त्याच्या तें मर्जीस येईना. उलट ताराबाईनें मात्र, रामराजानें आपल्या तंत्रानें वागावें, आपण पेशव्याच्या सांगण्याबाहेर वागणार नाहीं व त्यांनीं आपल्या व रामराजाच्या भानगडींत लक्ष घालूं नये, असें त्याजकडून ठरवून घेतलें. रामराजांत कर्तृत्व नाहीं अशी खात्री झाल्यावर, निदान ताराबाईस तरी नाखूष ठेवूं नये असा विचार पेशव्यानें करून, त्रिंबकराव-मामा पेठ्यास साताऱ्यास आपल्या कारभारावर नेमून पाठविलें आणि त्यास ताराबाईस खूष ठेवून कारभार करण्याची आज्ञा केली. त्यानें हळूहळू किल्ल्यावरचे लोक दूर करवून, कांहीं इसमांस इनामें देऊन, पेशव्यास अनुकूल अशी मंडळी जमा केली, व रामराजाच्या नांवानें पण ताराबाईच्या तंत्रानें तेथील कारभार चालविला. तरीही तिचीं कारस्थानें पूर्णपणें बंद पडलीं नाहींत किंवा अखेरपर्यंत पेशव्यास तिचा कधीं विश्वास आला नाहीं.

दमाजी गायकवाड व दाभाडे पुण्यास नजरकैदेंत होते तेथेंही त्यांचीं कारस्थानें बंद पडेनात व गुजराथेंतील महालही ताब्यांत येण्यास विलंब लागूं लागला. दमाजी कैदेंत पडला हें ऐकून गुजराथेंत त्याचा चुलत भाऊ केदारजी व गाय-कवाडाचा दिवाण रामचंद्र बसवंत दमाजीबरोबर कैदेंत होता त्याचा चुलत भाऊ बाळाजी यमाजी, यांनीं सोनगडास लोक जमवून स्वतंत्र कारभार चालविला. त्यांच्यावर पेशव्याच्या हुकमानें वसईचा सुभेदार शंकराजी केशव फडके यानें स्वारी केली, पण त्याचा त्यांनीं पराभव केला. या बंडाचें मूळ दमाजीच आहे

असें वाटून पेशव्यानें दमाजीच्या जवळचे सर्व नोकर दूर करून त्याची कैद सक्तीची केली. दमाजीचा कारभारी रामचंद्र बसवंत हा वेष पालटून लोहगडावरून पळून सोनगडीं गेला, तेव्हां पेशव्यानें दमाजीसही लोहगडावर नेऊन ठेविलें. दमाजीचे दोन मुलगे सातान्यास ताराबाई जवळ ओलीस ठेवलेले होते. याच वेळीं रामदासपंतानें बुसीच्या जोरावर पेशव्याशीं युद्ध आरंभिलें, तेव्हां पेशवा पुणें सोडून घाईघाईनें घोडनदीवर गेला. ही संधि साधून यशवंतराव दाभाडे व त्याचा मुलगा त्र्यंबकराव हे पुण्यास नजरकैदेंत होते ते कोठें तरी पळून गेले. त्यावरून पुनः ताराबाई, दाभाडे व रामदासपंत यांचें कांहीं सूत आहे कीं काय असा पेशव्यास संशय आला व त्यानें दाभाडे सातान्यास गेले आहेत काय, असें ताराबाईस विचारलें. त्याचा ताराबाईस राग येऊन तिनें एक सणसणीत पत्र नकारार्थी पेशव्यास पाठविलें व शंकेखोरपणाबद्दल त्याची निर्भर्त्सना केली. तसेंच निखालसता दाखविण्यासाठीं दादोबा प्रतिनिधीस पेशव्याच्या मदतीस जाण्याची आज्ञा केली व 'अविंधांचा पराभव करून तुम्ही हुजूर येणें' म्हणून पेशव्यास कळविलें. पण हा कदाचित् लबाडीचा डाव असून प्रतिनिधि आयत्या वेळीं निजामास मिळण्याचा संकेत ठरला असेल अशा शंकेनें पेशवा ताराबाईस लिहितो, 'प्रतिनिधिजवळ फौज नाहीं; व आपल्या जवळही मातबर मनुष्य असले पाहिजेत, याजकरितां प्रतिनिधीस हुजूर नेऊन तेथील बंदोबस्त करावा. सेवकास सामील व्हावें म्हणून सर्व सरदारांस पत्रें पाठविलीं, तीं उत्तम आहेत. साहेबांचा पुण्यप्रताप सेवकाचे मस्तकीं असतां, कोणेविशीं मोगलांचा डर धरीत नाहीं. जें होणें तें धन्याचे प्रतापेंकरून होईल.' अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार परस्परांत नानासाहेबाच्या निधनापर्यंत चालत असे. दोघें एकमेकांस पूर्णपणें ओळखून होतीं.

---

## प्रकरण १२ वें.

# निजामशाहीचे लचके.

ताराबाई व गायकवाड यांचीं घरांतील प्रकरणें विल्हेस लावीत असतां नानासाहेब निजामाकडील बाजू विसरला नव्हता. रामदासपंताच्या द्वारें शक्य तितकें आपलें कार्य साधण्याचा त्याचा उद्योग चालू होता. गाजीउद्दीन येणार हें भय सलाबतजंगास दाखवून त्याच्याकडून सहा सुभ्यांच्या चौथाईची भानगड कायमची निकालांत काढण्याची त्याची इच्छा होती. पण निजामाच्या दरबारीं फ्रेंचांचें

मुकासा शाहूनें भांडण मिटवण्यासाठीं खंडेराव दाभाड्याकडे सोंपविला. तरी पेशव्याकडे राजबाबती व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क होता. तिच्या वसुलासाठीं त्यास गुजराथेंत हात घालणें भागच होतें. त्याच्याही पलिकडे जाऊन ज्या करारानें चौथाई सरदेशमुखीचे हक्क मराठ्यांस गुजराथच्या सुभ्यांत मिळाले होते त्याच्या अटी बरोबर पाळल्या जातात किंवा नाहीं हें पहाणेंही पेशव्याचें कर्तव्य होतें. जर मराठ्यांचे सरदार चौथाईपेक्षां जास्त चापूं लागले व त्याविरुद्ध बादशाही सुभेदारानें तक्रार आणली तर तिकडे दुर्लक्ष करणें पेशव्यास शक्य नव्हतें. अशा तऱ्हेचा उपक्रम दाभाड्याचा मुतालिक गायकवाड करूं लागला तेव्हां त्रिंबकराव दाभाड्याच्या मृत्यूपासून धुमसत पडलेला गुजराथच्या व्यवस्थेचा प्रश्न पुनः पुढें आला. शक्य तर सर्वच आपणास मिळावें असा दमाजीचा हेतु होता. त्यासाठीं त्याचें निजामाशींही सूत होतें हें वर आलेंच आहे. त्रिंबकराव मेल्यापासून उमाबाईस दुखविण्यास शाहू अगदीं नाखूष असे. उमाबाई दाभाडे ही मोठी पराक्रमी बायको होती. आपल्या घराण्याचें पारडें तिळमात्र कमी होणें तीस खपण्यासारखें नव्हतें. पण मुलगा यशवंतराव व्यसनांत बेहोष असल्यामुळें तिचीही चमत्कारिक स्थिति झाली. अशा परिस्थितींत नानासाहेब फक्त योग्य संधीची वाट पाहत होता. आपणांस वेळेवर पैसा मिळत नाहीं या सबबीवर दमाजीस काढून त्याच्या जागीं दुसरा मुतालिक सुभा नेमण्याची यशवंतराव दाभाड्याची इच्छा होती. त्यास तोड म्हणून यशवंतरावाचा लहान मुलगा त्रिंबकराव सेनाखासखेल हा आपली आई अंबिकाबाई ईसह चांदखेड येथें रहात असे, त्याच्या नांवानें गुजराथ पेशव्यामार्फत आपल्याकडे करून घेण्याचा दमाजीनें व्यूह रचला. पण उमाबाईनें शाहूकडे तक्रार केल्यामुळें तो घाट फसला. उमाबाईच्या तक्रारींमुळें शाहूचा दमाजीवर मुळींच लोभ नसे. त्यामुळें दमाजीनें गोविंदराव चिटणीस व पेशवे यांच्या लगामीं राहून आपला स्वार्थ साधण्याचा क्रम ठेविला. दमाजीनें गोविंदरावास गुजराथेंत सरंजामही देण्याचें कबूल केलें. पेशव्याचें गायकवाडाशीं फारसें बरें नाहीं असें पाहून, निजामानें वर सांगितल्याप्रमाणें गुजराथवर स्वारी करून तेथें मोगलाई अंमल फिरून चालू करण्याचा विचार चालविला. निजाम मोठ्या सैन्यानिशीं गुजराथेंत उतरला तर स्थानिक मोगल अंमलदार त्यास मिळतील व या सर्वांपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें दमाजीनें ओळखून पेशव्यानें आपल्या साह्यास यावें अशी खटपट गोविंदराव चिटणिसामार्फत त्यानें चालविली. पेशव्यास तेंच पाहिजे होतें. त्यानें निंमे

पारडें जड होऊन बुसीच्या जोरावर रामदासपंत पेशव्यास दाद देईना. उलट पेशव्याच्या घरच्या भांडणांचा फायदा घेऊन त्यास पुरता शह देण्याचा पंतानें बेत केला. पेशवा आपला औरंगाबादचा वकील दीक्षित यास लिहितो, ' दिल्लीहून गाजुद्दीनखान न आले, पातशाहाचें कृपापत्र आलें, तर पंध्रा लक्षांची जहागीर देऊं ऐसें मागें ते बोलले होते. आम्ही अवश्य म्हणून म्हणत होतों. शेवटास नेणें नव्हतें, यास्तव मोघमच मजकूर ठेवला. सांप्रत गाजुद्दीनखान राहिले, यास्तव आमचें प्रयोजन नाहीं असें मनांत आणून, उडवाउडव करीत असतील तर करोत. रामदासपंतास घरींदारीं बहुत पेंच आहेत. आम्हीं उदासीनपणा दाखविल्यास कांहीं तरीं भारी पडेलच. आम्हांस तो मोठमोठ्या नफ्याचा भरंवसा त्यापासून आहे. राजश्री जानबाचे बोलण्यांत फारच मजकूर होता. रामदासपंतांनीं करारच केला आहे कीं तुमचें कर्ज फिटोन, तुमचे हातून मोहरांची दक्षिणा वांटवितों. वडिलांचे इतिफाकानें, सासुभ्यांचा यथास्थित बंदोबस्त, जो थोरले नवाबांस न जाहला, तो करितों. हे सर्व आशय तुम्हीं बोलत जाणें. आमचे मनांत त्यांशीं स्नेह करावा, सर्व प्रकारें त्यांचें साहित्य करावें, हेंच आहे.' ( १४ जुलै १७५१ ). " सर्वप्रकारें आम्हांस रामदासपंताचे स्नेहाचा भरंवसा आहे. त्यांचा आमचे ठायीं निष्ठापूर्वक स्नेह व आमची कृपा त्यांचे ठायीं असतां, वरकडांच्यानें काय होणार ? गायकवाडाचे प्रसंगीं त्यांनीं कुमक पाठविली येणेंकरून वचनप्रामाणिकतेचा पुढें भरंवसा फार धरला आहे (१५-८-१७५१)." रामदासपंतानें आरंभीं सलाबतजंगाचा जम बसला नव्हता तोंपर्यंत पेशव्यास खूप थापा दिल्या. गायकवाडावर पेशवा जाण्यास निघाला तेव्हां कांहीं मदतही केली. पण पुढें मराठ्यांचे आपसांतील बखेडे पाहून व दिल्लीहून गाजीउद्दीनास घेऊन शिंदेहोळकरही येत नाहींत हें जाणून, त्यास जोर आला. पुढें रामदासपंतानें जानोजी निंबाळकरास पुण्यास पाठविलें. तेथें तो तीन महिने होता तरी कांहीं तड येईना. गाजीउद्दिनास घेऊन तावडतोब येण्याबद्दल नानासाहेब शिंदेहोळकरांस वारंवार लिहीतच होता. ता. ११ जून रोजीं त्यानें होळकरास लिहिलें, " नबाब गाजुद्दीनखान फिरोजजंग बाजदबरसाद दक्षिणेस यावयाची तजवीज करीलसें दिसतें. फिरोजजंग आसोफजाचे पुत्र खरेच, परंतु बहुत दिवस दिल्लीस राहिले. मुत्सद्देगिरीचेंच काम केलें. शिपाईगिरी सरदारीचें काम त्यांस पडलें नाहीं. प्रस्तुत ते सरदारीचे व बहादुरीचे कामाची हिंमत करणार. त्यास आम्हीं सलाबतजंगाशीं जहागिरीची बोली लाविली आहे. तेही आम्हांशी बोलतात. परंतु

गाजुद्दीनखानाचे येण्याची गरमी असती तर चित्तानुरूप हेही आम्हांशीं बोलते. परंतु गाजुद्दीनखान येण्याची ढील, यामुळें इकडील निवटलें नाहीं. तुम्हीं गाजुद्दीनखानाचे वचनास गुंतलां, आम्हीं सलाबतजंगाकडे गुंतलों, येणेंकरून दोहोंकडेही फार फार अवघड होऊन बेइमानीचा शब्दारोप येईल. यास ही गोष्ट सर्वथा कार्याची नाहीं. प्रस्तुत तुम्हीं शब्दास न गुंतावें; जर सलाबतजंग कार्य करून न देत, तर यांजकडील बोली तोडून गाजुद्दीनकडे बोली लावून कार्य करून घ्यावें लागेल. सारांश, इकडील प्रकार निवटला नाहीं तोंपर्यंत तुम्हीं गाजुद्दीनखानाशीं वचनास न गुंतावें. आमचे मतें यांजशीं वचनप्रमाण झालें आहे. यांनींच जहागीर दिली तर तों यांसच राखावें. दुसरा पक्ष न करावा. यांनीं लबाडी केली, नीट न देत, तर यांशीं इमान उजवलें, आम्हांवर तर शब्द नाहीं. ऐसे जावसाल जानोजी निंबाळकर मध्यस्थ आहेत त्याहातीं करावे. मग सुखरूप गाजुद्दिनास आणून यांचें पारिपत्य करावें; व त्यांपासून मातबरच पैका, मुलूख, घेणें तो घ्यावा. या गोष्टीचा स्पष्टार्थ श्रावण भाद्रपद अखेर कळेल, तदनुरूप जें कर्तव्य तें करावें. जर केवळ यांचें राजकारण तुम्हीं टाकलें, ते नाउमेद होऊन घरीं बसले, म्हणजे यांसही आमची गरज पडणार नाहीं. यास कांहीं दिवस धातुपोषण बोलावें. यांजपासून आपलें कार्य साधावें. हे ताळ्यावर नच येत तर यांशीं शपथपूर्वक बोलून मग त्यांस आणावें. ऐसा कोरगारीनें मनसबा केल्यावांचून प्रामाणिकता राहणार नाहीं. आम्हीं यांसी सलुख केला, तुम्हीं त्यांसीं इमान केलें, म्हणजे महा अप्रामाणिकतेचें कारण होणार. बहुत लौकीक फटकळ होणार. यास्तव त्यांचें भय यांस पडे, कार्य यांजपासून होय, ऐसें करावें. हे ताळ्यावर नच येत तर आपलें इमान उगवलें. तुम्हीं दसरियापावेतों राजकारण राखावयाचे रीतीनें बोलणें. इतक्यांत यांसी बोली पाडून स्पष्ट निश्चय करून तुम्हांस कळवूं. तदनुरूप जें कर्तव्य तें करणें. सलाबतजंग थोड्या दिवसांत औरंगाबादेस दाखल होतील. जानबा जाऊन जावसाल करून येत तों उबार आहे." या पत्रावरून नानासाहेबाचा विचार स्पष्ट दिसतो. गाजीउद्दीनास निजामीवर आणण्याचा डाव नासिरजंगापासूनचा होता. पण पुढें दोघे मरून सलाबतजंगच पुढें आला, व त्यास फ्रेंचांची मदत असल्यामुळें उखळणेंही दुरापास्त झालें. तेव्हां त्याशींच गोडीनें काय होतें तें पहावें असा पेशव्यानें बेत केला. गरजेशिवाय मैत्री नाहीं, म्हणून गाजीउद्दीन येणार असा आवांका सलाबतास दाखविणें भाग, तर तेवढयापुरतें बोलणें शिंदेहोळकरांनीं चालू ठेवावें, पुढें सलाबतजंग देतो न देतो

याचा निश्चय पाहून मग गाजिउद्दीनाचें कार्य घेणें तर अंगावर घ्यावें, असा नानासाहेबाचा विचार होता. दोहोंकडे बोलणीं चालतात हें एकमेकांस समजलें तर दोघेही साशंक होऊन मराठ्यांवर बेइमानीचा दोष येऊन कार्यभाग बुडाला असता, म्हणून फार सावधगिरीनें कोणीही न गुंततां काम चालवावें असें पेशव्यानें दीक्षितास कळविलें. परंतु गाजीउद्दीन येणार याची दहशत सलावतजंगास पोहोंचावी, म्हणून पेशवा दीक्षितास लिहितो, ' गाजुद्दीनखान वडील आणि पातशाही सनदेसहवर्तमान, येतात. त्यांचे साहित्याविषयीं पातशाहांनीं शिंदे होळकरांस पुष्कळ सांगितलें. आम्हांसही लिहिलें आहे. सय्यद लष्करखानाचा मनोदय गाजुद्दीनखानाकडेच स्पष्ट दिसत होता. रामदासपंताशीं चित्तापासून विमनस्कता, यामुळेंहि तिकडेच अनुकूल मनोदय होता. सर्व प्रजांचें बरें होतें व सरदार करून येतील तें आम्हांस निभावलेंच पाहिजे. सलाबतजंगासही हेंच योग्य आहे. घरचे घरीं भांडणें सर्वथा योग्य नाहीं. कदाचित् सय्यद लष्करखान फिरंग्यांचे थरावर जातील तर न जावें. फिरंग्यांचें फुलचरीस ( पांडीचरीस ) संकट, मग नवें सामान कोठून येणार ? व एक फिरंगी सामानाचें काय होतें ? भर देतील परंतु भरंवसा न मानावा ?'

सय्यद लष्करखानास स्वतः निजामाचा दिवाण होण्याची इच्छा असल्यानें त्याचें रामदासपंताशीं बरें नव्हतें. पण पंतास फ्रेंचांची मदत होती. तेव्हां खानाचा डाव फ्रेंचांस लालूच दाखवून आपणांकडे वळविण्याचा होता. फ्रेंचांस म्हणजे अमक्याचा अभिमान धरण्याचें कारण होतें असें नाहीं. जिकडून जास्त फायदा तिकडे ते गेले असते. खानास फ्रेंच मिळते तर मग त्यास पेशव्याची जरूर राहिली नसती. म्हणून खानास त्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठीं नानासाहेबानें त्यास फ्रेंचांचीच किती हलाखीची स्थिति आहे याची जाणीव दिली. या प्रमाणें सलाबतजंगास भय दाखवून त्याकडून मुलूख उपटण्याचा पेशव्याचा विचार होता. पण पेशव्याशीं एकदां फ्रेंचांची गांठी घालून त्यांचें गर्वहरण करावें असें रामदासपंताचे मनांत होतें. दाभाडे गायकवाडांशीं चाललेल्या भांडणामुळें मराठ्यांत पुष्कळ फितुरी होईल असाही त्याचा कयास असावा. युद्धास निमित्त पाहिजे म्हणून पंतानें पेशव्यांकडे उत्तरेंतून खजीना येत होता तो लुटविला, व त्याबद्दल पेशव्यानें तक्रार केली, तेव्हां उडवाउडवी चालविली. याच वेळीं उत्तरेंत शिंदे-होळकरांची रोहिल्यांवर चढाई चालू असल्यानें ते इकडे येऊं शकत नाहींत असा पंतास विश्वास होता. तेव्हां पेशव्यानें एकदम या खजिन्याच्या अपमानाबद्दल

युद्ध चालू करावें अशी रामदासपंताची अपेक्षा होती. पेशव्यास त्याचा वकील याबद्दल ता. १४ आक्टोबर १७५१ रोजीं लिहितो, " येथें आज दोन तीन दिवस हुल्लड झाली आहे कीं, खुदावंदखान हैदराबादेहून चाळीस हजार खजाना घेऊन येत आहेत त्यास श्रीमंतांनीं यशवंतराव पवार दहा हजार फौजेनिशीं खुदावंदखानावर पाठविले आहेत. तो खजाना अटकावून आणावा, हे वार्ता येथें दाट रामदासपंतापावेतों आहे. या वर्तमानावरून कितेकांचा आव गेला आहे. जर हे गोष्ट सत्य असली, खजाना सरकारांत हस्तगत जाला, तर हे ( पंत ) सहजच गर्वहत होत आहेत; व येथें लोक म्हणतात कीं, दोन महिने श्रीमंतांनीं असेंच यांस दबकाऊन राखल्यास हे आपल्या आपण मरतात. यांस मारावें लागतच नाहीं. यांस शिबंदी व खानगी खर्च मिळोन नित्य लक्ष रुपये खर्च आहे. दरमहा तीस लक्ष रुपये पाहिजेत. खजिन्यांत तों पैका नाहीं. हैदराबादचा खजिना आणविला आहे, तितक्यानें बेगमी होत नाहीं. यास्तव यांस या दिवसांत पेशव्यांच्या प्रतापाचें दर्शन जालियानें यांचा गर्व हत होईल. राजश्री बाबूजी नायकाकडील वकील रामदासपंतांकडे जाऊन वळवळ करीत आहे. सप्तऋषी ( सातारा ) वरील मातुश्री ( ताराबाई ) चेही येथें कागदपत्र येतात. जावसाल जात असतात. रामदासपंताचे चित्तांत बिघाड करणें हा निश्चय जाला आहे." या पत्रांत लिहिलेली बाजारगप्प कदाचित् सैन्यास चेव आणण्यासाठीं रामदासपंतानें मुद्दामही उठविली असेल. पंतानें खजिना लुटवला त्याची फेड म्हणून पेशव्यानें लुटला ही गोष्ट बाह्यात्कारीं तरी खरीच वाटते. पण त्यामुळें मोगलांचा आव कां जावा तें समजत नाहीं. मात्र पेशव्याप्रमाणेंच सलाबतजंगाचीही पैशाबद्दल ओढ होती तेव्हां जर पेशव्यानें लढाई टाळून कांहीं महिने टिकाव धरून आव राखला तर जमवलेल्या लष्करास रजा देणें हें मोगलांच्या वांट्यास येईल असें हा वकील लिहितो; व या कारणासाठींच रामदासपंताच्या मनांत बिघाड करण्याचें होतें हें उघड आहे. ताराबाई, बाबूजी नाईक, वगैरे मंडळी पेशवा युद्धांत गुंतल्यास मागें धुमाकूळ घालतील असें त्यास वाटत असावें. उलटपक्षीं पेशव्याच्या मनांत, निजामाचे दोन मुख्य सरदार सय्यद लष्करखान व जानोजी निंबाळकर त्यांस फितूर करून घेऊन, मग आपण इतर मोगलांचा समाचार घ्यावा, असें होतें. त्यांस वश करण्यासाठीं शिंदेहोळकरांनीं गाजीउद्दिनाच्या स्वदस्तूरचीं पत्रें या दोन सरदारांस पाठविण्याची व्यवस्था करावी असें पेशव्यानें दिल्लीस लिहिलें. पण बुसीनें पेशव्याच्या मुलखावर स्वतःच चढाई करून जाण्याचा बेत ठरविला; पेशव्यानें

मोगलाईंत शिरून मुलखाचा नाश करावा हें त्यास पसंत नव्हतें व असें पेशवा करी तोंपर्यंत थांबण्याची त्याची तयारी नव्हती. त्या वेळीं मराठ्यांच्या राज्याची हद्द पुण्याच्या उत्तरेस व पूर्वेस फारशी दूर नव्हती. जुन्नर, अहंमदनगर वगैरे प्रांत निजामाच्याच ताब्यांत होता. तेव्हां पेशव्यावर स्वारी करावयाची म्हणजे प्रत्यक्ष पुणें प्रांतांत येणें जरूर होतें. बुसीस अडविण्यासाठीं नानासाहेब पुण्याहून नगराच्या रोखें कुकडी नदीच्या हद्दीवर राहिला. बुसी जोरानें आपणांवर येईल अशी नानासाहेबाची कल्पना नव्हती. परंतु त्यानें येऊन अकस्मात् छापा घातला. फ्रेंचांच्या तोफखान्याची पहिली ओळख मराठ्यांस या वेळीं झाली. ता. २० नोवेंबर १७५१ रोजीं पारनेरानजीक लढाई झाली तींत ' चिमणाबापू शेणवाई पडला. समशेरबहाद्दराच्या घोडीस भाल्याची जखम झाली. दुसऱ्या दिवशीं चंद्रग्रहण होतें. नानासाहेब व इतर मंडळी रात्रीं नदीवर स्नानास गेली होती. अशा वेळीं अचळ येऊन गारद्यांनीं गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. त्यामुळें मोठी गडबड उडाली. पेशव्याच्या देवपूजेचीं सोन्याचीं भांडीं व देव मोगलांनीं लांबविले. ' या कुकडी नदीवरील लढाईंत मनुष्य फारसें जायां झालें नाहीं, पण त्यामुळें पुण्यांत पळापळ सुरू होण्याइतकी मोगलांची दहशत लोकांस भासली. तिसऱ्या दिवशीं महादोबा पुरंदरे, महादजी शिंदे व कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांनीं पांच हजार फौजेनिशीं जोराची टक्कर देऊन निजामाची डोलाची अंबारी खालीं केली ती मराठ्यांच्या सैन्यानें लुटली. नंतर मोगलानीं रांजणगांव, दाभाड्याचें तळेगांव वगैरे गांवें लुटून उध्वस्त केलीं. ता. २७ नोवेंबर रोजीं निकराचा सामना होऊन मोगलांचा मोड झाला. चार हत्ती व पांचसातशें घोडे व लोक मारले गेले. पेशव्याकडील खंडोजी निगडे जखम लागोन ठार झाला. या लढाईंत शिंदे बंधु दत्ताजी व महादजी प्रथम प्रसिद्धीस आले. ता. ९ डिसेंबर रोजीं मांडवगण येथें चकमक झडून कोन्हेर त्रिंबकनें विशेष पराक्रम दाखविला त्यावरून त्यास ' फांकडे ' असा किताब देण्यांत आला.

हें युद्ध सुरू असतांच सलुखाचाही प्रयत्न चालू होता. सदाशिवराव व रामदासपंत यांची भेट कोरेगांव येथें झाली. तह होणार तों मध्येंच मराठ्यांनीं निजामाचा त्रिंबक किल्ला घेतल्याचें वर्तमान आलें. हा किल्ला महत्त्वाचा असा मानला जात असे. तेव्हां तो परत मिळाल्याशिवाय निजाम तहास कबूल होईना. किल्ला परत घेण्यासाठीं मोगल सैन्य निघालें त्यास मराठ्यांनीं खूब सतावून सोडलें. तसेंच निजाम इकडे गुंतल्याची संधि साधून रघूजीनें पैनगंगा ओलांडून त्याच्या

वऱ्हाड प्रांतांत खंडणी घेतली व ठाणीं बसविलीं. निजामाचे फौजेस पगार न मिळाल्यामुळें तीही नाराज झाली होती. बुसी खेरीज इतर सरदार रामदासपंताच्या विरुद्ध असल्यानें युद्धास त्यांची संमति नव्हती. शेवटी रेंगाळून व दिवसगत होऊन ता. ७ जानेवारी १७५२ रोजीं शिंगवें परगणे राहुरी मुक्कामीं तह ठरला. त्यांत पेशव्यास चार लक्षांचा मुलूख मिळाला, पण दिलसफाई झाली नाहीं. रामदासपंत व नानासाहेब यांच्यांतील चुरस अजून शमली नव्हती.

या दोन वर्षांत पेशव्याची स्थिति कशी काय बदलत गेली त्याची संगतवार हकीकत नानासाहेबानें ता. २७ मार्च १७५२ रोजीं शिंदेहोळकरांस कळविली. पेशव्याच्या राज्यकारभाराचा ओघ या पत्रांत जसा मुद्देसूद व मोकळ्या मनानें लिहिलेला दृष्टीस पडतो तसा अन्यत्र क्वचितच आढळेल. असल्या पत्रांवरूनच नानासाहेबाच्या स्वभावाची व कर्तबगारीची पुरी कल्पना आपणांस येते. वेगवेगळीं प्रकरणें अलग करून एकएकट्या व्यक्तीचा वाद स्वतंत्र केल्यानें इतिहासाचें स्वरूप विकृत होतें. मोठ्या राज्यकर्त्यांचीं चरित्रें साकल्यानें पाहिलीं तरच त्यांतील रहस्य कळणें शक्य आहे. तें पत्र येणेंप्रमाणें. " आशीर्वाद विशेष मुज्फरजंगाकडील पठाणांनीं नासरजंगास भेदून मारलें. मुज्फरजंग औरंगाबादेकडे येऊं लागला तेव्हां आम्हीं जप्ती केली. औरंगाबादेजवळून रुपये घेतले. त्यामुळें मोगलानें विषम मानिलें. तेव्हां तुम्हीं जयनगरापाशीं होतेत. वारंवार पत्रें पाठविलीं कीं, गाजुद्दीनखान इकडे येतील तर उत्तम. तुम्हींही यावें. सा सुभे दक्षिण सोडावी, अथवा गाजुद्दीनखानास आणून स्थापावें. त्यापासून निदान एखादा तरी सुभा घ्यावा, कर्ज वारून घ्यावें, येणेंप्रमाणें करावें. तेव्हां तुम्ही न आलेत, वजिराचे कामावर गुंतत चाललेत. श्रीइच्छेनें मुज्फरजंग व पठाण भांडून मुज्फरजंग मेला. आम्हीं जवळ गेलों. परंतु मागें ( गायकवाडानें ) बापू भीवराव मोडले, याजमुळें शह पडला. आम्हांजवळ फौज थोडी. सोबत्यांचा भरंवसा नाहीं. उन्हाळ्याचे दिवस. जानोजी निंबाळकर तेव्हां केवळ रामदासाचे लेक. त्यांनीं थोड्याबहुतांवर आम्हांस समजावून त्याजवर उपकार करून मजकूर विल्हे लाविला. आम्हांस गायकवाडास जरब देणें जरूर, यास्तव आम्हीं दरमजल सातारियाकडे आलों. तुम्हीं वजिराचे कामावर मोठी मेहेनत, मोठें जोखीम केलें. प्रांतही सुटला. परंतु मनसुब्याचा जम बसवून कांहीं पठाणास देऊन, कांहीं आपण घेऊन, रंग भरून माळव्यांत यावें, ते गोष्ट तेथील मुरवतीमुळें न जाहली. एकदेशी मनसबा जाहला. आम्हीं गायकवाडाचें पारिपत्य केलें. तुम्हांस

नानाप्रकारें लोकांनीं दर्शविलें कीं, यांनीं बेइमानी, दगाबाजी केली. 'परंतु ईश्वर साक्ष आहे. मोठमोठे मराठे, मोठे कारभारी, त्यांनीं त्याचें घर बुडविलें. नाहक चढीं लाविले. आम्हाशीं कबूल करून मागतीं चवथे दिवशीं फिरावें, यामुळें बंदिखाने, गड, सर्वही प्राप्त त्यांचे कर्मानुरूप जालें. एतद्विषयीं विस्तार कशास? परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध वाढलें. आईसाहेबांचे मतें सर्वप्रकारें आम्हांस मोडावें, रामदासपंताचे पुतण्यास पेशवाई यावी, त्यांनीं आह्मांस बुडवावें, दाभाडे यांणीं त्यास मिळावें, प्रतिनिधींनीं त्यास मिळावें, रघूजीबावांनीं त्यास मिळावें, ऐसा पूर्ण भाव. पावसाळांत हीं राजकारणें शपथपूर्वक घाटलीं. परंतु आईसाहेबांस गडावर एक दिवसाचें खावयास नाहींसें झालें. याजमुळें मात्र बाह्यात्कारें आम्हांशीं सलूख करून खालीं उतरलीं. आम्हीं विचार केला कीं, केवळ विरुद्धाचा लौकिक आहे तो वारावा. मनांत कांहीं तरी असो. जशी आमची क्रिया असेल तसें आह्मांस फळ होईल. जशीं तीं चालतील तसे आम्हीं चालूं. ऐसा सिद्धान्त करून सलूख केला. प्रतिनिधीस प्रतिनिधि करार केली. परंतु आंत सर्वांचे मनसबे घाटून तयार जाले. आम्ही पंचवीस लक्ष कर्ज मात्र नवें करून फौज नवी पंधरा व जुनी चाळीस ( हजार ) येणेंप्रमाणें ठेवली. त्याउपर रामदासपंत आले. प्रथम आमची फौज जमा झाली नव्हती, छापा घातला. दुसरें झुंज उत्तम झालें, त्याजवर सलावत बसली, इत्यादि मजकूर जगविख्यात व इकडील पत्रांवरून तुम्हांस अवगत होत गेले. वारंवार लिहिलें कीं, ( तुम्हीं ) लक्षाप्रकारें यावें. वजिराची अब्रू राखिली व आमची गमाविली हें कामाचें नाहीं. तुम्हीं दौलतेचे स्तंभ, राज्यांत खेळ फार जाले आहेत, खामखां ( अवश्य ) यावें. जे मेहेनत तुम्हीं वजिराचे कामासाठीं केली, ते मेहेनत जलदीनें येऊन येथें करतेत तर बहुत लाभ होता. पण तेथें कोपामुळें व इरेमुळें शह पडला. तुमचें येणें, दोन महिने वाट पाहिली, न जाहलें. शेवटीं जानवा, सय्यद लष्करखान केवळ वजीद जाहले कीं, खामखां सलूख करावा. तेव्हां सलूख केला. त्रिंबक एक महिन्यानें यावा ऐसें कबूल केलें; कां कीं, तुम्हांस पत्रें गेलीं आहेत, तुम्ही यालच, तुम्ही आल्यावर जें तुमचे विचारें होईल तें करावें. व गुजराथचें काम बुडतें, खर्चास अगदीं नाहीं, मोगलांची आग भारी, सरदार कोणी मनापासून अगदीं मेहनत न करीत, एक चिरंजिवांनीं मात्र खटपट करावी, ऐसे अनेक प्रकार घराऊ जाणून सलूख केला. परंतु अंतर शुद्ध नाहीं. आम्हांजवळून रघूजीबाबा मोगलांकडे गेले. मोगलांनीं त्यांस जहागीर करार करून

क्रिया घेऊन आपलेंसें केलें. बाबूजी नाईक यांचें कर्नाटक आम्हीं काढून घेतलें, याजमुळें ( ते ) दुःखी. लटकें फटकें बोलून आशेस लाऊन, दोन वर्षें आम्हीं बोढिलें. परंतु याउपर ते जाणार, आईसाईबांजवळून कर्नाटक करून घेणार. रामदासपंताजवळून नालबंदीस रुपये घेऊन तिकडे जाणार. ते हे एकत्र होणार. प्रतिनिधिही वाढले. गोविंदरायाचा सरंजाम घेतला. वरकडही किरकोळ कामें केलीं. शेर जाहले. त्यांचींही राजकारणें कीं, नाईक आम्ही एकत्र होतों, कर्नाटकास येतों, रामदासपंतांनीं आणखी फिरंगी गाडदी ठेवावे, खामखां आम्हांवर मनसबा मागती करावा, बाह्यात्कारें सलूख कांहीं दिवस दाखवावा. व मागें जानबा आमचे मित्र पुणियांत तीन महिने येऊन बसले, नित्य आम्हांस म्हणत कीं, ‘ मोगलांजवळ तुम्हीं नवी जागीर मात्र न मागावी, म्हणजे आम्ही त्यांची तुमची पूर्ण निखालसता करून देतों. ’ लहान सहान आम्हांस लिहित कीं, ‘ हें सर्व लटकें; हे एकाएकीं येऊन तुमचीं घरें जाळतात ?’ आम्हांस वाटे कीं, ‘ लोकआफवेवर काय आहे, जानबा आमचे मित्र आहेत, सहसा आम्हांस फसविणार नाहींत.’ शेवटीं जें जहालें तें दृष्टीस पडलें. बहुत लोक म्हणतात कीं, रामदासपंतानें जानबा याच कामासाठीं पाठविले कीं, आम्हीं स्नेह मानून गाफील राहवें. जानबा तों दाखवितात कीं, पंतानें लबाडी केली. असो. याचा अंत ईश्वर जाणे. एकदां मात्र तुम्हांस लिहिलें होतें कीं, ‘ याउपर गाजिउद्दीन खानाचें येणें कामाचें नाहीं, सलाबतजंगाचा आमचा स्नेह होत आहे. ’ परंतु बिघाड जाल्यापासून निरंतर हेंच लिहितों कीं, खामखां गाजुद्दीखानास आणावें. वजिराचा लेक सुभा करून आणला तर मागें दिल्लींत बखेडे करितील व येथें मोगल मराठे भेटणार नाहींत. गाजुद्दीखान आलिया सुलभ पडेल. मोगल व मराठे मातबर सर्व बऱ्हाणपुरावर येऊन भेटतील. एक फिरंगी गाडदी नवीन फौज मात्र पंताजवळ राहील. कडपें, सावनूर वगैरेंचे नवाब कर्नाटकांत बळावले आहेत. महंमदअलीखान त्रिचनापल्लीस बळावला आहे. सर्व गाजुद्दीनखानास अनुकूल पडतील. दुसरें, तुम्हीं तिकडून गाजुद्दीखान दहापंधरा हजार, आम्हीं इकडून, येणेंप्रमाणें मनसबा उभा राहतांच सर्व कामें होऊन जातील. सारांश, रामदासपंतानें अब्रू घेतली, ही एकदां हरतजवीज करून त्यास पुरती जरब देणें घडल्यावांचून, तुम्हांस कैलासवासियांनीं वाढविलें व तुम्हीं इराणतुराणपावेतों लौकीक केला, तो सर्व व्यर्थ. आम्हींही रायांचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला. याउपरी तुम्हीं जरूर त्यांस आणावें, अथवा त्यांनीं दसरा करून मागून यावें, तुम्हीं खामखां देशास यावें. शपथपूर्वक

ह्या मनसबा करावा तरच उत्तम आहे. मागें यावें यावें हें लिहित गेलों, न आलां; आतां त्यांचा पुढील रंग जाणून सर्व विस्तारें लिहिलें. याउपर याल, संशय नाहीं. या पत्राचें उत्तर यथार्थ सत्वर पाठविणें. गुजराथचे कामास फौज गेली. श्रीकृपेनें काम होत चाललें. जेव्हां म्हटलें तेव्हां जवळ आहे. याउपर गाजुद्दीखानास पूर्ण भरंवसा देऊन, वजिराशीं लगाम राखून, शेवटीं न तोडितां, दक्षिणेचे कामास उपयोगी पडत तें करून यावें. सर्वस्व वेंचून एकदां रामदासपंत मोडावा. ते आम्हांवर मनसबा करतात, संशय नाहीं. तुम्हीं हल्लीं लिहिल्याप्रमाणें केलिया, सहजच ते हतप्रभ होऊन, मोठें यश तुम्हांस येतें. याउपर तुम्हीं न आलिया मनसब्यास वाईट, मनास वाईट, यास्तव मनसबा सिद्ध करून यावें. कदाचित् गाजुद्दीखान नामर्द, फौज न ठेवी, बाहेर न निघे, तर दुसरा कोणी पंधरा हजारांचा धनी आणावा. निदानीं तुम्हीं यावें. येथेंही फौज फार आहे. रामदासपंतास मोडणें तुम्हीं आम्हीं एकत्र झाल्यास अगाध नाहीं. रघूजीबावाही येतील. लाभही उत्तम होईल. हें सर्व मनन करून उत्तर सत्वर पाठवावें. येथेंही तर्तूद करीत आहों. ऐवजाची मात्र मोठी ओढ आहे. तुम्हीं आलिया सर्व वारेल. सांप्रत नवें वर्तमान कीं, त्रिंबक आम्हीं न दिला, यासाठीं रामदासपंत औरंगाबादेस येणार. मग किल्लाही कदाचित् देणें भाग पडेल. जहागिरीचा जाबसालही त्यांजकडून अद्याप झाला नाहीं. मोठा लबाड, दगाबाज, आहे. सारांश, एकदां त्यास जरब द्यावी तरच सार्थक आहे."

या विस्तृत पत्रावरून नानासाहेबाची खरी स्थिति काय होती, त्यास कोणत्या गोष्टींची काळजी वाटत होती, आपल्या सरदारांशीं तो किती सलगीनें व गोडीनें वागत असे, वगैरे गोष्टी स्पष्ट दिसतात. शिंदेहोळकर उत्तरेंत रोहिल्यांच्या मोहिमेंत गुंतले त्यामुळें पेशव्याची बाजू दक्षिणेंत उणी पडली. गायकवाड, ताराबाई, रामदासपंत, सर्वच शेर झाले. या सर्वांस तोंड देण्याइतकें सैन्यबळ किंवा द्रव्यबळ पेशव्याजवळ मुळींच नव्हतें. त्यामुळें रामदासपंतानें आपली अब्रू घेतली असें निजामाच्या स्वारीचें स्वरूप पेशव्यास दुःसह भासलें. गाजीउद्दीनास आणण्याचा मनसबा फारच लांबणीवर पडल्यामुळें पेशव्याच्या त्यास आणण्याच्या गोष्टी केवळ वृथा गप्पा, मिवविण्या पुरत्या आहेत असें सहाजिकच इतरांस वाटूं लागलें. तेव्हां बुसीच्या जोरावर आपणांस भारी झालेल्या रामदासपंताची एकदां पुरी खोड मोडल्या खेरीज आपल्या विरोधकांचीं कारस्थानें बंद पडणार नाहींत व आपला दरारा बसणार नाहीं अशी पेशव्याची खात्री झाली.

म्हणूनच कसेंही करून दक्षिणेंत येण्याबद्दल सरदारांची मनधरणी करणें पेशव्यास भाग पडलें. नानासाहेबाचा आधींचा हेतु असा होता कीं, एवढी मोठी फौज उद्योगावांचून घरबसल्या खर्च करीत ठेवण्यापेक्षां तिनें उत्तरेंत पैसा मिळवावा, कांहीं आपल्या खर्चास पाठवावा, म्हणजे तिच्या भ्रमावरच आपण इकडे कामें उरकूं. पण त्या वेळीं प्रत्यक्ष दारांत फौज आल्याशिवाय कोणाचेंही कोणीही, क्षुद्र संस्थानिकसुद्धां पेशव्याचें ऐकण्यास तयार नसे, अशी सबंध हिंदुस्थानची स्थिति होती. त्यामुळेंच दमाजीस पेशव्यावर येण्याचें धाडस करवलें; प्रतिनिधीनें तर गोविंदराव चिटणिसास सांगोल्याच्या व्यवस्थेंत दिलेला सरंजाम आपणच बळकावला; बाबूजीस अजून निजामाचा भरंवसा होता; व जानबा निंबाळकरासारखे सरदार पेशव्यास झुलवूं शकत. ताराबाई तर जेव्हां खावयासही मिळेना तेव्हांच गडावरून साताऱ्यांत उतरली असें पेशवा लिहितोच. एवढ्यासाठींच पेशवा शिंदेहोळकरांस ताबडतोब दक्षिणेंत येण्यास विनवीत होता.

या निजामाच्या स्वारीची कशीबशी वाट लावून पेशव्यानें दमाजी गायकवाडाचें प्रकरणही निकालांत काढलें. दाभाडेही परत पुण्यास आला. , दोघांनींही विचार केला कीं, छत्रपतीच्या बळावर आपण कांहीं करूं हें आतां शक्य दिसत नाहीं; पेशव्याच्याच तंत्रानें वागणें भाग. तेव्हां दाभाड्यानें रामराजाच्या सनदेप्रमाणें अर्धी गुजराथ पेशव्यास दिली व दमाजीनें जिंकलेल्या मुलखाचा अर्धा हिस्सा व पुढें जिंकावयाच्यापैकीं निमे हिस्सा पेशव्याच्या हवालीं करण्याचें कबूल केलें. दमाजीनें धनी दाभाडे यांस काय रक्कम द्यावयाची व छत्रपतींच्या खर्चास काय द्यावयाची ती ठरविण्यांत आली. जरूर पडेल तेव्हां दहा हजार फौजेनिशीं दमाजीनें पेशव्याच्या मदतीस यावें असें ठरलें. हा करार ३० मार्च १७५२ रोजीं ठरला. गुजराथच्या वांटणींत २७,७३००० रुपये वसुलाचे महाल दमाजीच्या व २८३४९१८ चे पेशव्याच्या वांटणीस आले. हा करार पुरा करून देण्यासाठीं दमाजीनें रघुनाथराव व कारभारी सखाराम बापू ह्यांस बरोबर घेऊन गुजराथेंत प्रयाण केलें. याबद्दल पेशवा लिहितो "दमाजीनें चिरंजीव दादाचे हवालीं डभई, पारनेरा, केला. मुलखाची वांटणी होत आहे. सामोपचारानें काम विल्हे लातलें. येणेंकरून सरकारकाम होऊन गायकवाडाचें बरें झालें. युद्ध न करावें लागल्यामुळें मुलखाचें व आपल्या सेनेचें रक्षण झालें." दमाजीची ही व्यवस्था लावून देण्यांत रामचंद्रबाबा व सदाशिवराव प्रमुख होते. यानंतर दमाजी नेहमीं पेशव्याशीं फार स्नेहानें वागूं लागला व त्यास मदत करण्यास पुढें

त्यानें कुचराई केली नाहीं. दमाजीशीं जरा कडकपणानें वागण्यांत, आपणाविरुद्ध जाणारांस चांगली अद्दल घडावी, असा नानासाहेबाचा हेतु होता तो बराच तडीस गेला.

ताराबाईची धुसपूस चालू होतीच. पेशवा शिंद्यास लिहितो, ' ताराबाई हजार मनसबे राजकारणें घाटतात. करवीरकर संभाजीस आणावें ऐसेंही म्हणतात. आम्हावरही कृपा दाखवितात. मळमळीत आहे. येथें या कलहामुळें बाहेरील घरांतील फौज फार मिळाली. देश लुटला, पोटास नाहीं; तिकडून ऐवज येईसा करणें. घरांत बाहेर भरंवसा तुमचा आहे ' नानासाहेबास जयाप्पा शिंद्याचा मोठा विश्वास असे व म्हणून त्यास खासगी स्वरूपाचीं पत्रें पेशवा नेहमीं पाठवीत असे. ताराबाईनें आतां रामराजा अस्सल नव्हे याचाच सारखा घोष चालविला होता व म्हणूनच कोल्हापुरच्या संभाजीस आणण्याची तिची खटपट सुरू झाली. पेशव्यास एकदां राजा म्हटलेल्या रामराजास दूर करण्याची इच्छा नव्हती, तरी शक्य तर व तेव्हां, दोन राज्यें एकत्र करण्याची होती, म्हणून तो ताराबाईस ' होय, तसेंच' म्हणत असे. ताराबाई १७५२ सालीं पुनः पुण्यास आली तेव्हां नानासाहेबानें तिची उत्तम व्यवस्था राखून तिच्याकडून मागचे करार पुनः कबूल करून घेतले. ताराबाईनें दादोबास पेशव्याकडून प्रतिनिधिपद पुनरपि देवविलें होतें, पण त्यानें त्याचा भलताच फायदा घेणें सुरू केलें. त्यानें प्रतिनिधीच्या मुलखापैकीं जो भाग गोविंदराव चिटणीसास सांगोल्याच्या करारानें दिला होता तो ताब्यांत घेतला आणि अशा रीतीनें सांगोल्याचा करार आपल्यापुरता धाब्यावर बसविला. साताऱ्यासभोंवारच्या प्रदेशांत त्याचें वर्चस्व असल्यानें त्याचा बंडावा मोडणें पेशव्यास कठिण होतें व तेवढ्यासाठीं दहा हजार सैन्य पदरचें पोसून लावण्याची नानासाहेबाची इच्छा नव्हती. प्रतिनिधीशीं अशा रीतीनें गोडी ठेवण्यांत त्यास ताराबाईच्या पक्षांतून पुरता फोडावा असा पेशव्याचा अंतस्थ हेतु होता. दमाजीचें पारिपत्य झाल्यावर दादोबाची पेशव्याच्या विरुद्ध जाण्याची छाती नव्हती. पण त्यामुळें तो ताराबाईच्या मर्जीतून उतरला व हेंच पेशव्यास इष्ट होतें. *दमाजीस मदत करण्यासाठीं म्हणून दादोबानें उभारलेलें सैन्य या प्रकारानें* माशा मारीत राहिलें. पण दादोबास स्वतःच्या पराक्रमाची घमेंड होती, म्हणून तो सैन्यास रजा देण्याऐवजीं त्यास कामगिरी शोधीत होता. रामदासपंताकडून पैसा मिळेल तर निजामाबरोबर कर्नाटकांत जाण्याची त्याची तयारी होती. पेशव्यानें पाहिलें कीं हा कदाचित् निजामाकडे झुकेल, त्यापेक्षां युक्तीनेंच त्याचा गर्व

हरण करावा. म्हणून स. १७५२ सालीं निजामावरून परत आल्यावर त्यानें दादोबास सावनूरच्या नबावाकडून खंडणी वसूल करण्याची कामगिरी स्वतः सांगितली. सावनूरचा नबाव हा अलीकडे निजाम, पेशवे, व कोल्हापुरकर यांच्या अन्य व्यवधानांचा फायदा घेऊन कर्नाटकांत मोठा प्रदेश बळकावून बसला होता; आणि खुद्द पेशव्यासही तो जड होता. त्यानें दादोबाच्या फौजेची तिरपीट उडविली, तेणेंकरून प्रतिनिधीची परस्पर खोड जिरली. प्रतिनिधीचें व पेशव्याचें रहस्य नाहीं हें सावनूरकरास कळल्यामुळें त्यानेंही बिनदिक्कत, पेशव्याकडून आपलें पारिपत्य या प्रकरणीं होणार नाहीं हें ओळखून, दादोबास धुडकावून दिलें.

बाकी ताराबाईच्या पायीं वृथा कालक्षेप करण्याचा पेशव्यास किती वीट आला होता हें चिटणिसास त्यानें ता. ३१ मे १७५२ रोजीं लिहिलेल्या पत्रावरून कळतें. "साहेबांशीं राजकारण करून, त्यांचे संशय दूर करून, जसें प्रशस्त वाटे तसें राज्य करीत, दुर्लौकिक दिल्लीपावेतों न होय, ऐसें हरतजविजीनें करणें. आमचा अर्थ तरी, जें खावंदानें दिलें तें खाऊन, चाकरीस हजर राहून, जें काम सांगतील व आपल्यानें होईल तें करूं. आईसाहेबांनीं सुखरूप आपले खातरेस येईल तसे कार्यभाग करावे. या विचारें बोलून वसवास दूर होय ऐसें करणें. नच होय तर आम्हीं व आमच्या पक्षींचे जे मनापासून असतील ते, उदास रीतीनें हरामखोरी न करतां, आपलें सांभाळून आम्हांसहवर्तमान राहतील. ज्याची जे क्रिया असेल तसें फल होईल. आमचा अर्थ तर, दोन वर्षें कर्जदार झालों. आतां आम्हांस दरबारचे तेलामिठाच्या कारभाराचा उत्साह नाहीं."

निजामाबरोबर शिंगव्याचा तात्पुरता तह झाला तरी नानासाहेब व रामदासपंत यांचे परस्परांविरुद्ध डाव चाललेलेच होते. सलाबतजंगाच्या दरबारांत बुसीचें वर्चस्व प्रस्थापित झालें होतें. स. १७५२ सालीं इंग्रजफ्रेंचांचा अर्काटच्या नबावगिरीबद्दलचा दावा जोरानें चालू असून, क्लाइवनें त्रिचनापल्लीचा किल्ला हस्तगत केला असतां त्यास फ्रेंचांनीं वेढा दिला. मुरारराव घोरपडे पूर्वी इंग्रजांस मिळून होता तो आतां फ्रेंचांच्या बाजूस झुकला. पेशव्यास बुसीचें वर्चस्व नाहींसें करावयाचें असल्यामुळें सहाजिकच इंग्रजांशीं त्यास गोडी ठेवावी लागली. कारण गाजीउद्दीन दक्षिणेंत आल्यास कर्नाटकच्या बाजूस फ्रेंचांच्या विरुद्ध असलेला इंग्रजांचा दोस्त महंमदअली हा फ्रेंचांविरुद्ध म्हणजे सलाबतजंगाविरुद्ध लढेल अशी अपेक्षा पेशव्यास होती. शिंदेहोळकरांस पेशव्याचें वर दिलेलें निकडीचें पत्र गेलें, तेव्हां त्यांनीं रोहिल्यांकडचा मामला संपवून गाजीउद्दीनास दक्षि-

गेंत घेऊन येण्याची तयारी केली. पण ते निघण्यापूर्वीच इकडे एक अकल्पित गोष्ट घडली. भालकी मुक्कामीं ता. ७ एप्रिल रोजीं पगार न मिळाल्यामुळें बिथरलेल्या लोकांनीं रामदासपंताचा खून केला. या गोष्टीनें पेशव्यास ज्याची विशेष चीड होती तो माणूस परभारें नाहींसा झाला व त्याच्या जागीं पेशव्याच्या कलानें वागणाऱ्या सय्यद लष्करखानाची नेमणूक झाली. त्यामुळें पेशव्यास पुनः सामोपचारानें आपलें कार्य तडीस जाईल अशी आशा उत्पन्न झाली. तेव्हां त्यानें शिंद्यास लिहिलें, "गाजीउद्दीनखान दक्षिणेस यावयाचा पादशाहाचा हुकूम झाला, येथील गुंता उरकून त्यांचें आगमन दक्षिणेस होय तें करूं, म्हणोन लिहिलें तें कळलें. जेणेंकरून गाजीउद्दीन व सलाबतजंग यांशीं बेइमानी पदरीं न येतां कार्य होय तें करावें लागेल. सलाबत आमचें न ऐकतील तर गाजुद्दीन यांस आणण्याचें जरूर केलें पाहिजे. या डौलानें आपण करावें म्हणजे कार्यही आहे व लौकीकही उत्तम." म्हणजे पेशव्याचें मन डळमळीत होऊन दोन दगडींवर हात ठेवून तो आपलें कार्य साधूं पाहत होता. पण आतां गाजिउद्दिनाचा बेत बदलणें शक्य नव्हतें. त्यासह शिंदेहोळकर जुलैच्या आरंभीं ग्वालेर मुक्कामीं आले. ते येतात हें ऐकून पेशव्यानेंही पाऊस होता तरी फौजेस बोलावणें केलें व तो पुणें सोडून निघाला. त्यानें आपल्या वकिलास औरंगाबादेंत कारस्थान रचण्याबद्दल लिहिलें. तें असें कीं, गाजीउद्दीन ब्ऱ्हाणपुरास येऊन पोंचतांच औरंगाबादच्या अंमलदारांनीं सलाबतजंगावर उठून गाजीउद्दीनाची द्वाही फिरवावी व सर्वांनीं त्यास सामील व्हावें. पेशव्यानें ता. २५ जुलै रोजीं वकिलास लिहिलें, 'आपले विद्यमानें गाजुद्दीखान यांजला स्नेहाचा संदर्भ लावून भागानगर प्रांत आपणांकडे करून घ्यावा. आम्ही तों सर्वत्र ऐकतों कीं, फिरंगी व खान मिळोन फार झुंझावयाच्या गप्पा मारतात. त्यास पुरता शोध करून लिहिणें. सय्यद लष्करखान सलाबतजंगाचा निरोप घेऊन आमचे भेटीस येत आहेत. रामदासपंत वारल्यावर त्यांहीं सलाबतजंगाचा पक्ष धरला आहे. तरी तुम्हीं त्यांस बहुत प्रकारें लिहून पाठवून ते गाजिउद्दीनखानाकडे संदर्भ लावीत, आमचे विचाराप्रमाणें वर्तत, तें करणें. खान हजारदां आम्हांशीं गाजुद्दिनाचा प्रकार बोलले असतां रामदासपंत मेले म्हणून आयते वेळेस फिरले, तर हें कसें कामास येईल !' या पत्रांत लिहिलेली सय्यद लष्करखान पेशव्याचे भेटीस येण्याची बातमी खरी असून तो एक त्या धूर्त खानाचा डाव होता. गाजीउद्दीन येत आहे'ही बातमी सलाबतजंगास लागली तेव्हां साहजिकच त्यास पूर्वी गाजीउद्दिनाच्या बाजूस असलेला खान काय करतो

याची चिंता लागली व तो खानास आपल्या पक्षास मिळविण्यासाठीं त्याची मनधरणी करूं लागला. खान रामदासपंताविरुद्ध असल्यामुळें गाजीउद्दिनाच्या बाजूस झुकत होता, तरी त्याची बाजू घेऊन मराठ्यांनीं मोगलाई आपल्या घशांत उतरवावी ही गोष्ट त्यास केव्हांही नको होती. म्हणून त्यानें पेशव्याशीं इतके दिवस ठेवलेल्या खोट्या स्नेहाचा फायदा सलबतजंगास करून देण्याचें योजिलें. खानानें दिवाणगिरीचा राजिनामा देऊन मराठ्यांस जाऊन मिळण्याचें ढोंग करावें व अंतस्थ रीतीनें मराठमंडळांत वावरून सरदारांचीं मनें बिघडून ठेवावीं असें गुप्त खलबत ठरलें. यामुळें सय्यद लष्करखान हा बडा सरदार आपल्या बाजूस आहे असें पेशव्यास भासून तो तितका गाफील राहणार होता. या युक्तीप्रमाणें खान रुसवा दाखवून सलावतजंगाजवळून निघून करमाळयास जानोजी निंबाळकराकडे येऊन राहिला. मागें निजामानें शहानवाजखानाची नेमणूक दिवाणाच्या जागीं केली. ता. ९ आगष्ट रोजीं गाजीउद्दीन नर्मदेवर येऊन पोंहचला, पेशवा त्यास मिळण्याच्या उद्देशानें उत्तरेकडे चालला, तेव्हां सय्यद लष्करखान व निंबाळकर पेशव्यास येऊन भेटले. खानानें पेशव्यास थाप दिली कीं, बादशहाचीं पत्रें सलाबतजंगास आलीं असून त्यांत गाजीउद्दिनानें वडील म्हणून येऊन फक्त दक्षिणच्या सुभेदारीचा स्वीकार करावा व सलाबतजंगास आपला दुय्यम नेमून परत दिल्लीस जावें, असें ठरलें आहे. नानासाहेबानें ही बतावणी ओळखून ही गप्प गाजीउद्दीनास कळविली; तेव्हां त्यानें खान व निंबाळकर यांस पकडून आपणाजवळ आणण्यास सांगितलें. गाजीउद्दीन ता. २८ सेप्टेंबर रोजीं औरंगाबादेस येऊन दाखल झाला. पेशवा त्यास जाऊन गोदा उत्तरतीरीं शहागड येथें भेटला. दोघांची फौज एकत्र झाली तेव्हां एकंदर दीड लाख जमाव झाला. या वेळीं सलाबतजंगास वऱ्हाडच्या बाजूनें जानोजी भोसल्यानें, अहमदनगरच्या बाजूस पेशव्यानें व खानदेश बाजूस शिंदेहोळकरांनीं, असा पुरा घेरून टाकला. तेव्हां त्याचा धीर खचून गाजीउद्दिनास शरण जाऊन आपला बचाव करावा असा त्याचा विचार झाला गाजीनें पेशव्यास मदतीबद्दल, तापी व गोदावरी या दोन नद्यांमधील वऱ्हाडच्या पश्चिमेचा मुलूख देण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें सर्व पक्षांची तडजोड होऊन प्रकरणाचा निकाल लागणार इतक्यांत, निजामउल्मुल्काचा एक धाकटा मुलगा निजामअल्ली याच्या आईनें गाजीउद्दिनास मेजवानीस बोलावून विषान्न घालून ठार मारलें ( ता. १६ आक्टोबर १७५२ ). तिचा हेतु सलाबतजंगासही असाच मारून आपल्या मुलास गादी द्यावी असा होता. पण

तो या वेळीं सिद्धीस गेला नाहीं. गाजीउद्दीनच्या मृत्युमुळें पेशव्यानें फार प्रयासानें जुळविलेला मोठा व्यूह ढांसळून त्यास सलाबतजंगाशींच तडजोड करणें भाग आलें. सलाबतनें प्राणावरचें शेपटावर गेलें असें समजून गाजीनें कबूल केलेला मुलूख आपण होऊन पेशव्यास दिला. हा तह भालकी मुक्कामीं ता. ३ नोवेंबर स. १७५२ रोजीं ठरला. तेणें करून पेशव्याच्या मुलखाची हद्द जुन्नर पावेतों होती ती उत्तरेस खानदेशपर्यंत गेली; त्यांतले किल्ले मात्र निजामाकडेच राहिले. या तह प्रकरणीं नानासाहेबानें पिलाजी जाधवास एक पत्र लिहिलें तें मोठें खोंचदार असून त्यांत पेशव्यास शिवाजी महाराजांची आठवण किती जाज्वल्य होती हें उत्तम दिसून येतें. "नबाबांनीं राजश्रींच्या ( शाहूचे ) जांवयाचे जहागिरीचे मजकुरावरून वाईट मानून तुटता जाबसाल तुम्हांसी केला. जें इच्छितील तें करतील. आम्हांशीं स्नेह चित्तापासून करावा यासाठीं नबाबांनीं जानवास व खानास पाठविलें. त्यांपाशीं किल्ल्यांचा मजकूर नबाबांचे मर्जीप्रमाणें आम्हीं कबूल केला. आमचा स्वार्थ त्यामध्यें कांहीं नाहीं. ऐसें असतां सर्व एकीकडे ठेऊन गरमी दाखवूं लागले,तर आम्हांस श्रीकृपेनें काय चिंता आहे. **आम्हीं गनीम लोक शिवाजी महाराजांचे शिष्य आहों.**" या पत्रावरून तहाची बजावणी करतांना बरीच बाचाबाची झाली असावी असें दिसतें; आणि प्रस्तुतचा हिंदुपदपातशाहीचा उद्योग म्हणजे शिवाजी महाराजांनीं अंगीकारलेल्या उद्योगाची पूर्तता होय ही मराठमंडळाची भावना स्पष्ट होते.

भालकीचा तह हा बुसीच्या विद्यमानें ठरला असून त्यास निजामाच्या इतर सरदारांची संमति नव्हती. बुसीचा हेतु मराठ्यांशीं सख्य जोडून फ्रेंचांची दक्षिणेंतील स्थिति सुधारण्याचा होता. सय्यद लष्करखान, शहानवाजखान प्रभृति निजामाच्या राज्याच्या अभिमान्यांस बुसीचें वर्चस्व असह्य झालें. "परंतु जीव कोणांत आहे ? सर्वही निर्माल्य. पदरचा पैका वेंचावा, जातीनें हिंमत धरून करावेंच करावें, हे गोष्ट कालेंकरून कोणांतही राहिली नाहीं." असे या मोगलाई अमिरांबद्दल नानासाहेबाचे उद्गार आहेत. त्या काळीं ज्या व्यक्तीच्या अंगीं स्वतःच्या हिंमतीनें मनुष्यें गोळा करून व पैसा खर्चून फौज उभारण्याची करामत होती, असेच पुरुष पुढें येणें शक्य होतें. मोगलांच्या राज्यांतले पिढीजाद अमीर ऐषआरामी, भित्रे असून फौजेकडे खर्च करण्यास अत्यंत नाखूष होते. त्यामुळें हे गुण ज्यांच्यांत होते ते मराठे सरदार पुढें सरसावले. मराठ्यांचें हें उदाहरण पाहूनच दुप्ले प्रभृति पाश्चात्य धूर्तांस स्वतः तसें करण्याची

कल्पना सुचली. कवायती सैन्य, तोफखाना, दारूगोळा, वगैरे गोष्टींत ते वरचढ असल्यामुळें मराठ्यांकडून गांजले गेलेल्या संस्थानिकांस त्यांचें साह्य आवश्यक वाटलें. अशा रीतीनें इकडील राजकारणांत पाश्चात्यांचा रिघाव झाला.

भालकीच्या तहानंतर नानासाहेबानें कर्नाटकच्या कामांत हात घातला. सलावतजंग व पेशवा यांचेमधील तहांत असें ठरलें होतें कीं, दोघांसही न जुमानणारे व जड झालेले पाळेगार, देसाई, नवाब, हे सर्व दोघांनीं एकत्र स्वारी करून मोडावे. पण घरच्या कलहांत सलावतजंग गुंतला गेल्यामुळें त्यास कर्नाटकच्या मोहिमेवर येण्यास सवड झाली नाहीं. मराठ्यांचा जोर पाहून सलावतजंगानें बुसीच्या सल्ल्यानें आपली राजधानी औरंगाबादेहून हालवून स. १७५२ सालापासून भागानगर ऊर्फ हैदराबाद येथें मराठ्यांच्या टप्प्याबाहेर नेली. नवी राजधानी बुसीस जास्त सोईची होती. कारण त्याच्या संरक्षक फौजेच्या खर्चास मिळालेला निजामाचा उत्तर सरकार प्रांत तेथून जवळ असून पांदिचरीच्याही तो तितकाच जवळ जात होता. शाहूच्या आरंभींच्या व्यवस्थेंत कर्नाटक हें श्रीपतराव प्रतिनिधीचें कार्यक्षेत्र ठरलें होतें. पुढें रघूजीच्या स्वारीनंतर तो सुभा बाबूजी नाइकास मिळाला. त्याची तिकडे जी फजिती झाली ती मागें दिलीच आहे. त्यानंतर सन १७५२ सालीं दादोबास सावनूरकरावर पाठवून पेशव्यानें त्याचा कसा नक्षा उतरविला हेंही वर सांगितलेंच आहे. दादोबा व त्याचा मुतालिक यमाजी हे अशा रीतीनें पेशव्याच्या तंत्रानें वागूं लागले तेव्हां ताराबाईची त्यांच्यावरील मर्जी गेली व तिनें बाबूजी नाइकास प्रतिनिधिपद देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें प्रतिनिधीचा मुलूख ताब्यांत घेण्यासाठीं बाबूजी नाईक चालून आला. दादोबा व यमाजी हे पेशव्याशीं टक्कर देण्यास समर्थ नसले तरी स्वतःच्या मुलखाचें रक्षण करण्यास पुरेसे होते. त्यांनीं नायकाचा तांदुळवाडीनजीक पराभव केला. नायकास जखमा लागल्या, तेव्हां तो पळून साताऱ्यास गेला. तेथेंही पिच्छावर प्रतिनिधि येतांच तो परत बारामतीस चालता झाला. या प्रकाराबद्दल पेशवा ता. २५ जानेवारी १७५३ रोजीं लिहितो, ‘ बाबूजी नाईक साताऱ्यास जाऊन आईसाहेबांचे विचारांत मिळाले. आमचा अपकर्ष इच्छितात. उपद्व्याप करितात. आमच्या सरदारांकडे येऊन बुद्धिभेद करून त्यांस साताऱ्यास न्यावें या विचारास आले होते. परंतु सरदार गेले नाहींत. नाईक माघारे गेले. त्यांचेविषयीं आमचे चित्तांत तों कांहीं नव्हतें. त्यांहीं होऊन गडबड मांडिली आहे. ते आपले कर्मानुरूप फळ पावतील. वरकड आईसाहेबांचा विचार तरी आमचें न्यून पाहतात. सरदारांशीं

भेद, मोगलाईंत राजकारणें करतात. कोणें प्रकारें आमचें वाईट व्हावें या विचारांत आहेत. ईश्वरच आमच्या बऱ्यावर असल्यावर त्यांनीं इच्छून होणें काय ?' नानासाहेबानें ताराबाईसही लिहिलें कीं, 'साहेबीं प्रथम मजला वचन दिलें कीं, सर्वप्रकारें तुमचा विश्वास; तुम्हीं नातवापेक्षां ( रामराजापेक्षां) साहेबांस अधिक.' असें असतां साहेबीं गायकवाडास हुजूर आणलें. रामदासपंतास कागदपत्र लिहिले. बाबूजी नाईकास नेलें. यमाजीपंताचें पारिपत्य योजिलें. रात्रंदिवस सेवकास विरोध पडे ऐसीं राजकारणें होतात. मोगल केवळ हिंदु राज्याचा शत्रु, त्यास देखील अनुसंधानें होत असतां, सेवकच वांकडे वर्ततात हा दोष साहेबीं आज्ञापत्रीं लिहून सर्वांशीं बोलतात.' पण अशानें तिचा स्वभाव कांहीं बदलला नाहीं. लिहितांना मात्र ती गोड लिहीत असे. बाबूजी नायकाच्या या प्रकरणापासून दादोबा प्रतिनिधि मात्र तिच्या बाजूतून सुटला. त्यामुळें तिला यापुढें पेशव्याविरुद्ध कांहीं करतां आलें नाहीं. रामराजा तेवढा कायमचा तिच्या हातीं राहिला.

नानासाहेबानें भालकीहून परस्पर कर्नाटकावर स्वारी केली; तिची हकीकत देण्यापूर्वी शिंदेहोळकर ज्या कार्यांमुळें दोन वर्षें उत्तरेंत अडकून पडले होते त्यांची हकीकत येथेंच देणें योग्य आहे.

---

## प्रकरण १३ वें.

# उत्तरेंतील विवाडाची सुरुवात.

निजामउलमुल्काच्या मृत्यूनंतर दक्षिणेंत आपला पसारा वाढविण्याचा नानासाहेबानें जो उपक्रम केला, त्यासाठीं निजामाचा वडील पुत्र गाजीउद्दीन यास दक्षिणेंत आणण्याबद्दल त्यानें शिंदेहोळकरांस सांगितलें असतां, त्याप्रमाणें सन १७५२ पर्यंत त्यांस इकडे येतां आलें नाहीं हें वर आलेंच आहे. त्यांस विलंब लागण्याचें कारण दिल्लीच्या कारस्थानांत त्यांनीं केलेला प्रवेश हें होय. नादीरशाहा येऊन त्यानें बादशाहीस जोराचा धक्का दिल्यापासून चगताई× घराण्याच्या या पातशाहीचा ऱ्हास झपाट्यानें सुरू झाला. सन १७४८ सालीं महंमदशाहा,

---

× 'चकताई' किंवा 'चकत्यांची' पातशाही असा शब्दप्रयोग मराठे मोगलबादशाहीसंबंधानें त्या वेळीं वापरीत. चंगीझखानाचा मुलगा झगताईखान याच्या मुलीकडून बाबराच्या घराण्याची उत्पत्ति झाली, त्यावरून 'चकते' शब्द प्रचारांत आला.

निजामउल्मुल्क, व नंतर १७४९ त शाहू छत्रपति निधन पावले. शाहूस दिल्लीच्या पातशाहीबद्दल प्रेम होतें म्हणून तो जिवंत असेपर्यंत पेशव्याचे हात बांधलेले होते. परंतु इतउत्तर उत्तरेंतील अनुसंधान आपल्या मर्जीप्रमाणें घडवून आणण्याची पेशव्यास मोकळीक झाली. नादिरशाहानंतर त्याचा सरदार अहंमदशाहा अब्दाली हा प्रबळ झाला व त्यानें नादिरशाहाच्या राज्यापैकीं पूर्वेकडील भाग म्हणजे अफगाणिस्थान, बलुचिस्थान व सिंध, इतक्या प्रदेशावर स्वतःचें राज्य स्थापिलें. अब्दालीचा वजीर शहावलीखान हा मोठा शहाणा मुत्सद्दी असून शेजारच्या मोगल पातशाहीचा पडता काळ पाहून त्यापासून आपल्या धन्याचा फायदा करून देण्याचें त्यानें योजिलें; आणि अहंमदशाहास पंजाबावर स्वारी करण्यास भर दिली. या वेळीं दिल्लीस कमरुद्दीनखान हा वजिरीवर असून त्याचा कोणी आप्त शहानवाजखान म्हणून पंजाबचा कारभारी होता. त्याचें व त्याच्या भावाचें वांकडें पडलें. त्या भावाचा मदतगार अदिनाबेग नांवाचा एक धाडशी, क्रूर, महत्वाकांक्षी व उपद्व्यापी गृहस्थ होता. त्यानें अब्दालीस पत्रें पाठवून त्यास आपल्या यजमानाच्या साह्यास येण्याविषयीं लिहिलें. तदनुसार अहंमदशाहानें १७४८च्या जानेवारींत पेशावराहून खालीं येऊन लाहोर व मुलतान हे सुभे हस्तगत करून पुढें सरहिंद मुक्कामीं दिल्लीच्या उत्तरेस तळ दिला. त्यावर महंमदशाहानें शहाजादा अहंमद व वजीर यांस पाठविलें. त्यांनीं मार्चेच्या आरंभीं अब्दालीचा पराभव करून त्यास परत घालवून लाविलें. कमरुद्दीनचा मुलगा मीरमन्नू यानें पाठलाग करून अब्दालीचा धुव्वा उडविला तेव्हां त्यानें लाहोर परत दिलें. परंतु या झटापटींत सरहिंद येथें वजीर कमरुद्दीनखान तोफेचा गोळा लागून ठार झाला. याच संधींत दिल्लीस आजारी असलेला महंमदशाहा मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र अहंमदशाहा यानें बादशाही पद धारण केलें. त्यावेळीं सफदरजंग यास वजिरी व निजामाचा मुलगा गाजीउद्दीन यास बक्षीगिरी मिळाली. नवीन वजीर सफदरजंग हा इराणी असल्यानें जुने मोगली उमराव त्याच्या विरुद्ध होते. त्यामुळें आपलें बस्तान बसविण्यासाठीं सफदरजंगास मराठ्यांशीं गोडी ठेवून त्यांचें साह्य घेणें जरूर झालें. या वेळीं रोहिले पठाणांनीं दिल्लीच्या पूर्वेचा गंगायमुनांच्या लगतचा मुलुख बळकावून तेथील अनेक मोगल सुभेदारांस मारून स्वातंत्र्य धारण केलें. तेथून ते पूर्वेस वजिराचे सुभे अयोध्या व अलाहाबाद या प्रांतांतही लुटालूट करूं लागले. तेव्हां सफदरजंगानें त्यांच्यावर स्वारी करून सन १७४९ सालीं त्यांस नरम केलें आणि आपल्यातर्फे नवलराय नांवाचा कायस्थ अंमलदार रोहिलखंडावर

नेमून तो परत आला. मागें रोहिल्यांनीं नवलरायास मारून पुनः तो प्रांत हस्तगत केला. तेव्हां पुनः वजीर त्यांच्यावर चालून गेला. पण रोहिल्यांनीं त्याचा पराभव करून त्यास पिटून लावलें. इतक्या थरावर गोष्टी आल्या तेव्हां सफदरजंगास शिंदेहोळकरांची मदत घेण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं.

रामराजास गादीवर बसवून १७५० च्या पावसाळ्यांत शिंदेहोळकर उत्तरेंत गेले हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां वजिरानें त्यांच्याशीं मदतीचा एक विशिष्ट करार टरविला. करार बादशाहा व पेशवे यांच्या नांवें असून त्या अन्वयें मराठ्यांनीं पश्चिमेस सिंधु नदापासून पूर्वेस गंगेपर्यंतच्या उत्तरेंतील सबंध बादशाही मुलखाचें रक्षण करण्याची कामगिरी पत्करिली. त्याबद्दल त्यांस लाहोर, मुलतान, ठठ्ठा ( सिंध ), दिल्ली, रजपुताना ( अजमीर ) व आग्रा या सुभ्यांची चौथाई बादशहाकडून करार होऊन मिळाली. फौज निंमे बादशहाची व निंमे मराठ्यांची असावयाची असें ठरून राज्यकारभार पूर्वीच्याच अधिकाऱ्यांकडे रहावयाचा होता. कराराचा उद्देश असा होता कीं, अब्दाली, सिंधचे बलुची अमीर, रजपूत राजे, जाठ, शीख, रोहिले, बुंदेले वगैरे कोणीही वर उठून बादशाही मुलूख बळकावूं पाहतील तर त्या सर्वांचा बंदोबस्त मराठ्यांनीं करून मोगल पातशाहीचें संरक्षण करावें. हा काळ पावेतों मराठ्यांच्या कक्षेबाहेर राहिलेले शिल्लक मोगली सुभेसुद्धां या करारानें चौथाईखालीं येऊन सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांची सत्ता या हक्कांच्या रूपें या वेळेपासून चालू झाली. अर्थात् हें सर्व कागदी राज्य होतें. जेव्हां नानाविध शत्रूंचा पराभव करावा, तेव्हां मराठ्यांच्या पदरीं चौथाई पडावयाची होती. पण ज्याप्रमाणें पुढें इंग्रजांनीं हिंदुस्थानभर वेलस्लीच्या तैनाती फौजेचा अंमल बसवून सर्व प्रदेशाच्या संरक्षणाची कामगिरी आपणाकडे घेतली आणि तेणेंकरून ब्रिटिश सत्ता सर्वत्र चालू केली, तशाच तऱ्हेचा हा मराठ्यांचा उपक्रम होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इंग्रजांचा हेतु सिद्धीस गेला व मराठ्यांचा गेला नाहीं इतकाच दोहोंतील फरक. दोहोंतील बादशाही धोरण एकाच स्वरूपाचें होतें.

या कराराची पहिली बजावणी बंडखोर रोहिल्यांवर करण्यांत आली. रोहिले हे जातीनें अफगाणी पठाण असून अब्दालीस त्यांचें अगत्य होतें. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं मराठ्यांची फौज यमुना ओलांडून फेब्रुवारी १७५१ मध्यें अंतर्वेदींत शिरली. तेव्हां रोहिल्यांच्या कांहीं टोळ्यांनीं मराठ्यांचें लक्ष अन्यत्र वळविण्यासाठीं काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रांच्या प्रदेशांत धुमाकूळ उडवून दिला. हेतु हा

कीं, हिंदु यात्रेकरूंचें मत मराठ्यांबद्दल दूषित व्हावें आणि या यात्रेकरूंस मदत करण्याच्या निमित्तानें मराठे तिकडे वळावे. परंतु मराठे, वजीर व सुरजमल जाठ या त्रिवर्गांनीं एकत्र होऊन प्रथम अहंमदखान बंगष रोहिला याच्या फरुखाबाद प्रांतांत प्रवेश केला, तेव्हां त्यानें बहादुरखां रोहिल्यास आपल्या मदतीस आणिलें. ता. २० मार्च रोजीं लढाई होऊन बहादुरखां रोहिल्याचा पुरा पराभव होऊन, हत्ती, घोडे, तोफखाना वगैरे सामुग्री पाडाव झाली. या मोठ्या विजयाबद्दल शाबासकी दाखल पेशवा आपल्या सरदारांस लिहितो, "शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमीची. दक्षिणच्या फौजांनीं गंगायमुनापार होऊन पठाणांशीं युद्ध करून फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य नव्हे. तुम्हीं एकनिष्ठ कृतकर्मे दौलतीचे स्तंभ आहां. इरान तुरान पावेतों लौकीक झाला कीं, वजीर पळाला असतां यांनीं फत्तेच्या मसनदीवर बसविला. याउपर स्वकार्य साधून आपले मुलखांत येणें योग्य आहे." त्याप्रमाणेंच शिंद्यांनीं सादलखान पठाणाचा मोड केला. या वेळीं गोविंदपंत बुंदेले, नारो शंकर वगैरे इतर सरदारही शिंदे होळकरांस सामील होते. मराठ्यांच्या या स्वारीनें धीट होऊन काशीचा जमीनदार राजा बळवंतसिंग यानेंही जोर करून पठाणापासून गाजीपूर परत घेतलें. एवढीं कामें केल्यावर या वर्षी म्हणजे स. १७५१ च्या पावसाळ्यांत मराठे छावणी करून मुद्दाम रोहिल्यांच्या छातीवर अंतर्वेदींत राहिले. रोहिल्यांनीं मराठ्यांस ५० लक्ष रुपये दिले व अंतर्वेदींतला मुलूख सोडून ते गंगेपार गेले.

रोहिल्यांवरील ही स्वारी चालू असतांना त्यांस मदत करण्याच्या उद्देशानें अहंमदशहा अब्दालीनें पंजाबावर स्वारी केली. त्या वेळीं तेथला सुभेदार मीरमन्नू यानें बादशहाजवळ मदत मागितली. पण वजिरानें मदतीची कांहींच व्यवस्था केली नाहीं. अशा स्थितींत मीरमन्नूचा पराभव होऊन त्यानें अब्दालीस पंजाबचा सुभा देऊन वाटेस लावलें. मागें अब्दालीनें आपला सरदार नासिरखान पंजाबांत ठेवून दिला. अशा रीतीनें ज्या प्रांताच्या बंदोवस्ताची हमी मराठ्यांनीं घेतली तो हस्तगत करून अब्दालीनें त्या हमीची किंमत दिल्लीदरबारास प्रत्यक्ष पटवून दिली.

मराठ्यांनीं बादशहाशीं केलेल्या करारान्वयें रजपुत राजांकडून चौथाई वसूल करण्याचा हक्कही त्यांस प्राप्त झाला. याबद्दल रजपुतांस मोठें वैषम्य वाटलें व ते मराठ्यांचे अतःपर शत्रु बनले. 'आधीं तर रजपूत या प्रकारचे पाठीस लागले आहेत जे, दक्षणी होय ऐसा पहिल्यास मारूनच टाकितात. बोलावून मारतात, कौल देऊन मारतात, मेजवानीस बोलावून मारतात.' इतक्या तऱ्हेचें

मराठेरजपुतांचें वैर माजलें होतें. त्यांत आतां रोहिले व त्यांचा कैवारी अब्दाली यांशीं त्यांचें वैर जुंपलें. रोहिल्यांचा पराभव होऊन वजीर प्रबळ होत चालला ही गोष्ट बादशहा व त्याचे कांहीं उमराव यांस बरी वाटली नाहीं. सय्यदांप्रमाणें मराठ्यांच्या मदतीनें वजीर सर्व पातशाहीचा आक्रम करणार असें त्यांस वाटूं लागलें. त्यामुळें वजिराविरुद्ध कारस्थानें सुरू झालीं. मराठ्यांनीं एकदां या कामास हात घातला तर तें पुरें होईपर्यंत त्याची तड पोंचविणें हें त्यांचें काम होतें. पण याच वेळीं पेशव्यानें पत्रावर पत्रें पाठवून गाजीउद्दिनास घेऊन शिंदेहोळकरांस दक्षिणेंत बोलावलें. त्यामुळें स. १७५२ च्या पावसाळ्यांत ते दक्षिणेंत आले. त्याचा परिणाम असा झाला कीं, रोहिल्यांस पुन्हां तयारी करण्यास वेळ मिळून ते शिरजोर झाले; आणि पुनः मराठे १७५४ सालीं उत्तरेंत आले तेव्हां त्यांस सर्व मांडणावळ नव्यानें हातीं घ्यावी लागली. अशा रीतीनें मराठ्यांचा एकवार यशस्वी झालेला उद्योग फुकट गेला.

शिंदेहोळकर दक्षिणेंत गेले तेव्हां त्यांनीं अंताजी माणकेश्वर यास पांच हजार फौजेनिशीं बादशहाच्या जवळ ठेवून दिलें होतें. त्याचें व पेशव्याचे वकील हिंगणे यांचें बरें नव्हतें. दिल्लीस मृत वजीर कमरुद्दीनखानाचा पुत्र खानखानान, गाजीउद्दिनाचा मुलगा ह्मणजे निजामाचा नातू मीर शहाबुद्दीन ऊर्फ धाकटा गाजीउद्दीन व बादशहा वगैरेंनीं सफदरजंगाविरुद्ध कट केला कीं, वजिरास खलबतास बोलावून ठार करावें, खानखानान यास वजारत द्यावी, शहाबुद्दीन मीरबक्षी आहेच. या कटवाल्यांस पेशव्यांचा वकील बापूजी महादेव सामील झाला होता. त्यानें अंताजी माणकेश्वरास या कारस्थानाची बातमी लागूं न देतां फक्त जय्यत तयारीनें राहण्यास सांगितलें. याच हिंगण्यांची एक चिठी बादशहाची सापत्न माता मलकाजमानी इच्या हातीं लागून तिनें ती वजीर सफदरजंग याकडे पाठविली व त्यास इषारा दिला कीं तूं खलबतास येऊं नये, तुला दगा आहे. वजिरास ही गोष्ट समजली तेव्हां त्यास राग येऊन बादशहासुद्धां सर्वांची खोड मोडण्यासाठीं तो मोठ्या सैन्यासह दिल्लीजवळ आला. तेव्हां दिल्लीस बादशहाजवळ फारशी फौज नसल्यानें तो गर्भगळित झाला. त्यानें अंताजी माणकेश्वरास निकराची चिठी पाठविली कीं, आज माझें रक्षण करणें तुम्हांवर आहे. उलट वजिरानें सांगितलें कीं, मी शिंदेहोळकरांना करार करून दिला असून जर तुम्हीं पेशव्याचे नोकर असलां तर तुम्हांस माझेच मदतीस आलें पाहिजे. वास्तविक बापूजी महादेवानें स्वतःच्या अधिकारा बाहेरील उगाच

हा भलता कारभार केला होता. वजिराविरुद्ध चाललेल्या कारस्थानांत शिरण्याची त्यास गरज नव्हती. पण त्यामुळें अंताजीचा कोंडमारा झाला. बादशहानें सांगितलें कीं, तुम्हीं मजकडे राहिल्यास वजिराचे सुभे अलाहाबाद व अयोध्या मी पेशव्यांस देतों. बापूजीनें आधीं यांतील कांहीं अंताजीस कळूं दिलें नव्हतें. पण बादशहास मात्र ही पांच हजार फौज तुमचीच असें वचन दिलें होतें. शेवटीं अंताजी बादशहाकडेच राहिला व त्यानें सुभ्यांच्या सनदा मात्र करून घेतल्या. तेव्हां वजिरानें भय घातलें कीं, मी मराठ्यांकडील अंतर्वेद वगैरे दिलेला मुलूख काढून घेतों; आणि जाठ व रजपूत यांच्या मदतीनें मराठ्यांस उत्तर हिंदुस्थानांतून हांकून देईन. पण तूर्त बादशहाशीं युद्ध करण्याची त्यास हिंमत झाली नाहीं. इतका मराठ्यांच्या फौजेचा दरारा होता. वजिराविरुद्ध हिंगण्यांनीं कारस्थानांत शिरणें हा मराठ्यांच्या उत्तरेंतील राजकारणांत भेदाचा पाया झाला. वजीर सफदरजंग व पुढें त्याचा पुत्र सुजाउद्दौला हे या प्रकारानंतर नेहमीं मराठ्यांबद्दल साशंक राहिले. काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रें त्याच्या अंमलाखालीं होतीं तीं यामुळें कधींही मराठ्यांच्या ताब्यांत आलीं नाहींत. हिंगण्यांचें व पेशव्यांचें सूत बिघडण्यासही हें प्रकरण कारण झालें.

उत्तरेंत बादशहावजिरांचें असें जुंपलें असतां दक्षिणेंत पेशवा भालकीचा तह करून पुढील उद्योगास लागला होता. त्यानें गुजराथ जिंकण्यासाठीं दमाजीबरोबर धाकटा भाऊ रघुनाथराव याची रवानगी केली. यावेळीं रघुनाथरावाचें वय केवळ एकोणीस वर्षांचें होतें. बरोबर विठ्ठल शिवदेव विंचुरकर, नारो शंकर वगैरे सरदार होते. मराठ्यांनीं फेब्रुवारींत अहंमदाबादेस वेढा घातला. तेव्हां त्यांजबरोबर तेथील मोगल अंमलदार जवानमर्दखान बाबी यानें जोराची टक्कर दिली. मराठ्यांकडील धनाजी थोरात, शहाजी चौधरी प्रभृति सरदार ठार झाले. शेवटीं टिकाव धरवेनासा होऊन खानानें ता. २५ एप्रील १७५३ रोजीं अहंमदाबाद मराठ्यांच्या कबज्यांत दिली. अहंमदाबादच्या उत्तरेकडील बराच प्रदेश जहागीर म्हणून खानाकडे ठेवण्यांत आला तो पुढें दमाजीनें घेतला. आज फक्त राधनपूर संस्थान त्या खानाच्या वंशजाकडे चालत आहे. पुढें अहंमदाबादेस कराराप्रमाणें पेशवा व गायकवाड यांचा दुतर्फा अंमल सुरू झाला. पेशव्यानें आपल्यातर्फें श्रीपतराव बापूजी हा सुभेदार तेथें नेमिला. या वेळीं श्रीपतरावास जी सनद त्यानें दिली त्यांत शहराची व्यवस्था कशी ठेवावी याविषयीं विस्तृत हुकूम दिलेले आहेत. त्यांवरून मराठ्यांच्या राज्यकारभाची उत्तम कल्पना होते.

गुजराथच्या मोहिमेंतून परत खानदेशांत येऊन स. १७५३ च्या उघाडीस रघुनाथराव व होळकर उत्तरेंत रवाना झाले. हिंगणे व अंताजी माणकेश्वर यांनीं वजिराबरोबर युद्ध न करतां त्यास दबावावर थोपवून धरलें होतें. सुरजमल जाठ व वजीर हे फौजेसह दिल्लीच्या समोर तळ देऊन वसले होते. वजिरानें अंताजीस आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न जारीनें चालविला होता. त्यास दहा लाखांच्या जहागिरीची लालूच त्यानें दाखवून पाहिली. वजीर व मराठे एकमेकांविरुद्ध वागत आहेत हें पाहून अंतर्वेदींत मराठ्यांस मिळालेल्या मुलखांतील जमीनदार धीट होऊन ते मराठ्यांस किंवा वजिरास दोघांसही वसूल देईनात. अंताजीनें वजिरास विनंति करून मराठ्यांविरुद्ध त्याची हरकत काढून टाकविली. वजिरानें हें सारें मराठ्यांस आपल्या बाजूस ओढण्यासाठीं चालविलें होतें. बादशहाच्या मदतीस मीरमन्नूकडून पांच हजार, नजिबखान रोहिल्याची दोन हजार अशी नवी फौज आली. त्यामुळें यांशीं लढून व आपल्या फौजेची खराबी करून, वर जय होतो कीं नाहीं या संशयांत रहाण्यापेक्षां सफदरजंगानें परत अयोध्येस जाण्याचा विचार केला. या वेळेपासून वजीर स्वतंत्र झाला व त्यानें दिल्लीच्या भानगडींत लक्ष घालण्याचें सोडून दिलें.

हिंगण्यानें पेशव्यास पत्रावर पत्रे पाठवून दिल्लीस फौज पाठवावी असें लिहिलें, पण नानासाहेबानें तें काम रघुनाथराव व शिंदेहोळकर यांकडे सोंपविलें व स्वतः आपण कर्नाटकांत निघून गेला. वास्तविक या वेळीं पातशाहीचा मामला ही बाबत जास्त महत्त्वाची असून तिकडे पेशव्यानें स्वतः, निदान सदाशिवरावासारखा हुशार व तडफदार खासा तिकडे पाठवावयाचा होता. शिंदे व होळकर, हिंगणे व अंताजी यांच्यासारख्या मराठे सरदारांत वैमनस्य धुमसत होतें. त्यांचीं मनें आंतून शुद्ध नव्हतीं. त्यांत आणखी दिल्लींतील कारस्थानांची भर पडली होती. या सर्वांस हुकमांत ठेऊन काम घेण्याचें रघुनाथरावांत सामर्थ्य नव्हतें. तो अनभ्यस्त, अल्पवयी व चंचल मनाचा होता. त्यास स्वतःची बुद्धि नव्हती. सन १७४८ नंतर पेशवा पुनः एकदांही उत्तरेंत गेला नाहीं, ही त्याची अक्षम्य चूक असें म्हणणें भाग येतें. अगदीं हातघाईवर आल्यानंतर त्यानें १७६० सालीं सदाशिवरावास उत्तरेंत रवाना केलें पण त्या वेळीं त्याचा उपयोग नव्हता. सरदारांचीं आपसांतील भांडणें; रजपूत, जाठ, वजीर, व बादशाही उमराव यांचीं कारस्थानें; अबदाली, रोहिले वगैरेंची उचल; यांस वेळींच आळा घालून मराठ्यांच्या तिकडील उद्योगास आरंभापासून एकवा-

क्यता आली असती तर पानिपतचा घनघोर प्रसंग उद्भवलाच नसता. नानासाहेबानें पैशाचा लोभ धरून, दिल्लीचें केंद्रस्थान सोडून दक्षिणेकडे लक्ष घातलें, यावरून त्याची दिशाभूल झाली असें म्हणणें भाग आहे. इंग्रजफ्रेंचांच्या अवास्तव संचारामुळें पेशव्यास दक्षिणेंतील कारस्थानें जास्त महत्त्वाचीं वाटलीं व त्याचें अब्दाली वगैरेंच्या उपद्व्यापाकडे दुर्लक्ष झालें, तें अक्षम्य होय.

रघुनाथराव सन १७५३ च्या सेप्टेंबरांत खानदेशांतून निघाला तो माळव्यांतून राजपुतान्याकडे वळून जयपुरावरून जाठाच्या मुलखांत १७५४ च्या आरंभीं येऊन पोहोंचला. बरोबर खंडेराव होळकर, दत्ताजी शिंदे, सखाराम बापू, चिंतो विठ्ठल प्रभृति मंडळी होती. वजीर सफदरजंग अयोध्येस निघून गेल्यानंतर त्याचा सोबती सुरजमल जाठ भरतपुरास परत आला. तेव्हां बादशहा व गाजीउद्दीन यांस प्रथम त्याची खोड मोडावयाची होती, म्हणून बादशहानें रघुनाथरावास पहिल्यानें ही कामगिरी आंगावर घेण्यास सांगितलें. जाठ कुंभेरीच्या मजबूद किल्ल्यांत राहून लढूं लागला, तेव्हां मराठ्यांनीं कुंभेरीस वेढा दिला. त्यांच्या मदतीस गाजीउद्दीन बादशाहाचा तोफखाना घेऊन आला. मराठे व गाजीउद्दीन यांचें हें सूत पाहून त्याच्याबद्दल बादशहा व वजीर खानखानान यांस चिंता उत्पन्न झाली. मराठ्यांच्या मदतीनें गाजीउद्दीन पातशाही ताब्यांत राखणार याचें अनेकांस वैषम्य वाटलें. रजपूत राजे व जाठ हेसुद्धां मराठ्यांच्या भीतीनें बादशहास सामील झाले. बादशहानें सुरजमल्लास गुप्त पत्र पाठवून त्यास टिकाव धरण्यास सांगितलें व स्वतः फौज घेऊन बाह्यतः गाजीउद्दिनाकडे पण मनांतून जाठास मदत करण्याच्या हेतूनें भरतपुराकडे येऊं लागला. हें कारस्थान गाजीउद्दिनास कळलें तेव्हां मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन तो दिल्लीवर चालला. वाटेंत बादशहाचें सैन्य जाठाच्या मदतीस जात होतें त्याच्यावर छापा घालून त्यांनीं त्याचा फडशा उडविला. बादशाहा पळून दिल्लीस परत गेला. मागाऊन होळकर व गाजीउद्दीन यांनीं येऊन त्यास वेढा घातला.

कुंभेरीचा किल्ला मजबूद असून सभोंवार केवळ वाळवंटी प्रदेश होता. वाळूमुळें तटास सुरुंग लावणें शक्य नव्हतें. जाठाची तयारी जय्यत होती त्यामुळें किल्ला घेणें तर आंतील अन्नसामुग्री संपेपर्यंत सैन्यास तेथें तळ देऊन बसणें भाग होतें. जाठ चाळीस लक्ष रुपये देण्यास तयार होता, पण रघुनाथरावानें एक कोट मागितले. त्यामुळें वेढा चालू असतां एक दिवस, मल्हारराव होळकराचा एकुलता मुलगा व प्रसिद्ध अहल्याबाईचा नवरा खंडेराव होळकर हा दारू पिऊन बेहोष

स्थितींत मोर्चांत आला व तेथें जेजालेची गोळी लागून ठार झाला. हें वर्तमान ऐकून मल्हाररावाचा क्रोध अनावर होऊन त्यानें प्रतिज्ञा केली कीं, 'सुरजमल्लाचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच जन्मास आलियाचें सार्थक, नाहीं तर प्राणत्याग करीन.' या नवीन ईर्ष्येमुळें वेढा जोरानें पुढें चालू झाला. प्रतिज्ञेचें वर्तमान जाठास समजलें तेव्हां त्यास भीति उत्पन्न झाली, व त्यानें आपली वायको अनसूया व वकील रूपराम कटारी यांचा सल्ला घेतला. त्यांनीं सांगितलें, कीं जयाप्पा शिंद्याची मदत मागावी. त्यावरून सुरजमल्लानें रूपरामाचा मुलगा तेजराम यास शिंद्याकडे पाठवून आपला बचाव कोणत्याही उपायानें करावा अशी विनंति केली. तेव्हां जयाप्पानें जाठाचा बचाव करण्याचें वचन दिलें. हें वर्तमान मल्हाररावास समजलें, तेव्हां उभयतांत आधींच वैमनस्य होतें त्यांत भर पडून भयंकर वितुष्ट उत्पन्न झालें. इकडे वेढा चालू असतांच बादशहा जाठाच्या मदतीस येऊं लागला तेव्हां होळकर वर सांगितल्याप्रमाणें गाजीउद्दिनाबरोबर त्याजवर गेला. मागें रघुनाथरावानें सर्वांची सल्ला वेढयाच्या कामीं घेतली. त्यांत असें ठरलें कीं, क्षुल्लक एका किल्ल्यासाठीं साऱ्या मराठ्यांच्या फौजेनें पदरचें खाऊन घोळ घालून महिनेच्या महिने बसावें हें योग्य नव्हे, त्यामुळें कर्ज होऊन फौजेचा निभाव लागणें कठीण, तर जयाप्पाजवळ जाठ साठ लक्ष खंडणी देतों म्हणतो ती घेऊन दुसऱ्या उद्योगास जावें. याच वेळीं मारवाडच्या रामसिंगाकडून मदत मागण्यासाठीं शिंद्याकडे वकील आले होते, त्यांच्या मदतीस जयाप्पा निघाला. तेव्हां रघुनाथरावानें साठ लाख खंडणी घेऊन कुंभेरीचा वेढा उठविला. ही बातमी मल्हाररावास लागली तेव्हां शिंदेहोळकरांचें उघड वांकडें पडलें.

गाजीउद्दीन व होळकर दिल्लीस वेढा घालून बसले. तेव्हां कठिण प्रसंग पाहून वजीर खानखानानही बादशहास सोडून गेला. दुसरीकडून मदत येण्याचा संभव नाहीं असें पाहून बादशहानें किल्ल्याचे दरवाजे उघडून गाजीउद्दीनास सलूख करण्यासाठीं आंत घेतलें. तेथें दरबारांत गाजीउद्दीनानें खालील भाषण केलें. "बादशाहास राज्य करण्याचें चातुर्य नाहीं. त्याच्या हातून मराठ्यांचा बंदोबस्त होत नाहीं. मित्रांशीं त्यानें विश्वासघात केला आहे. तर याला पदच्युत करून तयमूरचा दुसरा लायक वंशज तख्तावर स्थापणें योग्य आहे." हा बेत त्यानें तावडतोब अंमलांत आणविला. बादशहा व त्याची आई ऊधमबाई यांस त्यांचे डोळे काढून त्यानें कैदेंत टाकिलें; व जहांदरशहाचा ५५ वर्षांचा वृद्ध मुलगा अजीजुद्दीन यास आलमगीर असें नांव देऊन तख्तावर बसविलें. या

कारभारांत गाजीउद्दिनास ऊधमबाईची सवत मलिका अज्जमानी ऊर्फ बादशहा बेगम इचें साह्य व प्रोत्साहन होतें. सध्यां तिनें होळकराच्या मदतीनें वरील प्रकार तडीस नेवविला, तरी ती पुढें मराठ्यांच्या विरुद्ध अब्दालीस मिळाली आणि तिनें आपली मुलगी चंदाजमानी त्यास दिली. या उद्योगानें चकताई घराण्याची पातशाही टिकेल अशी तिची समजूत होती. गाजीउद्दीन हा आतां वजीर झाला व मराठ्यांशीं सख्य ठेवून बादशाहीचा आटोप करण्याच्या प्रयत्नास लागला.

जयाप्पा फुटून मारवाडाकडे निघून गेल्यावर रघुनाथरावानें स्वारीच्या इतर कार्यांस सुरवात केली. तीं कार्यें म्हणजे हिंदूंचीं तीर्थें व क्षेत्रें मुसलमानांच्या ताब्यांतून सोडविणें व अंतर्वेदींत रोहिल्यांपासून जिंकलेल्या मुलखांत सुरळीत अंमल चालू करणें. जयाप्पा गेल्यामुळें हीं दोनही कामें अपूर्ण राहिलीं. याच वेळीं रोहिले नेस्तनाबूत होते तर पानिपतचा प्रसंग मुळांतच बंद पडला असता, पण रघुनाथरावाच्या हातून तें काम चांगलेंसें झालें नाहीं. अंतर्वेदींत रघुनाथरावाचे इयालक बर्वे बंधु हे कायमच्या बंदोबस्तास होते, पण सफदरजंगानें त्यांचा जम बसूं दिला नाहीं. काशीही मराठ्यांच्या ताब्यांत देण्यास तो राजी नव्हता. गाजीउद्दिनाचा हेतु मराठ्यांनीं तावडतोब पंजाबांत जाऊन अब्दालीचा अंमल उठवावा असा होता. पण तें कांहीं न करतां रघुनाथराव दिल्लीजवळ वसून राहिला. या सैन्याचा खर्च अर्थातच जवळच्या लोकांवर पडला, त्यामुळें ते मराठ्यांचे द्वेष्टे बनले. रघुनाथरावानें गाजीउद्दीनचा प्रतिस्पर्धी खानखानान यास आश्रय दिला, त्यामुळेंही दोघांत अविश्वास उत्पन्न झाला. गाजीउद्दीननें संधि पाहून खानखानान व पदच्युत बादशहा यांस ताब्यांत घेऊन मारून टाकिलें. या सर्व प्रकारामुळें मराठ्यांबद्दल उत्तरेंतील मुसलमानांचें मन साफ बिघडून गेलें. तसेंच दिल्लीच्या खुद्द अंमलांतील मथुरा, वृंदावन, गडमुक्तेश्वर, पुष्कर वगैरे क्षेत्रांत रघुनाथरावानें हिंदूंचा अंमल चालू केला, त्यांस वर्षासनें नेमून दिलीं, भटभिक्षुकांस ब्राम्हणभोजनांचा व दक्षिणांचा सुकाळ केला, याचाही परिणाम मुसलमानांचे मनावर अनिष्टच झाला. आपला पुरा अंमल बसण्याच्या आधीं असले बाह्य देखावे लांबणीवर पडते तरी चाललें असतें. बरें एवढें करून पेशव्याचें कर्ज तरी फिटावें तेंही फिटलें नाहीं. नानासाहेब जयाप्पास लिहितो. " गुदस्तां तुम्हीं निरोप घेऊन गेलां तेव्हां कर्ज वारावयाचा निश्चय होता. जाठांचा मनसबा भारी पडून शेवटीं पैका न मिळाला. दिल्लींत मातबर ऐवज मिळावा ऐसें असतां घराऊ पेचांपाचांमुळें तेंही न झालें. मनांत होतें कीं, हिंदुस्थानांतून एकदां चाळीस पन्नास लक्ष

रुपये यावे; येतांच कर्ज वारावें. परंतु अर्थ न घडला. तुम्हींही अंगीकृत प्रतिज्ञात पक्षासाठीं चिरंजिवाजवळून गेलां. या उपर लहानमोठे सरदारांवर पंचविसां लक्षांची बेरीज करून सांगितलें. ते बेरीज सर्वांहीं उत्साहें कवूल केली. एवढा क्षयरोगासमान कर्जरोग दूर जालिया उत्तम आहे. वहुतांनीं अवलंविलें स्वामिकार्य सहजांत सिद्धीस जाऊन न करी तोच मात्र दोषस्थान होईल." असलीं कर्जाबद्दलचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत. त्यावरून मराठ्यांच्या राज्याचा आर्थिक पाया किती लंगडा होता हें कळतें. पेशव्यांच्या अमदानींत कर्जाचें रडगाणें नेहमींच चालू असलेलें दिसतें व याच लंगडेपणामुळें मराठ्यांच्या वहुतेक मसलती बिघडत असत.

जयाप्पा शिंदे सन १७५४ च्या मार्चांत कुंभेरी सोडून मारवाडच्या रामसिंगाच्या मदतीस निघून गेला हें वर आलेंच आहे. रामसिंग हा मृत राजा अभयसिंग याचा पुत्र असून राज्याचा वारस होता. पण त्याचा चुलता बख्तसिंग यानें सन १७५० त मारवाडचें राज्य जोरावर बळकाविलें. तेव्हांपासून रामसिंगानें शिंद्यास आपल्या मदतीस यावें अशी निकड लाविली होती. पण गाजीउद्दीनाच्या मामल्यामुळें शिंद्यास तशी सवड झाली नव्हती. रामसिंग हा जयपूरच्या ईश्वरसिंगाचा जांवई असून स्वतः दुबळा व दुर्दैवी होता. उलटपक्षीं बख्तसिंग पराक्रमी असून त्यास राज्यांतील सरदारांचें साह्य होतें. जयपूरच्या भांडणांत माधवसिंगाचा पक्ष घेऊन मराठ्यांनीं रजपुतांच्या अंतस्थ भांडणांत भाग घेण्याचा जो उपक्रम केला तेव्हांपासून रजपुतांचें मन मराठ्यांविषयीं कलुषित झालें. रामसिंगानें मराठ्यांकडे मदत मागितली त्यामुळें मारवाडच्या राज्यांतील सरदारांस तो अप्रिय होऊन ते बख्तसिंगास मिळाले. तसेंच जयपुरप्रकरणीं मराठ्यांनीं प्रथम ईश्वरसिंगाची व नंतर माधवसिंगाची बाजू घेऊन अपकीर्ति संपादन केली, तेव्हांपासून मराठ्यांवर कोणाचाच विश्वास बसेनासा झाला होता. या सर्व पीठिकेमुळें बख्तसिंग हा राज्याचा वारस नव्हता तरी परकी मराठ्यांविरुद्ध लढणारा देशभक्त आहे असें रजपुतांचें सामान्य लोकमत होतें. दुबळ्या रामसिंगाचें चुलत्यासमोर कांहीं चालेना व शिंदेही परत जात नाहींत असें पाहून रामसिंगाच्या सासवेनें विषप्रयोग करून बख्तसिंगास ठार मारिलें, त्यामुळें तर रजपूत फारच चिडले. त्यांनीं बख्तसिंगाचा मुलगा विजयसिंग यास राजा करून रामसिंगास घालवून दिलें. विजयसिंगाचा सासरा जयपूरचा माधवसिंग याचें व मल्हारराव होळकराचें सख्य होतें त्यामुळें मराठे रामसिंगाचा पक्ष धरणार नाहींत अशीही

रजपुतांची समजूत असावी. पण जयाप्पानें ही कामगिरी कांहींशी होळकराच्या चुरशीनें व पैशाच्या लालसेनें अंगावर घेतली होती. जयापा आला तेव्हां विजयसिंगानें कमर बांधली. त्याच्या बाजूस ५०।६० हजार फौज होती. शिंद्याचें सैन्य थोडें होतें. परंतु त्याच्या बाजूचे सरदार व घरांतील भाऊ दत्ताजी व मुलगा जनकोजी हे केवळ 'देवाच्या घरचे' शिपाई होते. जयाप्पा नागोरावर येतोसें पाहून विजयसिंगानें चार कोस पुढें येऊन लढाई देण्याचा विचार केला. मेडत्याजवळ तुंबळ युद्ध झालें. आरंभीं मराठ्यांचा मोड झाला व ते परत फिरणार तोंच निवडक दोन हजार स्वारांनिशीं जनकोजी रजपुतांवर चालून गेला व निकरानें लढत राठोडांची फौज दुभागून तो पलीकडे गेला. रजपुत दुभागलेले आहेत ही संधि साधून जयाप्पा मागें स्वस्थ होता, त्यानें जोराचा मारा केला, तेव्हां विजयसिंग नागोरास पळून गेला. या लढाईंत जनकोजीच्या अंगास तीन जखमा लागल्या. लगेच जयाप्पानें नागोरास वेढा घातला. हा वेढा आठ महिने चालला तरी मराठ्यांचा इलाज चालेना. जयाप्पा तर त्याच्या स्वभावाप्रमाणें इरेस चढला होता. उलट पक्षीं विजयसिंगाचे वकील पुण्यास पेशव्याकडे गेले. पेशव्यानें शिंद्यास परत बोलवावें ही त्यांची मुख्य मागणी होती. परंतु नानासाहेबाचा जयाप्पावर फारच विश्वास होता. त्याच्या इच्छेविरुद्ध जाणें पेशव्यास कठिण होतें. विजयसिंगानें सासरा माधवसिंग याच्या मध्यस्थीनें होळकराची मदत मागितली होती. पण मल्हाररावास उघडपणें अशी मदत करणें शक्य नव्हतें. नानासाहेबास हे सर्व 'घराऊ पेंच' पूर्ण अवगत होते. जयाप्पाच्या इरेईमुळें राजकारण बिघडत आहे अशी जाणीव त्यास होती. त्यानें स्वारीच्या आरंभींच जयाप्पास सूचना दिली होती कीं, 'मोठा मनसबा, मारवाडी जात अद्याप गर्विष्ठ, त्यांसीं प्रसंग एकाएकीं तुम्हांवर प्राप्त झाला आहे. त्यास तजविजेनें दमवून, युक्तीनें समय पाहून जरब देऊन स्वकार्यसिद्धि करावी. श्रीकृपेनें सरदारी व शिपाईगिरी व दाब उपाय जाणणें सर्व गुण तुम्हांस आहेत. तदनुरूप साध्य असाध्य विचार करून कार्य करणें. जोधपूर निंमे राज्य द्यावेंसें विचार जाहलिया उत्तम आहे. दाटून सर्वच घ्यावयासाठीं कलहवृद्धि न करावी, हा थोरांचा संप्रदाय आहे. युद्धावांचून साम न होयसेंच असलिया, सावधतेनें आपले रीतीनें त्यास आयास आणून नम्र करून कार्य संपादावें. विलंबावर पडलें तरी निरंतर सविस्तर अर्थ लिहीत जाणें.' मल्हाररावाशीं जास्त वैर वाढवूं नये अशीही सूचना पेशव्यानें त्यास वेळींच केली होती. 'हरप्रकारें मल्हारबास आपले मायेंत राखून

तहरह करून मोकळे होणें. तुमचे विषयीं येथें तिळमात्र दुसरा अर्थ नाहीं. सर्व प्रकारें समाधान असों देणें ' असें नानासाहेबानें जयाप्पास लिहिलें. पेशव्याचे होळकर प्रभृति इतर सरदार जयाप्पाच्या मदतीस येणार नाहींत अशी खात्री असल्यामुळेंच विजयसिंगास जोर चढला होता हें नानासाहेबास अवगत होतें, म्हणूनच मल्हाररावास मायेंत राखावें असें त्यानें जयापास सुचविलें. तिकडे विजयसिंगाचा नागोरास टिकाव लागेनासा झाला तेव्हां त्यानें मोगलाई मसलत केली व भिकाऱ्यांच्या वेषांत मारेकरी पाठवून जयाप्पास स्नान करीत असतां ठार मारविलें. ही गोष्ट ता. ३० माहे जून १७५५ रोजीं घडली. जयाप्पाच्या मृत्यूनें मराठ्यांच्या सैन्यांत गोंधळ उडेल अशा समजुतीनें विजयसिंग लगेच चालून आला, पण दत्ताजीनें निकर करून त्यास परत फिरविलें. जनकोजी जवळ नव्हता. त्यानें त्याच दिवशीं मेडतें काबीज केलें होतें.

यावेळीं रघुनाथराव शिंद्याच्या मदतीस येता तर तावडतोब सर्व प्रकरण विल्हेस लागलें असतें. परंतु तो गंगायमुनातीरीं किरकोळ कामगिऱ्या करीत राहिला. सन. १७५४ च्या ऑक्टोबरांत सफदरजंग वारला व त्याचा मुलगा सुजाउद्दौला अयोध्येचा सुभेदार झाला. त्यानें काशी, प्रयाग वगैरे ठिकाणें मराठ्यांच्या ताब्यांत देण्याचें नाकबूल केलें. हीं क्षेत्रें ताब्यांत राखणें म्हणजे पर्यायानें मराठ्यांची शेंडी धरून ठेवणें आहे हें सुजा पुरें ओळखीत होता. आपल्या राज्यास मराठ्यांचा उपद्रव होणार असें भय वाटलें, कीं तावडतोब काशीच्या ब्राह्मणांची सुंता करण्याचा धाक त्यानें घालावा, म्हणजे आपोआप मराठे मागें फिरतात हें त्यास ठाऊक होतें. रोहिल्यांच्या स्वारींत असतांना मल्हाररावाच्या मनांत होतें कीं, काशी घेऊन तेथील पुरातन विश्वेश्वराच्या देवालयाची औरंगजेबानें मशीद केली होती ती पाडून, पुनः तेथें विश्वेश्वराची स्थापना करावी. पण तेथील ब्राह्मणांनीं नुसता हा बेत ऐकूनच पेशव्यास विनंतिपत्र पाठवून तो रद्द करविला. इतकें ब्राह्मणांचें धर्मप्रेम व शौर्य होतें ! यावेळींही दीक्षित लिहितो, ' काशींत आपली फौज राहील तों पावेतों भय नाहीं. फौज दूर गेली कीं नवाबाचा चणारडी ( चुनारगड ) काशीच्या उरावर आहे. मोठें भय आहे. काशीच्या राजानें श्रीमंतांस व वडिलांस काशी जिंकण्याच्या भरीस पडूं नये म्हणून लिहिलें आहे. ब्राह्मणांस वांचवून आपलें कार्य होईल तर उत्तम आहे. काशी रुद्द पाहतो. राजा आहे म्हणून वांचलों आहों. अयोध्येकडे श्रीमंतांच्या फौजा उतरल्यानें सर्वही कामें होतील. या कामास अंतर तरी लक्ष ब्राह्मण मरतील. यशही मोठें

होईल.' याच दीक्षितास पातशाहा, रघुनाथराव वगैरे सर्वांकडून ब्राह्मणभोजनें घालण्यासाठीं गांव इनाम करून घेण्याची मात्र मोठी हांव होती ! !

याच वेळीं गोहदच्या जाठ राण्यानें जोर केला होता त्याचें पारिपात्य विठ्ठल शिवदेवानें केलें व त्याचा पराभव करून शिरच्छेद केला, आणि ग्वालेरचा किल्ला ताब्यांत घेतला. पण उत्तरेंत यावेळीं एकंदरींत मराठ्यांच्या सत्तेविरुद्ध जिकडे तिकडे बंडावा चालू होता, त्याचा बंदोबस्त रघुनाथरावाच्या हातून झाला नाहीं. सर्वच कामें अर्धवट ठेवून तो स. १७५५ च्या उन्हाळ्यांत होळकरासह दक्षिणेंत रवाना झाला. अंगावर घेतलेल्या कार्यांपैकीं एकही नीटसें त्याच्या हातून तडीस गेलें नाहीं. वजीर गाजीउद्दीन मराठ्यांच्याबद्दल साशंक झाला. त्यानें जाठ व रोहिले यांजकडे संधान आरंभिलें. हिंगणे, अंताजी माणकेश्वर, शिंदे, वगैरे असंतुष्ट झाले. पैसाही मिळाला नाहीं. जयाप्पाच्या खुनाची बातमी पुण्यास समजली तेव्हां पेशव्यानें त्याचा कारभारी रामाजी अनंत यास लिहिलें कीं "जयाजी शिंदे यांस दगा होऊन निधन पावल्याचा मजकूर लिहिला तो कळोन बहुत श्रम जाले. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. उपाय नाहीं. जयाप्पासारखा उमदा सरदार दग्यानें मृत्यु पावावा ऐसें नव्हतें. असो. दत्ताजी शिंदे मर्द खबरदार आहेत. तुम्हीं सर्व सरदार शाबूद आहां. जनकोजीचें समाधान करून उपस्थित मनसुबा सिद्धीस पाववून, शत्रूचें पारिपत्य, तहरह उत्तम प्रकारें होय तें करणें. दतबाचा स्वभाव शिपाईगिरीचा आहे. यास्तव रागें करून असमयीं अस्थानीं निकडीस प्रवर्ततील त्यास समजाऊन गोड बोलूनच सांगत जाणें. आपा असतां बोलत होते त्या प्रमाणें झालें तर तह करणें. परंतु ते सांप्रत चढीं लागले असतील. यास्तव हर तजविजीनें संभाळून राहणें. दोन चार मिळून जमा होऊन आले तर तीन महिने पावेतों गनिमी तऱ्हेनें सांभाळणें. फौजा तिकडे आलियावर श्रीकृपेनें उत्तमच होईल. तिळमात्र उदास न होतां सेवा करणें.' या पत्रावरून दत्ताजीच्या स्वभावाची ओळख नानासाहेबास होती हें स्पष्ट दिसतें. पेशव्यानें दत्ताजीस लिहिलें, 'बिजेसिंगास उत्तम प्रकारें तंग केलें आहे, वरकुड कोणाच्यानें त्याची कुमक करवत नाहीं, स्वामींनीं त्याचे वकिलास साफ निरोप द्यावा, कै. आपांचा अभिमान शेवटास नेलियानें, लौकिक व स्वामिकार्य सर्वांस जय,' म्हणोन लिहिलें. त्यास आपांनीं जें अवलंबिलें तें आम्हांस सर्व प्रकारें करणें. परंतु हा राजकार्य प्रसंग आहे. आपांसही येथून बुद्धिवाद चारपांच महिने मागें लिहीत गेलों. तीं पत्रें तुम्हीं पाहिलींच असतील. दूरपथ, दोन वर्षांनीं हिंदुस्थानांतून फौज आली,

एकाएकीं तयारी करण्यास उशीर लागतो, त्यास नाइलाज. श्रीकृपें दिडा महिन्यांत पांचसहा हजार फौज येऊन पावेल. मागाऊन खासाही वीस हजार फौजेनिशीं येतच आहे. तुम्हीं अवलंबिलें कार्य तें अगत्य आम्हांस करणें. परंतु होणारानुरूप आपांनीं हातेर वोढिलें. शिपाईगिरीची रीत केली, सरदारगिरीचा प्रकार न केला. तेव्हां प्रथम भारती लढाई मारिली. त्या उपरी नव्या दवावांत तूट सोसून, सलूख हरप्रकारें, पुढील संकट दूरदेशीनें जाणून, करून मोकळे झाले असते तर आज प्रयाग, अंतर्वेद, व अलीकडील खेचीचा मुलुख सोडविणें वगैरे कामें सरकार किफायतीचीं होऊन गेलीं असतीं. परंतु होणारास इलाज नाहीं. तुम्हींही आजपावेतों शिपाईगिरी केली. आतां सरदारीची रीत धरून तजविजीनेंच कांहीं कामें करावीं. जरूर संकट पडेल तेथेंच नेटून शिपाईगिरी करावी. तुमचा अभिमान ईश्वरास आहे, आणि मजवर ईश्वरी कृपा आहे तोंवर साहित्यास कधीं चुकणार नाहीं. तीं पिढ्यांचे एकनिष्ठ सेवक, कामाचे असतां, तुमचा अभिमान नसावा हें कधींही या घरांत घडणार नाहीं. सर्व प्रकारें समाधान चित्ताचें करून अष्टपैलूचे रीतीनें जसा जे समयीं प्रसंग पाहाल तसा मनसवा करीत जाणें. बिजेसिंगाचा वकील, पंनास लक्ष रुपये द्यावे, रामसिंगास पोटापुरती जागा द्यावी, ऐसें बोलत होता. आम्हीं ते गोष्ट मान्य केलीच नव्हती. सांप्रत हा प्रसंग जाहला, याजमुळें आम्हीं साफच त्यास जाब दिला कीं, आम्हांस याउपर तह करितां अनुकूल पडत नाहीं. तुम्हीं जाणें. म्हणून निरोप दिला. तेथें ते आतां चढीं लागले असतील. मध्यस्थ मारले गेले, सबब मध्यस्थीसही कोणी शिरत नसेल. अद्याप त्यांनीं रामसिंगास पंधरा विसांची जागा दिल्ही, व तुमचा खर्च फिरोन दहा लाख जाजतीं दिले तर घेऊन सलूख करून या संकटांतून सुटावें, हें राज्यभार अष्टपैलूपणास उचित आहे. तेथील प्रसंगानुरूप करणें.”

हें पत्र नानासाहेबाच्या राज्यकारभारनैपुण्यास शोभेसें आहे. आपल्या एकनिष्ठ सरदारांशीं त्याची वागणूक किती प्रेमळपणाची असे, केवळ नोकर या नात्यानें त्यांस न वागवितां, त्यांच्या मनुज स्वभावज दोषांकडे त्यांच्याच दृष्टीनें पाहून, त्यांचा अभिमान वाळगून पुनः राजकारण न बिघडावें अशी त्याची कशी योजना होती, हें असल्या पत्रांवरून कळतें. नानासाहेबाचा कल शिपाईगिरीपेक्षां सरदारगिरीकडेच होता हेंही यावरून स्पष्ट दिसतें. शिवाय अडचणींनीं खचून न जातां अल्पावकाशांत त्यानें राज्यकारभार व्यवस्थित करून मराठ्यांच्या सत्तेचा फैलाव केला व त्यांच्या उमेदी वाढविल्या हाही वरील पत्रांतील आशय व्यक्त होतो.

या पत्रानंतर पेशव्यानें कारभारी रामाजी अनंत यास लिहिलें कीं, 'जयाप्पांनीं मारवाडच्या मनसुबियाचा अंगेज केला. त्यास आयुष्य असतें तरी त्यांचे तेच सिद्धीस नेते. तथापि त्यांच्या मागें दत्ताजींनीं आव घातला तो प्रकार सिद्धीस पावावाच पावावा, यापेक्षां दुसरें अधिक न जाणतां, अंताजी माणकेश्वर ग्वालेरीहून रवाना केले, ते अविलंबेंच येऊन पावतील. खासा स्वारीची तयारी होत आहे. दसरा झाल्यावर चाळीस पन्नास हजार फौजेनिशीं येणें होईल. रजपुतांमध्यें जाठांशीं राजकारण राखून एकाशीं स्नेह तर एकाशीं बिघाड, एकदांच सर्वांशीं कज्जिया करूं नये, तूर्त तोंडानें वरकडांशीं फारच गोड बोलून राजकारण राखावें. जें समयोचित दिसेल तें करणें.'

या मारवाडच्या स्वारींत बिलकूल लक्ष न घालण्याचा रघुनाथराव व मल्हारराव यांनीं मूळपासून विचार केला होता असें दिसतें. कारण शिंदे एवढे संकटांत असून सुद्धां मल्हारराव दक्षिणेंत निघून गेला. न जाणों, नानासाहेबानें कुमकेस जाण्यास लिहिलें, तर मग आज्ञाभंगाचा दोष येण्यापेक्षां आधींच दक्षिणेस जाणें त्यानें पतकरिलें. तीच गोष्ट रघुनाथरावाची. त्याच्या स्वारीची फलश्रुति गोविंदपंत बुंदेल्यानें पेशव्यास लिहिली ती अशीः—'दादा स्वामी जाठावर आले, परंतु मन कोणी घालून, मेहेनत करून, त्याजला जेर न केलें. सुरजमल स्वामींस ठावका आहे. आपसांत चित्त शुद्ध नाहीं याजकरितां तो शेर झाला. श्रीमंत स्वामींचा बदनक्ष झाला. चार हजार घोडे, दोन हजार उंट, चार हजार बैल, (मराठ्यांकडील) वाणियांचा सुरजमल्लानें नेला. असा बदनक्ष कधींही न जाला. जर श्रीमंत यजमान स्वामी, श्री. भाऊ स्वामी, येतात तर नक्ष राहतो. श्रीमंत आलियावर पातशहावजीर समागमें दोन हजार तोफ घेऊन येतील. दोन महिन्यांत जाठ फडशा होईल. करोड रुपयांचा मुलख सुटेल. आम्हींच देशास येतों, भेटीनंतर साद्यंत विदित करूं.' सरदारांच्या आपसांतील भांडणांबद्दल गोविंदपंतानें लिहिलें, 'उभयतां सरदारांत पेंच दिसतो. सुरळितपणें वर्तणूक होणार नाहीं. आपसांत कटाक्ष वाढेलसें दिसतें. याप्रांतीं स्वामी आलियाविना बंदोबस्त होणार नाहीं याजमध्यें सर्व आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. ज्याची फिकीर त्याजला असते. सरदारांत आपसांत चित्त शुद्ध नाहीं. याजमुळें मनसुवा सिद्धीस जाणार नाहीं. एकांनीं एक म्हणावें, दुसऱ्यांनीं दुसरेंच म्हणावें, यांत मनसबा कसा सिद्धीस जाणार ? याजकरितां स्वामींनीं (सदाशिवरावानें) श्री. नानास्वामींसुद्धां दिल्लीस यावें; आपलें कार्य मातबर, पात-

शाहांत व वजिरांत अनायासें ( कलागत ) लागली आहे. त्याजमुळें सरकारी कार्य जें म्हणावें तें होणार. द्रव्य, मुलूख घ्यावे. असा समय कधीं येणार नाहीं, आणि स्वामीखेरीज सरकारी कार्य मातबर होणार नाहीं. जालें तरी बंदोबस्त होणार नाहीं. असे पेंच आहेत. श्री. नानास्वामी व आपण बंदोबस्त करून जाल तरीच सरकारी कार्य होईल, आणि स्वामीचा हुकूम राहील ऐसें आहे. कितेक वर्तमान पत्रीं लिहितां नये. स्वामी सर्व जाणत आहेत.' इतकें कळकळीनें स्पष्ट लिहूनसुद्धां पेशव्यास उत्तरेंस स्वतः जाण्याची बुद्धि झाली नाहीं. हें भावी अनर्थाचें लक्षण समजलें पाहिजे. तसेंच मराठ्यांच्या फौजा पावसाळ्यांत देशास निघून जाण्याचा रिवाज कायम राहिल्यानें काय परिणाम होतो तेंही गोविंदपंतानें इषारा देऊन लिहिलें, 'हिंदुस्थान प्रांतीं हमेशा मातबर फौज पाहिजे, तरच बंदोबस्त राहील. बुंदेलखंडापासून अंतर्वेदीपावेतों रखवाली पाहिजे. मातबर जागा, रांगडे तेव्हांच फिसाद करितात. दिल्लींत बंदोबस्त नाहीं. तेथें गडबड झाली म्हणजे सर्व रजवाड्यांची नजर फिरते. दादास्वामीही देशीं जाणार, सरदारही समागमें जातील. आम्हांजवळ फौज नाहीं. हमेशा वीस हजार इकडे छावणी असावी. फौज येईल तेव्हांच बंदोबस्त करून आम्हीं देशास येऊं. सबब मातबर फौज अविलंबें सत्वर रवाना करावी. कैदेनें राहत, सरकारी कामावर चित्त देत, जागजागां गांव न लुटीत, असे लोक पाठवावे. नाहींतर नित्य लूट करितां हैराण करितात ऐसे न पाठविणें. हिंदुस्थान प्रांतीं फौज नसलिया बंदोबस्त रहाणार नाहीं, पैसा वसूल होणार नाहीं. हयगय जालिया फजिती आहे.' इतका जोराचा इषारा देऊन-सुद्धां पेशवा उत्तरेंत गेला नाहीं. त्यामुळेंच रघुनाथराव मागें फिरतांच अब्दालीनें हिंदुस्थानांत येऊन मराठ्यांनीं केलेली सर्व व्यवस्था उखडून टाकिली.

वर सांगितल्याप्रमाणें पेशव्यानें 'मातबर सरंजामानिशीं मारवाडांत जाऊन, साम दाम दंड भेद, युक्तीस पडेल तें करून शिंदे यांस काढून घेऊन येणें' अशी कामगिरी अंताजी माणकेश्वरास सांगितली. तेव्हां गोविंदपंतापासून वीस लाख कर्ज घेऊन फौजेची जमवाजमव करीत अंताजी निघाला. वाटेंत केरवली व बुंदीकोटा येथील फौजा राठोडांच्या मदतीस जात होत्या, त्यांस पैका भरून त्यानें मागें परतवलें. जयपूरचा माधवसिंग विजयसिंगास मदत करीत होता त्याचा मुलुख लुटून त्यास अंताजीनें तंबी पोहोंचवली. तसेंच त्याच वेळीं जयपूरचा सरदार अनिरुद्धसिंग याचें व शिंद्यांचें युद्ध चालत होतें त्यास अंताजी येतांच माधवसिंगानें परत बोलाविलें. पुढें सर्वांनीं विजयसिंगावर चढाई करून

त्याचा पराभव केला तेव्हां तो मराठे सांगतील तसा तह करण्यास तयार झाला. दत्ताजीच्या मनांत सर्व राज्य रामसिंगास मिळावें असें होतें पण अंताजीपंतानें सुचविलें कीं फार ओढून धरूं नये. तेव्हां राज्याच्या तीन वांटण्या करून एक मराठ्यांची, एक रामसिंगाची व एक विजयसिंगाची असें ठरलें. पेशव्यास दोन कोट नजर व खर्चाचे तीन कोट, मिळून पांच कोटीची निशा घेण्यांत आली. उत्तरेस नागोर येथें रामसिंगानें व दक्षिणेस झालोर येथें विजयसिंगानें राज्य करावें असें ठरून जोधपूर शिंद्याकडे राहिले. मारवाडांत मिळालेला सर्व मुलूख पेशव्यानें शिंद्याकडेच ठेविला. याच कारणावरून महादजी शिंदे पुढें या मुलखावर आपला हक्क सांगे.

या स्वारीमुळें मराठ्यांचें शौर्य, हिंमत, चिकाटी वगैरे गुण जितके निदर्शनास आले तितके दुसऱ्या स्वारींत क्वचितच दिसतील. शिंद्यांची कुचंबणा झाली ती फौज, पैसा, सामुग्री वगैरेंच्या मुळें. बाकी कुचराई अशी कोणींही केलेली नव्हती. स्वारींत शिंद्याकडचे सर्व सरदारांनीं जिवाची तमा न धरितां शिकस्त केली. पण पेशव्याकडून शिंद्याचा पाठपुरावा या युद्धांत होऊं शकला नाहीं किंवा शिंदेहोळकरांची चुरसही त्यास थांबवितां आली नाहीं. हें पानपतच्या अनर्थाचें पूर्वचिन्ह होय.

रजपूत लोक म्हणजे धर्मानें व जन्मानें मराठ्यांचे जातभाईच होते. विशेष जरूर नसतां पेशव्याचें कर्ज वारण्यासाठीं पैसे मिळवण्याच्या हेतूनें दुसरीं मोठीं व निकडीचीं कामें सोडून जयाप्पानें ही स्वारी निष्कारण हातीं घेतली. यांत मराठ्यांचा तर फायदा झाला नाहींच, उलट रजपूतमराठ्यांचें कायमचें वैर जुंपलें. स्वधर्मीयांवर शस्त्र धरल्यानें मराठ्यांच्या मूळच्या उच्च हेतूंचा विपर्यास झाला. रजपुतान्याच्या ऐवजीं प्रयाग, काशी वगैरे मुसलमानांच्या हातांतील क्षेत्रें सोडविण्याचें कार्य जयाप्पानें उचललें असतें तर मराठ्यांचें ब्रीद उत्तरेंतील हिंदूंच्या निदर्शनास आलें असतें. पानपतच्या प्रसंगांत रजपूत वगैरे उत्तरेंतील हिंदूंचें मराठ्यांस पाठबळ मिळालें नाहीं त्याची कारणपरंपरा या रजपुतान्यांतील स्वाऱ्यांत दिसून येईल.

## प्रकरण १४ वें.

# स्वकीयांचे विरुद्ध परकीयांची मदत.

नानासाहेब पेशव्यानें आपल्या कारकीर्दींत केलेल्या एका अक्षम्य चुकीचा इतिहास या प्रकरणांत द्यावयाचा आहे. मराठशाहीची पश्चिमबाजू जो समुद्र-किनारा, तिकडील रक्षणाचें काम आंग्र्यांनीं उचलिलें होतें. कान्होजी आंग्र्यानंतर त्याचे मुलगे सेखोजी व संभाजी यांनीं बापाचें काम पुढें चांगलें चालविलें. पण त्यांच्या मृत्यूनंतर मानाजी व तुळाजी आंग्रे या भावांत कलागती लागून पेशव्यानें मानाजीची बाजू घेऊन आंग्र्यांचा उत्तर कोंकणांतील बराच मुलुख हस्तगत केला. वसईच्या मोहिमेनंतर उत्तर कोंकणांत खुद्द पेशव्यांनीं आपला नवीन सुभा करून त्यांनीं थोडें आरमारही ठेविलें. कामाच्या सोईच्या दृष्टीनें पाहतां कोंकणचा सर्व किनारा ही राज्याची एक सरहद्द असल्यानें हा सर्व टापू एकाच माणसाच्या अधिकारांत असणें इष्ट होतें. पोर्तुगीज, इंग्रज, सीदी वगैरे आरमारी सत्तांना तोंड देऊन मराठशाहीचें एका बाजूनें रक्षण करण्यास आंग्र्याइतका अनुभवी व पराक्रमी सरदार दुसरा नव्हता; परंतु बाळाजी विश्वनाथापासून आंग्रे व पेशवे या घराण्यांचें फारसें सख्य नव्हतें. पेशव्याची हुकमत न मानण्याचा आंग्र्यांचा कल होता. तुळाजी आंग्र्यानें तर शाहूच्या पश्चात् नानासाहेबाचा अधिकार मुळींच न जुमानण्याचा क्रम चालविला. तुळाजी हा धाडसी, शूर व पराक्रमी होता. त्याच्या हाताखालीं अनेक कुशल युरोपीयन नोकर तोफखान्यावर व आरमारांत कामें करीत होते. शस्त्रास्त्रें, दारूगोळा व सैन्य या बाबतींतसुद्धां त्याची जय्यत तयारी होती. आपल्या अजिंक्य आरमाराच्या जोरावर इंग्रज, पोर्तुगीज, सीदी, झामोरीन वगैरे सर्व आरमारी सत्ताधीशांस तो धाकांत ठेवीत असे. सुरतेपासून तों कोचीनपर्यंतच्या पश्चिम किनाऱ्यावर त्याच्या आरमाराचा संचार असे. त्याचा दरारा इतका होता कीं, कोणतेंही परकी जहाज त्याच्या तडाख्यांत आल्यास त्यास सुटण्याची आशा नसे. अशा प्रबळ व कांहींशा क्रूर माणसाचा इंग्रज, सीदी वगैरेंनीं द्वेष करावा व त्यास बुडविण्याची वाट पहात असावें हें साहाजिक होतें. त्यांत पेशव्याचें व तुळाजीचें बरें नाहीं असें ऐकून इंग्रजांनीं पेशव्याच्या सरसुभेदाराकडे यासंबंधीं बोलणें सुरू केलें. रामाजी महादेव बिवलकर हा कारस्थानी व चळवळ्या गृहस्थ पेशव्यांचा कोंकणांतील सरसुभेदार होता. याचा वाडा अजून कल्याणास आहे. रामाजीपंत हा नानासाहेबाच्या

अत्यंत विश्वासांतला असून अनेक वर्षें हा कारभार करीत असल्यामुळें त्याची व इंग्रजांची चांगली घसण होती. याच वेळीं फ्रेंचांचें महत्त्व दक्षिणेंतून कमी करण्याचा पेशव्याचा प्रयत्न चालला होता. अर्थातच त्यांचे प्रतिपक्षी जे इंग्रज त्यांच्यांशीं दोस्ती ठेवणें रामाजीस इष्ट वाटलें. सुरतेच्या सीद्यास जिंकण्यासाठीं पेशव्यास इंग्रजांची मदत पाहिजे होती, व ती देण्याचें मुंबईच्या गव्हर्नरानें कबूलही केलें होतें. परंतु पेशव्याच्या अन्य व्यवसायामुळें सुरतेचा मामला मागें पडला, तरी रामाजी महादेवानें तुळाजीच्या विरुद्ध इंग्रजांशीं कारस्थान चालू ठेविलें होतें. या कामीं सालिना चाळीस हजार रुपये खर्चास देण्याचें कबूल करून रामाजीनें मानाजी आंग्र्याची मदत मिळविली. पेशव्यानें कोल्हापुरच्या संभाजीसही तुळाजीविरुद्ध आपणाकडे वळविलें होतें. इंग्रज व पेशवे यांचा रामाजीमार्फत तुळाजीस बुडविण्याचा करार ठरला, त्याच्या अटी येणेंप्रमाणें:—

१ उभयतांचें आरमार इंग्रजांच्या ताब्यांत असावें परंतु कारभार उभयतांच्या संमतीनें व्हावा.

२ तुळाजी आंग्र्याकडून जीं जहाजें काबीज करण्यांत येतील तीं इंग्रजमराठ्यांनीं निमेनिम वांटून घ्यावीं.

३ बाणकोट, हिंमतगड, व सावित्रीनदीच्या दक्षिण तीरावरील पांच गांवें मराठ्यांनीं इंग्रजांस कायमचीं द्यावीं.

४ पश्चिम किनाऱ्यावरून आंग्र्याची कोणत्याही किल्ल्यास समुद्रांतून मदत न जाईल असा बंदोबस्त इंग्रजांनीं ठेवावा.

५ आंग्र्याच्या मुलखांतील किल्ल्यांत जें द्रव्य, सामान, दारूगोळा, तोफा वगैरे सांपडेल तें सर्व मराठ्यांस देण्यांत यावें.

६ मानाजीच्या मुलखावर उभयतांनीं हल्ला केल्यास खांदेरी बेट व बंदर व कित्येक गांवें इंग्रजांस द्यावीं.

७ जरुरीप्रमाणें जास्त कलमें नानासाहेबाच्या संमतीनें ठरविण्यांत यावीं.

यासंबंधानें पेशवा व मुंबईचा गव्हर्नर रिचर्ड बूर्शीयेर यांजमध्यें दोन तीन वर्षें पत्रव्यवहार चालला होता. इंग्रजांकडून शिवाजी रणछोड म्हणून एक गृहस्थ पेशव्याकडे येत असे. सन १७५५ च्या आरंभीं नानासाहेबानें बूर्शीयेरला मद्रासचें आरमारही मुंबईस आणून ठेवावें असें सांगितलें. इंग्रजांनीं दर्यावरील सर्व व्यवस्था आपल्या ताब्यांतच राहिली पाहिजे असा आग्रह धरला होता. करारा-

प्रमाणें प्रथम सुवर्णदुर्ग ऊर्फ हर्णैचा किल्ला यावर स्वारी करावयाची होती. इंग्रजांनीं समुद्रांतून वेढा घालावा व मराठ्यांनीं जमिनीवरून त्यांजवर हल्ला करावा असें ठरलें. या ठरावाप्रमाणें आरमाराधिपति वुइल्यम जेम्स यास इंग्रजांनीं सुवर्णदुर्ग किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम केला. पेशव्याच्या आरमाराचा मुख्य नानापंत म्हणून इसम होता. स्वारीबरोबर रामाजीपंत होता. खुष्कीच्या मार्गानें मराठ्यांची फौज समशेरबहाद्दराच्या हाताखालीं पाठविण्यांत आली.

इंग्रजांचें आरमार तारीख २२ मार्च सन १७५५ रोजीं मुंबईहून निघालें तें दुसऱ्या दिवशीं राजपुरीजवळ आलें. त्या ठिकाणीं त्यांस तुळाजीचीं अठरा जहाजें दिसलीं. त्यांचा त्यांनीं पाठलाग करून त्यांस पिटून लाविलें. मागाहून पेशव्याचें आरमारही इंग्रजांस येऊन मिळालें. वाटेंत श्रीवर्धन वगैरे ठिकाणीं मुक्काम करीत दोनही आरमारें सुवर्णदुर्गास आलीं. सुवर्णदुर्गावर २९ मार्चला तोफांची सरबत्ती सुरू झाली. तेव्हां आंग्र्याचें आरमार जयगडास पळून गेलें. सुवर्णदुर्गावर मारा करण्यांत पेशव्यांच्या जहाजांनीं मुळींच मदत न करितां तीं मजा पहात राहिलीं, अशी पुढें इंग्रज अधिकाऱ्यांनीं तक्रार केली. इंग्रजांनीं एकट्यानेंच हल्ला सुरू ठेविला. तारीख ३ एप्रील रोजीं तोफेचा गोळा लागून किल्ल्यांतील दारूखाना उडाला, तेव्हां तेथील लोक सैरावरा पळूं लागले. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं तहाचें बोलणें सुरू केलें, व किल्ला सोडून जाण्याच्या अटीवर त्यांस जाऊं देण्यांत आलें. यानंतर रामाजीपंतानें तुळाजीचे इतरही किल्ले हस्तगत केले व रत्नागिरीस वेढा घातला. परंतु पावसाळा आल्यामुळें मोहीम तहकूब होऊन विजयदुर्गचा पाडाव पुढील वर्षावर गेला.

पुढें सन १७५६ च्या फेब्रुआरींत विजयदुर्गावर स्वारी झाली. या वेळीं ॲडमिरल वॉटसन् व कर्नल क्लाइव्ह यांच्या हाताखालीं मद्रासचें आरमार मुंबईकरांच्या मदतीस आलें होतें. हें आरमार फ्रेंचांचा मोड करण्यासाठीं मुद्दाम इंग्लंडाहून नुकतेंच आलें होतें. पण इकडे आल्यावर मद्रासेस इंग्रजफ्रेंचांचा तह झाल्याची वार्ता त्यांस समजली, तेव्हां रिकामें बसण्यापेक्षां कोठें कांहीं फायद्याची कामगिरी क्लाइव्ह शोधीत होता. त्यास ही विजयदुर्गची मोहीम आयतीच चालून आली. नोवेंबरपासूनच पेशव्याच्या फौजेनें खंडोजी माणकराचे हाताखालीं आंग्र्याचे मुलखांत शिरून विजयदुर्ग किल्ल्याभोंवतालचा बहुतेक प्रदेश काबीज केला होता. दुहेरी संकट पाहून तुळाजी आंग्र्यानें आपल्या बचावासाठीं रामाजीपंताकडे समेटाचें बोलणें सुरू केलें. पण गोडी झाली तर तुळाजी आपल्या हातीं

लागणार नाहीं, व पुनः त्याचा त्रास कायम राहील अशी दहशत इंग्रजांस होती. कोणीकडून तरी तुळाजीचा कांटा कायमचा निघावा अशी इंग्रजांची इच्छा होती. त्यामुळें रामाजीपंतानें तुळाजीशीं परभारें बोलणें चालवलेलें पाहून करार मोडल्याचें निमित्त करून इंग्रजांनीं विजयदुर्गावर स्वतःच एकदम हल्ला केला. इंग्रजांचा एक गोळा आंग्र्याच्या आरमारांत पडून त्यास आग लागली, त्यावरोबर आंग्र्यांचीं सर्व लढाऊ जहाजें जळून खाक झालीं. तारीख १३ फेब्रुआरी रोजीं इंग्रजांचे लोक कॅप्टन फोर्डच्या हाताखालीं किल्ल्यांत शिरले. किल्ल्यांतील पैसा पेशव्यांच्या हातीं लागूं नये म्हणून इंग्रजांनीं आपली एक तुकडी मराठ्यांस किल्ल्यांत शिरतांना प्रतिबंध करण्यासाठीं ठेविली व आंतील सर्व लूट ताब्यांत घेतली. त्या वेळीं तुळाजीनें अंधार कोठडींत ठेविलेले आठ इंग्रज, दोन स्कॉट आणि तीन डच गृहस्थ इंग्रजांस किल्ल्यांत सांपडले. या वेळीं आंग्र्यानें पुन्हां डोकें वर काढूं नये अशी शक्य ती तजवीज इंग्रजांनीं केली. तुळाजी मात्र इंग्रजांच्या हातीं लागला नाहीं. तो जाऊन खंडोजी माणकराच्या स्वाधीन झाला. विजयदुर्ग किल्ला पाहून त्याचा इंग्रजांस लोभ सुटला. बाणकोटच्या ऐवजीं हाच आमच्याकडे राहूं द्या असें नवीन बोलणें त्यांनीं सुरू केलें. परंतु पेशव्यानें तें मुळींच मान्य केलें नाहीं. नानासाहेबानें सहा महिने झाले तरी इंग्रज किल्ला सोडित नाहींत असें पाहून एक खरमरित पत्र पाठवून इंग्रजांस तंबी दिली. यावर गव्हर्नराकडून नरमाईचा जवाब पेशव्यास गेला, त्यांत पावसाळा संपल्यावर आपले लोक परत मुंबईस बोलावूं व किल्ला सोडून देऊं असें अभिवचन होतें. सावनूरच्या स्वारींतून परत आल्यावर पेशव्यानें इंग्रजांस पत्र लिहून अनेक भानगडींच्या निकालासाठीं त्यांचा वकील पुण्यास बोलाविला. सदाशिवरावाच्या मनांत पोर्तुगीजांवर स्वारी करून त्यांचा गोव्यासुद्धां प्रदेश काबीज करण्याचें फार होतें. त्यावरून पोर्तुगीजांनीं फोंडें येथील मराठ्यांच्या ठाण्यावर हल्ला केला. पण तेथें पोर्तुगीजांची धांदल उडून त्यांचा व्हॉइसराय मरण पावला. या वेळीं मराठे एकदम चालून जाते तर पोर्तुगीजांचा समूळ नाश झाला असता, परंतु दुसऱ्या भानगडींमुळें गोव्यावर जाण्यास सदाशिवरावास फावलें नाहीं. इंग्रजांचे वकील पुण्यास आले तेव्हां पेशव्यानें निजामाच्या राज्यांतून बुसीस हांकून देण्यासाठीं इंग्रजांची मदत मागितली, परंतु अशीच मागणी सलाबतजंगानें मद्रासकर इंग्रजांकडे केली आहे, म्हणून या गोष्टीचा जबाब आतांच देतां येत नाहीं, असें वकिलांनीं पेशव्यास सांगितलें. वास्तविक या वेळीं इंग्रजांची कलकत्त्यास फारच धांदल उडा-

लेली होती व कोणासच मदत करण्याचें इंग्रजांस सामर्थ्य नव्हतें. अशी बरीच बोलाचाली होऊन ता. १२ ऑक्टोबर १७५६ रोजीं अठरा कलमांचा लेखी ठराव उभयतांत झाला. एक महिन्याच्या आंत इंग्रजांनीं विजयदुर्ग सोडून द्यावा, बाणकोट वगैरे दहा गांव पेशव्यांनीं इंग्रजांच्या हवालीं करावे, पेशव्यानें मागील कांहींएक बाबतीबद्दल इंग्रजांकडे मागणी करूं नये, तुळाजी आंग्र्यास घाटाचे खालीं मुलूख वगैरे कांहीं देऊं नये, वगैरे कलमें या तहांत ठरलीं. तुळाजीस पेशव्यानें सहकुटुंब कैदेंत ठेवलें.

तुळाजी आंग्र्याचें नांव मराठ्यांच्या इतिहासांत चिरस्मरणीय झालें आहे. त्याच्यासारखे धाडसी व करारी पुरुष विरळा निपजतात. त्यानें आपल्या हयातींत इंग्रजांना सारखें थरकापांत ठेविलें. त्याचा कांटा काढून टाकणें एकट्या इंग्रजांस शक्य नव्हतें. तुळाजीसारखा पराक्रमी मोहोरा नानासाहेबासारख्या मनुष्य-स्वभाव जाणणाऱ्या पुरुषानें फुकट घालविला आणि राष्ट्रकार्यांत त्याचा उपयोग करून घेतला नाहीं, ही गोष्ट पेशव्याच्या कीर्तीस काळिमा लावते. एकवार तरी स्वतः भेट घेऊन त्याचें हृद्गत समजून घेणें हें मराठशाहीचा सर्वाधिकार चाल-विणाऱ्या पेशव्याचें कर्तव्य होतें. तुळाजी उद्दाम असेल, पेशव्याचा अधिकार मानीत नसेल, चित्पावन ब्राह्मणांचा त्यानें अतोनात छळही केला असेल, वगैरे सर्व गोष्टी खऱ्या मानूनही पेशव्याच्या वर्तनाचें समर्थन करतां येणार नाहीं. प्रति-निधि, दमाजी, रघूजी वगैरे व्यक्तींशीं ज्या तऱ्हेनं वागून पेशव्यानें त्यांचा समूळ नाश न करतां त्यांस राष्ट्रकार्यांत गोंवून घेतलें, तशी गोष्ट तुळाजीच्या बाबतींत झाली नसती असें वाटत नाहीं. पाश्चात्यांना आरमारी युद्धांत तोंड देऊन झगडणारा प्रथम कान्होजी व पुढें तुळाजी हे दोनच पुरुष हिंदुस्थानांत निर्माण झाले. अशा तुळाजीचा नाश इंग्रजांच्या काव्यास बळी पडून नानासाहेबानें केला हें त्याच्या मुत्सद्देगिरीस अत्यंत कमीपणा आणतें. शिवाजीनें प्रथमपासूनच दूरदृष्टीनें आरमार स्थापून जोरांत आणून ठेविलें, तें या कृत्यानें पेशव्यांनीं बुडविलें व मराठशाहीची एक बाजू कायमची लंगडी करून घेतली. असें नवीन आरमार पुनः तयार करणें त्यांस शक्य नव्हतें. मराठ्यांचें स्वातंत्र्य जाण्यास हीच गोष्ट मुख्यत्वें कारणीभूत झाली, यांत संशय नाहीं.

तुळाजीच्या नाशानंतर दोन वर्षांनीं फ्रेंच सरदार बुसी दक्षिणेंतून निघून गेला व त्यामुळें फ्रेंचांचें पारडें हलकें होऊन इंग्रजांची बाजू वर आली. बंगाल प्रांतांत मीरजाफरास नबाब करून व त्याच्या संरक्षणाची हमी आपणांवर घेऊन त्यांनीं

पर्यायानें बंगालप्रांत हस्तगत केला. त्यामुळें इतउत्तर इंग्रजांस पैशासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची जरूरी राहिली नाहीं. याच वेळीं क्लाइव्हसारखे महत्वाकांक्षी इसम त्यांजकडे आल्यामुळें त्यांनीं आपणास मिळालेल्या संधीचा शक्य तो फायदा करून घेतला. विजयदुर्गप्रकरणापासून इंग्रजांचे हेतूविषयीं नानासाहेबास शंका राहिली नव्हती. इंग्रजांस हाताशीं धरून आपण पोर्तुगीज व सीदी यांचा कांटा कायमचा काढूं अशी नानासाहेबास आशा होती. परंतु तुळाजीचा नाश झाल्यावरोवर इंग्रजांचा तोरा वाढला. सुरत शहर मराठ्यांनीं घेण्याचें आरंभिलें, तेथें इंग्रजांनीं आड येऊन त्यांचा हेतु सिद्धीस जाऊं दिला नाहीं. जंजिऱ्याचा हबशी जिंकून सबंध कोकणपट्टी मोकळी करण्याचा उद्देश पेशव्यानें मनांत आणला, त्यासही इंग्रज आडवे आले. ज्या रामाजीनें इंग्रजांची मदत तुळाजीविरुद्ध मिळविण्यासाठीं शिकस्त केली होती, तोच लिहितो, " सांप्रत इंग्रजांचे बखेडे यामुळें उरणपर्यंत जाणें प्राप्त झालें आहे. इंग्रजांची नजर फिरली आहे. त्यांचें पारिपत्य श्रीनें करावें, आपण प्रार्थना करावी. " म्हणजे मराठ्यांच्या हातून इंग्रजांचें पारिपत्य होणें अशक्य होऊन केवळ ईश्वरप्रार्थनेवरच अवलंबून राहण्याची दुबळी स्थिति त्यांस प्राप्त झाली.

तुळाजीची दहशत नाहींशी झाल्यावरोबर हबशास जोर चढला, व त्यानें मराठ्यांच्या प्रदेशांत स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. घाट चढून सचिवाच्या मावळांत सुद्धां त्यांनीं लुटालूट केली. तेव्हां सन १७५८ च्या आरंभीं जंजिऱ्यावर स्वारी करण्याचें पेशव्यानें ठरविलें. रामाजी महादेव, शंकराजी नारायण सचिव व माणकर या मंडळींस खुष्कीच्या मार्गानें पाठवून मानाजी आंग्र्यानें आरमाराची बाजू सांभाळावी असें ठरलें. हबशावरची ही मोहीम थांबत थांबत दोन वर्षं चालली होती. इंग्रजांची मदत हबशास असल्यामुळें त्याची बाजू पुनः पुनः सांवरली जाई. तरीसुद्धां उंदेरी किल्ला जिंकून मराठ्यांनीं हबशास जेर केलें, व जंजिऱ्यास कायमचा वेढा दिला. नानासाहेब स्वतः नोव्हेंबर १७५८ पासून फेब्रुवारीपर्यंत कोंकणांत होता. जंजिऱ्यास वेढा दिला होता तरी सीदी इब्राहिम रात्रीच्या काळोखांत चोर वाटेनें आपले लोक किनाऱ्यावर पाठवी आणि रयतेस भारी उपद्रव करी. मराठ्यांचा हुकूम कोणी मानला तर हबशी येऊन त्यांचीं घरेंदारें जाळी किंवा त्यांस जिवंत मारून टाकी. हबशाच्या जाचामुळें लोक भयभीत होऊन पळून जात. स. १७५८ सालीं मानाजी आंग्रे वारला, व त्याचा मुलगा रघूजी आंग्रे यास वजारतमाब हा किताब व सरखेल पद मिळालें.

त्यानें हवशाबरोबरच्या लढाईंत जोरानें सामना केला. उंदेरी व कांसा हे किल्ले त्यांच्याच मदतीनें काबीज झाले. मोहिमेचें आधिपत्य पेशवे आंग्र्यांस न देतां आपल्याच हस्तकास देत, यामुळें वैषम्य वाटून आंग्र्याकडून नेटानें काम तडीस लागत नसे. पानपतावरील संहारामुळें, पेशव्याचा कोंकणांतील हा उद्योग फुकट गेला. कारण, मराठ्यांच्या पराभवानें सीदी व इंग्रज यांनीं जोर करून पुनः पूर्वपदादर स्थिति आणली.

सन १७५९ सालीं पेशव्यांची सत्ता कळसास पोंचून मराठे हिंदुस्थानचे सार्वभौम होणार असा सुमार दिसूं लागला. तेव्हां त्यांच्याशीं गोडी राखण्याचे निमित्तानें पेशव्याचे आग्रहावरून मुंबईकर इंग्रजांनीं प्राइस नांवाचा आपला वकील पुण्यास पाठविला. त्याच्या भेटीच्या हकीकतीवरून मराठेइंग्रजांची सत्ता कोणत्या तोलांत होती हें समजतें. तुळाजी आंग्रे नाहींसा झाल्यापासून मुंबईकरांचा त्रास कायमचा चुकला. फ्रेंचांबरोबरच्या युद्धांत त्यांची बाजू वरचढ झाली. बंगाल प्रांतही त्यांच्या आटोक्यांत आला, तेव्हां ते मराठ्यांशीं नमून न वागतां दिमाख दाखवूं लागले. पुण्यास जातांना प्राइसनें करावयाच्या कामाची कलमवार यादी मुंबईच्या गव्हर्नरानें त्यास दिली, त्यांत १ नानासाहेब व सदाशिवराव यांच्यामध्यें विरोध उत्पन्न झाल्यानें जे दोन पक्ष पुण्याच्या दरबारांत आढळतील त्यांची बातमी काढणें, व आपणास कोण फायदेशीर होईल तें पाहाणें. २ आम्हीं जंजिरा काबीज करण्यास पेशव्यांस मदत दिली नाहीं, व हवशास दारूगोळा, अन्नसामुग्री वगैरे साहित्य पुरविलें, याबद्दल कारणें दाखवून पेशव्याची समजूत करणें. ३ नानासाहेबानें फ्रेंचांशीं संधान लावलें आहे त्याची बारकाईनें चौकशी करणें. ४ सुरतेवर स्वारी करण्याबद्दल पेशव्याचा काय मानस आहे तें काढणें. ५ आपला कायमचा वकील पुण्यास ठेवणें. ६ आपल्याकडील पळून गेलेल्या गुन्हेगार लोकांस परत आणण्याची खटपट करणें, वगैरे कामें सांगितलीं होतीं. कोणावरही विश्वास न ठेवतां, व शब्दास कोठेंही न गुंततां किंवा वर्दळीवर न येतां, आपले हेतु साधण्याचा इंग्रजांचा बेत होता. पेशवा व इतर दरबारी इसम यांस नजर म्हणून कांहीं चिजासुद्धां प्राइस बरोबर पाठविल्या होत्या. सीदीबद्दल त्यांनीं असं कळविलें कीं, तो आमचा पूर्वापार स्नेही आहे. त्याच्यावर शस्त्र धरणें आम्हांस शक्य नाहीं, मात्र आम्ही होऊन कोणाचेही तर्फे युद्धांत पडूं इच्छित नाहीं, पण आमच्या वाटेस कोणी गेलें तर त्याच्याशीं दोन हात करण्यास आमची तयारी आहे. सीदीस साहित्य पुरविलें त्याचा खुलासा असा कीं, मुंबईच्या बाजारांत कोणासही

जिन्नस खरेदी करण्यास मोकळीक आहे, मराठे आले तर त्यांसही आम्ही जिन्नस विकूं. व्यापार हा आमचा धंदा आहे. उलटपक्षीं मराठे मात्र आम्हांस आपल्या मुलखांत नानातऱ्हेचा उपद्रव देतात, आमचीं जहाजें अडकवून ठेवितात, व आपल्या मुलखांतून मजूर वगैरे मुंबईंत येऊं देत नाहींत. फ्रेंचांच्या कारस्थानाबद्दल इंग्रजांस असें कळलें होतें कीं, फ्रेंचांनीं जंजिरा काबीज करण्यास पेशव्यास मदत करावी म्हणजे मुंबई काबीज करावयास पेशवे फ्रेंचांस मदत करतील, असा तह घाटत आहे; त्याबद्दलचा जाब पेशव्यास विचारणें, व त्यास थोडीशी तंबी देणें हीं कामें प्राइसला सांगितलेलीं होतीं. सुरतेबद्दल इंग्रजांनीं असा डाव काढला कीं, बादशहाच्याच हुकमानें आम्हीं सुरतेचे अधिकारी झालों आहों. नानासाहेब ज्याप्रमाणें बादशाही फर्मानें दाखवून प्रांत जिंकतो त्याचप्रमाणें सुरतेबद्दल आम्हांस बादशहाचा हुकूम मिळाला आहे. तेव्हां जर पेशव्याच्या हुकमानें गायकवाड किंवा इतर कोणी सरदार सुरतेवर येईल, तर आमच्या फौजेला मराठ्यांशीं युद्ध करणें भाग पडेल. अर्थात त्याचे जे परिणाम होतील ते भोगण्यास पेशव्यानें तयार असलें पाहिजे. अशी सूचनावजा धमकी देण्यासही प्राइसला सांगितलेलें होतें.

प्राइस ता. २४ आगष्ट १७५९ रोजीं मुंबईहून निघून ता. ४ सेप्टेंबर रोजीं पुण्यास पोंचला. नानासाहेबानें प्राइसची भेट घेतली, परंतु कामासंबंधानें तो स्वतः कांहींच बोलला नाहीं. मात्र आपला हेतू खासगी कारभारी गोविंद शिवराम याच्याकडून त्यानें प्राइसच्या कानावर घालविला. गोविंद शिवरामनें इंग्रजांनीं सुरत सोडून द्यावी आणि जंजिरा काबीज करण्यास मदत करावी, हे दोन मुख्य मुद्दे मांडले, ते प्राइसनें साफ नाकबूल केले. गोविंद शिवरामनें जरा दम दिला, त्यासही तोडीस तोड देऊन प्राइसनें नरम केलें. इंग्रज व मराठे यांनीं एकमेकांचे शत्रू व मित्र असतील ते आपलेही शत्रु व मित्र समजावे असा करार करण्यास इंग्रज तयार झाले नाहींत. पेशव्यानें प्राइसला कळविलें कीं, जर सीदीला जिंकण्यास तुम्ही आम्हांस मदत करीत नाहीं, तर आमचीही तुमच्याशीं कांहीं संबंध ठेवण्याची इच्छा नाहीं. अर्थात् अशी गोष्ट शक्य नसल्यामुळें प्राइसच्या वकिलातीचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

## प्रकरण १५ वें.

# हिंदुपद्पातशाहीची सिद्धता.

शिवाजी महाराजांच्या वेळेपासून मराठ्यांचें धोरण या देशांत हिंदूंची सार्वभौम सत्ता स्थापण्याचें होतें. शिवाजीचा दृष्टिक्षेप दक्षिणेस जिंजीपासून उत्तरेस आग्रा, दिल्ली, मथुरा, बनारसपावेतों वाढलेला होता. चौथाई सरदेशमुखीच्या द्वारें महाराष्ट्राबाहेरील प्रदेश स्वसत्तेच्या आटोक्यांत आणण्याची सोय शिवाजीनेंच करून ठेविली होती. रजपूत राजांशीं स्नेह ठेवून, स्वधर्मसंरक्षणाकरितां सर्व हिंदूंनीं एक होण्याची जरूर केवढी आहे ही गोष्ट शिवाजीनें आपल्या राजकीय पत्रांतून व्यक्त केलेली आहे. जसवंतसिंग, जयसिंग, छत्रसाल, कुत्बशाहीचे चालक आकण्णा मादण्णा, मालोजी घोरपडे व तंजावरचा कारभारी रघुनाथ पंडित हणमंते, इत्यादिकांशीं शिवाजीनें केलेले व्यवहार पाहिले म्हणजे त्याच्या अंतिम ध्येयासंबधानें संशयच राहत नाहीं. त्यानें औरंगजेबास लिहिलेल्या पत्रांतही हाच उद्देश व्यक्त होतो. शिवाजीचा हा वाढता उद्योग व मराठे लोकांच्या अंतर्यामींचा जोम ओळखूनच औरंगजेबास तरी केवळ स्वराज्य संरक्षणार्थ आपल्या सर्व बादशाहीचें सामर्थ्य पंचवीस वर्षें पावेतों मराठ्यांवरच योजावें लागलें. मराठ्यांस कायमचे ठेंचण्यासाठींच त्या धूर्त बादशहानें विजापुर गोंवळकोंड्याचीं राज्यें पादाक्रांत करून संभाजीचा उच्छेद केला. परंतु एवढ्या सर्व संकटांतून मराठ्यांनीं आपलें तेज कायम ठेवून शेवटीं बादशहावर मात केली, यांतच हिंदुपद्पातशाहीचा त्यांचा उद्देश सिद्ध होतो.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लवकरच सर्व रजपूत राजांनीं सांवर येथें मोठें संमेलन भरवून मोगल बादशाहीशीं चालत आलेला सेव्यसेवकभावाचा संबंध उघडपणें तोडून टाकिला. पुढें बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाल्यावर त्यानें तरी ठिकठिकाणच्या हिंदु सत्तांस एकवट करून महाराष्ट्रधर्माच्या भावनेवर पुढील राजकारणांत मराठ्यांना पुढारपण मिळण्याची योजना केली, आणि शंकराजी मल्हारामार्फत चालून आलेल्या सय्यदबंधूंच्या कारस्थानाचा फायदा घेऊन दिल्लीच्या मध्यवर्ती कोठारावर पहिला आघात दिला. तोच उद्योग पुढें बाजीरावानें सर्व दिशांस वाढवून वीस वर्षांच्या आपल्या कर्तबगारीनें हिंदुस्थानांतील यच्चयावत् सत्ताधीशांस मराठ्यांच्या सत्तेपुढें नम्र होण्यास शिकविलें. बाजीराव व सवाई जयसिंग यांचा दृढ स्नेह असून उभयतांच्या व्यवहारांत हिंदुधर्मभावना

चांगलीच झळकत राहिली. निजाम, सीदी, पोर्तुगीज, माळव्यांतील गिरिधर बहादर व महंमदखान बंगश, कर्नाटकांतील अनेक मुसलमान नवाब या सर्वांबरोबर मराठ्यांचे अनेक निकराचे संग्राम होण्याचें प्रयोजन, मोगल बादशाहीस टेंका देणाऱ्या या शत्रूंस नरम करणें एवढेंच होतें. बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा नानासाहेब पेशवाईवर आला, त्यानें आपली नजर सर्व हिंदुस्थानभर फिरती ठेवून निरनिराळ्या हस्तकांकरवीं हिंदुपदपातशाहीचा उद्योग विशेष निकरानें व धूर्तपणानें पुरा करीत आणिला. शाहू छत्रपतीच्या पश्चात् नानासाहेबाचेच हातीं सर्व सत्ता येऊन, त्याला हें पूर्वीचें धोरण जास्तच त्वरेनें पुढें चालवितां आलें. या गोष्टीस मुख्य बळ फौजेचें. गनिमी काव्याची पूर्वीची पद्धत आतां निरुपयोगी ठरून इंग्रज फ्रेंचांच्या कर्नाटकांतील झगड्यांनीं पाश्चात्य कवाईत व पाश्चात्य तोफा यांचा प्रभाव नानासाहेबास चांगलाच कळून आला. त्यासाठीं फ्रेंच सेनापति बुसी यास आपल्यापाशीं नोकरीस ठेवण्याचे इलाज नानासाहेबानें करून पाहिले; पण ते सिद्धीस गेले नाहींत. बुसीचा मुख्य आधार पांदिचरीच्या फ्रेंचांकडून असून, पूर्व किनाऱ्यावरील निजामाच्या ताब्यांतील प्रदेश हस्तगत करणें फ्रेंचांच्या सत्तेस फायदेशीर होतें. शिवाय निजामशाहींतील अव्यवस्थेचा उपयोग जसा बुसीस होणारा होता, तसा वर्चस्वेच्छु मराठ्यांच्या नोकरींत राहून होणारा नव्हता. नानासाहेबास तरी बुसीचा शिरजोरपणा टाळून फौज तयार करून तोफखाना स्वतंत्र निर्माण करावयाचा होता. तेव्हां बुसीनें आपल्या हाताखालीं मुजफरखान, इब्राहीमखान वगैरे जे गार्दी सरदार तयार केले, त्यांसच नोकरींत घेऊन आपलें काम पेशव्यास भागवावें लागलें. मात्र हेसुद्धां एक प्रकारचे परकी व भाडोत्रीच होत. त्यांजवर विसंबून निर्धास्त राहणें पेशव्यांस इष्ट नव्हतें. ब्राह्मण अगर मराठे गोलंदाज बुसीनें किंवा नानासाहेबानें कां तयार करविले नाहींत तें समजत नाहीं.

हिंदुपदपातशाहीच्या वरील भावनेंत नानासाहेबाच्या सर्व मोहिमा व उलाढाली उपस्थित झाल्या. त्याचा प्रत्यक्ष शेजारी निजाम यास सर्वथा उखडून दक्षिण मोकळी करणें हा पहिला उद्योग सिद्धीस नेतांना त्याला जे नानाप्रकारचे डावपेंच करावे लागले, त्यांचें वर्णन आतां पुढें द्यावयाचें आहे. दुसरा मोठा उद्योग थेट दक्षिण पावेतों कर्नाटकचा सर्व भाग स्वसत्तेखालीं आणण्याचा. हे दोनही कार्यभाग स. १७६० पावेतों बहुतेक सिद्धीस गेले. तिसरा कार्यभाग उत्तर हिंदुस्थानांतला शिंदे होळकरांस सुप्रत केलेला असून त्याकरितां रघुनाथरावाची

नेमणूक होती. आतां हें सूत्र ध्यानांत ठेवून पुढें या प्रकरणांचे तपशील शक्य तितक्या संकोचानें द्यावयाचे आहेत.

भालकीच्या तहानंतर नानासाहेब सन १७५२ च्या जानेवारींत कर्नाटकच्या स्वारीस निघून गेला. तहांत सलाबतजंगानेंही कर्नाटकांत येण्याचें कबूल केलें होतें, परंतु बुसी त्यास घेऊन हैदराबादेस निघून गेला. फ्रेंचांचा पगडा निजामावर कायम ठेवावयाचा तर त्यास जुनी राजधानी औरंगाबाद येथून शक्य तितकें दूर नेणें इष्ट, या विचारानें बुसीनें हैदराबाद येथूनच कारभार चालवण्याची निजामास सल्ला दिली. औरंगाबाद हें महाराष्ट्रांत व पुण्यास जवळ असल्यामुळें निजामाच्या राजकारणांत मराठ्यांचा पगडा त्याजवर विशेष असे. तसेंच जुनीं मुसलमान सरदार घराणींही तेथेंच राहाणारीं होतीं. त्यांच्यांतून सुटून फ्रेंचांच्या पांदिचरीच्या पायाजवळ शक्य तितकें जावें हा बुसीचा हेतु होता. यानंतरच्या सहा वर्षांत निजामाच्या दरबारीं बुसीचें वर्चस्व राहून त्याच्या अनुरोधानें सर्व कारस्थानें चालूं लागलीं.

नानासाहेब पेशव्याच्या करामतींत कर्नाटकांतील त्याच्या कामगिरीस अग्रस्थान देण्यांत येतें. मराठशाहीचा सामान्य फैलाव जरी त्याच्या दृष्टीसमोर नेहमींच होता तरी बाजीरावाची नजर जशी उत्तरेकडे तशी नानासाहेबाची दक्षिणेकडे असे. राज्यकारभाराच्या दृष्टीनें हें व्यंगच होय. एकाच बाजूस दृष्टि ठेवून चालकांचें भागत नसतें. म्हणून बाजीरावानें दक्षिणेकडे लक्ष न दिल्यानें जसें नुकसान झालें तसेंच नानासाहेबाच्या उत्तरेकडील कारभारासंबंधीं झालें असें म्हणावें लागतें. प्रतिनिधि, बारामतीकर, पुरंदरे, पटवर्धन इत्यादिकांच्या संसर्गानें त्याची दृष्टि कर्नाटकाकडे वळली व तिकडील व्यवहारांचें महत्व, वाकबगारी व आवड त्याच्या मनांत विशेष ठसली, तशी ती उत्तरेंतील कारस्थानांबद्दल उत्पन्न झाली नाहीं.

नानासाहेब भालकीहून परस्पर कर्नाटकांत निघाला तो जानेवारीच्या आरंभीं रायचुराजवळ कृष्णा उतरून श्रीरंगपट्टणास गेला. तेथें खंडणी घेऊन ता. २० मार्च रोजीं तो परत फिरला. येतांना त्यानें होळेहुन्नूर व धारवाड येथील किल्ले हस्तगत केले. या स्वारींत सदाशिवराव, रामचंद्रबाबा, कोन्हेर त्रिंबक वगैरे इसम पेशव्याबरोबर होते. म्हैसूर, बिदनूर, सावनूर, सोंधें वगैरे संस्थानांतून त्यांनीं खंडण्या सूल केल्या. जूनच्या शेवटीं पेशवा परत पुण्यास येऊन पोहोंचला.

बुसी हैदराबादेस गेल्यावर आजारी पडून आरामासाठीं त्यास समुद्रकिनारीं मच्छलिपट्टणास जावें लागलें. तेव्हां मागें दिवाण सय्यद लष्करखान यानें त्याचें अजिबात उच्चाटन करण्याचें कारस्थान चालविलें. फ्रेंचांची नवीन तऱ्हेची कवायती फौज ठेविलेली होती तिला महिन्याच्या महिन्यास रोख तनखा द्यावा लागत असे. परंतु बुसी गेल्यावर तिचा पगार खानानें दिला नाहीं त्यामुळें ती विथरली. पेशव्याविरुद्धही खानाचें कारस्थान चालू झालें. ‘ मागील महिन्यांत फार गलवला होता कीं, सल्ला बिघडतो. जानोजी निंबाळकर व हणमंतराव निंबाळकर व चंद्रसेनाचा लेक, असे एकमत झाले. असे मिळोन पेशव्याशीं बिघाड करावा. शिंदेहोळकर वगैरे फितव्यांत आहेत. अवघ्यांचे वकील आले आहेत. होळकराकडे मोगलांकडून वकील आले आहेत ’ अशी बातमी होती. इतक्यांत बुसी सप्टेंबरांत परत आला व त्यानें पेशव्यास पत्रें पाठवून त्याशीं संधान जोडण्याचा प्रयत्न चालविला. मराठेफ्रेंचांनीं निजामास आंवळावें असा हा डाव होता. आपल्या सैन्याचा पगार अतःपर दुसऱ्यावर अवलंबून नसावा या हेतूनें बुसीनें निजामाकडून उत्तरसरकार प्रांत फौजेच्या खर्चास लावून घेतला. याच सुमारास दक्षिणेस फ्रेंचांनीं त्रिचनापल्ली हस्तगत केली, त्यामुळें फ्रेंचांचा दरारा कर्नाटकांत वाढला. मच्छलिपट्टणचा माजी कारभारी हैदरजंग याचें साह्य बुसीस होतें. बुसीनें सलाबतजंगास सांगून सय्यद लष्करखानास रजा देवविली व शहानवाजखानास दिवाणी दिली.

सन १७५४ च्या आरंभीं पेशव्यानें कर्नाटकची दुसरी स्वारी केली. या स्वारींत बागलकोट, कोपळ, होसकोट, हरिहर, बेदनूर वगैरे ठिकाणांहून खंडणी घेऊन तो कोल्हापुरास आला. तेथें संभाजी व त्याची बायको जिजाबाई यांशीं त्यानें सख्य जोडून कोल्हापुरचें राजकारण आपल्याशिवाय होऊं नये अशी योजना ठरविली. जमखिंडी, तेरदाळ, अथणी वगैरे परगणे कोल्हापुरकरांचे होते ते या वेळीं पेशव्यास मिळाले. या स्वारींत यशवंतराव दाभाडे सेनापति पेशव्याबरोबर होता तो परत येतांना मिरजेस वारला. परत आल्यावर सेप्टेंबरांत दादोबा प्रतिनिधि वारला. त्यांच्या जागीं अनुक्रमें त्रिंबकराव व भवानराव यांस तीं पदें देण्यांत आलीं.

या वर्षी डुप्लेविरुद्ध फ्रान्सांत काहूर उठून त्यास परत स्वदेशीं जावें लागलें. त्याच्या जागीं गोदेहू नांवाचा गृहस्थ नेमून आला. त्याच्या आंगीं डुप्लेची मुत्सद्देगिरी व महत्त्वाकांक्षा नव्हती. त्यामुळें फ्रेंचांचें वजन इकडे कमी झालें, व तित-

कीच इंग्रजांची बाजू सांवरली. म्हैसूरच्या नंदिराजाचें साह्य घेऊन नबाव महंमदअल्लीनें त्रिचनापल्ली परत मिळविली. तो तिकडे गुंतला आहे ही संधि पाहून पेशव्यानें कर्नाटकांत पुनः स्वारी करून १७५५ च्या आरंभीं खंडणी वसूल केली. या स्वारींत पेशव्याच्या तोफखान्यावर मुज्फरखान नांवाचा गारदी होता त्याचें व महादोबा पुरंदरे याचें भांडण होऊन खान पेशव्यास सोडून सावनूरच्या नबाबाच्या नोकरीस गेला, आणि तोफा ओतवून व कवायती फौज तयार करून त्यानें त्या नबाबाची बाजू मजबूद केली. हा नबाब आधींच निजाम व पेशवे या उभयतांस डोईजड झाला होता. त्यांत आतां मुज्फरखानास त्यानें तोफखान्यावर ठेविलें, तेव्हां सावनूरवर स्वारी करणें पेशव्यास जरूर झालें.

सन १७५५ च्या आक्टोबरांत नानासाहेबानें सावनूरच्या नबाबावर मोहीम केली. या मोहिमेंत मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, जानोजी व मुधोजी भोसले वगैरे मोठमोठे सरदार होते. मुज्फरखानाच्या तोफखान्यास तोंड देण्यासाठीं पेशव्यानें निजामाशीं गोडी करून बुसीसह त्यालाही मोहिमेवर बोलाविलें. मुज्फरखान सावनूरचे नबाबाजवळ चाकरीस राहिला, त्यास बऱ्या बोलानें परत द्यावा अशी पेशव्यानें मागणी केली, ती अमान्य केल्यामुळें मराठी फौजा सावनुरावर चालून आल्या. सावनूरकरास कडाप्पा कर्नूळ येथील नबाब व मुरारराव घोरपडे यांचें साह्य होतें. या युद्धांत तोफखाना व गाडदी यांजवरच पेशव्याची मुख्य भिस्त होती. मुज्फरखानानें अतिशय कौशल्यानें मराठ्यांस तोंड देऊन तीन महिने सावनूर झुंजविलें, पण बुसीच्या तोफखान्यानें त्याजवर असा मारा केला कीं, तो टेंकीस आला. पुढें तह होऊन सावनूरकराचें बहुतेक राज्य पेशवे निजामांनीं वांटून घेतलें. यानंतर हरपनहल्ली, चित्रदुर्ग, बिदनूर, सोंधें वगैरे ठिकाणच्या झाडून सर्व संस्थानिकांकडून मराठ्यांनीं खंडण्या घेतल्या. या युद्धानें पेशव्यांची हद्द कृष्णेवर होती ती तुंगभद्रेवर गेली. जिंकलेल्या मुलखाच्या रक्षणासाठीं पटवर्धनांची स्थापना या प्रांतीं करण्यांत आली. सावनूरच्या या मोहिमेचा तत्कालीन पत्रांत मोठा बडेजाव केलेला आढळतो. परंतु मराठ्यांकडील सरदारांची व फौजेची संख्या पाहिली म्हणजे त्याबद्दल कौतुक वाटण्याचें कारण राहत नाहीं. त्यांतही निजाम बुसी मदतीस आले, तेव्हांच सावनूर सर झालें. बुसीच्या मदतीवांचून मुज्फरखान हार गेला असता कीं काय याची शंका आहे. एवढ्या खटाटोपाचा परिणाम मात्र अल्प झाला. मोहिमेनंतर मुज्फरखान पुनः पेशव्यांकडे नोकरीस राहिला.

सावनूरच्या मोहिमेनंतर निजामाचें राजकारण पुनः रंगास चडलें. सावनुरावरून परत जातांना दिवाण शहानवाजखानानें कारस्थान करून निजामाकडून बुसीला रजा देवविली. पेशव्याचा प्रयत्न बरेच दिवसांपासून बुसीस आपल्या चाकरीस ठेवण्याचा होता, परंतु या वेळीं ती गोष्ट घडली नाहीं. शहानवाजखानानें बुसीला रजा दिल्यानंतर त्यानें निजामाचे मदतीसाठीं मद्रासकर इंग्रजांकडे फौजेची मागणी केली होती. बुसी निजामाचा निरोप घेऊन निघाला तरी दक्षिण सोडून जाण्याचा त्याचा विचार नव्हता. त्यानें गुप्तपणें सैन्य नोकरीस ठेवून कुच केलें व हैदराबादेजवळ चारमिनार नांवाच्या ठिकाणांत तो बंदोवस्तानें राहिला. निजामानें चंद्रसेनाचा मुलगा रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर यांस बुसीच्या पाठीवर पाठविलें होतें, परंतु बुसीनें त्यांस फोडून आपल्याकडे वळविलें, आणि मच्छलीपट्टणाहून नवीन मदत मागितली. ती लॉ याच्या हाताखालीं लवकरच आली, तेव्हां बुसीस जोर आला. या प्रसंगीं निजाम व बुसी दोघेही पेशव्याकडे एकमेकांविरुद्ध कुमक मागत होते, परंतु पेशवा दोन दगडींवर हात ठेवून काय प्रकार होतो तो पाहत होता. मद्रासकर इंग्रजांकडून मागितलेली मदत निजामास आली नाहीं, तेव्हां सलाबतजंगास बुसीची समजूत करून पुन्हा आपल्या नोकरींत ठेवणें भाग आलें. बुसीस घालविण्याची खटपट मुज्फरखानाच्या वळावर शहानवाजखानानें सुरू केली होती, परंतु शहानवाजखानाविरुद्ध बुसीचा हस्तक हैदरजंग यानें नवीन कारस्थान चालू केलें. हैदरजंगाचा बेत स्वतःच निजामाचा दिवाण व्हावें असा होता, परंतु पेशव्याचा जोर शहाजवानखानास असल्यामुळें तो तडीस गेला नाहीं. निजामापाशीं आपली सर्व व्यवस्था लावल्यावर बुसी सन १७५६ च्या अखेरीस उत्तरसरकार प्रांतांत गेला. त्या वेळीं बंगाल्यांतून सिराजउद्दौल्याचें बोलावणें बुसीस आलें होतें. इतक्यांत इंग्रज फ्रेंचांचें युद्ध सुरू होऊन चंद्रनगर इंग्रजांनीं काबीज केल्याचें वर्तमान बुसीला समजलें. त्यावरून इंग्रजांचें ठाणें विशाखापट्टण हें बुसीनें लगोलग हल्ला करून घेतलें. इतक्यांत मागें सलाबतजंगाचे भाऊ निजामअली व बसालतजंग व दिवाण शहानवाजखान या तिघांनीं कारस्थान रचून फ्रेंचांस काढून टाकण्याची सिद्धता केली. पेशव्यानें निजामाच्या राज्यांतील गोंधळाचा फायदा घेऊन नवीन मुलूख जिंकण्याचा विचार केला. फ्रेंचांस जसा उत्तरसरकार प्रांत मिळाला तसा आपणांसही एखादा प्रांत मिळावा अशी पेशव्याची इच्छा होती. पेशव्याचे चिथावणीवरून जानोजी भोसल्यानें उत्तरेकडून निजामास त्राहि त्राहि करून सोडलें. पेशव्याचाही बेत निजा-

मावर स्वारी करण्याचा होता. पण सावनूरच्या मोहिमेनंतर रघुनाथराव व होळकर उत्तरेंत रवाना झाले, आणि दत्ताजी शिंदे मारवाडच्या स्वारींतून परत येऊन परत येऊन पोंचला नव्हता, म्हणून पेशवा त्याची वाट पहात होता. पेशव्यास तोंड देण्यासाठीं सलावतजंगानें उत्तरसरकार प्रांतांतून बुसीस परत बोलाविलें. तो सन १७५७ च्या सेप्टंबरच्या अखेरीस हैदराबादेस येऊन दाखल झाला. बसालतजंग व निजामअली या दोघां भावांचें सलावतजंगाशीं भांडण लागलें. त्या भांडणांत फायदेशीर होण्यासारखी दिसेल ती बाजू आपण उचलून आपला फायदा करून घ्यावा असा पेशव्याचा घाट होता. बसालतजंगानें पेशव्यास अहमदनगर व पंचवीस लाखांची जहागीर देण्याचें कबूल केलें; तसेंच शहानवाजखानास दौलताबादेसह चार लाखांची जहागीर देण्यास तो कबूल झाला. हीं कारस्थानें ऐकून सलाबतजंगानें आपला कारभार भाऊ निजामअली यासच सांगितला. निजामअलीचा दिवाण विठ्ठल सुंदर हा फार हुशार व धूर्त होता. स्वतः निजामअली हैदराबादची गादी बळकावूं पाहत होता तरी, एकदम तो बेत सिद्धीस जाण्यासारखा नाहीं हें जाणून, धूर्तपणानें त्यानें तूर्त सलावतजंगाचा कारभार तेवढा हातांत घेतला. त्याला अडचण बुसीची होती. आपली बाजू मजबूद करण्यासाठीं त्यानें बुसीजवळच तयार झालेल्या इब्राहिमखान गारद्यास नोकरीस ठेवलें. गारदी हे बंदुक मारणारे कवायती पायदळ शिपाई. यांतील लोक मराठ्यांच्या फौजेंतील लोकांप्रमाणें हंगामी नसून त्यांचा पगारही महिन्याच्या महिन्यास रोख द्यावा लागे. त्या काळीं रोख पगार देणें कठीण असल्यामुळें, सरदारांस जहागिरी देऊन तिच्या वसुलांत त्यांनीं हवी तशी शिपायांची समजूत करावी अशी रीत असे. अनियमित वसूल व उत्पन्न असणाऱ्यांस गारदी आपल्या नोकरीस ठेवणें शक्य नसे. त्यामुळें एखादे प्रसंगीं आयत्या वेळीं सैन्य मिळणें त्यांस कठीण पडे.

सलावतजंग हा केवळ बुसीच्या मदतीवर निजामी संभाळून होता. तो हैदराबादेकडे असून आपल्या हातांत पुनः अधिकार कसा येईल हें पाहात होता. बुसीस रजा देतांना शहानवाजखानानें इंग्रजांची मदत येईल असें सांगितलें होतें, ती न आल्यामुळें बुसीचें पारिपत्यही झालें नाहीं, पण सलावतजंग मात्र अधिकार गमावून उघडा पडला. रामचंद्र जाधवानें बुसीस अडविलें नाहीं म्हणून सलावतनें शहानवाजखानाचे विचारें त्याची जहागीर जप्त केली. त्यामुळें तोही सलावतच्या विरुद्धच होता. सलावतजवळच्या फौजेनें पगार तुंबल्यामुळें धरणें घेतलें, त्यांची

समजूत खानास करितां आली नाहीं. उलट हिशेबासंबंधानें खानावर तोहमत आली होती. कठिण प्रसंग पाहून शहानवाज पळून दौलताबादेस जाऊन बंदोबस्तानें राहिला. सलाबतनें त्यास भेटीस बोलाविलें पण तो आला नाहीं. उलट त्यानेंच निजामास किल्ल्यावर बोलाविलें. पण दगा आहे असें कळल्यावरून सलाबत त्याचे भेटीस गेला नाहीं. तेव्हां निजामअलीनें दौलताबादेस वेढा दिला. हें पाहून शहानवाजनें पेशव्यास आपल्या मदतीस बोलाविलें. आपल्या म्हणण्याप्रमाणें जहागीर मिळत नाहीं याचा राग पेशव्यास होताच. त्यानें दत्ताजी व जनकोजी शिंदे मारवाडांतून परत आले होते त्यांस मोठेपणा देण्यासाठीं विश्वासरावास बरोबर देऊन निजामावर पाठविलें. या वेळीं विश्वासरावाचें वय केवळ सोळा वर्षांचें होतें. त्या काळीं पराक्रमक्षेत्राचे दरवाजे खुले असल्यामुळें किती लहान उमरीचीं माणसें केवढे कारभार करीत हें पाहून आश्चर्य वाटतें.

या वेळीं सलाबतजंग व बसालतजंग यांस पेशव्याशीं कुरापत काढण्याची इच्छा नव्हती तरी निजामअली, विठ्ठल सुंदर व इब्राहिमखान यांनीं पेशव्याच्या फौजेची खोड मोडण्याची तयारी केली. पेशवा जो मुलूख मागत होता तो देण्याचें त्यांनीं नाकबूल केलें आणि विठ्ठल सुंदरानें कर्ज काढून सैन्याची तात्पुरती समजूत केली. ता. २२ ऑक्टोबर १७५७ रोजीं मराठे औरंगाबादेजवळ येऊन निजामाच्या सैन्यापुढें उभे राहिले. या स्वारींत विश्वासराव, दत्ताजी व जनकोजी शिंदे, गायकवाड, गोविंद हरी पटवर्धन, पुरंदरे, फडणीस वगैरे मंडळी होती. निजामाचें सैन्य लढाई देईना तेव्हां मराठ्यांनींच त्याजवर चाल केली. जानबा निंबाळकरावर दत्ताजी, व्यंकटरावावर जनकोजी, व बाकींच्यावर विश्वासराव, असे चालून गेले. व्यंकटराव निंबाळकराची बहिण जनकोजीस दिलेली असून जनकोजीचा साडू नागोजीराव माने हाही निजामाच्या सैन्यांत या वेळीं होता. पण ‘ सोयरे झाले तरी जेवणापुरते, क्षात्रधर्मास अंतर करितां येत नाहीं ’ हें जाणून शिंद्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. लढाईंत नागोजी माने गोळी लागून ठार झाला, निजामाचा मोड झाला, व सगळे निजामबंधू औरंगाबादेंत कोंडले गेले. तेव्हां सलाबतनें रामचंद्र जाधवास भालकीहून निकडीनें येण्यास लिहिलें. जाधव येत आहे हें पाहून त्यावर पेशव्याचें सैन्य चालून गेलें. बचावासाठीं जाधव सिंदखेडच्या गढींत राहिला. तेव्हां दत्ताजीनें गढीस मोर्चे लावले. जाधवास सोडविण्यासाठीं निजामअली चालून आला त्यास रास्ते व पवार यांनीं अडवून धरिलें. मागाहून कांहीं दिवसांनीं खुद्द नानासाहेब व सदा-

शिवराव येऊन पोहोंचले. तेव्हां दत्ताजीनें इरेस चढून डुकर खळीस येतो तशी त्वेषानें चाल केली. तेव्हां जाधव व निजामअली सलुखावर आले. साखरखेडलें येथें तह होऊन पेशव्यास नलदुर्ग किल्ला व पंचवीस लाखांचा प्रदेश मिळाला. नंतर सर्व मराठी फौजा एकत्र होऊन औरंगाबादेस आल्या, पण त्या पूर्वींच बुसी हैदराबादेहून येऊन सलाबतजंगास सामील झाला होता. हें पाहून सर्वांचीच पांचावर धारण बसली. निजामअलीनें धूर्तपणा दाखवून बुसीशीं विरोध केला नाहीं. शहानवाजखान निजामास शरण आला. बुसीनें पेशव्यास सामोरें जाऊन त्याची भेट घेतली व गोडी राखण्याचा भाव दर्शविला. शहानवाजखानानें बुसीस दौलताबादेवर भेटीस बोलाविलें पण बुसीचा हस्तक हैदरजंग याच्या मनांत स्वतः निजामाचा दिवाण होण्याचें असल्यानें त्यानें बुसीचें मन दूषित करून त्यानें किल्ल्यावर जाऊं नये असें सांगितलें. हैदरजंगानें कारस्थानें करून किल्लेदारास पैसे भरून शहानवाजखानास कैद करविलें. तसेंच निजामअलीच्या गारदी फौजेंतही त्यानें फितुरी आरंभिली. निजामअलीसही कैद करून दौलताबादेंत ठेवण्याचा हैदरजंगाचा बेत होता. पण धूर्त निजामअली मोठ्या सावधगिरीनें वागत होता, त्यामुळें तो बेत साधला नाहीं. तेव्हां हैदरजंगानें निजामअलीस हैदराबादच्या सुभेदारीवर जाण्यास सुचविलें. ती सूचना बाह्यतः मान्य करून निजामअलीनें जाण्याची तयारी केली व हैदरजंग भेटीस आला असतां त्याचा खून करविला. हा खून शहानवाजखानानें करविला अशी फ्रेंचांच्या सैन्यांत समजूत होऊन त्यांतील एका शिपायानें शहानवाजखानाच्या तंबूंत शिरून त्यास व त्याच्या मुलास कापून काढलें. त्याच रात्रीं निजामअली बऱ्हाणपुरास पळून गेला व तेथें त्यानें लढाईची तयारी चालविली; तेव्हां पेशवा पुण्यास परतला, व बुसी सलाबतजंगास घेऊन हैदराबादेस गेला.

या वेळीं इंग्रजफ्रेंचांचें युद्ध जोरांत आलें होतें. या युद्धाचें व्यवधान दक्षिणेंत उपस्थित झालें नसतें तर निजामाच्या दरबारीं बुसीनें सर्व कारभाराचा आटोप केला असता, आणि पुढील घडामोडींस निराळेंच वळण लागलें असतें. परंतु इंग्रजांशीं निकराचा सामना सुरू झाल्यामुळें फ्रेंचांचा मुख्य सरदार लाली म्हणून नवीन आला होता, त्यानें बुसीस तावडतोब आपल्या मदतीस बोलाविलें. बुसीस नाहीं होय म्हणण्याची सोय राहिली नाहीं. त्यास लगोलग हैदराबाद सोडून जाणें भाग पडलें. अशा रीतीनें निजामाच्या दरबारांतलें फ्रेंचांचें वजन संपलें व त्यांच्या जागीं पुढें इंग्रज शिरले. सलाबतजंगानें इब्राहिमखानास काढून लावण्याच्या अटीवर निजामअलीस दिवाणगिरी दिली, व बसालतजंगास अदवानीच्या

सुभ्यावर पाठविलें. इब्राहिमखान निजामाच्या ताब्यांतून सुटला ही गोष्ट पेशव्यास इष्टच झाली. त्यास पुढें स. १७५९ चे अखेरीस सदाशिवरावानें आपल्या नोकरीस ठेविलें.

आतां सन १७५८ साला पूर्वीं घडलेल्या दुसऱ्या हकीकती सांगणें जरूर आहे. सन १७५६ सालच्या शेवटीं पेशव्यांचा अहंमदाबादचा सुभेदार श्रीपतराव बापूजी पुण्यास परत आला, त्याच्या गैरहजेरींत खंबायतचा नवाब मोमीनखान याच्या मदतीनें मोगलांनीं तें शहर पुनः काबीज केलें. दमाजी गायकवाडासही त्यांनीं बराच त्रास दिला, तेव्हां पेशव्यानें रामचंद्रबाबाचा मुलगा सदाशिव रामचंद्र यास गायकवाडाचे मदतीस पाठविलें. तरीही अहंमदाबाद हातीं येण्यास एक वर्ष लागलें. सन १७५७ च्या अखेरीस दमाजीनें अहंमदाबाद घेतली व तो शिंदखेडच्या मोहिमेंत पेशव्यास सामील झाला.

सन १७५६ च्या अखेरीस सावनूरच्या मोहिमेंतून पेशवे परत आल्यावर तिकडे अब्दालीनें पंजाबावर पुनः स्वारी केली अशी बातमी ऐकून पेशव्यानें रघुनाथराव व होळकर यांस उत्तरेंत अब्दालीवर पाठविलें; आणि आपण स. १७५७ च्या आरंभीं म्हैसुरावर चालून गेला. वाटेनें किरकोळ खंडण्या घेत तो श्रीरंगपट्टणास पोंचला. म्हैसूरच्या राज्याचा कारभार प्रधान नंदिराज पूर्ण मुखत्यारीनें पाहत होता. त्याजपाशीं पेशव्यांनीं बेसुमार खंडणी मागितली, तेव्हां ती कमी करावी अशी नंदिराजानें विनवणी केली. ती न ऐकतां पेशव्यानें श्रीरंगपट्टणास वेढा दिला. मुजफरखानानें बातेऱ्या बांधून शहरावर तोफांचा मारा सुरू केला. सत्तावीस दिवस मारा झाल्यावर शहर काबीज होण्याचे बेतास आलें, इतक्यांत एके दिवशीं श्रीरंगाच्या देवालयाच्या शिखरास तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें, व मराठ्यांच्या बातेऱ्यांतील एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले. त्यामुळें उभयपक्षीं हा अपशकून वाटून तहाची तडजोड ठरली. पेशव्यानें छत्तीस लाख खंडणी मागितली. सरकारचा सावकार महादशेट वीरकर मध्यस्थ होता त्याचे विद्यमानें चार लाख कमी करून वेढा उठविण्याचें पेशव्यानें कबूल केलें. पैकीं पांच लाख रोख आले, आणि बाकीच्या फेडीकरतां राज्यांतील चौदा उत्कृष्ट महाल नंदिराजानें मराठ्यांकडे तारण लावून दिले. या महालांत पेशव्यानें वसुलाकरितां कमावीसदार नेमून त्यांच्या मदतीस सहा हजार फौज ठेविली. तसेंच बळवंतराव मेहेंदळ्यास शहाजीच्या जहागिरींतील शिरें, बेंगळूर, कोलार वगैरे

ठिकाणें घेण्यासाठीं त्या प्रांतांत ठेवून स्वतः पेशवा स. १७५७ च्या पावसाळ्या-पूर्वीं पुण्यास परत आला.

पुढें बळवंतराव मेहेंदळ्यानें शिऱ्याचें ठाणें घेतलें. तेव्हां निजामानें दिलावर-खान नामक सरदार त्याचे संरक्षणार्थ पाठविला होता, परंतु मराठ्यांपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. शिरें घेतल्यानंतर बळवंतरावानें कडाप्याच्या नबाबावर स्वारी केली. कडाप्याच्या नबाबास सावनूर, कर्नुळ, चित्रदुर्ग वगैरे ठिकाणच्या संस्थानिकांचीही मदत आली होती, त्यांचा भर पावसाळ्यांत मराठ्यांनीं पराभव केला. कडाप्याच्या नबाबास मुराररराव घोरपड्याचेंही साहाय्य होतें, तरी कोणास न जुमानतां बळवंतरावानें ता. २४ सप्टेंबर १७५७ रोजीं कडाप्याजवळ लढाई दिली. लढाईंत नबाब मारला जाऊन हजारों पठाणांची कत्तल झाली. कडपें शहर मराठ्यांनीं लुटलें. मयत नबाबाचा वारस अबदुल नबीखान मराठ्यांशीं हिंमतीनें लढला. त्याचें अर्धें राज्य बळवंतरावानें आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर बळवंत-राव अर्काटच्या नबाबाजवळ खंडणी मागूं लागला. इंग्रजांनीं मध्यस्थी करून खंडणी माफ करण्याची पुष्कळ खटपट केली, पण तें सारें निष्फळ होऊन मरा-ठ्यांस साडेचार लक्ष रुपये देणें महंमदअल्लीस भाग पडलें. मेहेंदळ्याचा कारभारी अमृतराव शंकर यानें ही खंडणी वसूल करण्याबाबत फार चांगलें काम केलें. हा गृहस्थ कर्नाटकांतील व्यवहारांत निष्णात असून पेशवे तिकडील सर्व काम त्यासच सांगत असत.

बळवंतराव कडाप्याकडे गुंतलेला पाहून म्हैसूरच्या नंदिराजानें पेशव्याच्या सैन्यास हुसकावून देऊन दिलेले परगणे परत घेतले. ही मसलत नंदिराजास दिंडि-गलचा सुभेदार हैदरअल्ली यानें दिली होती. हैदरानें फ्रेंचांपासून कवायती लष्क-राची रचना उचलली, व कर्नाटकांत पहिलें कवायती लष्कर त्यानें तयार केलें. या आगळिकीबद्दल म्हैसूरकरांचें पारिपत्य करण्यास बळवंतरावास या वेळीं फुर-सत सांपडली नाहीं. पेशव्यांकडून मदत यावयाची तोंच निजामाकडील व पान-पतचें राजकारण रंगास चढलें. म्हणून बळवंतरावासच पेशव्यानें परत बोलाविलें आणि पुढें त्याची रवानगी पानिपतचे मोहिमेवर केली. या वेळीं हैदराचें पारि-पत्य झालें असतें तर सर्व कर्नाटक मराठ्यांचे कक्षेंत येऊन हैदरअल्लीचा उदय झाला नसता, असा संभव होता. परंतु तो योग जुळून आला नाहीं. सन १७५५ च्या आरंभीं रघूजी भोसले मरण पावला. त्याचे मुलगे चार. जानोजी, मुधोजी, साबाजी, व बिंबाजी. पैकीं जानोजी व मुधोजी यांच्यांत भांडण लागलें, तें

मध्यस्थीसाठीं पेशव्यांकडे आलें. पेशव्यांनीं ही संधि पाहून भोसल्याच्या कारभारांत आपला शिरकाव केला. त्यांच्याकडून रामराजाचे खर्चास दरसाल दहा लक्ष रुपये यावे व दहा हजार फौजेनेशीं जानोजीनें मराठी राज्याचे नोकरीस यावें, असा ठराव नानासाहेबानें करून दिला. त्याप्रमाणें जानोजी व मुधोजी भोसले हे सावनूरच्या स्वारींत पेशव्यांबरोबर हजर होते. पुढें निजामाच्या प्रकरणींही जानोजीनें त्यांस मदत केली. याच वेळीं बंगालप्रांत भोसल्यांच्या कक्षेंतला असतां तेथून सिराजउद्दौल्यास हुसकावून देऊन इंग्रजांनीं जो अपहार केला त्याकडे मात्र भोसले किंवा पेशवे या दोघांचेंही तिळमात्र लक्ष गेलें नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें. सिराजउद्दौल्याचें रक्षण करणें हें चौथाईच्या ठरावाप्रमाणें भोसल्यांचें कर्तव्य असून मराठशाहीच्या एकंदर हिताच्या दृष्टीनें तिकडे लक्ष पुरविणें हें पेशव्यांचेंही काम होतें. दोघांनींही दुर्लक्ष करून इंग्रजांचा प्रतिकार वेळींच केला नाहीं त्यामुळेंच इंग्रजांचा उदय शक्य झाला. शक्तीच्या मानानें पाहिलें तर स. १७५६ त नानासाहेबास बंगालचें राजकारण हातीं घेतां आलें असतें. पण इंग्रजावर शस्त्र धरण्याची त्याची इच्छा नव्हती.

सन १७५९ च्या आरंभीं निजामाकडील शह सुटल्यावर नानासाहेबानें पुनः कर्नाटकाकडे लक्ष दिलें. मागील स्वारींत बळवंतराव मेहेंदळे कडप्याकडे गुंतला असतां हैदरानें मराठ्यांकडे गहाण दिलेले परगणे हिसकावून घेतले होते. ते त्याच वेळीं परत घ्यावयाचे, परंतु पटवर्धन व मेहेंदळे या दोघांस निजामप्रकरणीं पेशव्यानें परत बोलाविलें, त्यामुळें तें काम राहिलें. या स्वारींत गोपाळराव पटवर्धन व रास्ते यांनीं म्हैसुरावर येऊन चौदा परगण्यांत पुनः आपला अंमल बसविला, व बेंगरूळास वेढा दिला. तेव्हां नंदिराजानें हैदरास मराठ्यांवर पाठविलें. या स्वारींत मराठ्यांजवळ तोफखाना नसल्यामुळें त्यांस केवळ गनिमी काव्यानें लढावें लागे. हैदर मात्र कवायती पायदळ व तोफखाना यांच्या बळावर मराठ्यांस हैराण करी. अशी स्थिति असूनही गोपाळरावानें हैदराशीं चार महिने चांगलीच टक्कर दिली, पण निकाल मात्र कोणाच्याच बाजूनें लागेना. तेव्हां दोघेही कंटाळून गेले, व रोख बत्तीस लक्ष रुपये घेऊन मराठ्यांनीं परगणे सोडून चालतें व्हावें असा तह ठरला. नंदिराजाजवळ एवढी रक्कम नसल्यामुळें हैदरानेंच आपल्या पतीवर मराठी सावकारांचें कर्ज घेऊन रकमेची भरपाई केली. हैदराच्या पराक्रमाबद्दल मराठ्यांच्या सावकारांसही एवढा विश्वास होता कीं, हे चौदा परगणे हैदराकडे रहात असतील तरच ते पैसे

देण्यास कबूल होते. म्हणजे नंदिराजाच्या शब्दावर विश्वास नाहीं एवढा विश्वास हैदराच्या पराक्रमावर या वेळीं सावकारांचा होता. हे चौदा परगणे ताब्यांत घेणें हाच म्हैसूरचें सर्व राज्य आक्रमिण्याचा हैदराचा उपक्रम होय. नानासाहेबास गोपाळरावाची ही तडजोड पसंत पडली नाहीं. "हैदरानें तुमचें स्वरूप नेलें" असें त्यानें गोपाळरावास लिहिलें. पण आपण हरलों असें गोपाळरावानें बिलकुल कबूल केलें नाहीं. "आम्हांकडून हैदरास चांगली तंबी पोंचल्याशिवाय कांहीं त्यानें आम्हांस खंडणी दिली नाहीं," असा जवाब गोपाळरावानें पेशव्यास पाठविला. हैदर कशा प्रकारचा मनुष्य आहे याची कल्पना नानासाहेबास झालेली नव्हती. आपला कांहीं एक उपाय चालत नाहीं अशी खात्री झाल्याशिवाय खंडणी देणारा मनुष्य हैदर नव्हता. हा एक निराळ्याच वर्गाचा माणूस आहे असें मराठ्यांस कळून येण्यास बरेच दिवस लागले. यानंतर गोपाळराव उदगीरच्या मोहिमेंत मिळण्यासाठीं परत आला, त्यामुळें कर्नाटक राज्यव्यवहारांत हैदरास मोकळा हात सांपडला.

हैदर मध्यें आला नसता तर म्हैसूर संस्थान मराठ्यांच्या ताब्यांत आलें असतें; आणि येणेंकरून मद्रासकर इंग्रजांचा व त्यांचा संबंध येऊन महाराष्ट्राच्या इतिहासाला निराळें वळण लागतें. उत्तरेंत अब्दाली व दक्षिणेंत हैदर मराठ्यांच्या आड येऊन, त्यांनीं इंग्रजांना पुढें येण्याची संधि अप्रत्यक्ष रीतीनें करून दिली. सन १७६० सालीं हैदरअल्लीला कावूंत आणण्यासाठीं नंदिराजानें मराठ्यांची मदत मागितली होती. पण याच वेळीं निजाम व अब्दाली यांच्याबरोबर मराठ्यांचे मनसुबे हातघाईवर आल्यानें ती मदत त्यांस देतां आली नाहीं. पुढें बरींच वर्षें हैदरास मोकळीं मिळून तिकडे आपला जम बसविण्यास त्यास भरपूर अवकाश सांपडला.

बुसी निजामाकडून निघून गेल्यावर निजामअल्लीनें सलाबतजंगास आपल्या ताब्यांत आणलें. मात्र सलाबतजंगाच्या मर्जीसाठीं इब्राहिमखान गारद्यास आपल्या नोकरींतून काढून टाकणें त्यास भाग पडलें. सावनूरच्या मोहिमेनंतर मुजफरखान गारदी पेशव्यांच्या नोकरीस राहिला. तो अगदींच वेळ पडेल तसे वागणारा होता. लालुचीस वश होऊन अगर केवळ लहरीखातर पाहिजे त्या पक्षास मिळणें अथवा वाटेल तें कृत्य करणें याची त्यास क्षिति नव्हती. अशा इसमावर नेहमींच अवलंबून राहतां येणार नाहीं हें ओळखून, पेशव्यानें माधवराव पानशे यास आपल्या तोफखान्यावरचा मुख्य

नेमून ही कला मराठ्यांनीं स्वतः शिकावी अशी व्यवस्था केली. मुज्फरखाना-बद्दल सदाशिवरावाचें मन बरें नव्हतें. असल्या विश्वासघातकी माणसास नोकरींत घेऊं नये, असें सदाशिवरावानें नानासाहेबास सांगितलें. पुढें इब्राहिमखानास निजामअलीनें रजा दिली, तेव्हां सदाशिवरावानें त्यास आपल्या नोकरींत ठेविलें. या गोष्टीमुळें संतापून जाऊन किंवा मागील दंश मनांत धरून मुज्फरखानानें सदाशिवरावास ठार मारण्याचा प्रयत्न ता. २८ आक्टोबर १७५९ रोजीं केला. मुज्फरखानाचा जांवई हैदरखान यानें सदाशिवरावाच्या डेऱ्यांत शिरून त्याजवर हत्यार चालविलें. तेव्हां जवळच नागोजी गुजर शिलेदार होता त्यानें हैदरखानाचा हात धरून सदाशिवरावाचा बचाव केला. बरचीच्या टोंकाची एक लहानशी जखम मात्र पाठींत लागली. हैदरखानास पकडून जरब देतांच त्यानें मुज्फरखानाचे सांगीवरून आपण हें कृत्य केलें असें कबूल केलें. तेव्हां त्या दोघांचाही एकदम शिरच्छेद करण्यांत आला. हें कृत्य गोपिकाबाईच्या प्रेरणेनें झालें असें डफ म्हणतो, पण त्यास आधार नाहीं. गारद्यांची ही भाडोत्री परंपरा सुमेरसिंग, महंमद इसफ वगैरेंच्या ठिकाणीं भरपूर असून ती पुढें पेशव्यांस चांगलीच भोंवली.

बुसी निघून गेल्यावर निजामानें सर्वस्वी आपल्या ताब्यांत रहावें, राज्यकारभार आपल्या सल्ल्यावांचून करूं नये, असा प्रयत्न पेशव्यानें चालविला. सलाबतजंगास ही गोष्ट पतकरली असती, परंतु त्याचा भाऊ निजामअली याच्या मनांत पुढें मागें स्वतःच निजाम व्हावयाचें असल्यामुळें त्यानें पेशव्याच्या हेतूस विरोध केला. गेल्या दोन तीन वर्षांत क्लाइव्हनें जोर करून इंग्रजांची बाजू मजबूद केली होती. तेव्हां पेशव्यावर अवलंबून राहण्यापेक्षां इंग्रजांशीं सख्य जोडणें निजामअलीस हिताचें वाटलें. हीं कारस्थानें ऐकून निजामास एकदां शेवटचा हात दाखवण्यासाठीं पेशव्यानें तयारी केली. निजामाचा अहमदनगरचा किल्ला ता. ९ नव्हंबर १७५९ रोजीं विसाजी कृष्ण बिनीवाल्यानें किल्लेदारास वश करून हस्तगत केला. मुसलमानी वैभवाची खूण म्हणून हें प्राचीन शहर निजामास हवें होतें. तें हातचें गेल्यानें निजामाचें नाक कापल्याप्रमाणें झालें, व त्यानें मराठ्यांशीं दोन हात करून राज्य राखण्याचा प्रयत्न चालविला; पण या वेळीं त्याच्या बाजूस फारशी फौज जमली नाहीं. इब्राहिमखान गेल्यामुळें कवायती फौज व तोफखाना या बाजूंनींही त्यास उणेपणा आला. निजामाचा भाऊ बसालतजंग, जानोजी निंबाळकर वगैरे मंडळी आपआपल्या घरींच बसली होती. सदाशिवरावानें नगरावरून

मुलूख जिंकीत जिंकीत उदगीरवर जाऊन मोंगलांशीं गांठ घातली. या मोहिमेंत रघुनाथराव व विश्वासराव हेही बरोबर होते. दोन दिवस युद्ध होऊन मोगल टेकीस आला व त्यानें विठ्ठल सुंदरास सलुखासाठीं पेशव्याच्या डेऱ्यावर पाठविलें. सदाशिवरावानें क्रोड रुपयांचा मुलूख व दौलताबाद, अशीरगड, विजापुर, बऱ्हाणपुर वगैरे प्रसिद्ध किल्ले व शहरें मागितलीं. त्याजवरून बहुत रदबदली करून साठ लक्षांच्या मुलखावर तोड झाली. विजापुर, दौलताबाद, बऱ्हाणपुर, नगर, यांसारखीं प्राचीन वैभवाचीं मुसलमानी शहरें हातचीं गेल्यानें निजामाचें जीवित संपल्यासारखें झालें. यावेळीं वर उत्तरेंत अब्दालीनें पेंच घातला नसता तर एक दोन वर्षांत निजाम व हैदर ह्यांस जिंकून पेशव्यांनीं सर्व दक्षिण सोडविली असती. उदरगीचा विजय हा पेशव्याचे कर्तबगारीचा कळस होय. मराठ्यांचा अंमल या पूर्वी पुण्याच्या पलिकडे फारसा नव्हता, तो या विजयानें खानदेश, नासिक, नगर, औरंगाबाद, सोलापुर, विजापुर, वगैरे सर्व टापूंत बसून निजामाचें अर्धें राज्य मराठ्यांच्या ताब्यांत आलें.

तहानें जे किल्ले मराठ्यांस मिळाले ते ताब्यांत आणण्यास मराठ्यांस पुढेंही लढावेंच लागलें. दौलताबाद घेण्यास गोपाळराव पटवर्धन यास पाठविलें होतें. तेथील किल्लेदारानें देतों देतों असें गोड बोलून किल्ला ताब्यांत देण्याची दिरंगाई चालविली. तेव्हां नानासाहेबानें एक खरमरित पत्र लिहून गोपाळरावास दौलताबाद घेण्यास सांगितलें. या पत्रावरून पेशव्याची उमेद या वेळीं किती वाढली होती, व हाताखालचे लोकांस वागविण्याची त्याची रीत कशी होती, हें दिसून येतें. “वारंवार लिहितां कीं, हीं स्थळें दुर्घट आहेत. शहास गुततां येत नाहीं, विचारें कार्यसिद्धी करावी लागत्ये, यास्तव हल्ला राहविला, म्हणोन लिहितां. अपूर्व वाटतें! विचार दुरंदेशी तुम्हांसच कळते, हें पूर्ण प्रत्ययास येऊन गेलें! परंतु हें राजकारण प्रथम नरम धरिलेंत, रसद बंद केली, ये गोष्टीची तारीफ चिरंजीव भाऊ वगैरे सर्व शहाणे फार करितात. तुम्हांस स्थळें अवघड वाटतात, परंतु श्रीकृपेनें तृणप्राय आहेत. मल्हारबांनीं धोडप हल्ला करून घेतली, तें स्थळ हल्ला करून यावयाचें होतें? कालच्या मोगलांवर उभयतां चिरंजीवांनीं सफेजंगी केली, एका लढाईंत मोगल चक्काचूर केला, हें कोणाचे तर्कांत येत होतें? लाखों असाध्य कामें श्रीकृपातेजप्रतापामुळें तृणप्राय आहेत! परंतु करणारासारखें फळ होतें. तुम्ही सख्त जलद शिपाई असें जाणून मी तुम्हांला पाठविलें होतें. तुम्हींच आम्हांस विचार लिहिणार इतकें कळलें असतें तर एखादे लहान सहान पथके पाठविले

असते. तो प्रथम दिवशींच रसद बंद करिता. कांहीं यावयाचें न बोलता, म्हणजे आज काम जाहलें असतें. तुम्हीं मातवर, तुम्हांस कार्य झाल्यावांचून आणतां नये, यास्तव तुम्हांस यश यावें म्हणून तुम्हांसच आज्ञा करितों. ते तुम्ही करीत नाहीं, ये गोष्टीस इलाज कोणता करावा? गोपाळरावजी! हे दौलताबाद तुम्हांस दुर्घट वाटते, परंतु दोन महिन्यांत सखतीनें वेढा घालून एक रुपया न देतां घेऊं! कांकीं त्याची कुमक कोणी करीत नाहीं! मोगलानें कुमक केली तर पुनरपि श्रीकृपेनें पन्नास हजार फौज जमा करून अगदीं मोगल दक्षिणेंत होता कीं नव्हता सा करूं! हें मोगल समजले आहेत, तुम्हीं समजत नाहीं, यास इलाज काय करावा! तुम्हांस बहुत दुरंदेशी समजते. रागें भरून लिहिलें म्हणोन तुम्हांस राग येईल. परंतु तुम्हीं वारंवार आम्हांस विचार लिहितां, यास्तव लिहिणें प्राप्त झालें. या पत्रापूर्वी कार्य जाहलें असेल तर उत्तम आहे. नाहींतर परिच्छिन्न शहरपन्ना घेऊन वेढा बसविणें. श्रीकृपेनें कार्य होईल. जों जों तुम्हीं राजकारणें करितां तों तों काम नासतें! या उपर या पत्रावरून जितका राग येईल तितका त्याजवर काढणें. जर कार्य जाहलें असेल तर व्यर्थ राग येऊं न देणें. तुमचा स्वभाव रागीट. यास्तव इतके दिवस सख्त लिहिलें नाहीं. आतां वारंवार तुम्ही विचार लिहूं लागलां, तेव्हां नाइलाज म्हणून लिहिलें आहे. हें पत्र कोणास ठाऊक नाहीं. लेंकरादाखल सेवकावर एकांतीं रागें भरल्यास वाईट मानूं नये." या पत्रांतील पेशव्याची आत्मिक छटा पटवर्धन घराण्यास शोभणारी आहे.

निजामाकडील मामल्याच्या सुरुवातीसच दत्ताजी शिंद्याच्या मृत्यूची बातमी पेशव्यास येऊन पोंचली. त्यामुळें दक्षिणेंतील प्रकरण त्यास आटोपतें घ्यावें लागलें. तें आटोपल्यावरोबर नानासाहेब उत्तरेंतील प्रकरणाची वाटाघाट करून पुढील विचार ठरविण्यासाठीं उदगीरच्या उत्तरेस पटदुरावर आला. पटदूर येथूनच पानिपतच्या स्वारीचा उगम असल्यामुळें ती हकीकत पानिपत प्रकरणांत देणें योग्य आहे.

## प्रकरण १६ वें.

# अटकेवरील झेंडे.

रघुनाथराव व मल्हारराव होळकर दिल्लींतील कारभाराची व्यवस्था लावून स. १७५५ च्या पावसाळ्यांत दक्षिणेंत आले हें मागें सांगितलेंच आहे. मागाहून दत्ताजी व जनकोजी शिंदेही मारवाडांतील भानगडी मिटवून स. १७५६ च्या अखेरीस इकडे आले. अर्थात् मराठी फौजांचें उत्तरेंतील दडपण हलकें होतांच पुनरपि दिल्लींत विरुद्ध कारस्थानें चालू झालीं. त्यांत मुख्य पुढारी नजीबखान रोहिले होय. हा गृहस्थ प्रथम गाजीउद्दीनचे वशिल्यानें पुढें आला आणि अल्पावधींत प्याद्याचा फर्जी बनून मराठ्यांचें बस्तान दिल्लींत बसूं न देण्याचा प्रचंड खटाटोप करूं लागला. दिल्लींत बादशहाचे संरक्षणास अंताजी माणकेश्वर पांच हजार फौज घेऊन राहिला होता, त्याचा वचक शत्रूंस फारसा वाटला नाहीं. गाजीउद्दीननें मराठ्यांची मदत आणून बादशहास कबजांत घेऊन सर्व कारभार बळकाविला हा प्रकार मल्किाअज्जमानी वगैरे मंडळीस दुःसह होऊन त्यांनीं नजीबखानाच्या द्वारें अब्दालीस पुनः इकडे बोलाविलें. मागील स्वारींत अब्दालीनें पंजाबप्रांत जिंकून तेथें मीर मन्नू यास आपल्या तर्फे सुभेदार नेमिलें होतें. पुढें मीर मन्नू लवकरच घोड्यावरून पडून अपघातानें मरण पावला, तेव्हां अब्दालीनें त्याच्या मुलाचे नांवें सुभेदारी करून कारभार सर्व त्याच्या विधवा आईकडे सांगितला; आणि तिच्या मदतीस अदिनाबेगाची नेमणूक केली. परंतु कांहीं दिवसांनीं तो अल्पवयी मुलगा मरण पावला व बाईवर तिचेच अधिकारी उठले. याच वेळीं शीखही जोर करून एक एक प्रांत बळकावूं लागले. तेव्हां अब्दालीपासून पंजाब परत घेण्यास ही चांगली संधि आहे असें पाहून गाजीउद्दीननें स. १७५६ च्या आरंभीं लाहोरावर स्वारी केली. अदिनाबेग त्यास मिळाला. गाजीउद्दीननें मीर मन्नूची बायको व मुलगी यांस विश्वासघातानें निजलेलीं असतां पकडून आणिलें व त्या मुलीशीं स्वतः लग्न केलें; आणि सालिना तीस लाख रुपये घेण्याचा करार करून व पंजाबप्रांत अदिनाबेगाच्या स्वाधीन करून तो दिल्लीस परत आला. हा प्रकार अब्दालीस कळतांच आपण केलेली व्यवस्था मोडून पंजाब हातचा गेला या गोष्टीनें चिडून त्यानें पुनः स. १७५६ च्या नोव्हेंबरांत पंजाबावर स्वारी केली.

अब्दाली येण्यापूर्वींच नजीबखानानें सुजाउद्दौला, मारवाडचा विजयसिंग, जयपूरचा माधवसिंग, सुरजमल जाठ वगैरेंशीं संधानें जोडून मराठ्यांविरुद्ध

कारस्थान रचलें होतें. या गोष्टी इतक्या गुप्तपणें त्यानें केल्या कीं, वजीर गाजीउद्दीन यास त्यांची वार्ताही कळत नव्हती. अब्दालीनें येऊन पंजाबांतील एकेक शहर घेण्यास सुरवात केली तेव्हां कोठें तो जागा झाला. दिल्लींत पातशहाची स्वतःची फौज अगदीं थोडी होती व तींतही नजीबखानानें फितुरी करून ठेवली होती. अंताजी माणकेश्वराची मराठी फौज हीच कायती दिल्लीच्या रक्षणास होती, पण तिला अब्दालीस तोंड देण्याचें काम झेपण्यासारखें नव्हतें. अब्दाली दिल्लीवर येतांच नजीबखान भेटण्याच्या निमित्तानें त्याकडे जाऊन त्यास सामील झाला व इतर मुसलमानही मराठ्यांविरुद्ध अब्दालीस मिळाले. अंताजीनें दोन लहानशा लढाया अब्दालीशीं दिल्या पण सभोंवारची स्थिति पाहून तो मागें सरकत फरीदाबादेस आला. मराठ्यांचे वकील हिंगणे, नारो शंकर वगैरे दिल्लींतून पळून गेले. बादशहानें मराठ्यांस कळविलें कीं, 'हे पातशहात बाळाजीरायाची आहे, आम्हांजवळील राहिला मुलूख आहे तोही घेऊन अब्दालीचें पारिपत्य करावें.' याच्या अगोदरच रघुनाथराव व मल्हारराव होळकर दक्षिणेंतून निघून राजपुतान्यांत आले होते, पण ते नसतीं लफडीं अंगावर घेऊन तिकडेच रेंगाळत राहिले. यावेळीं सदाशिवराव किंवा दत्ताजी शिंदे यांच्यासारखा हिय्याचा व तडफेचा शिपाई असता तर त्यानें तावडतोब येऊन अब्दालीस गांठलें असतें व असें होतें तर अब्दालीचा मोड मुळांतच खुडला गेला असता. पण या दोघांच्या दीर्घसूत्रीपणामुळें अब्दालीचा जोर वाढला व मराठ्यांकडून आपलें रक्षण होऊं शकत नाहीं असा दिल्लीजवळच्या रयतेचा समज झाला. इतकेंच काय पण नारो शंकराच्या आश्रयास भीतीनें जी रयत आली होती तीसच त्यानें लुटल्यामुळें मराठ्यांबद्दल सर्वांचा आदर व विश्वास नाहींसा झाला. याचे परिणाम मराठ्यांस पानिपतावर भोंवले.

ता. २८ जानेवारी १७५७ रोजीं अबदालीनें दिल्ली हस्तगत केली, व स्वतः बादशाही पद धारण केलें. बादशहा व गाजीउद्दीन यांस त्यानें कैदेंत टाकलें. गाजीउद्दीनचा शिरच्छेद करावा म्हणून नजीबखानानें अब्दालीस पुष्कळ आग्रह केला पण त्यानें तें ऐकलें नाहीं. दिल्लीहून अब्दाली मथुरेवर आला. तेथें पांच हजार जाठ होते त्यांनीं जोरानें टक्कर दिली पण शेवटीं त्यांस पळून जावें लागलें. मथुरा लुटून तो आग्र्यास आला व तेंही शहर त्यानें घेतलें. अब्दाली पुढें जाठांवर आला तेव्हां सुरजमल्लानें दहा लाख खंडणी भरून त्याची समजूत केली. याप्रमाणें आपला दरारा बसवून व मराठ्यांच्या मदतीची किंमत लोकांस पटवून, तो उन्हाळा आला तेव्हां स्वदेशीं परत गेला.

परत जातांना अब्दालीनें गाजीउद्दीन यास वजीरी देऊन नजीबखानास अमीर-उल्-उमराव करून पांच हजार फौजेनिशीं त्यांस बादशहाचे बंदोबस्तास नेमलें. या दोघांच्या ओढाताणींत आपलें वजन कायम राहील अशी अब्दालीची अटकळ होती. तसेंच सरहिंद येथें त्यानें अबदुस्समदखानास दहा हजार फौजेनिशीं बंदोबस्तास ठेविलें. लाहोरास त्यानें आपला मुलगा तैमूरशहा व जहानखान यांची स्थापना केली. नजीबखानाच्या मनांतून मोगल पातशाही मोडून पठाण पातशाही व्हावी असें होतें, परंतु अब्दालीस नजीबखानाचा विश्वास पटेना किंवा तसें करणें इष्ट आहे किंवा काय याचा निश्चय होईना, म्हणून राहिलेलीं कामें पुढील वर्षी करूं असें सांगून तो निघून गेला.

सन १७५६ च्या नोव्हेंबरांत अब्दाली काबुलाहून निघाला, त्या वेळींच रघुनाथराव व होळकर दक्षिणेंतून दिल्लीवर निघाले होते, परंतु त्वरेनें अब्दालीस गांठण्याची हिंमत न करतां वाटेनें किरकोळ खंडण्या वसूल करीत राहिले. शिंद्याची मदत आल्याखेरीज पुढें जाण्याची त्यांची तयारी नव्हती. ता. ११ जून सन १७५७ च्या सुमारास रघुनाथराव दिल्लीस पोंचला. त्याकडे मारवाडच्या विजयसिंगाचे वकील येऊन भेटले, आणि शिंद्यांची व आपली गोडी करून द्यावी, रामसिंगास राज्य देऊं नये, असें बोलणें त्यांनीं सुरू केलें. मल्हाररावाच्या मदतीनें रघुनाथरावानें त्यांत मन घातलें. एवंच शिंद्यांच्या दोन वर्षांच्या खटपटीचें यश नाहींसें करून टाकण्याचा प्रसंग या दोघांनीं आणिला. नंतर रघुनाथरावानें अंतर्वेदींतील उठलेला अंमल बसविण्याकरितां विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर व गंगाधर यशवंत यांस तिकडे पाठविलें. रघुनाथरावाची कर्जामुळें फारच त्रेधा उडाली होती. मल्हारराव नसतीं लचांडें काढून काळ दवडीत होता. त्या वेळच्या स्थितीचें वर्णन रघुनाथरावाच्या पुढील पत्रांत आहे. " अब्दाली मार्गशीर्ष पौषांत आला तरी मनसुबा भारीच आहे. दत्ताजी शिंद्यांची रवानगी करावी, कारण अब्दाली न आला तरी काशी, बंगाला या प्रांतीं स्वारी केलीयास चार रुपये आकारतील. कपाळ स्वामींचें थोर आहे, प्रयत्न आमचा आहे. वरकड हिंदुस्तानांत कोठें जीव दिसत नाहीं. जाठांत जीव आहे, पण मोठा काबूकार आहे. दोन महिने माधवसिंगाचें प्रकरण चाललें आहे. मल्हारबा न ऐकत, लटके आपले घराऊ हिशेब काढून मामलत न करीत, आम्हांस कर्ज देखील भक्षावयास न मिळे. रोज गांव मारून खावें, झुंजल्याखेरीज दाणा नाहीं, रुपया नाहीं, कर्जही न मिळे. तेव्हां आम्हीं मल्हारबास टाकून मामलत रगडून केली. कष्टी जाले.


अकरांपैकीं सहा लक्ष आले, त्यांपैकीं त्यांची वांटणी दोन लक्ष देणें पडली. सारांश, मल्हारबा ज्या त्या कारभारांत ओढतात, आम्ही सोशितों. पुढें समजावीसही करूं. दत्तबा आलियानें परस्पर वर्म असतें, यामुळें ओढणार नाहींत. **आपल्यांत दुही पडते, तेव्हां शत्रूचें वळ फावतें.** ऐसे हजारों पेंच होतात, ते कोठवर लिहावे. संकलित लिहिले आहेत." या प्रत्यक्ष रघुनाथरावाच्या लिहिण्यावरून मल्हारराव होळकराच्या वर्तनाची कल्पना चांगली होते. मल्हाररावाप्रमाणेंच हिंगणे, अंताजी, नारो शंकर, वगैरे कित्येक मतलवी गृहस्थ थोडें बहुत राज्यविघातक वर्तन करीत होते. त्यांचा बंदोबस्त अल्पवयस्क व मळमळीत रघुनाथरावाचे हातून होणें शक्य नव्हतें. तें काम स्वतः नानासाहेब किंवा सदाशिवराव करूं शकता. पैसा व अव्यवस्था या दोन मराठ्यांच्या मुख्य अडचणी होत्या, व त्यांचें निवारण अखेरपर्यंत कधींच झालें नाहीं.

सन १७५७ च्या जुलैपासून १७५८ च्या मार्चपर्यंत रघुनाथरावाचा मुक्काम दिल्लींत होता. अब्दाली परत गेल्यावर गाजीउद्दीननें मराठ्यांच्या मदतीनें नजीबखानाचा नक्षा उतरवण्याचें काम चालविलें. मराठ्यांच्या साह्यानें दिल्लीचा किल्ला ताब्यांत येतांच वजिरानें नजीबाची बक्षीगिरी काढून ती अहमदखान बंगष यास दिली. बादशहा व नजीबखान त्याचे हातांत सांपडले. शहाजादा अलीगौहर यास मात्र बादशहानें बचावासाठीं युक्तीनें दूर ठिकाणीं पाठवून दिलें. नजीबखानास मारून टाकावा अशी रघुनाथरावास पुष्कळांनीं सल्ला दिली, परंतु नजीबखानानें मल्हारराव होळकरास शरण जाऊन, 'मी तुमचा धर्मपुत्र आहें, माझा बचाव करा' अशी विनंति केली. तेव्हां मल्हाररावाचे भिडेमुळें नजीबखानास सोडून देणें रघुनाथरावास भाग पडलें. यानंतर रघुनाथरावानें हिंगणे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, वगैरे सरदारांची झडती घेऊन त्यांस काबूंत आणण्याचें काम केलें. हिंगण्याच्या घराण्याची या वेळीं अगदीं वाताहत झाली. "येथील वकिलातीचें ऐसें स्वरूप गमावलें कीं, वकिलातीचें स्वरूपच न राहिलें. येथें ते ऐसे असतात कीं, पेशव्यांच्या वकिलातीचा माणूस दहादहा वीसवीस रुपये मागत फिरतो. जो कोणी शंभर रुपये दरमहा चाहे तो येथें मिळणार नाहीं."

सटरफटर प्रकरणें हातीं घेऊन रघुनाथराव आठ नऊ महिने दिल्लींत घोळ घालून बसला, त्यामुळें नाना प्रकारचे तोटे झाले. फौजेच्या खर्चामुळें दिल्लीच्या आसपासचे लोक त्रस्त होऊन गेले. व्यक्तिविषयक भानगडींचा तपास रघुनाथरावानें चालविल्यामुळें रिकामपणांत चाहाडखोरांचें मात्र फावलें. सर्वस्व खर्ची

घालून राष्ट्रकार्य करण्याची खरी प्रवृत्ति त्या वेळीं एकट्या शिंद्यांशिवाय दुसऱ्या कोणाही सरदारांचे ठिकाणीं राहिलेली दिसत नाहीं. जो तो स्वतःचा लाग साधण्यास पहात होता. इतर लहान सरदारांस वठणीस आणण्याचें काम रघुनाथरावानें केलें, पण मल्हाररावासारखें डोईजड पारडें ताळ्यावर आणण्याची धमक त्यास नव्हती. या वेळीं शीखांनीं जोर करून तैमूरशहा व जहानखान यांस लाहोरांत कोंडलें होतें. स्वतः अब्दाली इराणच्या बाजूस गुंतला होता. अशा वेळीं पंजाबांत जाऊन तो प्रांत पूर्ण ताब्यांत घेणें सोपें होतें. अब्दाली निघून जातांच अदिनाबेग पंजाब प्रांत परत घेण्याच्या उद्योगास लागला. त्यानें शीखांस उठवून सर्व पंजाबभर धुमाकूळ माजविले. परंतु शीखांच्या मदतीनें आपला कार्यभाग पुरा तडीस जाणार नाहीं, हें ओळखून अदिनाबेगानें रघुनाथरावास पंजाबांत बोलाविलें.

रघुनाथराव मल्हाररावास बरोबर घेऊन एप्रिलांत लाहोरावर आला. बरोबर बापूजी महादेव हिंगणे होता. वाटेंत सरहिंद येथें अब्दुस्समदखानास त्यानें पकडिलें. मराठ्यांशीं लढण्याचें आपणास सामर्थ्य नाहीं असें पाहून जहानखान तैमूरशहास घेऊन काबुलास पळून गेला. रघुनाथरावानें अटकेपर्यंत त्यांचा पाठलाग करून सर्व सामानसुमान, संपत्ति व सिंधुनदीपर्यंतचा प्रदेश हस्तगत केला, आणि पाऊण कोट रक्कम घेण्याच्या करारानें पंजाबप्रांत अदिनाबेगाच्या स्वाधीन करून रघुनाथराव ताबडतोब स्वदेशीं परत आला. या स्वारीचें वृत्त रघुनाथरावानें ता. ४ मे सन १७५८ च्या पत्रांत पेशव्यांस लिहिलें. " लाहोर, मुलतान, काश्मीर, वगैरे अटके अलीकडील सुभ्यांचा बंदोबस्त करून अंमल बसवावा, त्यास, कांहीं जाला, कांहीं होणें तोही लवकरच करितों. तयमूर सुलतान व जहानखान यांचा पाठलाग करून फौज लुटून घेतली. थोडीशी झडत पडत अटकेपार पिशावरास ते पोंचले. अब्दाली इराणावर चालून गेला, त्याची फौज इराणच्या पातशहानें लुटून घेतली. अब्दाली कंदहारास आला. इराण्याची फौज पाठलाग करीत आली आहे. जबरदस्तखान व मुकर्रबखान, या प्रांतींचे सरदार व जमिनदार, अब्दालीचे जबरदस्तीमुळें त्यास रुजू होते, तेही बदलोन हंगामा करितात. हल्लीं रफीक होऊन, सेवा करून दाखवूं, अब्दालीस तंबी करूं, ऐशा त्यांच्या अर्ज्या आल्या आहेत. अब्दालीचा धर सुटला आहे. सारांश, त्याचा जोर तिकडून होतो ऐसें नाहीं. तिकडून इराणचे शहानें जेरदस्त केलें, इकडून जोरा पोंचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या व दौलतेचा वारस स्वामीपाशीं देशास आला, तो स्वामींनीं



सन १७५८ तील हिंदुस्तान
जाड्या रेषेच्या आंतील प्रदेश मराठ्यांच्या चौथाई खालीं आला होता.
काबूल
कंदाहार
अटक
काश्मीर
जंमू
लाहोर
मुलतान
सरहिंद
कुंजपुरा
शुक्रताल
मीरत
दिल्ली
अनुपशहर
आग्रा
धवलपूर
इटावे
लखनौ
काशी
गाजीपूर
पाटणा
गया
प्रयाग
जैतपूर
झांशी
जयपूर
अजमेर
जोधपूर
उदेपूर
कोटा
बुंदी
अहमदाबाद
बडोदे
द्वारका
उज्जैन
धार
इंदोर
भोपाळ
सिहोर
माइबाग
भडोच
सुरत
नागपूर
कटक
बालेश्वर
जगन्नाथ
मुर्शिदाबाद
कलकत्ता
मेदिनीपूर
वर्धमान
पंचकोट
सितगांग
नाशीक
औरंगाबाद
पैठण
माहूर
उदगीर
कल्याण
वसई
ठाणें
मुंबई
कुलाबा
पुणें
बारामती
सातारा
पंढरपूर
अकलकोट
सांगोलें
कोल्हापूर
विजापूर
हैदराबाद
विशाखापट्टण
मच्छलीपट्टण
धारवाड
कर्नूळ
सावनूर
गुत्ती
चित्रदुर्ग
सिरें
कडाप्पा
मद्रास
अर्काट
म्हैसूर
श्रीरंगपट्टण
फुलचरी
त्रिचनापल्ली
दिंडिगल
मदुरा
तेलिचेरी
मंगळूर
बंगालचा उपसागर
हिंदी महासागर
नेपाळ
आसाम
तिबेट

आम्हांकडे पाठविला होता. त्यास अटकेअलीकडे थोडीशी जागा वसावयास देऊन अटकेपार काबूल पिशावरचा सुभा देऊं. अब्दालीच्या फौजेवर अब्दुल-समदखान सरहिंदेंत होता, तो सरकारांत पाडाव आहे, तो व आणखी या प्रांतींची फौज, इराणी, मोगल देऊन मशारनिल्हेची रवानगी करितों. हे तिकडील पैरवी करितील, स्वामीचे पुण्यप्रतापें अब्दालीस जोरा पोंचवून तंबी करितील, पारिपत्य उत्तमप्रकारें करून अटकेपार अंमल वसवितील. लाहोर प्रांतीं रेणको अनाजी व रायाजी सखदेव ऐसे ठेविले. गोपाळराव गणेश यांचाही पैगाम आहे. तेही राहतील. इराणचे पातशहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हांस व मल्हारबास आले होते, कीं लौकर कंदाहारेस यावें, आणि यांचें पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्हीं तरी काबूलचा सुभा अब्दुलरहीमखान स्वामींनीं पाठविला, त्यास देतों. फौज वगैरे थोडेंबहुत साहित्यही करितों. काबूल व कंधार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्तानाकडे अकबरापासून आलमगीरपावेतों होते, ते आम्ही विलायतेंत कां द्यावे ? यास्तव तूर्त येथें सुभे देतों. त्यांसही ( इराणचे शहास ) या सुभ्यांची दरकार नसेल. तो इराणचा अंमल करील. आम्हीं कंधारपावेतों अंमल बसवून तूर्त त्यास गोडच जाब पाठविणार आहों. जंबू, काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडीबहुत अटके अलीकडील करीत आहों. पलीकडील तूर्त होत नाहीं. खटपट मात्र होईल. तूर्त तांतडीमुळें जें होईल तें करितों. पुढील स्वारीस जो कोणी सरदार मातबर येईल तो बंदोबस्त करील. मुलूख दोचौं करोडींचा वसुली, परंतु जमीनदार मवास मोठमोठे आहेत. आम्हीं नांवास मात्र खंडणी करितों. जेथें पंचवीस लक्षांचा मुलूख तेथें एक दोन लक्ष येणेंच कठिण आहेत. तूर्त माघारे फिरावयाचा डौल स्वामीचे आज्ञेवरून धरिला आहे. याजमुळें जें होतें तेंच करितों, तटीं लावीत नाहीं. तूर्त अदिनाबेगावरच सारा यखतियार दिल्हा आहे; त्यासच कमाविसीनें लाहोर, मुलतान दिल्हें आहे. यंदांतर सारें शिबंदी खालींच जाईल, शिबंदी वारतांच कठिण पडेल. दोन तीन वर्षांनीं कांहीं सोईस लागेल. स्वामींस कळावें. ”

रघुनाथरावानें सरहद्दीचा बंदोबस्त कसा केला, याचें हें थोडक्यांत चांगलें वर्णन आहे. पेशव्यानें ताबडतोब परत बोलावल्यावरून त्यास पंजाबचा बंदोबस्त अपुरा टाकून दक्षिणेंत जावें लागलें. नानासाहेबास या बाजूची अलीकडील परिस्थिति बिलकूल माहीत नव्हती. या वेळीं परत न जातां मराठे सरदारांनीं ठासून पंजाबांत बसलें पाहिजे होतें, म्हणजे अब्दाली वाढला नसता. पलीकडे इराणी

व इकडे मराठे या शत्रूंच्या मध्यें तो चिरडून जाण्याच्या अगदीं बेतांत आलेला होता. हल्लींच्या इंग्रजांप्रमाणें त्या वेळींही मराठ्यांची बादशाही हाव सिंधूपलीकडे कशी गेली हें वरील पत्रावरून ध्यानांत ठेवण्याजोगें असून, या संधीस मल्हारराव होळकरानें तरी परत जाण्याचें कांहींएक कारण नव्हतें. अंताजी माणकेश्वर लिहितो, "सेवकावर स्वामींनीं कृपा करून पत्र ( १८ एप्रीलचें ) पाठविलें तें पावलें. वर्तमान लाहोरच्या फत्तेचें, शत्रूचे पारिपत्याचें व तिकडील मुलूख कावीज केल्याचें लिहिलें तें सविस्तर वाचून परम आनंद झाला. तो पत्रीं कोठवरी लिहावा. हिंदुस्थानांत कीर्ति लौकिक मातवर जाली. कुल राजे, उमराव, सुभे यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा सूड अब्दालीपासून एक स्वामींनीं घेतला. तेणेंकरून यशाचे पर्वत झाले. स्वामी यशस्वीच आहेत. याचा विस्तार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचें ! हें वर्तमान वजिरांनीं ऐकोन बहुतच हर्ष मानिला. स्वामी अवतारी पुरुष आहेत. त्यांची स्तुत मनुष्यांनीं काय करावी ! सेवकास आश्रा स्वामींचे पायाखेरीज दुसरा कोठेंही नाहीं. जरी स्वामींची छावणी लाहोर प्रांतीं जाली, तरी वजीरपातशहास घेऊन छावणीस आपल्या जवळ घेऊन येतों. वजीर व लहानमोठे सर्व म्हणतात कीं, खासा छावणी न झाली तर पठाण मागतीं लाहोर प्रांतीं पावसाळा येतील. उगेच लोक म्हणतात तें सेवेशी लिहिलें. करणें न करणें यख्त्यार खावंदांचा. वजीर व पातशहा यावयाचा निश्चय कोणे प्रकारचा तो निवडून सेवकास आज्ञा लिहावी, त्याप्रमाणें त्यांस घेऊन विठ्ठल शिवदेव सेवेशीं येतील. त्याप्रमाणें कृष्णरावही येतील. सर्व विनंति करतील." यावरून रघुनाथरावानें घाईघाईनें पंजाबांतून परत न जातां, तेथेंच छावणीस राहणें किती जरूर होतें हें चांगलें कळून येतें. दक्षिणच्या घोड्यांस अटकेवर सिंधूचें पाणी पाजून तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा त्यानें रोविला, येणेंकरून त्यास 'राघो भरारी' हें भपकेदार नांव मिळून, त्या दिखाऊ घमेंडींत अखिल महाराष्ट्र कांहीं काळ दंग झालें, आणि हिंदुपदपातशाहीचें शिवछत्रपतींचें ध्येय सिद्धीस गेलेंसें वाटून धन्यवाद सुरू झाला. मराठे सगळें हिंदुस्थान पादाक्रांत करणार अशी भावना लोकांत पसरली. परंतु यांतील पोकळपणा लवकरच निदर्शनास आला. रघुनाथराव व नानासाहेब या दोघांच्या चुकीमुळें पुढें पानिपतचें अरिष्ट उद्भवलें.

सन १७५८ च्या आरंभीं शिंदखेडची मोहीम आटपून जनकोजी शिंदे उत्तरेंत निघाला. प्रथम उज्जनीस जाऊन जमवाजमव करून तो बुंदी, खेचीवाडा,

राजगड, हरगड, वगैरे ठिकाणच्या खंडण्या घेत जयपूरच्या राज्यांत आला. माधवसिंगाकडून वीस लाख खंडणी घेऊन पुढें वरसादीच्या छावणीचा विचार करणार तोंच उदेपुरच्या राण्यानें शिवपुरची गढी काबीज करण्याकरितां जनकोजीचें साह्य मागितलें. तेथें तीन महिने राहून मारवाडकडील कांहीं वसुली त्यानें केली. पुढें पावसाळ्यांत रघुनाथराव लाहोरचे स्वारीहून परत येत असतां वाटेंत जनकोजीनें त्याची भेट घेतली. मल्हाररावाचे मध्यस्थीनें नजीबखानानें कार्य-भाग बिघडविला, सबब कसेंही करून प्रथम तुम्हीं नजीबखानाचें पारिपत्य करा, असें या भेटींत रघुनाथरावानें जनकोजीस विनवून सांगितलें. " क्रोड रुपये शिबंदी वाढली तरी पुरवेल, एवढी जोड आम्हांस द्यावी. आम्हीच पारिपत्य केलें असतें, परंतु मल्हाररावांनीं धर्मपुत्र म्हणून अगत्य धरून आपले तर्फेनें अंतर्वेद प्रांत कुरुक्षेत्रापासून कुंजपुरादेखील चोवीस लक्षांची मामलत त्याचे स्वाधीन केली. माधवसिंग जयनगरकर, बिजेसिंग मारवाडी वगैरे बहुत धर्मपुत्र मल्हाररावास आहेत, या धर्मपुत्रांचा फलादेशही भोगीत आले. " असें सांगून रघुनाथराव स्वदेशीं आला. म्हणजे जी गोष्ट होळकराकडून त्यास घडवितां आली नाहीं तिचें संकट त्यानें शिंद्याचे गळयांत अडकवून दिलें. मल्हाररावाचा बंदोबस्त वेळींच झाला पाहिजे होता. मागून मल्हारराव होळकर परत येत असलेला जनकोजीस भेटला, तेव्हां त्यानें जनकोजीस आग्रहानें सांगितलें कीं, नजीब-खानाचे साह्यानें भागीरथीस पूल बांधून अयोध्येचें राज्य जिंकावें. नजीबखानास राखावा. त्याचें पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून रामेश्वरपर्यंत जासुदांहातीं पैसा आणवून एकछत्री राज्य करतील. पेशव्यांनीं स्वतः येऊन आपला शह उत्तर हिंदुस्थानांत बसविला ही गोष्ट होळकरास रुचली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील कारभारांत आपण मुखत्यार असावें, त्यांत पेशव्यांनीं दखलगिरी करूं नये, असा मल्हाररावाचा कटाक्ष होता. पुढें दत्ताजी शिंदे मल्हाररावास भेटला तेव्हांही त्यानें हाच बुद्धिवाद दत्ताजीस शिकविला. जनकोजीस हा बुद्धिवाद पटला नव्हता परंतु सरळ दत्ताजीस तो पटला. पुढें रेवाडी नजीक जनकोजी व दत्ताजी यांच्या फौजा एकत्र होऊन ते दिल्लीकडे गेले, तेथें त्यांस पंजाबांत अदिनाबेग मृत्यू पावून गडबड उडाल्याची हकीकत समजली. जनकोजीचा विचार रघुनाथरावाचे सांगीप्रमाणें प्रथम नजीबखानाचें पारिपत्य करण्याचा होता, परंतु दत्ताजीस तो विचार मानवला नाहीं. सन १७५९ च्या फेब्रुवारीपर्यंत यासंबंधीं पुष्कळ वाटा-घाटी चालल्या, आणि पेशव्यास लिहून पुढील उद्योगाची दिशा शिंद्यांनीं ठरविली.

पुढें रघुनाथरावाची व पेशव्याची भेट होऊन उत्तरेंतील कारभारासंबंधीं ता. ५ डिसेंबर १७५८ च्या पत्रांत पेशव्यानें लिहिलें कीं, " दत्ताजी व जनकोजी शिंदे कोठें आहेत, काय मनसुबा करितात तें वरच्यावर कळवावें. वजिराचा अगत्यवाद चि० दादांस आहे. त्याचा पक्ष धरून ( १ ) नजीबखानाचें पारिपत्य करावें; ( २ ) लाहोरचा नवा मुलूख सोडविला तेथें अदिनाबेग मृत्यु पावला, तेथील बंदोवस्त दत्ताजींनीं जाऊन अगत्य करावा; ( ३ ) बंगाल्याकडील काम मातबर असून पैका मेळवावयाची जागा आहे. लाहोरचा बंदोवस्त झाल्यावर सुजाउद्दौला सोबती करून भारी फौजेनिशीं जाऊन पटण्याकडील व बंगाल्याचा मुलूख सोडवावा. ठीक पडल्यास वजिरास समागमें न्यावें. दत्तवा चित्तावर धरतील तें करतील. तसेंच (४) सुजापासून काशी, प्रयागाची नजर व आणखी कित्येक बाबती त्याजकडे लावून पैका साधेल तरी साधावा; एक लाहोरचा बंदोवस्त असल्यास हें करावें. सारांश, सरकारच्या कर्जास पैसा मातबर मिळे तें करावें." एकूण नजीबखानाचा बंदोवस्त, लाहोरचा बंदोवस्त, बंगाल प्रांत सोडविणें आणि तीर्थस्थळें कबजांत घेणें, असे हे चार मनसबे नानासाहेबानें ठरविले होते. रघूजी भोसल्याचे पश्चात् बंगाल प्रांत हातचा गेल्यासारखा होता. इंग्रजांनीं प्लासी जिंकून तिकडे आपला प्रवेश केला होता, परंतु त्या प्रांतावरील आपला शह गमावूं नये अशी हिंदुपदपातशाहीच्या हेतूच्या सांगतेची पेशव्याची भावना होती. अटकेपासून बंगालसमुद्रापावेतोंचा प्रदेश ताब्यांत राखण्याची ताकद एकट्या शिंद्यांची बिलकूल नव्हती. तशांत तिकडील पैसा दक्षिणेंत आणून कर्ज वारण्याची पेशव्याची मनीषाही व्यर्थ होती. शत्रूंचा पाडाव होऊन स्थिरता झाल्याशिवाय पैसा वसूल होत नसतो. तशांत होळकर, विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार मनांतून या उद्देशास विरोधी होते. होळकराचे बुद्धिवादानें शिंद्याचे मनाची मात्र चलबिचल झाली. हे सर्व प्रकार पेशव्यास माहीत होते, प्रत्यक्ष रघुनाथराव ते सर्व पाहून गेला होता. पेशवा या वेळीं पुण्यांत स्वस्थचित्त होता; आणि स्वतः एकवार शिंद्यांबरोबर तो उत्तरेंत आला असता, तर निदान पानिपतचें अरिष्ट तरी बऱ्याच अंशीं टळलें असतें असें वाटूं लागतें. त्या अरिष्टाचीं हीं आद्य कारणें सहसा लक्षांत येत नसतात म्हणून तीं अवश्य तपासलीं पाहिजेत.

पेशव्याचे सांगण्याप्रमाणें दत्ताजीनें कामें सुरू केलीं व तो स. १७५९ च्या मार्चांत लाहोरास गेला. तेथें त्यानें पंजाबची सर्व व्यवस्था नीट लाविली. आणि साबाजी शिंदे व त्र्यंबक बापूजी रेठरेकर या सरदारांस त्यानें बंदोबस्तासाठीं

पंजाबांत ठेवून दिलें. आणि एप्रिल महिन्यांत परत फिरून त्यानें कुंजपुऱ्यास मुक्काम केला, व तेथून नजीबखानाचे साह्यानें भागीरथीस पूल बांधून सुजावर चाल करावी अशी योजना ठरविली. जनकोजी, नारो शंकर व अंताजी माणकेश्वर यांस हा विचार पसंत पडला नाहीं. त्यांचे मनांत नजीबखानाचेंच पारिपत्य प्रथम करावें असें होतें. पेशव्यानें दत्ताजीस लिहिलें, " वजीर मीरशहाबुद्दीनाचा विचार सुधा नाहीं. सुजास वजिरी दिल्यास पन्नास लाख रुपये देतो. आज्ञा जालिया लाहोराहून आल्यावर करूं व सरकारचें कर्ज फेडूं, म्हणून लिहिलें, तें कळलें. ऐशास कर्ज फेडावें हें आपणांसच योग्य आहे. परंतु मीरशहाबुद्दीनास आपणच स्थापिलें. त्यापासून करारांत अंतर पडल्यास मुलाहिजा धरण्याचें प्रयोजन नाहीं. करारांत अंतर नसेल तर काढूं नये. सुजास वजिरी देणें तर काशी प्रयाग हीं दोन स्थळें घ्यावीं; रोख रुपये घ्यावे, तरच सुजास वजिरी द्यावी. रुपये द्यावयास दोन तीन वर्षें लावील तर न द्यावी. कारण तो पैकेकरी जबरदस्त, फौज तोफखाना मोटा, जाठाशीं त्याचा स्नेह, यामुळें सत्वरच भारी होतील. मोगल लोक फावले मार्गांनीं आम्हांशीं वांकडे वर्तावयास अंतर करणार नाहींत. तथापि पन्नास लाख रोख हातास येत, काशी प्रयाग येत, तरी करावें. परंतु त्याची रीत संस्थानिकपणाची दिसते. गंगेपलीकडील संभाळून असावें, दिल्लीचे खटपटींत जीव राहिला नाहीं, निरंतर तुमचे आज्ञेंत चालावें, अबदालीचा शह फावले मानीं दिल्लीवर आहेच. पहिला दिल्लींत ऐवज मातबर होता, मुलूख फार होता, पातशहाचा दबाब होता, यास्तव मनसूरअल्ली वजिरीसाठीं झटत होता. आतां पातशाहींत खजिना नाहीं, मुलूख नाहीं, यास्तव सुजाचें राजकारण खरें लटकें याचा पुरता शोध जाठाचे मार्फतीनें करून, आपणाकडील इतबारी शहाणा सुजाकडे पाठवून, रागरंग पाहून पन्नास लाख रोख व प्रयाग हातास येत असेल तर वजिरी द्यावी. नजीबखानास बक्षीगिरी दिल्यास तीस लाख रुपये देतों म्हणोन लिहिलें. ऐशास, नजीबखान पुरा हरामखोर बाट आहे. गुदस्तां दादाशीं त्याशीं कांहीं मजा राहिली नाहीं. तो दिल्लींत प्रविष्ट जालीया, अब्दालीचें ठाणें बसलेंसें जाणावें. बेइमान हरामखोर आहे. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजण्याप्रमाणें आहे. फावले मानीं त्याचें पारिपत्यच करावें. सुजा प्रयाग न देई, बेरीज मात्र बोलावी, रुपये द्यावयास तीन वर्षें लावावीं, असें करूं लागला, तर गाजुद्दीनाशीं जे जे करार चिरंजिवांनीं केले, ते कायम करून, ते आपण एक होऊन असावें. बाजतबरसाद वजीर पातशहास घेऊन नीट बंगालच्या सुमारें जावें. रोहिले

जमीदार बहुत करून सामील होतील. वजीर तुम्हीं एकदील होऊन बंगालचा रोंख धरावा, तों इकडून चिरंजीव प्रयागाजवळ बुंदेलखंडच्या मार्गें येतील, तुम्हीं वजिरासह अंतर्वेदींतून यावें. असा भारी शह पडल्यावर भारी नजर व काशी, प्रयाग दिल्यास, बादशहा व वजीर यांस समजावून सुजास बक्षीगिरी द्यावी हा दुसरा प्रकार. वजीर न येई तों तुम्हींच सुजास मेळवून घेऊन, काशी प्रयाग घेऊन, बंगाला पटणें निंमे देऊं करून, दोघांनीं मिळून सोडवावा हा तिसरा प्रकार. या तीनही मनसव्यांत जो पक्का बनेल तो करावा. दिल्लींत लहान वकील लबाड फार बोलत असतात. उगीच गोष्ट फुगवून राजकारण अडकवून पाडावें, निशेस ठिकाण नाहीं, तुमचा सरळ कारभार, यास्तव हरएक राजकारण पक्के निशेचें कोणतें याचा शोध पुरता घ्यावा. तूर्त तुम्ही लाहोर प्रांतीं गेलां, तिकडेही काम फार आहे. यामुळें उशीर लागेल, छावणीही त्या प्रांतें होईल. तेव्हां हा मनसवा बाजतबरसाद जाईलसें वाटतें. तथापि लाहोरकडील बंदोबस्त सत्वर होऊन तुम्ही छावणीस, दिल्ली आसपास आलां तर हीं राजकारणें घडून येतील. ” हे बेत पेशव्यास घरीं बसून सुचलेले केवळ प्रचंड कल्पनातरंग होते, ते बिलकूल सिद्धीस गेले नाहींत. त्यांस लागणारी तयारी बिलकूल नव्हती.

गाजीउद्दिनानें मराठ्यांची मदत घेऊन नजीबखानास उखडण्याचा चालविलेला प्रयत्न बादशहास रुचला नाहीं. या दोन बलाढ्य उमरावांस एकमेकांविरुद्ध लढवून बादशहा स्वतःचा कसावसा टिकाव धरीत होता. शहाजादा अल्लीगौहर यावर बादशहाची मोठी भिस्त होती. गाजीउद्दिनानें सर्व राजकुटुंबावर सक्तपेहेरवी ठेविली होती. पण बादशहानें युक्तीनें शहाजाद्यास बाहेर काढून पराक्रम गाजविण्यासाठीं दूर पाठवून दिलें. तो ठिकठिकाणीं हिंडत गेला. रोहिल्यांनीं त्यास मदत केली नाहीं, तेव्हां तो अलाहाबादेवरून बहार प्रांतांत गेला. नंतर बादशाहानें त्यांची नेमणूक बंगालच्या सुभ्यावर केली. सुजाउद्दौला व काशीचा बळवंतसिंग यांची मदत त्यास मिळाली. शहाजाद्याची ही चलती पाहून गाजीउद्दीन घाबरला, आणि दत्ताजीच्या मदतीनें आपला बंदोबस्त करूं लागला. पुढें शहाजादा व सुजा यांनीं सन १७५९ चे मार्चांत पाटणावर चाल केली त्या वेळीं बंगाल प्रांत इंग्रजांच्या मदतीनें मीरजाफरानें घेतला होता. म्हणून पाटणाचा कारभारी रामनारायण यास क्लाइव्हची मदत येऊन त्यानें शहाजाद्याचा पराभव करून त्यास परत फिरविलें, तेव्हां तो अलाहाबादेस सुजाच्या आश्रयास येऊन राहिला. दत्ताजी शिंदे लाहोराहून परत आला, तेव्हां मराठ्यांचा अंमल दिल्लींत कायम होणार अशी भीति

वाटून नजीबानें व बादशहानें अबदालीस निकडीचीं पत्रें लिहून हिंदुस्थानांत बोलाविलें, आणि दत्ताजीस गंगेवर पूल बांधून देण्याच्या गुळचट थापा देऊन स्वस्थ बसविलें. नजीबखानाचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीस पेशवा लिहून लिहून थकला, पण या वेळीं दत्ताजीस केवळ भुरळ पडल्याप्रमाणें झालें. दत्ताजीनें पुनः पेशव्याचा सल्ला विचारला त्यास पेशव्यानें लिहिलें, " वजीर मीरशहाबुद्दीन सर्व आपल्या लक्षांत आहेत, त्यांजकडून करारांत अंतर नाहीं, सबब सुजास वजिरी देऊं नये. वजिराकडून अंतर पडेल व सुजाकडून पन्नास लाख मिळतील तर सुजास वजिरी देण्यास हरकत नाहीं; नजीबखान बाट, अर्धा अब्दाली, त्याचें राजकारण न करावें. सुजाउद्दौला व जाठ एक झाल्यास भारी होईल, सबब आहेत वजीर तेच फार उपयोगी." दत्ताजीचा हेतु कांहीं मोठा उद्योग करून पेशव्याचें कर्ज फेडण्यासाठीं पुष्कळसा पैसा मिळवावा. त्यासाठीं सुजावर स्वारी करण्याचा दत्ताजीनें निश्चय केला होता. पण नजीबखानाचा हेतु दत्ताजीस गंगेवर पूल बांधून देण्याचा नसून केवळ अब्दाली येईपर्यंत त्यास थोपवून धरण्याचा होता. नजीबखानानें दत्ताजीस आशेस गुंतवून सहा महिने पावेतों त्यास कांहीं करूं दिलें नाहीं. शेवटीं कंटाळून दत्ताजीनें पूल तयार होत नसेल, तर तुम्हीच येऊन मिळा, असें नजीबास कळविलें. तेव्हां नजीबानें पुलाचा कबजा घेऊन तो गंगेपलीकडे शुक्रतालावर बंदोबस्तानें मराठ्यांशीं लढूं लागला. हा पूल ताब्यांत घेण्यासाठीं तीनचार महिने मराठे रोहिल्यांची रोज झटापट चालू राहिली. परंतु हजार पांचशें माणूस जायां होऊनही हेतु साध्य झाला नाहीं. तेव्हां गंगेस हरिद्वाराजवळ वर उतार पाहून गोविंदपंत बुंदेले, अंताजी माणकेश्वर, तुकोजी होळकर वगैरें सह दत्ताजी आक्टोबरच्या शेवटीं गंगापार झाला. परंतु ही स्वारी आपणावर येणार असें पाहून सुजाउद्दौल्यानें रोहिल्यांच्या मदतीस सैन्य पाठविलें. त्यांनीं मराठ्यांच्या सैन्याचा पराभव केला. दत्ताजीस खाजगी भेटीस बोलावून मारण्याचाही नजीबाचा बेत होता. पण जनकोजी वगैरे मंडळींनीं दत्ताजीस नजीबाचे भेटीस जाऊं दिलें नाहीं. मात्र या वाटाघाटींत पंधरा दिवस फुकट गेले. याच वेळीं अब्दाली पंजाबांत आल्याची खबर आली. त्याचें थोडेंसें सैन्य पुढेंही येऊन पोंचलें. साबाजी शिंदे अब्दालीकडून पराभूत होऊन परत आलेला ता. ८ नोव्हेंबर रोजीं दत्ताजीस भेटला. घाईघाईनें नजीबाचा पाडाव करून व सुजास वळवून घेऊन अब्दालीच्या सामन्यास निघण्याचा प्रथम दत्ताजीचा विचार होता. पण यांपैकीं कांहींही त्यास साधलें नाहीं. सुजाउद्दौल्यानें सलुखाच्या वाटाघाटींत

दत्ताजीस आणखी एक महिना अडकवून ठेविलें. यामुळें दत्ताजीचा सर्वस्वी घात झाला. या वेळीं प्रसंग पाहून मागें सरकून त्यानें तावडतोब दक्षिणेकडे माघार घ्यावयास पाहिजे होती, परंतु शत्रूस भिऊन पळाल्याचा दुर्लौकिक पदरीं घेण्यापेक्षां मृत्यु पतकरण्याचा निश्चय करून सर्व लहान थोर मंडळीच्या सल्ल्याचा अव्हेर करून, दत्ताजी दिल्लीच्या बाजूसच चिकटून राहिला. ता. ११ डिसेंबर रोजीं शुक्रताल सोडून दत्ताजी अब्दालीचे सामन्यास वळला. मुलें माणसें व जनकोजी शिंदे यांस त्यानें दिल्लीकडे पाठविलें, आणि आपण सडा होऊन अब्दालीची व नजीबखानाची गांठ पडण्यापूर्वी त्यास गांठण्यासाठीं दत्ताजी चालला. या झटापटींत दत्ताजीची अघाडी अब्दालीच्या अघाडीस भिडून एक मोठी लढाई झाली. गिलच्यांनीं पळण्याचें सोंग करून मराठ्यांस पूर्णपणें अंगावर घेतलें, व नंतर एकदम उलट खाऊन, यमुनेच्या अडचणींत त्यांस जोरानें रेंटलें. या वेळीं कुणबी जोंधळ्याचीं कणसें कापितो तसे त्यांनीं मराठे कापून काढिले. मागून दत्ताजी त्यांचे मदतीस निघाला असतां वाटेंत त्रिंबक बापूजीचे पथकांतील गिलच्यांनीं नागवलेले पंजाबांतून परत आलेले उघडे बोडके लोक त्यास भेटले. त्यांस पाहून दत्ताजीस परम दुःख झालें. तरी तो डगमगला नाहीं. या लढाईनंतर अब्दाली यमुना ओलांडून अंतर्वेदींत शुक्रतालावर नजीबखानास जाऊन मिळाला.

इकडे ता. ३ जानेवारी १७६० रोजीं दत्ताजी दिल्लीस दाखल झाला. त्याच्या पूर्वींच एक महिना वजीर गाजीउद्दिनानें, आपल्या विरुद्ध अब्दालीस इकडे आणविल्याबद्दल, बादशहाचा शिरच्छेद करविला, आणि राजघराण्यांतील एका लहान मुलास ‘ शहाजहान सानी ’ असें नांव देऊन तक्तावर बसविलें. दत्ताजी हट्टास पेटून मागें सरकत नाहीं असें पाहून त्याची बायको भागीरथीबाई इनें अनेक माणसांस भीड घालून दत्ताजीचे समजुतीस पाठविलें. परंतु अपयश घेऊन नानासाहेबांस व भाऊसाहेबांस तोंड काय दाखवावें हें त्याचें एकच उत्तर असे. शेवटीं भागीरथीबाईची प्रसूति नजीक आलेली पाहून दत्ताजीनें जनकोजीस बायका मुलें घेऊन चंबळेपार जाण्यास सांगितलें, परंतु जनकोजीनें एकट्यानें जाण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां रूपराम कटारी या समागमें चंबळेपलीकडे बायका मुलांची रवानगी दत्ताजीनें करून दिली. नंतर शिंदे यमुनेच्या घाटीं व पलीकडे दुआबांत अब्दाली अशी उभयतांची समोरासमोर गांठ पडली. अब्दालीच्या सेनापटुत्वाचा मराठ्यांस अनुभव नव्हता. त्याच्या पंजाबांतील थोड्याशा शिबंदीचा आपण पराभव केला, त्यामुळें रघुनाथरावाची अब्दालीच्या कर्तृत्वासंबंधानें चुकीची समजूत

झाली. या चुकीच्या अंदाजामुळेंच पेशवा, होळकर व दत्ताजी हेही थोडे बेफिकीर राहिले असावे. मल्हारराव होळकर या वेळीं जयपूरच्या सुमारास होता, त्यास शिंद्यांस जाऊन मिळण्याविषयीं पेशव्यानें अनेकवार लिहिलें व दत्ताजीनेंही त्यास निकडीनें बोलाविलें, परंतु तो वेळेवर आला नाहीं. ता. २९-१-६० रोजीं पेशव्यानें गोविंदपंतास लिहिलें, "अब्दाली आल्यामुळें उभयतां शिंदे, रोहिल्यांचा कारभार तसाच ठेवून गेले. तेच समयीं मल्हारजी होळकरास सामील करून जावयाचें होतें, तें न केलें. मल्हारबांनीं आधीं काम कोणतें करावें, मग कोणतें करावें, माधोसिंगाचा मजकूर काय, जेव्हां म्हटलें तेव्हां त्याचें पारिपत्य करतां येईल, तो विचार मल्हारबांनीं न केला. दत्तबा तों ईश्वराच्या घरचे शिपाई. त्यास अब्दालीची तमा काय? जाऊन गांठ घालतील. ते त्यास सोडतील ऐसें नाहीं. मल्हारबास वारंवार जावयाविशीं पत्रें पाठविलीं. बहुत करून सामील जालेच असतील. प्रस्तुत पत्रें त्यांस व दत्तबांस पाठविलीं आहेत हीं त्यांस देणें. अब्दालीचे पारिपत्याविषयीं तुम्ही सर्व प्रकारें मनःपूर्वक मेहनत करीत असालच. इकडे निजामाचा गुंता लवकरच वारून चि० दादास अविलंबें रवाना करतों. चार दिवस अधिक लागले तरी फौज दहा हजार त्वरेनेंच पाठवितों. तुम्हीं आपले कमाविसदारांची खबरदारी ठेवणें." दत्ताजीच्या पराक्रमाविषयीं पेशव्यास मोठी खात्री असल्यामुळें तो थोडासा जास्त निश्चिंत राहिला असें स्पष्ट दिसतें. दत्ताजीनें घाई न करतां जरा मागें सरकून मल्हारराव येईपर्यंत सावधगिरीनें निभावून नेलें पाहिजे होतें. "तजविजीनें सांभाळून काम करावें, जातीनिशीं जायां होऊं नये, सरदारीनें काम करावें," हें तत्व पेशव्यानें दत्ताजीस वारंवार लिहिलें, परंतु तें त्यानें मानलें नाहीं.

ता. १०–१–६० रोजीं गिलचे बदाऊंच्या घांटावर यमुना उतरून अलीकडे येऊं लागले. त्यांस थांबवण्याचा प्रयत्न जानराव वाबळ्यानें कसून केला. त्यास घाटावर दम निघेनासा झाला, तेव्हां बयाजी शिंद्यास दत्ताजीनें वाबळ्याचे मदतीस पाठविलें. पण हल्ला करतांना बयाजी गोळी लागून ठार झाला. दुराणी व रोहिले यांनीं घांट काबीज केला. दुसऱ्या बाजूस गोविंदपंत बुंदेले लढत होता, त्यासही गिलच्यांनीं अडवून धरिलें. हें ऐकतांच स्वतः दत्ताजी व जनकोजी स्वार होऊन बाहेर पडले. त्यांचा उद्देश आपली फौज सोडवून मल्हारराव येईपर्यंत माघार घ्यावी असाच होता. परंतु शत्रूंनीं एकदम चाल केली. तोफांचा व बंदुकांचा मारा अतिशय झाला. नदीच्या तीरावर भारी अडचण होती. पळून जाण्यास

सोईचें नव्हतें. एका बाजूस मालोजी शिंदे लढत होता तो पडला, तरीही दत्ताजी व जनकोजी निशाणापाशीं लढत राहिले. तों जनकोजीच्या दंडास गोळी लागून तो बेशुद्ध पडला. हें वर्तमान दत्ताजीस समजतांच त्यानें जोरानें शत्रूवर घोडे घातले. त्या गर्दींत यशवंतराव जगदाळे गोळी लागून पडला. त्याचें प्रेत काढावयास दत्ताजी पुढें झाला, तों उजवे बरगडींत गोळी लागून तोही गतप्राण होऊन खालीं पडला. तेव्हां सर्वांचीं अवसानें गेलीं. घांट सोडून लोक मागें मैदानांत आले. जनकोजी घायाळ होता, त्यास येसाजी भोईटे व जानराव वावळे यांनीं घोड्यावर घालून ज्यास जसें सुचलें तसे पळत चालले. पाठीवर गिलचे डोचकीं कापीत चालले. शिंद्यांचें सर्व सामान, हत्ती, वगैरे दुराणीनें हस्तगत केलें. या लढाईस बदाऊंच्या घांटाची लढाई म्हणतात. या लढाईंत सात आठ हजार मनुष्य जायां झालें. दत्ताजीचा नोकर राजाराम चोपदार यानें यमुनेच्या कांठीं दत्ताजीचें शव दहन केलें. जनकोजी वगैरे मंडळी पळत पळत मागें कोटपुतळी येथें येऊन पोंचली. तेथें त्यांस मल्हारराव होळकर भेटला. शिंदे व पेशवे यांचीं निकडीचीं पत्रें जात असतां दोन तीन महिने तो रेंगाळत मागें कां राहिला हें समजत नाहीं. कसेंही असलें तरी त्याच्या कुचराईमुळें सर्व भार शिंद्यांवर पडून मराठ्यांची बाजू अजीबात ढांसळली.

मराठ्यांच्या इतिहासांत जे कित्येक हृदयद्रावक प्रसंग आहेत त्यांत दत्ताजीच्या वरील पराक्रमाची गणना केली पाहिजे. पानपतच्या प्रचंड संहारानें दत्ताजींचें अचाट कृत्य लोपून गेलें आहे. धन्याची कामगिरी पार पाडण्याकरितां त्यानें आपल्या प्राणांची आहुती दिली. कोट रुपये मिळवून पेशव्याचें कर्ज वारावयाच्या नादास लागून त्यानें सहा महिने व्यर्थ गमाविले. पुढें अब्दाली आंगावर आला तरी पळून जाण्याची कल्पना त्यास आवडली नाहीं. या वेळीं होळकर मदतीस येता तर दोघांनीं मिळून याच वेळीं अब्दालीस जेर केलें असतें. होळकराची भिस्त सलुखाच्या बोलाचालीवर व गनिमी काव्यानें लढण्यावर होती. त्याचे उलट शिंदेघराण्याचा स्वभाव शत्रूस समोर गांठण्याचा होता. होळकराच्या पद्धतीनें कोणत्याही प्रकरणाचा निकाल एकदम न होतां तो दिवसगतीवर पडे, व त्यामुळें शत्रूस वेळ सांपडून कार्यभाग बिघडे. या वेळीं नानासाहेबासारखा हुकमत चालविणारा गृहस्थ उत्तरेंत असता तर मराठ्यांचे हेतू सिद्धीस गेले असते. परंतु केवळ शिलेदारीवर भार पडल्यामुळें सर्वत्र घडी विसकटली.

पुढें होळकर व जनकोजी शिंदे यांनीं एकत्र झाल्यावर दक्षिणेंतून फौजा येई-पर्यंत गनिमी काव्यानें अब्दालीस जेर करण्याचा उपक्रम आरंभिला. गिलचे पाठलाग करतील तसे हे मारवाडांतून कर्नूलास, कर्नूलाहून दिल्लीस, दिल्लीहून आग्र्यास, आग्र्याहून जयपुरास असे पळत जात. अशा प्रकारानें दुराणी न दमतां मराठ्यांसच पुरे पुरे झालें. या वर्षीं सुबत्ता फार होती, त्यामुळें सामुग्रीची टंचाई कोठेंच भासली नाहीं. ता. १ मार्च १७६० रोजीं मराठ्यांच्या फौजेनें यमुना उतरून शिकंदरा लुटला. होळकराचा बेत अब्दालीस भिडून लढाई देण्याचा होता, परंतु शिंद्याच्या फौजेनें दहशत खाल्ली असल्यामुळें, कोणास अवसान राहिलें नाहीं. होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत हा अब्दालीच्या टेहेळणीवर यमुनातीरास होता. त्याची व अब्दालीची सन १७६० च्या एप्रील व मे महि-न्यांत पुष्कळ वेळां चकमक उडून एक दिवस मोठी लढाईही झाली. हजार पांचशें मनुष्य पडल्यावर मराठ्यांनीं पळ काढला. या लढाईंत होळकराचे सटवाजी खराडे व महिपतराव दिवाण हे सरदार पडले. यानंतर मराठ्यांच्या फौजा जयपूरच्या दक्षिणेस किरवलीच्या सुमारास तळ देऊन राहिल्या, व अब्दालीनें गंगेच्या कांठीं अनूपशहर येथें पावसाळ्याची छावणी केली. येथपासून पुढें आतां कसा बनाव चालू झाला तें पुढील प्रकरणीं पाहूं.

---

प्रकरण १७ वें.

## पानिपतचें प्रचंड युद्ध.

दिल्ली येथें बदाऊंच्या घांटावर लढाई होऊन दत्ताजी शिंदे पडला, आणि पुढें शिंदे होळकरांची अत्यंत वाताहत झाली. या बातम्या वरचेवर येऊन पेशव्यास मिळाल्या, त्या वेळीं तो स्वतः नगरास असून सदाशिवराव, विश्वासराव व रघु-नाथराव हे सर्व फौजांसह निजामाशीं झुंजत होते. प्रथम नानासाहेबाचा असा अंदाज होता कीं, शिंदेहोळकर हे अब्दालीस अडविण्यास पुरेसे आहेत. त्यांच्या मदतीस रघुनाथरावास पाठविण्याचा बेत पेशव्यानें आधींच केला होता. परंतु शिंद्यांच्या पराभवाची बातमी आल्यावर पुष्कळांच्या तोंडचें पाणी पळालें. शिंदे-होळकरांस अब्दाली तोलण्यासारखा नाहीं याबद्दल सर्वांची खात्री झाली. मरा-ठ्यांची पाठ फिरल्याबरोबर हा लगोलग परत येऊन त्यांचा उद्योग सालोसाल निष्फळ करून टाकतो, तर त्याचा कायमचा निकाल लावावा अशी योजना पेश-

ण्यानें मनांत आणून, त्यानें उदगीरची मोहीम आटोपून सर्वांस ताबडतोब परत बोलाविलें; आणि हिंदुस्थानचे वाटेवर पूर्णा नदीचे कांठीं पटदूर येथें पेशव्याच्या व सरदारांच्या भेटी झाल्या. येथें ता. ७ मार्च सन १७६० पासून एक आठवडाभर कडाक्याची वाटाघाट अहोरात्र होऊन, सदाशिवरावास मोठ्या फौजेनिशीं उत्तरेंत पाठविण्याचा पेशव्यानें निश्चय केला. गेल्या सात आठ वर्षांत उत्तरेंतील राजकारण रघुनाथरावानें सांभाळावें अशा हेतूनें त्याची योजना त्या बाजूस करण्यांत येत असे. पण त्याच्या कारभारामुळें कर्ज होणें, सरदारांत फाटाफूट होणें, तिकडील सत्ताधीशांस जरब न राहणें, वगैरे कारणांमुळें जी अव्यवस्था माजली त्यामुळें रघुनाथरावाचा नाकर्तेपणा सर्वांस कळून चुकला होता. पटदुरास या गोष्टींची उघड चिकित्सा सदाशिवरावानें केली. रघुनाथरावाखेरीज इतर कोण पाठवावयाचा याचा विचार करितां, सर्वांस धाकांत ठेवून तडकाफडकीनें कामें उरकण्याची ताकद फक्त सदाशिवरावांत होती, त्याचेंच नांव सर्वांच्या तोंडांत आलें. युद्धकला, लेखनचातुर्य, हिशेब, जरब, शहाणपण इत्यादि बाबतींत सदाशिवरावाहून जास्त लायक इसम त्या वेळीं महाराष्ट्रांत दुसरा नव्हता. सालोसाल कर्नाटकांत जाऊन तिकडील कार्यभाग व निजामाचा कार्यभाग त्यानेंच सिद्धीस नेला होता. अब्दालीचें प्रकरण मागच्या स्वाऱ्यांप्रमाणें तात्पुरतें न मिटवतां त्याचा कायमचा सोक्षमोक्ष करण्यास, तशाच निग्रहाचा व वजन पडण्यासारखा इसम पाहिजे होता. सदाशिवरावांत या स्वारीच्या बाबतींत एवढेंच वैगुण्य होतें कीं, त्यास उत्तर हिंदुस्थानांतील मुलखाची, माणसांची व व्यवहारांची प्रत्यक्ष माहिती व वाकबगारी बिलकुल नव्हती. तो तिकडे कधीं गेलेला नव्हता. कर्नाटकांतील व निजामाकडील दक्षिणेचा अनुभव उत्तरेंतील पठाणांशीं वागतांना उपयोगीं पडणारा नव्हता. पण या विषयांतील उणेपणा शिंदे, होळकर, बुंदेले वगैरे सरदारांच्या साह्यानें भरून निघेल अशी पेशव्याची समजूत होती. सदाशिवराबाबरोबर मोठ्या तोफखान्यासह इब्राहिमखान गारदी, दमाजी गायकवाड, बळवंतराव मेहेंदळे, नाना पुरंदरे, नाना फडणवीस, महिपतराव चिटणीस वगैरे मंडळी असून, पेशव्यांचे घरांतील खासा म्हणून अनुभव मिळण्यासाठीं विश्वासराव दिला. या वेळीं बहुधा सखारामबापूस भाऊसाहेबानें मागितलें असावें, पण रघुनाथरावानें त्यास दिलें नाहीं.† माळव्यांत गेल्यावर यशवंतराव पवार, अप्पा-

† राजवाडे—खंड १२ ले. १७९ च्या ता. १६—९—१७७६ च्या कागदांत भाऊसाहेबांच्या तोतयाची परीक्षा घेण्याचे बाबतींत रघुनाथराव लिहितो, "तीर्थ-

जीराव आटोळे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, समशेर बहाद्दर, विठ्ठल शिवदेव, वगैरे सरदार त्यांस येऊन मिळाले. खर्चासाठीं नानासाहेबानें एक कोट रुपये व मुवलक साहित्य सदाशिवरावाबरोबर दिलें. स्वारीबरोबर यात्रेच्या निमित्तानें सदाशिवरावाची बायको पार्वतीबाई, विश्वासरावाची लक्ष्मीबाई, नाना फडणिसाची बायको व आई वगैरे कांहीं थोड्या बाया होत्या. स्वारीचा थाट अपूर्व असून एवढी मोठी मराठ्यांची स्वारी मागें कधीं झाली नव्हती. गनिमी काव्यानें लढून अब्दालीचा पाडाव होणार नाहीं अशी खात्री झाल्यानें या वेळीं तोफखाना, गारदी, वगैरेंच्या जोरावर समोरासमोर युद्ध करून अब्दालीस चीत करण्याचा निश्चय पटदुरावर ठरला.

पटदुराहून सदाशिवराव ता. १४ मार्च १७६० रोजीं निघाला तो वाटेनें ब्र्हाणपूर, हंडिया, सिहोर, भोपाळ, सिरोंज वगैरे गांवांवरून जूनच्या आरंभीं ग्वालेरीस येऊन पोंचला. निघाल्यापासूनच रजपूत, जाठ, सुजाउद्दौला, रोहिले, बुंदेले वगैरे सत्ताधीशांकडे वकील पाठवून त्यानें खंडण्या वसूल केल्या आणि त्यांनीं मराठ्यांच्या पक्षास मिळावें अशी खटपट चालविली. गोविंदपंत बुंदेल्यास सांगून अब्दालीच्या हालचालीची व मसलतीची बातमी आपणास दररोज मिळावी, अशी व्यवस्था सदाशिवरावानें केली. चारी दिशांस पत्रें पाठवून तो इत्थंभूत माहिती मिळवी. वाटेंत अहीर वगैरे ज्या लोकांनीं व जमीनदारानीं दंगा आरंभिला होता, त्यांचा बंदोबस्त सदाशिवरावानें केला. मराठ्यांस आरंभीं वाटलें होतें कीं, पावसाळा लागतांच अब्दाली परत काबुलास जाईल, परंतु पूर्व प्रघात मोडून या वर्षीं अब्दाली अंतर्वेदींत छावणी करून राहिला. यावरून त्याचीही इच्छा नजीबखान वगैरे मुसलमानांच्या सांगण्यावरून मराठ्यांची ही ब्याद कायमची नाहींशी करण्याची होती असें दिसतें. या वेळीं रजपूत राजेरजवाडे बहुधा तटस्थ होते,

---

रूप भाऊसाहेब हिंदुस्थानांत गेले तेव्हां मजपाशीं अगोधर काय बोलले, तेव्हां हिंदुस्थानांत जाण्याचा निश्चय केला. ती. कै. नानासाहेबांचीं व त्यांचीं व आमचीं भाषणें कशीं कशीं झालीं ? त्या वेळीं विठ्ठल शिवदेव व फडणीस व दादू फौजदार वगैरे कोणते कोणते मागून घेतले व कोण दिल्हे तें सविस्तर (या तोतयास ) पुसणें." यावरून या पटदूरच्या वाटाघाटींत सदाशिवराव व रघुनाथराव यांची बरीच हमरातुमरी झाली असावी असें अनुमान होतें.

किंवा मनांतून मराठ्यांच्या विरुद्ध होते. कारण नागोरच्या स्वारीपासून रजपुतांचीं मनें साफ बिघडलीं होतीं. सुजाउद्दौला आरंभीं दोन दगडींवर हात ठेवून विचार करीत होता, परंतु नजीबखानानें फारच चातुर्यानें त्याचें मन वळवून अब्दालीकडून त्यास वजिरी देण्याचें वचन देऊन, व मोठा मानमरातब राखून, त्यास पुढें पावसाळ्यांत अब्दालीकडे वळविलें. सर्व मुसलमानांची मराठ्यांविरुद्ध एकी करण्याची नजीबखानानें या वेळीं शिकस्त केली. इतकें झालें तरी सुजास व नजीबखानाखेरीज इतर रोहिल्यांस अब्दालीच्या पक्षांतून फोडण्याचा मराठ्यांचा प्रयत्न शेवटपर्यंत चालूच होता.

ता. ८ जून १७६० रोजीं चंबळ नदी ओलांडून गेल्यावर एकदम पावसाळा सुरू झाला, त्यामुळें आग्र्याच्या अलीकडे गंभीर नांवाची एक लहानशी नदी आहे तिला पूर येऊन सदाशिवरावास एक महिना तेथें कुचंबून राहावें लागलें. मराठ्यांना या वेळीं नावा न मिळाल्यामुळें नदीपलीकडे जाण्यास पायउतारावरच अवलंबून रहावें लागे. जुलैच्या आरंभीं सदाशिवरावास गंभीरनदीपलीकडे मुचकुंदतीर्थावर शिंदे होळकर फौजांसह मिळाले. या ठिकाणीं मोठा दरबार भरवून सदाशिवरावानें दत्ताजी पडल्याबद्दल जनकोजीची समजूत केली व त्यास मोठ्या सन्मानानें सरदारीचीं वस्त्रें दिलीं. अशा दरबारांत या स्वारींत पेशव्याच्या ठिकाणीं विश्वासराव मुख्य जागीं बसत असे. आग्र्यास गेल्यावर तेथून अब्दालीवर स्वारी करावयाची तर यमुना ओलांडावयास पाहिजे होती. पण मराठ्यांस नावा बिलकुल मिळाल्या नाहींत. यमुनेस उतार नसल्यामुळें अलिकडच्या बाजूस मराठे व पलीकडच्या बाजूस गिलचे अशी स्थिति चार महिने राहिली. अंतर्वेदींतील कडाकुऱ्याच्या बाजूचा पूर्वेकडील भाग गोविंदपंत बुंदेल्याच्या ताब्यांत होता. तेथून त्यानें अब्दालीस पायबंद द्यावा, अशी सदाशिवरावानें त्यास अनेक वेळ आज्ञा केली, परंतु त्याच्या जवळची फौज मोठी नसल्यानें त्यास हें काम करतां आलें नाहीं. आग्र्याहून मराठ्यांची स्वारी मथुरेस आली. तेथें अधिकश्रावणमास असल्यामुळें सर्वांनीं मथुरा, वृन्दावन, गोकुळ वगैरे ठिकाणच्या यात्रा यथास्थित केल्या. समोरच्या तीरावर अब्दाली होता, त्याची कोणास यत्किंचित् पर्वा वाटली नाहीं. मथुरा येथें सुरजमल जाठ सदाशिवरावाच्या भेटीस आला. त्यास एक कोस सामोरें जाऊन सदाशिवरावानें त्याचा बहुमान केला, व त्याची मदत संपादन केली. मराठ्यांच्या फौजेस रसद पोंचविण्याची हमी त्यानें घेतली, व यमुनेपार दोनतीन हजार फौज उतरवून सकुरा-

बादचें ठाणें त्यानें घेवविलें. यमुनेस उतार नाहीं त्या अर्थी अब्दालीवर एकदम चालून जाणें शक्य नसल्यानें, यमुनेच्या दक्षिण तीरावरच मराठ्यांस राहणें भाग आलें. त्यांनीं या फुरसतींत दिल्ली कावीज करण्याचा विचार केला. दिल्लींत अब्दालीच्या वजिराचा भाऊ याकूबअलीखान एक हजार फौजेनिशीं रक्षणास होता. इब्राहिमखानानें खंदकावर मोर्चे देऊन तीन तोफांचा मार दिला, तेव्हां किल्ल्याचा एक एक बुरूज धडाधड खालीं कोसळूं लागला. अब्दाली या वेळीं यमुनेपलीकडे उभा होता, परंतु त्यास मदत करितां येईना. इब्राहिमखानाच्या तोफखान्याचा प्रभाव पाहून एवढा इसम आपल्या बाजूस असेल तर साऱ्या हिंदुस्थानचें राज्य आपण हाकूं, असे अब्दालीनें उद्गार काढिले. याकूबअल्लीनें आपणास सुरक्षित जाऊं देण्याच्या अटीवर किल्ला खालीं करून देऊन तो पलीकडे अब्दालीस जाऊन मिळाला. ता. १ आगष्ट १७६० रोजीं मराठ्यांचें निशाण दिल्लीवर लागलें. मराठ्यांच्या सार्वभौमत्वाविषयीं हुजत घालणाऱ्या अब्दालीच्या डोळ्यांदेखत मुसलमानांची सहाशें वर्षांची राजधानी हस्तगत केल्यानें मराठ्यांच्या पराक्रमाची परीक्षा सहजच झाली. किल्ल्यांतील सर्व मालमिळकत मराठ्यांनीं ताब्यांत घेतली. दिल्ली काबीज केल्याबद्दल सदाशिवरावास मोठी धन्यता वाटली. त्यानें मोठा दरबार भरवून सर्वांकडून विश्वासरावास नजरा करविल्या; आणि दिल्लीच्या रक्षणास व शहरांतील बंदोवस्तास पांच हजार फौजेनिशीं नारो शंकर यास राजेबहाद्दर असा किताब देऊन नेमिलें.

या विजयानें मराठ्यांचा दरारा सर्वांवर बसला. अब्दालीच्या फौजेस नजीबखानाच्या नादीं लागून आपण व्यर्थ या संकटांत पडलों असें वाटूं लागलें. सुजाउद्दौला, अहंमदखान बंगष, हाफीज रहमतखान वगैरे सरदार मराठ्यांचें शत्रुत्व जोडल्याबद्दल हळहळ मानूं लागले. अब्दालीचे अफगाण पठाण स्वदेशीं जाण्यास उत्सुक झाले, व कांहीं निघूनही गेले. अशा स्थितींत सुजास फोडून आणिलें म्हणजे अब्दाली आपोआप निघून जाईल, अशा समजुतीनें सदाशिवरावानें तो प्रयत्न चालविला. रोहिले सरदारांसही त्यांनीं गोविंदपंतास जाऊन मिळावें असें सदाशिवरावानें सुचविलें. परंतु ते तोंडानें गोड बोलत तरी अब्दालीच्या समक्ष तो हिंदुस्थानांतून निघून जाईपर्यंत त्यांस हूं चूं करण्याची सोय नव्हती. अब्दालीनेंही तहाचें बोलणें सुरू केलें, परंतु हिंदुपदपातशाहीचा प्रश्न निकालास लावण्यासाठीं व अब्दालीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठीं सदाशिवराव जय्यत तयारीनें आला असल्यामुळें, अब्दालीचा चांगलाच पराभव होईपर्यंत तहाची

गोष्ट त्यानें मनावर घेतली नाहीं. अशा स्थितींत एवढया मोठ्या फौजेसह दिल्लींत पावसाळा संपेपर्यंत दोन महिने स्वस्थ राहणें मराठ्यांस भाग आलें. शहाजादा अलीगौहर, जो पुढें शहाआलम बादशहा झाला, तो या वेळीं अलाहाबादेस होता. त्यास दिल्लीस परत आणण्याची सदाशिवरावानें पुष्कळ खटपट केली. त्याच्याकडून सुजास वजिरी देववून, अब्दालीपासून सुजास फोडण्याची सदाशिवरावाची इच्छा होती. परंतु मराठे व अब्दाली यांचे युद्धाचा निकाल होईपर्यंत आपण दिल्लीस येत नाहीं, असें शहाजाद्यानें साफ कळविलें, तेवढयावर तें प्रकरण थवकून राहिलें.

दिल्ली हस्तगत करीपर्यंत मराठ्यांकडील बाजू युद्धदृष्ट्या वरचढ होती. दोन्ही बाजूंच्या फौजा जवळ जवळ समसमान होत्या, परंतु दिल्लींत दोन महिने कुचंबणा झाल्यामुळें ती स्थिति हळू हळू पालटत गेली. अब्दाली व मराठे यांच्या फौजांनीं दिल्ली सभोंवारचा शंभर मैलांचा टापू खाऊन लुटून फस्त केला. त्यामुळें जवळचा पैसा संपला तेव्हां सदाशिवरावानें पैशाची अडचण भरून काढण्याकरितां दिवाण-इ-आमच्या दिवाणखान्याचें छत तोडून त्याचे रुपये पाडले. हें छत चांदीच्या पत्र्याचें असून वर सोन्याचें काम केलेलें होतें. या क्षुल्लक गोष्टीनें पैसाही विशेष न मिळतां लौकिकांत पादशाहीची अप्रतिष्ठा होऊन मुसलमान मंडळी मराठ्यांवर चिडून गेली. नादीरशाहासारखे जेते आले तरी त्यांनीं या छतास हात लावला नव्हता. हें छत तोडूं नये म्हणून जाठ, होळकर वगैरे इसम सदाशिवरावांस सांगत होते, पण सदाशिवरावानें तें मानलें नाहीं. याच वेळीं मुसलमानांस चेव आणण्यासाठीं नजीबखानानें विश्वासरावास पातशहा केल्याची खोटी बातमी लोकांत पसरविली. मराठ्यांच्या दरबारांत विश्वासराव प्रमुखस्थानीं असे, त्याचा छद्मी नजीबखानानें असा विपरीत अर्थ पसरविला. वास्तविक सदाशिवरावाच्या मनांत बादशहास काढून टाकण्याचें मुळींच नव्हतें. आपणांस नदी ओलांडून अब्दालीवर जातां येत नाहीं, व तोही आपणावर येत नाहीं, असें पाहून सदाशिवरावानें दिल्लीच्या उत्तरेस ऐंशीं मैलांवर असलेल्या कुंजपुरा ठाण्यावर हल्ला करण्याचा विचार केला. या ठिकाणीं दत्ताजी शिंद्याचा वध करणारा कुत्बशहा व अब्दुस्समदखान हे प्रमुख सरदार अबदालीनें काबूलच्या वाटेवर ठेवलेले होते. कुंजपुरा मुक्कामीं यमुना ओलांडून पलीकडे जाणें सोपें होतें, व त्याच वाटेनें अब्दाली अंतर्वेदींत आला होता. हें ठाणें घेतलें म्हणजे अब्दालीचा काबुलाशीं असलेला संबंध तुटत होता. दिल्लींत कुचंबून रहाण्यापेक्षां हें ठाणें घेऊन यमुना ओलांडून अब्दालीस रेंटीत अंतर्वेदींत नेण्याचें सदाशिवरावानें सल्लागा-

रांच्या विचारें ठरविलें. उभयपक्षीं तहाचीं बोलणीं चालू होतीं, पण त्यांस जोर नव्हता. अब्दाली पंजाब प्रांत घेऊन तह करण्यास तयार होता, परंतु सदाशिवरावाच्या मनांत अटकेची हद्द ठरवावयाची होती. तहाच्या योजनेस लष्करी चापती लावल्याखेरीज जोर येणें शक्य नसतें. तेव्हां कुंजपुरा घेतला, म्हणजे अब्दाली नरम येईल अशी सदाशिवरावाची भावना असावी. मात्र या प्रकरणाचा कायमचा सोक्षमोक्ष लावल्याखेरीच कच्चा तह करण्याची सदाशिवरावाची तयारी नव्हती. अब्दालीस मराठ्यांच्या सामर्थ्याची पुरी ओळख देऊन तो पुनः सिंधु नदी ओलांडणार नाहीं, अशी व्यवस्था सदाशिवरावास घडवून आणावयाची होती. हा बेत ठीक होता, पण युद्धशास्त्रदृष्टया येणेंकरून मराठ्यांस राखावयाचा प्रदेश ऐशीं मैलानें वाढत होता, व हा प्रदेश मराठ्यांच्या मूळ पायापासून विरुद्ध दिशेस होता. या वेळची परिस्थिति व तहाची वाटाघाट खालील पत्रांत उपलब्ध होते.

सदाशिवराव ता. १४ आक्टोबर १७६० रोजीं गोविंदपंत बुंदेल्यास लिहितो, " लवकर जाऊन सर्व कामें यथास्थित करणें. ग्वाल्हेर आग्रा मथुरेवरून ऐवज दिल्लीस येई तें करणें. जाठ वल्लभगडास आहेत, तिकडून रसदेचा वगैरें पेंच पडावयाचा नाहीं. त्याची फौज, पुत्र, हुजूर येणार. ते तेथें राहून पलीकडे पायबंद द्यावा. तिकडून तुम्हीं फौजसुद्धां जाऊन शहावरी असावें. इकडे यमुनेचें पाणी हलकें होतांच अब्दालीचें पारिपत्य यथास्थित करावें असा डौल आहे. त्याजकडून तहाचें राजकारण अद्याप आहे, परंतु मळमळीत आहे, ठीक नाहीं. येथील मर्जीनुरूप जाहल्याशिवाय तह होणार नाहीं. प्रस्तुत आम्ही दिल्लीहून दोन मजली कुंजपुऱ्याचे सुमारें आलों. पुढें जाऊं. अलीगौहरचे पुत्र बाहेर काढून वलीहदी शुक्रवारचे मुहूर्तें केली. आपले तालुक्यांतही शहाआलमचा गजशिक्का चालविणें. महिनाभर फौज उतरायाजोगें पाणी होत नाहीं. कुंजपुऱ्यास समदखानाचें पारिपत्य करूं. अब्दाली तिकडे आला तर उत्तम, न आलिया फिरोन घेऊं. लिहिल्याप्रमाणें तुम्हीं शह देणें. जाठ आपलाच आहे, वसवास नाहीं."

ऑक्टोबरच्या आरंभीं दिल्लीहून निघून मराठे कुंजपुऱ्यावर चालले. कुंजपुऱ्यास जातांना वाटेंत यमुनेच्या पूर्व कांठास बागपत आहे, पण सोनपत, गणोर, सांभाळकिया, पानिपत हीं गांवें पश्चिम कांठावर आहेत. अर्ध्या वाटेवर गेल्यावर सदाशिवरावास असें आढळून आलें कीं, नजीबखानाच्या खोट्या बातमीनें मुसलमानांचा फार गैरसमज झाला आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठीं व

मराठे चकत्यांच्या घरांतील पातशाही काढून टाकूं इच्छीत नाहींत यांची लोकांस खात्री पटविण्यासाठीं, सदाशिवरावानें नाना पुरंदरे व आपाजी जाधवराव यांस दिल्लीस परत पाठवून, शहाआलमचा मुलगा जवानवक्त यास 'वली-अहद' म्हणजे युवराज बनविण्याचा समारंभ केला आणि शहाआलमच्या नांवाचें नाणें पाडून, त्याचे शिक्के चालू केले. ता. १५ ऑक्टोबर रोजीं मराठे कुंजपुऱ्यास पोंचले तेथें दोन दिवस मोठ्या निकराची लढाई झाली. इब्राहिमखानाच्या तोफखान्यापुढें पूर्वीच्या काळचा कोठलाच किल्ला टिकणें शक्य नव्हतें. अब्दालीनें अवदुस्समदखानाच्या मदतीस कांहीं सैन्य पाठविलें. परंतु तें येण्यापूर्वीच मराठ्यांनीं कुंजपुरा काबीज केला. कुत्बशहा व अवदुस्समदखान यांस दमाजी गायकवाडानें जिवंत पकडलें, व त्यांस हत्तीवर बसवून सदाशिवरावाकडे पाठविलें. त्या दोघांस पाहून सदाशिवरावास दत्ताजीच्या वधाची आठवण झाली, आणि त्या रागांत त्यानें या दोघांचा शिरच्छेद करविला. पाडाव केलेल्या शत्रूंस ठार मारण्याचा प्रघात नाहीं, व मराठे तर असल्या क्रौर्याच्या कामांत नेहमींच मागें असत. शिंदेहोळकरसुद्धां त्यांस मारूं नये असें सांगत होते, पण तें न ऐकतां दहशत बसविण्यासाठीं व गिलचांच्या क्रौर्याची फेड जशास तशी करण्यासाठीं, सदाशिवरावानें हें कृत्य करविलें. या योगानें उभयपक्षीं निष्ठुरता वाढत जाऊन पानपतच्या संग्रामानंतर अब्दालीनेंसुद्धां मराठ्यांस बिलकुल दया माया दाखविली नाहीं.

ता. १७ ऑक्टोबर १७६० रोजीं कुंजपुरा घेतल्यावर त्या ठिकाणीं अनेक पठाणांची कत्तल होऊन मराठ्यांस लूटही भरपूर मिळाली. याच वेळीं ता. १९ ऑक्टोबर रोजीं दसरा आला, तो सण विजयाचे भरांत मराठ्यांनीं मोठ्या थाटानें साजरा केला. इतक्या मोठ्या सैन्यासह कुरुक्षेत्रावर थाटानें साजरा झालेला दसरा मराठ्यांच्या इतिहासांतही दुसरा नसेल. सदाशिवरावाच्या भाग्याचा तारा त्या दिवशीं परम उच्च बिंदूस पोंचला होता. विश्वासरावास भर दरबारांत सर्वांनीं नजरा केल्या, तेव्हां मराठ्यांच्या सार्वभौम सत्तेचा दरारा भपकेबाज दिसला. पण याच दिवसापासून सदाशिवरावाची बाजू खालावली. मराठे दिल्ली सोडून निघाले तेव्हां आणखी एक महिना यमुनेचें पाणी उतरणार नाहीं अशी त्यांची समजूत होती. या गोष्टीमुळें निर्धास्त राहून, सदाशिवरावानें दक्षिणेकडून अंतर्वेदींत पायबंद देऊन, अब्दालीस हुसकून आपल्या तोंडावर आणून सोडण्याची कामगिरी गोविंदपंत बुंदेल्यास सांगितली; परंतु बुंदेल्याच्या थोड्याशा फौजेच्या हातून ती

रेंटण्यासारखी नव्हती. मुसलमानांच्या लाख फौजेस हुसकून देण्याचें काम दहा हजार फौजेनें करणें अशक्यच होतें. त्यांतही गोविंदपंताच्या हाताखालील फौज पेशव्याच्या हुजरातीप्रमाणें किंवा शिंयाच्या शिलेदारांप्रमाणें निवडक नव्हती. अशी निवडक फौज व दत्ताजीसारखा "ईश्वराच्या घरचा शिपाई" या कामावर असता तर कदाचित् अब्दालीस कांहीं पायबंद पोंचण्याचा संभव होता. बाकी दत्ताजीच्याच गतवर्षीच्या अनुभवावरून अब्दालीची रहाणी किती बंदोबस्ताची असे, याचा विचार करितां हीही गोष्ट अशक्य वाटते. इकडे यमुना ओलांडून अंतर्वेदींत उतरून अब्दालीवर चालून जाण्याची सदाशिवरांव तयारी करीत आहे तोंच, ता. २५ आक्टोबर रोजीं अब्दालीनें छातीभर पाण्यांतून घोडे घालून खालीं बागपतावर यमुना उतरण्यास आरंभ केला. दिल्ली ते कुंजपुरा या दरम्यान यमुनेचे जे उतार आहेत त्यांवर सदाशिवरावानें थोडथोडी फौज रक्षणार्थ ठेविली होती. पण अब्दालीस पाहून ती पळाली. अनेक लोक नदीच्या प्रवाहांत बुडाले तरी त्याची क्षिति न करितां, अब्दालीनें आपली फौज तीन चार दिवसांत पलीकडून अलीकडे आणली. अब्दाली यमुना उतरूं लागल्याची बातमी समजतांच सदाशिवराव त्वरेनें त्याच्यावर मागें चालून आला, पण समोरासमोर येतांच त्याजवर एकदम हल्ला न करतां सदाशिवरावानें हलुहलु मागें सरून पानपतावर छावणी केली. पानपतच्या या एकंदर मोहिमेंत मराठ्यांच्या गनिमी काव्यास सोडून उघड्या मैदानांत तोफखाना रोखून शत्रूंस लढाई देण्याची मोगलाई पद्धत सदाशिवरावानें स्वीकारली होती. इब्राहिमखानाच्या तोफखान्यामुळें मराठ्यांची जुनी धावती लढाई शक्य नव्हती. तसेंच या वेळीं सदाशिवरावाची बायको पार्वतीबाई, विश्वासरावाची लक्ष्मीबाई वगैरे बायका मंडळी बरोबर असल्यामुळें जोराच्या मजली मारणें किंवा प्रसंगीं पळून जाणें अशक्य झालें होतें. म्हणून पानिपत गांवाजवळ पन्नास हात रुंद व बारा हात खोल असा खंदक खणून त्याच्या आड मराठ्यांनीं आपली छावणी केली; आणि त्याच्याच दक्षिणेस दोन कोस अब्दालीनें आपल्या छावणीचा तळ दिला. या बंदोबस्तामुळें दोन्ही पक्षांकडील सैन्यास एकमेकांवर आकस्मिक हल्ला घालणें अशक्य झालें, व दुसरी बाजू आपणांवर केव्हां हल्ला करते, याची वाट पहात उभयपक्ष अडीच महिने तटस्थ राहिले.

अब्दाली बागपतावर उतरून अलीकडे आला तेव्हां, जसा कुंजपुऱ्याच्या पाडावामुळें त्याचा काबुलशीं संबंध तुटला, तसाच आतां मराठ्यांचा दक्षिणे-

कडील संबंध तुटला. दिल्लीस नारो शंकराच्या हाताखालीं मराठ्यांची पांच हजार फौज होती; व अंतर्वेदींत यमुने पलीकडे गोविंदपंताची दहा हजार होती. सदाशिवरावाचा असा अंदाज होता कीं, दक्षिणेकडून व पूर्वेकडून अब्दालीस रसद मिळेनाशी झाली कीं, उपासमार होऊन तो आपणांवर चालून येईल. म्हणजे तोफखान्याच्या बळावर त्यास उघड्या समरांगणांत लढाई देऊन आपण मोडूं. परंतु हा त्याचा अंदाज खरा ठरला नाहीं. अब्दालीचा कोंडमारा होण्या ऐवजीं मराठ्यांचाच कोंडमारा झाला, व उत्तरेकडून सामुग्री आणण्याची मराठ्यांची कांहींच व्यवस्था नसल्यामुळें, दक्षिणेकडील रसद अब्दालीनें बंद करतांच मराठ्यांच्याच लष्कराची उपासमर होण्याची पाळी आली. नोव्हेंबरच्या आरंभीं मराठ्यांच्या छावणींत गव्हांचा दर सोळा शेर व अब्दालीच्या छावणींत चार शेर होता. ती स्थिति हळूहळू पालटत जाऊन डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून याच्या अगदीं उलट झाली. गोविंदपंताच्या धामधुमीनें अब्दालीची रसद कायम बंद होऊं शकली नाहीं. यावरून त्यानें त्या बाजूस आपलें किंवा रोहिल्यांचें बरेंच सैन्य ठेवून दिलें असावें असें वाटतें. तसेंच पश्चिमेकडून राजपुतान्यांतूनही अब्दालीस सामुग्रीचा पुरवठा होत असावा. या वेळीं हा सर्व प्रदेश मराठ्यांवर उठलेला होता. रजपूत राजे मराठ्यांचे शत्रु नसते तर त्यांच्याकडून मराठ्यांस सामुग्री येण्यास वाट होती. परंतु त्यांची प्रत्यक्ष लढण्यांत अब्दालीस मदत नसली, तरी त्यास रसद पोंचवण्याइतके ते तत्पक्षीय खास होते. सारांश, दिल्ली सोडून सर्व मंडळी व सैन्य घेऊन कुंजपुऱ्यावर जाणें ही युद्धशास्त्रदृष्ट्या भाऊची चूक झाली. ऐशीं मैल टापूंतील नदीचे उतार राखण्याची सदाशिवरावानें पुरेशी व्यवस्था केली नाहीं व नंतरही तावडतोब शत्रूवर चालून येण्याऐवजीं बाहेरील गोष्टींच्या भरंवशावर राहून त्यानें निष्कारण कालहरण केलें. उपासमरीनें व काळजीनें आपलें सैन्य शारीरिक व मानसिक दृष्ट्या अगदीं जिकिरीस येऊन पोंचेपर्यंत वाट पहाणें हें अत्यंत घातुक झालें.

सबंध नोव्हेंबर महिना एकमेकांचा टाव घेण्यांत फुकट गेला. या वेळपर्यंत मराठ्यांची बाजू वरचढ असून अब्दालीस उपासमरीनें मारण्याची आशा करीत बसण्याऐवजीं मराठे त्यावर चालून जाते तर एकतर अब्दालीचा पराभव होता किंवा निदान थोड्या नाशानें मराठे परत दिल्लीस तरी आले असते. कदाचित् दक्षिणेंतून फौज येऊन ती अब्दालीच्या पाठीशीं भिडेल व नंतर त्यास कात्रींत धरल्याप्रमाणें आपण मध्यें पकडूं अशी आशा सदाशिवरावास असावी. आपण फौज

घेऊन तुमच्या मदतीस लवकर येतों, तोंपर्यंत घाई करूं नये, असें नानासाहेबानें सदाशिवरावास लिहिलें होतें असें भाऊसाहेबाची कैफियत लिहिणारा म्हणतो. कारण पानपतच्या पेंचाचें वर्तमान दक्षिणेंत पोंचलें असून पेशवा दसऱ्यासच पुणें सोडून बाहेर पडला होता. पण नानासाहेबाच्या या वेळच्या वागणुकीवरून त्यास या पेंचाचें महत्व कळलें होतें असें वाटत नाहीं. एक महिना त्यानें दुसरें लग्न करण्यांत पैठणाकडे घालविला. जानेवारीच्या आरंभीं वर्तमान कळल्यानंतर तो त्वरेनें निघालाच होता. एक महिना वाट पाहून कंटाळल्यावर दोन्ही बाजूंच्या दररोज लहान लहान चकमकी झडूं लागल्या. पण दोन्ही पक्ष अत्यंत सावधगिरीनें रहात असल्यानें कोणासच जोराचा आकस्मिक हल्ला चढवणें शक्य झालें नाहीं. ता. २२ नोवेंबर रोजीं पठाणांच्या एका तुकडीनें हल्ला केला तो शिंद्यानें परतवून त्यांचा गोठापर्यंत पाठलागही केला. या हल्ल्यांत मराठ्यांकडील अडीचशें व गिलच्यांकडील सहाशें माणूस जखमी व ठार झाले. नंतर ता. ७ डिसेंबर रोजीं सुमारें पांच हजार गिलचे मराठ्यांच्या मोर्चावर चालून आले. लढाईस आरंभ होणार तोंच सायंकाळ होऊन काळोख पडला. तरी तीन चार घटका लढाई होऊन त्यांत दीड हजार पठाण पडला व मराठ्यांस जय मिळाला. मात्र या वेळीं गोळी लागल्यामुळें सदाशिवरावाचा शूर सरदार बळवंतराव मेहेंदळे * पडला व मराठ्यांचा विरस झाला. या वेळीं गोविंदपंत बुंदेलेही रसद मारण्याचें काम जोरानें करूं लागला होता, त्यामुळें अब्दालीच्या लष्करांत धान्याची थोडी टंचाई भासूं लागली. तेव्हां अब्दालीनें न कळवतां एकदम आताईखानाच्या हाताखालीं दहा हजार सैन्य बागपतास उतरून अंतर्वेदींत गोविंदपंतावर पाठविलें. या सैन्यानें एका दिवसांत पंचवीस कोसांची दौड करून दिवस मावळण्याच्या सुमारास गोविंदपंतास गांठलें व त्याचा पराभव केला. दोन तीन हजार मराठे या वेळीं

---

* बळवंतराव मेहेंदळे हा सदाशिवरावाचा श्यालक असून त्याच्या तंत्रानें सदाशिवराव चाले असा चुकीचा समज बखरकारांच्या चुकीमुळें महाराष्ट्रांत प्रचलित झालेला आहे, पण तो बरोबर नाहीं. सदाशिवरावाच्या दोन बायकांपैकीं कोणीही मेहेंदळ्यांकडील नव्हत. बळवंतराव हा नाना फडणिसाचा मामा असून ' हा ( बळवंतराव ) श्रीमंतीस ( सदाशिवरावांस ) अनाप्त झाला ( म्हणजे त्याचे तंत्रानें सदाशिवराव वागत नसे. ) ' असें नाना फडणीस पानिपतच्या हकीकतींत लिहितो. बळवंतरावाबरोबर त्याची बायको सती गेली.

पडले. गोविंदपंताचें शीर कापून अव्दालीनें तें सदाशिवरावाकडे पाठवून दिलें. ही लढाई दिल्लीच्या समोर यमुनेच्या पूर्वतीरीं गाजुद्दीननगराजवळ ता. २२ डिसेंबर रोजीं झाली.

सुजाउद्दौल्याच्या मार्फत अवदालीशीं तहाची वाटाघाट हा सारा काळ चालूच होती. कुंजपुऱ्याच्या विजयापर्यंत सदाशिवरावाची बिलकुल माघार घेण्याची तयारी नव्हती. पानिपतास छावणी झाल्यानंतर अव्दालीची बाजू वरचढ होऊन त्यानें ओढून धरण्याचा काळ आला. अवदाली निधड्या शिपाई बाण्याचा होता. तहाचें बोलणें कोणी त्याच्याजवळ काढलें कीं तो म्हणे, तहाची वगैरे भानगड आपण जाणत नाहीं, लढाईसाठीं मी आलों आहें तेवढें काम मी करीन. सुजाच्या मनांत आपल्या मध्यस्थीनें तह घडून यावा असें होतें. वजिरी आपणाकडे कायम होऊन आपलें महत्व कायम रहावें एवढीच त्याची इच्छा होती. मराठ्यांविरूद्ध विशेष द्वेष त्यास नव्हता. पण नजीबखान मात्र तहाचें बोलणें निघालें कीं तें साफ मोडून काढीत असे. मराठ्यांची फौज पुरी नष्ट झाल्याखेरीज त्यांचा ससेमिरा सुटावयाचा नाहीं अशी त्याची खात्री होती. म्हणून त्यांचा पुरा उत्साहभंग होण्यासारखा पराभव केल्याशिवाय आपलें अस्तित्व सुरक्षित नाहीं हें ओळखून तो वागत होता. गोविंदपंताच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या छावणीची अगदीं दुर्दशा होत चालली. दुष्काळानें आपलें रौद्र स्वरूप प्रकट केलें. बाहेरील रसद साफ तुटली. घोडे, बैल वगैरे जनावरें मरून त्या लहानशा जागेंत भयंकर दुर्गंधि सुरू झाली. प्रत्येकासमोर भावी परिणामाचें भीषण चित्र मूर्तिमंत उभें राहिलें. तेव्हां सर्वांनीं सदाशिवरावास विनंति केली कीं, भुकेनें मरण्यापेक्षां शत्रूशीं लढून तरी आम्हांस मरूं द्या. या वेळीं पार्वतीबाई वगैरे बायांचा जनानखाना बरोबर नसता तर पळती लढाई देत शत्रूची फळी फोडून जाणें मराठ्यांस अशक्य नव्हतें. परंतु कबिले सुरक्षित कसे न्यावयाचे हा मुख्य मुद्दा लक्षांत धरून बाकीची मांडणी या प्रसंगीं करणें भाग आलें. रजपुतांप्रमाणें बायकांचा जोहार करणें हें मराठ्यांच्या मनोभावनेविरुद्ध होतें. तेव्हां आघाडीस मुख्य सरदारांचें घोडदळ; त्यांवर कोणी चालून येऊं म्हणेल तर त्यांस थबकवण्यासाठीं दोन बाजूंस व समोर तोफखाना; मध्यें कबिले; व सर्वांच्या पाठीं बाजारबुणगें; अशा तऱ्हेचा गोल बांधून, लढत लढत सावकाश शत्रूची फळी फोडून पलीकडे जावें असा लढाईचा बेत ठरला व या कामास, पौष शुद्ध ८ मी, बुधवार, शके १६८२ ( ता. १४ जानेवारी, सन १७६१ ) हा दिवस मुकर करण्यांत आला.

पहांटेस सर्व नित्यकर्मे उरकून सूर्योदयास मराठ्यांनीं हालचालीस सुरवात केली. इब्राहिमखानानें सदाशिवरावास प्रणाम करून, 'आजपर्यंत खाल्लेल्या अन्नाचें चीज आज कसें करून दाखवितों तें पहा,' असें म्हणून तोफांस सरबत्ती देवविली. यानंतर लढाईचा बनाव कसकसा बदलत गेला याचें लष्करी दृष्टया लिहिलेलें तपशीलवार वर्णन मिळत नाहीं. रणांगणावर हजर असलेल्यांनीं मागाहून आठवणीनें लिहिलेल्या पत्रांवर व हकीकतींवरच विश्वास ठेवून, त्याचें स्वरूप कल्पावें लागतें. हे सर्व लेखक मुख्य पात्रांपैकीं कोणी नसून त्यांतील बरेचसे तरवारबहाद्दरही नव्हते. त्यांचें लक्ष आत्मरक्षणाकडेच जास्त असून लढाई कशी चालली आहे याची त्यांस फारशी दाद नसावी. सर्व हकीकतींचा मेळ घालून जी कल्पना होते ती अशी कीं, मराठ्यांचा आगाऊ ठरलेला बेत लढाई देण्याचा नसून शत्रूची फळी फोडून पलीकडे जावयाचें एवढाच होता. अर्थात् लष्कराची मांडणी या बेतास अनुसरून केलेली होती. प्रत्यक्ष आपल्या आड येतील तेवढयाच शिपायांवर मारा करावयाचा व शक्य तितका दिल्लीकडचा मार्ग आक्रमावयाचा, डावीउजवीकडे गोल मोडून वळावयाचें नाहीं किंवा शत्रूंचे जास्तींत जास्त शिपाई मारण्याच्या भानगडींत पडावयाचें नाहीं, अशा आंखीव रचनेनें मराठे हालूं लागले. पण एक तर अबदालीच्या ठांसून उभे राहिलेल्या शिपायांच्या ओळींतून मार्ग काढणें अशक्य झाल्यामुळें म्हणा किंवा गिलचांस पाहिल्याबरोबर अनेक दिवसांच्या काळजीनें, जाग्रणानें व अविश्रांत श्रमानें सदाशिवरावाचें चित्त भ्रान्त झाल्यामुळें म्हणा, आगाऊ ठरलेला व एवढें अफाट लष्कर ज्या बेतानें हालत होतें तो सर्वांस कळलेला बेत एकीकडे राहून दुष्मन् गिलचांस मारूं किंवा मरूं अशा इरईनें युद्धाचें तोंड लागलें. त्यामुळें सुरक्षितपणानें मार्ग क्रमण्यास आवश्यक जी गोलाची रचना ती साफ मोडली व दोन्ही लष्करें एकमेकांत मिसळलीं. यामुळें इब्राहिमखानाच्या तोफखान्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं, कारण तोफखाना हा शत्रु जरा लांबीवर असतांनाच उपयोगी पडूं शकतो. हातघाईंत त्याचा उपयोग नाहीं. हातघाईच्या लढाईंत सकाळीं सात वाजल्यापासून दोन प्रहरच्या दोन वाजेपर्यंत मराठ्यांनीं एवढा जोर केला कीं, शत्रुपक्षाकडील रोहिले व गिलचे हे त्यांच्या धडाडीच्या माऱ्यापुढें टिकेनासे झाले. मराठ्यांच्या मध्यभागच्या हुजरातीच्या घोडदळानें अब्दालीचा वजीर शहावलीखान व आताईखान यांच्या पथकांचा; डावीकडील इब्राहिमखानाच्या तोफखान्यानें व गारद्यांनीं बरखुरदारखान व अमीरबेगखान यांच्या पथकांचा; उजवीकडील शिंद्याच्या

स्वारांनीं शहापसंदखानाच्या सैन्याचा धुव्वा उडविला. आताईखान ठार झाला व वजिरास घोडा मेल्यामुळें पायउतारा व्हावें लागलें. पण आधींच उपासमर व जाग्रण यांनीं मोडकळलेल्या मराठ्यांस सकाळपासूनच्या एवढ्या श्रमानें थकवा येऊन हत्यार चालेनासें झालें. भुकेनें व तहानेनें सर्वांस मूर्च्छा येण्याची पाळी आली. ही संधि पाहून अहंमदशहा स्वतः युद्धांत मुळींच भाग न घेतां दहा हजार स्वारांनिशीं मागें स्वस्थपणें लढाई पहात होता त्यानें एकदम मराठ्यांच्या मध्यावर लगट केली. याच वेळीं विश्वासरावास छातींत गोळी लागून तो गतप्राण झाला. या गोष्टीनें सदाशिवरावाचें भान जाऊन तो गर्दींत मिसळून दिसेनासा झाला. विश्वासरावाच्या मृत्यूची वातमी मराठ्यांच्या सैन्यांत पसरतांच आधींच थकलेल्या फौजेनें वाट मिळेल तिकडे पळण्यास सुरवात केली. विठ्ठल शिवदेवाच्या पथकांत अव्दालीकडून रुसून आलेले दोन हजार पठाण मराठ्यांनीं नोकरीस ठेवलेले होते. ते मागें परतून मराठ्यांच्या बुणग्यांत शिरले व खुणेचीं भगवीं फडकीं टाकून लुटालूट करूं लागले. त्यामुळें मागील बाजूच्या त्या तीन-चार लाख माणसांच्या अफाट समुदायांत भीतीनें मनस्वी गोंधळ उडाला व पळापळ सुरू झाली. हें पाहून पार्वतीबाई, लक्ष्मीबाई वगैरेंचे कबिले घेऊन कांहीं लोक आड रस्त्यानें गिलच्यांची नजर चुकवून दिल्लीकडे सटकले. मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, सटवोजी जाधव, वगैरे सरदार चार पांच हजार फौजेनिशीं पळाले तेवढे वांचले. यशवंतराव पवार, जनकोजी शिंदे, सदाशिवराव, विश्वासराव हे लढाईंत ठार झाले. इब्राहिमखानास जखमी पकडून नेऊन गिलच्यांनीं ठार मारलें. अंताजी माणकेश्वरास दिल्लीकडे येत असतां वाटेंत एका जाट जमिनदारानें मारलें. समशेरबहाद्दर जखमी होऊन परत येत असतां जाठाच्या मुलखांत दीग मुक्कामीं वारला. मराठ्यांच्या सर्व सैन्याची वाताहात झाली.

या लढाईंत मराठ्यांचें खडें सैन्य ५४ चौपन्न हजार स्वार व तीस हजार पायदळ इतकें होतें. त्यांपैकीं अजमासें दहा हजार बचावून परत आले ते सोडून बाकी रणांगणांवर पडले किंवा गुलाम केले गेले. छावणींत बाजारबुणगे, नोकर चाकर, मजूर, वगैरे मिळून दोन लाख माणसें होतीं असें म्हणतात. त्यांतील जिवंत सांपडलीं त्यांपैकीं बायकामुलांस गुलाम करून विकण्यांत आलें. पुरुषांची कत्तल करण्यांत आली. रणांगणावरून पळालीं त्यांपैकीं कांहीं बचावलीं, बाकीच्यांस जवळच्या जमीनदारांनीं व लोकांनीं ठार मारलें. एकंदर दोन लाख

माणसांचा संहार झाला असावा. मराठ्यांचें सामानसुमान तर सर्वच गेलें. डेरे, तंबू, राहुट्या, वस्त्रेंपात्रें, दागदागिना सर्व लुटला गेला. पन्नास हजार घोडा, तसेंच हजारों बैल, उंट, खेचरें, तट्टें वगैरे वाहतुकीचीं जनावरें, हत्ती, तोफा व सर्वांचीं शस्त्रास्त्रें गिलच्यांस मिळालीं.

अब्दाली, रोहिले वगैरेंचें सुमारें चाळीस हजार माणूस मारलें गेलें व बरेच घोडे मेले. बाकी दुसरें त्यांचें कांहींच नुकसान झालें नाहीं.

पानपतावर कर्तबगार मराठ्यांची एक पिढी कापली गेली. ज्याच्या नात्याचें कोणी माणूस मेलें नाहीं असें घरच महाराष्ट्रांत राहिलें नव्हतें. यामुळें पुढील पिढीच्या कर्तबगारींत अनुभवाचा अभाव सर्वत्र जाणवला. पानपतावरून बचावून आलेले दोन गृहस्थ नाना फडणीस व लंगडा होऊन सुटलेला महादजी शिंदे हे होत. यांच्याच अनुभवानें पानपतोत्तर मराठशाहीचें गाडें कांहीं काळ चाललें.

पानिपतच्या पराभवाची बातमी ऐकून नारो शंकर दिल्लीच्या बंदोबस्तास होता तोही खजिनासुद्धां टाकून पळून गेला. त्यास पळून जावयाचें कांहींच कारण नव्हतें. पांच सात हजार फौज व सामुग्री त्याजवळ असून त्यांच्या बळावर त्यास दिल्लीचा किल्ला बरेच दिवस झुंजवितां आला असता. कदाचित् मल्हारराव होळकर वगैरे मंडळी पळून आली त्यांनीं त्यास बरोबर ओढलें असावें. ही सर्व मंडळी, नानासाहेब दक्षिणेंतून येत होता तो येईपर्यंत तेथेंच ठांसून बसली असती तर बादशाहींत मराठ्यांचें ठाणें कायम बसलें असतें. गिलचे कांहीं वेढा देऊन दिल्ली घेण्यास खास आले नसते. कारण भाऊसाहेबांचा पराभव करावयाचा एवढ्यापुरतीच सर्व मुसलमानांची प्रसंगापुरती जूट होती, तरी पुढें काय करावयाचें याबद्दल एकाचा विचार दुसऱ्याशीं जुळत नव्हता. अब्दालीस हिंदुस्थानचें राज्य हांकण्याची महत्वाकांक्षा व कुवत दोन्ही नव्हतीं. हिंदी मुसलमानांस मदत करण्यापुरता त्याचा प्रयत्न होता. सुजा व नजीबउद्दौला यांचे परस्पर हितसंबंध एकमेकांस बाधक स्वरूपाचे असल्यामुळें त्यांचें पटणें शक्य नव्हतें. पण नारो शंकर दिल्ली सोडून गेला ही बातमी ऐकून अब्दाली तेथें येऊन राहिला. नजीबाच्या मनांतून अब्दालीनें बरेच दिवस इकडे राहून मुसलमनांची सत्ता दृढ करून द्यावी असा होता. पण पठाण शिपाई दोन वर्षांच्या इकडील मुक्कामामुळें परत जाण्यास उत्सुक झाले होते. त्यांस अब्दालीकडून पगारही मिळालेला नव्हता. नजीबाच्या मनांतून सुजा, जाठ, रजपूत राजे प्रभृति राजेरजवाड्यांकडून पैसे वसूल करून अब्दालीस द्यावयाचे होते. ही बातमी

ऐकून सुजानें गुपचुप रात्रीं छावणी उठवून पलायन केलें. जाठ व माधवसिंग यांनीं कांहीं खंडणी दिली, तेवढयावर भागत नसल्यामुळें अब्दालीच्या लष्करानें बंड केलें. तें शांत करतां करतां त्याच्या नाकीं नऊ आले. शेवटीं कंटाळून तो ता. २२ मार्च १७६१ रोजीं दिल्ली सोडून काबुलास गेला. पानपतच्या मोहिमेनें त्याचा स्वतःचा यत्किंचित् फायदा झाला नाहीं. पंजाबांतून मराठे मागें हटले, पण शीखांनीं जोर करून अब्दालीचा अंमल चालूं दिला नाहीं. मराठ्यांची लाट मात्र सिंधु नदीवरून चंबळेवर मागें आली. दिल्लींत दहा वर्षें नजीबाचें वर्चस्व झालें होतें तें पुढें १७७१ सालीं शहाआलमास आणून मराठ्यांनीं मोडलें.

पळून आलेल्या मराठ्यांस जाठ व सुजा यांनीं अन्नवस्त्र देऊन त्यांचा बचाव केला. सुजानें बऱ्याच मराठे शिपायांस आपल्या छावणींत लपवून ठेवून व कित्येकांबद्दल खंडणी भरून त्यांचा बचाव केला; तसाच जाठानें जखमी, आजारी व पळामुळें थकलेल्यांस आश्रय देऊन केला. मराठ्यांचा पराभव करून अब्दाली परत गेला, तरी आपणांस कायम मराठ्यांशीं वागण्याचे प्रसंग रोज येणार हें ते ओळखून होते. मराठ्यांच्या उत्तरेंतील अंमलास मात्र अडथळा होऊं लागला. पानपतच्या युद्धाचें वर्तमान सर्व हिंदुस्थानांत विजेसारखें पसरलें. निजाम, इंग्रज, हैदर, बुंदेले, रोहिले, रजपूत राजे, सर्वांस वाटलें कीं आतां मराठ्यांचा ससेमिरा आपल्या पाठीमागचा कायम सुटला; मराठे या पराभवांतून वर डोकें काढूं शकणार नाहींत. त्यांची ही आशा मराठ्यांनीं विफल केली, हें इतिहासज्ञांस ठाऊक आहेच; येथें निराळें सांगणें नलगे.

पानपतच्या अपजयाचीं कारणें पाहूं जातां खुलासेवार माहितीची वाण सर्वत्र भासते. बखरी या बऱ्याच मागून, ऐकींव माहितीवरून व खुलवून लिहिलेल्या असल्यामुळें उगमाचा शोध करण्यास त्यांचा उपयोग नाहीं. सदाशिवरावाच्या गर्वाबद्दल व दुराग्रहाबद्दलचे उद्गार बहुधा अतिशयोक्तिरसाचे मासले आहेत. त्यांत तारतम्याचा अभाव सर्वत्र आढळतो. तसेंच केवळ मराठी साधनांनीं पूर्तता होण्यासारखा भरपूर अस्सल पुरावा उपलब्ध नाहीं. त्यास उर्दू, फारशी, हिंदी वगैरे उत्तरेंतील भाषांत मिळूं शकणारी सामुग्री जुळवून पारखली पाहिजे. तेव्हांच अनेक बाबींचा संशयच्छेद होईल. उपलब्ध मराठी कागदपत्रांवरून अपजयाचीं कारणें पुढीलप्रमाणें दिसतात.—अब्दाली मराठ्यांची चुरस उत्पन्न होण्याचीं पूर्वकारणें म्हणजे १ जबाबदारी पार पाडण्याचें पुरें सामर्थ्य संपादन

करण्यापूर्वीच शिंदे होळकरांनीं बादशाहीच्या कारभाराचा भार आपणांवर ओढून घेणें; २ कामगिरी अंगावर घेतल्यानंतर, एकजुटीनें मुख्य कामास हात घालावयाचें सोडून, दुसरीं रजपूत राजांच्या भांडणांसारखीं क्षुद्र कार्यें शोधीत राहून त्यांत कालहरण करणें व त्या राजांचें मित्रत्व गमावणें; ३ शिंदे, होळकर, हिंगणे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर प्रभृति सरदारांत वैमनस्य उत्पन्न होऊन जुटीनें कोणतेंच काम तडीस न जाणें; ४ सरदारांस एकमूठ करून, त्यांवर वचक बसवून, कामें उरकण्यासाठीं, अशा कामास नालायक, अननुभवी व अल्पवयी रघुनाथरावास उत्तरेंत पाठविणें; ६ अब्दाली स्वदेशीं निघून गेल्यावर मागाहून अटकेपर्यंत पोकळ झेंडे फडकावून कांहींएक वंदोवस्त केल्याशिवाय परत येऊन अब्दालीच्या सामर्थ्याविषयीं चुकीची समजूत रघुनाथरावानें करून देणें; ६ काशी, प्रयाग वगैरे हिंदूंचीं तीर्थस्थळें सोडवण्याची पेशव्याची आज्ञा बाजूस ठेवून, रघुनाथरावानें जयाप्पास नागोरच्या स्वारीस जाऊं देणें; ७ मल्हारराव होळकरानें नवीवखान, माधवसिंग, विजयसिंग वगैरे माणसांच्या बाजू घेऊन, मराठ्यांच्या राजकारणांत फूट पाडणें; हीं होत. मोहीम सुरू झाल्यानंतर पुढील चुका मराठ्यांकडून घडल्याः—१ अब्दालीचा पराभव करण्यापूर्वी मराठ्यांनीं दिल्लीस जाऊन बादशाही ताब्यांत घेतल्याचें स्वरूप मुसलमानांस दाखविणें, यांतच छताच्या चांदीचे रुपये पाडणें, विश्वासरावास प्रमुखस्थानीं बसवून नजरा करविणें, अशांसारखीं व्यवहारतः भाग असणारीं पण मुसलमानांच्या भावनांच्या दृष्टीनें विचार करतां गैरमुत्सद्दीपणाचीं कृत्यें सदाशिवरावाच्या हातून घडलीं. २ दिल्ली सोडून पुढें आपणांस न राखतां येण्या इतक्या प्रदेशावर आपली युद्धरेषा वाढविणें. ३ कुंजपुऱ्यास अबदुस्समदखान, कुत्बशहा वगैरेंचे वध करविणें. ४ कुंजपुऱ्याच्या विजयानंतर तावडतोब परत न येणें. ५ अब्दाली नदी उतरूं लागल्याबरोबर तेथेंच त्याजवर एकदम चढाई न करणें. ६ या स्वारींत कबिले, यात्रेकरू वगैरे तडफेच्या युद्धास अडचण करणाऱ्या अनवश्यक माणसांचें लोढणें बरोबर बाळगणें. ७ आपली फौज उमेदीनें हुषार व उपासानें निःशक्त होण्यापूर्वी लढाईस योग्य असेपर्यंत मराठ्यांनीं लढाई न देणें. ८ गोल बांधून लढत लढत शत्रूच्या अंगावरून निघून जाण्याच्या शेवटच्या रात्रीचा बेत गिलच्यांस पाहून त्वेषानें बदलणें. ९ मागें ताज्या दमाची कांहीं फौज आयत्या वेळीं मदतीस येण्याजोगी न ठेवतां सर्वांनीं एकदमच हातघाई करणें. १० विश्वासराव पडल्यानंतर देहभान सोडून सदाशिवरावानें लढाईत घुसणें. ११ लढाईचा

बेत ठरवणें व हुकूम सोडणें हीं दोनही कामें लढवय्या सेनापतीच्याच शिरावर असणें.

सदाशिवराव हा कामाचा उरक, वचक, हुशारी, आवेश वगैरे दृष्टींनीं मराठ्यांकडील मंडळींत श्रेष्ठ होता, तरी उत्तरेंतील अनुभव, युद्धशास्त्राची विशेष माहिती, सेनापतीस लागणारी शांत वृत्ति, तडजोडीनें काम करण्याची हातोटी, प्रसंगीं अंगावर बाजू आली असतां पडतें घेऊन निभावून जाण्याची कला, कोणतेंही काम निकरावर येऊं न देण्याचें कसब, वगैरे बाबतींत तो कमी होता. निदान सदाशिवरावाच्या पाठीमागें या महत्त्वाच्या स्वारींत नानासाहेबानें स्वतः हजर राहावयास पाहिजे होतें.

मराठ्यांचे हिंदुस्थान हस्तगत करण्याचे कल्पनातरंग पानपतच्या अरिष्टानें मावळून गेले, असें आधुनिक लेखक प्रतिपादितात, तें मात्र परिणामावरून कारण ठरवण्यासारखें होय. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत होणें किंवा न होणें, हें पानपतच्या जयापजयावर मुळींच अवलंबून नव्हतें. इंग्रजांचा पाय बंगाल्यांत व मद्रासकडे यापूर्वींच रुतला होता. पानपतामुळें इंग्रजांचे दोन मुख्य प्रतिस्पर्धी मराठे व मुसलमान आपसांत लढून हीनबल झाले, आणि तेणेंकरून इंग्रजांची सत्ता स्थापन होण्यास अप्रत्यक्ष मदत झाली, एवढेंच फार तर म्हणतां येईल. मराठ्यांच्या दृष्टीनें या पराभवामुळें वस्तुतः त्यांची कीर्ति जास्तच उज्वल होऊन व त्यांच्या अनेक गुणांची तावून सुलाखून पारख होऊन, त्यांच्यावरील अनेक आक्षेपांचें निरसन झालें. कडव्या परदेशी मुसलमानांसमोर लढण्याची हिंमत व शौर्य मराठ्यांच्या अंगीं बिलकूल नाहीं, ते केवळ गनिमी काव्यानें लढणारे पळपुटे होत, अशा तऱ्हेचे आरोप या एकाच प्रसंगानें खोडून टाकले. शिंदे होळकरांची दाणादाण डोळ्यांपुढें असतां, सर्व मराठे सरदार सदाशिवरावाच्या हाताखालीं अब्दालीवर घुसले; त्याचा पाडाव केल्याशिवाय परतावयाचें नाहीं अशा निश्चयानें वर्ष सहा महिने मुसलमानांच्या केवळ घरांत शिरून त्यांनीं त्यांच्याशीं निकराचा सामना केला; बळवंतराव मेहेंदळे, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार पडल्यावरही पळून जाण्याच्या विचारास थारा न देतां, शेवटपर्यंत खळी खणून सर्व एकत्र बसले; जेव्हां जेव्हां निघून जाण्याचा विचार निघे, तेव्हां लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व सैनिकांनीं, बायकामुलांनीं, व बाजारबुणग्यांनीं सुद्धां, यजमानाबरोबर अखेरपर्यंत लढून प्राणही देऊं असा निश्चय शेकडों वेळां प्रदर्शित केला; आणि एवढा प्रचंड संहार धैर्यानें सहन करून, चिकाटी न सोडतां, पुनः

त्यांनीं तोच उद्योग अल्पावधींत सिद्धीस नेला; यापेक्षां खऱ्या शौर्याचें दुसरें लक्षण काय पाहिजे! पानपतचा संग्राम मराठ्यांची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ उज्ज्वल राखील; कितीही राज्यक्रांत्या किंवा घडामोडी झाल्या, तरी पानपतच्या आठवणीनें मराठ्यांच्या बाहूंस सदैव स्फुरण चढेल; आणि कोणत्याही देशाचें राज्य करण्यास मराठे सर्वथैव लायक आहेत, याची खात्री हा एकच प्रसंग निरंतर पटवीत राहील, यांत तिलमात्र संशय नाहीं.

पानिपतच्या मोहिमेंत नानासाहेबाचा संबंध प्रत्यक्ष असा मुळींच नव्हता. तो स्वतः या स्वारींत असता तर, अब्दाली हा वरचढ होता असें धरूनसुद्धां, युद्धाचें स्वरूप अगदीं बदललें असतें. त्यानें सर्वस्व नाश होण्याच्या थरास मोहीम कधींच आणली नसती.

---

## प्रकरण १८ वें.

# नानासाहेबाचा मृत्यु व कर्तबगारी.

सन १७५७ पासूनच्या शेवटच्या तीन वर्षांत नानासाहेब पेशव्याच्या कार्योत्साहांत बरीच शिथिलता आलेली आढळून येते. सदतीस वर्षांच्या उमरींत एवढी शिथिलता येण्याचें वास्तविक कारण नाहीं. परंतु सदाशिवराव, रघुनाथराव वगैरे कामें उरकण्यासारखे पुरुष पेशव्यांच्या घरांतच तयार झाले तेव्हां साहजिकच पुष्कळशीं कामें इतरांवर सोंपवून स्वतः मोकळें राहाण्याची संवय त्यास लागली असावी. तसेंच राज्याच्या भरभराटीमुळें नानासाहेब कांहींसा रंगेल बनला असावा असें दिसतें. तसेंच सदाशिवराव, रघुनाथराव, बायको गोपिकाबाई इत्यादिकांच्या कौटुंबिक वितुष्टांत गुरफटून त्याचें मन बरेंच उदास झालें असावें. या कौटुंबिक कलहाचा अस्सल वृत्तांत कळण्याचीं साधनें आज उपलब्ध नाहींत. बखरींतील हकीकती सजवलेल्या व काल्पनिक भासतात, तरीपण गोपिकाबाई ही सदाशिवरावाबद्दल नेहमीं नानासाहेबाचें मन कलुषित करी, असा प्रवाद प्रचलित आहे तो बराच खरा असावा. तिला सदाशिवरावाचा उत्कर्ष पाहून हेवा वाटे व तो पेशवा होण्याची खटपट करतो असा संशय येई. ताराबाई व रामराजा, संभाजी व जिजाबाई, या माणसांच्या कारस्थानांत पेशवाईचें पद सदाशिवरावासारख्या पुरुषास दिलें जाणें मुळींच अशक्य नव्हतें. तसेंच त्या वेळच्या मराठे

सरदारांची मनोवृत्ति पाहिली तर दोन पेशवे झाल्यास प्रत्येकास कोणी सहाय्यक मिळालेच नसते अशीही स्थिति नव्हती. त्यामुळें सदाशिवराव हा नानासाहेबाच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात नेहमीं पेशव्यास प्रतिस्पर्धी असा भासत असावा. पानिपतच्या मोहिमेंत सदाशिवरावाबरोबर विश्वासराव देण्यांत, विश्वासरावास अनुभव मिळण्याच्या हेतूबरोबर, सदाशिवरावानें मोठ्या फौजेच्या बळावर उत्तरेंतच सवता सुभा स्थापूं नये हाही हेतु असावा.

उदगीरच्या मोहिमेनंतर नानासाहेब महाराष्ट्रांतच निजामावर नजर ठेवण्यासाठीं राहिला. मुख्य फौज उत्तरेंत गेल्यामुळें पेशव्याजवळ बेताचीच फौज होती. तरी त्यानें विसाजी कृष्ण बिनीवाले यास कर्नाटक प्रांतीं रवाना केलें. सप्तवार्षिक युद्ध या वेळीं फारच रंगास आलेलें होतें, फ्रेंचांचा सर्वत्र पराभव होत होता, अशा वेळीं फ्रेंचांच्या बाजूचा पुरस्कार करून मद्रासच्या बाजूस मराठ्यांचें वस्तान वसविण्याची खटपट विसाजीपंत करीत होता. नानासाहेब स. १७६० च्या पावसाळ्यांत पुण्याच्या आसपास होता. दसऱ्यास बाहेर पडून तो नगराच्या सुमारें येऊन राहिला. नोवेंबर महिन्यांत सदाशिवराव व अब्दाली समोरासमोर तळ देऊन बसले असतां मराठ्यांची हलाखी नव्हती. पेशव्याचा सदाशिवरावाच्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वास होता. त्यामुळें पानिपतच्या मोहिमेवर पूर्ण लक्ष ठेवून वेळींच उत्तरेंत जाणें नानासाहेबाच्या हातून घडलें नाहीं. त्यास पडलेल्या पेंचाची नीटशी कल्पना नसावी. ती होऊन तो डिसेंबरच्या आरंभीं निघता, तर पानपतच्या युद्धाच्या पूर्वी पंधरा दिवस अब्दालीच्या पिछाडीवर दिल्लीस येऊन पोहोंचला असता. म्हणजे फळी फोडून जाण्याची जी निकराची पाळी सदाशिवरावावर आली, ती अब्दालीवर येऊन तो दोन सैन्यांमध्यें चुरडला गेला असता; परंतु तसा योग नव्हता. पेशव्याचें मन याच वेळीं गोपिकाबाईच्या भांडणांत बरेंच व्यग्र असावें. कारण ता. २७ डिसेंबर रोजीं त्यानें दुसरें लग्न केलें. श्रीमंत व राजघराण्यांतील हिंदूंत बहुभार्यत्वाची चाल त्या काळीं बरीच रूढ होती; तरी, नानासाहेबास याच वेळीं लग्न करावें अशी इच्छा होण्यास त्याचें व गोपिकाबाईचें बरेंच फाटलें असावें असें दिसतें. पेशव्याच्या रखेली दासी बऱ्याच होत्या तरीही व पहिली बरोबरची पत्नी व तीन मुलगे जिवंत असतां, दुसरा संबंध करण्यास अन्य कारण संभवत नाहीं. ही दुसरी बायको पैठणच्या नारोबा नाईक बाखरे या देशस्थ सावकाराची मुलगी असून तिचें नांव राधाबाई ठेवण्यांत आलें. नानासाहेबाची सामाजिक दृष्टि देशस्थ, चित्पावन

वगैरे भेद मानण्याइतकी संकुचित नव्हती एवढी गोष्ट मात्र या विवाहानें स्पष्ट होते. यानंतर लौकरच पेशव्यास पानपतच्या पेंचाची खबर कळून तो तसाच उत्तरेंत जाण्यास निघाला. बरोबर जानोजी व मुधोजी भोसले, बाबूजी नाईक, गोपाळराव पटवर्धन, सदाशिव रामचंद्र, यमाजी शिवदेव वगैरे मंडळी होती. फौज वीस हजारांपेक्षां जास्त नसावी. ब्ऱ्हाणपुर, हंडिया, भोपाळवरून भेलशास हें सैन्य ता. २४ जानेवारीच्या सुमारास येऊन पोहोंचलें. गोपिकाबाई, माधवराव वगैरे कुटुंबांतील माणसेंही या स्वारींत होतीं. भेलशासच पानिपतच्या आपाताची बातमी संशयित स्वरूपाची पेशव्यास कळली. 'दोन मोतीं गलत, दसवीस अश्राफत, रुपयोंको गणति नहीं' ही सांकेतिक भाषेंत लिहिलेली सावकारी बातमी पानिपताहून आली. परंतु प्रत्यक्ष युद्धांतील माणसांची हकीकत कळण्यास बराच अवधि लागला. परस्पर विरोधी बातम्यांनीं सर्वांचीं मनें अगदीं गोंधळून गेलीं. शेवटीं ग्वालेरच्या दक्षिणेस पछोरा येथें स्वारीचा मुक्काम असतां मल्हारराव, पार्वतीबाई वगैरे मंडळींची भेट होऊन सर्व हकीकत पेशव्यास समजली, तेव्हां नानासाहेबाचें हृदय विदीर्ण झालें. त्यास अनावर शोक झाला. तरीही धीर धरून त्यानें चंबळेअलीकडील मुलखाचा बंदोबस्त करविला. तिकडील प्रांतांतील जमीनदार मराठ्यांवरील संकट ऐकून बंडखोर बनले. त्यांस जागोजाग मोडून अंमल कायम ठेवण्यास बराच प्रयास या प्रसंगीं मराठ्यांस पडला. स्वतः नानासाहेब या वेळीं उत्तरेंत नसता तर मराठ्यांचा नर्मदेपलीकडील अंमल नष्टच झाला असता.

नानासाहेबाचा बेत तसेंच पुढें दिल्लीस जाऊन गिलच्यांचें पारिपत्य करावें असा होता. परंतु होळकर, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर वगैरे पळून आलेली मंडळी अनुकूल नसल्यामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. अब्दाली व सुजा दिल्ली सोडून घरीं निघून गेल्यानंतर दिल्लीस एकटा नजीबखान कायतो बंदोबस्तास होता. त्याचा पराभव करून दिल्ली परत घेणें कठिण नव्हतें. नानासाहेब नेहमींच्या मनःस्थितींत असता तर त्यानें स्वतःचा बेत बदलला नसता. पण पानपताची हकीकत ऐकून पेशव्याचें मन कांहींसें भ्रमिष्टासारखें झालें होतें. त्यास हिंमत देणारा एकही इसम तेथें हजर नव्हता. त्याचें शरीर सुकत चाललें. असें पाहून गोपिकाबाई प्रभृति जवळच्या मंडळीनें परत फिरण्याचें ठरविलें. ता. २२ मार्च १७६१ रोजीं परत फिरून स्वारी माळव्यांतून दक्षिणेंत चालली. युद्धाची एकंदर हकीकत ऐकून मल्हारराव प्रभृति मंडळीवर नानासाहेबाची मर्जी खप्पा झाली

होती. त्यानें सर्वांच्या जहागिरी जप्त करविल्या. त्यामुळें ते खिन्न झाले व त्याचा परिणाम पुढें माधवराव व रघुनाथराव यांच्या भांडणांत दिसून आला. परत येतांना नर्मदेवर ओंकारमांधाता येथें नानासाहेबाची तुला करण्यांत आली. सात वर्षांपूर्वी अशीच तुला केली तेव्हां त्याचें वजन १७८ पौंड होतें तें या वेळीं ११४ च भरलें. यावरून त्याची प्रकृति किती खालावली होती याचें अनुमान होतें. दिवसें दिवस त्याचा भ्रम वाढत चालला. स्मरण राहीनासें झालें. अपराधावांचून एखाद्यावर रागावणें, मनास येईल तें करणें, छडीनें मारणें, असेही प्रकार घडूं लागले. वऱ्हाणपुर, कायगांव, पावळ, या गांवांवरून नानासाहेब ता. ६ जून रोजीं पुण्यास येऊन पोहोंचला. प्रकृति दररोज क्षीणतर होत होती. ता. १८ रोजीं तो पर्वतीवर जाऊन राहिला. बुद्धिभ्रंश वाढत चालला. भाऊ, भाऊ, असा सदाशिवरावाबद्दलचा शोक फारच अनावर झाला. तो ऐकून सर्वांचीं अंतःकरणें विदीर्ण होत. हा प्रकार वाढत जाऊन मंगळवार ज्येष्ठ वद्य ६ शके १६८३ ( ता. २३ जून १७६१ ) रोजीं दीड प्रहर रात्रीं पेशव्याचें देहावसान झालें.

पेशव्याच्या मृत्यूचें अंतस्थ कारण क्षयरोग हें असावें. पेशव्यांच्या कुटुंबांत क्षयाचा प्रादुर्भाव होता. त्याच्या शेवटच्या तीन चार महिन्यांतील प्रकृतीचा तपशील या व्याधीला विशेष संभवतो. मृत्युसमयीं नानासाहेबाचें वय केवळ चाळीसच होतें तरी, अगदीं लहानपणापासून तीस वर्षें जबरदस्त उद्योग, दगदग व चिंता यांच्या योगानें त्याच्या शारीरिक व मानसिक शक्ति क्षीण होऊन त्यास अकालीं वार्धक्य आलें होतें. शेवटच्या तीन चार वर्षांत तो थोडा आरामप्रिय व विषयलोलुप झाला होता. घरांतील भांडणांमुळें त्याचें चित्त बरेंच उदास झालें होतें. पत्नी गोपिकाबाई इशीं त्याचें बिनसलें असल्याचा उल्लेख नाना फडणिसाचा आहे. मरणापूर्वी सहा महिनेच त्यानें दुसरी तरुण बायको केली व त्यानंतर लवकरच अस्थिचर्मावर शरीरस्थिति आली. लग्नानंतर एक महिन्यांतच पानपतचा धक्का त्याच्या मनास बसला व त्याचा क्षीण शरीरयष्टीवर भलताच परिणाम झाला. स्मरणशक्ति नष्ट झाली, क्रोध अनावर व अकारण झाला. शेवटीं बुद्धिभ्रंशांतच त्यास मृत्यु आला.

मृत्यु पर्वतीवरील वाड्यांत झाला. दुसऱ्या दिवशीं स्मशानयात्रा लकडीपुलाजवळ नदीच्या कांठीं जाऊन तेथेंच अग्नि देण्यांत आला. पुढें त्या जागेवर वृंदावन बांधण्यांत आलें. उत्तरक्रिया दुसरा मुलगा माधवराव यानें केली. पेशव्याच्या कारभारी मंडळींत यावेळीं सखाराम बापू, कृष्णराव पारसनीस, बाबू-

राव फडणीस, नाना पुरंदरे वगैरे मंडळी होती. त्यांनीं या आपत्प्रसंगीं धीर धरून पुण्याचा बंदोबस्त केला व पुढें कारभार चालविला.

नानासाहेबास अपत्यें पांच मुलगे झाले. त्यांतील दोन लहानपणींच वारले. बाकीचे तीन विश्वासराव, माधवराव व नारायणराव. विश्वासराव पानपतावर पडला. दुसरा माधवराव, पेशव्याच्या मृत्युसमयीं सोळा वर्षांचा होता तो पुढें पेशवा झाला. नारायणरावाचें वय सहा वर्षांचें होतें. बायको गोपिकाबाई ही पतिनिधनानंतर सत्तावीस वर्षें जगून दोन मुलांच्या कारकिर्दी पाहून नातू सवाई माधवराव याचीही अर्धी अमदानी तिनें पाहिली. तिचें आयुष्य पुढें सर्व नाशकाजवळ गंगापुर येथें गेलें. दुसरी बायको राधाबाई ही सन १७७० त वारली.

नानासाहेब पेशव्याचें राज्यकर्ता या नात्यानें हें चरित्र लिहिलें असल्यानें त्याच्या पत्नीच्या उर्वरित आयुष्याबाबत या चरित्रांत कांहीं न लिहिलें तरी चालण्यासारखें आहे. परंतु आपल्या धर्माप्रमाणें पत्नी ही सहधर्मचारिणी असल्यानें पतीच्याच चरित्रांत तिच्या आयुष्याचा अंतर्भाव करणें योग्य दिसतें. खेरीज गोपिकाबाईच्या पतिनिधनानंतरच्या आयुष्यांत तिचा स्वभावविशेष जसा स्पष्ट दिसतो तसा तो पूर्वीच्या आयुष्यांत दिसत नाहीं. किंबहुना तिचा नानासाहेबाशीं असलेला संबंध उकलण्यास फारसा अस्सल पुरावा उपलब्ध नाहीं असें म्हटलें तरी चालेल. हिंदु समाजांत पत्नीचें पति हयात असतांनाचें आयुष्य समजण्यास फारच थोडें साहित्य सांपडतें. तेव्हां गोपिकाबाईच्या आयुष्याच्या उत्तरार्धावरून तिचा नानासाहेबावर असलेला दाब अजमावण्यास मदत व्हावी या हेतूनें तिच्याबद्दल थोडी हकीकत येथें देतों.

गोपिकाबाई ही मानी, करारी व कांहींशी मत्सरी बाई असावी असें तिच्या चरित्रावरून दिसतें. पति हयात असतां सदाशिवरावाची हुशारी तिच्या डोळ्यांत खुपे, तर पतिनिधनानंतर रघुनाथरावाचा कारभार तिला दुःसह वाटे. नानासाहेबास मरणापूर्वी दुसरें लग्न करण्यास कारण काय झालें असावें हें समजणें कठिण आहे तरी गोपिकाबाईशीं त्याचें फाटलें असावें एवढा तर्क त्यावरून होतो. कदाचित् राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्याची तिला हौस असल्यामुळें तसें झालें असेल. पेशव्याच्या मरणानंतर मुलगे लहान असल्यामुळें तिला आपली अधिकारलालसा तृप्त करण्यास कांहीं वाव सांपडावा, पण माधवरावाच्या तेजस्वीपणापुढें व मनस्वीपणापुढें तिची डाळ शिजणें अशक्य झालें व त्या मानी बाईनें स्वतःचा मुलगा पेशवा असूनसुद्धां जें एकदां पुणें सोडलें तें कायमचेंच. फक्त मुलगा

माधवराव याच्या शेवटच्या आजारांत ती भेटून गेली तेवढीच तिची खेप पुण्याकडे झाली. गोपिकाबाईचा हेतु माधवरावानें स्वतंत्र कारभार करावा असें असल्यामुळें माधवरावानें प्रथम रघुनाथरावाशीं युद्धाची तयारी केली होती, पण या प्रकारानें राज्यांत दुफळी होऊन शत्रू मात्र बळावत जाणार हें ओळखून तो रघुनाथरावाच्या स्वाधीन झाला व कांहीं दिवस नमतें घेऊन पुढें त्यानें रघुनाथरावाचा आटोपही केला. पण मध्यंतरींच्या काळांत गोपिकाबाईचे बंधु रास्ते, गोपाळराव पटवर्धन, त्रिंबकराव मामा पेठे वगैरे गोपिकाबाईच्या पक्षाच्या मंडळीसही त्यास काबूंत आणावें लागलें तें त्या मानी बाईला मानवलें नाहीं. माधवरावाचे मामा रास्ते हे सरंजामाप्रमाणें फौज ठेवीनात व हिशेबही दाखवीनात तेव्हां त्यांचा सरंजाम त्या निःपक्षपाती पेशव्यानें जप्त केला व त्यांस भर दरबारांत अपमान होण्याजोगें शासन करण्याचें त्यानें ठरविलें. अशी शिक्षा करण्यांत माधवरावाचा हेतु अब्रूच्या भयानें तरी सरदारांनीं नीट वर्तावें असा होता. गोपिकाबाईस ही गोष्ट कळली तेव्हां, पाहिजे तर रास्त्यांचा सरंजाम जप्त करावा पण त्यांचा पाणउतारा करूं नये, असें तिनें माधवरावास कळविलें. पण नातेवाइकांस सूट मिळते हें कळलें तर आपली जरब बसणार नाहीं हें ओळखून पेशव्यानें तें नाकबूल केलें. यावरून वाईट वाटून ती तापट बाई नाशकाजवळ गंगापुरास जाऊन राहिली अशी दंतकथा आहे.

गंगापुरास ती सन १७६४ पासून १७८८ त तिचा मृत्यु होईपर्यंत राहिली. माधवराव तिची उत्तम वडदास्त ठेवीत असून सर्व गोष्टींची खबरही तो तिला कळवीत असे. स्वतःच्या खाजगी बाबीपुरती तिची आज्ञाही पाळण्यांत तो तत्पर होता. मात्र राज्यकारभारांत तिचा सल्ला त्यानें कधीं घेतला नाहीं. गोपिकाबाईस राज्यांतील सर्व मोठ्या व्यक्तींची व घडामोडींची इत्थंभूत माहिती माधवराव कळवी, व विशेष खाजगी गोष्टी कारकुनांस न कळाव्या म्हणून मोडींत न लिहितां बाळबोधींत लिहून तो पाठवी. कारण गोपिकाबाईस फक्त बाळबोधच वाचतां येत असे. त्यानें, रघुनाथरावानें व नाना फडणीस प्रभृति इतर कारभाऱ्यांनीं तिला पुण्यास यावें म्हणून वारंवार अगत्यानें लिहावें, पण तिनें आपला हट्ट सोडला नाहीं. घरच्या भाऊबंदकीनें व राज्यांतील इतर भांडणांनीं ती अगदीं उदास झाली होती. पुढें माधवरावासारखा कर्ता मुलगा क्षयानें अकालीं मरून त्याची बायको रमाबाई सती गेली, व दुसरा मुलगा नारायणराव याचा खून होऊन रघुनाथराव पेशवा झाला, तेव्हां तिचें हृदय अगदींच करपून गेलें. गंगापुरचा

आपला वाडा सोडून ती पंचवटींत एका मठांत जाऊन राहिली, व जोगिणींप्रमाणें भिक्षा मागून तिनें कांहीं महिने निर्वाह केला. नातू सवाई माधवराव जन्मास येऊन बारभाईनीं राज्यकारभार त्याच्या नांवें सुरू केला, तेव्हां ती पुनः गंगापुरास गेली.

सवाई माधवरावाच्या शिक्षणाबद्दल तो नेहमीं नाना फडणिसास लिहीत असे. तो एकदां आजीस भेटण्यासाठीं गंगापुरास गेला असतां त्याचा खोडकर स्वभाव पाहून व शिक्षणांतही तो मागासलेला पाहून, तिनें कारभाऱ्यांची कानउघाडणीसुद्धां केली. बाकीचा तिचा वेळ धार्मिक व्रतवैकल्यांत व ईश्वरचिंतनांत जात असे. स्वतःच्या नोकराचाकरांचा ती कळकळीनें परामर्ष घेई. तिची खास दासी येसू इच्या मुलाचें लग्न तिनें दोन्ही बाजूंचा खर्च करून केलें, त्यासाठीं सुमारें साडेतीन हजार रुपये खर्च आला.

एकंदर विचार करतां गोपिकाबाई अत्यंत दुर्दैवी होती असें म्हणावें लागतें. चाळिशीच्या वयांतच नवऱ्याचा मृत्यु, एकोणिसाव्या वर्षी वडील मुलगा विश्वासराव याचा मृत्यु, अठ्ठाविसाव्या वर्षी माधवरावाचा मृत्यु व रमाबाईचें सती जाणें, पुढें एकोणीस वर्षांच्या नारायणरावाचा खून व नंतर चारच वर्षांनीं त्याची बायको गंगाबाई इचा मृत्यु, असे कौटुंबिक आघात तिजवर पाठोपाठ येत गेले. याखेरीज सवत राधाबाई, दीर सदाशिवराव व रघुनाथराव वगैरे पेशव्यांच्या घरांतील इतर सर्व वयानें तिच्यापेक्षां लहान मंडळीसुद्धां तिच्या देखतच गेली. राज्याचीं अनेक स्थित्यंतरें तिला पहावीं लागलीं. मृत्युसमयीं तिचें स्वतःचें वयसुद्धां ६३–६४ वर्षांहून जास्त नव्हतें.

नानासाहेबाच्या कर्तबगारीचें विवेचन प्रसंगानुरोधानें या चरित्रांत मागें जागजागीं आलेंच आहे. सर्व पेशव्यांत, एकंदर राज्यकर्त्यांस लागणाऱ्या गुणांचा विचार करतां, नानासाहेब पेशवाच मुख्य दिसतो. एकंदर मराठशाहीचा विचार करितांही शिवछत्रपतींच्या खालोखाल नानासाहेबाचाच अनुक्रम लावावा लागेल. शिवाजीसारख्या राज्यसंस्थापकांची योग्यता अगदीं निराळ्या जातीची असून नानासाहेबासारख्यांची तिशीं साम्यता नाहीं हें उघड आहे. निरनिराळ्या राष्ट्रपुरुषांची योग्यता ठरविण्याची इतिहासकारांची एक विशिष्ट पद्धत आहे. कित्येक पराक्रमी व्यक्ति आपणास पाहिजे तशी परिस्थिति उत्पन्न करून आपल्या राष्ट्राचा भाग्योदय करतात. उलट पक्षीं कित्येक व्यक्तींना परिस्थितीच गडप करून टाकते; आणि कित्येकांच्या अंगीं या दोहींचें थोडथोडें मिश्रण असतें. शिवाजीसारखे

पुरुष पहिल्या कोटींतील होत. छत्रपति शाहू परिस्थितीच्या वर डोकें काढूं शकला नाहीं. परंतु नानासाहेबाला जरी परिस्थिति सर्वस्वी झुगारून देऊन शिवाजी-प्रमाणें अनुकूल काल उत्पन्न करितां आला नाहीं, तरी असलेल्या परिस्थितींतच शक्य तितका राष्ट्रोद्धार त्यानें केला, असें निःसंशय म्हणतां येतें. ‘ राजा कालस्य कारणं ’ या न्यायानें प्रत्येक राष्ट्रपुरुषाच्या हातीं आपल्या लोकांस वळण लावण्याचें सामर्थ्य थोडेंबहुत असतेंच. शिवाजीच्या अनुकरणानें जशी कांहीं विशिष्ट मंडळी राष्ट्रांत पुढें आली, तशीच पेशव्यांच्या अनुकरणानेंही राष्ट्रोद्धार करणाऱ्या असंख्य व्यक्ति पुढें सरसावल्या. शिवाजीच्या तालमेंत तयार झालेल्या माणसांनीं जसें औरंगझेबाच्या आघातांतून राज्य वांचविलें तसेंच, पहिल्या तीन पेशव्यांच्या वेळेस जीं माणसें तयार झालीं त्यांनीं पुढें इंग्रजांसारख्यांच्या हल्ल्यांना पन्नास वर्षें थोपवून धरून, मराठ्यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर केलें. राज्यसंस्थापक म्हणून शिवाजीचें स्थान पहिलें असलें, तरी मराठशाहीचा उठावदार भाग पेशवाईतच मोडतो. पेशव्यांच्या अमलाखालीं मराठ्यांचे घोडे जे अटकेपासून तंजावरापर्यंत नाचत राहिले त्यामुळेंच मराठ्यांचें नांव हिंदुस्थानभर झालें. जर शिवाजीनंतर संभाजीच्या कारकीर्दींत मराठी राज्य बुडतें तर शिवछत्रपतीकडे आज आपण मराठेच काय पण इतर हिंदी लोकही ज्या दृष्टीनें पाहत आहेत त्या दृष्टीनें ते पाहते काय ? पेशवाईतील मराठशाहीच्या अपरंपार विस्तारामुळेंच शिवाजीचेंही नांव वास्तविक चिरंजीव झालें आहे. आणि हा विस्तार मुख्यत्वेंकरून नानासाहेबाच्या अमदानींत झाला हें मनांत आणलें, म्हणजे त्याच्या कर्तबगारीचें महत्त्व मनांत भरतें.

कोणत्या गुणांच्या बळावर नानासाहेबानें अनेक संकटांतून मार्ग काढून आपलें बस्तान बसविलें, हें पाहूं जातां प्रथम त्याचा उद्योग नजरेस येतो. त्या काळीं राज्यकर्त्यांस बरींचशीं कामें स्वतः करावीं लागत व पेशवे स्वतः तीं करण्यांत कधींही कमीपणा मानीत नसत. नानासाहेबाचीं स्वतःचीं हजार पांचशें पत्रें उपलब्ध आहेत, त्यावरून त्याच्या अनुपलब्ध पत्रव्यवहाराचा अंदाज बांधतां, पत्रें लिहिण्यांतच त्याचा किती तरी वेळ मोडत असला पाहिजे. सर्व हिंदुस्थानांत पसरलेल्या सरदारांस हुकूम सोडून, त्यांच्या पत्रांस उत्तरें देऊन, सर्वांस खुलासा देणें हें काम कांहीं लहान नव्हतें. बारीकसारीक गोष्टींत सुद्धां त्याचें अनवधान नसे. पुण्याहून साताऱ्यास घोडा पाठवितांना मोतद्दारास चार रुपये खर्चास दिले त्याचाही हिशेब मागण्यास तो चुकत नसे. बरसातीचे महिने सोडून बाकी आठ-

महिने नानासाहेब फिरतीवर असे, आणि स्वारींत असतांही राज्याचे सर्व उद्योग सुरळीत चालू असत. ते तसे चालण्यास रोज दहा पांच पत्रें तरी तो स्वतः लिहीत असावा. शिवाय नानासाहेबाचीं पत्रें उगाच कांहीं तरी कारकुनांनीं लिहून आणलेलीं नीरस नसत. स्वतःच्या हातचा किंवा कल्पनेचा ठसा पत्रांत उमटला नाहीं असें त्याचें बहुधा एकही पत्र नाहीं. त्याची भाषा गोड व मोहक असून अक्षरही सुवाच्य, सफाईदार, मनांत भरणारें व जलद लिहिलेलें असे. नानासाहेबासारखा फर्डा लेखक मराठशाहींत झाला नाहीं. त्याच्या खालोखाल अनुक्रम नाना फडणिसाचा लागेल.

मनुष्यस्वभावाची पारख करून त्यास आपल्या लगामीं लावून घेण्यांत नानासाहेब विशेष कुशल होता. तो आंतल्या गांठीचा असून, स्वतःचा अंत लागूं न देतां, दुसऱ्याचें इंगित काढून घेऊन आपला शह कायम ठेवणें, अडचणीच्या प्रसंगांतून कांहीं तरी युक्ति काढून निभावून जाणें, प्रसंगीं पड खाऊन आपला हेतु सिद्धीस नेण्याची संधि निर्माण करणें, भिन्न प्रकृतींच्या व्यक्तींस नाना उपायांनीं नरम करणें, अशा प्रकारची अष्टपैलू वागणूक नानासाहेबाची होती. हिंमत, साहस, जरब वगैरे गुणांत सदाशिवराव नानासाहेबाहून वरचढ होता; परंतु तापट व हट्टी स्वभावामुळें त्याचीं कामें बिघडत; तसें नानासाहेबाचें होत नसे. यमाजी शिवदेव, श्रीनिवासराव प्रतिनिधि, ताराबाई, बाबूजी नाईक, रघूजी भोसले, दमाजी गायकवाड, गोविंदराव चिटणीस, मानाजी आंगरे, अशा भिन्न व प्रखर व्यक्तींस कोणत्या ना कोणत्या मार्गानें ताळ्यावर आणून, त्यानें आपलें काम पुढें चालविलें. राज्यचालकाचें मुख्य कसब यांतच आहे. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव ओळखून त्याजकडून आपलें काम करून घेणें हेंच मोठें कठिण काम आहे. याच गुणामुळें नानासाहेबाच्या हातून राज्याचा एवढा उत्कर्ष झाला. केव्हां झगडून तर केव्हां हार खाऊन, केव्हां गोड बोलून तर केव्हां रागावून, केव्हां बक्षीस देऊन तर केव्हां शिक्षा करून, राज्यचालकास आपला शह ठेवावा लागतो. असें वर्तन ठेवण्यास दूर विचार व शांति हे गुण अवश्य पाहिजेत. या गुणांनींच नानासाहेबानें शाहूची मर्जी संपादन केली, ताराबाईस निर्माल्यवत् केलें, शिंदेहोळकरांकडून दिल्लीअटकेपर्यंत राज्याचीं कामें घेतलीं, निजामाचा नक्षा मोडला, म्हैसूरपासून अटकेपर्यंत मराठी सत्तेचा फैलाव केला. शाहूच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्याचे तुकडेच पडावयाचे, पण तें नानासाहेबाच्या हुशारीमुळें राहिलें. पानपतानंतरसुद्धां नानासाहेबानें दोन महिने ठांसून माळव्यांत

राहून बंदोबस्त करविला, म्हणूनच मराठ्यांचा उत्तरेंतील अंमल कायम राहिला. प्रकृति ढांसळली नसती तर त्यानें अटकेपावेतोंचा सर्व बंदोबस्त तेव्हांच केला असता. तुळाजी आंगऱ्याची व नानासाहेबाची आरंभीं प्रत्यक्ष भेट होती तर आंगऱ्यांचा तंटा इतका विकोपास गेला नसता असें वाटूं लागतें. भेटीचा योग आला नाहीं हें राष्ट्राचें दुर्दैव समजलें पाहिजे. नानासाहेब हा बाजीरावापेक्षां शिपाईगिरींत व माधवरावापेक्षां नीतिमत्तेंत कमी होता, परंतु राज्याचे दृष्टीनें सर्व पेशव्यांत एकंदर गुणांनीं नानासाहेबच श्रेष्ठ ठरेल. माधवराव व सदाशिवराव यांस हाताखालचे लोक कांपत; नानासाहेबास ते भजत. ‘ कै. नानासाहेबांनीं लोभ केला, त्याप्रमाणें आपणही अकृत्रिमपणें लोभ करून चालवावें ’ असे अनेक सरदारांचे उद्गार पुढें कैक वर्षें निघालेले वाचण्यास सांपडतात.

नानासाहेब व गोपिकाबाई हीं सारखींच सुंदर, सशक्त, तेजस्वी, शहाणीं व भाग्यशाली होतीं. नानासाहेब कोणत्याही जुलमाचा कट्टा शत्रु असून त्याच्या वेळीं मराठ्यांच्या राज्यांत बहुधा सुख नांदत होतें. प्रजा नानासाहेबास अद्यापि धन्यवाद देत असते, असें डफनें लिहून ठेविलें आहे. म्हणजे साठ वर्षांनंतरसुद्धां त्याबद्दलची स्मृति बुजाली नव्हती. नानासाहेबापुढें सदाशिवरावानें एकदां नाक कान कापण्याकरितां कैदी आणिले असतां तो म्हणाला, ‘ अरे भाऊ, आपण कृष्णंभटाच्या घरीं मेजवानीस आलों आहों, लोकांचे नाक कान कापण्यास आलों नाहीं. ’ ही वेळ पेशवे कृष्णंभटाकडे गडगनेराच्या भोजनास गेले असतांची होय. बखरींत ‘ नानासाहेब अजातशत्रु ’ असा पेशव्याचा उल्लेख आहे, त्यावरून त्याच्या स्वभावाचें उत्तम दिग्दर्शन होतें. राज्यकर्त्या पुरुषास प्रतिस्पर्धी हे असावयाचेच व तसे ते नानासाहेबासही होते. पण त्याचा स्वभाव कारण संपल्यावर चिरकाल वैर बाळगण्याचा नव्हता. मनुष्याचे दोष ही रागावण्यासारखी गोष्ट नसून अनुकंपनीय स्थिति आहे व दोषांमुळें माणसास परतें केलें तर त्याच्या गुणाच्या फायद्यास मात्र आपण मुकतों असें या पेशव्याचें धोरण दिसतें. त्यामुळें शत्रु समूळ खणून काढण्याची त्याची सहजच प्रवृत्ति नसे.

नानासाहेबाच्या अमदानींत राज्यकारभाराची जी रीत पडली तीच पुढें मराठी राज्यांत चालली. सरदार व सरंजामदार पथक्ये यांच्या व सरकारच्या दरम्यान वसुलाची वांटणी कशी व्हावयाची, वसुलाचे हिशेब कसे ठेवावयाचे, त्याचा खर्च कसा करावयाचा, याचे योग्य नियम घालून देण्यांत आले. बाळशास्त्री गाडगीळ यास मुख्य न्यायाधिशी मिळून त्यानें न्यायाचें काम चोख केलें. जमीनमहसुलाच्या व्यव-

स्थेनें रयत आबाद झाली. नानासाहेबाच्या या राज्यकारभाराचें बरेंचसें श्रेय त्याचे कारभारी रामचंद्रबाबा व सदाशिराव यांस आहे. त्यांच्या सारखे हिशेबनवीस क्वचितच निपजतात. पेशव्यांच्या राज्यांतील हिशेबी खात्याची पद्धत व व्यवस्था नांवाजण्यासारखी असून अनेक विद्वानांनीं या पद्धतीची तपासणी करून प्रशंसा केली आहे. या खात्यावर मुख्य फडणवीस असे. आरंभीं हा हुद्दा जनार्दनपंतबावा फडणीस यांकडे असून सन १७५६ सालीं तो वारल्यानंतर बंधू बाबूराव व पुत्र नाना यांजकडे फडणीसी आली. या फडाच्या कचेरींत सर्व मराठी राज्याच्या हिशेबांची तपासणी होत असे. कोणा सरंजामदारांकडून हिशेबांत गोंधळ करण्याची प्रवृत्ति दिसल्यास पुण्याहून त्याच्या महालांचे हिशेब तपासण्यास तपासनवीस पाठविले जात. एका पैचीही अफरातफर अशा कात्रींतून करणें मुष्किलीचें असे. शिंदेहोळकरांसारख्या पराक्रमी व वजनदार सरदारांसुद्धां या खात्याचा धाक असे, व एखादा यःकश्चित् कारकून सरदाराच्या डोळ्यांतून टिपें काढूं शके. याच शाळेंत मराठी राज्यांतील बांके लेखक, कारकून व मुत्सद्दी तयार होत.

नानासाहेबाच्या अमदानींत जितक्या घराण्यांचा उदय झाला, तितका अन्यत्र कधीं झाला नसेल. स्वराज्याचा खरा उपयोग एखाद्या राष्ट्रास काय होतो हें या काळच्या इतिहासावरून दिसून येतें. नानाप्रकारच्या उद्योगांत अनेक लहान मोठीं कुटुंबें व माणसें या वेळीं कशीं भराभर पुढें येत होतीं, राष्ट्रीय उद्योगाच्या अनेकविध व्यवसायांत लोकांची हांव व त्यांच्या उमेदी कशा झपाट्यानें वाढत गेल्या हें तत्कालीन कागदपत्र वाचून कळतें, व आजच्या स्थितीशीं तुलना केल्यास त्याचें मोठें आश्चर्य वाटतें. पेशव्यांनीं ब्राह्मणांसच कारभारांत भरलें, सर्व जातींस सारखा फायदा दिला नाहीं या आरोपाचें खंडण मागें केलेंच आहे. जातिभेदानुसार कामें हिंदुस्थानांत वांटलेलीं होतीं हा कांहीं पेशव्यांचा अपराध नव्हे, त्याचा दोष हिंदुसमाजरचनेवर येईल. ब्राह्मणाची संख्या हिशेबी व कारकुनी खात्यांत जास्त दिसते ती केवळ संधीमुळें. त्या वेळीं ‘ जाहिराती देऊनही ’ या कामांस अन्य लोक मिळाले नसते. रामचंद्रबाबा, महिपतराव चिटणीस वगैरे कांहीं कारकुनी पेशांतील सारस्वत व प्रभु यांस राज्यांत ब्राह्मणांइतकीच संधि होती, व तिचा फायदा घेऊन बाबासारखे गृहस्थ पेशव्यांच्याच सरदारांवर सधन होऊन परत त्यांसच कर्ज देण्याइतके संपन्न बनले. मुलुखगिरीच्या कामांत पाहिलें तर, ब्राह्मण सरदारांपेक्षां मराठे सरदारच पुढारलेले होते. शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले यांच्यासारखे मातबर सरदार ब्राह्मणांत कोणीच झाले नाहींत.

याचें कारण मराठे लेखणीपेक्षां तरवार गाजवण्यांतच भूषण मानीत, तसें ब्राह्मण मानीत नसत. पेशव्यांच्या राज्यांत कोणत्याही जातीची लायकी अंगीं असणारांस अफाट कार्यक्षेत्र मोकळें होतें. कोणासही निरुद्योगी बसण्याची पाळी येत नव्हती. सर्व जातींच्या संगोपनाची भावना पेशव्यांस कशी वाटत होती हें भास्करराव दादाजीच्या पत्रांत नमूद आहे. "खावंदांचे घरीं सर्व लहानमोठे आहेत, बरेवाईट आहेत, परंतु आपपरत्वें जातीचा अभिमान हा प्रकार कांहीं एक नसावा. सर्वही खावंदांचीं लेंकरें, व सेवक जो दौलतीचा खैरखवाई तो आपला उपयोगी, ऐसें ध्यानांत आणून सर्वांवर कृपा योग्यायोग्य असावी. अशा रीतीस जो आणीक तऱ्हेनें वर्तेल व दाखवील त्याचें पारिपत्यच असावें, तरीच वखेडेबंड मिटतील. आम्ही सेवक हें जाणतों कीं, देशस्त, कोंकणस्त, कराडे, परभु, सेणवी, मराठे, हे सर्व स्वामींचे; स्वामी इतक्यांचे मायबाप. चाकरी मात्र सर्वांनीं दौलतेची करावी. हे जातिभेद अभिमान नसावे."

राज्याची कामगिरी करणारांची बूज पेशवा किती दक्षतेनें व आठवण ठेवून करी याचे अनेक उल्लेख आहेत.. हत्तीघोडे, पालख्या, जवाहीर, इनामें, वर्षासनें इत्यादि देऊन लोकांचा गौरव केल्याचे पुरावे सर्वत्र भरपूर आढळतात. युद्धांत पडलेल्या इसमांचे कुटुंबाचा परामर्ष फार काळजीनें घेतला जाई. त्यामुळें लोक पेशव्यावर प्रेम ठेवीत. राजकीय कैद्यांना सुद्धां सन्मानानें वागविण्यांत येई. तुळाजी आंग्र्याची कैदेंत चांगली व्यवस्था ठेवण्याबद्दल नानासाहेबाचे हुकूम होते.

नानासाहेबाच्या कारकिर्दींत महाराष्ट्रांत संपत्ति, पराक्रम, उमेद व यश यांचेंच सर्वत्र साम्राज्य होतें. मोहिमेच्या, राज्यकारभाराच्या, वकलातीच्या, यात्रेच्या, विद्येच्या व व्यापाराच्या निमित्तानें लाखों मराठे हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत संचार करीत होते, त्यामुळें ठिकठिकाणचे नवेनवे रीतरिवाज, कलाकौशल्य, आहारविहार, देवघेव वगैरे बाबतींत महाराष्ट्राची अभूतपूर्व वाढ या काळांत होऊन मराठ्यांचें जीवन विस्तार पावलें. शिवकालीन मराठ्यांची साधी राहणी जाऊन त्याच्या जागीं दरबारी ऐषआराम व थाटमाट आला. ओळखी व उद्योग वाढत गेले तशा जरुरी व इच्छाही वाढल्या. तऱ्हतऱ्हेचें उंची कापड, घोडे, शस्त्रास्त्रें, तसबिरा, पुस्तकें, खाद्य पदार्थ, व सुंदर स्त्रिया वगैरे उत्तरेंतून दक्षिणेंत पाठविण्याबद्दल त्या काळच्या पत्रांतून वारंवार उल्लेख आढळतात.

नानासाहेबाचें लक्ष धार्मिक व सामाजिक बाबतींत लोकप्रियतेकडे मुख्यतः असे. वेदविद्या, ब्रह्मवृंद, मुहूर्त, शकून, नवस, दैवी उपाय, यांचे ठिकाणीं

त्याच्याहि अंगीं इतरे जनांप्रमाणेंच अंधश्रद्धा वास करीत होती. त्यामुळें त्याच्या अमदानींत ब्राह्मणभोजनें, दक्षिणा, तुलादानें, कल्पलतादानें, देवस्थानांच्या स्थापना, स्वधर्मनिष्ठ ब्राह्मणांच्या योगक्षेमास नेमणूका वगैरे गोष्टींस बराच ऊत आला. कायगांवकर दीक्षित घराण्यावर पेशव्याची भक्ति होती. हे दीक्षित धर्मनिष्ठ साधुवृत्तीचा पेशा ठेवून, खेरीज सावकारी, व्यापार व वकलात असलीं कामेंही करीत. त्या काळीं ब्राह्मण साधूनें असले धंदे करणें हें समाजांत कमीपणाही आणीत नसे. या दीक्षितांस पाठविलेल्या पत्रांत नानासाहेबाच्या धार्मिक श्रद्धेचें प्रतिबिंब स्पष्ट दिसतें. " शिवपूजन व विष्णुपूजन व गायत्रीजप व वेदोक्त अनुष्ठानें करीत जाणें म्हणून लिहिलें, तर आज्ञेप्रमाणें करीत जाऊं. आम्हीं स्वामींचीं लेकरें आहोंत. आमचें कल्याण व आमची बुद्धि उत्तम कामाच्या ठायीं लागून दिवसें दिवस यशाची अभिवृद्धि होय, ऐसा आशीर्वाद स्वामी देतीलच, यांत संशय नाहीं. स्वामीकडे खर्चास रवाना करतों. तेथूनच ब्राह्मण योजून रामेश्वरास अकरा कावडी रवाना कराव्या. राज्यप्राप्तीकरतां पूर्वी अठ्ठावीस लक्ष दूर्वा वाहिल्या आहेत. बाकी बहात्तर लक्ष राहिल्या त्या वासुदेव दीक्षित वाहतील. स्वामींची कृपा पाहिजे. " " एतदर्थें कांहीं दैवी उपाय बापूभट टोकेकर या करवीं आपण करवावा कीं, राजश्रींची कृपा चित्तांत आहे ते वृद्धीस पाववून, आम्हांस निरोप देत. महिना पंधरा दिवसांत ( कार्य ) होय ऐसें असेल तर करावें. द्रव्यवृद्धि अति करतां येत नाहीं याचा ( दैवी ) विचार आपल्या विचारें कसा तो करावा. " अशा तऱ्हेचीं पत्रें अनेक आहेत. दीक्षित हे पेशव्यांचे गुरु तसेच इतर हिंदू व मुसलमान सत्ताधीशांचेही गुरू होते. प्रत्यक्ष दिल्लीपति बादशहासुद्धां त्यांच्या आशीर्वादाची लालसा धारण करीत. बाळकृष्ण दीक्षित दिल्लीस गेला तेव्हां त्याचा सत्कार कसा झाला याचें वर्तमान नानासाहेबानें वासुदेव दीक्षितास कळविलें तें वाचून याबद्दलची कल्पना येते. " ( बाळकृष्ण दीक्षितांस ) आदरपूर्वक शहरांत आणिलें. भेटीचे दिवशीं खुद्द बादशहा दरवाजापर्यंत सामोरे येऊन हात धरून नेऊन बसविलें. फार सत्कार ठेऊन बोलले कीं, राजा शाहूचे जे गुरू व ज्या थोरले दीक्षित महाराजांचा पूर्ण आशीर्वाद औरंगजेब बादशहावर झाला, त्यांच्या ( नारायण दीक्षितांच्या ) आशीर्वादानें या बादशाहीची दिवसें दिवस ऊर्जित दशा आहे. आपले वडील पैगंबराप्रमाणें होऊन गेले. आपली तीच योग्यता आहे. तेव्हां आपण येथें येऊन दर्शन दिल्यामुळें आम्ही आज कृतार्थ झालों. वगैरे भक्तिपूर्वक भाषणें करून थोरले नारायण

दीक्षित महाराजांच्या प्रमाणें सन्मान ठेविला. नंतर पंधरा हजारांचा गांव (इनाम), जहागिरीचें फर्मान व पोषाख, पालखी, मोरचेल, चवरी, जवाहीर वगैरे खिलत दिली. आणि लिहिलें, दीक्षितांस जहागीरच काय ! त्यांचें पुण्य बलवत्तर, त्यांजवर ईश्वराची कृपा व आपण त्यांचे शिष्य, तेव्हां त्यांस काय कमी आहे ? परंतु रियासतीचें कल्याण व आम्हीं कृतार्थ व्हावें, याकरितां ही यत्किंचित् सेवा केली. याप्रमाणें पत्र आलें." या पत्रांतील दुबळ्या पातशाहाचें 'औरंगजेब बादशाहावर आशीर्वाद झाला, त्यांच्या आशीर्वादानें या बादशाहीची दिवसें दिवस ऊर्जित दशा आहे' वगैरे उद्गार वाचून मात्र इतिहासज्ञांस हसूं येईल. बाकी या पत्रावरून त्या वेळीं हिंदु मुसलमानांचे संबंध कशा स्वरूपाचे होते या प्रश्नावर प्रकाश पडतो.

नानासाहेब मोहिमेवर असतांना, वाटेंत जवळपास असणाऱ्या तीर्थक्षेत्रांच्या यात्राही करीत असे. गणपतिपुळें, सिद्धटेक, थेऊर, मोरेश्वर, वगैरे गणपतीच्या स्थानांस जाण्याचा सर्वच पेशव्यांच्या प्रघात असे. कारण गणपति हें पेशव्यांचें कुलदैवत होतें. नानासाहेबानें वनेश्वर महादेव, शकुंतेश्वर, पर्वतीवरील देवदेवेश्वर व विष्णु, वगैरे मंदिरें बांधलीं. थेउरास कल्पलतादान, सुवर्ण हस्तिरथदान, पर्वतीवर सुवर्णतुला वगैरे धार्मिक कृत्यें केलीं. पर्वतीवर त्यानें एक वाडा बांधला. त्यामुळें पुण्यांत तेथील देवदेवेश्वराचें महत्व वाढलें. याच ठिकाणीं त्यानें शाहू महाराजांच्या पादुका ठेवल्या होत्या. याच पर्वतीच्या खालील मैदानांत पुढें श्रावणमास दक्षिणा देण्यासाठीं एक तटबंदी रमणा तयार केला. दक्षिणेचे सर्व ब्राह्मण—कित्येक हजार असत ते—या ठिकाणीं दोन दिवस आधीं कोंडीत असत. नंतर एकएकास बाहेर काढून दरवाजावर दक्षिणा देत. येणेंकरून एकाच ब्राह्मणास दोनदां दक्षिणा उपटण्यास सांपडणें अशक्य होई. नानासाहेबाच्या कारकीर्दींत दक्षिणेची रकम सालिना अठरा लक्षांइतकी वाढली. तत्कालीन समजुतीप्रमाणें हें विद्येस उत्तेजन असें समजलें जात असे. दक्षिणेसाठीं हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणांहून ब्राह्मण येत असल्यामुळें पेशव्यांची कीर्ति आसेतुहिमाचल पसरली.

पुणें शहराचें वैभव वाढविण्याचीं अनेक कामें पेशव्यानें केलीं. पेठा वसविणें, वाडे बांधणें, व्यापारी व कलावान् लोकांस आश्रय देणें, पाण्याची व्यवस्था करणें, देवळें बांधणें, बागा व पूल तयार करविणें वगैरे कामें नेहमींच चालू असत. सर्व समारंभ मोठ्या थाटमाटानें करण्यांत येत. दिल्लींतील बादशाही थाट पुण्यास

दरबारांत पाळण्याचा रिवाज चालू झाला. पेशव्यांच्या राहत्या शनवारवाड्याची शोभाही नानासाहेबाच्या कारकीर्दींत वाढली. पेशवे थेऊर, आळंदी वगैरे ज्या गांवांस नेहमीं जात त्यांच्या वाटांवर झाडें लावण्यांत आलीं.

नानासाहेब स्वतः रसिक व रंगेल होता. मात्र हा रंगेलपणा राज्यकारभाराच्या कधींही आड येत असल्याचा उल्लेख नाहीं. त्यास रक्षा होत्या. या पेशव्याजवळ दासींचीं कामें करीत. गाणें बजावणें, नृत्य वगैरे गोष्टींतही त्या प्रवीण असाव्या. उत्तरेंतून बहुधा अशा सुंदर गौरवर्ण मुली पुण्यास आणवीत. स. १७४३ त पेशव्यानें हिंगण्यास दिल्लीहून ' दोन पोरी, खुबसुरत, दहा दहा वर्षांच्या, हिंदु, शुद्ध, जरूर खरेदी करून पाठवाव्या ' म्हणून लिहिल्याचा उल्लेख आहे. तसेंच स. १७५५ मधील एका पत्रांत ' श्रीमंत स्वामींची फर्मास दिल्लीहून आणली. चार हजार रुपयें खर्च केले. पांच पोरी उत्तम आणविली. त्यांत दोन, तीन जे स्वामींचे खुशीस येईल ते देऊं. तलास वहुत केला,' असा उल्लेख सांपडतो. यावरून दिल्लींत अशा मुली खरेदी मिळत असें वाटतें. तत्कालीन श्रीमंतांच्या प्रघाताप्रमाणें पेशव्यानें वैभवदर्शक अशा रक्षा ठेवल्या, यावरून त्यास आजच्या दृष्टीनें पाहून, अनीतिमान् म्हणणें योग्य नाहीं. मोठे पुरुषही सभोंवतालच्या समाजाच्या व त्या त्या काळाच्या पुढें जाऊं शकत नाहींत एवढेंच या प्रकाराबाबत म्हणतां येईल.

जयाप्पा शिंदे, पिलाजी जाधव, नाना पुरंदरे वगैरे मंडळी पेशव्यांचे नोकर तसेच मित्रही म्हणावयास हरकत नाहीं. अशा मित्रवजा घरगुती माणसांस नानासाहेब किती प्रेमानें लिहीत असे त्याचे उल्लेख वर आलेच आहेत. त्यांच्याशीं वागतांनाही पेशवा निरभिमान असे. पिलाजी वारला तेव्हां त्याच्या मुलाच्या समाचारास नानासाहेब स्वतः वाघोलीस गेला होता. अशाच घरोब्यानें तो इतरांशींही वागत असे. हा घरोबा कांहीं प्रसंगीं राज्यसंबंधी त्याच्या कर्तव्याच्याही आड येई. उदाहरणार्थ फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर याचें पुढील पत्र पहा. " आम्हांकडील सरंजामाचा व स्वकीय अर्थ वरचेवरी श्रुत करीत गेलों, परंतु चित्तांत येऊन कोणे गोष्टीचा निकाल आम्हांकडील तिळतुल्य जाला नाहीं. आमचे सरदारीची उभारणी पहिलेपासून थोरले नानांनींच केली. बाजीरावांनीं व आपांनीं संरक्षण केलें. त्याप्रमाणें तुम्हीं उभयांनींही हा काळपर्यंत चालवावयास अंतर केलें नाहीं. शेवटीं राजश्रींचा काळ जाला ते समयीं तुमचे हातीं आम्हांस निरवून

दिलें. असें असोन चौघांनीं चार गोष्टी, लटक्या कंड्या, सांगोन, आमचेविषयीं चित्तांत विपर्यास आणून, सरदारी मोडावी, ये सरदारीवरी चार पथकें उभीं करावीं, कांहीं भारी पथकें पहिलीं आहेत तीं हुजरातीस लावावीं, अगदीं आमच्या सरंजामाची फांदाफांदी करून आम्हांस मोडावें, इनाम गांव देखील काढावे, असा प्रसंग दिवसेंदिवस दिसोन आला. जे समयीं तुम्हीं जें सांगितलें तें तें आम्ही ऐकतच गेलों. आतांही तुमच्या वचनाव्यतिरिक्त आहों असें नाहीं. जे वेळेस आज्ञा कराल ते वेळेस दहापंधरा हजार फौजेनिशीं एक बाजूच तुमची सांभाळिली. तुम्हांस तों ईश्वरें दुसऱ्यांच्या फौजांच्या सहाय्याचा प्रसंग पडों दिल्हाच नाहीं. हे मुल्क व हे सरदारी केवळ तुमचीच आहे, असें आजपर्यंत आम्ही जाणत होतों. आणि आमचा निश्चय असा आहे कीं, तुम्हां व्यतिरिक्त दुसऱ्या कोणास आप्त म्हणतों असें नाहीं. हा अर्थ आपणही पुरता ध्यानांत आणून आमचे सरदारीचा जोड जैसा आहे तैसा राखून, कार्य आमच्या हातें घेणें. आणि जसा बंदोबस्त करावयाचा तसा करणें परंतु मोडून अपेश न घेणें. या कितेक गोष्टी बोलोन मनांतील संदेह काढावयास तेथें यावें असा निश्चय केला आहे. तेथें आलियावरी, चार गोष्टी मनांत आहेत त्या बोलोन, आपल्या वडिलांनीं दाली बांधली, ते तुमची तुम्हांजवळी सोडून ठेवावी, आणि आपली आज्ञा घेऊन जे स्थळीं रहावयास सांगाल ते स्थळीं राहूं, अथवा तेंही अनुकूल न पडे तरी आपलीं पत्रें घेऊन दस्तकें घेऊन महायात्रेस जाऊं, हाच विचार मनांत आणिला आहे. उत्तर पाठवावें. उत्तर आलें न आलें तरी एक वेळ दर्शनास येतों. येथें राहून चार लटकीं दुर्निमित्यें लोकांनीं आपल्यास सांगावीं, आपल्या चित्तांत विक्षेप यावा, यांत काय नफा आहे ? आणि दुसरें, अव्यवस्थित चित्त ज्यांचें त्यांसमीप मातबर मनुष्यांनीं राहूं नये. आपल्यास ईश्वरें सर्वांचें संरक्षण करावयाची शक्ति दिली आहे, तेथें आम्हीं जड होतों असें नाहीं. लोकांचे बोलें आम्हांस मोडावें हा धर्म नव्हे. ईश्वरें तुम्हांस बुद्ध संमत दिली आहे. परंतु आम्हांजवळ आपले विश्वासू ठेऊन, शोध घेऊन, मग जें करणें तें करावें. सारांश, आम्हीं तुम्हांस सुटत नाहीं. वडिलांनीं ओटींत घेतलें, लेकांबरोबर वाढविलें, तें कैसें सुटेल ? याचा विचार ध्यानांत आणावा. तुमचे तुम्हांस संकट आहे. जे वेळेस, तुम्हांस तैसा प्रसंग पडेल ते वेळेस, मालमुल्ख जिवानिशीं हजर होऊं हे खातरजमा असावी. आमचा कंटाळा जाहला असेल तर महायात्रेस वाटेस लावावें हें उचित आहे. फार लिहावें तर आपणांस विषाद येईल. थोरांस उचित तें करावें. बहुत काय लिहिणें. ”

या पत्रावरून घरोब्याच्या सरदारांच्या भिडेचें केवढें दडपण पेशव्यावर पडत असेल याची कल्पना येईल. मराठशाही सरंजामी सरदारांत विभागलेली होती. सरदार पराक्रमी व राज्याच्या उपयोगी असत तोंपर्यंत सर्व सुरळीत होतें. पण फत्तेसिंगासारखे जात्याच अपराक्रमी सरदार वृद्धत्वानें अगदीं निकामी होऊन राज्यकारभारास उपयोगी पडेनासे झाल्यानंतरही त्यांच्या भरभक्कम जहागिरी जशाच्या तशा चालू ठेवून राज्याचें रक्षण कसें करावयाचें ? पेशव्यानें नवीन सैन्य ठेवावें तर त्याचा खर्च कोठून यावयाचा ? जुन्या जहागिरी खालसा कराव्या तर फत्तेसिंगासारखे व्यक्तिशः सज्जन सरदार नाराज होत. अशा अडचणींतून मार्ग काढणें पेशव्यांस अशक्यप्रायच होतें. रघूजी भोसल्यासारखे मातबर सरदार पेशव्यास जुमानीतच नसत. आपल्या जहागिरींत पेशव्यानें हात घालूं नये अशी सर्वांची मनीषा असे. पण असें करणें पेशव्यास अशक्य असल्यानें अनेक सरदारांचें पेशव्याशीं वितुष्ट पडे. मराठशाही चालविण्याची जबाबदारी पार पाडण्यास आहे तसेंच चालविण्याच्या शाहूच्या आज्ञेचा मोठाच अडथळा पेशव्यांस येत असे. राज्याच्या पूर्ण हिताच्या दृष्टीनेंच सर्वस्वी पेशवे वागते तर त्यांचीच उचलबांगडी होऊन मराठशाही मोडली असती. पण तसा प्रसंग येण्याइतकें न ताणतां, सर्वांस एकत्र राखण्याची खटपट करून, पेशव्यांनीं मराठशाही चालविली हीच त्यांची संस्मरणीय कर्तबगारी होय.

मराठशाहींतील सर्वच कर्तबगार माणसांचें शिक्षण अनुभवसिद्ध असे. त्यांत पुस्तकी ज्ञान तात्पुरतेंच असे. नानासाहेबास तत्कालीन थोर घराण्यांतील ब्राह्मणांप्रमाणें संस्कृत येत होतें. कांहीं कवींस पेशव्यांचा आश्रय होता. पण त्यांत नांव घेण्यासारखा कोणी निपजला नाहीं. त्या काळीं अठरा पगड जातींस सार्वजनिक शिक्षण देणें हें राज्याचें काम असें कोठेंच समजलें जात नसे. विद्वान् ब्राह्मणांस नेमणुका देणें इतकेंच राजाचें कर्तव्य समजलें जाई. नानासाहेबास वाचनाची गोडी होती किंवा काय हें समजण्यास मार्ग नाहीं. पण त्याच्या एका पत्रावरून त्याच्या विद्वत्तेचा कांहींसा अंदाज होतो. तें पत्र असें—" चि. रा. नाना ( पुरंदरे ) प्रति बाळाजी बाजीराव प्रधान. कृतानेक आशीर्वाद उपरी. या प्रांतीं ( कर्नाटकांत ) प्राचीन हिंदु राजे सर्व संस्कृतप्रवीण. वेश्यामद्यादिकांचा अति अनादर. सातां पिढयांचें श्रीमत्. सातां नृत्यगीत वाद्यत्पत्तिप्रवीण. स्वजातीय अनेक स्त्रिया प्रवीण त्यांसी रत. किंचित् जितेंद्रियही आहेत. नर्माची रीत. देवब्राह्मणांची विशेष मर्यादा व शोभा, जिचे अवलोकनमात्रें अधर्मिष्टास धर्मरति

उत्पन्न होणार. गाणार कम्पतम स्वर, वर्ज्यावर्ज्यादिक शास्त्रप्रमाण रीतीनें गाणार. वेदशास्त्र किंचित् जाणतात. त्यांत जे मुख्य, ते तों पाहिलेच नाहींत. जे मुख्य ते निरापेक्ष सर्वार्थिसमृद्धि. त्यांचे शिष्यवर्ग अनेक. प्रयत्नें आणून विद्यादृष्टीनें पाहतां अतिश्रेष्ठ स्वदेशज; स्थूल दृष्टीनें पाहतां मात्र अरमणीय. बाग, फुलें, कमळें इत्यादि शोभा जे महाप्रयत्नें लहानशी करावी, त्याची तों गणना नाहीं. त्यांचें तेज पहातांना असें वाटतें कीं, यांची प्रार्थना करून स्वदेशास न्यावें, परंतु ते विदेशभूमि जाणून प्रार्थना केली असतां न येत. इकडील नद्या अमृतोपम. वहुत जनांस स्वजलप्रदानें समृद्धिवंत करितात, व पांथांस आनंद व राज्यास द्रव्यवृद्धि करितात. ज्यांचे सहचारें वोढयाची उपमाही आमच्या (महाराष्ट्रांतील) राक्षसस्वभाव नद्यांस न ये. उत्तर प्रांतांतील सर्व मनुष्य शुभ्र, त्यांत एक रामचद्र व कृष्णजी श्याम, त्यांचें वर्णन करितात. देशीं एक ईश्वर श्रमयुक्त झाले; इकडील सर्वही नीलांवुद संभ्रम. परंतु धर्मरूपें पहातां जे हंसोपम. सर्वही मर्यादशील. आयापेक्षां व्यय थोडा. अधर्मापेक्षां धर्म फार. शैव, मध्व, लिंगधर्ते, सर्वही स्वमताभिमानित. शौर्य धर्माविषयीं, नायमारा व्यतिरिक्त, सर्वही युक्तियोद्धे. हें सर्व तुम्हां सहवर्तमान पहावें उचित असतां, अनेक शोभा टाकून एक स्वलग्नशोभा अंगीकारून, गेलां, हें उत्तम न केलें! पुढें तरी स्वकीयागमनें करून या प्रांताचें अवलोकन करणें उचित असे. तुम्हांसहवर्तमान इकडे येणें झालिया, उर्वरित शृंगारसाधनें प्रयत्नपूर्वक पाहण्यांत येतील. राज्यकार्य प्रसंग विचार करतां, भगीरथसमान कैलासवासी यांनीं उत्तरेकडून दक्षीण पावेतों सुवर्णनदीप्रवाह चोवीस वर्षे वाहविला. त्यांचे आशीर्वादें अलीकडेही निरंतर वर्धमान वाहत असतां, देशाधिकारी सेनामुख्य व अकृत्रिमास पूर्ण त्या नदीनें संतुष्ट केलें. एक तृष्णा मात्र त्या सुवर्णवोघानें वर्धमान केली. दक्षिण देशांतून सुवर्णनदी मार्गें रघूजी फत्तेसिंग वावांनीं आणिली, परंतु जागां जागां जिरली. मध्यें वहुत दिवस दक्षिण नदी न वाहिली. श्रीइच्छेनें या वर्षीही कालानुरूप द्रव्यनदी उत्तमच या सैन्यांत आहे. परंतु पुण्याकडे जातां रुक्ष देश फार आहे, त्याजमुळें सर्व जिरून जाईल. एकदां उत्तरेकडील सुवर्णनदी व दक्षिणेची नदी, दोहींचा संगम सागरकूप समान पुणें या स्थळीं मध्यें न जिरतां, पूर्युक्त योग घडणें. तेव्हां ऋणोद्धार, श्रमसार्थक, इहलोक परलोकीं उत्तम होईल. भागीरथी सागरासाठीं उत्पन्न, परंतु विश्वातें उद्धरिते. तशी या काळीं हे उत्तर दक्षण नदी वाहते, वहुत जनांस उपकारक होते. सर्वही नद्या जलौघें समुद्रास जातात,


एक कावेरी मात्र बहुत लोकांनीं आपले उपयोगास आणिली. तशी हे द्रव्यनदी मुख्य-कार्य थोडें व गौणजनकार्य मात्र बहुत करिते. हा न्याय अन्याय, हा विचार, साक्षी दृष्टिवंत असतील त्यांनीं विचारून, पुण्यांतील रुक्षता दूर होय व मध्यें कार्याकारण जिरे ऐसें करणें, हें योग्य असे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद."

हें पत्र बहुधा कर्नाटकांतून लिहिलेलें असावें. त्यावरून नानासाहेबास संस्कृताचें चांगलेंच ज्ञान होतें हें उघड दिसतें. एवढ्या मोठ्या पत्रांत फक्त बाग हा एकच मुसलमानी शब्द त्यानें घातला आहे. यावरून त्या काळींही शुद्ध भाषा लिहिण्याची खटपट बरीच दिसते. तसेंच या पत्रावरून पेशव्याच्या स्वभावावरही प्रकाश पडतो. रंगेलपणा, रसिकता, विनोदप्रियता, श्लेषालंकारांची आवड, माहिती मिळवण्याचा हव्यास, हीं सर्व या पत्रांत दिसतात. तसेंच त्याच्या सर्व कारभाराचा उद्देशही त्यांत स्पष्ट नमूद आहे. उत्तर व दक्षिण दोन्ही दिशांकडून पैशाचा ओघ महाराष्ट्रांत आणून सोडावयाचा व त्याचें दारिद्र्य नाहींसें करावयाचें हाच तो इष्टोद्देश होय. हाच उद्देश मराठ्यांच्या सर्व स्वाऱ्यांत होता. त्यांचे सर्व दोषही या मुख्य हेतूमुळेंच उत्पन्न झालेले आहेत. ज्यांत अर्थप्राप्ति नाहीं अशा निष्कारण राघो भरारी स्वाऱ्या नानासाहेबास मुळींच आवडत नसत. त्याच्या पैशाच्या मागणीमुळें सरदारांसही अनेक वेळीं, इष्टानिष्टता, न्यायान्याय, हिताहित, बाजूस ठेवून पैशाच्या पाठीमागें जावें लागे. रजपुतांच्या अंतस्थ भांडणांत केवळ यामुळेंच मराठ्यांनीं लक्ष घातलें. त्यामुळें त्यांची मैत्री गमाऊन हिंदुपद पातशाहीचें मुख्य कार्य मागें पडलें. मुलुखगिरी खेरीज धनोत्पादनाचे सततचे व सर्वांच्या कायमच्या हिताचे दुसरे व्यापार, उद्योग वगैरे खरे मार्ग त्यांनीं समजून घेतले नाहींत. हा मुख्य व परिणामीं घातक झालेला राष्ट्रीय दोष मराठ्यांवर नेहमींच येणारा आहे. या अंगभूत दोषामुळें इंग्रजांचें खरें बल कशांत आहे हें पेशव्यांस कळलें नाहीं, आरमाराचें महत्व त्यांस वाटलें नाहीं, व्यापाराच्या सोईसाठीं रस्ते वगैरे बांधावे अशी जरुरी त्यांस भासली नाहीं. नानासाहेब पेशव्याच्या हे दोष लक्षांत आले नाहींत किंवा येऊनही त्यांच्या निरसनाची तजवीज त्यानें केली नाहीं, ही गोष्ट त्याच्या शहाणपणास उणेपणा आणते.

वरील सर्व विवेचनावरून नानासाहेबाच्या गुणदोषांचें स्वरूप वाचकांस समजलेंच असेल. शिवाजीसारख्या काल निर्माण करणाऱ्या पुरुषांच्या मालिकेंत अर्थातच त्याचें स्थान नाहीं. सभोंवतालच्या परिस्थितीस गुंडाळून ठेवून तिच्या

पुढें जावयाचें, अर्थात् आपल्या काळाच्या व समाजाच्या पुरोभागीं राहून सर्व बाबतींत राष्ट्रास नवीन वळण लावून पुढें न्यावयाचें हें अत्युच ध्येय त्यास साधलें नाहीं हें निश्चित आहे. पण समाजाचे दोष नाहींसे करून त्यास वरच्या पायरीवर नेण्याचें कसब नानासाहेबांत नसलें तरी, गुणदोष हे कोठेंही अपरिहार्य आहेत असें धरून, त्यांतील गुणांचा तेवढा शक्य तो उपयोग करून घेणें व त्यांच्या बळावर राज्यधुरा कांहीं काळ तरी जोमानें वाहणें; व हें सर्व केवळ स्वतःच्या कल्याणासाठीं न करितां तेणेंकरून स्वदेशाची भरभराट करण्याचें ध्येय साधणें, हें कांहीं सामान्य कार्य नव्हे. पेशव्यांच्या अनेक दोषांत स्वदेशाभिमानाचा अभाव हा दोष नव्हता. स्वदेशाचें महत्व वाढविण्यांतच आपलें महत्व वाढावें असा त्यांचा हेतु होता. हिंमत, शौर्य, कष्टाळूपणा, साधेपणा, वगैरे मराठ्यांच्या गुणांचा उपयोग करून घेऊन, शिवछत्रपतीच्या हिंदुपदपातशाहीच्या ध्येयाची पोंचविली एवढी तरी तड त्यांनीं पोंचविली हीच पेशव्यांची व विशेषतः नानासाहेबाची राष्ट्रेतिहासांतील ठळक कामगिरी होय व या कामगिरीबद्दलच त्यांचें नांव राष्ट्रांत संस्मरणीय झालें पाहिजे.

# वंशावळ.


विश्वनाथ भट श्रीवर्धनकर.
मुलगी ल. बहिरवभट मेहेंदळे.
बाळाजीपंतनाना ल. राधाबाई ( डुब्रेरकर बर्वे ).
गणपतराव.
विसाजी ऊर्फ बाजीराव.
भिऊबाई ल. आबाजी नाईक बारामतीकर.
अंताजी ऊ. चिमाजी आपा.
अनूबाई ल. व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर.
१ काशीबाई ( चासकर जोशी ).
२ मस्तानी ( रक्षा ), ( सती गेली ).
१ रखमाबाई ( पेठे ).
२ अन्नपूर्णा ( सती गेली ).
बयाबाई ल. ओंकार
बळवंतराव.
मुलगी ल. जनार्दन बाबा फडणीस.
नानासाहेब.
१ गोपिकाबाई ( रास्ते ).
२ राधाबाई (वाखरे पैठणकर).
रामचंद्र.
रघुनाथ.
१ जानकी (बर्वे). मृ. १७४९.
२ आनंदीबाई (ओक).
जनार्दन ल. सगुणाबाई (भिडे).
समशेर बहाद्दर.
सदाशिवराव.
१ उमाबाई. २ पार्वतीबाई (कोल्हटकर). मृत्यु स. १७८३.
कृष्णराव–आपा.
बाळाजी ऊ. नाना फडणीस.
विश्वासराव. ल. लक्ष्मीबाई (दीक्षितकायगांवकर).
माधवराव. ल. रमाबाई (सती). (जोशी मिरजकर).
नारायणराव. ल. गंगाबाई (साठे).
अमृतराव. (दत्तक).
बाजीराव.
चिमाजी.
अलीबहाद्दर ऊर्फ कृष्णसिंग, बांद्याचा नबाब.
१ मुलगे अल्पवयांत मृत.
२ मुलगे अल्पवयांत मृत.
सवाई माधवराव. मृ. १७९५.
नानासाहेब (दत्तक). १८५७.
धोंडोपंत रावसाहेब ( दत्तक. ) १८५७.

# परिशिष्ट.

नानासाहेब पेशव्याच्या दोन पत्रांच्या नकला रा. यशवंत राजाराम गुप्ते यांस पुण्याच्या मुतालिकी चिटणविशी दप्तरांत मिळाल्या, त्या त्यांनीं महाराष्ट्रसाहित्य मासिकाच्या जानेवारी १९२४ च्या अंकांत छापल्या. हीं पत्रें बाहेर विशेष माहीत नसल्यामुळें, तीं नष्ट होऊं नयेत म्हणून येथें उतरून घेतों. पहिलें पत्र गायकवाडांकडील इसम देवजी ताकपीर यास गुजराथच्या मनसुब्याबावत असावें. या चरित्रांतील पृष्ठ ६५ वर गोविंदराव चिटणिसामार्फत दमाजीचें पेशव्याशीं सूत चाललें असल्याचें लिहिलें आहे, त्या बाबत हें पत्र दिसतें. दुसरें पत्र पृष्ठ ६७ वरील निजामाच्या प्रकरणाबाबत असावें. बजाजी माधवराव हा निजामाच्या दरबारीं नानासाहेबाचा हस्तक असावा. दोन्ही पत्रें साताऱ्याहून लिहिलेलीं आहेत.

## लेखांक १

### श्री.

राजश्री देवजी ताकपीर गोसावी यांसीः–अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद. सु॥ सबा आर्बैन मया व अलफ (१७४७). तुम्ही कितेक मनसुबियाचा मजकूर, राजश्री गोविंदराव चिटणीवीस यांस लिहिला, त्यांनीं सविस्तर अवगत केलें, त्याजवरून कळों आलें. ऐशास तुम्ही पदरचे. सर्व प्रकारें तुमच्या मनसुबियाची पुष्टता करून सिधीस पावावी हें अगत्य आहे. प्रस्तुत आम्ही राजश्री स्वामिसंनिध असों. येथील गुंता उरकलीयावर पुण्यास येऊन गोविंदरायास बरोबर घेऊन येऊं. तुम्हीही भेटीस यालच. तदोत्तर तुमच्या मुखें सर्व अर्थ मनास आणून गोविंदरावाचे विचारें उचित मनसुबा कर्तव्य तो केला जाईल. येविसीचा कितेक...गोविंदराव यांस सांगितला असे, ते तुम्हांस लिहितील त्याजवरून कळेल. तुम्हीं आपलें समाधान असों देणें.

## लेखांक २

### श्री.

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बजाजी माधवराव गोसावी यांसी. सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ खमसैन मया व अलफ तुम्हीं विनंतिपत्र छ २५ जिल्कादचें (२६ आक्टोबर १७४९.) पाठविलें तें पावलें.

गोविंदपंत बुंदेले—३९, ६८, १०१, १४५-१४६, १८३-१८५, १८९-१९१, १९३-१९८.

गंगाधर यशवंत चंद्रचूड—१००-१०१, १७४, १८७.

चिमाजीआपा—२-६, १०-११, २०, ३६.

जनकोजी शिंदे—१४१-१४३, १६३, १७८-१८१, १८४-१८७, १९०, १९७, १९९, २००.

जयापा शिंदे—३८, ५२-६१, ९३, १००-१०२, १०९, १२५-१२७, १३२-१३४, १३८, १४३, २१९.

जानोजी भोसले—९१, १२७, १६०, १६६-१६७, २०७.

जानोजी निंबाळकर—१०३-१०४, ११४-११५, ११७-११९, १२१, १२७, १५९, १६३, १६९.

ताराबाई—७०-७१, ७४-७५, ७७-८२, ९२-१०१, १०४-११३, ११७, १२०-१२१, १२४-१२५, १२९-१३०.

तुळाजी आंग्रे—३७, १४८-१५२.

त्रिंबकराव दाभाडे ( धाकटा )—६५, ९५, ११३, १५९.

दत्ताजी शिंदे—११८, १३७, १४१, १४३-१४४, १६३-१६४, १७९-१८६, १९२.

दमाजी गायकवाड—१३, २१, २३, ५९-६०, ६३-६६, १०४-१०८, ११२-११३, १२३-१२४, १३५, १६३-१६५, १८८, १९४, २००.

दादोबा प्रतिनिधि—७१, ७३, ७९, ९४, ९८, १०५, १०९, १२०, १२४-१२५, १२९-१३०, १५९.

नजीबखान रोहिला—१३६, १७२-१७५, १७९-१८३, १८९-१९३, १९८, २०१-२०३, २०७.

**नानासाहेब पेशवा**—कुलवृत्त २, जन्म ३, शिक्षण ३-५, लग्न ६, आंग्यास मदत ७, पेशवे पदप्राप्ति व तत्संबंधी भानगडी ७-९, कोल्हापुरकरांशीं गुप्त तह १०-११, कारभाराचें सामान्य स्वरूप ११-१७, माळव्यावर स्वारी १९-२१, बुंदेलखंडावर स्वारी २१-२३, बंगाल्यांत स्वारी २४, काशीयात्रा २५, माळ-

ण्याच्या सनदा २६–२७, रघूजीशीं समेट २७–२९, बावूजी नायकाशीं चुरस ३२–३६, आंग्र्यांशीं भांडण ३७, भोपाळची स्वारी ३८, छत्रपतीच्या भानगडी ४०–४२, कर्नाटकचा सुभा ४३–४६, पेशवाईवरून बडतर्फ ४७–५१, पुनः पद-प्राप्ति, ५२ जयपूरचा वारसा ५३–५५, शिंदे होळकरांचीं भांडणें ५६–५७, नेवाईची स्वारी ६०–६१, दाभाड्याचें प्रकरण ६३–६५, निजामाचा वारसा ६६–६९, शाहूची अखेर व सर्वाधिकारप्राप्ति ६९–७४, सकवारबाईबद्दल आरोप ७६–७९, राज्य बळकावण्याचा आरोप ७९–८४, जातिभेदाचा आरोप ८५–८६, सर्वाधिकाराचा आटोप ८६–९५, सदाशिवरावाशीं चुरस ९६–९७, रामराजाची अटक ९८–१००, नासिरजंगाचें कारस्थान १०१–१०४, दमाजीचा पराभव व गुजराथची वांटणी १०४–१०७, ताराबाईशीं घासाघीस १०८–११३, रामदासपंतावर मात ११४–१२६, गाजीउद्दिनास मदत १२६–१२७, भालकीचा तह १२८, कर्जाची रड १३९–१४०, मारवाडच्या स्वारीबद्दल सल्ला १४१–१४५, तुळाजी आंग्र्याचा उच्छेद १४८–१५२, इंग्रजांचा कावा १५३–१५६, कर्नाटकांतील स्वाऱ्या १५७–१६०, बुसीचें उच्चाटण १६१–१६४, म्हैसूरवर स्वारी १६५–१६८, निजामशाहीची वांटणी–१६९–१७१, उत्तरेंतील कारस्थानाबद्दल सल्ला १८०–१८३, पानिपतच्या स्वारीची योजना १८८, दुसरें लग्न २०६, उत्तरेंत शेवटची स्वारी २०७, अनावर शोक, बुद्धिभ्रंश व मृत्यु २०७–२०८, अपत्यें २०९, कर्तबगारीचा अंदाज २११–२१३, स्वभावविशेष वगैरे २१४–२१८, नीतिमत्ता २१९, सरदारांची भीड २१९–२२१, विद्वत्ता २२१–२२३, इतिहासांतील स्थान २२३–२२४.

नाना पुरंदरे—९९, १०६–१०८, १८८, १९४, २१९–२२३.

नाना फडणीस—१२, १८८, १८९, २१५.

नारो राम मंत्री—७, ४०.

नारोशंकर—२५–२६, १३३, १३५, १६०, १७३, १७५, १८९, १९१, २०१, २०७.

नासीरजंग—६६–६७, ९८, १०१–१०३, ११९–१२०.

निजामअल्ली—६६, १०४, १२७, १६२–१६४, १६८–१६९.

निजामुल्मुल्क—१७, १९–२०, ३१–३४, ४२–४३, ४९, ५७–६०, ६३ ६५, ८७–८८.

पिलाजी जाधव—१९, ३६, ३८, ४४-४६, ५२, ५९, १२८, २१९.
फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर—१८, २२, ३४, ३६, ७१, १०४, २१९-२२१.
बळवंतराव मेहेंदळे—१०६, १६५-१६७, १८८, १९७.
बाजीराव—२-४, ६-७, ९, ११-१३, १८-१९, २१.
बाबूजी नाईक—८, ११, २०, ३४-३६, ४२-४६, ४९, ५१, ५७-५८, ७०, ९५, ९८-९९, ११७, १२१, १२९-१३०, २०७.
बुसी—१०३-१०४, ११८-११९, १२५-१२९, १५१, १५७-१६४, १६८.
भगवंतराव अमात्य—५८-५९, ७०, ९५.
भास्कर राम कोल्हटकर—२३, ८९-९१.
मल्हारराव होळकर—१९-२०, २३, २७, ३८, ५५-६१, ९३, ११४, ११९, १२६-१२७, १३२-१३९, १४२-१४५, १६०, १६५, १७३-१७९, १८५-१८७, २००-२०१, २०७.
महादजी शिंदे—३८, ११८, २०१.
महादाजीपंत पुरंदरे—७, ४७, ७१, ९४, ९६, ९८-१०१, १०७-१०८, ११८, १६०.
महादेवभट हिंगणे—६६-६८.
माधवराव पेशवा—२०७-२११, २१४.
माधवसिंग जयपूरकर—५३-५९, ६०-६१, १४०-१४१, १७२, १७९.
मानाजी आंग्रे—६-७, ५७, १४८—१४९, १५३.
मीर मन्नू—१३१, १३३, १३६, १७२.
मुजफरखान गारदी—१६०, १६८-१६९.
मुजफरजंग—३४, ६६-६९, १०१-१०३, ११९.
मुधोजी भोसले—२१, ६९, १६०, १६६, २०७.
मुरारराव घोरपडे—१९, ३२-३३, १०९, १२५, १६०, १६६.
यमाजी शिवदेव—४२, ७०, ७३, ९५, १२९-१३०, २०७.

यशवंतराव दाभाडे—६३-६५, ९५, १०४-१०५, १०७, ११२-११३, १२०, १२३, १५९.

यशवंतराव पवार—२०, २३, २७, ११७, १८८, २००.

रघुनाथराव—४-६, १३५-१३९, १४२-१४३, १४५-१४६, १६५, १७२, १७४-१८०, १८७-१८८, २०३.

रघूजी भोसले—८, १८-२४, २७-२९, ३१-३२, ३५-३६, ४२-४४, ५७, ६९, ७१, ८९-९३, १०१, १२०, १६६.

राणोजी शिंदे—२४-२५, २७, ३८, ५३.

रामचंद्रबाबा—३, १२, ३९, ४१-४२, ४५-४६, ५४-५८, ६०-६१, ९३-१०१, १२३, १५८, २१५.

रामदासपंत—१०३-१०५, १०७, ११३-१२२, १२५-१२६.

रामराजा—११, ७०-७४, ७९-८२, ८६, ९२-९९, १०५, १०७-११२, १२४, १३२.

रामसिंग जोधपूरकर—१३८, १४०, १४१, १४७.

रामाजी अनंत काळे—९३, १४३, १४५.

रूपराम कटारी—१३८, १८४.

रेठरेकर ( त्र्यंबक बापूजी )—२२, १०६, १८०, १८४.

विजयसिंग ( बिजेसिंग )—१४०-१४२, १४६-१४७, १७२, १७९.

विठ्ठल शिवदेव—१०६, १३५, १४३, १६०, १७८, १८०, १८९, २००, २०७.

विठ्ठल सुंदर ( निजामाचा दिवाण )—१६२-१६३, १७०.

विश्वासराव—१६३, १७०, १८८-१९१, १९४-१९५, २००, २०३, २०६, २०९, २११.

शाहू छत्रपति—२, ६, ११, १५, १८-१९, २७-२८, ३४-३५, ३७, ४०-५२, ५७-५८, ६२-६५, ७०-७५, ७८-८०, ९२.

सकवारबाई—३५, ६९-७३, ७६-८०, ९९.

सखाराम बापू—१२, ४७, १३७, १८८.

**सदाशिवराव**—५, ६, २१, ३९; कर्नाटकांतील स्वारी ४५–४७; सांगोल्याची व्यवस्था ९३–९६; कोल्हापुरकरांची पेशवाई ९७; १००, १०७, १२३, १४५, १४६, १५१, १५८, १६३–१६५; उदगीरची मोहीम १६९–१७०; पानिपत १८७–२००; २०३–२०५.

सफदरजंग—१३१–१३६, १३९, १४२.

समशेरबहादर—११८, १८९, २००.

सलाबतजंग—६६, १०३–१०४, ११३–११७, १२५–१२९, १५८–१६४.

सवाई जयसिंग—२१, ४०, ५३, ५४.

सुजाउद्दौला—१४२, १७२, १८०–१८३, १८९–१९३, १९८, २०१–२०२.

सुरजमल जाठ—१३३,१३६–१३८, १४५–१४६, १७२, १९०, १९३, २०१–२०२.

संभाजी कोल्हापुरकर—१०–११, ४४–४५, ७१, ७५, ७९–८०, १५९.

हिंगणे ( बापूजी महादेव )—६८, १३४–१३६, १७३, १७५, २१९.

हैदर—१६६–१६८.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०४८

REFBK-0003048